म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. ७१३४

राजवाडे लेखसंग्रह

REFBK-0009755

साहित्य अकादेमी

राजवाडे-लेखसंग्रह

राजवाडे-लेखसंग्रह

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थलप्रत.
अनुक्रम 2.3.3.6.4.6 दि: 1.12.2014
क्रमांक ....99.3.6.... नों: दि: 22.12.2014

संपादक
लक्ष्मणशास्त्री जोशी



REFBK-0009755

साहित्य अकादेमी
नवी दिल्ली

प्रकाशक : साहित्य अकादेमी, नवी दिल्ली
वितरक : पॉप्युलर बुकडेपो,
लॅमिंग्टन रोड, मुंबई ७

पहिली आवृत्ती
१९५८

किंमत : ५ रुपये

मुद्रक : म. शं. साठे, दी प्राज्ञप्रेस, वाई जि. उ. सातारा

हस्तलपत.
23344 वि. 1/वि/...
7737.... ता. वि. 44/10/45

अनुक्रमणिका

१ विकार विचार प्रदर्शनाच्या साधनांची उत्क्रांति १
[इतिहास व ऐतिहासिक खंड २ वर्ष तिसरें १-३१]

२ इतिहासाच्या दोन बाजू भौतिक व आध्यात्मिक २८
[ऐतिहासिक प्रस्तावना २६-२७]

३ इतिहास म्हणजे काय ? २९
[ऐतिहासिक प्रस्तावना २८०-२८२]

४ हिंदु समाजांत हिंद्वितरांचा समावेश ३३
[भा. इ. सं. मंडळ, पुणें चतुर्थ संमेलन-वृत्त, १-२६]

५ हिंदुस्थानांतील आर्य लोकांचा वर्ण ६०
[राजवाडे लेखसंग्रह भाग ३ १५९-१६४]

६ आमचीं पुराणें व असीरियांतील नवे शोध ६६
[राजवाडे लेखसंग्रह भाग ३ ६४-८३]

७ "मग" ब्राह्मण कोण ? ८४
[राजवाडे लेखसंग्रह भाग ३ ११-२०]

८ "मगध" ९३
[राजवाडे लेखसंग्रह भाग ३ १८५-१८७]

९ नट व निच्छवि ९५
[राजवाडे लेखसंग्रह भाग ३ १४५]

१० महाराष्ट्रांतील प्राकृतिक भाषांचा व वाङ्मयाचा इतिहास ९६
[इतिहास व ऐतिहासिक वर्ष दुसरें ३५१-३६६]

११ मराठ्यांचा इतिहास कसा लिहावा ११०
[ऐतिहासिक प्रस्तावना १०२-१०५]

१२ महाराष्ट्राची वसाहत ११४
[राधामाधवविलास चंपू १५८-१७३]

१३ महाराष्ट्र व उत्तर कोंकणची वसाहत १४४
[महिकावतीची बखर ८५-१०६]

१४ मराठी राज्याचा हेतु १६८
[ऐतिहासिक प्रस्तावना ३१-४७]
१५ मराठ्यांच्या इतिहासाचें कार्य व पराभव १८७
[ऐतिहासिक प्रस्तावना ९१-९७]
१६ मराठी राज्याचा विकास १९५
[ऐतिहासिक प्रस्तावना १७७-१८०]
१७ मराठेशाहीचा पाया घालणारा शहाजी १९९
[राधामाधवविलास चंपू १००-१२५]
१८ शिवाजीची गुणसंपदा २२३
[ऐतिहासिक प्रस्तावना २८८-२९३]
१९ रामदास २२९
[ग्रंथमाला-संकीर्ण लेखसंग्रह]
२० कादंबरी २६६
[ग्रंथमाला-संकीर्ण लेखसंग्रह]



मराठीचे निरुक्तकार व इतिहासाचार्य

विश्वनाथ काशिनाथ राजवाडे

जन्म
१२ जुलै १८६४

निधन
३१, डिसेंबर १९२६

23344 दि: 9937 वि: दि:

प्रस्तावना

जन्म व बाल्यावस्था

श्री. विश्वनाथ काशिनाथ राजवाडे यांचा जन्म शके १७८५ (सन १८६३) आषाढ शुद्ध ८ ला कोंकणांत वरसई येथें झाला. त्यांचें बालपण व प्राथमिक शिक्षण पुणें जिल्ह्यांतील वडगांव येथें झालें. त्यांचे पितामह वडगांव जवळील लोहगडचे किल्लेदार होते. त्यांचे वडील बाळपणींच वारले. शिक्षण प्रथम चुलत्याजवळ झालें. भाषा व गणित ह्या विषयांत गति उत्तम होती. परंतु धांगडधिंगा, मस्ती, मारामारी, इत्यादि हूडपणा करण्यांत व विटीदांडू, पोहणें, पळणें, आट्यापाट्या, खोखो, इत्यादि खेळांत लहानपण गेलें. महाविद्यालयीन शिक्षण संपेपर्यंत कसरतीचा नाद खूप राहिला. त्यामुळें शरीर बळकट व काटक बनलें.

मध्यम व उच्च शिक्षण

माध्यमिक व बहुतेक उच्च शिक्षण पुणें येथें झालें. त्यांनीं आपले विद्यार्थी-दशेंतील शिक्षणविषयक अनुभव ' कनिष्ठ, मध्यम व उच्च शालांतील अनुभव ' या विस्तृत (छापील ५० पृष्ठांच्या) लेखांत नमूद केले आहेत. त्यांच्या आत्म-चरित्राचें हें एक उत्तम प्रकरण आहे. हा लेख उत्कृष्ट साहित्याचा एक नमुना म्हणून मराठींत कायम राहीलच पण त्या शिवाय त्यांत त्या वेळच्या भारतीय शैक्षणिक संस्थांचेंहि दर्शन घडतें आणि इंग्लिशांनी निर्माण केलेल्या शिक्षणपद्धतीच्या गुणावगुणांची गंभीर मीमांसाहि वाचावयास मिळते. राजवाडे यांची नैसर्गिक बुद्धिमत्ता विशाल होती. त्या बुद्धिमत्तेचा संपूर्ण उपयोग होऊन बौद्धिक प्रगति व्हावी अशा प्रकारचें सकस शिक्षण देण्याची योग्यता असलेल्या शिक्षकांचा आज-सारखाच दुष्काळ त्या वेळच्या मध्यम व उच्च शिक्षणसंस्थांमध्येंहि होता. म्हणून राजवाडे या संबंधी म्हणतात कीं, ' पंतोजी (शिक्षक) आडमुठे, पोटभरू, इकडची पाटी तिकडे नेऊन टाकणारे होते ', ' जर चागला शिक्षक (हायस्कूलमध्यें) मिळता तर ३ वर्षांत बी. ए. इतकी तयारी झाली असती '. मध्यम शिक्षण देणाऱ्या इंग्लिश शाळांबद्दल ते आपल्या लेखांत असें सांगतात कीं, त्यांना एकंदर पुणें येथील तीन इंग्लिश शाळांमध्यें क्रमानें शिकण्याचा योग आला. प्रथम सन १८७६ मध्यें बाबा गोखले यांच्या शाळेंत ते दाखल झाले. शाळेचे ठिकाण गलिच्छ, दुर्गंधाचें माहेरघर, पडक्या भिंती, जवळच उघडीं गटारें, आणि पाट्यांचे पायखाने. शिक्षक चुकार, एका तासांत

५–१० मिनिटेंच वर्गशिक्षण देत. नंतर ते वासुदेव बळवंत फडके (बंडवाले) यांनीं स्थापन केलेल्या हायस्कूलमध्यें प्रविष्ट झाले. या संस्थापकानें सद्बुद्धीनें शाळा काढली होती. परंतु तेथेंहि नालायक शिक्षक पुष्कळ. नंतर खिश्चन मिशनऱ्यांच्या हायस्कूल-मध्यें प्रवेश मिळविला. तेथेंहि अनेक शिक्षक व्यसनी, दारुडे व अनाचारी दिसले. सर्वत्र आचारहीन व देशभक्तीचा लेशहि नसलेलेच शिक्षक भरलेले होते. त्यास मोठा अपवाद म्हणजे कै. विष्णुशास्त्री चिपळूणकर यांनीं स्थापलेलें न्यू इंग्लिश स्कूल होय. यासंबंधी राजवाडे लिहितात कीं, तें स्थापतांना चिपळूणकरांनीं अशी प्रतिज्ञा केली होती कीं, आपल्या शिक्षणसंस्थेला गोऱ्या इंग्लिश साहेबाचा पाय लागूं द्यावयाचा नाहीं. परंतु चिपळूणकर अल्पायुषी ठरले. त्यांच्याहि संस्थेंत संस्थाचालकांनीं मागाहून इंग्लिश गोऱ्या अधिकाऱ्यांचें सुस्वागत करण्याची प्रथा सुरूं केली.

सन १८८२ जानेवारींत राजवाडे मुंबई विद्यापीठाची प्रवेशपरीक्षा (मॅट्रिक) उत्तीर्ण झाले. मुंबईच्या सुप्रसिद्ध एल्फिन्स्टन कॉलेजमध्यें पहिली सहामाही काढली. नंतर पैसे नसल्यामुळें कॉलेज सोडावें लागून पोट भरण्याकरितां खाजगी माध्यमिक शिक्षण देण्याचा वर्ग काढला. पुढें १८८४ सालीं वडील बंधु प्रा. वैजनाथ काशिनाथ राजवाडे यांस पुणें येथील डेक्कन कॉलेजांत फेलोशिप मिळाली. त्यामुळें वडील बंधूंच्या मदतीनें डेक्कन कॉलेजांत विश्वनाथपंत राजवाडे यांना शिक्षणास अवसर मिळाला. या कॉलेजांत त्यावेळीं भारतीय कीर्तीचे विद्वान न्यायकोशकर्ते म. म. भीमाचार्य झळकीकर, डॉ. रामकृष्ण गोपाळ भाडारकर इत्यादि प्राध्यापक होते. या कॉलेजमध्यें राजवाडे यांनीं ६ वर्षें काढलीं. १८९० सालीं जानेवारींत ते बी. ए. उत्तीर्ण झाले. क्रमानें प्रत्येक वर्षीं ते परीक्षेस बसलेच नाहींत. लहर येईल तेव्हां एका वर्षाचा अध्ययनक्रम २ महिन्यांत तयार करून परीक्षेस बसायचें व उत्तीर्ण व्हावयाचें; मधलीं अनेक वर्षें गाळलीं. कारण कॉलेजमधील परीक्षेस नेमलेल्या अनेक पुस्तकांच्या अध्ययनांत त्याना कालक्षेप करणें आव-डलें नाहीं. तर्कसंग्रह, लार्ड बेकन इ० पुस्तकें जुन्या पुराण्या बाधित झालेल्या सिद्धान्तांनीं भरलेलीं होतीं अतएव त्याचें अध्ययन व्यर्थ होय, असें त्यांना वाटे. म्हणून त्यांनीं या कालखंडांत पाश्चात्त्य ग्रंथकारांच्या इतिहास, तत्त्वज्ञान, समाजशास्त्र, साहित्य, या दृष्टीनें महत्त्वाच्या मोठमोठ्या ग्रंथांचें परिशीलन करण्यांत व समवयस्क विद्यार्थ्यांबरोबर गप्पा छाटण्यांत बराच वेळ घालविला आणि त्या बरोबरच शारीरिक व्यायाम करून शरीरसंपत्ति कमावली. कॉलेजच्या ७ वर्षांत ते कधीहि आजारी पडले नाहींत. कॉलेज-शिक्षणांतील परीक्षांची पद्धति त्यांना कंटाळवाणी व खुळचटपणाची वाटली. कॉलेजमध्यें दाखल झाल्यापासूनच त्यांनीं सरकारी नोकरी करावयाची नाहीं असा निश्चय केला होता; त्यामुळें परीक्षा उत्तीर्ण होण्याला त्यांनीं बिलकुल महत्त्व दिलें नाहीं. व त्यामुळें तेथील शिक्षक व विद्यार्थी यांच्याशी त्यांचे घनिष्ठ संबंधहि

निर्माण झाले नाहींत. या संबंधी ते म्हणतात, " शिक्षकांशीं व परीक्षार्थ्यांशीं माझा फारसा स्नेह झाला नाहीं याचें मुख्य कारण हेतूंची भिन्नता हें होय. शिक्षकांचा हेतु मुलें परीक्षेकरितां तयार करण्याचा; मुलांचा हेतु परीक्षा देऊन नोकरी मिळविण्याचा; आणि माझा हेतु केवळ विद्यार्जन करून पूर्णपणें स्वतंत्र धंदा करण्याचा. केवळ विद्यार्जन करण्याचा हेतु बाळगणारा मी नोकर तयार करण्याच्या गिरणींत जाऊन पडलों ... ... सरकारी नोकरी म्हणून करावयाची नाहीं असा दृढतर ग्रह माझ्या मनाचा झाला ... ... वाजवीच आहे कीं ह्या भाडोत्री शिक्षकांच्या गुलामगिरीच्या नोकऱ्यांचा व कंटाळवाण्या परीक्षांच्या पासून मी पराङ्मुख झालों व पुस्तकालयांतील ग्रंथांकडे एकदिलानें वळलों. १८८४ पासून १८९० पर्यंतच्या सात वर्षांत व पूर्वीच्या दोन वर्षांत युरोपियन इतिहास, अर्थशास्त्र, नीतिशास्त्र, राजनीतिशास्त्र, तत्त्वज्ञान, तर्कशास्त्र व मानसशास्त्र ह्यांवरील प्राचीन व अर्वाचीन, अस्सल व भाषान्तरित बरेच ग्रंथ मी मननपूर्वक वाचले. शिवाय वनस्पतिशास्त्र व फारशी भाषा कामापुरती मी शिकलों ... प्लेटोचें सुराज्य (रिपब्लिक) मी याचवेळीं सबंध मराठींत उतरलें... ह्या (सरकारी) शिक्षणपद्धतीचा मुख्य हेतु जो नोकरीकरितां परीक्षा देणें तो मी बहुतेक अजीबात झुगारून दिला. त्यामुळें ह्या शिक्षणपद्धतीनें जें एकप्रकारें मानसिक दौर्बल्य येतें व कर्तृत्वशक्तीचा ऱ्हास होतो तो माझ्या ठायीं झाला नाहीं. परंतु एका दुष्ट खोडीनें मात्र मला अतोनात ग्राशिलें. ती खोड म्हणजे दुसरी तिसरी कांही नाहीं. इंग्रजी बोलण्याची व इंग्रजीत विचार करण्याची. ... सतत पंधरा वर्षें, बारा आणि बारा चोवीस तास सर्व कामें मी इंग्रजींत करूं लागलों ... परंतु-दोघा तिघा गृहस्थांनीं मला ह्या विपत्तींतून वाचविलें. विष्णुशास्त्री चिपळूणकरांच्या टीकात्मक निबंधांनीं इंग्रजीच्या ह्या खग्रासापासून माझा बचाव केला. काव्येतिहाससंग्रहकारांच्या ऐतिहासिक पत्रांनीं स्वदेश म्हणून कांही आहे हें मला कळलें व परशुरामतात्या गोडबोले ह्यांनीं छापलेल्या काव्यांनीं महाराष्ट्रसारस्वताचा मला अभिमान वाटूं लागला." यावरून राजवाडे यांच्या ध्येयवादी जीवनाची नांदी महाविद्यालयीन शिक्षणाच्या समयीच सुरूं झाल्याचें निदर्शनास येतें.

भारतीय पुनरुज्जीवनाची प्रेरणा

महाविद्यालयीन शिक्षण संपल्याबरोबर त्यांचा विवाह झाला. परंतु पत्नी थोड्याच अवधीत कालवश झाल्यानंतर राजवाडे यांच्या ध्येयवादी जीवनाला म्हणजे दीर्घ अशा ज्ञानमय तपाला एकाग्रता लाभली. सन १८९५ मध्यें त्यांनी 'भाषांतर हें मराठी मासिक सुरूं केलें. त्यांत प्लेटो, ॲरिस्टॉटल, गिबन इत्यादि पाश्चात्त्य ग्रंथकार व शंकराचार्य इत्यादि भारतीय ग्रंथकार यांच्या ग्रंथांचीं भाषान्तरें क्रमानें प्रसिद्ध करणें हा त्यांचा उद्देश होता. त्याकरितां अनेक संस्कृतच्या व इंग्लिशच्या

विद्वान पदवीधरांचें साहाय्य त्यांना मिळूं लागलें. तें 'भाषांतर' मासिक दोन वर्षें पुरी होण्याच्या आंत बंद पडलें. परंतु त्या मासिकाच्या प्रथम अंकांतील प्रास्ताविक लेखावरून राजवाडे यांचा जीवनोद्देश व्यक्त होतो. ज्या ज्ञानाच्या प्रकाशामुळें युरोप हा अंधकारमय मध्ययुगांतून जागा झाला तें ज्ञान भारतालाहि प्राप्त होणें जरूर आहे; त्यायोगेंच येथील बौद्धिक व मानसिक अवनति संपून पुनरुज्जीवन (Renaissance) सुरूं होईल. नव्या ज्ञानाचा प्रकाश येथील लोकांना लोकभाषेंतून मिळावा म्हणून त्यांनीं 'भाषान्तर' मासिक सुरूं केलें. भाषान्तर मासिक लवकर बंद पडलें. परंतु त्यामुळें राजवाडे यांच्या पुनरुज्जीवनाच्या किंवा नवजीवनाच्या प्रयत्नांना खंड पडला नाहीं. त्यांनीं त्याकरितां इतिहासविद्येचा आश्रय केला. १४ व्या शतकांतील युरोपच्या पुनरुज्जीवनापेक्षां १९ व्या शतकांतील भारतीय पुनरुज्जीवनाची पार्श्वभूमि अत्यन्त निराळी दिसल्यामुळें राजवाडे यांनीं त्याला ऐतिहासिक जाणिवेचें अधिष्ठान पाहिजे असें निश्चित केलें. कारण हा देश परकीय राज्यसत्तेनें जिंकलेला असल्यामुळें त्याच्या पराभूत मनोवृत्तीला अस्मितेची व आत्मस्मृतीची आवश्यकता होती. म्हणून इतिहासविद्येच्या स्थापनेची गरज निर्माण झाली. परंतु या अस्मितेच्या जाणिवेबरोबरच बुद्धिवादी अशा आधुनिक वैज्ञानिक संकृतीचेंहि बल प्राप्त करून घेणें आवश्यक झालें. राजवाडे यांनीं आपल्या इतिहासमीमांसेंत भारत पाश्चात्त्यांनी कसा जिंकला व भारत त्यांच्या पुढें कां पराभूत झाला यासंबंधी कार्यकारणभाव सांगतांना पाश्चात्त्यांची संस्कृति ही भारतीय हिंदूंपेक्षा अधिक प्रगत अतएव अधिक समर्थ होती हें सांगितलें आहे. याचा अर्थ असा कीं भारतीयांना स्वाभिमान व वैज्ञानिक संस्कृति या दोन्ही गोष्टींचा लाभ झाल्याशिवाय भारतांत नवजीवन येणार नाहीं असा सिद्धान्त राजवाडे यांनी सूचित केला. या ऐतिहासिक चिंतनानें मराठी भाषेंत नवजीवनाचें बीजच रोंवलें.

मराठ्यांचा इतिहास, मराठी भाषेचें व संस्कृतचें ऐतिहासिक व्याकरण, जुन्या मराठी वाङ्मयाचा इतिहास व भारतीय वा हिंदु समाजाच्या इतिहासाची समाजशास्त्रीय मीमांसा या संबंधांत इतिहाससंशोधक राजवाडे यांचें संशोधनमय लेखन व त्यांनी संपादित केलेले ग्रंथ यांचें महत्त्व अनन्यसाधारण आहे. मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें त्यांनीं गोळा करून प्रसिद्ध केलीं किंवा मराठी वाङ्मयाची मध्ययुगीन ग्रंथसंपत्ति व अनेक ग्रंथकार परिश्रम पूर्वक शोधून प्रकाशांत आणले एवढीच त्यांची इतिहासक्षेत्रांतली कामगिरी नाही; तर त्यांनी इतिहासाचीं आधुनिक तत्त्वदर्शनें, समाजशास्त्रीय विविध विचारप्रणाल्या आणि भाषाशास्त्र यांचेंहि चिरकाल मनन करून त्या संबंधी स्वतःचे सिद्धान्त रचले व भारतीय समाजेतिहास व भाषेतिहास यांना ते सिद्धान्त लागू करून कांहीं महत्त्वाच्या निर्णयांप्रत ते येऊन पोंचले. त्याकरितां त्यांनीं ग्रीस, रोम, मध्ययुगीन व आधुनिक युरोप, याचे जे सुप्रसिद्ध

इतिहास व जागतिक इतिहास प्रथितयश ग्रंथकारांनी लिहिले त्यांचाहि व्यापक व्यासंग केला होता.

लेखनकार्याचा तपशील

राजवाडे यांच्या लेखनकार्याचा तपशील पुढील प्रकारचा आहे. राजवाडे यांच्या सन १८९० ते १९२६ पर्यंतच्या प्रौढावस्थेंतील कालांत भारतीय व विशेषतः महाराष्ट्रीय आधुनिक पंडितांच्या लेखनांत व चर्चेंत जे ऐतिहासिक मुद्दे उपस्थित होत होते व त्यासंबंधी जी लेखन-भाषणात्मक चळवळ चालू होती त्या मुद्यांना व वैचारिक चळवळीला धरून राजवाडे आपलें संशोधन व मनन करीत व संशोधनाचें व मननाचें फलित लेखन रूपानें वेळोवेळीं प्रसिद्ध करीत. कॉलेजमध्यें शिकत असतांनाच प्रथम त्यांनीं प्लेटोच्या (Republic) गणराज्याचें मराठी भाषांतर केलें; तें अंशतः त्यांनीच सुरूं केलेल्या भाषान्तर मासिकांत १८९५ मध्ये अंशतः प्रसिद्ध झालें. परंतु तें मासिक दीड वर्षांतच बंद झाल्यामुळें गणराज्य (Republic) संपूर्ण प्रसिद्ध होऊं शकलें नाहीं. सन १८९८-१९२६ पर्यंतच्या अवधींत त्यांनीं आपल्या जीवितोद्देशांतील महत्त्वाचें कार्य म्हणून 'मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें' या संग्रहाचीं २२ खंडें (सुमारें ११ सहस्र पृष्ठें) प्रसिद्ध केलीं. या बावीस खंडांपैकी १-६, ८ या खंडांना आणि १० व ११ या खंडांना त्यांनीं ऐतिहासिक विवेचनात्मक निबंध या स्वरूपाच्या प्रस्तावना लिहिल्या आहेत. त्यांतील १,३,४,६,८ या महत्त्वाच्या असून पहिल्या खंडाची प्रस्तावना ही सर्वांत मोठी म्हणजे १२३ पृष्ठांची आहे; त्यामध्यें मराठ्यांच्या इतिहासाचे कांही महत्त्वाचे प्रश्न उपस्थित करून उलगडून दाखविले आहेत, त्याच प्रमाणें स्वतःचा इतिहासदर्शनाचा मौलिक दृष्टिकोणहि मांडला आहे. या प्रथमखंडाच्या प्रस्तावनेनें राजवाडे यांची महाराष्ट्रीय सुशिक्षितांत खूप प्रशंसा झाली व त्यांना थोर इतिहासचिंतक म्हणून प्रतिष्ठा प्राप्त झाली. ही त्यांची प्रतिष्ठा शेवटपर्यंत केवळ टिकली एवढेंच नाही तर लेखनकार्याच्या वाढीबरोबर ती वाढत गेली. तिचे अनेक तेजस्वी पैलू प्रकट होत गेले. मराठीमध्यें त्यांच्या समयीं जीं महत्त्वाचीं वैचारिक विषयाला स्थानदेणारीं मासिकें वा नियतकालिकें होतीं त्यामध्यें म्हणजे विश्ववृत्त, ग्रंथमाला, सरस्वती मंदिर, प्राची प्रभा, इतिहास व ऐतिहासिक, रामदास व रामदासी, केसरी, भारतेतिहास संशोधक मंडळाचें वार्षिक संशोधनवृत्त इत्यादिकांमध्ये मधून मधून लेख प्रसिद्ध करीत. त्यांतून त्यांचे अनेक मोठे निबंधहि आले आहेत. 'महाराष्ट्राचा वसाहतकाल ' हा ग्रंथ ' इतिहास व ऐतिहासिक' मासिकांत खंडशः प्रसिद्ध झाला. 'तिङन्त विचार' हा मराठीच्या ऐतिहासिक व्याकरणावरील निबंध ' प्राची प्रभा ' या मासिकांत प्रसिद्ध झाला. त्यांचा 'सुबन्त विचार' हा निबंध भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणें, या संस्थेनें; 'संस्कृत भाषेचा उलगडा' हा निबंध स्वतंत्र

पुस्तक म्हणून सत्कार्योत्तेजक सभा, धुळे, या संस्थेनें व 'मराठी धातुकोश' हा मराठी ३० सहस्र धातूंच्या निरुक्तावरील ग्रंथ धुळें येथील राजवाडे संशोधन मंदिरानें प्रसिद्ध केला आहे. सन १९०३ सालीं ग्रंथमाला मासिकाच्या संपादकांनीं राजवाडे यांचा त्या समयापर्यंत प्रसिद्ध झालेल्या लेखांचा 'संकीर्ण लेखसंग्रह' प्रकाशित केला. राजवाडे यांच्या निधनानंतर त्यांनीं ग्रंथांच्या प्रस्तावना म्हणून किंवा स्वतंत्र लेख म्हणून जें कांहीं लेखनकार्य केलें त्याचा संपूर्ण संग्रह तीन खंडांत मिळून चित्रशाळा, पुणें, या संस्थेंने प्रसिद्ध करून प्रशंसनीय कामगिरी केली आहे. या तीन भागांच्या संग्रहाशिवाय आणि वर निर्दिष्ट केलेल्या लेखनकार्याव्यतिरिक्त अत्यन्त चिरस्थायी महत्त्वाचे राजवाडे यांचे निबंध म्हणजे राधामाधवविलास चंपू व महिकावतीची बखर यांच्या प्रस्तावना होत. या प्रस्तावना म्हणजे भारताच्या व महाराष्ट्राच्या इतिहासाचें गंभीर तत्त्वचिंतनच होय; त्यांचें वैचारिक मूल्य मोठें आहे.

मराठ्यांच्या इतिहाससाधनांची जुळवाजुळव करण्याकरितां राजवाडे यांनीं आपलें सर्व आयुष्य वाहिलें. राजवाडे यांचें असें मत होतें कीं, भारताचा व महाराष्ट्राचा शास्त्रशुद्ध इतिहास उपलब्ध होण्याकरितां इंग्लिश इतिहासकारांवर अवलंबून राहणें * धोक्याचें आहे, त्यांनीं लिहिलेला इतिहास हा बहुशः जेत्यांच्या दृष्टिकोणांतून लिहिलेला जितांचा इतिहास असण्याचा संभवच फार; आपला इतिहास शास्त्रशुद्ध, निःपक्षपाती व पूर्वग्रहशून्य मनाने लिहिला जावा व तो तथ्य-(Facts) निष्ठ प्रमाणांवर आधारला जावा; अशा इतिहासानेंच राष्ट्राला आत्मस्मृति लाभेल; म्हणून ऐतिहासिक प्रमाणांची जुळणी करणें हें इतिहासकाराचें प्रथम कर्तव्य होय; त्याकरितां अनेक इतिहासकारांनीं जन्मभर तपःसाधनाच करणें आवश्यक आहे अशी त्यांची श्रद्धा होती.

राजवाडे यांची ज्ञानमय तपश्चर्या

अशी श्रद्धा त्यांच्या ठिकाणीं तारुण्यांत, विद्यार्थीदशेंतच उत्पन्न झाली. त्यानंतर त्यांनीं आपलें सर्व जीवित इतिहासाच्या ज्ञानमय तपांत व्यतीत केलें. इ. सन १८९५–१९२६ पर्यंत, अंतकालापर्यंत, लोकनिरीक्षणार्थ व इतिहास साधनांचा शोध करण्याकरितां भारताची व विशेषतः मराठी भाषिक प्रदेशाची निरंतर यात्रा करीत ते राहिले. ही यात्रा त्यांनी अनिकेत बनून परंतु स्थिरमतीनें केली. गृहस्थाश्रमाचा बंध म्हणजे पत्नी; २७ वर्षें वय होण्याच्या आंत त्यांच्या पत्नी निधन पावल्या. नंतर ते

---

* राजवाडे यांनीं कॉलेजमध्यें इतिहास पठन करतांना काय मनांत आलें तें लिहिलें आहे- "हिंदुस्थानच्या विशेषतः महाराष्ट्राच्या इतिहासावर इंग्लिश लेखकांनीं जीं 'पुस्तकें' लिहिलीं आहेत त्यांपैकीं पुष्कळ यावेळीं पाहण्यांत आलीं, आणि ह्या देशाचा इतिहास लिहिण्यास हे लोक किती नालायक आहेत हें युरोपियन इतिहासकारांशीं तुलना करतां माझ्या पूर्णपणें ध्यानांत आलें."

परिव्राजक म्हणजे चिरयात्रिक बनले; इतिहासांत व पुराणांत वर्णिलेलीं स्थलें पहात हिंडले. त्यांतील कांही इतिहासदृष्ट्या महत्त्वपूर्ण वाटणाऱ्या स्थलांचीं वारंवार दर्शनें घेतलीं. प्रांत, ग्रामें, नगरें, सरोवरें, नद्या, पर्वत, गड व गढ्या पाहिल्या. हें अवलोकन करतांना इतिहासवर्णित घटनांची त्या स्थलकालांशीं तुलना करीत इतिहासाचें मनन करीत. त्या स्थलांतील किंवा प्रदेशांतील जमाती, त्यांच्या चालीरीति, वाङ्मय, भाषोपभाषा, संज्ञा व उच्चार यांचा निरुक्तशास्त्र, वंशशास्त्र व समाजसंस्थाशास्त्र द्वारें छडा लावीत. प्रवासांतले कांहीं दिवस, आठवडे किंवा महिने एकाद्या मुक्कामांत राहून वाचन, लेखन व मनन या करितां काढीत.

अशा मुक्कामांत ऐतिहासिक कागदपत्रें किंवा हस्तलिखित पोथ्यापुस्तकें यांचा संग्रह कोणाकडे आहे काय त्याची चवकशी करून तो मिळविण्याची खटपट करीत व मिळाल्यावर महत्त्वाचें लिखाण हातीं आलें कीं त्यावर बुभुक्षिताप्रमाणें तुटून पडत. मालकाची खुषी असली व त्यामुळें तो संग्रह अन्यत्र सोयीच्या स्थळीं अध्ययनार्थ व संग्रहार्थ नेण्यास मिळाला तर तिकडे न्यावयाचा. जर तितकी खुषी नसली तर मालकाच्या मर्जीप्रमाणें त्याच गांवीं मुक्काम ठोकून वाचन, तर्जुमा इत्यादि कामें करावयाचीं. राजवाडे यांची मनःप्रकृति दुर्वासमुनीप्रमाणें होती हें सर्वत्र प्रसिद्ध आहे. परंतु इतिहाससाधनांचा लाभ ज्याच्याकडून होण्याची शक्यता असे त्याच्याशीं त्यांचें वर्तन पुष्कळदां विनयशील किंवा निदान संयमीं असावयाचें. नवीं कागदपत्रें किंवा वैशिष्ट्यपूर्ण असें अन्यप्रकारचें लिखाण हातीं पडल्याबरोबर त्याच्या वाचनांत व प्रतिलीपि करण्यांत देहभान विसरून त्यांचें अहोरात्र काम चालावयाचें. मितनिद्रा व मित आहारविहार असावयाचे. दुपारीं एकदांच २ किंवा ३ वाजतां स्वहस्तानेंच बहुशः पाकसिद्धि करून दूधभातासारखा सात्त्विक आहार घेत. रात्रीं फलाहार किंवा दूध घेत. स्वच्छतेची फार काळजी घेत. एकच लहानसें व्यसन होतें. तें म्हणजे विडी. कित्येकदां चार पांच विड्याहि एकदम शिलगावून पीत बसत व धुराच्या वलयाकडे मंद नजर टाकीत ऐतिहासिक प्रश्नांच्या चिंतनांत निमग्न होत.

हस्तलिखितांचीं दप्तरें तपासतांना खूप कष्टहि पडत. स्वच्छ व व्यवस्थित रीतीनें ठेवलेलीं दप्तरें त्यांना फार थोड्या ठिकाणीं आढळलीं. बऱ्याच ठिकाणीं मालक दप्तरें दाखविण्यास नाराज असत. त्यांना राजी करण्याकरितां खटपट करावी लागे. लागेबांधे किंवा वजनदार माणसांचें दडपण यांचा उपयोग करणें भाग पडे. त्यांत पुनः दप्तरें पहावयास मिळालीं तरी तर्जुमा करण्यास किंवा योग्य ठिकाणीं संग्रह करण्याकरितां नेण्यास पुष्कळच आर्जवें करावीं लागत. प्रथम पुष्कळदा दप्तरें सुरक्षित नसावयाचीं. अडगळीच्या माडीत जाळ्या-जळमटांनी भरलेल्या जागेंत अस्ताव्यस्तरीतीनें टाकलेल्या राशींत पडलेलीं असावयाचीं. त्यावर पाऊस गळून कित्येक दप्तरांचा कागद एकमेकांस चिकट्टून कागदपत्रांच्या विटाच बनलेल्या

असावयाच्या. अक्षरें व ओळी ओघळ जाऊन अस्पष्ट झालेल्या स्थितींत असायचीं किंवा उंदीर व बागुर्डे यांनीं खराबी केलेलीं किंवा कसरींनीं अर्धवट नष्ट झालेलीं कागदपत्रें असावयाचीं. अशा स्थिस्तींत कसलाहि निर्वेद उत्पन्न होऊं न देतां शांतपणें बिनतक्रार त्या कागदपत्रांची नीट जुळणी करून व साफसफाई करून त्यांचें अध्ययन करून विल्हेवाट लावत. असें हें तप ३५–४० वर्षें राजवाडे यांनीं केलें आणि मराठी भाषेंत इतिहासाचीं साधनें सिद्ध केलीं. असे अविश्रांत श्रम करीत असतां अडचणी व संकटेंहि आलीं परंतु त्यांना तोंड देऊन अधिक उत्साहानें कामें केलीं.

उदाहरण म्हणून प्रथम खंडाच्या संपादनाची हकीकत ध्यानांत ठेवण्यासारखी आहे. त्यांच्या इतिहाससाधनाच्या संशोधनास खरा प्रारंभ वाई प्रांतींच झाला. वाई येथील श्री. एरंडे यांच्या वाड्यांत पानिपतच्या संग्रामाच्या काळांतील कागदपत्रांचा कातडी पेटींत सुरक्षित ठेवलेला व अव्वल दर्जाच्या प्रमाणांनीं भरलेला असा संग्रह त्यांच्या हातीं लागला. इतिहाससाधनांचा प्रथम खंड त्यावरूनच त्यांनीं तयार केला. तो खंड पुणें येथें फडकेवाड्यांतील विष्ठल छापखान्यांत छापला. परंतु त्या छापखान्यास आग लागून तो जळला व त्याबरोबर प्रथम खंडाचीं पुस्तकेंहि भस्मसात् झालीं. पुनः तोच खंड त्यांनीं स्वहस्तानें लिहून काढला. त्याकरितां खूप काम करून दमरें पुनः तपासावीं लागलीं. तेव्हां एक मित्र त्यांना म्हणाले कीं तुम्ही इतकें काम करून जीवाला फार ताप करून घेतां. त्यांनीं त्यावर उत्तर दिलें कीं, ' माणूस काम करून मरत नाहीं, आळसानें मरतो.' प्रथम खंडाच्या प्रस्तावनेंत त्यांनीं पानिपतच्या संग्रामांत झालेल्या मराठ्यांच्या पराभवाची मीमांसा केली. नंतर त्यांनीं वाईच्या जवळ मेणवली येथील नानाफडणवीसांचें दप्तर रात्रंदिवस काम करून तपासलें. नंतर वाईजवळील ओझर्डे येथील मोगलांचे देशमुख सूर्याजी पिसाळ यांच्या दप्तराचें अध्ययन केलें. त्या संबंधांत लिहितांना त्यांनीं, सूर्याजी पिसाळावर तो मोगलांच्या बाजूचा व मराठी लोकांचा गनीम (शत्रु) म्हणून उल्लेख करणारा म्हणून टीकेची झोड उठविली. त्यामुळें तें ओझर्डेदप्तर राजवाडे यांना नाराज होऊन मालकांनीं दिलें नाहीं.

राजवाडे यांनीं कागदपत्रांच्या रूपानें जेवढीं इतिहाससाधनें प्रसिद्ध केलीं त्यापेक्षां अधिक मोठा अप्रकाशित असा संग्रह त्यांच्यापाशीं राहिला. त्यांतील कांहीं अंश त्यांनींच पुणें येथें सन १९१० मध्यें स्वतः स्थापन केलेल्या ' भारत इतिहास-संशोधक मंडळ ' या संस्थेंत ठेवला. नंतरच्या संग्रहाचा अंश त्यांच्या स्मरणार्थ त्यांच्या निधनानंतर स्थापन झालेल्या धुळें येथील ' राजवाडे संशोधक मंडळ ' या संस्थेंत ठेवलेला आहे.

मराठी व संस्कृत भाषा, त्यांचें व्याकरण व हिंदू समाज या संबंधांतील त्यांचें संशोधन असेंच महत्त्वाचें आहे. महाराष्ट्रांत व पंजाबांत प्रसिद्ध असलेल्या महानु-

भाव संप्रदायाचें मराठी वाङ्मय हें मराठींतील सर्वांत प्राचीन वाङमय होय. हें वाङ्मय अनेक गुप्त सांकेतिक लिपींमध्यें लिहिलें आहे. त्या लिपींचा उलगडा राजवाडे यांनीं प्रथम स्वबुद्धीनें केला व त्या वाङमयाचें द्वार खुलें केलें. ज्ञानेश्वरीची एकनाथ पूर्वीची प्रत राजवाडे यांनींच प्रथम हुडकून काढून व तीचें व्याकरण काढलें व हेंच ज्ञानेश्वर कालीन मराठीचें व्याकरण होय हें सिद्ध केलें. त्यामुळें त्यांच्या संशोधक प्रतिभेचा प्रकाश अधिक उज्वल दिसूं लागला. मुकुंदराज, मुक्तेश्वर, दासोपंत, रघुनाथ पंडित, जनीजनार्दन, शिवदिन केसरी इत्यादि मध्ययुगीन साहित्यकारांचें व संतांचें वाङमय, वंशावळी व काळ याच्या संबंधी महत्त्वाचे शोध राजवाडे यांनींच प्रथम लावले. तात्पर्य, मध्ययुगीन मराठी वाङ्मय व मराठी राज्य यांच्या संबंधांच्या संशोधनकार्यांत राजवाडे यांचें अद्वितीय महत्त्व मान्य करावें लागतें.

राजवाडे यांची इतिहासकल्पना

राजवाडे यांची इतिहासाची कल्पना विज्ञाननिष्ठ व जीवनव्यापी आहे. मानवाच्या सार्वदेशिक व सार्वकालिक स्थित्यन्तरांचा समावेश करणाऱ्या वैयक्तिक व सामाजिक जीवनाचा संपूर्ण अर्थ त्यांच्या इतिहासकल्पनेंत समाविष्ट केलेला आहे. त्यांनीं आपली इतिहासाची ही व्यापक कल्पना पाश्चात्य इतिहासज्ञ पंडितांच्या सर्व विवेचनांचें मंथन करून निर्माण केली आहे. 'मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें' खंड ६ च्या प्रस्तावनेंत त्यांनी इतिहासविषयक महत्त्वाच्या पाश्चात्य कल्पनांची साधकबाधक चर्चा केली आहे. या चर्चेंचें सार त्यांनी ' विद्यासेवक 'मासिकांतील (वर्ष १ अंक ७) ' भारतीय इतिहासाचीं मूलतत्त्वें ' या लेखांत इतिहासाच्या लक्षणांत सांगितलें आहे, असें म्हणतां येईल. तें लक्षण असें– "इतिहास शब्दाचे दोन अर्थ आहेत. (१) गतकालीं होऊन गेलेलीं जीं कृत्यें त्यांना इतिहास हें जसें नांव लावतात तसेंच (२) गतकालीं होऊन गेलेल्या कृत्यांच्या परंपरित वर्णनालाहि इतिहास हा शब्द लावतात. कृत्यें व त्यांचीं वर्णनें या दोहोंचा वाचक एकच शब्द आहे. पैकीं कृत्यपरंपराबाचक जो इतिहास शब्द तो येथें इष्ट समजावा. इतिहासाचीं मूलतत्त्वें म्हणजे कृत्यपरंपरेचीं मूल कारणें. मूलकारणें दोन प्रकारचीं, बाह्य व आंतर. मनुष्याच्या पिंडावर बाह्य सृष्टीचे आघात होतात. आघातांचें सातत्य होऊन मनोरचना बनते. सृष्टी ही मनोरचनेचें ऊर्फ स्वभावाचें बाह्य कारण होत्ये आणि कृत्यरूपानें फलद्रूप होणारा स्वभाव कृत्यांचें आन्तर कारण ठरतें."

ही इतिहासाची व्याख्या वैज्ञानिक आहे, गूढवादास बाजूला सारणारी आहे. या इतिहासाच्या व्याख्येंत परिस्थिति व मानव यांच्या द्वन्द्वावर आधारलेली ऐतिहासिक प्रक्रिया आहे. यांत दैवी संकेत किंवा दिव्य व वीर विभूतींचें कर्तृत्व किंवा भौगोलिक कारणें किंवा आर्थिक, राजकीय वा अन्य प्रकारची सामाजिक शक्ति किंवा विशिष्ट

वंशाचें वा राष्ट्राचें जन्मसिद्ध सामर्थ्य किंवा इतिहासाची अबाधित गति किंवा युगप्रेरणा इत्यादि कोणतें तरी एक कारण इतिहासाला प्रेरणा देऊन त्याची दिशा, उन्नति, अवनति व परिणति ठरवितें असें सांगणाऱ्या विविध ऐतिहासिक उपपत्तींना राजवाडे यांनी कमी महत्त्व दिलें आहे. या व्याख्येंत व्यक्त झालेल्या विज्ञाननिष्ठ दृष्टिकोणाला धरूनच प्रथमपासून इतिहास संशोधनास राजवाडे प्रवृत्त झाले. राजवाडे यांच्यावर मुख्यतः प्लेटो, हेगेल व कॉंत (Comte) ह्या तत्त्वज्ञांच्या विचारांची छाप पडली होती. त्यांमध्यें त्यांनी कॉंतनें मांडलेली मानवी समाजाच्या वैचारिक विकासाची क्रमिक सोपानपरंपरा मुख्यतः मान्य केली होती. धार्मिक (Religious), आध्यात्मिक (Metaphysical) व वैज्ञानिक (Scientific) या तीन श्रेणींत वैज्ञानिक अवस्था सर्वोच्च होय हें त्यांना मान्य झालें होतें. उदाहरणार्थ, 'विकार-विचार प्रदर्शनाच्या साधनांची उत्क्रांति' या निबंधांत त्यांनीं धार्मिक कल्पना, धार्मिक ग्रंथ वा धार्मिक कला यांना भ्रमाधिष्ठित म्हणून निर्दिष्ट केलें आहे; त्याच प्रमाणें सहाव्या खंडाच्या प्रस्तावनेंत तत्त्वज्ञान हें स्वैर कल्पनांचा खेळ असल्यामुळें कालान्तरानें मानवी ज्ञानाची उत्कृष्ट वाढ होऊन विज्ञानच तत्त्वज्ञानाचा प्रांत आक्रमून टाकील व पारमार्थिक तत्त्वज्ञानाचा पदोपदीं पराभव होईल असेंहि त्यांनीं भविष्य वर्तविलें आहे. त्यामुळें वैज्ञानिक किंवा भौतिकवादी (Positivist) इतिहासोपपत्तिच सर्वथा ग्राह्य म्हणून त्यांनी मान्य केली. 'मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें' खंड १ च्या प्रस्तावनेंत त्यांनीं 'ऐतिहासिक प्रसंग' म्हणजे काय याचें जें स्पष्टीकरण केलें आहे तें या व्याख्येस धरून आहे. तेथें ते म्हणतात—"मानवी इतिहास काल व स्थल यांनी बद्ध झालेला आहे. कोणत्याहि प्रसंगाचें वर्णन द्यावयाचें म्हटलें म्हणजे त्या प्रसंगाचा परिष्कार विशिष्ट कालावर व विशिष्ट स्थलावर पसरवून दाखविला पाहिजे. प्रसंगाचा परिष्कार कालानें व स्थलानें विशिष्ट कसा झाला आहे, हें दाखवितांना त्या कालीं व स्थळीं कोणत्या व्यक्ती प्रामुख्यानें पुढें येतात, हेंहि इतिहासकाराला स्वाभाविकपणेंच सांगावें लागतें. सारांश, काल, स्थल व व्यक्ति या त्रयीची जी सांगड तिलाच प्रसंग व ऐतिहासिक प्रसंग ही संज्ञा देतां येते" (राजवाडे लेखसंग्रह पृ. ३०). येथें इतिहासाच्या मुळाशीं समाज हा न धरतां, व्यक्ति ही मूलभूत धरली आहे. म्हणजे इतिहास हा मानवव्यक्तींनीं घडविलेला असतो, हा सिद्धान्त गृहीत धरला आहे. व्यक्ति ही मूलभूत धरून समाज म्हणजे व्यक्तिसमुदाय असा अर्थ करतात व समाजेतिहासाचा अर्थ सांगतात : 'लहान व्यक्तींचीं चरित्रें व मोठ्या व्यक्तींचीं चरित्रें मिळून समाजाचा संपूर्ण इतिहास होतो. समाजांत मोठ्या व्यक्ती केव्हांहि थोड्या असल्यामुळें मोठ्या व्यक्तींच्या इतिहासाला लहान व्यक्तींच्या म्हणजे बहुजनसमाजाच्या इतिहासाचा जोड द्यावा लागतो. केवळ मोठमोठ्या व्यक्तींच्याच चरित्रानें समाजाचा इतिहास संपूर्ण होत नाहीं." (पृ. ३१)

इतिहासाची अशा प्रकारची भौतिकवादी व्याख्या स्वीकारल्यावर समाज म्हणजे व्यक्तिसमुदाय, असा अर्थ करावा लागतो. व्यक्ति ही मूलभूत घटक धरून इतिहासमीमांसेस प्रारंभ केला तरी त्या मूलघटकापाशीं थांबून भागत नाहीं. त्या मीमांसेचा विस्तार करण्यास व्यक्तिसमुदायांचे भिन्न भिन्न प्रकार हेहि ध्यानांत घरावे लागतात. समाजांतील भिन्न भिन्न कर्में व त्या कर्मांकरितां आवश्यक अशा भिन्न भिन्न प्रकारच्या मानवीसंघटना समजावून घेतल्या तरच इतिहास म्हणजे काय याचा उलगडा होऊं शकतो. संस्था व संस्थेचीं कर्में यांच्याशीं इतिहासाचें मुख्य कर्तव्य आहे ही गोष्ट राजवाडे यांनीं मान्य केली आहे. 'मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें' खंड ६ च्या प्रस्तावनेंत संस्था म्हणजे शरीर होय अशी ते रूपकात्मक परिभाषा वापरून म्हणतातः "वासना–यंत्रणा–व साधना किंवा इच्छा-शरीर–व कर्म अशी मानवसमाजाच्या चळवळीची त्रिविध परंपरा आहे. या त्रिविध परंपरेची हकीकत देणें म्हणजेच इतिहास लिहिणें होय. कोणत्या वासनेकरितां संस्था-यंत्राचें कोणतें इंद्रिय निर्माण झालें, त्या इंद्रियानें इष्टकार्य कितपत होतें व तें इंद्रिय सबंध यंत्राच्या अनुरोधानें चालतें किंवा प्रतिरोधानें चालतें ही हकीकत देण्याचें काम शरीरकपद्धतीचें असतें. वस्तुतः पाहतां संस्थांच्या शरीरांपेक्षां शरीराच्या द्वारा झालेलें जें काम त्याच्याशीं इतिहासाचें मुख्य कर्तव्य आहे. परंतु काम सिद्ध व्हाव-याला शरीराची अपेक्षा असल्यामुळें व शरीराच्या सिध्यर्थ समाजाची झटपटहि विशेष असल्यामुळें किंबहुना शरीराची रचना व सुधारणा हेंच कांहीं काल किंवा सर्व-काल राष्ट्राचें मुख्य कर्तव्य होऊन बसल्यामुळें शरीर, शरीररचना व शरीरसुधारणा हाच इतिहासाचा मुख्य विषय होऊन बसला आहे. ... ... वासनेचा निर्देश केल्यावाचून शरीर कां निर्माण झालें तें सांगतां येत नाहीं व कार्याचा निर्देश केल्या-वांचून शरीराचीं लक्षणेंहि ठरवितां येत नाहींत. ही अडचण लक्षांत घेऊन शरीरक म्हणून एकच पद्धती मी स्वीकारली आहे." (ऐतिहासिक प्रस्तावना पृ. २२८-२९)

राजवाडे यांच्या दृष्टीनें इतिहासाचा निश्चित अर्थ कोणता याची अशी रूप-रेखा आहे. असा इतिहास पूर्वग्रहरहित व प्रामाणिकपणें लिहिण्याचा प्रयत्न करणें आवश्यक आहे असें ते वारंवार सांगतात. ते म्हणतातः "निर्लेप व निरहंकारपणानें इतिहासाचा विचार करावयाला लागणें ही इतिहासाचें खरें स्वरूप जाणण्याच्या मार्गाला लागण्याची पहिली पायरी आहे. ह्या मार्गाला लागण्याची दुसरी पायरी सर्व प्रकारचे अर्धवट ग्रह सोडून देणें ही होय." (ऐतिहासिक प्रस्तावना पृ. १३२). परंतु या संबंधी ते निराशेचे उद्गार काढतात–"वर्तमानक्षणाच्या पाठीमागील गतकाळीं पृथ्वीवरील नव्या व जुन्या दरोबस्त सर्व समाजांच्या सर्व तऱ्हेच्या उलाढालींची जी साद्यन्त व विश्वसनीय हकीकत ती इतिहास होय. असला साद्यन्त व विश्वसनीय इतिहास पृथ्वीवरील कोणत्याहि भाषेंत अद्यापपर्यंत लिहिला

गेला नाहीं.... प्रत्येकाचा इतिहास त्याच्या त्याच्या स्वदेशाभिमानाच्या रंगानें चितारला गेल्यामुळें इतर देशांतील इतिहासज्ञांच्या पसंतीस सहजच उतरत नाहीं. जो तो आपआपला देश त्रिभुवनाचा केंद्र समजून तत्प्रवण सर्व देशांचीं चरित्रें होत आहेत असें चित्र काढण्याचा, निःपक्षपातीपणाची प्रतिज्ञा करूनहि, प्रयत्न करीत असतो. ह्या स्वदेशाभिमानाखेरीज प्रत्येकाचें कांहीना कांही तरी वैयक्तिक खूळ असतेंच. कोणी केवळ भौगोलिकदृष्ट्या, कोणी केवळ काळदृष्ट्या, कोणी निवळ व्यापारीदृष्ट्या, व कोणी स्वदेशसंस्कृतीदृष्ट्या जगाच्या इतिहासाची अजमावणी करीत असतात.... असा प्रकार असल्यामुळें समाजाच्या चरित्राचें खरें स्वरूप काय, त्याचें केंद्र कोठें आहे, तें प्रागतिक आहे किंवा अधोगतिक आहे किंवा स्तब्ध आहे, वगैरे प्रश्नांचा जसा समाधानकारक निकाल लागावा तसा लागत नाहीं. वैयक्तिक मतें बाजूला सारून व स्वदेशाभिमानाचा दर्प बाजूला ठेवून हें काम केलें तरच शुद्ध व विमल तत्त्व हस्तगत होण्याचा संभव आहे." (ऐतिहासिक प्रस्तावना पृ. ३१२)

परंतु अशा प्रकारें पूर्वग्रहमुक्त मन असलेला इतिहासकार कोठें मिळणार? निर्लेप व निरंजन होऊन इतिहासाचा विचार करणें दुर्घट आहे. झाडून सर्व पूर्वग्रह टाकून देणें मनुष्यस्वभावाला निसर्गतः अशक्यप्राय आहे. सांस्कृतिक संप्रदायाच्या परिसरांत मानवी मन बाल्यापासून वाढत असतें. मनुष्य बाल्यांत स्वसमाजाची भाषा जशी साहजिक आत्मसात करतो त्याप्रमाणें स्वसमाजाच्या इष्टानिष्टत्वाच्या भावना, परंपरेसंबंधी अभिमान, अभिरुची इत्यादि सर्व कांही आत्मीय बनवितो. ह्या सर्व मानसिक बनावाच्या अनुरोधानें सत्यासत्य व सारासार ठरविणारी स्वाभाविक बुद्धि विवेक व निर्णय करूं लागते. म्हणून प्रत्येक समाजाची, कालाची व व्यक्तीची जगाच्या व स्वतःच्या इतिहासाकडे पाहण्याची तऱ्हा एकसारखी असणें कठिण आहे. ही गोष्ट राजवाडे यांनीं लक्षांत घेतली आहे. ते म्हणतात: "ह्या भिन्न दृष्टीचा परिणाम असा होतो कीं एका काळीं व एका समाजाला जीं विधानें सिद्धान्तवत् भासतात तींच दुसऱ्या काळीं दुसऱ्या समाजाच्या अश्रद्धेचे विषय होतात. ह्या विरोधाचें कारण असें आहे कीं विकार व विचार यांनी खळबळून जाणाऱ्या व्यक्तींशीं व समाजांशीं मानवइतिहासाला कर्तव्य असतें. ज्या निर्विकार दृष्टीनें दगडाकडे किंवा वनस्पतीकडे मनुष्य पाहूं शकतो, तिचा उपयोग मनुष्यसमाजावर करतां येत नाहीं. कारण निर्विकार दृष्टीचा उपयोग करूं पाहणारी व्यक्ति स्वतः विकारवश असते; व ज्या समाजांवर दृष्टीचा प्रयोग करावयाचा ते समाजहि विकारवश असतात." (ऐतिहासिक प्रस्तावना पृ. ३१६)

इतिहासविषयक विवेचनांत ह्या महत्त्वाच्या अडचणीबरोबर दुसरी एक महत्त्वाची अडचण उभी असते; ती म्हणजे इतिहासांतील घटनांच्या

मूल्यमापनासंबंधी होय. अमुक एक ऐतिहासिक कृत्य, विधि, निषेध, संस्था, चाल, प्रवृत्ति, अधम कीं उत्तम, हितकारक कीं अहितकारक, प्रगत कीं अप्रगत, इत्यादि प्रश्न मूल्यमापनांत अन्तर्भूत होतात. या संबंधी राजवाडे यांचें मत असें आहे कीं मूल्यमापन हें इतिहासकाराचें उद्दिष्ट किंवा प्रयोजन नाहीं; कारण मूल्यमापन हें नीतिशास्त्राशीं संलग्न कार्य आहे. परंतु नीतिशास्त्र हें शाश्वत निकष देण्यास असमर्थ आहे; कारण तें विशिष्ट देशकालाशीं सापेक्ष असतें. ते म्हणतात– " मानवसमाजाची हकीकत देतांना संस्थांचें किंवा कृत्यांचें अधमोत्तमत्व ठरविण्याला स्थिर मान असूं शकत नाहीं. असूं शकतें, असें म्हणणें म्हणजे एका पूर्वग्रहाचाच आश्रय करणें आहे. आणि पूर्वग्रहाचा आश्रय करणें म्हणजे इतिहासाच्या सशास्त्र परिशीलनाला सर्वस्वी घातक आहे. बरें, वाईट; शुभ, अशुभ; वगैरे नीतिशास्त्रांतले जे अर्थ आहेत ते गृहीत धरून ऐतिहासिक प्रसंगांची, समाजांची व संस्थांची परीक्षा करणें म्हणजे ठरीव नीतिशास्त्रांतल्या अर्थाच्या पलीकडे जाण्यांत मानवसमाजाला अटकाव करण्यासारखेंच आहे.... तात्पर्य प्रगति झालेली आहे किंवा अधोगति झालेली आहे हें पहाण्याचें काम नीतिशास्त्राचें आहे; इतिहासाचें नाहीं. "

" सूक्ष्मतेनें पहातां, निर्भेळ इतिहास म्हणून ज्याला म्हणतां येईल त्याचें काम फक्त झालेल्या प्रसंगांची विश्वसनीय हकीकत देण्याचें आहे. कालाचें पौर्वापर्य लावून व प्रसंगांचें कार्यकारणत्व सिद्ध करून भूत गोष्टी अशा अशा सातत्यानें झाल्या इतकें सांगितलें म्हणजे इतिहासाची कामगिरी आटोपली; " " इतिहास भूतवृत्ताचा विश्वसनीय सारांश देतो व नीतिशास्त्र त्याचें उत्तमाधमत्व ठरवितें. ... निःपक्षपातानें काढिलेला सारांश मात्र, यावच्चन्द्रदिवाकरौ अजरामर राहतो. " (ऐतिहासिक प्रस्तावना पृ. ३१७, १८)

या प्रतिपादनाचा भावार्थ असा आहे कीं, राजवाडे हे, इतिहास ही विज्ञानाप्रमाणेंच एक ज्ञानशाखा आहे, असें मानतात. ज्ञानशाखेचा दर्जा इतिहासास आणण्याचा प्रयत्न आधुनिक काळांतच सुरूं झाला. आधुनिक कालापूर्वी जगांत जे इतिहास झाले त्यांचा उघड हेतु भूतवृत्तानुवाद हाच असला तरी त्याबरोबर भिन्न अन्तःस्थ हेतूं दडलेले होते. विशिष्ट व्यक्ती, कुलें, वंश, राष्ट्रें, संप्रदाय, प्रसंग, किंवा घटना यांचें माहात्म्य वाढविणें किंवा क्षुद्रत्वारोप करणें हाच अन्तःस्थ हेतु इतिहासनिवेदकांत वसत होता. त्यामुळें त्यांत वाटेल तेथें अवास्तवाची वा अतिशयोक्तीची भर पडल्याशिवाय रहात नसे. त्याकाळीं वस्तुतः कांही थोड्याच वस्तुनिष्ठ दृष्टीच्या महानुभावांना सत्यकथनाची प्रेरणा लाभलेली असे. त्याकाळीं इतिहास हा निर्भेळपणें वस्तुनिष्ठच असला पाहिजे, असा नियम सर्वसंमत होण्याची प्रवृत्ति समाजांत नसे. अद्भुत व कल्पित कथांची इतिहासांत भर टाकल्यानें कांही बिघडलें आहे अशी

जाणीवच त्यावेळीं नव्हती. अशा पूर्वपरंपरेच्या विपरीत वातावरणांतून बाहेर पडलेली इतिहासकाररीति हें या आधुनिक युगाचेंच लक्षण आहे. परंतु नैतिक मूल्य-मापन व इतिहास यांच्या संबंधी सापेक्ष नीतिवादाच्या आधारें राजवाडे यांनीं जें प्रतिपादन केलें आहे त्यांतली महत्त्वाची अडचण राजवाडे यांनीं ध्यानांत घेतलेली दिसत नाही. ती अशी कीं, इतिहासाचा विषय मानवी कृत्यें हा असल्यामुळें त्यांत मानवी कृत्यांची सदसद्विवेकबुद्धीशीं नित्यसंलग्नता ध्यानांत घ्यावी लागते. मानवी विश्वच नैतिक विश्व आहे, त्याच्या संबंधी कोणतेंहि विवेचन नैतिक विवेकाच्या स्पर्शापासून मुक्त असें करणें अशक्य आहे. म्हणजे मानवी ऐतिहासिक प्रसंग हा नैतिक प्रसंगच आहे; या प्रसंगाच्या कोणत्याहि तथ्यकथनपर वा कार्यकारणत्वनिर्णय-पर इतिहासांत चांगलें व वाईट या कोटींचा म्हणजे नैतिक मूल्यांचा अनुकूल वा प्रतिकूल निर्देश अपरिहार्यपणेंच करावा लागतो. उदाहरणार्थ, स्वतः राजवाडे हेच इतिहासविवेचनांत अशीं सदसत् मूल्यांचा निर्णय दर्शविणारीं शेकडों विधानें करतांना दिसतात. उदाहरणार्थ, 'मराठ्यांच्या इतिहासाचें कार्य व पराभव'; 'मराठी राज्याचा विकास'; 'मराठेशाहीचा पाया घालणारा शहाजी'; व 'शिवाजीची गुणसंपदा' (पृ. १८७–२२८) हीं या पुस्तकांतील प्रकरणेंच पहावीं. यांत गुणदोषविवेचन म्हणजे नैतिक मूल्यांवर आधारलेली चर्चाच प्राधान्यानें आली आहे. '१८ व्या शतकाच्या पूर्वार्धांत व उत्तरार्धांत मराठ्यांची संस्कृति युरोपांतील प्रगत राष्ट्रांच्या संस्कृतीहून कमी दर्जाची होती' (पृ. १९३) हें वाक्य अत्यंत मौलिक महत्त्वाचें आहे. यांत सांस्कृतिक मूल्यांचा तुलनात्मक निर्णय राजवाडे यांनीं जाहीर केला आहे. मराठ्यांचा पराभव ब्रिटिश कां करूं शकले या तथ्याच्या मुळाशीं असलेलें कार्यकारणत्व दाखविणें हाच राजवाडे यांचा उद्देश असला तरी त्याकरितां हिंदूंची संस्कृति युरोपियन संस्कृतीपेक्षां हीन होती हा नैतिक निर्णय करूनच हिंदूंच्या पराभवाची मीमांसा राजवाडे करूं शकले. व राजवाडे यांचा 'शिवाजीची गुणसंपदा' हा लेख शिवाजीसंबंधी नैतिकनिर्णय सिद्ध करणारा आहे. समाज-मनोरचनेची मीमांसा इतिहासाचा भाग आहे, असें राजवाडे मानतात; (ऐतिहासिक प्रस्तावना पृ. ३६१) त्यांत नैतिक कल्पनांचा प्रामुख्यानें अन्तर्भाव होतो. यासंबंधांत हिंदूंचा इतिहास काय संदेश देतो हें राजवाडे स्वतः सांगतात—"हिंदू लोकांची ही तात्त्विक संन्यासप्रवण मनोरचना बदलण्याचा दीर्घोद्योग केला पाहिजे अशी सल्ला इतिहासाचा हा भाग सांगतो." नैतिक वा कलात्मक मूल्यांचा सापेक्षतावाद मान्य केला तरी इतिहास हा मूल्यचर्चेच्या जाळ्यांतून कधींहि सुटणें शक्य नाही. कारण मानवी विश्वांतील हालचालींचा तथ्य (Fact) व मूल्य (Value) यांचा प्रांत वेगळा करून विचार करणें अशक्य आहे. हा वदतोव्याघात किंवा स्वविरोध (inner contradiction) राजवाडे यांच्या ध्यानांत आला नाहीं.

राजवाडे यांनी स्वीकारलेली ही इतिहासकल्पना पाश्चात्य इतिहासतत्त्वविचारांत अत्यन्त महत्त्वाची मानलेली व गाजलेली आहे. पाश्चात्य देशांत गेलीं दोन शतकें इतिहासतत्त्वाची मीमांसा सुरूं आहे. इतका अत्यंत खोलांत जाऊन त्यामध्यें भाग घेणारा पहिला इतिहाससंशोधक भारतीय म्हणजे राजवाडे हेच होत म्हणून त्यांचा या संबंधांतला दृष्टिकोण अत्यन्त संक्षेपानें वर मांडला आहे.

राजवाडे यांनीं इतिहासतत्त्वमीमांसेच्या दृष्टिकोणांतून संस्कृत व मराठी भाषेचा व्याकरणरूप इतिहास ज्याप्रमाणें लिहिला आहे, त्याचप्रमाणें भारतीय समाज व महाराष्ट्र यांचा सामाजिक व राजकीय इतिहासहि लिहिला आहे. त्याचें दिग्दर्शन या लेखसंग्रहांत वाचकांस होईलच.

या पुस्तकांतील संग्रहाचें स्वरूप

राजवाडे यांच्या लेखनसंपत्तींतील कांही निवडक भागच या संग्रहांत संगृहीत केले आहेत. राजवाडे यांच्या विविध व समृद्ध साहित्याच्या कांहीं विशिष्ट नमुन्यांचेंच दर्शन वाचकांस या संग्रहांत घेतां येईल. राजवाडे यांनीं जेव्हां ऐतिहासिक विवेचनास प्रारंभ केला तेव्हां मराठ्यांच्या इतिहासाची स्थिति फार शोचनीय होती; त्रोटक आधार, विपर्यस्त माहिती, पूर्वग्रहदूषित असलेलीं व अपुऱ्या माहितीवर लिहिलेलीं युरोपियनांचीं किंवा एतद्देशीयांचीं पुस्तकें अशी पार्श्वभूमि लक्षांत घेऊन त्यांनीं तें विवेचन लिहिलें. त्यानंतरच्या काळांत स्वतः राजवाडे व इतर पंडित यांच्या परिश्रमानें भारताच्या व महाराष्ट्राच्या इतिहासाची प्रमाणसामग्री मोठ्या प्रमाणावर जमा होऊन त्या वेळीं विवाद्य वाटणाऱ्या व अंधारांत असलेल्या गोष्टींवर प्रकाश पडल्यामुळें पुष्कळच प्रगति झाली आहे. म्हणून आजहि ज्या चर्चेचें महत्त्व शिल्लक आहे अशा चर्चेमधील पुष्कळसा विस्तार वगळून त्यांतील साहित्यगुणालंकृतच असे सारभूत भाग तेवढे येथें उद्धृत केले आहेत. साहित्यगुणालंकृतच कां निवडले ? तर साहित्यगुणांशीं संबंध नसलेले परंतु निरुक्त विद्येशीं वा संस्कृत व प्राकृत व्याकरणाशीं संबंध असलेले अत्यंत नवीन सिद्धान्त प्रस्थापित करणारे असे राजवाडे यांनीं निबंध लिहिले आहेत त्यांतील अंश आम्ही येथें उद्धृत केले नाहींत. उदाहरणार्थ 'ज्ञानेश्वरीचें व्याकरण', 'संस्कृत भाषेचा उलगडा', 'सुबंत विचार', 'तिङन्त विचार', 'गुण व वृद्धि' इत्यादि राजवाडेकृत निबंधांना आम्ही संपूर्ण वगळलें आहे. त्याच प्रमाणें 'पाणिनिकालनिर्णय', 'सप्तशती' इत्यादि वैशिष्ट्यपूर्ण लेखहि स्थलसंकोचास्तव वगळावे लागले आहेत.

परंतु या ठिकाणीं जे लेख किंवा निबंधांश उद्धृत केले आहेत त्यावरून राजवाडे यांच्या ऐतिहासिक तत्त्वज्ञानाचें व भारताच्या व महाराष्ट्राच्या सोपपत्तिक इतिहासाचें सम्यक् दर्शन होईल अशी आमची अपेक्षा आहे. ज्या ठिकाणीं राजवाडे यांची साहित्यिक शैली, ऐतिहासिक तत्त्वमीमांसा व ऐतिहासिक निर्णय

यांचा संगम झाला आहे असेच भाग येथें उद्धृत केले आहेत. 'विकार-विचार प्रदर्शनाच्या साधनांची उत्क्रांति', 'इतिहासाच्या दोन बाजू- आधिभौतिक व आध्यात्मिक' व 'इतिहास म्हणजे काय ?' हे या संग्रहांतील पहिले तीन लेख राजवाड्यांच्या ऐतिहासिक तत्त्वमीमांसेचें स्वरूप संक्षेपानें दर्शित करतात. 'हिंदू समाजांत हिंद्वितरांचा समावेश' यो निबंधांत राजवाडे यांनीं हिंदू समाज, युरोपियन समाज किंवा खिश्चन समाज व मुसलमान समाज यांच्या सामाजिक विस्ताराची संस्थात्मक पद्धति यांचें विवेचन केलें आहे; या निबंधांत हिंदुसमाजरचनेच्या ऐतिहासिक सिद्धान्तांचीं कांहीं मूलतत्त्वें दिग्दर्शित केलीं आहेत. भारतीय सामाजिक इतिहासाच्या मननाचें हा निबंध एक उत्कृष्ट साधन आहे. त्यानंतरच्या 'हिंदुस्थानांतील आर्य लोकांचा वर्ण', 'आमचीं पुराणें व असीरियांतील नवे शोध', 'मग ब्राह्मण कोण', 'मगध', 'नट व निच्छवि' ह्या लेखांत अतिप्राचीन भारताच्या वंशविषयक इतिहासाची रूपरेखा सूचित केली आहे. 'प्राकृतिक भाषांचा व वाङ्मयाचा इतिहास' हा लेख मराठी भाषेच्या संदर्भांत लिहिलेला आहे; यांत भाषा व वाङ्मय यांच्या ऐतिहासिक चिंतनाचें दृष्टिक्षेत्र किती व्यापक असणें आवश्यक आहे याची कल्पना मिळते. त्यानंतरच्या 'महाराष्ट्राची वसाहत' व 'महाराष्ट्र व उत्तरकोकणची वसाहत' या लेखांत महाराष्ट्राच्या अतिप्राचीन इतिहासाचें चित्र भाषिक, वांशिक व सामाजिक संस्थारूप प्रमाणांच्या अधारावर निर्माण केलेलें पहावयास सांपडेल, व त्या बरोबर भारताच्या राजनैतिक इतिहासाचें रहस्योद्घाटन केलेलें दिसेल. या नंतरच्या रामदासापर्यंतच्या लेखांत मराठी राज्याची ऐतिहासिक मीमांसा मांडलेली वाचकांस वाचावयास मिळेल. ही मीमांसा महाराष्ट्रांतील आधिभौतिक व आध्यात्मिक संस्कृतीच्या गुणदोषांच्या चर्चेवर आधारलेली आहे. त्या चर्चेचाच भाग म्हणूनच 'रामदास' हा निबंध येथें उद्धृत केलेला आहे. अखेरीस 'कादंबरी' हा अत्यंत नामांकित निबंध उद्धृत करून या पुस्तकाची समाप्ति केली आहे. या निबंधांत पाश्चात्य कादंबरी वाङ्मयाच्या अद्भुत (Romantic) आणि वस्तुवादी (Realist) या दोन ऐतिहासिक अवस्थांची मीमांसा प्रथम करून शेवटीं त्या पार्श्वभूमीवर तुलनात्मक दृष्टिकोणांतून श्री. हरी नारायण आपटे या कादंबरीकारापर्यंतची मराठी कादंबरी वाङ्मयाची समीक्षा केली आहे.

— लक्ष्मणशास्त्री जोशी

धारवाड ग्रंथ संग्रहालय, धारवाड.
अनुक्रमांक 23324 दि. 1/1/68
क्रमांक 2334 नों. दि. 22/5/68
ग्रं. क्र. 8044

विकार-विचार प्रदर्शनाच्या साधनांची उत्क्रांति

१. सहज विक्षेप अभिप्रायसूचक

मनांत संकल्पविकल्प येतात. त्यांचें प्रदर्शन मनुष्यादि प्राणी अनेक तऱ्हांनीं करतात. मुख, दंत, जिव्हा, नासिका, कर्ण, नेत्र, हस्त, पाद व इतर अंगें यांच्या विक्षेपांनीं संकल्पविकल्प दाखवितां येतात किंवा दिसले जातात. ह्या साधनाला विक्षेपसाधन म्हणतात. हें साधन सर्वांत साधें. ह्या विक्षेपसाधनाला जल, वायू, अग्नि, आकाश, वगैरेंचें साह्य लागत नाहीं. मुखानें बेडावणें, दांत काढणें, स्मित करणें, जिभल्या दाखवणें, मिशीवर हात फिरविणें, केस पिंजारणें, माथा तुकविणें, भुंवया चढविणें, कपाळाला आठ्या घालणें, कान टवकारणें, गाल फुगवणें, नाक चढवणें किंवा फेंदारणें, डोळे मिचकावणें फाडणें लाल करणें, हातवारे करणें, आंगठा दाखविणें, ओटें मोडणें, मूठ दाखवणें, हात चोळणें, लाथ मारणें, वाकुल्या दाखविणें, शेंपूट हलवणें, खुरानें जमीन उकरणें, पंख फडफडविणें, फणा हपटणें, सोंड फिरविणें, लंगडशाई करणें, नाचणें, उडणें, बागडणें, धांवणें, उताणें पडणें, कुशीवर पडून मेल्याचें सोंग घेणें, लोळणें, नमणें, नमस्कार करणें, वगैरे संकल्पविकल्प दाखविण्याचे शेंकडों प्रकार साध्या विक्षेपांत पडतात. बोलणें, सूर काढणें, हंसणें, हुंगणें, खाजवणें, टाळी वाजविणें, खाक वाजविणें, चुटक्या वाजविणें, शीळ घालणें, फू करणें, थुंकणें, खेकसणें, आरडणें, बोंबलणें, शंख करणें, खिदळणें, गुरगुरणें, केंकाटणें, कोंकणें, भोंकणें, आरवणें, चिवचिवणें, किचकिचणें, दात खाणें, जीभ टाळूवर हापटणें, सुसकारणें, कोल्हेकुई करणें, हंबरणें, टिवटिवणें, मचमचणें, ललकारणें, गुणगुणणें, तणतणणें, फणफणणें, कटकटणें, हळहळणें, तळतळणें, थयमान करणें, चुंबन करणें, चाटणें, आलिंगणें, कुरवाळणें, चिमटे काढणें, गुध्धे मारणें, रट्टे देणें, लाथाडणें, ढकलणें, वगैरे शेकडों प्रकारांत स्वेतर व्यक्ती, पृथ्वी, जल, वायू, आकाश वगैरे बाह्य पदार्थांचें साह्य घेऊन संकल्प-विकल्प दाखविले जातात. हा दुसरा प्रकार मिश्र आहे. हे दोन्ही प्रकार सर्वस्वी सहज म्हणजे जन्मसिद्ध असून मनुष्यांतल्याप्रमाणेंच पशुपक्ष्यादींत दृष्टीस पडतात. हे कोणी कोणाला शिकवावे लागत नाहींत. कारण, प्राण्यांच्या त्या त्या अवयवांचे हे धर्मच आहेत. प्राणित्वाची घटनाच अशी आहे कीं आंतर किंवा बाह्य कारणांचा

आघात झाला असतां प्रत्याघात ह्या प्रकारांचें रूप घेऊन अवश्यमेव प्रगट होतो. उपरिनिर्दिष्ट सर्वच विक्षेप सर्वच प्राण्यांत प्रादुर्भूत होतात असें नाहीं. आनंदानें किंवा कृतज्ञतेनें किंवा समाधानानें लांगूलविक्षेप कुर्यात उत्कटत्वानें दृश्यमान होतो. लांगूलाभावास्तव मनुष्यांत हा विक्षेप संभाव्यच नाहीं. हंसणें मनुष्यास शक्य आहे. पण कान टवकारणें प्रायः नाहीं. प्रायः म्हणण्याचें कारण असें कीं कानाच्या शिरा हलविण्याचें सामर्थ्य क्वचित् मनुष्यांत आढळून आल्याचें ग्रंथांतरी लिहिलेलें आठवतें. सांगण्याचा मुद्दा एवढाच कीं वर नमूद केलेले विक्षेप प्राणिमात्रांत सहज ऊर्फ जन्मसिद्ध असतात. कृत्रिम ऊर्फ यत्नसिद्ध नसतात.

२. ध्वनींच्या अनुकरणांतून भाषोत्पत्ति

सहज विक्षेपांचें प्रत्यभिज्ञान होऊन यत्नानें त्यांची पुनरावृत्ति करण्याची बुद्धि होणें ही ह्या पुढची पायरी आहे. हा गुण मनुष्याइतका दुसऱ्या प्राण्यांत वर्धमान झालेला दिसत नाहीं, किंबहुना दुसऱ्या प्राण्यांत हा गुण बहुतेक नाहींच म्हटला तरी चालेल. विक्षेपांचें शास्त्र बनविण्याचें सामर्थ्य एकट्या मनुष्यप्राण्यानेंच तवेढें दाखविलेलें आढळतें. पूर्वी केलेला विक्षेप ज्ञानतः पुनः करणें म्हणजे पुनरावृत्तिसामर्थ्य एकट्या मनुष्यांतच दिसून येतें. ही पुनरावृत्ति तो आपल्या स्वतःच्याच विक्षेपांची करतो असें नाहीं, इतर प्राण्यांच्या विक्षेपांचीहि पुनरावृत्ति तो करूं शकतो. म्हणजे अनुकरणसामर्थ्य त्याच्या ठायीं विलक्षण आहे. विक्षेपांपैकीं हालचालींचीच तेवढी पुनरावृत्ति मनुष्य करून थांबत नाहीं, तर त्या त्या प्राण्याच्या विशिष्ट शब्दांची पुनरावृत्ति व अनुकरण करून त्या त्या प्राण्याची ओळख तो इतर मनुष्यांना पटवून देतो. मनुष्य शब्दानुकरण करूं लागला म्हणजे त्या त्या प्राण्याला त्या त्या प्राण्याच्या शब्दावरून तो नांव देऊं लागतो. एथेंच मनुष्याला प्राण्यांचें नामकरण करण्याचा शोध लागतो. काव्‌काव् करणाऱ्या पाखराला काकः, किः किः करणाऱ्या माकडाला किलिः, रू रू आवाज करणाऱ्याला रुरुः, भृंग् आवाज करणाऱ्याला भृंगः, अशीं शब्दांवरून प्राण्यांना नांवें तो देतो. कुकवाकू, कोकिल, कुक्कुट, फेरव, कुक्कुर, करेटु, क्रकर, चिल्ल, कीर, कुरर, केकी, मयूर, तित्तिरिः, हीं सर्व प्राणिनामें शब्दानुकरणजन्य आहेत. कित्येक नामांत कर वगैरे प्रत्यय लावलेले आहेत व कित्येकांत केवळ शब्दच प्राणिवाचक केला आहे. कर, कुर, र, इन्, रव इत्यादि प्रत्ययान्त जीं प्राणिनामें आहेत तीं कर करणें, कुर आवाज करणें, इन् जवळ असणें, रव आवाज करणें ह्या धातुनामांचा शोध लागल्या नंतरचीं असल्यामुळें तीं प्रत्ययान्त नामें काक, कुकवाकू, चिल्ल, कीर ह्या अप्रत्ययान्त नामांहून अर्वाक्तन आहेत हें उघड आहे. केवलशब्दजन्य प्राणिनामें सर्व नामांत अत्यन्त जुनाट ऊर्फ प्राथमिक होत. प्राथमिक म्हणजे

केव्हांचीं ? तर मनुष्याला हे प्राणी प्रथम भेटले तेव्हांचीं. कोणत्या मनुष्याला ? संस्कृत किंवा वैदिक भाषा बोलणाऱ्या मनुष्याला कीं इतर पूर्वकालीन मनुष्याला ?

हा प्रश्न सुटावयाचा म्हणजे त्या त्या प्राण्याचें मूळ वसतिस्थान किंवा जन्मस्थान कोणतें त्याचा निश्चय झाला पाहिजे. समजा कीं हिमालयोत्तरप्रदेशांत कावळा नाहीं व हिमालयदक्षिणप्रदेशांत आहे. तसेंच अशीहि कल्पना करा कीं वैदिक भाषा बोलणारे ऋषींचें मूळस्थान हिमालयोत्तर मेरूपर्वतावर होतें. तर काक हा शब्द हिमालयाच्या दक्षिणेस उतरल्यावर वैदिक ऋषींच्या भाषेंत आला असें अनुमान सहजच निघतें. हा काक शब्द ऋषींच्या पूर्वीच्या रानटी जातींत निर्माण झालेला ऋषींनीं उचलला असेल व तो बराच जुना ठरेल. जुना म्हणजे एक लाख किंवा पांच लाख वर्षांचाहि जुना ठरेल. भूस्तरशास्त्राप्रमाणें मनुष्य ह्या पृथ्वीवर वावरत असलेल्याला लाखों वर्षें लोटून गेलीं आहेत. ह्या लाखों वर्षांत त्याची प्रगती अत्यन्त मंदगतीनें होत असलेली अनुमानास येते. भाषणादि मुखविक्षेप तो आज लाखों वर्षांपासून करीत आला आहे व विशिष्ट ध्वन्यादि आघातांवरून वस्तूंना नामें देण्याचा शोध त्याला लाखों वर्षांच्या पूर्वीच लागलेला आहे. नवेनवे प्राणिशब्द कानावर पडतांच भाषेंत नवीं प्राणिनामें वेळोंवेळीं तो बनवीत आल्याचें भाषेतिहासावरून व व्युत्पत्तीवरून दृष्टयुत्पत्तीस येतें. तात्पर्य, प्राणिशब्दजन्य प्राणिनामें अत्यन्त जुनीं. संस्कृत किंवा वैदिकभाषेंतील अत्यन्त जुनीं असें म्हणण्याचा आशय नाहीं; तर मानववंशांतील कोणत्या तरी त्या किंवा शेजारच्या शाखेंतील माणसांच्या भाषेंतील अत्यन्त जुनीं. वैदिकऋषींना काकशब्द हिमालयदक्षिणप्रदेशांत आल्यावर माहीत झाला असेल. परंतु ऋषींच्या पूर्वींचे जे रानटी लोक ह्या देशांत होते त्यांच्या भाषेंत तो रूढ व जुना होता.

अप्रत्ययान्त केवळ शुद्ध शब्दजन्य जीं प्राणिनामें तीं अत्यन्त प्राथमिक धरण्याचें कारण असें आहे कीं शब्दज्ञान हें, स्पर्शज्ञान वगळलें असतां, सर्व ज्ञानांत अत्यन्त प्राथमिक असतें व तें कर्णेंद्रियांवरतीं आघात भानगडीवांचून करतें एका आकाश-तत्त्वाचें तेवढें साहाय्य ह्या ज्ञानाला पुरें होतें. रंगावरून, गतीवरून किंवा क्रौर्यादि गुणांवरून जीं ज्ञानें होतात त्यांना पृथ्वी, तेज, वायू इत्यादि अनेक मिश्र उपाधींचें साहाय्य लागतें. स्वल्पश्रमानें बहुत लाभ करून घेण्याचा प्राणिमात्राचा स्वभाव पहातां, शब्दजन्य प्राणिनामें सहज सुचणारीं अतएव सर्वांत पुरातन समजणें न्याय्य होतें. रात्र असो, दिवस असो, प्राणी दिसो वा न दिसो, शब्दावरून त्याचें अस्तित्व मनुष्याला प्रतीत होतें. अस्तित्व प्रतीत झाल्यावर, तो शब्द करणाऱ्या प्राण्याची ओळख इतर मनुष्यांना पटविण्याकरतां किंवा तो प्राणी अंतर्धान पावला असतां त्याच्या संबंधानें इतराशीं बोलतांना, कर, कुर, इन्, इत्यादि प्रत्यय न लावतां (कारण, प्रत्यय त्याकालीं अस्तित्वांतच आलेले नसतात) त्या प्राण्याच्या शब्दाचें

होईल तितकें हुबेहुब अनुकरण करून त्या प्राण्याची आठवण इतरांना करून देण्याची खटपट मनुष्य करतो. येथें केवळ गुणानें गुणीचा निर्देश करण्याचा शोध मनुष्याला सहजगत्या होतो. गुण आणि गुणी ह्यांच्या मधील भेद ह्या कालीं त्याला होत नाहीं. शब्दांवरून प्राण्यांना ज्या प्रमाणें तो नामें देतो त्याचप्रमाणें तो रहातो त्या टापूंतील एकोनएक ध्वनि ज्या सजीव पदार्थांपासून साक्षात् निघतात किंवा निघाले अशी त्याची समजूत होते त्या ध्वनीवरून नदी, धबधबा, झाड, मेघ, इत्यादि सजीव पदार्थांना तो नामें देतो. ह्या तऱ्हेनें पदार्थदर्शक शेकडों ध्वनींचा सांठा मनुष्याजवळ सांचतो. मनुष्याचा हाच पहिला शब्दकोश होय. ह्या सजीव-पदार्थदर्शक ध्वनीबरोबरच धडपडणें, घोरणें, हुंगणें, फरफटणें, कुरकुरणें, थापणें, थापटणें, इत्यादि क्रियांचेहि ध्वनी तो ओळखूं व नामाथूं लागतो व त्या क्रियांचें नामकरण त्या ध्वनींनीं करतो. विशिष्ट ध्वनींनी विशिष्ट पदार्थ व क्रिया यांचें विशिष्ट निर्देशन व प्रत्यभिज्ञान करून देण्याचें सामर्थ्य ज्या कालीं त्याला येतें त्या कालीं भाषा म्हणून जिला म्हणतात तिचीं दोन मुख्य अंगें–नाम व क्रिया ह्यांचे दर्शक ध्वनि–यांचा अपूर्व शोध त्याला लागतो. येथेंच परिपूर्ण भाषा निर्माण झाली. भाषा म्हणजे दुसरें तिसरें कांहीं नाहीं, मुखांतून निघूं शकणाऱ्या शब्दांनीं क्रियांचें व पदार्थांचें आविष्करण करण्याची कला ध्वनी काढण्याला तोंड व ते ऐकण्याला कान ह्या दोन इंद्रियांचीं साधनें या कलेला बस्स होतात आणि हीं दोन्हीं साधनें बहुतेक प्रत्येक मनुष्यापाशीं असतात.

२. अध्वनिपदार्थवाचक व जातिवाचक नामें

अनुकरणात्मक ध्वनींच्या द्वारा आपलें मनोगत दुसऱ्यांना कळविण्याचा किंवा आपलें भूत मनोगत वर्तमानकालीं स्वतःचें स्वतःला प्रत्यक्ष करण्याचा हा शोध मनुष्यमात्राच्या प्रगतीच्या इतिहासांत मोठा क्रांतिकारक झाला. ज्या समाजांत हा शोध प्रथम झाला त्या समाजाला ज्यांना हा शोध अद्याप झाला नव्हता त्या समाजांवर हरएक प्रकारें वर्चस्व मिळालें. टेलिग्राफनें मनोगत कळवितां येणाऱ्या सध्यांच्या पाश्चात्यांना तदनभिज्ञ हिंदू, नीग्रो, चिनी, इत्यादि पौरस्त्यांवर जें वर्चस्व मिळालेलें आपण पहातों त्याच अपूर्व मासल्याचें वर्चस्व अनुकरणात्मक ध्वनींच्या भाषेचा शोध लावणाऱ्या समाजांना मिळालें. परंतु कोणत्याहि शोधाप्रमाणें हा शोध अपुरा भासूं लागला. ध्वनी ज्यांपासून ऐकूं येईल त्या पदार्थांचें व क्रियांचें नामकरण करतां आलें हा कांहीं थोडाथोडका लाभ झाला असें नव्हे. परंतु ध्वनि ज्यांना नाहीं असे पदार्थ व वस्तू असंख्य राहिल्या. ह्या असंख्य अध्वनी वस्तूंचें व क्रियांचें प्रदर्शन एथपर्यंत हावभावानें होत असे. कावळा मांस खातो, हा आशय कळविण्याला अनुकरणार्थक काक हा शब्द उच्चारावा, अध्वनि

जें मांस त्याचा तुकडा दाखवावा, खाण्याची क्रिया बक्, भक्, भक्ष् या अनुकरणात्मक ध्वनीनें ऐकवावी व वर्तमानकालाचा बोध हात किंवा बोट खालीं करून दर्शवावी, इतका खटाटोप करावा लागे. ध्वनी व हावभाव यांचें मिश्रण करून मनोगत कळविण्याची ही तऱ्हा शेकडों वर्षें चालली. ह्या मिश्र तऱ्हेंत कान, तोंड, डोळे व हात अशा चार साधनांचा उपयोग करावा लागे. ही तऱ्हा उजेडांत बरीच कामास पडे. परंतु आंधारांत ही फारच लुली व तोकडी भासे. ज्यांना ध्वनी नाहीं त्या पदार्थांचें व क्रियांचें प्रदर्शन ध्वनीनें कसें करावयाचें ऊर्फ त्यांना नांवें कशीं द्यावयाचीं ही अडचण विचारप्रदर्शनाच्या प्रगतींत अत्यन्त संकटाची होती व ती काढून टाकण्याला मनुष्याला फार कालावधि लागला असावा. कालान्तरानें कोण्या कल्पकाला अध्वनी पदार्थांना व क्रियांना सध्वनी पदार्थांच्या व क्रियांच्या आधारानें नांवें देण्याची युक्ति सुचली. दाह किंवा उकाडा झाला असतां मराठींत हुष् हुष् असा उद्गार आपण काढतों. वैदिक लोकांचे पूर्वज उष् उष् असा दाहदर्शक उद्गार काढीत. हाच दाहार्थक उद्गार पाणिनीनें आपल्या धातुपाठांत 'उष् दाहे' म्हणून दिला आहे. ह्या दाहार्थक उष् उद्गारावरून जळजळींत वाळूमधून उन्हाच्या तडाक्यांत मनुष्याला वाहून नेणाऱ्या प्राण्याला उष्ट्र म्हणून शब्द निर्माण झाला. उष् म्हणजे दाह, त्यांतून तारून नेणारा तो उष्ट्र. दाह करणाऱ्या वनस्पतिरहित ओसाड जागेला उषर व दाहाचा प्रतिकार करणाऱ्या डोक्यावरील आच्छादनाला उष्णीष नांव पडलें त्या प्राण्याच्या आवाजावरून उष्ट्र हें नांव पडलेलें नाहीं, सबब असा तर्क करतां येतो कीं आर्यांच्या अत्यन्त प्राथमिक मूलस्थानांत उष्ट्र प्राणि नव्हता. ह्या उद्गारावरून प्रभातवाचक उषा, संध्यारागवाचक उषस् व ऊनवाचक उष्ण हे तीन अध्वनी शब्द अस्तित्वांत आले. उषा, उषस्, उष्ण इत्यादि शब्दांत जे प्रत्यय संस्कृतभाषा बोलणारे लावीत ते प्रत्यय संस्कृतभाषा बोलणाऱ्यांचे हजारों वर्षांपलीकडील पूर्वज लावीत नव्हते. प्रत्ययांऐवजीं ते प्रत्ययार्थक सबंद शब्दच योजीत.

आस्तेआस्ते प्रत्ययार्थक सबंद शब्दांचे संक्षेप होतां होतां साक्षात् प्रत्यय निर्माण झाले. परंतु सप्रत्यय भाषेचा काल फार अलीकडील आहे. सध्यां ज्या हजारों, किंबहुना लाखों वर्षांपलीकडील भाषेसंबंधीं बोलणें चाललें आहे तो काल अप्रत्यय भाषेचा होता. प्राणी व वस्तू यांच्या ध्वनींच्या अनुकरणात्मक शब्दांनीं बनलेल्या त्या लाखों वर्षांपूर्वीच्या प्राथमिक अप्रत्यय भाषेचा वैदिक किंवा संस्कृत भाषा कदाचित् पंचवीस-तिसावा अपभ्रंश असण्याचा यद्यपि पूर्ण संभव आहे, तत्रापि त्या ध्वन्यनुकारक अप्रत्यय प्राथमिक भाषेचा मागमूस अद्यापहि संस्कृत भाषेंत बराच राहिलेला आहे. हा मागमूस पाणिनीनें दाखवून दिलेला आहे. धन्य आहे ह्याच्या पृथक्करणशैलीची कीं बहुतेक सर्व संस्कृत शब्दांचीं धातुबीजें प्रत्ययोपसर्गांचीं टरफलें सोलून काढून त्यानें धुतल्या तांदुळांप्रमाणें मोकळीं करून ठेविलीं आहेत. पाणिनीय

धातुकोशांतील धातू व इतर धातू यांची परीक्षा करतां आम्हांस असें आढळून आलें आहे कीं सुमारें सातशें धातू ध्वन्यनुकरणोत्पन्न आहेत. कित्येक एकध्वन्यात्मक आहेत व कित्येक अनेक ध्वनींच्या संयोगापासून झालेले आहेत. याशिवाय बोलण्याच्या भाषेंत चिमचिम, गपगप, फसफस, धपधप, इत्यादि ध्वन्यनुकारक धातू पाणिनीनें व कोशकारांनीं जे दिलेले नाहींत, परंतु संस्कृत ग्रंथांतून वारंवार जे भेटतात व जे केवळ बोलण्यांत होते असें मराठींतील त्यांच्या अपभ्रंशांवरून अनुमानतां येतें ते हजारों निराळेच. तात्पर्य, लाखों वर्षांपूर्वील आर्यपूर्वज प्राथमिक मनुष्याला किंवा मनुष्यसमाजाला हजारों ध्वन्यनुकारक शब्दांची भाषा अवगत होती. आणि अशी स्थिति असणें कांहीं विचित्र नाहीं. मुळीं बोलणें म्हणजे विकार, विचार, वस्तू व क्रिया ह्यांचें प्रदर्शन मुखांतील ध्वनींनीं करणें. जो जो म्हणून कांहीं अनुभव आला त्याचें प्रदर्शन मुखध्वनीनें करण्याच्या या कलेचें सारसर्वस्व म्हणजे सर्व ब्रह्मांड ध्वनिरूप करून दाखवावयाचें. कोणत्या प्राथमिक समाजानें ब्रह्मांडाचा कितवा भाग कोणत्या तऱ्हेनें ध्वनिमय केला असेल हें त्या त्या समाजाच्या बहिःसृष्ट्यनुभवावर व प्रतिभेवर अवलंबून रहाणार हें उघड आहे. सध्यां आपल्या भोंवतील प्राण्यांचे व पदार्थांचे जे आवाज आपण ऐकतों त्याहून भिन्न असे आवाज लाखों वर्षांपूर्वील प्राथमिक मनुष्यसमाजानें ऐकिले असतील हें सांगावयास नको. तत्कालीन दोन सोंडांचे हत्ती किंवा पन्नास हात लांबीच्या सुसरी कोणता ध्वनी करीत असतील अगर तत्कालीन नद्या, झाडें कोणता आवाज करीत असतील त्याची सध्यां आपणास कल्पनाहि नाहीं.

आपणास सध्यां अज्ञात असलेल्या त्या ध्वनींवरून प्राथमिक मनुष्यांनीं जे शब्द बनविले ते शब्द प्राथमिक ध्वन्यनुकरणात्मक नसून सादृश्यावरून बनविलेले साधित म्हणून ठरविण्याची चुकीहि आपल्या हातून होण्यासारखी आहे. येथें ऐतिहासिक प्रमाण उपलभ्य नाहीं. ते लाखों वर्षांपूर्वींचे ध्वनि पुनरुज्जीवित करण्याचें साधन आपणाजवळ नाहीं. त्यामुळें मूळ शब्द कोणते व कृतक शब्द कोणते ते निवडतां येणें परम दुर्घट आहे. उदाहरणार्थ, काळा, पांढरा, हिरवा, वगैरे रंगवाचक शब्द घ्या. ह्या निर्जीव पदार्थांना नांवें कशीं मिळालीं ? सादृश्यावरून मिळालीं कीं ध्वनींवरून मिळालीं ? काळा, पांढरा, हे जे साधे नित्य भेटणारे रंग आहेत त्यांचीं नामें प्राथमिक मनुष्याला निर्माण करण्याची आवश्यकता जरूर भासली असेल. त्याशिवाय अत्यन्त साधाहि व्यवहार शक्य नाहीं. आमच्या मतें काळा, पांढरा, हीं रंगनामें खालील तऱ्हेनें अस्तित्वांत आलीं असावींत. अत्यन्त कृष्णवर्ण अशा एखाद्या तत्कालीन प्राण्याचा आवाज काल् काल् असा असावा व काळा रंग शब्दानें दर्शविण्यास प्राथमिक मनुष्यानें काल् काल् ध्वनी करणाऱ्या त्या काळ्याकुट्ट प्राण्याचा काल् काल् ध्वनी अनुकरला असावा. ध्वनीच्या आधारावर तो

ध्वनी करणाऱ्या प्राण्याचा जसा बोध करून देण्याचा शोध मनुष्यानें लावला, त्याचप्रमाणें तो ध्वनी करणाऱ्या प्राण्याच्या रंगावरून काळा, पांढरा, इत्यादि अध्वनी साध्या रंगांनाहि नांवें देण्याचा शोध त्यानें केला. गुणींच्या ध्वनींवरून गुणांना नांवें देण्याचा हा मनुष्यप्राण्याला लागलेला आणीक एक अपूर्व शोध होय. आतांपर्यंत ध्वनी करणाऱ्या प्राण्यांना, वस्तूंना व क्रियांनाच तेवढीं नांवें देण्याची कला त्याला माहीत होती. ह्यापुढें अध्वनी गुणांचेंहि शब्दानें प्रदर्शन करण्याची कला त्याला हस्तगत झाली. भा भा ध्वनी करणाऱ्या उज्वल व लखलखीत रंगाच्या पशुपक्ष्यांवरून प्रकाशाला भा हा शब्द मनुष्य लावूं लागला. चोंचीनें, सोंडेनें, पायानें किंवा दांतांनीं पदार्थ करकरा फाडण्याच्या किंवा खाण्याच्या ध्वनीवरून कर हा शब्द सोंडेला किंवा चोंचीला किंवा स्वतःच्या हाताला लावण्याची बुद्धि मनुष्याला झाली व कृ करणें व कृ विदारणें हे दोन धातू निर्माण झाले. एणेंप्रमाणें गुणांचें शब्दांनीं प्रदर्शन करण्याची युक्ति सांपडल्यापासून मनुष्यानें शब्दांची केवळ टांकसाळ मांडिली.

द्रव्य, कर्म व गुण ह्यांचे दर्शक शेकडों शब्द मनुष्यापाशीं सांठले. तेव्हां त्यांतील जाति ओळखण्याचा म्हणजेच व्यक्ति ओळखण्याचा आणीक एक शोध त्याला लागला. हिरवा, पांढरा, तांबडा, काळा, इत्यादि अनेक वर्ण पाहून त्या सर्वांना सामान्य असा रंग हा शब्द त्यानें मुकरर केला. रंज् हा मूळ लालभडक रंगाचा द्योतक शब्द होता. त्या शब्दाला सामान्यार्थक बनवून रंग हें जातिनाम मनुष्यानें उत्पन्न केलें, आणि अशीं अनेक जातिनामें तयार केलीं. नंतर महत्कालान्तरानें शास्त्रीय ज्ञानाचा अहंकार झाल्यावर जाति अगोदर कीं व्यक्ति अगोदर हा वाद तो घालूं लागला. जातिकल्पना मनुष्याच्या डोक्यांत स्वयंभू आहे आणि भूतभविष्यवर्तमान सर्व व्यक्तींना व्यापून जाति असते, असा निरर्गल सिद्धान्तहि तो ठोकून देऊं लागला. वस्तुतः जातिनामें भाषेच्या व बोलण्याच्या सोईकरतां केवळ सांकेतिक आहेत व त्या नामांनीं दर्शविलेला अर्थ मूर्त नसून केवळ मानसिक असतो हें त्याच्या लक्ष्यांत पर्वी पर्वीपर्यंत येईना. जातींचा मानसिक अर्थहि जसजशी माहिती वाढत जाते तसतसा बदलत जातो व कधीं कधीं अजीबात नष्ट होतो, सबब जातिकल्पना स्वयंभू, स्थिर व व्यक्तिप्राक् नाहीं, हेंहि तो ध्यानीं धरीना. हा जातिव्यक्तिवादाचा घोटाळा पुढला आहे; परंतु, त्याचा उगम प्राथमिक मनुष्यसमाजांत लाखों वर्षांपूर्वीच झालेला असल्यामुळें प्रस्तुत स्थलीं उल्लेख्य झाला. पुढें जरी असा हा घोटाळा जातिनामांनीं केला, तत्रापि भाषेच्या व विचाराच्या प्रगतीला जातिनामें जशीं सध्यां तशींच किंवा त्याहूनहि जास्त पुरातनकालीं उपकारक झालीं. त्या पुरातनकालीं मराठी भाषेची पूर्वज जी वैदिकभाषा तिची पंचवीस-तिसावी पूर्वज जी प्राथमिक अप्रत्यय भाषा ती निव्वळ सुट्या

ध्वनींची होती. सार्थ ध्वनी एकापुढें एक काढणें हीच तत्कालीन भाषण-शैली. नदीच्या कांठावरील सिंहानीं मनुष्य मारिला, हा आशय– नदी कंठ स्थान सिंह मनुष्य झोंप– हे शब्द एकापुढें एक उच्चारून कसातरी अर्धामुर्धा दर्शविला जात असे व बाकी राहिलेला अर्थ अंगविक्षेपांनीं पूर्ण केला जाई. अनेकवचन बोटांनीं किंवा हातांनीं दाखविलें जाई. अध्वनिपदार्थवाचक शब्द व जातिवाचक नामें अस्तित्वांत आल्यावर कालदर्शक व संख्यादर्शक शब्द अस्तित्वांत आले. नंतर लिंगभेद समजूं लागला. शेवटीं वाढ होत होत वारंवार येणाऱ्या संबंधदर्शक शब्दाचे संक्षेप होऊन प्रत्ययोपसर्गादींची निर्मिति झाली आणि लाखों वर्षांनीं वैदिक भाषा जीस म्हणतात ती उत्क्रान्त झाली. तिच्यापासून किंवा तिच्या बहिणीपासून जुनी महाराष्ट्री, महाराष्ट्री, अपभ्रंश व जुनी मराठी अशा परंपरेनें आपण सध्यां बोलतों ती अर्वाचीन मराठी उदयास आली. प्राथमिक, वैदिक, संस्कृत, महाराष्ट्री, मराठी ह्या भाषांची म्हणजे मुखध्वनींनीं विचारप्रदर्शन करणाऱ्या साधनांची परंपरा ही अशी आहे.

४. मूळभूत अनेक ध्वनिपरंपरा

ही परंपरा वैदिक आर्यांची झाली. पृथ्वीवर इतर अशाच पांच सात ध्वनिपरंपरा आहेत. असुर भाषा, द्राविड भाषा, चिनी भाषा, अमेरिकन इंडियनांच्या भाषा, आफ्रिकन भाषा, इत्यादि विचारप्रदर्शनाचीं ध्वनिसाधनें अनेक झालीं आहेत आणि त्यांचे ध्वनी आर्यध्वनींहून भिन्न आहेत. भिन्नध्वनि असण्याचें कारण प्राथमिक अवस्थेंत त्या त्या लोकांच्या कानावर आर्यांना भेटले त्यांहून इतर प्राण्यांचे व वस्तूंचे भिन्न ध्वनी पडले हें होय. ह्या आर्येतर लोकांच्या ध्वनिसाधनांचा विचार येथें इतकाच स्पर्शून, आर्यांच्या दुसऱ्या एका विचारप्रदर्शक साधनाकडे वळूं

५. अभिप्रायदर्शक चित्रकर्म

मुखध्वनींनीं विचारप्रदर्शन करावयाचें म्हटलें म्हणजे ऐकणारी व्यक्ति बोलणाऱ्या व्यक्तीच्या आटोक्यांत हजर असावी लागते. व्यक्ति गैरहजर असली तर ह्या ध्वनिसाधनाचा कांहीएक उपयोग होत नाहीं. ध्वनि धरून ठेवून गैरहजर इसम त्या स्थानीं आला असतां तो त्याच्या कानावर पडावा, ही युक्ति त्या प्राथमिक अवस्थेंत असंभाव्य होती. तत्रापि प्राथमिक अवस्थेंत त्यांतल्या त्यांत मनुष्याला एक युक्ति सुचलीच. तो ज्या स्थलीं रहात असे – प्रायः डोंगरकपारी किंवा गुहा – तेथील भित्तिसदृश खडकावर किंवा खाल्लेल्या अथवा मारलेल्या प्राण्याच्या हाडावर आपल्या अवस्थेचें रेखाचित्र तो कोरी. व त्या चित्रद्वारा आपलें मनोगत आप्तेष्टांना कधीं काळीं तरी कळेल अशी आशा बाळगी. ह्या कोरकामाप्रमाणेंच रंगचित्राचेंहि काम

प्राथमिक मनुष्याला माहीत होतें, असें विंध्यपर्वतांतील अवशेषांवरून उघड होतें. गैरहजर मनुष्यांकरतांच तेवढें कोरकाम किंवा रंगचित्र प्राथमिक मनुष्य काढी असें नव्हे. जेथें भाषेनें संपूर्ण मनोगत शब्दद्वारा कळवितां येत नसे, तेथें हजर मनुष्यांना काठीनें किंवा बोटानें जमिनीवर रेघा व पानें, भूर्जपत्रें, इत्यादींवर रंगचित्रें काढून तो आपलें मनोगत स्पष्ट करी. रंगचित्र व कोरींव रेखाचित्रें यांचा प्राथमिक मनुष्य शब्दांच्या बरोबरीनें उपयोग करीत असावा असा बळकट अंदाज आहे. प्राथमिक मनुष्याचें जें रेखाकर्म किंवा रंगचित्रकर्म हिंदुस्थानांत सांपडतें त्याचा संबंध आपणा वैदिक लोकांच्या पूर्वजांशीं नाहीं. कारण आपण ह्या देशांतील मौल नव्हों. तथापि, आपणा आर्यांचें मूलस्थान हिंदुस्थानाबाहेर जेथें कोठें असेल तेथें आपल्या प्राथमिक पूर्वजांनीं कोरींव व रंगीत चित्रें विचारप्रदर्शनार्थ काढिलीं असतील यांत बिलकुल संशय नाहीं. ध्वनी ऊर्फ भाषा जशी मनुष्याला उपजत आहे तसेंच कोरकाम व रंगचित्रकर्म हीं दोन्हीं मनुष्याला स्वयंभू आहेत. तत्रापि, आपणा आर्यांचा संबंध हिंदुस्थानांतील प्राथमिक कोरींव व रंगीत चित्रकर्माशीं दुसऱ्या एका बाजूनें पोहोंचतो. वैदिक आर्यांच्या पूर्वी या देशांत नागलोक रहात असत. ते जर येथील मौल असतील तर प्राथमिक अवस्थेंतील त्यांचें हें चित्रकर्म असूं शकेल. नागलोकांची चित्रकर्माबद्दल ख्याती असे. ह्यांचा शरीरसंबंध वैदिक आर्यांशीं झालेला इतिहाससिद्ध आहे व नागवंशाचा अंतर्भाव आर्यवंशांत करण्याची रूढीहि आहे. कसेंहि असो कोरींव किंवा रंगीत चित्रकर्मानें मनोगत व्यक्त करण्याची कला ध्वनीनीं मनोगत व्यक्त करण्याच्या कलेइतकीच बहुतेक प्राथमिक आहे. प्राथमिक अवस्थेंत चित्रीकरणाचें हें साधन सामान्य रोजचे विचार प्रगट करण्याच्या उपयोगी पडे. प्राथमिक अवस्थेंत ह्या स्वयंभू चित्रसाधनाचा अवलंब विचारप्रकटनार्थ केल्यावांचून आर्य राहिले असतील हें संभवत नाहीं.

६. चित्रांचें व ध्वनींचें पृथक्करण

शब्दसाधनाला फक्त तोंड व कान हीं दोन इंद्रियें लागतात. चित्रसाधनाला हात व डोळे हीं दोन इंद्रियें लागून शिवाय एखादा चित्रक्षम बाह्य पदार्थ लागतो. शब्दसाधन अंधारांत व उजेडांत सारखेंच उपयोगीं पडतें, परंतु गैरहजर माणसाला निरुपयोगी असतें. जणूं काय, चित्रसाधन गैरहजर माणसाच्याच करितां प्राथमिक मनुष्यानें निर्माण केलें. पहिल्या वस्तूचा कालान्तरानें स्वतःला किंवा इतरांना पुनः पुनः अनुभव आणून देण्यास चित्रकलेचें हें साधन प्राथमिक मनुष्याला फारच साहाय्यक झालें असावें. इतकें कीं चित्रानें तो निरोपहि पाठवीत असावा. ह्या कलेचा जसजसा जास्त अनुभव येत चालला तसतशा त्यांत सुधारणा होत गेल्या. फळ्यांवर किंवा भूर्जपत्रांवर महत्त्वाच्या प्रसंगांचीं किंवा वीरांचीं चित्रें काढून

तीं गोत्रांतील आसपास जवळ दूर रहाणाऱ्या मनुष्यांस दाखवीत हिंडणारे वक्ते उत्पन्न झाले व चित्रांच्या अनुषंगानें रसभरित कथा करूं लागले. आपल्याकडे निरक्षर लोकांत चित्रकथी हा धंदा अद्यापहि करतात. ही चित्रकथकांची संस्था अत्यन्त जुनी आहे, इतकी जुनी कीं वेदादिग्रंथ तिच्या मानानें अत्यन्त अर्वाचीन समजावे लागतात. ऋग्वेदांत चित्र हा शब्द येतो व त्याचा अर्थ आश्चर्यवत् पहाणें असा करतात. धातुपाठकार चित्रीकरण व कदाचित् दर्शन असे दोन अर्थ चित्र-धातूचे देतो. ऐतिहासिकदृष्ट्या पहातां चित्रीकरण हा अर्थ जुना धरावा असें मत होणें रास्त आहे. चित् हा प्राथमिक अवस्थेंतील अत्यन्त जुना धातू. त्यापासून संज्ञा ज्या वस्तूची झाली ती वस्तू बाह्य पदार्थांवर रेखाटणें या क्रियेला चित्र् हा शब्द लावूं लागले. मन् विचार करणें यापासून दुसऱ्याच्या हृत्पटावर तो विचार काढणें याला मन्त्र् हा शब्द, किंवा तन् पसरणें पासून दुसऱ्यावर हुकूमत् पसरणें या अर्थी तन्त्र् हा शब्द, याच मासल्याचे आहेत. चित्त्र, मन्त्र, तन्त्र हे शब्द चित्, मन्, तन् या शब्दांहून अर्वाचीन. येणेंप्रमाणें चित्रीकरणाची ही कला वैदिक लोकांच्या पूर्वजांत अति जुनी आहे व विचार प्रगट करण्याचें एक साधन म्हणून मुख्यतः ती प्रथम अस्तित्वांत आली. शब्दसाधन व चित्रसाधन यांमध्यें दुसरा फरक असा आहे कीं ध्वनींचें अनुकरण शब्दसाधन करतें व आकृतींचें अनुकरण चित्र करतें. आकृति जशी दिसते तशी मनुष्य डोळ्यानें ग्रहण करतो. सृष्टींत आकृत्या बहुत मिश्र असतात, साध्या नसतात. तळ्यावरील झाडावर हातांत दगड घेऊन उभ्या राहिलेल्या माकडानें चोंचींत सर्प धरणारी घार मारिली, ही सर्व मिश्र अवस्था माणूस एकदम पहातो व तिचे मिश्र चित्र प्रथमतः काढतो. नंतर बहुत कालान्तरानें मिश्र अवस्थेंतील एक एक भाग तो पृथक् करावयाला शिकतो. प्रथम मिश्र व नंतर साधें, ही परंपरा चित्रीकरणांत जशी दिसते तशी ध्वनीकरणांतहि दिसते. पशुपक्ष्यादि प्राणी एकेक सुटा ध्वनी करीत नाहींत, अनेकध्वनिसंवलित ध्वनिपरंपरा करतात. ही ध्वनिपरंपरा मनुष्याच्या कानावर पडते व तिचें अनुकरण ध्वनिपरंपरेनें मुखद्वारा साधण्याचा प्रयत्न तो प्रथम करतो आणि नंतर त्या मिश्र ध्वनिपरंपरेंतील एखाद्या सुट्या ध्वनीची अनुकरणार्थ निवड करतो. मिश्रांतून सुट्याचा उदय होण्याला किती कालावधि लागला असेल त्याची कल्पनाच करावी. मिश्र चित्रांतून सुट्या चित्रावर यावयाचा काल व मिश्र ध्वनींतून सुट्या ध्वनींच्या अनुकरणावर यावयाचा काल एक होय. मिश्र ध्वनीवरून व मिश्र चित्रावरून सुट्या ध्वनीवर व सुट्या चित्रावर येण्याच्या यातना भोगतांना, प्राथमिक मनुष्य फारच गडबडला, गोंधळला, घुटमळला व भांबावला असेल. स्पानिश घोडेस्वार पाहून घोडें आणि स्वार ह्या दोन वस्तू एकच असाव्या हा जसा गोंधळ अमेरिकन इंडियनांचा प्रथमदर्शनी झाला व नंतर कालान्तरानें घोड्याचें स्वारापासून त्यांनीं पृथक्करण केलें; किंवा

ग्रंथालय, ठाणे.
2334 वि: विकृति
9937 नों: क्रि: 9916/54

पाण्याचा थेंब पाहून तो अविभाज्य द्रव्य असावा अशी भ्रामक समजूत अनेक युगें चालून नंतर हैड्रोजन व आक्सिजन ह्या दोन द्रव्यांत त्याचें रसज्ञांनीं पृथक्करण जसें नुक्तें पर्वां केलें; आणि हें पृथक्करण झाल्यावर जो हिरमुसलेपणा, आचंबा व हर्ष इंडियनांना व रसज्ञांना झाला तोच हिरमुसलेपणा, आचंबा व हर्ष मिश्र चित्रावरून व मिश्र ध्वनीवरून सुट्या चित्रांवर व सुट्या ध्वनीवर येतांना प्राथमिक मनुष्याला झाला

७. चित्रलिपीचा उदय

सुट्या ध्वनिसाधनानें तीन बाबींचा बोध होतो : (१) बाह्य वस्तू, (२) त्या वस्तूची मनांतील कल्पना आणि (३) बाह्य वस्तू व आंतर कल्पना यांचा दर्शक स्वतः शब्द. प्राथमिक मनुष्य चित्रानें प्रथम बाह्य वस्तू दाखवूं लागला. मग त्या वस्तूला नांव म्हणजे शब्द म्हणजे ध्वनि त्यानें दिला असो किंवा नसो. कालान्तरानें त्याच्या असें लक्ष्यांत आलें कीं चित्र जी वस्तू दर्शविते त्या वस्तूचा दर्शक जो ध्वनि त्या ध्वनीचेंहि दर्शक चित्र होऊं शकेल. एथपासून चित्र ध्वनीचें म्हणजे वस्तुदर्शक शब्दाचें दर्शक झालें. घोड्याचें चित्र घोडा या वस्तूचें जसें दर्शक तसेंच घोडा या शब्दाचें दर्शक झालें. पुढें असें सुचलें कीं, घोड्याचा संबंध सगळा आकार काढण्यापेक्षां नुसता घोड्याचा मुखवटा काढला तरी तेवढा मुखवटाच घोडा शब्दाचा दर्शक होऊं शकेल. ह्या युक्तीनें चित्रानीं शब्द दर्शविण्याला उघडच जास्त सोईचें झालें. चित्र-लेखनानें वस्तूहि ध्यानांत येई व शब्दहि ध्यानांत येई. चित्रलेखनांत शब्दांचे समास देखील दाखवितां येत. तडागांतर्गतमच्छः ह्या शब्दसमासाचा किंवा कल्पनासमासाचा चित्रसमास तळ्याच्या चित्रांत माशाचें चित्र काढून दाखविला जाई. एणेंप्रमाणें चित्रलेखनाची कला अस्तित्वांत आली.

८. मूलाक्षरांची लिपि

परंतु ही कला कालान्तरानें फार अवजड झाली. जेवढ्या म्हणून वस्तू व कल्पना मनुष्याला अवगत होत्या त्या हजारों वस्तूंचीं व कल्पनांचीं हजारों चित्रें काढावीं लागत व त्यांचे अर्थ ध्यानांत ठेवावे लागत. शिवाय निरनिराळे कलावंत एकाच वस्तूचीं निरनिराळीं चित्रें काढून घोटाळा माजवीत असतील तो निराळाच. सबंद प्राणी काढण्याचें सोडून दिलें, तरी प्राण्यांच्या मुंडक्यांचीं, कानांचीं, खुरांचीं, चोचींचीं व शेपटांचीं चित्रें काढणें आणि हंसणें, लाजणें, खाणें, पळणें इत्यादि क्रियांचीं चित्रें काढणें फार बेताल भासूं लागलें. ह्या भानगडींतूनहि कल्पक मनुष्यानें रस्ता काढला. साक्षात् मुंडकीं, कान काढण्याऐवजीं उभ्या, आडव्या, तिरप्या वाकड्या, वक्र, खालीं, वर, पुढें व मागें, रेघा काढून वस्तू व शब्द दाखविण्याची

युक्ति निघाली. रेघोट्यांत आकृतींचा चित्रपणा व वस्तुदर्शनत्व सहजच मागें पडत चाललें व त्या फक्त शब्दांच्या व तद्द्वारा वस्तूंच्या बोधक झाल्या. रेघोट्या शब्द दाखवीत, त्यामुळें त्यांची संख्या शेकडोंनीं मोजावी लागे. शब्द फोडून त्यांतील निरनिराळे अवयव विवक्षित रेघांनीं दर्शविण्याची कूलृप्ति ही ह्या पुढील पायरी होय. तत्रापि हजार पांचशे खुणा ध्यानांत ठेवाव्या लागतच. शेवटीं शब्दावयव ज्या साध्या ध्वनींचे बनलेले असतात त्या साध्या ध्वनींच्या दर्शक अशा खुणा अस्तित्वांत आल्या, म्हणजे मातृका म्हणून ज्यांस संस्कृत शब्द आहे त्यांचा शोध झाला. ह्या मातृकांना म्हणजे मोजक्या विवक्षित खुणांना संस्कृतांत अक्षरें म्हणजे न बदलणाऱ्या कायमच्या खुणा असें अन्वर्थक नांव पडलें. मूलाक्षरांचा शोध हा असा पायरीपायरीनें व बहुत प्रयासानें लागलेला आहे, एकदम नव्यानें कोणी निर्माण केला असा अर्थ नाहीं. मूलाक्षरें हीं अगदीं साध्या अत्यंत पृथक्कृत ध्वनींचीं तेवढीं दर्शक आहेत, वस्तू किंवा कल्पना किंवा शब्द यांचीं दर्शक नाहींत. चित्रावरून अक्षरापर्यंत येतां येतां, वस्तू व कल्पना यांना अजीबात काट मिळून फक्त साधा पृथक्कृत ध्वनि तेवढा राहिला.

९. अक्षर व वर्ण

अक्षरसंस्थानाचा हा असा समाम्नाय म्हणजे परंपरा आहे. (१) सबंध प्रसंगाचें मिश्र चित्र, (२) सुटें चित्र, (३) चित्राचा भाग, (४) सरळ रेघा, (५) वक्र रेघा, (६) शब्ददर्शक रेघा, (७) शब्दावयवदर्शक रेघा, व (८) शेवटीं साध्या मूळध्वनींच्या सरळवक्र रेखामय खुणा ऊर्फ मूळाक्षरें, अशी लांब परंपरा आहे. चित्रणें व लिहिणें यांची प्राक्सिद्धि झाल्यावांचून मूळाक्षरांची सिद्धि शक्य नाहीं. मूळाक्षरांच्या पूर्वी चित्र काढणें व रेघा काढणें या क्रियांचें ज्ञान मनुष्याला अवश्य आहे. अर्थात् ज्यांना मूळाक्षरें माहीत आहेत ते लोक स्वतः तरी किंवा ज्यांच्यापासून त्यांनीं मूळाक्षरें उसनीं घेतलीं ते लोक लिहिण्याच्या टप्प्यावरून अगोदर गेले असले पाहिजेत. वर उल्लेखिलेल्या आठ पायऱ्या चढल्या शिवाय मिश्रध्वनींचें मूलध्वनींत पृथक्करण करतां येणें संभाव्य सुद्धां नाहीं, मग शक्य कोठून असेल ? सुलभ व सोईस्कर मूळाक्षरांच्या शोधावर येत असतांना व आल्यावर नंतर मूलध्वनींचें पृथक्करण मनुष्याला शक्य झालें. वैदिक आर्यांनीं ज्या कालीं अक्षरांचा शोध केला त्या कालीं अक्षरांना ते वर्ण या संज्ञेनेंहि ओळखीत. वर्ण व अक्षर हे दोन शब्द शकपूर्व १००० च्या सुमारास झालेल्या पाणिनीच्या अष्टाध्यायींत गृहीत धरलेले आहेत. वर्ण म्हणजे रंगानें काढलेली ध्वनीची खूण व अक्षर म्हणजे ध्वनीची न बदलणारी खूण. ऱ्हस्वं लघु व दीर्घं च, या दोन सूत्रांत ऱ्हस्वं या नपुंसकलिंगी रूपापुढें उच्चार हा पुल्लिंगी शब्द अध्याहृत समजतां येत नाहीं, अक्षर

किंवा वर्ण हे दोन नपुंसकलिंगी शब्दच अध्याहरणें भाग पडतें. अक्षर व वर्ण ह्यांच्यांत भेद असा आहे कीं लोखंडी शलाकेनें फळा, पाटी, दगड वगैरे कठिण भूमीवर खोदून जी आकृति निघते तिला अक्षर म्हणत व भूर्जपत्रादि मऊ भूमीवर रंगानें काढलेल्या आकृतीस वर्ण म्हणत. शलाकादि कठिण पदार्थांनीं दगडावर रेखाचित्रें व रंगांनीं रंगचित्रें काढण्याची कला अत्यन्त प्राथमिक मनुष्याला माहीत होती, हें सुप्रसिद्ध आहे. तेव्हां पाणिनिकालीन आर्यांना ह्या लेखनाच्या दोन्हीं तऱ्हा माहीत होत्या हें सांगणें नको. इतकेंच नव्हे तर रेघांच्या खुणांनीं संख्यादर्शक ध्वनि दर्शविण्याची कला ऋग्वेदकालींच माहीत होती, हें पंचकर्ण्यः व अष्टकर्ण्यः ह्या रूपांवरून सर्वमान्य आहे. सबब, अरेमियन लोकांपासून अक्षरें हिंदूंनीं उसनीं घेतलीं असावीं इत्यादि तर्क सयुक्तिक दिसत नाहींत. उलट अरेमियन लोकांनीं आर्यांच्यापासून अक्षरें काढण्याची व अक्षरसमाम्नायाची कला उचलली असावी, असें दिसतें. शकपूर्व चौदाव्या शतकांत आर्यांचा अंमल मितानी देशावर असण्याच्या सुमारास अरेमियन लोकांनीं आर्य अक्षरसमाम्नाय बहुशः घेतला असावा आणि तोहि मोडून तोडून अर्धाकच्चा केला असावा. मूलस्थानांतून हिंदुस्थानांत येऊन राहिल्यामुळें, मूलस्थानांत भौगर्भिक अदलाबदल झाल्यामुळें व मधील टांपूंत अद्याप शोध व्हावयाचा असल्यामुळें आर्यांच्या रेखाचित्रांचा व रंगचित्रांचा वगैरे पत्ता लागलेला नाहीं. तत्रापि पाणिनीपूर्वी आर्यांनीं वर्णसमाम्नाय शोधून काढलेला होता यांत बिलकुल संशय नाहीं. हीच पाणिनिकालीन वर्णमाला अपभ्रंश होत होत महाराष्ट्रांत बालबोध या संज्ञेनें प्रचलित आहे.

१०. विचारसूचक अभिनय

विचारप्रदर्शनार्थ साधन म्हणून ध्वनींपासून मनुष्यानें एका पाठीमागून एकएक शोध करून महत्कालान्तरानें भाषा निर्माण केली व चित्रांपासून अक्षरें निर्माण केलीं. ह्या दोन सृष्ट्या उत्पन्न करण्याच्या प्रारंभाच्याहि पूर्वी तिसऱ्या एका साधनाचा मनुष्यानें उपक्रम केला. तें साधन हावभाव ऊर्फ विक्षेप हें होय. ह्या साधनाचा प्रस्तुत लेखाच्या प्रारंभीं उल्लेख केला आहे. या साधनाची प्राथमिक मनुष्यांत जी स्थिती होती तीच स्थिती सध्यांहि आहे. भाषा व अक्षरें यांच्या अवाढव्य प्रगतीमुळें विचारप्रदर्शन व व्यवहार करण्याच्या कामीं हें साधन सुधारण्याची आवश्यकता नव्हती, आणि भाषा व अक्षरें यांच्या अभावीं आवश्यकता असती तत्रापि भाषा व अक्षरें जें ब्रह्मांड काम करतात तें करण्याची या साधनाची क्षमताहि नाहीं. तत्रापि बोलण्याला पोषक दुजोरा म्हणून याची विचारप्रदर्शनाच्या कामीं ज्यांना भाषा कळत नाहीं त्या पशुपक्ष्यांशीं व्यवहार करण्याच्या कामीं, व भाषा आणि अक्षरें यांनीं जे विचार व विकार प्रदर्शित करतां येणें मुष्कील आहे ते विचारविकार

दाखविण्याच्या कामीं, ह्या साधनाचा मनुष्यप्राणी अतिशय उपयोग करीत आलेला आहे व त्यास त्यानें व्यवहारक्षमताहि आणिलेली आहे. नैसर्गिक हावभावांचें परिणत व कृत्रिम रूप म्हटलें म्हणजे ज्यास अभिनय म्हणतात तो होय. अनुकरणात्मक ध्वनीचें भाषा हें जसें परिणत व कृत्रिम रूप, किंवा अनुकरणात्मक रेघांचें अक्षर हें जसें परिणत व कृत्रिम रूप, तसेंच अनुकरणात्मक सहज विक्षेपांचें अभिनय हें परिणत व कृत्रिम रूप आहे.

११. आकृति-निर्मिति

ध्वनि, रेघा व हावभाव या तीन साधनांइतकेंच जुनें एक चौथें साधन प्राथमिक मनुष्याला अनुकरणानें सुचलें. तें हें कीं, पाहिलेल्या वस्तूची हुबेहुब आकृति बनविणें. रेघांचें साधन लांबी व रुंदी या दोन परिमाणांतून कार्य करतें. हुबेहुब आकृतीच्या साधनाला लांबी व रुंदी लागून शिवाय आणिक खोलीहि लागते. प्रथम प्रथम ह्या आकृती तो लाकडाच्या, मातीच्या किंवा दगडाच्या बनवी. राही त्या कपारीचें किंवा गुहेचें अनुकरण करून दोन उभ्या दगडावर तिसरा एक दगड ठेवणें, किंवा राही त्या झाडावरील माच्याचें अनुकरण करून पाण्यांत माचे बांधणें, नदींतील रांजण पाहून त्या सारखे लहान मोठे रांजण व रांजण्या करणें, बेलफळें, नारळ इत्यादींच्या कवटयाप्रमाणें मातीचीं भांडीं करणें, गुहेंतील पाण्याच्या थिबकण्यानें बनलेल्या स्तंभाप्रमाणें दगडाचे स्तंभ बनविणें, पशुपक्ष्यांच्या मृत्तिकामय, दारुमय किंवा पाषाणमय मूर्ति घडविणें, इत्यादि त्रिपरिमाणक आकृत्या बनवून त्यांची कल्पना इतर माणसांना करून देण्याचा हव्यास प्राथमिक मनुष्याला असे. ह्याचीच परिणति होत होत जमिनीवर व पाण्यावर स्वतःच्या उपयोगाकरतां नाना प्रकारचीं भांडीं बनविण्याची कला मनुष्यानें निर्माण केली. ही कला परिणतदशेस यावयाला हजारों किंबहुना लाखों वर्षें लागलीं. हें पुनःपुनः सांगण्याचें कारण नाहीं.

१२. भाषा, वर्ण इत्यादींची दैवी उपपत्ति

एणेंप्रमाणें (१) ध्वनीपासून भाषा, (२) रंगीत किंवा साध्या रेखा-चित्रापासून अक्षरमालिका, (३) नैसर्गिक हावभावापासून कृत्रिम अभिनय, व (४) पाहिलेल्या आकृतींपासून बनावट भांडीं, अशा चार कृत्रिम व्यावहारिक कला मनुष्यानें आपल्या अकलेनें संपादन केल्या. शेकडों टक्केटोणपे खाऊन व हजारों प्रयोगांत फसून मनुष्याला ह्या चार नित्योपयोगी कला परम कष्टानें व निडळाच्या घामानें साध्य झाल्या. कोण्या काल्पनिक स्वर्गांत किंवा नरकांत रहाणाऱ्या देवासुरांनीं दिल्या अश्यांतला बिलकुल भाग नाहीं. शंकराच्या डमरूतून ध्वनी निघाले, चित्रलेखा-नामक गंधर्वकन्येनें चित्रें काढण्याचें कसब शिकविलें, कोण्या किन्नरानें अभिनय

पढविला किंवा विश्वकर्म्यानें भांडीं बनविण्याचा धडा घालून दिला, वगैरे बोलणीं केवळ भाकडकथा होत. ह्या भाकडकथांचा अर्थ इतकाच आहे कीं भाषा, अक्षर-मालिका, अभिनय व भांडीं निर्माण करण्याची परंपरा काय आहे याचा ऐतिहासिक उलगडा करण्याचें ज्ञान पर्वांपर्वांपर्यंत भारतीय मनुष्यांत नव्हतें. ज्या बाबींचा उगम, घटना, वृद्धि व परिणती कळत नव्हत्या त्या बाबी कोण्यातरी दैवी शक्तीच्या प्रसादानें प्राप्त झाल्या, असा अर्थ अज्ञ मनुष्य सदैव व सर्वत्र लावीत आलेला दृष्टीस पडतो. हें सर्व आपलेंच स्वतःचें कर्तृत्व आहे, हा शोध मनुष्याला परम कष्टानें लागलेला आहे. आतां शंकराच्या डमरूचें किंवा देवांच्या विश्वकर्म्याचें किंवा वागधिष्ठात्र्या सरस्वतीचें किंवा पशुपक्ष्यांचें नामकरण करणाऱ्या नोहाचें दैवी अर्थानें कांहींएक प्रयोजन उरलेलें नाहीं. ऐतिहासिक दृष्टीनें यांच्यांतूनहि इतिहास निघण्यासारखा आहे.

१३. वास्तव व भ्रांत कलांचा विकास

ध्वनि, रेघा, हावभाव व आकृति यांना भाषा, अक्षर, अभिनय व भांडीं यांचें रूप देऊन या चारी नैसर्गिक व अनुकारक शक्त्यांचा उपयोग रोजच्या व्यवहारांतील विचारप्रदर्शनाच्या कामीं मनुष्यानें केला. साध्या, सरळ, पोटभरू व्यवहाराला हीं भाषादि साधनें साळसूदपणें पुरीं पडतात, हें खरें आहे. परंतु विचारांचें किंवा विकारांचें जेव्हां काहूर उठतें आणि सुखदुःखादींचा जेव्हां कल्होळ माजतो, तेव्हां साधीं बोलणीं आणि सुधीं लिहणीं कुचकामाचीं ठरतात आणि तीव्रतर साधनांचा आश्रय केल्यावांचून वादळाची शांति होत नाहीं. विचारांचा व विकारांचा हा तीव्र आवेग दर्शविण्यास मनुष्यानें अगदीं अज्ञातपूर्व अशीं नवीन साधनें शोधून काढलीं असें नाहीं. पूर्वीचा पाया ज्याला बिलकूल नाहीं, असें नवीन कांहींच शोधून काढणें शक्य नाहीं. पाया पूर्वीचाच, साधनें तींच, फक्त भरदारींत फरक. साध्या बोलण्याला जो ध्वनी लागतो त्यालाच दीर्घ व भरदार करून कोणत्याहि आवेगाचें प्रदर्शन तीव्रपणें करणें म्हणजेच गाणें. साध्या मूळाबरहुकूम चित्ररेखांना आवेगाचें तीव्र रूप भरदार, काल्पनिक व नाजूक रंगांनीं देणें म्हणजेच चित्र काढणें. साध्या हावभावांचा अतिशय करणें म्हणजेच नाचणें. आणि साध्या नित्याच्या घन आकृतींना तीव्र आवेग दाखवावयास लावणें म्हणजेच मूर्ति करणें. एणेंप्रमाणें ध्वनि, रेखा, हावभाव व आकृति यां प्रत्येकापासून मनुष्यानें साधेपणा व अतिशायन ह्या ऐयत्तिक भेदांवर दोन दोन निरनिराळ्या कला उत्पन्न केल्या. त्यांचा नकाशा असा मांडतां येईलः—

गुण	साधेपणा ऊर्फ व्यवहार	अतिशायन ऊर्फ तीव्रता
१ ध्वनि	भाषा	गान
२ रेखा	अक्षर	चित्रण
३ हावभाव	अभिनय	नृत्य
४ आकृति	भांडें	मूर्तिकरण

साधेपणानें नित्याचा अनेकविध अनंत व्यवहार होत असतो. अतिशायनानें तीव्र अनुभवाचें प्रदर्शन होतें. वारंवार असे प्रसंग येतात कीं रोजच्या साधेपणाचा वीट येतो व आकस्मिक तीव्र अतिशायन सर्वांनाच सदा साध्य नसतें. सबब साधेपणा व अतिशायन यांचें कमजास्त मिश्रण करून कल्पक मनुष्यानें आणीक चार कला निर्माण केल्या. भाषेंतील निवडक शब्द व गाण्यांतील ठेकेदारपणा यांच्या मिश्रणानें मनोहर काव्य ज्याला म्हणतात तें जन्मास आलें. अक्षरें व चित्रण यांच्यापासून सुबोध चित्रमय ऊर्फ सचित्र ग्रंथ उदय पावले. अभिनय व नृत्य या दंपत्यापासून नाटक हें दिवटें पोर निपजलें. आणि भांडें व मूर्त्तिकरण या जोडप्यानें स्थापत्य हें बडें प्रकरण जन्मविलें. सगळयांनाच तानसेन होतां येत नाहीं, पण खग्घरा किंवा मालिनी बहुतेक सर्वांना कंठारूढ करतां येत्ये. अजंटा फार थोडयांच्या आटोक्यांत असतो. पण चित्रमयजगत् इच्छा असल्यास घरोघर पहातां येतें. तांडव एकट्या शंकरालाच शक्य आहे, पण लळितें आणि तमाशे गांवढ्यांचें मन रिझवितात. भिवा सुताराला घरोघर मजुरीला आणतां येत नाहीं, पण एखादी जाळीदार मेहरप किंवा सुंदर वृंदावन थोडया खर्चांत कोणालाहि साध्य आहे. साध्यासाध्यतेच्या व शक्याशक्यतेच्या दृष्टीनें या ज्या चार कला निर्माण झाल्या त्यांचा नकाशा असाः-

१ ध्वनि	भाषा	×	गान	=	काव्य
२ रेखा	अक्षर	×	चित्रण	=	चित्रमय ग्रंथ
३ हावभाव	अभिनय	×	नृत्य	=	नाटक
४ आकृति	भांडें	×	मूर्त्तिकरण	=	स्थापत्य

गाणें, चित्रिणें, नाचणें व मूर्त्तिकरणें, किंवा काव्य, सचित्र ग्रंथ, नाटक व स्थापत्य ह्या आठहि कलांत अंतःकरण जें मन व मनाचा मालक जो मनुष्य त्याची कर्तबगारी प्रधान असते. मनुष्याची कर्तबगारी व लुडबुड ज्यांत अप्रधान असते अश्याहि चार बिना ध्वन्यादींच्या पायावर मनुष्याला पैदा करतां आल्या. प्रायः बाह्यसाधनावर विशेष मदार ठेवून ह्या बिना मनुष्यानें बनविल्या, कातडीं, बांबू, धातू, केश, तारा, इत्यादींच्यावर आघात केला असतां ध्वनी निघतो व तो ध्वनी योग्य तऱ्हेनें वळविला तर त्याच्यापासून सुस्वर उत्पन्न होतात. बाह्य पदार्थांपासून सुस्वर काढण्याच्या ह्या कलेला वादन म्हणतात. वस्तूंचीं हातानें चित्रें काढण्यापेक्षां प्रकाशाच्या द्वारा तीं काढून घेण्याची प्रकाशलेखनकला महशूर आहे. नटांची मातब्बरी सफा काढून टाकून केवळ बाहुल्यांच्या कडून अभिनय व नर्तन करविण्याची कळसूत्राची कला अत्यन्त पुरातन आहे. मूर्तींच्या आंगलटींत व मुखचर्यंत विचार व विकार सांठविण्यापेक्षां वृक्ष, वेली, उपवनें, उद्यानें, मैदानें व टेंकडया यांच्या विशिष्टरचनेनें विचार व विकार चेतविण्याची भूमिरचनेची कला भरतखंडांत फार जुनी आहे. वाद्यांत फोनोग्राफ, चित्रणांत प्रकाशलेखन व कळसूत्रांत सिनेमा हीं रूपें

आधुनिकशास्त्रज्ञानोत्पन्न अतएव सद्यस्क आहेत. ह्या तिहीं खेरीज बाकींचीं सर्व रूपें आपल्या ह्या महाराष्ट्रांत प्राचीन कालापासून उमद्या स्थितींत असलेलीं आढळतात. ह्या बाह्य कलांचा जोड पूर्वीच्या आठ कलांना दिला असतां नकाशा व परंपरा अशी बनतेः—

मूळ मनुष्याधीन साधन	साधा व्यवहार	अतिशायन	व्यवहार × अतिशायन	बहिःसाधन
१	२	३	४	५
१ ध्वनि	भाषा	गान	काव्य	वाद्य
६	७	८	९	१०
२ रेखण	अक्षर	चित्रण	चित्रमय ग्रंथ	प्रकाशलेखन
११	१२	१३	१४	१५
३ हावभाव	अभिनय	नृत्य	नाटक	कळसूत्री बाहुल्या
१६	१७	१८	१९	२०
४ घन आकृति	भांडीं	मूर्त्तिकरण	स्थापत्य	भूमिरचना

ह्या वीस रस्त्यांनीं मनुष्य विचार व विकार प्रगट करीत असतो. पैकीं १ ध्वनि, ६ रेखण, ११ हावभाव व १६ घनाकृति, आणि २ भाषा, ७ अक्षर, १२ अभिनय व १७ भांडीं या आठ मूळ व्यावहारिक साध्या साधनांच्या कार्यासंबंधानें मागें उल्लेख केला आहे. प्रकृत लेखांत भांडें या शब्दाचा अर्थ विचारविकारप्रदर्शनार्थ किंवा व्यवहारोपयोगार्थ बनविलेली प्रतिमा, मूर्त्ति, घर, छपर, हौद इत्यादि कोणतीहि घन आकृति असा समजावयाचा आहे. अतिरेक होऊन विकार व विचार मनांत मावतनासे झाले, द्रवून उतूं जाऊं लागले व साध्या साधनांच्या द्वारा प्रदर्शित करतां येतनासे झाले म्हणजे अतिशायनाच्या ज्या ३ गान, ८ चित्रण, १३ नृत्य व १८ मूर्त्तिकरण ह्या कला, त्यांचा आश्रय मनुष्य करतो. मनाचें द्रवून जें उतूं जाणें त्यालाच रस म्हणतात. शृंगार, वीर, करुण, अद्‌भुत, हास्य, रौद्र, भयानक, बीभत्स व शांत ह्या नऊ तऱ्हांनीं द्रवून मन उतूं जातें व ह्या नवाहि उतांचें प्रदर्शन गान, चित्रण, नृत्य व मूर्त्तिकरण या चार अतिशायनांनीं मनुष्य साधतो. शब्द व भाषा यांचा व गानाचा कांहींएक संबंध नाहीं. गान हजारों शब्दांनीं बोलत नाहीं, फक्त सप्त स्वरांनीं नवरस बोलतें. चित्रण अक्षरांनीं म्हणजे बावन मातृकांनीं अर्थ दाखवीत नाहीं, फक्त पांच रंगांच्या न्यूनाधिक्यानें नवरसांचें आविष्करण करतें. नृत्य म्हणजे साधे अभिनय नव्हत, अंगांच्या उद्धत हावभावांनीं नवरसांचें प्रकटीकरण म्हणजे नृत्य अथवा खरें म्हटलें म्हणजे तांडव. आणि मूर्त्तिकरण म्हणजे केवळ भांडीं घडणें नव्हे, तर घनाकृतींच्या उठावांनीं नवरसांचें प्रदर्शन करणें.

अतिशायनाच्या ह्या गानादि चार कला, साध्या व्यवहाराच्या भाषादि चार कला व मूळ ध्वन्यादि चार साधनें, मिळून विचारविकारप्रदर्शनाच्या बारा साधनांचीं कार्यें केवळ इयत्तेच्या चढउतारानें बनलेलीं आहेत. आतां तत्त्वांत काव्यादि जीं चार साधनें मांडिलीं आहेत तीं साधेपणा व अतिशायन यांच्या मिश्रणानें अंतर्बाह्य बनलेलीं आढळतात. गानाचा ठेका व भाषेचे शब्द मिळून काव्याचें गद्यपद्य बहिःस्वरूप बनतें; व शब्दांचा अर्थ आणि अतिशायनोद्भूत नवरस मिळून काव्यांचें अंतःस्वरूप घडतें. अक्षरें व चित्रें यांचा मिलाफ म्हणजे चित्रमय ग्रन्थांचें बहिःस्वरूप; व अर्थ आणि वस्तूंचें साक्षाद्दर्शन हें त्यांचें अंतःस्वरूप. अभिनयांतील हातवारे व नृत्यांतील औद्धत्य हें नाटकाचें बहिःस्वरूप; व हातवाऱ्यांनीं दर्शविलेले विकारविचार आणि औद्धत्यातिशायनानें दर्शविलेले नवरस हें त्याचें अंतःस्वरूप. भांडें हें स्थापत्याचें बहिःस्वरूप; आणि नवरसांचा मूर्त उठाव हें अंतःस्वरूप. ह्या चार मिश्र कलांचीं अत्यन्त शुद्ध रूपें म्हटलीं म्हणजे हीं. इतर नाना कलांचें मिश्रण होऊन ह्या मूळच्या शुद्ध मिश्र कला अनेकधा मिश्र झालेल्या प्रायः पहाण्यांत येतात. उदाहरणार्थ नाटक. ह्यांत गद्य, पद्य, काव्य, वाद्य, चित्र, मूर्त्ति, इत्यादि अनेक मिश्रणें झालेलीं आहेत. दुसरें उदाहरण स्थापत्याचें. स्वतः फक्त एकट्या भांड्याच्या मूर्तीनें नवरसांचें प्रदर्शन करणें हें स्थापत्याचें मूळ कार्य. त्यांत भिंतीवरील चित्रें. नक्षी, अक्षरें, अर्धमूर्त्ति, पूर्णमूर्त्ति, लेप, रांगोळ्या, इत्यादींचें मिश्रण झालेलें प्रायः आढळतें. असो. या बाराहि कलांत मनुष्याच्या कर्तृत्वाचें प्राधान्य विशेष असतें. वाद्यादि ज्या चार विचारविकारप्रदर्शनाच्या कला राहिल्या त्यांत मनुष्याधीन साधनांपेक्षां बाह्य वस्तूंचें साधनाधिक्य जास्त सांपडतें. बाब स्पष्ट आहे, सबब ह्या वीस साधनांसंबंधीं प्रपंच एथेंच थांबवून, मनुष्यनिर्मित दुसऱ्या एका विचित्र साधनाचें वर्णन करतों. हें साधन पूर्ण विकारमय आहे, आणि विकारमय असून आश्चर्य कीं अत्यन्त गूढ विचार प्रदर्शित करण्याचा हें खटाटोप करतें. इतर कलांच्या प्रमाणें ह्याहि कलांचा पाया तोच आहे, म्हणजे ध्वनि, रेखण, हावभाव व घनाकृतिच आहे. फक्त पायाच्या उगमांत तेवढा भेद. गानादिकलांत पायाचा उगम ज्ञात असतो, वर्णयिष्यमाण कलांत नसतो. आकाशवाणी, अरण्यरुदन, पिशाचगायन, स्मशानकोलाहल, वगैरे ध्वनी कित्येक मनुष्यांना कधींकधीं ऐकूं येतात व ते कोठून व कसे येतात तें कळत नाहीं. त्यानें मनुष्य गांगरतो, दचकतो, हैराण होतो व कधींकधीं आजारीहि पडतो. ह्या ध्वनींची बाधा दैवी समजून त्यांचा प्रतिरोध करण्याकरितां मनुष्य श्रुतध्वनींच्या सदृश किंवा विदृश ध्वनी तोडगे म्हणून निर्माण करतो. ऱ्हां ऱ्हीं ऱ्हूं, क्रां क्रीं क्रूं, फट्, वषट्, स्वाहा, वगैरे असले असंख्यात ध्वनी तोंडावाटे काढून व इतर सार्थ किंवा अनर्थ संस्कृत, प्राकृत व धेडगुजरी शब्द किंवा शब्दमाला गुणगुणून मांत्रिक दैवीध्वनींची बाधा पिटाळून लावतात. ह्या ध्वनींना मंत्र ही संज्ञा आहे व साधनाला मंत्रसाधन

हें अभिधान आहे. अज्ञातोद्गम किंवा काल्पनिक ध्वनी जसे कित्येकांना ऐकूं येतात तशींच आकाशनगरें, गंधर्वपुऱ्या, सूर्यमुखें वगैरे चित्रेंहि कित्येक मनुष्यांना आकाशांत म्हणजे अवकाशांत दिसतात. हीच काल्पनिक चित्रकला होय. कित्येक मनुष्यांच्या अंगांत संचार होऊन तीं नानाप्रकारचे वेडेविद्रे हावभाव, आळेपिळे दाखवितात व पिंगे घालतात. हेंच काल्पनिक तांडव ऊर्फ नृत्य होय. आणिक कित्येक मनुष्यें भ्रांतीनें पिशाच, राक्षस, खैस, वेताळ, स्वर्ग, नरक, पाताळ, देव, दानव वगैरे घनाकृति बनवितात. हेच काल्पनिक मूर्त्तिकरण व स्थापत्य समजावें. अज्ञानोद्भव भ्रांतिकृत ध्वनी, रेखा, हावभाव व घनाकृति ह्या काल्पनिक साधन-चतुष्टयाचा जोड उपरिनिर्दिष्ट ज्ञातोद्गम विश्वसनीय वास्तविक साधनांना दिला म्हणजे जो नकाशा बनतो तो असाः-

विकारविचारप्रदर्शनाचीं साधनें

वास्तव ऊर्फ शुद्ध	भ्रांत ऊर्फ शबल
१ ध्वनि-भाषा-गान-काव्य-वाद्य	१ ध्वनि–भाषा–गान–काव्य–वाद्य
२ रेखण–अक्षर-चित्रण–चित्र-मयग्रंथ–प्रकाशलेखन	२ रेखण–अक्षर–चित्रण–चित्रमयग्रंथ –प्रकाशलेखन
३ हावभाव–अभिनय-तांडव–नाटक–कळसूत्र	३ हावभाव–अभिनय–नृत्य–नाटक –वेताळसभा
४ घनाकृति–भांडीं–मूर्त्ति–स्थापत्य –भूमिरचना	४ घनाकृति–भांडीं–मूर्त्ति–स्थापत्य –भूमिरचना

वास्तव साधनांचीं उदाहरणें कोणतीं व भ्रांत साधनांचीं उदाहरणें कोणतीं तीं खालील यादींत क्रमवार देतों-

१	वास्तव	ध्वनी :	मानुष व बाह्य सृष्टींतील पदार्थांचे
२	भ्रांत	ध्वनी :	अज्ञात उगमापासून निघालेले
३	वास्तव	भाषा :	व्यवहारांत बोलतात ती
४	भ्रांत	भाषा :	अज्ञातोद्भव ध्वनींच्या अनुकरणानें ऱ्हां ऱ्हीं ऱ्हूं इत्यादि मंत्रभाषा
५	वास्तव	गान :	स्वरोद्भव
६	भ्रांत	गान :	ङुं ङुं णें, गुणगुणणें, पुटपुटणें, इत्यादि मंत्रगान
७	वास्तव	काव्य :	शिवाजी काव्य, नारायणवध, पोपचे डन्शियाड, मनाचे श्लोक, इत्यादि
८	भ्रांत	काव्य :	मिल्टनचें प्यारेडाइझ लॉस्ट, डांटीचीं काव्यें, कुमारसंभव इ. इ.
९	वास्तव	वाद्यें :	सनया, ढोल, इत्यादि

१०	भ्रांत	वाद्यें :	डौर (डमरू), कुडबुडें, इत्यादि
११	वास्तव	रेखण :	वस्तुदर्शक रेघा
१२	भ्रांत	रेखण :	तोडग्यांच्या सरळ, वक्र व नागमोडी रेघा
१३	वास्तव	अक्षरें :	अ, क, इत्यादि
१४	भ्रांत	अक्षरें :	ओंकार, यंत्रें, स्वस्तिकें वगैरे
१५	वास्तव	चित्र :	पशुपक्षी इत्यादींचें
१६	भ्रांत	चित्र :	राक्षसकिन्नरदेवदानवादींचें
१७	वास्तव	सचित्रग्रंथ :	इतिहास, सुतारकी, लोहारकी इत्यादींच्या विशदीकरणार्थ
१८	भ्रांत	सचित्रग्रंथ :	पुराणें, माहात्म्यें, इन्फर्नो इत्यादींच्या विशदीकरणार्थ
१९	वास्तव	प्रकाशलेखन :	फोटोग्राफी इत्यादि
२०	भ्रांत	प्रकाशलेखन :	आकाशांत कल्पनेनें नगरें वगैरे पहाणें
२१	वास्तव	हावभाव :	रोजचे अंगाचे विक्षेप
२२	भ्रांत	हावभाव :	संचाराच्या वेळचे विक्षेप
२३	वास्तव	अभिनय :	विक्षेपांचें वर्गीकरण करून शास्त्रांत सांगितलेले
२४	भ्रांत	अभिनय :	वेताळ, स्मशान, खंडोबा, इत्यादि संबंधक नेमके विक्षेप
२५	वास्तव	नृत्य :	प्रसिद्ध आहे
२६	भ्रांत	नृत्य :	पिंगा, अंगांत येऊन नाचणें इ. इ.
२७	वास्तव	नाटक :	मनुष्यसमाजसंसारदर्शक
२८	भ्रांत	नाटक :	देवासुरपिशाचसमाजदर्शक
२९	वास्तव	कळसूत्र :	मनुष्याकृति बाहुल्यांचें
३०	भ्रांत	कळसूत्र :	पिशाचाकृति बाहुल्यांचें
३१	वास्तव	घनाकृति :	पशुपक्ष्यादींच्या
३२	भ्रांत	घनाकृति :	देवांदानवांच्या
३३	वास्तव	भांडीं :	स्वयंपाकपात्रें, सामान्य घरें, वाडे
३४	भ्रांत	भांडीं :	देववेताळ यांच्या पूजेचीं साधीं उपकरणीं, दगडाचीं व लाकडाचीं देवांचीं साधीं छपरें, साधे तकिये, ख्रिस्त्यांचीं साधीं प्रार्थना-मंदिरें, साधीं थडगीं, इ. इ.
३५	वास्तव	मूर्त्ति :	पशुपक्ष्यादींच्या

३६	भ्रांत	मूर्त्ति :	रामकृष्ण, सैतान, देवदूत इत्यादींच्या
३७	वास्तव	स्थापत्य :	वाडे, किल्ले, कोट, घाट इत्यादि
३८	भ्रांत	स्थापत्य :	देवळें, चर्चें, मशिदी, इत्यादि
३९	वास्तव	भूमिरचना :	उद्यानें, बागा, पदार्थसंग्रहभूमी, नगररचना
४०	भ्रांत	भूमिरचना :	स्वर्ग, नरक, पाताळ, वायुलोक, चंद्रलोक

इ. इ.

अज्ञातोद्भव शबल साधनें केवळ भ्रांतिकृत असतात. परंतु तीं भ्रांतिकृत असतात असें मनुष्य समजत मात्र नाहीं, वास्तव साधनांच्या व कलांच्या इतकींच किंवा त्याहूनहि जास्त खरीं तीं आहेत असा मनुष्याचा समज असतो. गूढ आवाज, वगैरे मूळ पाया. त्यावर तीं कोठून आलीं एतद्विषयीं तर्क. माहीत असणाऱ्या कोणत्याहि पदार्थापासून आला नाहीं त्या अर्थीं व कोण्यातरी प्राण्यापासून आला पाहिजे या अर्थीं, उपमानप्रमाणानें प्राथमिक मनुष्यानें असें ठरविलें कीं कोण्यातरी अदृश्य प्राण्याचा हा आवाज असावा. आवाज झाडावरून, रानांतून, सरोवरावरून, मेघांतून, आकाशांतून वगैरे जिकडून येईल तिकडे तो अदृश्य प्राणी रहात असावा. असे नाना तर्क करून मनुष्यानें भुतें, यक्ष, देव, दानव, अप्सरा, गंधर्व, वेताळ, पिशाच, इत्यादि गूढ प्राणी प्रथम निर्माण केले, नंतर त्यांच्या रहाण्याच्या जागा, स्थलें, प्रदेश व लोक निर्माण केले, आणि शेवटीं त्यांचीं त्यांच्या गुणानुरूप उपमान-प्रमाणानें रूपें निर्माण केलीं. इतकेंच करून मनुष्य थांबला नाहीं, तर हे अदृश्य प्राणी रागावले म्हणजे पूजा, प्रार्थना, नैवेद्य व बळी देऊन त्यांची मर्जी संपादण्याचे मार्ग त्यानें ठरविले. ह्या मार्गांनाच देवधर्म म्हणतात. सुष्ट देव, दुष्ट देव, खाष्ट देव, वरिष्ट देव, कनिष्ट देव, प्रेष्ठ देव, श्रेष्ठ देव आणि एकमेव एक देव असे नाना प्रकारचे देव व देवदूत व भुतें व सैतानें व या सर्वांच्या स्त्रिया व पोरें असें एक नवीन जगच्या जग मनुष्यानें निर्माण केलें आणि तें जग खरें व मेल्यावर त्या खऱ्या जगांत आपण अक्षय्य रहाण्याला जाणार, इतकेंच नव्हे तर आपलें हें दोन दिवसांचें साधें जग खोटें आणि खोटें नसलें तर क्षणिक, इत्यादि तर्कपरंपरा बांधीत बांधीत तो त्या खऱ्या परलोकावर बेसुमार आसक्त झाला. इतका आसक्त कीं, रोजचीं व्यवहारांतलीं जीं कर्मे, आयुधें, उपकरणीं, चित्रें, मूर्त्ति, इमारती, थडगीं, लग्नें, जातकर्णे, पताका, ध्वज, संस्कार, इत्यादि सर्वांवर त्या खऱ्या जगांतील वस्तूंचा त्यानें छाप मारिला. त्या खऱ्या जगाचीं व तेथील देवांदानवांचीं चित्रें, स्तोत्रें, वेद, बायबलें, कुराणें, त्रिपीटकें, काव्यें, नाटकें, तांडवें, देखील मनुष्यानें केलीं. असा मोठा गोंधळ मनुष्यानें माजवून ठेविला. खरेंच खरें होतें त्याला त्यानें खोटें ठरविलें आणि निव्वळ काल्पनिक जें होतें त्याला खरें ठरविलें. मनुष्यानें ही जी कल्पना-सृष्टि बनविली तिचें उत्कट ऐतिहासिक रूप पहावयाचें असल्यास उत्तम मार्ग म्हटला

म्हणजे कोणत्याहि लोकांच्या देवळांकडे चला. म्हणजे मनुष्याच्या भ्रांत साधनांचा केवळ ऐतिहासिक संग्रह एका ठिकाणीं केलेला तुम्हाला आयताच आढळेल. शहरांतलें अलीकडील शेदीडशें वर्षांतील देऊळ घेऊं नका. मुफस्सल मधील जुना विदीर्ण झालेला एखादा देऊळवाडा घ्या आणि ज्या भागांत तो कालानें किंवा देऊळफोडयांच्या हातानें छिन्नभिन्न झाला असेल ते भाग कल्पनेनें एकत्र जुळवा. प्रथम जुनाट पिंपळ व वड यांचे पार लागतील. हे वृक्ष ब्राह्मण आहेत व ह्यांच्यावर ब्रह्मराक्षस रहातात. भ्रांतदृष्टया ब्रह्मराक्षस म्हणजे एक व्यंतरयोनि समजतात. ऐतिहासिकदृष्टया ब्रह्मराक्षस म्हणजे ब्राह्मण व राक्षस यांच्यापासून झालेली एक पुरातन संकर जात समजली तर फारसें चुकणार नाहीं. ज्या कालीं देशांत राक्षसांची वस्ती होती त्या कालचा हा संकर असेल. ह्या वृक्षांच्या पुढें एखादा म्हसोबा किंवा विरोबा किंवा पोटोबा लागेल. एक साधा ओबडधोबड दगड व त्याला शेंदूर फासलेला. चांगली नक्षीदार मूर्त करतां आली नसती असें नाहीं. परंतु हे म्हसोबा वगैरे देव फार साधे व ओबडधोबडच असतात. त्यांच्या ओबडधोबडपणांत इतिहास आहे. पुरातनकालीं हे देव ज्या लोकांत अस्तित्वांत आले त्यांना ह्याहून जास्त कौशल्याची मूर्त्तिकला माहीत नव्हती, आणि माहीत असली तत्रापि स्वयंभू ओबडधोबड मूर्तीपुढें कृत्रिम सुंदर मूर्तींची किंमत त्यांना वाटत नव्हती. थोडे पुढें गेलांत म्हणजे एका बाजूला वेताळसभा लागेल. हा वैशिष्ट्यानें महारलोकांचा म्हणजे नागलोकांतील एका कनिष्ट जातीचा देव आहे. दुसऱ्या बाजूला दगडाच्या एका देवळींत एक दगडी दिवा जळतांना आढळेल. ही दगडी देवळी पितरांची आहे आणि दिवा रात्रंदिवस त्यांना उजेड दाखविण्याकरितां पाजळत आहे. दहा पांच हातांवर गांवांतील दोन चार सतींचीं देवळें लागतील. त्यांवर दंपत्य कोरलेलें असतें. नंतर मारुतीच्या देवळांपाशीं याल. वैदिककालींन मरुत् म्हणजेच पौराणिककालीन मारुति. मरुत्, मारुतः, मारुतिः अशी तिसरी पिढी आहे. मारुति हा पांथस्थांचा संरक्षक. ह्यांच्यापुढें देवडी व त्यावरील गोपुर भेटेल. गोपुरांत पूर्वी देऊळवाडयाच्या गाई बांधीत असत, सध्यां तेथें वाजंत्र्यांचा ताफा रहातो. गोपुर पूर्वाभिमुख असून त्यांतून प्राकारान्तःप्रदेशांत जाण्याचा रस्ता आहे. प्राकार दोन अडीच पुरुष उंच असून त्यांच्या विटा हातहात लांब आहेत. प्राकार दुमजली आहे. खालच्या मजल्यांत चौफेर वोवऱ्या केल्या आहेत व वरच्या उघडया मजल्यावरून शत्रूवर तिरंदाजी किंवा गोळीबार करण्याकरितां तटांत छिद्रें ठेविलीं आहेत. देऊळ एकप्रकारचा किल्लाच आहे. प्राकार दोन हजार वर्षांपूर्वीच्या शकयवनांच्या धाडी परतविण्याकरितां तटांच्या धर्तीवर बांधलेला आहे. आंत गेलांत म्हणजे मध्यें एक दोन मुख्य देवळें व भोंवतालीं उपदेवालयें दिसतील आणि त्यांच्यापुढें दहा पांच उभ्या काठया आढळतील. एक काठी इंद्रध्वज आहे,

दुसरी गरुडध्वज आहे, तिसरी सिंहध्वज आहे आणि चवथी रामदासी भगवा झेंडा आहे. साऱ्या ध्वजा ऐतिहासिक आहेत. इंद्रापासून समर्थांपर्यंत साऱ्यांचे ते ध्वज आहेत. भगवा झेंडाहि इंद्रध्वजच आहे. ध्वजदंड या शब्दाचा मराठी अपभ्रंश ध्वजदंडः = झअअंडा = झेंडा. आणि भगवान् जो इंद्र त्याचा अपभ्रंश भगवा. भगवद्ध्वजदंडः = भगवाझेंडा. पांचवी काठी पेशव्यांच्या जरीपटक्याची आहे. जरीपटका म्हणजे पुनः इंद्रध्वजच. इंद्राच्या ध्वजाला जर्झरं म्हणून संस्कृत नांव असे. पटक म्हणजे कापडाचा तुकडा. जर्झरीकपटकः = जरीपटका. जरीपटका म्हणजे इंद्राचें निशाण. पेशव्यांनीं तें नवीन शोधून काढिलेलें नाहीं. वैदिककालापासूनचें तें जुनेंच आहे. मध्यें मुसलमानी धाडींत देवळांतून लपून राहिलें होतें तें छत्रपतींनीं व पेशव्यांनीं सैन्यांत पुनः प्रचलित केलें इतकेंच. ह्या ऐतिहासिक काठ्यांच्या शेजारीं अत्यंत जीर्ण झालेले व पावसापाण्यानें झडलेले दहा पांच दगड तुमच्या सूक्ष्म नजरेखालीं येतील. दगड पुरुषपुरुष किंवा अर्धा पुरुष उंच व हात पाऊण हात रुंद आहेत व त्यांवर तीन चार मजली अर्धमूर्त्ति कोरलेल्या आहेत. कोरकाम ओबडधोबडच आहे, परंतु म्हसोबा, विरोबांच्याहून जास्त कुसरीचें आहे. एका मजल्यांत शिवलिंग व स्त्रीपुरुष उपासक कोरलेले आहेत. दुसऱ्या मजल्यांत भालेवाले घोडेस्वार कोरलेले आहेत. तिसऱ्या मजल्यांत मोठमोठ्या ढुंगणाच्या नितंबिनी व कुंभस्तनी महाराष्ट्रवधूटिका कोरलेल्या आहेत. ह्या अर्धमूर्त्ति दगडांना कांदळ किंवा कांदळाचे दगड म्हणतात. महाराष्ट्रांत असें एक गांव नाहीं कीं जेथील देवळाबाहेर, शेजारीं किंवा आंत हे कांदळ सांपडणार नाहींत. हे कांदळ केव्हांचे ? ज्या कालीं पर्वतांत व गुहांत व दऱ्यांत लेणी कोरण्याचें वारें महाराष्ट्रांत शिरलें तेव्हांचे. कांदळ हा शब्द कांदर या शब्दाचा अपभ्रंश. 'कंदरस्य इदं कांदरं.' कंदर म्हणजे पर्वतांतील कोरीव लेणें. हा कंदर शब्द वाल्मीकि रामायणांत येतो. कंदरपूजा ऊर्फ लिंगपूजा महाराष्ट्रांत फार जुनी आहे. बौद्धांपासून लिंगपूजकांचें संरक्षण करणारे भालेवाले कंदरांवर कोरलेले आहेत. बहुशः बौद्धांचा पराजय व लिंगपूजकांचा जय सुचविलेला असावा. ज्या अर्थी प्रत्येक खेड्यांत कंदर सांपडतात त्या अर्थी एका कालीं बौद्धांची व शैवांची मोठी दंगल महाराष्ट्रांत होऊन गेली असावी असा तर्क होतो. कांदळांपैकीं कांहीं दगड अति जुने व कांहीं अनुकरणानें केलेले बरेच म्हणजे फक्त पांच-सातशें वर्षां पलीकडील अर्वाचीन असे दोन प्रकारचे असतात. ह्या कांदळां शेजारीं किंचित् अंतरांवर वीर असतात. असुर, राक्षस, शक, यवन व मुसलमान यांच्या पासून शौर्यानें गांवाचें संरक्षण करण्यांत देह ज्यांनीं खर्चिला त्यांचे पुतळे देवळाच्या आवारांत बहुमानानें मांडून ठेवण्याची चाल महाराष्ट्रांत असे. मूर्त्ति ग्राम्य कारागिरीच्या असतात व कांहींच्या खालीं लेखहि कोरलेला असतो.

मध्यवर्ती देवालय प्रायः शिवाचें किंवा विष्णूचें व कधीं कधीं दोहोंचीं दोन देवळें असतात. कित्येक देवळें चालुक्यकालीन, कित्येक राष्ट्रकूटकालीन, कित्येक यादवकालीन व क्वचित् एखादें मुसलमानकालीन असतें. यादवकालीन व मुसलमानकालीन देवळे साध्या हेमाडपंती घाटाचीं प्रसिद्ध आहेत. चालुक्यकालीन देवळें फार कलाकुसरीचीं व कारागिरीचीं असतात. प्रथम गरुड किंवा नंदी लागतो. नंतर सभामंडप सुरू होतो आणि गाभाऱ्याच्या प्रारंभाला जयविजयांची परवानगी मागावी लागते. ती मागतांना गणराजांची व त्यांचे बंधू स्कंदराज यांची प्रार्थना केल्यावर उंबरठ्याखालील कीर्तिमुखाला पायाखालीं चिरडून आंत प्रवेश जों करावा तों गर्भागाराची अपूर्व शोभा डोळ्यांत भरते. एथें प्रेक्षकाचें चिमुकलें मन भांबावून जातें. पहावें तरी काय काय ? आधीं कोणतें पहावें आणि मागून कोणतें पहावें ? प्रथम गर्भागार पहावा कीं सभामंडप पहावा कीं प्राकारचित्रें पहावीं याचा निश्चय होत नाहीं. कोठें इंद्रसभा व दशावतार यांचीं रंगीत चित्रें काढिलेलीं आहेत, कोठें देवयोनी व गणदेवता यांच्या अर्धमूर्त्ति कोरिल्या आहेत, कोठें यक्षकिन्नरराक्षस यांच्या प्रतिमा घडलेल्या आहेत, कोठें तत्कालीन राजांच्या सभा चितारल्या आहेत. हें सर्व नीट व साद्यन्त व सार्थ पहावयाला महिना पुरणार नाहीं. नुसतीं उपकरणींच घेतलीं तर तो अटनीवरचा शंख, सर्पाकृति पळी, कमलाकृति अभिषेकपात्र, मच्छाकृति धुपाटणें, वगैरे वस्तूंतहि इतिहास भरलेला सांपडतो. देवळांतून प्राकारांगणांत येऊन खुद्द देवालयाचा पायापासून शिखरापर्यंतचा घाट पहावा तर तोहि किती आश्चर्यकारक ! त्या मेहरपा, त्या जाळ्या, त्या मूर्ति, ते कोण, तो आकाशदिवा, सर्वच कांहीं विचित्र ! अंगणांत नागशिला पडली आहे ती नागलोकांची स्मृति करून देत्ये. पश्चिम देहलीनें प्राकाराच्या बाहेर पडलें म्हणजे अगदीं नदीच्या पाण्यापर्यंत उतरलेला अर्धचंद्राकृति घाट लागतो. तेथें जलदेवतेचें देवालय आहे, संन्याशांच्या समाधी आहेत, चबुत्रे आहेत, सोडूनच शंभर हातांवर एक मशीद आहे, दुसऱ्या बाजूस मातीचा एक ढिगारा दिसतो तो कदाचित् बौद्ध स्तूप असेल, पांच-चार मैलांवर डोंगरांची रांग दिसते तींत पांडवलेणीं आहेत, दरम्यानच्या अंतरांत ख्रिस्त्यांनीं अलीकडे तीन-चारशें वर्षांत नवीनच उभारलेलें एक क्याथोलिक चर्च आहे, आणि त्याच्याच जोडीला समाजिस्टांचें दहावीस वर्षांतलें एक लहानसें साधें प्रार्थनामंदिर आहे.

१४. लोकभ्रम शैशवावस्थादर्शक

ह्या सर्व देखाव्याचा अर्थ काय ? गेल्या तीन हजार वर्षांतील महाराष्ट्रांतल्या लोकांच्या शबल, काल्पनिक, व अवास्तव साधनांचें, कलांचें व मतांचें हें मूर्त प्रदर्शन आहे. ह्याचा अर्थ तीन तऱ्हांनीं करतां येतो. केवल श्रद्धालू जे आहेत त्यांना

स्वर्गनरक ऊर्फ परलोक यांतील देवादींच्या कृती या देखाव्यांत दिसतात व त्या खऱ्याहून खऱ्या ते मानतात. केवळ कलेचे व शिल्पाचे जे चुंचू आहेत ते मूर्तींचे डौल, इमारतीचा घाट, चित्रांचा उठाव, रंगाची भरदारी व कल्पनेची भरारी वर्णन करण्यांत दंग होतात आणि असलें शिल्प आतां लोपलें म्हणून शोक करतात. इतिहासाचे जे अभ्यासी आहेत त्यांना ह्या देखाव्यांत वरील दोघांच्याहून निराळा अर्थ दिसतो. सोंडेचा गणपती, पंखांचे देवदूत, चोचीचा गरूड, शेषशायी नारायण, चतुर्मुख ब्रह्मदेव, दशमुख रावण, घोडमुखे किन्नर, ऊर्ध्वशिख नारद, डोक्याच्यावर असलेला स्वर्ग व पायाच्या खालीं असलेलें पाताळ, हे सर्व भ्रांत कल्पनेचे खेळ आहेत, हे सर्वथैव खोटे आहेत, आणि शुद्ध शास्त्रज्ञान जसजसें वाढत जाईल तसतसा ह्याचा लोप कालान्तरानें झालाच पाहिजे हें इतिहासज्ञ जाणतो आणि लोपत जाणाऱ्या भ्रांत शिल्पाबद्दल हळहळत बसत नाहीं. उलटें, लोप अत्यन्त मंदतम गतीनें होत आहे ह्याचें त्याला दुःख होतें. स्थूल मूर्तींवरचा, चित्रांवरचा व वृक्षपशुपक्ष्यादींच्या प्रतिमांवरचा तरी भ्रांत विश्वास अद्याप लुप्त कोठें झालेला आहे ? आणि यद्यपि कोठें कोठें क्वचित् क्वचित् झाला, तत्रापि स्वर्ग, नरक, देव, देवदूत, जिहोव्वा, God, अल्ला, ह्या अमूर्त भ्रांत कल्पना अद्याप सर्वत्र विराजमान आहेतच. फक्त अद्वैत वेदान्ती म्हणून ज्यांना म्हणतात त्यांच्यांतून व भौतिकशास्त्रज्ञ म्हणून ज्यांना म्हणतात त्यांच्यांतून कांहींच्या ठाईं ह्या कल्पना नष्ट झालेल्या आहेत. परंतु ह्या थोड्या कांहींची संख्या पृथ्वीवरील एकंदर लोकसंख्येचा कितवा लक्षांश आहे ? अद्याप जग, बाल्यावस्थेंत कसलें, शैशवावस्थेंतच आहे.

१५ देवकल्पनेचें मूळ भ्रम

मनुष्यमात्राच्या ह्या दीर्घकालीन म्हणजे लाखों वर्षांच्या शैशवावस्थेचा मंद इतिहास विचारविकारप्रदर्शनाच्या वरील शुद्ध व शबल चाळीस साधनांच्या स्थितिगतीवरून अल्पस्वल्प अनुमानतां येतो. ह्या इतिहासावरून असें दिसतें कीं ईश्वर, आत्मा, परमात्मा, काल, दिक्, कारण, इत्यादि शुद्ध किंवा शबल कल्पना स्वयंभू नसून मनुष्यानें शुद्ध किंवा भ्रांत अनुमानानें बनविलेल्या आहेत. अनुभवाच्या अन्वयव्यतिरेकानें शुद्धाचे कांहीं कण मनुष्याला गावले आहेत, बाकी सर्व साम्राज्य एथून तेथून शबलाचें आहे. शबलांतून शुद्धाकडे गती होत आहे हें त्यांतल्यात्यांत समाधान. चमत्कार असा कीं उत्क्रांतीकडे म्हणजे इतिहासाकडे अवर्णनीय दुर्लक्ष्य असलेलें दिसतें. नीतिकल्पना, ईश्वरकल्पना, कार्यकारणभावकल्पना, दिक्कल्पना, काल कल्पना, ह्या सर्व कल्पना लाखों वर्षांच्या उत्क्रांतीनें बनत आलेल्या आहेत हें बहुतेक कोणताच तत्त्वज्ञ लक्ष्यांत घेत नाहीं. जो उठतो तो स्वयंभुत्वाकडे म्हणजे ईश्वरदत्तत्वाकडे ऊर्फ उपजतस्वभावाकडे धांव घेतो. जणूं काय आज ह्या घटकेला माणूस आका-

शांतून अचानक भूमितलावर पडला ! जणूं काय त्याच्या पाठीमागें लाखों वर्षांचा इतिहास नाहींच ! लाखों वर्षांच्या उत्क्रांतीनें बनलेल्या एका कल्पनेची त्रोटक परंपरा देतों. त्यावरून वरील कल्पना व त्यांचें स्वयंभुत्व हीं दोन्हीं किती भ्रांत्युद्भूत आहेत तें स्पष्ट होईल. अज्ञात प्रदेशांतून ध्वनी ऐकूं आला, माणूस दचकला, आजारी पडला, आजाराचें स्पष्ट कारण कळेना, सबब भूताची कल्पना केली. निरनिराळ्या अज्ञातोद्गम ध्वनींना, हावभावांना, आकाशचित्रांना, रोगांना, दुःखांना, सुखांना, जन्माला व मरणाला एक एक भूत कल्पिलें. सुष्ट भुतें व दुष्ट भुतें निर्माण झालीं. त्यांची उपासना सुरूं झाली. नंतर रोगांचीं, सुखांचीं व दुःखांचीं खरीं कारणें व तन्निवारक उपाय जसजसे कळूं लागले, तसतशीं सुष्ट भुतांचीं म्हणजे देवांची व दुष्ट भुतांची म्हणजे सैतानांची टर उडून जरूरी भासतनाशीं झाली. विद्युत्पातानें मनुष्य मेला म्हणजे इंद्रानें आपल्या वज्रानें तो मारिला अशी भ्रांत समज असे व पटकीनें माणूस मेला म्हणजे मरीदेवीनें त्याला मारिलें अशी भ्रांत कल्पना असे. घराला विद्युद्वाहक तार योग्य रीतीनें लाविली म्हणजे विजेचें भय फारसें रहात नाहीं हें शास्त्रीय ज्ञान झाल्यावर, इंद्र व त्याचें वज्र हीं दोन्हीं भ्रांतिजन्य व काल्पनिक ठरतात व मनुष्याच्या मनांतून दोघांची हकालपट्टी होत्ये. तसेंच शुद्ध हवापाणी असलें म्हणजे मरीदेवीची गुमान भासत नाहीं. देवाची आणि देवीची जरूर कोठ-पर्यंत, तर संकटनिवारणाचे उपाय सुचले नाहींत तों पर्यंत. संकटनिवारणाचे जसजसे जास्त उपाय मनुष्याला सुचतात तसतसा तेवढ्या पुरता देवाला कमीकमी त्रास द्यावयाचा, किंवा तो तो देव काढून टाकून पदभ्रष्ट करावयाचा परिपाठ मनुष्याचा आहे. अशा रीतीनें अनेक देव खोटे ठरल्यावर एकच एक देव मनुष्य प्रौढीनें कल्पितो व आपणास शहाण्यांचा शिरोमणि समजतो. पण हा एकमेव-अद्वितीय देव-हि हजारों प्रसंगीं उपयोगी पडत नाहीं. शेवटीं त्या अद्वितीयालाहि भिरकाडून देऊन मनुष्य एक अद्वैतवेदान्ती तरी बनतो व ईश्वराला मायेच्या म्हणजे भ्रांतीच्या सदरांत काढतो किंवा भौतिकशास्त्रज्ञ बनून कल्पित ईश्वराच्या ताब्यांतून संकटें निवारण्याचें काम आस्ते आस्ते बळकावीत जातो. तात्पर्य, कार्याचें खरें कारण जेथें जेथें सांपडलें नाहीं तेथें तेथें भूत किंवा देव हें कारण अज्ञ मनुष्य कल्पीत आलेला आहे व खरें कारण सांपडलें म्हणजे भूतकारणाला किंवा देवकारणाला रजा देण्याची त्याची वहि-वाट आहे. तात्पर्य, देव ही कल्पना कृत्रिम आहे, स्वयंभू नाहीं.

१६. विकार-विचार प्रदर्शक ४० साधनें व इतिहास

असो. वीस शुद्ध व वीस शबल मिळून चाळीस साधनें विकारविचार प्रदर्शनाचीं वर्णिलीं. ह्या चाळीस साधनांच्या साहाय्यानें कोणत्याहि देशाचा व तेथील भूत व वर्त-मान लोकांचा इतिहास जाणावयाचा असतो. आपल्या महाराष्ट्राचा व ह्या भूमींतील

भूत व वर्तमान लोकांचा इतिहास याच साधनांच्या साहाय्यानें लिहिला जावयाचा आहे. अलीकडील पन्नास वर्षांत ह्या चाळीस साधनांतून फक्त अक्षरसाधनें जीं कागदपत्रें व ग्रंथ त्यांकडे आपलें विशेष लक्ष्य वेधून गेलें, अल्पद्रव्यांत अल्पश्रमानें याच साधनाची सहजोपलब्धी प्रथम होणें शक्य होतें. तेव्हां झालें तें ठीकच झालें. परन्तु ह्या एका अक्षरसाधनाच्या उपलब्धीनें सर्वच कार्यभाग आटपत नाहीं. अक्षर हें विचाराचें एक साधन झालें. अक्षराव्यतिरिक्त आणीक एकोणचाळीस साधनें राहिलीं त्यांची वाट काय ? अक्षरानें सर्वच विचार प्रगट होतात असें नाहीं. अक्षराला साध्य नाहींत असे शुद्ध व शबल विचार गान, चित्र, मूर्त्ति, स्थापत्य साधतात. तेव्हां, ह्याहि साधनांचा यथायोग्य समाचार आपण घेतला पाहिजे. अक्षरसाधन-संशोधनाहून हें संशोधन द्रव्यदृष्ट्या सापेक्षतः किंचित् जड आहे. तत्रापि जड असो वा हलकें असो, ह्या संशोधनाविना महाराष्ट्रेतिहासाचें चित्र फारच फार कोतें राहील हें कांहीं नाकबूल करतां येत नाहीं. शिवाय अक्षरसाधन सर्वकाळीं सारखेंच उपलब्ध असतें असें नाहीं. पांच चारशें वर्षें सोडिलीं म्हणजे कागदपत्रांचें साहाय्य बंद होतें. फक्त ग्रंथ रहातात. त्यांना पुष्टि मूर्त्ति, चित्रें, स्थापत्य यांची द्यावी लागते. कित्येक कालाचा इतिहास तर अल्पस्वल्प अवशेषांवरून तर्कानें अनुमानावयाचा असतो. अशा अडचणी आहेत. त्या टाळण्यास उपरिनिर्दिष्ट चाळीसहि साधनांचें साहाय्य आवश्यक असल्यामुळें, त्यांच्या संबंधानें वरील सोळा कलमांत किंचित् प्रपंच करणें अगत्याचें भासलें.

२

इतिहासाच्या दोन बाजू : भौतिक व आध्यात्मिक

कोणत्याहि संस्कृत राष्ट्राच्या चरित्राचा सांगोपांग विचार करावयाचा म्हटला म्हणजे तो अनेक दृष्टींनीं केला पाहिजे. धर्म, नीति, विद्या, समाज, व्यापार, कृषि, कलाकौशल्य, कायदेकानू, राजकारण, व तत्सिद्धयर्थ केलेल्या अंतःस्थ व बहिःस्थ खटपटी इतक्या सर्वांच्या प्रगतीचा किंवा विगतीचा कालक्रमानें यथास्थित, बांधेसूत, पद्धतवार व सप्रमाण विचार केला जाऊन तो पुनः आत्मिक व भौतिक रीत्या झाला म्हणजे राष्ट्राचें चरित्र समग्र कळलें, असें होतें. येथें आत्मिक व भौतिक हे शब्द कोणत्या अर्थाचे वाचक आहेत तें सांगितलें पाहिजे. धर्म, नीति, विद्या, राजकारण, इत्यादि राष्ट्राच्या चरित्राचीं जीं निरनिराळीं अंगें सांगितलीं त्यांचा विचार दोन तऱ्हेनें करितां येईल. हीं अंगें कार्याच्या रूपानें फलित झालेलीं पाहून त्या फलित रूपांचें पद्धतवार वर्णन करण्याची एक तऱ्हा आहे व हींच अंगें कारणरूपानें असलेलीं पहाणें म्हणजे वर सांगितलेल्या फलित कार्यांचीं कारणें म्हणून त्यांचा विचार करणें म्हणजेच दुसऱ्या तऱ्हेचा अंगीकार करणें होय. पहिल्या तऱ्हेला मी भौतिक म्हणतों व दुसरीला आत्मिक म्हणतों.

भौतिक पद्धतीनें कोणत्याहि धर्माचा विचार करावयाचा म्हणजे त्या धर्मांतील निरनिराळ्या पंथांचे जीवनवृत्तांत द्यावयाचे; म्हणजे ते पंथ किती आहेत, त्यांचीं स्थलांतरें कोठें कोठें झालीं, निरनिराळ्या पंथांच्या कलहांचें स्वरूप काय होतें इत्यादि बाह्य रूपांचीं वर्णनें करावयाचीं; आणि आत्मिक पद्धतीनें कोणत्याहि धर्माचा विचार करावयाचा म्हणजे त्या धर्माचीं मूलतत्त्वें काय आहेत, आत्म्याच्या अनेक वृत्तींतून कोणत्या वृत्तीचें त्या धर्मांत प्राधान्य आहे, इत्यादि अंतःस्थ व गूढ प्रश्नांचा ऊहापोह करावयाचा. भौतिक पद्धतीनें कला-कौशल्याचा विचार करावयाचा म्हणजे त्याच्या शाखा किती आहेत, निरनिराळ्या शाखांचा संकर किती झाला व शाखांचीं स्थलांतरें कोठें कोठें झालीं हें सांगावयाचें आणि आत्मिकरीत्या कलाकौशल्याचा विचार करावयाचा म्हणजे आत्म्याच्या कोणत्या वृत्तीपासून कलाकौशल्याचा उगम होतो वगैरे अंतःस्थ व गूढ प्रश्नांचा उलगडा करावयाचा. त्याचप्रमाणें भौतिक पद्धतीनें कोणत्याहि राष्ट्राच्या राजकीय

गतिस्थितींचा विचार करावयाचा म्हणजे त्या राष्ट्रांत झालेल्या अंतःस्थ कलहांचीं व बहिःस्थ कलहांचीं वर्णनें द्यावयाचीं; म्हणजे राष्ट्रांतील बंडांचीं, निरनिराळ्या पक्षांच्या, वर्गांच्या व जातींच्या चढाओढींचीं व परराष्ट्रांशीं झालेल्या लढायांचीं वर्णनें द्यावयाचीं आणि आत्मिक पद्धतीनें राष्ट्राच्या राजकीय गतिस्थितींचा विचार करावयाचा, म्हणजे अंतःस्थ व बहिःस्थ कलहांच्या उत्पत्तीचीं कारणें, त्या राष्ट्रांतील एकंदर लोकसमूहांत आत्म्याच्या उन्नतावनत वृत्तीपैकीं कोणत्या वृत्तीचें विशेष प्राबल्य आहे त्याचा सूक्ष्म विचार, त्या राष्ट्रांतील मोठमोठ्या तटांच्या पुरुषांच्या राजकीय मतांचें सशास्त्रदर्शन इत्यादि प्रश्नांची चर्चा करावयाची. राष्ट्राच्या राजकीय गतिस्थितींचा भौतिक व आत्मिकदृष्ट्या जो विचार त्यासच राष्ट्राचा राजकीय इतिहास म्हणतात. धर्म, नीति, विद्या, समाज, व्यापार, कृषि, कलाकौशल्य ह्यांतील एक किंवा अनेक अंगांचें प्राबल्य किंवा दौर्बल्य होऊन राष्ट्राच्या राजकीय चरित्रावर त्यांचे आघात व परिणाम होऊं लागले म्हणजे त्यांचाहि विचार राष्ट्राच्या राजकीय इतिहासांत करावा लागतो. येणेंप्रमाणें कोणत्याहि राष्ट्राचा सर्वांगांनीं संपूर्ण असा राजकीय इतिहास लिहावयाचा म्हटला म्हणजे तो भौतिक व आत्मिक अशा दोनहि पद्धतींनीं लिहिला पाहिजे.

३

इतिहास म्हणजे काय ?

मानवी इतिहास काल व स्थल ह्यांनीं बद्ध झालेला आहे. कोणत्याहि प्रसंगाचें वर्णन द्यावयाचें म्हटलें म्हणजे, त्या प्रसंगाचा परिष्कार विशिष्ट कालावर व विशिष्ट स्थलावर पसरवून दाखविला पाहिजे. प्रसंगांचा परिष्कार कालानें व स्थलानें विशिष्ट कसा झाला आहे, हें दाखवितांना त्या कालीं व त्या स्थळीं कोणत्या व्यक्ती प्रामुख्यानें पुढें येतात हेंहि इतिहासकाराला स्वाभाविकपणेंच सांगावें लागतें. सारांश, काल, स्थल व व्यक्ती ह्या त्रयीची जी सांगड तिलाच प्रसंग व ऐतिहासिक प्रसंग ही संज्ञा देतां येते.

कोणत्याहि बखरींत किंवा इतिहास हें प्रौढ नांव धारण करणाऱ्या ग्रंथांत जेथें ह्या त्रयींतील एकाची किंवा सर्वांची गफलत अगर लोप केलेला असतो तेथें ऐतिहासिक प्रसंगाची यथास्थित व सशास्त्र मांडणी झाली नाहीं असें म्हणावें लागतें. परीक्षेकरितां घेतलेल्या बखरींत व इतिहास हें प्रौढ नांव धारण करणाऱ्या ग्रांट डफच्या ग्रंथांत योग्य आधार न मिळाल्यामुळें किंवा योग्य आधार मिळविण्याची खटपट न केल्यामुळें, किंवा शिक्षणाभावामुळें किंवा केवळ अज्ञानामुळें वर सांगितलेल्या त्रयींतील एकाचा किंवा अनेकांचा लोप वेळोवेळीं झालेला वाचकांच्या नजरेस (आम्ही) आणून दिला आहे. ज्यांनीं प्रसंग घडवून आणिले, त्या व्यक्तींच्या नांवांचा लोप किंवा गफलत, जेव्हां प्रसंग घडले त्या कालचा लोप किंवा गफलत, व जेथें प्रसंग घडले त्या स्थलांचा लोप किंवा गफलत बखरकारांच्या बखरींत व ग्रांट डफच्या इतिहासांत अनेक प्रसंगीं झाल्या-कारणानें प्रसंगांचा कालानुक्रम, त्यांचें व्यक्तिमाहात्म्य, व त्यांचें स्थलवैशिष्ट्य व्यव-स्थित रीतीनें ध्यानांत येणें मुष्कील होतें व इतिहासाच्या अस्तित्वाचें मुख्य प्रयोजन व हेतु निष्फल होतात. व्यक्तींच्या हातून विशिष्ट कालीं व विशिष्ट स्थळीं घडलेल्या अनेक प्रसंगांचें मुद्देसूद, तपशीलवार, व व्यवस्थित वर्णन देतां देतां विशिष्ट कालीं व विशिष्ट देशांत कोणत्या महाविचाराची कशी उत्क्रांति झाली व काय परिणाम झाले, हें वर्तमान व भावी पिढ्यांना दाखवून देण्याचें भूत व वर्तमान इतिहासाचें मुख्य प्रयोजन आहे. हें प्रयोजन मराठी व मुसलमानी बखरींतील व ग्रांट डफच्या ग्रंथांतील मजकुरांवरून व्हावें तसें साध्य होत नाहीं. ह्याला मुख्य कारण ह्या ग्रंथांत कालाचा, स्थलांचा किंवा व्यक्तींचा योग्य व व्यवस्थित निर्देश झाला नाहीं हें होय. अर्थात् इतिहास व तज्जन्य उपदेश ह्या बखरींतील व इतिहासांतील मजकुरापासून

उद्‌भूत होत नाहींत. विशिष्ट काल, विशिष्ट स्थल व विशिष्ट व्यक्तींचें विशिष्ट आचरण ह्या तीन घटकांचा संघात झाला असतां प्रसंग ही वस्तू बनली जाते व अनेक प्रसंगांच्या व्यवस्थित संततीपासून इतिहास म्हणून ज्या वस्तूस म्हणतां येईल तिची निर्मिती होते.

ही निर्मिती होत असतां अनेक कालांशांनीं घटित जो कालाचा महाभाग -ज्यास epoch, age, मन्वंतर वगैरे संज्ञा देतात, त्यांत कोणत्या विचाराचें प्राधान्य आहे हें सहज समुद्‌भूत होतें. ह्या विचारापासूनच वर्तमान व भावी पिढ्यांना गतकालीन पिढ्यांच्या कर्मसंततीचें ज्ञान होतें. कोणती कर्मसंतती घेऊन आपला समाज जन्माला आला आहे व कोणत्या दिशेचें आचरण ठेविलें असतां, वर्तमान व भावी समाजाचा कर्मलोप होऊन समाज आत्यंतिक सुखाचा वाटेकरी, कालान्तरानें का होईना, पण होईल हेंहि ह्या गतकालीन विचारापासून अंशतः कळूं लागतें. गतकालीन पिढ्यांच्या कर्माचें जें ज्ञान– ज्यास युगमाहात्म्य, Spirit of the age, Esprit d'epoc, वगैरे निरनिराळ्या भाषांतून समानार्थक संज्ञा आहेत– त्यासच इतिहासाचा आत्मा म्हणतात, किंवा इतिहासाचा आत्मा अशी औपचारिक भाषा योजण्यापेक्षां, त्यासच इतिहास हा व्यपदेश सामान्यैंकरून देतात.

हें युगमाहात्म्य, हें कालमाहात्म्य, हा इतिहासाचा आत्मा दाखवून देण्याचें अवघड काम अद्यापपर्यंत महाराष्ट्रांत कोण्याहि इतिहासकारानें यथास्थित केलें नाहीं. कां कीं, वर निर्दिष्ट केलेल्या घटकत्रयीचा पत्ता क्रमवार ह्या इतिहासकारांना लागला नाहीं. घटकत्रयीचा संघात कसा झाला, हें त्यांना कळलें नाहीं व अर्थात् महाराष्ट्राच्या इतिहासाच्या आत्म्याची ओळख त्यांना बिलकुल झाली नाहीं. घटकत्रयीचा पत्ता नीट न लागल्याकारणानें आत्मिक इतिहासाची ओळख ह्या इतिहासकारांना झाली नाहीं एवढेंच नव्हे, तर अर्थात् तत्कालीन लहानमोठ्या व्यक्तींच्या चरित्रांतील अनेक गोष्टींचें अज्ञान त्यांचें ठायीं कायम राहिलें.

राष्ट्रांतील मोठमोठ्या व्यक्तींचीं चरित्रें म्हणजेच राष्ट्राचा इतिहास होतो, असें एक विधान आहे व तें बव्हंशीं खरें आहे. व्यक्ती ह्या समाजाच्या घटक होत व मोठ्या व्यक्ती समाजाचे मोठे घटक होत. अर्थात् मोठ्या व्यक्तींचीं चरित्रें कांहीं एका अंशानें समाजाचा इतिहास होत.

लहान व्यक्तींचीं चरित्रें व मोठ्या व्यक्तींचीं चरित्रें मिळून समाजाचा संपूर्ण इतिहास होतो. समाजांत मोठ्या व्यक्ती केव्हांहि थोड्या असल्यामुळें मोठ्या व्यक्तींच्या इतिहासाला लहान व्यक्तींच्या म्हणजे बहुजनसमाजाच्या इतिहासाचा जोड द्यावा लागतो. केवळ मोठमोठ्या व्यक्तींच्याच चरित्रानें समाजाचा इतिहास संपूर्ण होत नाहीं, हें पक्कें समजून पाश्चात्य इतिहासकार बहुजनसमाजस्थितिसंबंधीं देववेल तितकी सशास्त्र व सप्रमाण माहिती आपापल्या इतिहासांतून देत असतात.

मराठी बखरकारांना व ग्रांट डफला मोठमोठ्या व्यक्तींच्या चरित्रांतील बहुतेक प्रत्येक प्रसंगाची माहिती अपुर्ती, त्रोटक, तुटक व अव्यवस्थित देऊन समाधान मानणें जेथें भाग पडलें, तेथें त्यांच्या ग्रंथांतून तत्कालीन बहुजनसमाजाच्या स्थितीचें वर्णन वाचण्याची अपेक्षा करणें म्हणजे अयोग्य स्थलीं अपेक्षित वस्तूचा शोध करण्याचा व्यर्थ परिश्रम करण्यासारखेंच आहे.

ग्रंथालय, डा. ए. इगतपुरी.
23344 दि: 1/1/1984
9232 नों: दि: 27/3/84

४

हिंदू समाजांत हिंद्वितरांचा समावेश

पाश्चात्यांची समावेशनरीति

इंग्लिश, अमेरिकन, मुसलमान, जपानी व हिंदू वगैरे पृथ्वीच्या पाठीवरील निरनिराळे समाज स्वेतर लोकांना कोणकोणत्या निरनिराळ्या पद्धतींनीं आत्मसात् करून घेतात, ह्या बाबीचा शोध करणें हें समाजशास्त्राचें एक काम आहे. पैकीं युरोपियन व अमेरिकन समाज कोणत्या पद्धतींनीं स्वेतरसमावेशन करतात, तें युरोपियन व अमेरिकन समाजशास्त्र्यांनीं सूक्ष्मपणें शोधिलेलें आढळतें. युरोपियन व अमेरिकन समाज तीन निरनिराळ्या पायऱ्यांनीं स्वेतरांचें समावेशन करून घेतात. (१) नुसतें जुजबी राजकीय समावेशन म्हणजे, कोणी इसम कांहीं काल देशांत राहिला असतां, स्थानिक स्वराज्यांतील व राष्ट्रीय स्वराज्यांतील उमेदवार निवडण्याचा हक्क देऊन आणि देशांतील कायद्यांचा पाठिंबा देऊन, त्या इसमाला आपला प्रजाजन म्हणून समाविष्ट करणें. (२) धार्मिक समावेशन म्हणजे देशांतील राष्ट्रानें जो देवधर्म आपला म्हणून जाहीर केला तो देवधर्म कोणी इसम स्वीकारील तर नुसत्या राजकीय प्रजाजनाहून तो धार्मिक प्रजाजन राष्ट्राला प्रियतर होतो. (३) सामाजिक समावेश म्हणजे समाजांतील स्त्री-पुरुषांशीं बेटीव्यवहार करण्याची मोकळीक देणें. हें तिसरें समावेशन झालें म्हणजे तो इसम त्या राष्ट्रांतील सर्व धार्मिक, राजकीय व सामाजिक हक्क तद्देशज प्रजाजनाप्रमाणें भोगूं लागतो, आणि तो व त्याची संतती पूर्णपणें तद्देशज म्हणजे अभिजन बनतात. सर्वांत श्रेष्ठ व प्रेष्ठ असें हें सामाजिक समावेशन यूरोपियन व अमेरिकन राष्ट्रें पृथ्वीवरील वाटेल त्या इसमाला देतात असें नाहीं. ह्या कामीं ते निवड करतात. ती निवड ते दिसण्याला अगदीं क्षुल्लक मुद्यावर करतात. तो मुद्दा म्हणजे दुसरा-तिसरा कांहींएक नसून निव्वळ कातडीच्या रंगाचा व चेहऱ्याच्या ठेवणीचा. काळी, पिंवळी, किंवा सांवळी कातडी घेऊन जो इसम जन्मास आला त्याला ते सामाजिक समावेशन करूं देत नाहींत. त्यांना गोरी कातडी प्राणाहूनहि प्रिय वाटते. ती ज्याजवळ नसेल तो इसम बेटीव्यवहार करण्याला व कधीं कधीं रोटीव्यवहार करण्याला ते लायक समजत नाहींत. यदा कदाचित् कातडी गोरी असली, तत्रापि जर त्या इसमाचें नाक फेपटें किंवा केस लोंकरीसारखें किंवा डोळे तिरके किंवा गालफडाचीं हाडें पुढें आलेलीं असलीं,

तर त्या इसमाशीं ते बेटीव्यवहार करण्याला कांकू करतात. कातडीच्या रंगाचा किंवा चेहऱ्याच्या ठेवणीचा हा अपवाद वर्ज्य केला, तर असें म्हणतां येईल कीं, युरोपियन व अमेरिकन समाजांत पृथ्वीच्या पाठीवरील वाटेल त्या मनुष्यास प्रविष्ट होतां येतें. इतकें खरें कीं, अपवादांत पडणाऱ्या माणसांची संख्या अपवादांत न पडणाऱ्या माणसांच्या संख्येहून बेसुमार जास्त आहे. युरोपियन समाज बोलण्यांत समतेचे मोठमोठे व्यापक सिद्धान्त बोलतो, परंतु त्याच्या करणींत फरक जमीन-अस्मानाचा असतो.

मुसलमानांची समावेशनरीति

मुसुलमान समाज स्वेतर लोकांचें समावेशन करून घेण्यांत यूरोपियन समाजाइतका चवचालपणा दाखवीत नाहीं. राजकीय, धार्मिक किंवा सामाजिक अश्या समावेशनाच्या तीन पाह्यऱ्याहि मुसुलमान समाजाला माहीत नाहींत. एक धार्मिक समावेशन तेवढें त्याला माहीत आहे. मुसुलमान देवधर्म कोणी स्वीकारला म्हणजे तो इसम मुसुलमान समाजांतील एकोन एक श्रेष्ठ व प्रेष्ठ हक्क भोगण्यास लायक होतो. त्याच्या आड कातडीचा रंग किंवा चेहऱ्याची ठेवण येऊं शकत नाहीं. वाटेल तो शुद्ध किंवा मिश्र वंश असो, हवी ती उच्च किंवा नीच संस्कृति असो, कोण्याहि इसमानें मुसुलमानी देवधर्म स्वीकारिला कीं तो एकजात मुसुलमान झाला. मुसुलमान समाजांत समावेशन इतकें अगदीं पराकाष्ठेचें साधें व सरळ आहे.

चिनी व जपानी यांच्यांत समावेशनप्रश्नाचा अभाव

चिनी किंवा जपानी समाजांस बाह्यांचा समावेश करून घेण्याचा प्रसंगच फारसा आलेला नाहीं. त्यांचे देश त्यांच्या स्वतःच्याच लोकसंख्येनें इतकें खचून भरले आहेत कीं, बाह्यांच्या वसाहती तेथें फारशा झाल्या नाहींत. चिनांत किंवा जपानांत कोणी इसम योग्य काळ जाऊन राहिला, तर त्याचें राजकीय समावेशन यूरोपांतील राष्ट्रांतल्याप्रमाणेंच बहुतेक होतें. बौद्ध धर्म स्वीकारिला, तर धार्मिक समावेशनहि होईल समाजिक समावेशन म्हणजे कायदेशीर शरीरसंबंध होऊन एकजातपणा येण्यास चिनी व जपानी समाजांत तत्त्वदृष्टीनें वंशाची किंवा रंगाची किंवा चेहऱ्याची आडकाठी नाहीं. इतकेंच कीं बाह्यांचा संसर्गच त्या देशांना इतका थोडा पोहोचला आहे कीं, हे प्रश्न तेथें उत्कटत्वानें अद्यापपर्यंत उद्भवले नाहींत.

हिंदुसमाजांतील जातींचा जन्म

ह्या सर्व समाजांहून हिंदुसमाजाची बाह्यांच्या समावेशनासंबंधानें रीती पूर्वी अगदीं भिन्न होती व सध्याहि आहे, समजा कीं, कोणीं अनार्य बाह्य व्यापाराच्या

किंवा अन्य कोणत्याहि मिषानें भरतभूमींत येऊन कायम रहाण्याची इच्छा करूं लागला; तर राजकीय दृष्टीनें त्याची गणना नागरिकांत किंवा ग्रामजनांत होणें अशक्य असे. ग्राम किंवा नगर म्हटलें म्हणजे तें अठरा पगड जातींखेरीज इतरांचें बनलेलें नसे. प्रत्येक धंद्याची स्वतंत्र जात असून, त्या जातींचें ग्राम बने. प्रत्येक जात आपापल्या धंद्याची वतनदार होती. ज्याला वृत्ति म्हणजे वतन नाहीं असा मनुष्य ग्रामांत हक्कानें राहूं शकत नसे. इतर ग्रामांतून कोणी बेकार आर्य मनुष्य ग्रामांत राहण्याची इच्छा करू लागला, तर ग्रामांतील वृत्तिवंतांची म्हणजे वतनदारांची ग्रामसभा भरून त्यांनीं एकमतानें, बहुमतानें नव्हे, परवानगी दिली तर त्याची स्थापना गांवांत होई व तीहि उपरि म्हणून होई. उपरीचा मिरासी म्हणजे पिढीजात ग्रामस्थ होण्यास कित्येक पिढ्या जाव्या लागत. ही कथा आर्य उपरींची झाली.

अनार्य लोकांचा समावेश ग्रामसंस्था कांहीं विशेष संस्कार झाल्याखेरीज, होऊं देत नसत. अनार्य दोन प्रकारचे असत. एतद्देशज अनार्य व बहिर्देशज अनार्य. एतद्देशज अनार्यांत नाग, कोळ, भिल्ल, गोंड, पुक्कस, कातकरी, ठाकूर, वगैरे लोक येत. बहिर्देशज अनार्यांत शक, यवन, पारसीक, बाल्हीक, मुसुलमान वगैरे लोक येत. आर्यांना आर्यावर्तांत व दक्षिणेंत प्रथम अनार्य लोक जे भेटले ते एतद्देशज नाग वगैरे अनार्य लोक भेटले. त्या अनार्यांपैकीं कित्येक नागवंशापैकीं होते, कित्येक कोल-वंशापैकीं होते व कित्येक राक्षसवंशापैकीं होते. नाग, कोल व राक्षस हे ह्या देशांत आर्यांच्या पूर्वीचे लोक होत. आर्यावर्तांत व दक्षिणारण्यांत व अपरान्तांत आर्यांनीं ग्रामस्थापना जेव्हां केल्या, तेव्हां ह्या एतद्देशज अनार्यांना ग्रामसंस्थेंत कोणतें स्थान कसें द्यावें याचा विचार पडला. ह्या विचारांतून सुरक्षितपणें पार पडण्यास आर्यांचा पूर्वीचा एक प्रघात उपकारक झाला. गुणांनीं व कर्मांनीं भिन्न इसमांचे निराळे वर्ण करण्यास आर्य फार पुरातन कालापासून शिकले होते. ह्या शिक्षणाचा ऊर्फ सतत मनःप्रवृत्तीचा परिणाम चातुर्वर्ण्य होय.

चातुर्वर्ण्यांतील चारी वर्ण बीजक्षेत्रानें नितांत पृथक् होण्यापूर्वी, अनुलोम व प्रतिलोम शरीरसंबंध घडत. त्या शरीरसंबंधापासून जी प्रजा निर्माण होई तिला तीन पिढ्यांनीं, किंवा पांच पिढ्यांनीं किंवा सात पिढ्यांनीं मूळ पित्याच्या वर्णांत परत जातां येई.

कालान्तरानें चातुर्वर्ण्यांतील लोकसंख्या बरीच वाढल्यावर, अनुलोम व प्रतिलोम शरीरसंबंधांची प्रजाहि बरीच वाढूं लागली. अनुलोमज व प्रतिलोमज प्रजा बरीच वाढल्यावर त्या अनुलोमजांत किंवा प्रतिलोमजांत आंतलें आंत शरीरसंबंध होऊं लागले. अशा रीतीनें अनुलोमज व प्रतिलोमज संकरांचे पोट-समाज अस्तित्वांत आले. आईबाप, भाऊ-बंधु, सगे-सोयरे, असा कौटुंबिक मायेचा पसारा संकर समाजांत झाला. अशा संकरसमाजांतून मूळवर्णांत म्हणजे मूळब्राह्मणक्षत्रियादि

वर्णांत परत जाण्याची कोण्या संकरज व्यक्तीनें इच्छा व प्रयत्न केला, तर तो सिद्धीस जाणें मायाजाळामुळें केवळ अशक्य झालें. समजा कीं ब्राह्मण बीज व क्षत्रिय क्षेत्र ह्यांच्या संयोगापासून एक मुलगा व एक मुलगी अशीं दोन अपत्यें झालीं. पैकीं मुलगा हा सदाच संकरांत राही. त्याला पित्याच्या वर्णांत जातां येत नसे. मुलगी राहिली, तिचें पाणिग्रहण ब्राह्मणानें केलें व त्या जोडप्याला मुलगी झाली, आणि त्या मुलीचें पाणिग्रहण म्हणजे तिसऱ्या पिढींतील मुलीचें पाणिग्रहण जर पुनः ब्राह्मणानें केलें तर त्या जोडप्याला जी संतती होईल ती–मुलगे व मुलग्या–पूर्ण ब्राह्मण वर्णाची गणिली जाई. ह्या तीन पिढ्यांच्या ज्या तीन मुली-आजी, आई व स्वतः मुलगी–ह्यांचा पूर्वीच्या संकरजातींतील मायबापाशीं, बंधु-भगिनीशीं किंवा सग्यासोयऱ्यांशीं मायेचा संबंध अजीबात तुटे. संकरजांची लोकसंख्या जसजशी वाढली तसतशी वर्णो-न्नत्यर्थ जिवलगांची ही अस्वाभाविक ताटातूट असह्य भासूं लागली आणि ती सोसून वर्णोन्नति साधण्याचा हव्यास माजी पडत पडत अजीबात बंद पडला. ही बंदी ज्या कालीं पडली तोच काल संकरजातींचा स्थिर होण्याचा होय. मनुस्मृतींत व याज्ञ-वल्क्य स्मृतींत संकरांच्या वर्णोन्नतीच्या पद्धती दिल्या आहेत. त्यांवरून ताडतां येतें कीं, मनु व याज्ञवल्क्य यांच्या कालीं संकरजांची वर्णोन्नति होण्याची पद्धती समा-जांत प्रचलित होती. समाजांत एखादी रूढी प्रचलित असल्याविना धर्मशास्त्रांत आज्ञा ऊर्फ कायदा म्हणून तिचें प्रख्यापन सहसा होऊं शकत नाहीं. अर्थात् मनु व याज्ञवल्क्य ह्यांच्या नंतर वर्णोन्नतीचें सायास संकरजांच्या अनुभवास येऊन संकरसमाज स्थिर झाला.

संकर स्थिर होणें म्हणजे संकरसमाजबाह्य शरीरसंबंध होण्याचें थांबणें. बाह्य शरीरसंबंध होण्याचें ज्या संकर समाजांत थांबतें तो समाज जाति ह्या पदवीला पोहोंचतो. ज्या समाजाची वृद्धि, फक्त बीजक्षेत्राचा व्यवहार त्या समाजांतल्या समाजांत होऊन होते, अन्य कोणत्याहि रीतीनें होत नाहीं, त्या समाजास जाति म्हणतात. जाति फक्त जन्मानें प्राप्त होते, इतर कोणत्याहि तऱ्हेनें प्राप्त होत नाहीं. संकरजाती म्हणून ज्या म्हणतात त्या ह्या अशा अस्तित्वांत आल्या. जातिसंस्थेनें एक कार्य अगदीं बेमालूम होतें. तें हें कीं, बीजक्षेत्राची शुद्धि परिपूर्ण राहते व जिवलगांची ताटातूट होत नाहीं. संकरांच्या वर्णोन्नतीचा प्रश्न सोडवितां, सोडवितां आर्यांना ही जातिसंस्था निर्माण करण्याची क्लृप्ति सुचलेली आहे. तीच क्लृप्ति एतद्देशज अनार्य समाजाची स्थापना ग्रामसंस्थांत करतांना, आर्यांनीं अमलांत आणिली. जो जो म्हणून अनार्य समाज दक्षिणेंत व उत्तरेंत वसाहत करतांना आर्यांना भेटला, त्या त्या अनार्य समाजाची आर्यांनीं स्वतंत्र जात म्हणून गणना केली प्रायः आपापल्या समाजांतील संस्था जेते जितलोकांशीं व्यवहार करतांना जितलोकांत स्थापीत असतात. आणि ती स्थापना करण्याच्या प्रयोगांत जे नूतन अनुभव येतात त्यांचा स्वसमाजाची नूतन घटना करण्यांत उपयोग करतात.

संकरांची व्यवस्था करण्यांत जातिसंस्थेची कल्पना सुचली. आणि ती कल्पना आर्यांनीं अनार्यांची व्यवस्था करतांना अनार्यसमाजांना लाविली, इतकेंच नव्हे तर स्वतःच्या चातुर्वर्ण्यसंस्थेलाहि लाविली. संकरांतून बीजक्षेत्रशुद्धी झाल्यावर व्यक्तींना चातुर्वर्ण्यांतील कोणत्याहि मूळवर्णांत जसें परत जातां येत असे. तसेंच चातुर्वर्ण्यांतील कोणत्याहि खालच्या वर्णाच्या व्यक्तीला गुणकर्मांचा उत्कर्ष साधल्यास, म्हणजे तपश्चर्या केल्यास, ब्राह्मणवर्गांत प्रविष्ट होतां येत असे. जातिसंस्थेची कल्पना सुचल्यावर ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र हे चारी वर्णहि जाति बनले. सध्यां, ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र हे चार वर्ण असून शिवाय ह्याच चार जातीहि आहेत. खेरीज सुतार, चांभार, लोहार, सोनार वगैरे स्थिर झालेल्या संकरजातीहि आहेत. शिवाय नाग, कोळ, राक्षस, वगैरे एतद्देशज अनार्यांच्या संस्कारापासून झालेल्या अंत्यज व बाह्य जाति झाल्या त्या वेगळ्याच. संसर्ग हा शब्द येथें मुद्दाम योजिला आहे. नाग, कोळ, राक्षस, वगैरे जे मूळचे अनार्य समाज ह्या देशांत होते, त्यांशीं अन्त्यांचा म्हणजे शूद्रांचा संबंध होऊन जी संकरप्रजा उत्पन्न झाली तिला अन्त्यजन्म किंवा अन्त्यज ही संज्ञा मिळाली. ह्या अन्त्यजांना नामशूद्र, पंचम वगैरे प्रांतपरत्वें संज्ञा आहेत. जातिविवेकाच्या ग्रंथांत महार, मांग, गारुडी, बुरूड, चांडाल, वगैरे अन्त्यजांची उत्पत्ति कोणत्या संकरापासून झाली त्याचीं वर्णनें आहेत. हीं वर्णनें कल्पित नसून वस्तुस्थितिदर्शक आहेत, हें सांगावयाला नको. एणें प्रमाणें एतद्देशज अनार्यांपासून दोन निराळ्या जाति झाल्या. एक संकरज अंत्यज व दुसरी शुद्ध मूळची अनार्य.

हिंदूंच्या संसर्गांत बाह्यांचीहि जाति बनण्याची प्रवृत्ति

ब्राह्मणादि शुद्धजाति, सुतारादि संकरजाति व महारादि अंत्यजजाति ह्यांना ग्रामांत वृत्ति करून दिलेल्या असत. प्रत्येक जातीला स्वतंत्र वृत्ति असे. सर्व हिंदुस्थानांत एकहि व्यक्ति अशी नसे कीं, जिचा अंतर्भाव जातींत झालेला नव्हता; तात्पर्य, हिंदुसमाज जातींना ओळखतो, स्वतंत्र व तुटक व्यक्तींना ओळखत नाहीं. व्यक्तींना ओळखावयाचे ते जातिद्वारा ओळखलें जातें. म्हणजे हिंदुसमाजांत कोणताहि ग्रामसंबंध ठेवण्यास जाति हा शेवटला राशि आहे, व्यक्ति नाहीं. अशी स्थिति असल्यामुळें बहिर्देशज अनार्य जर भरत-खंडांत येऊन वसती करण्याची इच्छा करूं लागले, तर व्यक्ति ह्या दृष्टीनें त्यांची स्थापना ग्रामसंस्थांत होणें शक्य नसे. व्यक्ति जेव्हां जाति बनत तेव्हांच त्यांची समाजांत स्थापना होई. जाति म्हटली कीं तिला स्वतंत्र वृत्ति ग्रामसंस्था नेमून देत असे. असे बहिर्देशज समाज भरतखंडांत जातिरूपें घेऊन राहिलेले पूर्वी पुरातनकालींहि होते व सध्यांहि आहेत. मीडिया देशांतील मेदांपासून झालेली उत्तर हिंदुस्थानांतील मेध ही जात फार पुरातन आहे.

ही जात भंग्याची वृत्ति करून आहे. पश्चिम हिंदुस्थानांतील पारशांची जात बनून बाराशें वर्षें लोटलीं आहेत. ही पारशी जात वैश्याचा धंदा करते. कोकणकिनाऱ्यावरील यहुद्यांचीहि जात बनून आज दोन हजार वर्षें होत आलीं. ही जात मुख्यत्वें तेल्याचा धंदा करत्ये. निर्भेळ अरब व इंग्रज हेहि हिंदुस्थानांत जात बनूनच राहिले आहेत. इंग्रज म्हटला कीं तो इंग्रज जन्मावा लागतो आणि अरब म्हटला म्हणजे तो अरब जन्मावा लागतो. इंग्रजबीज व अंत्यजक्षेत्र यापासून युरेजिअन जात बनली आहे. ख्रिस्ती बाट्यांची अद्याप जात बनली नाहीं. अद्याप धर्मांतर होऊन बाहेरून हा समाज वाढत आहे. परंतु, जातिबद्ध हिंदू समाजाच्या संसर्गानें थोड्याच कालांत बाटलेल्या ख्रिस्त्यांची पूर्ण जात बनेल यांत संशय नाहीं. ह्या जातीला योग्य ती वृत्तीहि हिंदुसमाज देईल, हें निश्चित आहे. अंत्यजादि हिंदू बाटून जो मुसुलमान समाज झाला आहे तो कित्येक प्रांतांत जात बनला आहे, व कित्येक प्रांतांत धर्मांतरानें त्याची अल्पस्वल्प वृद्धि होत असल्यामुळें अद्याप जात बनला नाहीं. परंतु कालान्तरानें हाहि समाज स्थिर होऊन त्याचीहि हिंदुसंसर्गानें जात बनेल यांत संशय नाहीं. एकवर्णेच्छू हिंदूंची उमेद सर्व हिंदूंना एकवर्णी करण्याची आहे. परंतु जातिसंस्थेची चिकाटी पाहतां व बीजक्षेत्राच्या शुद्धीविषयीं हिंदूंची अपरंपार आसक्ति लक्षांत घेतां, असें भाकीत केलें तर चालेल कीं, एकवर्णेच्छु हिंदूंचीहि पुढें-मागें एक स्वतंत्र जात होईल.

हिंदूंत जातिशः समावेशन व जातिबाह्य शरीरसंबंधाचा निषेध

एतद्देशज अनार्य असोत कीं बहिर्देशज अनार्य असोत, हिंदुस्थानांत त्यांना कायमचें रहावयाचें म्हणजे जात बनूनच त्यांना हिंदुसमाज राहूं देत असे; म्हणजे अनार्य बाह्य समाजाला जात बनवून त्याचा समावेश हिंदुसमाज आपल्यांत करून घेत असे. जात बनल्याशिवाय नागरिकत्वाचे किंवा ग्रामस्थाचे हक्क मिळत नसत, म्हणजे स्थानिक स्वराज्याच्या व साम्राज्याच्या छत्राचा आश्रय मिळत नसे. हिंदुसमाजांत बाह्यांचें राजकीय समावेशन, जातीचें रूप घेतल्यानंतर होत असे. बाह्य जातिसंस्थ झाले म्हणजे त्यांना त्यांच्या अनुरूप वृत्ति मिळून किंवा धंदा मिळून हिंदुसमाजांत व हिंदुदेशांत देशांतील राज्यछत्राखालीं सुखरूप राहतां येत असे. अशी जाति देशांत फारकाल राहिली, एथील अभिजन बनली व हिंदुसमाजाचे सामान्य धर्म पाळूं लागली, म्हणजे त्या जातीला हिंदू हें अभिधान प्राप्त होई. नंतर त्या जातीचा जो देव असेल त्याची स्थापना हिंदूंच्या तेहतीस कोटी देवतामंडळांत होऊन, पूर्ण हिंदुत्वाचा शिक्का त्या जातीवर कायमचा मारला जाई.

अशा रीतीनें राजकीय व धार्मिक समावेशन यद्यपि झालें, तत्रापि सामाजिक समावेशन कधींच होत नसे. कारण, जातिबाह्य शरीरसंबंधाचा हिंदू मनोरचनेला

पराकाष्ठेचा तिरस्कार आहे. यूरोपियन किंवा अमेरिकन समाजाला नीग्रो किंवा चिनी यांच्याशीं रंगबाह्य शरीरसंबंध करण्यापासून जी मनोरचना परावृत्त करते तीच मनोरचना जातिबाह्य शरीरसंबंध करण्यापासून हिंदूंना परावृत्त करत्ये. यूरोपियनांत किंवा अमेरिकनांत रंगबाह्य शरीरसंबंध केल्यानें जी संकरप्रजा उत्पन्न होते तिला निग्रिटो, मूलाटो, युरेशियन, वगैरे संज्ञा असून, ती संकरप्रजा संस्कृतीनें व दर्जानें बहुतेक मातेच्या संस्कृतीची व दर्जाची समजतात. आर्यांत फक्त वर्ण जेव्हां होते, तेव्हां वर्णावर्णांत शरीरसंबंध होऊन जी प्रजा होई तिला संकर समजत; व तिचा दर्ज्या मातेच्या किंवा पित्याच्या दर्ज्याहून आनुलोम्यप्रतिलोम्याप्रमाणें जास्त किंवा कमी समजत. अस्सल यूरोपियन स्त्री व अस्सल निग्रो ह्यांच्या शरीरसंबंधापासून झालेली संतती मूलाटोहून अत्यन्त नीच समजतात. तोच प्रकार आर्यांतहि होई. ब्राह्मण स्त्री व शूद्र पुरुष यांपासून झालेली संतती केवळ चांडाल समजत. पुढें आर्यांत जेव्हां जातिसंस्था झाल्या, तेव्हां अनुलोमप्रतिलोमसंकरच होण्याचें बंद पडलें व एखाद्या स्त्री किंवा पुरुष व्यक्तीनें जातिबाह्य शरीरसंबंध केला व त्या संबंधापासून प्रजा झाली, तर त्या स्त्रीपुरुषांना व त्यांच्या प्रजेला जातिभ्रष्ट समजत; व त्यांना गांवांत कोठेंहि थारा मिळत नसे. तशांत मुसुलमानादि विधर्मीयांशीं संबंध घडला, तर त्या व्यक्तीस आपल्या जातीस व हिंदुत्वास मुकावें लागे. सबंध जातची जात जर विधर्मीयांशीं शरीरादिसंबंध किंवा अन्नपानादिसंबंध ठेवूं लागली, तर ती सबंध जातची जात हिंदुत्वांतून उठे. चार-पांचशें वर्षांपूर्वी खानदेशांत बोहऱ्यांची जात व कोंकणांत गोवेंप्रांतीं किरिस्तावांची जात अशा तऱ्हेनें अस्तित्वांत आली. बोहरी हें मूळचे हिंदु व्यापारी होते व गोव्याचे किरिस्ताव मूळचे ब्राह्मणादि वर्णांतील होते. यूरोपियनांना रंगबाह्य शरीरसंबंधाची व हिंदूंना जातिबाह्य शरीरसंबंधाची ओकारी सारखीच येते. अशी जर स्थिति आहे, तर यूरोपियनांनीं मानभावीपणानें हिंदूंना नांवें ठेवावीं यांत कोणता शहाणपणा आहे बरें ?

हिंदू आर्यांची अनार्यांना सुसंस्कृत करण्याची रीति

उपरिगत तपशिलावरून लक्ष्यांत येईल कीं, यूरोपियन समाज बाह्यांचे समावेशन व्यक्तिशः करतो व हिंदू समाज जातिशः करतो. ह्या पद्धतींतून बाह्यांचें हित कोणती पद्धती जास्त साधते ते पाहूं. बाह्यांची व्यवस्था करण्याची विवंचना दोघांहि समाजांना परदेश जिंकतांना पडलेली आहे. यूरोपियन लोक अमेरिकेंत वसाहती जेव्हां करूं लागले व आर्य हिंदुस्थानांत व दक्षिणेंत जेव्हां ग्रामसंस्था स्थापूं लागले, तेव्हां बाह्यांची व्यवस्था लावणें दोघांनाहि अपरिहार्य झालें. पैकीं, यूरोपियन पद्धतीचे संक्षिप्त चित्र प्रथम काढतों. स्पानिश लोक अमेरिकेंतील पेरू व मेक्सिको ह्या देशांत वसाहत करण्यास इसवी सनाच्या पंधराव्या व सोळाव्या शत-

कांत गेले. पेरु व मेक्सिको देशांतील मूळच्या रहिवाशांचा स्वतःच्या समाजांत अंतर्भाव कसा करावा, हें त्यांना प्रथम नीट समजलें नाहीं. कांहीं व्यक्तींना खिश्चन करून काय होतें तें त्यांनीं पाहिलें. जम नीट बसेना. तेव्हां दगाबाजी, क्रौर्य व निर्दयपणाची कमाल करून, पेरू व मेक्सिकोंतील सबंध गांवचे गांव उध्वस्त करून त्यांतील रहिवाश्यांची त्यांनीं कत्तल केली. त्या कत्तलींचा इतिहास जगप्रसिद्ध आहे. युनायटेड स्टेट्स्मध्यें इंग्लिश वसाहतवाल्यांनीं अमेरिकन इंडियनांची वासलात कशी लाविली तेंहि महशूर आहे. इंग्लिश वसाहतवाल्याच्या क्रौर्यापुढें, मानभावीपणापुढें, मद्यपानप्रसारापुढें, आर्थिक कचाटीपुढें, रोगबीजप्रसारापुढें, खिश्चन संस्कृतीपुढें व भूमितृष्णेपुढें, बिचारे इंडियन्स केवळ नामशेष होत आले. ते इतकेंकीं, युनायटेड स्टेट्स्मधील एका लहानशा टापूंत सध्यां कांहीं थोडे इंडियन्स केवळ प्रदर्शनार्थ राखून ठेविल्यासारखे आहेत. रंग, संस्कृति, आचार व धर्म निराळा, ह्या सबबीवर यूरोपियन लोकांनीं इंडियन लोकांना उच्छिन्न केलें. उच्छेदाशिवाय अन्य कलमि त्याना त्या कालीं सुचली नाहीं. कमसंस्कृतीच्या यूरोपीयनेतर लोकांचा स्वसमाजांत समावेश यूरोपियन लोकांनीं हा असा केला. राजकीय किंवा सामाजिक किंवा धार्मिक समावेशन करण्याचें रानटी समाजांतील एकेका व्यक्तीनें तेवढें अवगत असल्यामुळें सर्व रानटी समाज युरोपियन समाजाच्या तोडीचा होण्यास बेसुमार अवधि लागतो. उतावीळपणानें शेंकडों वर्षें वाट पाहण्याचा दम नसल्यामुळें, हें व्यक्तिसमावेशन अत्यंत मंद वाटून, रानटी समाजांना पृथ्वीच्या पाठीवरून समूळ सुधारून ऊर्फ उखडून टाकण्याचा उपक्रम यूरोपियनांनीं केला.

आतां भारतवर्षांतील आर्यांची स्वेतर-समावेशनाची रीति पहा. भिल्ल, कोळ, गोंड, नाग, राक्षस, वानर, गरुड वगैरे अनार्य बाह्यसमाज आर्यांना भारतवर्षांत उत्तरेंत व दक्षिणेंत भेटले. पैकीं राक्षस समाजसंस्कृतीनें आर्यांच्या बहुतेक बरोबरीचा असल्यामुळें, त्याचा युद्ध करून निःपात करणें आर्यांना राक्षसांनीं भाग पाडलें. बाकीचे जे अनार्यसमाज होते, ते आर्यांच्याहून संस्कृतीनें सर्वतोप्रकारें निकृष्ट होते. ह्या निकृष्ट समाजांच्या आर्यांनीं जाति बनविल्या, व आपल्या चातुर्वर्णिक जातिसंस्थांच्या शेजारीं त्यांची स्थापना केली. अनार्य समाजांशीं आर्यांच्या शूद्रादिकांचा शरीरसंबंध होऊन जे अंत्यजसंकर उत्पन्न झाले त्यांना ग्रामसंस्थांत स्थान व वृत्त्या मिळाल्या. भिल्ल, कोळ, गोंड वगैरे निर्भेळ अनार्य जाति व संकरोत्पन्न अनार्य अंत्यज जाति अद्यापहि हिंदुस्थानांत नांदत आहेत. अंत्यजांची लोकसंख्या मुसुलमान संकरांच्या लोकसंख्येइतकी सध्यां हिंदुस्थानांत आहे. मुसुलमान संकर जो हिंदुस्थानांत आहे तो बहुतेक अंत्यज व अनार्य बाटून झालेला आहे. मुसुलमान ह्या देशांत आले नसते किंवा त्यांनीं ह्या अंत्यजांना बाटविलें नसतें, तर आज मित्तीस अंत्यजांची लोकसंख्या दहा-बारा कोटी असती. युरोपियनांनीं इंडियनांशीं जे क्रौर्याचें आचरण

केलें, तसें आचरण जर आर्यांनीं अनार्यांशीं केलें असतें, तर आज मित्तीस ही दहा-बारा कोट लोकसंख्या दिसली नसती. परंतु भारतवर्षांतील आर्यांची बुद्धि दयार्द्र पडल्यामुळें व क्रौर्यमार्गाचें अवलंबन करणें अन्याय्य व अमानुष वाटल्यामुळें, स्वतंत्र जाति बनवून नागादि अनार्य जातींचें आर्यांनीं संरक्षण केलें. अनार्यांची संस्कृति इतकी निकृष्ट असे कीं त्यांच्यांतील व्यक्तिमात्र आर्यसमाजांत घेऊं म्हटलें तरी घेणें आर्यांनाहि फायद्याचें नसे व अनार्यांनाहि फायद्याचें नसे. नाना युक्त्यांनीं किंवा अमानुष क्रौर्यानें त्यांचा समूळ नाश करणें आर्यांचें ब्रीद नसे. प्राणिमात्राची हत्या करणें म्हणजे महत्पाप जे गणीत ते हजारों अयुध्यमान मनुष्यांची हत्या जोडण्यास कसे प्रवृत्त व्हावे ? युयुत्सूशीं युद्ध करण्यास आर्य वैदिककालापासून प्रख्यात आहेत. परंतु अयुध्यमान अशा निरपराधी दस्यूंचा वध आर्यांच्या हातून होणें असंभाव्य होतें. तेव्हां, स्वसमाजांतील वर्णांच्या व पुढें कालान्तरानें झालेल्या जातींच्या धर्तीवर दस्यूंचे म्हणजे अनार्यांचे आर्यांनीं जातिरूप गट बनविले व ते आस्तेआस्ते सुधारावे व आर्यसंस्कृतीच्या जवळ यावे या सद्धेतूनें आपल्या सान्निध्यास सुखरूप ठेऊन दिले. अनार्यांचे जातिरूप गट झाल्यानें, त्यांच्या समाजाला व निकृष्ट संस्कृतीला प्राणहारक धक्का बसला नाहीं. त्यांच्या वनदेवता, त्यांचे नाच, व त्याचे धर्मसंस्कार, त्यांची पारध व त्यांचीं उपजीविकेचीं साधनें त्यांचीं त्याच्यापाशीं राहून, आर्यांच्या चालीरीतींचें व देवधर्मांचें अनुकरण यथावकाश व यथाशक्ति करण्यास त्यांना वाव सांपडला. भिल्ल, खोंड, गोंड, कोळ वगैरे अनार्य रानटी लोकांची पूर्व स्थिति व वर्तमान स्थिति ह्यांची तुलना ज्या समाजशास्त्र्यांनीं केली आहे, ते वरील विधानाचें पोषण व समर्थन करूं शकतील.

आर्यांच्या व अनार्यांच्या शरीरसंबंधापासून जे अंत्यज संकर झाले, त्यांच्या ठाईं आर्यबीज असल्यामुळें हिंदुत्वांत येणें त्यांना निर्भेळ अनार्यांहून सुकर झालें. हिंदूंचे देव, धर्म, आचार व विचार अंत्यजांत निर्भेळ अनार्यांतल्याहून जास्त लवकर पसरले. ग्रामसंस्थांत अंत्यजांना तत्तदनुरूप वृत्त्या मिळाल्यानें तर हिंदू संस्कृतीचे व हिंदू समाजाचे ते अंशभाक् झाले. हिंदूंचीं शास्त्रें व हिंदूच्या कला संपूर्णपणें ग्रहण करण्याची लायकी त्यांना कित्येक शतकेंपर्यंत आली नाहीं, हें खरें. परंतु पृथ्वीवर हा प्रकार सर्वत्र असाच घडत आलेला आहे. गहन शास्त्रें व भानगडीच्या कला रानटी लोकांच्या आंगवळणी पडण्यास फार प्रयास पडतात. तत्रापि, आर्यांच्या ग्रामसंस्थांत कायमचें स्थान मिळाल्यापासून, अंत्यजांची सुधारणा नाना प्रकारानें झालेली आहे.

(१) त्यांचा वन्यपणा सुटून, त्यांना ग्राम्यपणा आला. (२) केवळ पारधीनें उपजीविका करण्याचें सुटून, गांवांत शेती व इतर धंदे करून ते उपजीविका करूं लागले. (३) नग्नावस्था जाऊन, वस्त्राच्छादनावस्था त्यांना प्राप्त झाली. (४) मद्यपानापासून परावृत्ति झाली. (५) जिवंत गाईचें मांस खाण्याचें बंद पडलें. (६) त्यांच्या मूळच्या निकृष्ट भाषांहून श्रेष्ठ ज्या प्राकृत भाषा त्यांच्या द्वारें विचार-

प्रदर्शन ते करूं लागले. (७) चोरटेपणा जाऊन संभावितपणा आला. (८) ब्राह्मणांकडून उपाध्येपण करून घेण्याची सवड मिळाली. (९) वन्यदेवताराधनाच्या ऐवजीं रामकृष्णादि आर्यदेवतांचें उपासकत्व लाभलें.

अशी प्रतिष्ठापना आर्यसंस्कृतींत होतां होतां, भक्तिमार्गाच्या सोपानानें कित्येक अंत्यजांना सर्ववर्णवंद्य असें संतपण गांठतां आलें. जातिसंस्थेच्या जादूनें अनार्योत्पन्न अंत्यजांची ही अशी सुधारणा झाली.

अंत्यजांच्या वन्यावस्थेपासून सुधारणावस्थेपर्यंतच्या प्रगतीचा हा असा मनोरंजक व आल्हादक इतिहास आहे. तो मनन केला असतां, चातुर्वर्णिकांच्या व विशेषतः ब्राह्मणांच्या नांवानें खडे फोडण्याचें व्रत वृथानिंदक प्रांजलपणें सोडून देतील, अशी नम्र उमेद आहे. ही वृथानिंदा खऱ्या इतिहासाच्या व त्याच्या आधारावर बांधलेल्या सामाजिक सिद्धांताच्या अज्ञानानें झालेली आहे. प्रथम ही निंदा अज्ञ पण कांघावी अशा युरोपियन सुज्ञांनीं केली. त्यांचें अनुकरण आपल्या इकडील सद्धेतुप्रेरित अश्या मायाळू सुधारकांनीं केलें. स्वदेशज व परदेशज सुज्ञांनी चालविलेली ही निरर्गल निंदा इतक्या थरास जाऊन पोहोंचली कीं, भारतवर्षांतील ब्राह्मण म्हणजे अंत्यजवर्गाचा जन्मोजन्मीचा वैरी ठरला. गेल्या शंभरदीडशें वर्षांत असें भासविण्याचा ज्यारीनें प्रयत्न चाललेला आहे कीं, ब्राह्मण-क्षत्रियांनीं दुष्टबुद्धीनें आपल्याच पैकीं कांहीं लोकांना चातुर्वर्णिक समाजसोपानाच्या खालीं ढकलून व पराकाष्ठेच्या निकृष्ट स्थितीस पोहोंचवून, त्यांच्या हक्कांची अश्रुतपूर्व पायमल्ली केली. महारादि अंत्यज मूळचे उच्च वर्णाचे असून, ब्राह्मणांनीं दुष्टबुद्धीनें त्यांना नीच ठरवून, अनामक, पंचम, अंत्यज, बाह्य, अशीं निंदाव्यंजक नांवें दिलीं व त्यांचा स्पर्शहि दूषक गणिला. परंतु खरा प्रकार ह्या भासाच्या अगदीं उलट आहे, हें वरील इतिहासावरून स्पष्ट आहे. अनार्य स्त्रिया व आर्य शूद्र यांच्या शरीरसंबंधापासून अंत्यजसंकर उत्पन्न झाले. व संकरांच्या जाति बनवून प्राणहानि न होतां उन्नति करून घेण्याचा मार्ग आर्यांनीं अंत्यजांना मोकळा करून दिला, असा खरा प्रकार आहे. युरोपियनांच्या तावडींत जर हे अंत्यज व अनार्य सांपडते, तर ते अमेरिकन इंडियनांच्याप्रमाणें आज पृथ्वीवरून समूळ नष्ट झाले असते. हिंदुस्थानांत ब्राह्मणादि चातुर्वर्णिकांचा जाणता वर्ण मध्यस्थीस असल्यामुळें, अंत्यजादि अनार्योत्पन्न समाजांचा सामाजिक मृत्यू टळलेला आहे. युरोपियन व अंत्यज ह्यांच्यामध्यें ब्राह्मणादि वर्ण जर मध्यस्थीस पाचरी दाखल नसते, तर अंत्यजांचा चुराडा होऊन कित्येक शतकें लोटलीं असतीं, हें विधान सिद्ध करण्यास कल्पनाशक्तीची मदत घ्यावयाचें कारण नाहीं. जेथें ब्राह्मणादींची पाचर मध्यें नाहीं, अशा युरोपियन वसाहतींत मजुरी करण्यास गेलेल्या अंत्यज, मुसुलमान व अंत्यजसम मुदतबंद मजुरांचा युरोपियनांच्या जुलमाखालीं, माराखालीं व निर्दयतेखालीं, कोण धुव्वा उडतो तें ध्यानांत घेतलें, म्हणजे, वरील विधानांची सत्यता प्रतीतीस येईल.

हिंदुसमाज लखोटबंद आहे काय ?

एतद्देशज किंवा बहिर्देशज बाह्यांचा व अनार्यांचा आर्यसमाजांत समावेश कसा होतो, तें वरील परिष्कारावरून स्पष्ट होतें. हिंदुसमाजांत बाह्यांचा व स्वेतरांचा समावेश जातिद्वारा होतो. आजपर्यंतच्या एकोनएक समाजशास्त्र्यांचा असा एक स्थूल ग्रह झालेला आहे कीं, हिंदुसमाजांत बाह्यांचा समावेश बिलकुल होत नाहीं व हिंदुसमाज हा सर्व बाजूंनीं मढविलेल्या डब्याप्रमाणें लखोटबंद आहे. युरोपीयन समाजांत बाह्यांचा राजकीय व धार्मिक समावेश व झालाच तर सामाजिक समावेश व्यक्तिशः होतो. तसा व्यक्तिशः किंवा वैयक्तिक समावेश हिंदुसमाजांत होत नाहीं, आणि दुसऱ्या कोणत्या तऱ्हांनीं समावेश होऊं शकतो किंवा नाहीं तें माहीत नाहीं; अशा स्थितींत हिंदुसमाज बाह्यांना लखोटबंद आहे, असा युरोपीयनांचा समज झाला तो ठीकच आहे. आमचें इतकेंच सांगणें आहे कीं, युरोपियन समाजशास्त्र्यांना हिंदुसमाजाच्या स्वभावाचें व लकबांचें गुह्य कळलें नाहीं. जातिसंस्था निर्माण करून, समाजरचना करण्याचा यशस्वी प्रयत्न हिंदूंनीं आज दहा-पांच हजार वर्षें केला. तो युरोपियन समाजरचनेहून मूलतः सर्व प्रकारें भिन्न असून, परिणामतःहि तितकाच भिन्न आहे. जातिद्वारा बाह्यांचें स्वसमाजांत समावेशन करून घेण्याची ही जी हिंदूंची असामान्य पद्धती तिची तुलना युरोपियनांच्या समावेशन पद्धतीशीं व मुसुलमानांच्या समावेशनपद्धतीशीं केली असतां, तिचे गुणदोष उठावदार दिसतात. सबब, तशी तुलना करून दाखवितों.

मुसलमानांची समावेशनरीति सदोष

वाटेल त्या रानटी संस्कृतीची, रंगाची, शिक्षणाची किंवा शिक्षणाभावाची आणि आचाराची व्यक्ति असो, तिनें मुसलमानी धर्म स्वीकारिला म्हणजे तिचें समावेशन स्वसमाजांत मुसुलमान करून घेतात. त्यामुळें होतें काय कीं, निरनिराळ्या संस्कृतींची, रंगांची व आचारांची मुसुलमानसमाजांत एकच खिचडी होऊन जाते. अशी खिचडी झाल्यानें समाजांत सर्वत्र समता नांदते, असें समाधान अर्धवट सुधारक करून घेण्याचा संभव आहे. परंतु, तें समाधान फार वेळ टिकणारें नसून व्यर्थ व पोकळ आहे. केवळ धर्माच्या सबबीवर उच्च संस्कृतीच्या व्यक्तींची व नीच संस्कृतीच्या व्यक्तींची रहाणें, जेवणेंखाणें, कायदा, शरीरसंबंध व आचार या संबंधानें सरसकट समता ज्या समाजांत मानली जाते व ज्या समाजांत नीच संस्कृतीच्या व्यक्तींची लोकसंख्या उच्च संस्कृतीच्या लोकसंख्येहून बेसुमार अधिकतर असते, त्या समाजांत आरोग्याला उपकारक असे शौचधर्म रसातळास जातात, संसर्गजनक रोगांचा प्रादुर्भाव होतो, उपदंशादि व्याधींनीं ग्रस्त झालेली दुर्गुणी प्रजा

माजते, कायद्याच्या ऐवजीं बेबंदशाहीचें प्राबल्य होतें आणि सदाचारसंपन्नतेचा व विद्येचा लोप होतो. एकाच वाक्यांत सांगावयाचें म्हणजे उच्च संस्कृतीचा अशा समाजांत विध्वंस होतो.

अल्जीरिया–मोरोक्कोपासून चीनापर्यंत जो मुसुलमान समाज पसरला आहे त्याचीं शहरें, खेडीं व घरें गलिच्छपणाचीं आगरें आहेत, असें प्रवाशी सांगतात. हिंदुस्थानांतल्या शहरांतील मुसुलमानवाडे हिंदूंच्या पेठांहून गलिच्छतर असतात, हें सर्वत्र महशूर आहे. कायद्याला झुगारून दुर्बल दंगेखोरपणा करण्याविषयीं सर्व मुसुलमानदेश कुप्रसिद्ध आहेत. पृथ्वीच्या पाठीवरील इतर सर्व देशांपेक्षां, मुसुलमान देशांत उपदंशाचा विकार अधिकतर प्रमाणानें आढळेल, असा अंदाज आहे. विद्येच्या क्षेत्रांत तर, अभिनव व अपूर्व शास्त्रीय शोध करणारी व्यक्ति मुसुलमान समाजांत पंधराशें वर्षांत नांव घेण्यासारखी एकहि सांगतां येण्याजोगी नाहीं. विद्येच्या कामीं मोठ्यांतली मोठी कामगिरी जी मुसुलमानांनीं केली ती ही होय कीं, ग्रीस व हिंदुस्थान यांतील शास्त्रीय शोधांचा व कलांचा आधुनिक युरोपांत सात-आठशें वर्षांपूर्वीं त्यांनीं प्रसार केला. तात्पर्य, जगाच्या ज्ञानांत, आचारांत, शौचधर्मांत व राजधर्मनिर्मितींत कोणतीहि अपूर्व पदवी मुसुलमान लोकांनीं आक्रमण केली, असें विधान प्रांजलपणें करतां येण्यासारखें नाहीं. वाटेल त्या संस्कृतीच्या माणसांचा स्वसमाजांत समावेश केल्यामुळें, मुसुलमान समाज मानवहित साधण्याच्या व स्वसमाज हित साधण्याच्या कार्यांत अगदीं दुर्बल म्हणून प्रख्या पावलेला आहे. सध्यां तर मुसुलमान समाज इतक्या नीचतर पदवीस पोहोंचला आहे कीं, इतर सुधारलेल्या, शास्त्रसंपन्न व शुचिर्भूत देशांची गुलामगिरी करण्यापलीकडे येणाऱ्या हजार बाराशें वर्षें त्याला गत्यंतर नाहीं. नीच बाह्यांचें सामाजिक समावेशन त्या समाजांत इतक्या थोरल्या प्रमाणांत झालेलें आहे कीं, समावेशन करण्याच्या श्रेष्ठतर पद्धती यद्यपि त्या समाजानें यापुढें अंगीकारिल्या, तत्रापि आहेत त्या नीच बाह्यांची सुधारणा करण्यांत त्याला येणारीं हजार वर्षें पुरणार नाहींत.

युरोपियनांची समावेशनरीति व रंगशुद्धीचें महत्त्व

बीजक्षेत्रशुद्धि, वंशशुद्धि, रंगशुद्धि किंवा समानसंस्कृति, ह्या सर्व बाबींना धाब्यावर बसवून, वाटेल त्या व्यक्तींचें सरमिसळ सामाजिक समावेशन केल्यामुळें, मुसुलमान समाजाची प्रगती न होतां पिछेहाट झाली. आधुनिक युरोपियन समाज असें सरसकट सामाजिक समावेशन करीत नाहीं. सामाजिक समावेशनाच्या बाबतींत रंगशुद्धीकडे तो समाज असाधारण लक्ष्य देतो. मुसुलमानी समावेशनाला जर सरमिसळ समावेशन म्हटलें, तर युरोपियन समावेशनाला निवडक समावेशन हें नांव यथार्थ होईल. इंग्रज समाज, फ्रेंच, जर्मन, नॉर्स, स्वीड, स्विस्, इतालियन, ग्रीक, रशियन,

हंगारियन वगैरे पांढऱ्या रंगाच्या लोकांशीं शरीरसंबंध करतो; परंतु नीग्रो, चिनी, जपानी, तुर्की या बेरंगी लोकांशीं शरीरसंबंध करण्याला व ह्या लोकांचें स्व-समाजांत सामाजिक समावेशन करून घेण्याला तो अनेक कारणास्तव राजी नसतो. बेरंगी लोकांचें सामाजिक समावेशन न करण्यास मुख्य कारण असमान किंवा विषम संस्कृति हें होय. विषम संस्कृतीच्या म्हणजे निकृष्ट किंवा भिन्न संस्कृतीच्या लोकांचें सामाजिक समावेशन करून घेतलें तर स्वसमाजाच्या आचारांत, विचारांत, राज-कारणांत, विद्येंत, शास्त्रांत, कलांत व चेहऱ्यांत विलक्षण फेरफार होऊन, समाज विस्कळित होईल, ही भीति यूरोपियन समाजाला वाटते. ह्या भीतीचें उत्कट रूप खुद्द यूरोपांत इतकें भासमान होत नाहीं. कारण, यूरोपियनेतर बाह्यांचा प्रवेश यूरो-पियन देशांत होण्यास बिलकुल अवकाश नाहीं. ते ते यूरोपियन देश स्वदेशज एकजिनशी लोकसंख्येनें इतके गच्च भरून गेले आहेत कीं, बाह्यांना पाय ठेवण्याला तेथें रीघ नाहीं. ह्या भीतीचें उत्कट रूप अमेरिकेंत चांगलें भासमान होतें. त्या खंडांत वसाहत करण्यास अद्यापहि हवी तितकी जागा आहे. तत्रापि यूरोपीयनेतर चिनी, जपानी, आफ्रिकन, तुर्की, व हिंदू लोकांना, अमेरिकेंतील, यूरोपियन लोक नुसते बद्धमूल होऊं देत नाहींत, मग सामाजिक समावेशनाचें नांव कशाला ? शास्त्रें, कला व राजकारण या बाबींत जपानी लोक अमेरिकनांच्या बहुतेक बरोबरीचे अलीकडे झालेले आहेत. परंतु त्यांनाहि युनायटेड् स्टेट्स् मध्यें वसाहत करण्यास व यूरोपीयनांशीं शरीरसंबंध करण्यास मज्जावच आहे. कारण, वंशैक्य व रंगैक्य व रूपैक्य नाहीं. आपण हिंदू तर निर्भेळ आर्यत्वाचे गड्डे आहों. परंतु युनायटेड् स्टेट्स् मध्यें किंवा कानडांत आपल्या चार माणसांनींहि कायमची वसाहत केलेली खपत नाहीं. येथें वंशैक्य आहे, रूपैक्य आहे व कित्येक शिखांच्या बाबतींत तरी बरेंच रंगैक्य आहे. असें असून हिंदूंची भीति कां वाटते ? तर, हिंदूंची संख्या बरीच झाल्यास समाजाचा एकजिनसीपणा जाऊन, आचारांत, विचारांत, राजकारणांत व समाजकारणांत अनिष्ट फेरफार होतील व नसत्या भानगडी उपस्थित होतील. आणि ही भीति कांहीं अन्याय्य नाहीं. सामाजिक समावेशनाची जी वैयक्तिक पद्धती तिच्याखेरीज अन्य पद्धती जोपर्यंत यूरोपियन समाज अवलंबणार नाहीं, तोपर्यंत त्या समाजाला समान संस्कृतीच्या बाह्यांचें तर भय वाटत राहीलच, परंतु निकृष्ट संस्कृतीच्या बाह्यांचेंहि भय वाटण्याचें सुटणार नाहीं. अशा दुहेरी पेंचांत, समान संस्कृतीच्या लोकांस मज्जाव करणें व निकृष्ट संस्कृतीच्या लोकांचा समूळ उच्छेद करणें किंवा त्यांना गुलाम-गिरींत किंवा गुलामगिरीसारख्या स्थितींत डांबून ठेवणें, हे दोन मार्गच तेवढे यूरो-पियन समाजाला खुले राहतात. ह्याहून तिसरा मार्ग अद्याप यूरोपियनांना व अमे-रिकनांना सुचला नाहीं व बरींच शतकें सुचण्याचें कारण नाहीं. कां कीं, निवडक सामाजिक समावेशनानें, समाजाला अंतस्थ एकजिनसीपणा येऊन अपूर्व विद्या,

अपूर्व कला, अपूर्व शोध, अपूर्व शौचधर्म, अपूर्व संपत्ति व अपूर्व ऐश्वर्य, ह्यांची जोड त्यांना झाली आहे. त्या लाभाप्रीत्यर्थ कित्येक रानटी समाज नष्ट करून अर्धवट सुधारलेले अनेक समाज यूरोपियनांनीं आपलें दास्यकर्म करण्यास लाविले आहेत. रानटीपणा व कमतर संस्कृति हे ज्यांचे अक्षम्य अपराध त्या समाजांना उच्छिन्न करण्यांत व दास करण्यांत यूरोपीयनांना कांहींच खंती वाटत नाहीं. दया, धर्म, सर्वांभूतीं समवृत्ति, वगैरे सद्गुण बाह्यांशीं वर्तन करतांना यूरोपियन समाज पार झुगारून देतात. तात्पर्य, निवडक समाजिक समावेशनानें समाजाला एकजिनसीपणा येऊन यद्यपि अपूर्व ऐश्वर्याचा लाभ होतो, तत्रापि समाजांत दयादाक्षिण्यादि सात्विक गुणांच्या अभावाचा करंटपणा बेताल बोकाळतो व खिस्ताच्या सार्वलौकिक भ्रातृभावाचें वाटोळें होतें. अधूनमधून फ्रेंच समाजक्रांतीसारखे सात्विकतेचे यूरोपियन समाजाला झटके येतात, परंतु परस्वापहरणबुद्धीपुढें त्या सात्विकतेचें मातेरें होतें. सद्यःकालीं तर, बाह्यांशीं व्यवहार करतांना यूरोपियनांचे ठाईं सात्विकता औषधालाहि राहिली नाहीं. वैयक्तिक व निवडक सामाजिक समावेशनाचा रस्ता धरल्याचा हा तामस व राजस परिणाम आहे.

हिंदु, मुसुलमान व युरोपियन यांची तुलना

ह्या मुसुलमानी व यूरोपियन ऊर्फ खिश्चन सामाजिक समावेशनांशीं आतां हिंदू समावेशनाच्या पद्धतीची तुलना करूं. अखिल मानववंशांशीं ज्याच्या त्याच्या योग्यतेप्रमाणें समबुद्धीनें वागावें, ही आर्यांची पुरातन कालापासून पहिली नीति आहे. आपण उच्च संस्कृतीला पोहोंचून इतर निकृष्ट समाजांनाहि आपण गांठलेल्या संस्कृतीस गांठण्याच्या मार्गाला लावून द्यावयाचें, ही आर्यांची दुसरी नीति आहे. जवळ आलेल्या कोणत्याहि समाजाचा वंश, रूप, रंग, इत्यादि सबबींवर द्रोह करावयाचा नाहीं. त्याला हिंस्रबुद्धीनें ठार करावयाचें नाहीं, व त्याला दास बनवावयाचें नाहीं, ही आर्यांची तिसरी नीति आहे. आणि शेजारास आलेल्या समाजापासून आपली बीजक्षेत्रशुद्धि भ्रष्ट होऊन, आपला वंश, रूप व वर्ण ह्यांच्यांत वैगुण्य येऊं द्यावयाचें नाहीं, ही आर्यांची चवथी नीति आहे. ह्या चतुष्पथ नीतीच्या बलावर स्वसमाज, स्ववंश व स्वसंस्कृति शुद्ध राखून आर्यांनीं स्वतःच्या वर्णांच्या व संकरांच्या जाती बनवून अनार्यांच्या व अनार्य संकरांच्याहि जाती बनविल्या. आपापली संस्कृति घेऊन व आपापल्या जातींत सुखानें व समाधानानें राहून आपापली उन्नति, यथाशक्ति व यथावकाश करीत राहावें, असा शिलशिला आर्यांनीं घालून दिला. ह्या जातिसंस्थेचे फायदे खालीलप्रमाणें आहेत.

(१) मुसुलमानांच्या प्रमाणें आपला धर्म स्वेतर बाह्यांवर जुलमानें लादण्याची व स्वतःचा समाज दुर्बल करून घेण्याची जरूर रहात नाहीं. (२) युरोपियनांप्रमाणें

बाह्यांचा समूळ उच्छेद करण्याची किंवा बाह्यांना साक्षात् गुलाम किंवा गुलामवजा बनविण्याची आपत्ति ओढवत नाहीं. (३) बाह्यांना आपले देवधर्म सोडावे लागत नाहींत. (४) बाह्यांना आपले आचार-विचार मनसोक्त पाळतां येतात. (५) बाह्यांना आपली भाषा सोडून देणें भाग पडत नाहीं. (६) बाह्यांना आपल्या गणगोतास मुकावें लागत नाहीं. (७) बाह्यांची बीजक्षेत्रशुद्धि यावज्जाति जशीची तशीच राहते. (८) बाह्य शेजारीं राहून आर्यांना आपल्या विद्येंत, शौचधर्मांत, शास्त्रांत, कलांत व संस्कृतींत अप्रतिबद्ध प्रगती साधतां येते. (९) जातिबद्ध सर्व समाजांत सौख्य, स्थैर्य, व समाधान नांदतें. (१०) आर्यसंमतीनें बाह्यांची आस्ते-आस्ते बिनबोभाट व विना सायास उन्नति होते. (११) रानटीपणाचा शिक्का जाऊन, बाह्यांची कालांतरानें हिंदुत्वांत गणना होते. जातिसंस्थेच्या मुशींत घालून, बाह्यांचा समावेश आर्य आपल्या समाजांत जो करून घेतात तो यूरोपियन किंवा मुसुलमानी समावेशाहून दयादि गुणांनीं वरचढ आहे, हें वरील तुलना पाहून, कोणीहि प्रांजल माणूस कबूल करील. हिंद्वितर जे एतद्देशज व बहिर्देशज अहिंदू त्यांच्या जाती बनवून दिल्यामुळें, हिंदुसमाजाचेंहि मोठें हित झालेलें आहे. कसें तें पुढील कलमांत नमूद करतो.

अस्तंगत प्राचीन संस्कृति व भारतीय यांची तुलना–जातिमहिमा

गेल्या आठ दहा हजार वर्षांत असुर, बाबिलोनियन, मिसर, शक, यवन, रोमन, किर्मिर, क्रौंच वगैरे अनेक समाज पृथ्वीच्या पाठीवर राज्यादि उपभोग घेऊन अस्तंगत झाले व नामशेष उरले. हे समाज नष्ट कां झाले ? हे समाज अजीबात नष्ट होण्याचें खरें कारण लढायांत पराजय, किंवा साथीचे रोग किंवा सद्दीची वक्रदृष्टि ह्यापैकीं एकहि नसून ह्यांच्या नाशाचें खरें कारण ह्या लोकांतील सामाजिक समावेशनाची पद्धती आहे. हे लोक वाटेल त्या बाह्य समाजाशीं शरीरसंबंध करीत व वाटेल त्या बाह्य समाजास वावरूं देत. त्यामुळें, ह्या समाजांतील वंशशुद्धि भ्रष्ट होऊन मूळचे जाज्वल्य गुण– कीं ज्यांच्या जोरावर ह्यांनीं राज्यें उभारलीं– बाह्यांच्या बेसुमार मिश्रणानें फिके व विरल झाले. हें गुणवैरल्य इतक्या थोरल्या प्रमाणावर झालें कीं, बाह्य व बाह्यज संकर ह्यांच्या गर्दीत मूळची गुणी प्रजा वितळून गेली. आणि ती इतकी निखालस वितळून गेली कीं, नांवाखेरीज तिचें मूर्त रूप राहिलें नाहीं. अशी नामशेषता आर्यावर्तांतील आर्यांच्या वांट्यास आली नाहीं, हें जगजाहीर आहे, आर्यांजवळ अशी कोणती जडीबुट्टी होती कीं जिच्या जोरावर ते आज आठ-दहा हजार वर्षें समाजरूपानें जसेचे तसे कायम आहेत ? ही जडीबुट्टी दुसरी तिसरी कोणतीहि नसून आर्यांनीं शोधून काढलेली जातिसंस्थेची कल्पना होय.

बाह्यांचें नियमन जातिसंस्थांत केल्यानें, बाह्यांच्या बीजक्षेत्राचें मिश्रण आर्य-समाजांत होत नाहीं. आर्यसमाजांत राज्यसंस्था जेव्हां प्रबल, समर्थ व कर्तृत्ववान् असते, तेव्हां बाह्यांच्या संसर्गापासून आर्यांच्या बीजक्षेत्राला इजा पोहोंचणें शक्यच नसतें. अशा ऐश्वर्याच्या कालीं जातिसंस्थेचें महत्त्व जसें ठळकपणें ध्यानांत यावें तसें येत नाहीं. आर्यवंश, आर्यसंस्कृति व आर्यविद्या प्रबल राजसंस्थेच्या बलावर टिकल्या कीं जातिसंस्थेच्या बलावर टिकल्या, याचा निर्णय ऐश्वर्यकालीं नीटसा करतां येत नाहीं. जातिसंस्थेच्या उपयुक्ततेची खरी परीक्षा, राजसंस्था विच्छिन्न होऊन आर्यसमाजाचें ऐश्वर्य जेव्हां लोप पावतें तेव्हां उत्तमोत्तम होते. स्वतंत्र राज्य-संस्था समूळ नष्ट झाली, तत्रापीहि जातिबद्ध आर्यसमाज बहुतेक ऐश्वर्यकालच्या इतकाच सुरक्षित व अभंग रहातो. असा प्रकार, आर्यसमाजाचें राज्ययंत्र बाह्यांच्या हातीं अनेक वेळां गेलें असतांहि, अनुभवास आला आहे, राज्ययंत्र परकीयांच्या ताब्यांत गेलें असतां, इतर समाज नष्ट व नामशेष झालेले आहेत. परंतु, अशा दुःस्थितींत आर्यसमाज टिकून रहातो. दोन हजार वर्षांपूर्वी शक, यवन, मेद, पार-सीक यांच्या हातांत आर्यसमाजांतील राज्ययंत्र गेलें होतें. त्या संकटांतून जातिबद्ध आर्यसमाज सुरक्षित व शाबूत बाहेर पडला. सातशें वर्षांपूर्वी आर्यसमाजाचें राज्ययंत्र मुसुलमानांच्या हातांत गेलें; त्याहि आपत्तींतून जातिबद्ध आर्यसमाज शाबूत निघाला. सध्यां इंग्रजांच्या हातीं हिंदुसमाजाचें राज्ययंत्र गेलेलें आहे. ह्याहि प्रसंगांतून हिंदुसमाज सुरक्षित बाहेर पडावयाचा जर असेल व अजीबात नष्ट व्हावयाचा नसेल, तर तेंहि श्रेय हिंदुसमाजाच्या जातिबद्धतेलाच द्यावें लागेल. अशी ही जातिसंस्था आजपर्यंत आठ दहा हजार वर्षें आपल्या अत्यन्त उपयोगी पडली आहे. बुद्धिभ्रंश होऊन, ह्या बहुगुणकारी संस्थेचा जर आपण साहसानें त्याग केला, तर इतर प्राचीन व अर्वाचीन समाजांप्रमाणेंच आपल्या वंशाचा, संस्कृतीचा, आचाराविचारांचा व समाजाचाहि नामशेषत्वापर्यंत विध्वंस होईल.

जातिमहिमा– यहुदी व पारशी

परकीय बाह्यांशीं शरीरसंबंध न करूं देणाऱ्या जातिसंस्थेचें हें समाजरक्षणाचें कार्य पृथ्वीवरील इतर जातिबद्ध समाजांतहि दृष्टयुत्पत्तीस आलें आहे. असे जातिबद्ध समाज म्हटले म्हणजे यहुद्यांचा व पारशांचा. पालेस्तैनांतील यहुद्यांचें राज्ययंत्र रोमन लोकांच्या हातीं जाऊन व त्याची स्वदेशांतून पृथ्वीच्या पाठीवर सैरावैरा उचलबांगडी होऊन, आज दोन हजार वर्षें झालीं. तत्रापि बाह्यांशीं शरीरसंबंध न ठेऊं देणाऱ्या जातिसंस्थेचा आश्रय केल्यामुळें, नांव सांगावयाला स्वदेश नसतां व संरक्षण करणारें स्वराज्य नसतां, यहुद्यांची निर्भेळ जात अद्याप यहाव्हाची करुणा भाकतांना देशो-देशीं मूर्तिमंत दृष्टीस पडते. पारशांचा देश गेला व स्वराज्य गेलें, परंतु हिंदूंच्या

संसर्गानें व स्वतःच्या नैसर्गिक मनोरचनेनें प्रोत्साहित होऊन जातिसंस्था झाल्यामुळें जरदुष्ट्राची संस्कृती अद्यापहि जीव धरून आहे. ह्या दोन दाखल्यावरून जाति-संस्थेंत काय सामर्थ्य आहे तें स्पष्ट होतें.

जातिमहिमा-परसमाजरक्षण

जातिसंस्था आपत्कालीं स्वसमाज संरक्षण करण्यास उपकारक होते, हें वरील उदाहरणावरून प्रत्ययास येतें. संपत्कालीं जातिसंस्थेचें कार्य काय, याचा तपशील मागें बराच दिला आहे. तत्रापि, एक बाब त्या तपशिलांत द्यावयाची राहिली आहे. ती ही कीं, संपत्कालीं जातिसंस्था परसमाजाचें संरक्षण करत्ये. संपत्कालीं आर्यांना जे अनार्य बाह्य समाज भेटले त्यांचा सत्यानाश, मनांत दुष्टबुद्धि असती तर युरो-पियनांनीं अमेरिकन इंडियनांचा जसा केला तसा, आर्यांना खचित करतां आला असता. परंतु असलें अमानुष कृत्य न करतां, आर्यांनीं अनार्यांवर जातिसंस्थेचें गरम पांघरूण घातलें आणि त्यांच्या संस्कृतीचें व समाजाचें संरक्षण केलें. सारांश, आप-त्कालीं स्वसमाजसंरक्षण व संपत्कालीं परसमाजसंरक्षण, अशी दोन कार्यें जातिसंस्था साधते.

जातिसंस्थेवरील आक्षेपाचें निराकरण


जातिसंस्था आपत्कालीं व संपत्कालीं उपकारक होते, जातिसंस्था निकृष्ट समा-जांना मारक न होतां तारक होते, जातिसंस्थेचे सुष्ट गुण यद्यपि एकवार कबूल केले, तत्रापि जातिसंस्थेनें समाजाला मांद्य येतें, त्याच्या अंगीं स्थितिस्थापकत्व रहात नाहीं व समाजाची प्रगति व उन्नति होत नाहीं, इतकेंच नव्हे तर, हजारों वर्षांपूर्वी जी बरीवाईट स्थिति असते तीच हजारों वर्षांनंतर तशीच कायम रहाते, वगैरे आक्षेप जातिसंस्थेवर घेतलेले सर्वांच्या पहाण्यांत आहेत. जातिसंस्थ समाज आपल्या ठिकाणीं सारखे कुजत व कुचंबत पडलेले असतात, हें दूषण युरोपियन लोकांनीं गेलीं तीनशें वर्षें हिंदुसमाजाला लावलेलें सर्वांच्या परिचयाचें आहे. तेव्हां ह्या आरोपांत कितपत तथ्य आहे, तें पाहिलें पाहिजे. हिंदुस्थानांत शुद्ध आर्य जाती, आर्य संकर जाती, आर्यानार्य अंत्यज जाती व शुद्ध अनार्य जाती, असे जातींचे चार वर्ग आहेत. पैकीं प्रत्येक वर्ग गेल्या दोन अडीच हजार वर्षांत कितपत प्रगत किंवा प्रतिगत होता, तें पाहूं.

शुद्ध आर्य जातींतील ब्राह्मणांकडे शास्त्राध्ययन व शास्त्राध्यापन हें काम असे. व्याकरणशास्त्र, न्यायशास्त्र, पूर्वमीमांसाशास्त्र, वेदान्तशास्त्र, अलंकारशास्त्र, गणित-शास्त्र, ज्योतिषशास्त्र, रसायनशास्त्र, धर्मशास्त्र, वैद्यक, इत्यादि शास्त्रांत शक बाराशें पर्यंत जातिबद्ध ब्राह्मणांनीं मोठें अपूर्व शोध केलेले सर्वप्रसिद्ध आहेत. शुद्ध आर्य-

जातींतील क्षत्रियांपैकीं कंबोजोत्पन्न कुरूनें (ज्यांस इंग्रज Cyrus म्हणतात) यूरपपासून पंजाबापर्यंतचा प्रदेश आपल्या साम्राज्यांत आणिला. ह्या कुरूला असुरांच्या इष्टिकालेखांत कंबुजीय म्हणून म्हटलेलें आहे. तदनंतर चालुक्य, राष्ट्रकूट, उत्तरचालुक्य, यादव, गुप्त, परमार, इत्यादि क्षत्रियकुलांत मोठमोठे पराक्रमी चक्रवर्ती राजे शक १२०० पर्यंत होऊन गेले. ह्याच कालांत कुबेरतुल्य वैश्याधिपतींनीं सर्व पृथ्वीभर आपल्या व्यापाराचें जाळें पसरिलें होतें, आणि शुद्ध आर्यशूद्र हे ह्या तिन्ही आर्य जातींचे विश्वासुक सेवक होते. अपूर्व शास्त्रीय शोध करणें, मोठमोठीं साम्राज्यें उभारणें, व सर्व पृथ्वीचा व्यापार नियंत्रिणें हीं तीन कृत्यें करणाऱ्या शुद्ध आर्य जातींवर मांद्याचा व अप्रगततेचा आरोप करणें खचित शोभणार नाहीं.

शुद्ध आर्य संकरजातींकडे उद्योगधंदे व कलाकुसरीचीं कामें असत. त्या धंद्यांतील व कलाकुसरींतील उत्कृष्टतेची व प्रगतीची साक्ष शक बाराशें पर्यंतचीं लेणीं, देवालयें, मूर्ति, जयस्तंभ, स्तूप, संध्यामठ, अलंकार, भांडीं, उपकरणीं, कापडें, किल्ले, कोट, गढ्या, घाट, ताम्रपत्रें, शिलालेख, वगैरे अद्यापहि प्रत्यक्ष व ग्रंथोल्लेखद्वारा देत आहेत. ज्या संकरजातींतील शिल्प्यांनीं असली आश्चर्योत्पादक सृष्टि निर्माण केली, त्या संकरजातींवर मांद्याचा आरोप अंध व धूर्त ह्यांखेरीज इतर कोणी प्रांजल मनुष्य करूं धजणार नाहीं. अनार्योत्पन्न संकरजातींकडे त्यांच्या मगदुराला व स्वभावाला साजतील असे अशुची धंदे दिलेले होते. ते धंदे करतां करतां त्यांचें अनार्यत्व आस्ते आस्ते लोप पावून पूर्ण हिंदुत्वाची पदवी त्यांनीं शक १२०० पर्यंत गांठली. रानटीपणांतून सुधारलेल्या अवस्थेंत येणाऱ्या व आलेल्या ह्या आर्यानार्य अंत्यज जातींस मंदगति कसें म्हणतां येईल ?

राहतां राहिल्या शुद्ध अनार्य जाती. यांची रानटी स्थिति यद्यपि अद्यापि बरीच राहिली आहे, तत्रापि ह्याहि जाती शेतकी वगैरे उच्च धंदे करूं लागल्या आहेत. आर्यांच्या संगतीनें ह्याहि अनार्य जाती आस्ते आस्ते प्रगती करीत आहेत. खरें पहातां, त्यानीं साधिली हीच प्रगती आश्चर्यकारक आहे. आस्ट्रेलिया, पाटेगोनिया, मध्य आफ्रिका, वगैरे खंडांतील युरोपियनांच्या संसर्गास ज्या रानटी जाती आहेत त्यांच्या मानानें हिंदूंच्या शेजारास असलेल्या अनार्य जाती खरोखरच भाग्यवान् समजल्या पाहिजेत. युरोपियन संसर्गाची बाधा होऊन आस्ट्रेलिया, अमेरिका व आफ्रिका यांतील रानटी समाज कित्येक नष्ट झाले, कित्येक क्षीण झाले व कित्येक गुलाम झाले. तें दुर्भाग्य हिंदुस्थानांतील अनार्यांच्या वांट्यास न येतां, आस्ते आस्ते मगदुराप्रमाणें प्रगतीचा मार्ग क्रमण्यास त्यांना इतरत्र अश्रुतपूर्व अशा सवलती हिंदूंच्या दयाभूतपणानें मिळाल्या आहेत. अशा ह्या बाराव्या शतकापर्यंतच्या जातिसंस्थ हिंदूसमाजाला मंद व मृत कोणत्या तोंडानें म्हणावें ?



मुसलमानांची पूर्वपीठिका व त्यांचा भारतांतील विजय।

हिंदू समाज मंद व मृत किंवा मुमूर्षुवत् जो दिसूं लागला तो शक १२०० च्या पुढील काळांत लागला. उत्तरहिंदुस्थानांत शक हजार पर्यंत व दक्षिण हिंदुस्थानांत शक १२ शें पर्यंत सर्व समाज जातिबद्ध होता. तदनंतर जातिसंस्थ नसलेल्या आयुधजीवी मुसुलमान संघांची हिंदुस्थानांत प्रवेशना होऊन कायमची स्थापना झाली. जातिसंस्थ हिंदू समाजाच्या देशांत, खरें पाहतां, अजाति मुसुलमानांची कायमची स्थापना होणें अशक्य असावयास पाहिजे होतें, कारण, जातिरूप धारण केल्याशिवाय, कोण्याहि बाह्याला हिंदू देशांत कायमची राहण्याची सोय नसे. असा दंडक असतां मुसुलमानधर्मी आयुधजीवी संघांची कायमची स्थापना हिंदुस्थानांत कशी झाली ? हा सामाजिक प्रश्न सोडविण्यास ह्या संघांचा पूर्वेतिहास लक्षांत घेतला पाहिजे.

पश्चर्वादि आयुधजीवी संघांचा पाणिनीनें आपल्या सूत्रांत उल्लेख केला आहे. शकयवनादींचा उल्लेख कात्यायनानें आपल्या वार्तिकांत केला आहे. नंतर पल्हव, पारसीक, मेद इत्यादि आयुधजीवी संघांचा उल्लेख शिलाताम्रपट व नाणीं यांत येतो. ह्या पर्शु, शक, यवन, पल्हव, मेद, पारसीक वगैरे आयुधजीवी संघांचा सुळसुळाट भारतवर्षांत नंदांच्या राजवटीनंतर इतका झाला कीं, मौर्यांच्या राशियतीच्या अंतास, ह्यापैकीं कित्येकांनीं पश्चिम, मध्य व उत्तरपश्चिम हिंदुस्थानांत राज्यें केलीं. हे आयुधजीवी संघ हिंदुस्थानांत प्रथम भाडोत्री शिपाई म्हणून आणले गेले. ह्या भाडोत्री शिपायांच्या संघांना स्वतःची शक्ति कळून आल्यावर राज्ययंत्राचा ताबा त्यांनीं सहजच घेतला. नंदांच्या कालीं क्षत्रियांचा निःपात करण्याच्या कामीं ह्या आयुधजीवी संघांचा उपयोग क्षत्रियेतर नंदमौर्यादि राजांनीं करून घेतलेला असावा, असा माझा तर्क आहे. कारण, क्षत्रियांखेरीज, दुसरी लढवय्यी जाति हिंदूसमाजांत त्या कालीं नव्हती. क्षत्रियांची जाति हतबल झाल्यावर चंद्रगुप्तादि पराक्रमी वृषलांच्या व्यवस्थित अमदानींत ह्या आयुधजीवी संघांनीं विशेष गडबड केली नाहीं. वृषल म्हणजे शूद्र जे मौर्य त्यांचें तेज जसजसें पुढें लोपत चाललें, तसतशी या संघांनीं उचल करून शेवटीं राज्ययंत्रांचें आक्रमण केलें.

ह्याच सुमारास दक्षिणेंत आंध्रभृत्य ऊर्फ शातवाहन यांचा उदय होऊन, शकयवनादि आयुधजीवी संघांच्या राजांचें शातवाहनांच्या हस्तें उच्चाटण झालें. आयुधजीवी संघांच्या राजवटींत चातुर्वर्ण्याला बराच धक्का बसला. त्याचें निर्मार्जन शातवाहनांनीं केलें. आपण चातुर्वर्ण्याची पुनः संस्थापना केली, अशी प्रौढोक्ति एका पराक्रमी शातवाहन राजानें केलेली शिलालेखांत नमूद आहे. शातवाहनांचें तेज कांहीं कालानें शकाच्या दुसऱ्या शतकांत फिकें झाल्यावर, शक, हूण, पल्हव, वगैरे

आयुधजीवी संघांनीं पुनः उचल करून सुमारें तीनशें वर्षें ह्या देशांत अराजक माजविलें. ह्या आयुधजीवीसंघोत्पन्न अराजकाचा मोड शकाच्या चवथ्या पांचव्या शतकांत उत्तरेस गुप्तांनीं व दक्षिणेस चालुक्यांनीं करून, पुनः हिंदुस्थानांत चातुर्वर्ण्याची घडी बसविली.

इतक्यांत शातवाहनशकाच्या साहाव्या शतकांत महंमदानें जो मुसुलमान धर्म काढिला त्याचा अंगीकार शक, पल्हव, पारसीक, मेद, कंबोज, बाल्हीक वगैरे लोकांनीं केला. मोगल, पठाण, इराणी, अफगान, वगैरे सर्व मुसुलमान ह्या शक, पल्हव, बाल्हीक, मेद, पारसीक, कंबोज वगैरे आयुधजीवी संघांचे वंशज होत. तात्पर्य, मुसुलमान म्हणजे दुसरे तिसरे कोणी अज्ञातपूर्व लोक नसून धर्मान्तर केलेले पूर्वीचे शकयवनादि आयुधजीवी संघच होत. ह्या आयुधजीवी संघांना चालुक्य, राष्ट्रकूट, यादव वगैरे राजे आपल्या सैन्यांत ठेवीत. यवनादि म्लेंच्छ लोकांच्या पलटणांचा व मशिर्दींचा उल्लेख साहाव्या शतकापासून तेराव्या शतकापर्यंतच्या कित्येक संस्कृत ग्रंथांत व शिलालेखांत केलेला आढळतो. हिंदु राजांच्या सैन्यांत राहिलेल्या ह्या आयुधजीवी मुसुलमान संघांना आपली स्वतःची शक्ति कळून येऊन, अन्योन्य मत्सरानें ग्रस्त झालेल्या उत्तरहिंदुस्थानांतील व दक्षिणहिंदुस्थानांतील क्षत्रियांपासून त्यांनीं या देशांतील राज्ययंत्र हिरावून घेतलें. मुसुलमान संघांचा असा हा स्थूल पूर्वेतिहास आहे. हे संघ या देशांत अकराव्या बाराव्या शतकापर्यंत कायमचे राहिलेच नाहींत. भाडोत्री शिपाईपणा करण्याची त्यांची हंगामी वृत्ति असे. अर्थात् ग्रामसंस्थांत किंवा नगरसंस्थांत कायमची वृत्ति मिळून जातिरूपानें हिंदूसमाजाचा अवयव बनण्यास ह्यांना बराच काल कारणच पडलें नाहीं. हे संघ सैन्याच्या कटकांत रहात व ह्यांची वसती हिंदुस्थानांत हंगामी आहे, अशी समजूत होती. हे हंगामी आयुधजीवी संघ अंतस्थ यादवीच्या प्रसंगीं राज्ययंत्र काबीज करतात, ह्याचा अनुभव आर्यांना यद्यपि दोन चार वेळां आला होता, तत्रापि अन्योन्यमत्सराच्या आवेशांत ही बाब आर्यक्षत्रिय विसरून जात. ह्या मत्सरोत्पन्न स्मृतिभ्रंशामुळें, हंगामी मुसुलमानांची ह्या देशांत राज्ययंत्र काबीज केल्यावर कायमची वसती झाली. ह्या कायमच्या वसतीचा परिणाम शक अकराशें पासून शक सोळाशें पर्यंत उत्तर हिंदुस्थान व शक बाराशें पासून शक पंधराशेंपर्यंत दक्षिण हिंदुस्थान अनुभवीत होते.

मुसलमान उत्पाताचा परिणाम

पश्चर्वसुरशकयवनोत्पन्न असे जे हे अरब, इराणी, मोगल, वगैरे मुसुलमान त्यांच्या स्वभावांत व कृतींत महंमदाचा धर्म स्वीकारल्यामुळें मोठें स्थित्यंतर झालें होतें. असुर्या देशांतील जे असुर लोक त्यांची संस्कृती व स्वभाव इष्टिकालेखांवरून कळून येतो. हे असुर लोक पराकाष्ठेचे क्रूर व निर्दय असत. हस्तगत झालेल्या

शत्रूंचे डोळे काढणें, दांत उपटणें, कातडी सोलून काढणें, वगैरे अमानुष प्रकार ह्या लोकांत असत. महंमद ज्या अरब लोकांत जन्मला त्या लोकांनीं ही असुर संस्कृती व हा असुर स्वभाव पूर्णपणें आत्मसात् करून घेतलेला होता. पश्चिम आशियांतील ज्या ज्या समाजानें महंमदाचा धर्म स्वीकारिला, तो तो समाज ह्या असुर संस्कृतीनें कमजास्त भिनून गेला. असे हे मुस्लिम धर्म स्वीकारलेले लोक हिंदुसमाजांत जात न बनवितां जेव्हां कायमचे राहिले आणि त्यांच्या हातीं सर्व राजसत्ता जेव्हां गेली, तेव्हां हिंदूंच्या विद्या, कला, धर्म, शास्त्रें, व शिल्पें हीं सर्व स्तब्ध, मलिन व छिन्नभिन्न झालीं. बाह्य असा जो जातिसंस्थाविहीन मुसुलमान समाज त्यांशीं झगडतां झगडतां, विद्या, कला, शास्त्रें व शिल्पें ह्यांची प्रगती करण्यास आर्यसमाजास अवकाशच मिळाला नाहीं. ह्या मुसुलमान काळांत हिंदूसमाज मंद, मुमूर्षू व स्तब्ध असा दिसूं लागला. एतत्संबंधक विस्तार ज्यास पहावयाचा असेल त्यांनीं तो रामीरामदास व रामदास यांच्या लेखांत पाहावा. हिंदूसमाजांत ही विद्यादिक्षेत्रांत मंदता व स्तब्धता जी आली ती मुसुलमानी उत्पाताचा परिणाम आहे, जातिसंस्थेचा परिणाम नाहीं. मुसुलमानी अंमलांतील हिंदूसमाजाची ही विद्यादिविषयक स्तब्धता पाहून व मुसुलमानपूर्व क्षत्रियांच्या अंमलांतील जातिसंस्थ हिंदूसमाजाच्या विद्यादि-विषयक अपूर्व प्रगतीकडे कानाडोळा करून, कित्येक टीकाकार नितांत उपकारक अशा जातिसंस्थेला अपकारक समजतात, परंतु, त्यांची ही परीक्षा सर्वस्वी अयुक्त आहे, हें वरील कार्यकारणोद्घाटणेवरून निःसंशय सिद्ध होतें.

मुसलमान अमदानींतील जातिसंस्था

अजाति मुसुलमान भारतवर्षांत कायमचे राहिल्यानें हिंदूंच्या जातिसंस्थेच्या समाजसंरक्षणविषयक उपयुक्ततेची चांगलीच साक्ष पटली. शुद्ध आर्य जाति, आर्य संकर जाति, आर्यानार्यसंकर अंत्यज जाती व अनार्य जाती, असे जे जातींचे चार वर्ग त्यांपैकीं पहिल्या दोहोंचा बाह्यांशीं शरीरसंबंध झाला नाहीं. त्यामुळें ते दोन वर्ग जसेचे तसे शुद्धबीजक्षेत्र राहिले. अंत्यज जातींतून व अनार्य जातींतून मात्र शरीरसंबंधद्वारा किंवा धर्मान्तरद्वारा अनेक व्यक्ती मुसुलमान झाल्या. त्यांतल्या त्यांत वृत्तिवंत जे अंत्यज व अनार्य होते, ते बिलकुल बाटले नाहींत. त्यांची बीजक्षेत्रशुद्धि जशीची तशीच आजपर्यंत आहे. अंत्यजांपैकीं व अनार्यांपैकीं उल्लू, उपरि, उनाड व उच्छृंखल अशा व्यक्ति मात्र धर्मांतर करून मुसुलमान समाजांत सामील झाल्या. बाकीचा सर्व हिंदुसमाज निकृष्ट संस्कृतीच्या, वंशाच्या व आचाराच्या मुसुलमान समाजाच्या भ्रष्ट स्पर्शापासून अलिप्त व सुरक्षित राहिला. शुद्ध आर्यजातींपैकी दक्षिणेंत द्रव्य-लोभास्तव वैश्यवर्गाचा जुलमी मुसुलमानांच्या छळानें परिपूर्ण उच्छेद झाला. तो इतका कीं, शिवकालीं दक्षिणेंत पुनः स्वराज्य व जातिसंस्था यांचें पुनरुज्जीवन

करण्याच्या प्रसंगीं गुजराथ, मारवाड या देशांतून गांवगन्ना व्यापार करण्यास गुजराथी व मारवाडी वणिग्वर्ग महाराष्ट्रांत बोलवावा किंवा येऊं द्यावा लागला. ब्राह्मणक्षत्रियांतून वतनाकरितां कांहीं व्यक्ती बाटल्या, परंतु अशांची संख्या अल्पस्वल्प होती. धर्म, शास्त्रें, विद्या, कला व आचार इत्यादि संस्कृतीचे आधार-स्तंभ ज्या ब्राह्मणक्षत्रियादि शुद्ध आर्य जाती व आर्यसंकर जाती त्या बीजक्षेत्रानें शुद्ध राहिल्यामुळें, मुसुलमान उत्पातापासून आर्यसंस्कृतीचा समूळ उच्छेद झाला नाहीं. हिंदुस्थानांतल्या सारख्या इराणांत, अफगानिस्तानांत व बलूचिस्तानांत जाति-संस्था त्या त्या कालीं नसल्यामुळें, मुसुलमान उत्पातापुढें त्या त्या देशांतील मूळची संस्कृती व समाज जसा नष्ट झाला, तसा हिंदुस्थानांत झाला नाहीं, याचें कारण हिंदूसमाजाची जातिसंस्था होय. हिंदूलोक जातिसंस्थ जोपर्यंत आहेत, तोपर्यंत बाह्यांचे कितीहि व कोणतेहि उत्पात जरी आले तरी त्यामुळें त्यांच्या शुद्ध समाजत्वाचा व संस्कृतीचा भंग होत नाहीं. उलटा उत्पातकांच्या समाजांत व संस्कृतींत मात्र फरक होतो.

मुसलमानांचें दौर्बल्य

पर्शु, असुर, शक, यवन, मेद, पारसीक, वगैरे आयुधजीवी संघ आर्यांच्या प्रमाणेंच पंचमहाभूतांचे व मूर्तीच उपासक असल्याकारणानें, हिंदू जातिसंस्थ पडल्यामुळें, पश्वादींचे संघ बाहेरून वृद्धिंगत न होता, हिंदूसमाजांत जातिरूप धारण करून कालान्तरानें हिंदुसम झाले किंवा क्षय होऊन नष्ट झाले. शकादींचे वंशज जे मोगलादि संघ त्यांनीं महंमदी धर्म स्वीकारल्यावर, त्यांच्यांत बाह्यांचें झटपट समावेशन करून घेण्याची शक्ति आली. मुसुलमानांची ही समावेशनशक्ति हिंदू-समाजाला दिसण्यांत जरी मारक दिसते, तरी परिणामीं ती तशी नसून, उलट मुसुलमान समाजालाच मारक व शक्तिक्षयकारक झाली. आयुधजीवी मुसुलमान संघांची संस्कृती मूळचीच आर्यसंस्कृतीहून निकृष्ट होती. तशांत धर्मान्तर करून हिंदूसमाजांतील जे लोक मुसुलमानसमाजांत शिरले तेहि निकृष्ट अशा आर्यानार्य अंत्यज व शुद्ध अनार्य जातींतील असल्यामुळें, यद्यपि बाट्यांच्या संख्येनें मुसुलमान लोकसंख्या फुगून गेली, तत्रापि सामर्थ्यानें समाजकार्यें करण्याची मुसुलमानांची शक्ति ह्या फुगीनें वाढण्याच्या ऐवजीं बेसुमार क्षीण मात्र झाली. बाट्यांच्या अधिकतर लोक-संख्येच्या निकृष्टपणाची दाट छाया मुसुलमान समाजावर पडली. ह्या निकृष्ट फुगीचा परिणाम असा झाला कीं, मुसुलमानी राशियतींतहि जातिबद्ध ब्राह्मणक्षत्रियांच्या हातीं राज्यकारभाराचीं सर्व सूत्रें कालान्तरानें गेलीं. मूळच्या आयुधजीवी मुसुलमान संघानें हिंदूच्या अंगावर बेमुरवत तुटून पडून राज्ययंत्र आक्रमिलें होतें. हाच गुण मुसुलमान बाट्यांनींहि उचलला. अंतस्थ यादवीनें विस्कळित होऊन, ब्राह्मण-

ठाणे ग्रंथ संग्रहालय, ठाणे. [illegible]
अनुक्रमांक 23364 दि: [illegible]
ग्रंथांक 9937 नोंद दि: 25/11/94

क्षत्रियादि हिंदूजाती क्षीण व सौम्य राहिल्यामुळें बेमुरवत तुटून पडण्यानें मुसुलमानांनीं आपलें वर्चस्व चांगलें राखिलें.

परंतु परराज्याखालीं हिंदूंतील यादवी थंड पडून, शत्रूच्या आंगावर जीवाकडे न पाहतां बेमुरवत तुटून पडण्याचें मुसुलमानांचें वर्म जेव्हां हिंदूंच्या ध्यानांत आलें व तें आचरणांत आणण्याचा जेव्हां हिंदूंनीं उपक्रम केला, तेव्हां मुसुलमानांच्या हातचें राज्ययंत्र शिवकालीं व रामदासकालीं पुनः हिंदूंच्या हातीं आलें. जीवाकडे न पाहतां बेमुरवत शत्रूवर तुटून पडणें हें एकच काय तें गुणाधिक्य मुसुलमानांमध्यें होतें. बाकीच्या कर्तृत्वाच्या सर्व गुणांत हिंदू मुसुलमानांहून वरचढ होते. शत्रूंच्या आंगावर तुटून पडण्याचें हें गुणाधिक्य हिंदूंनीं आपलेसें केल्याबरोबर निकृष्ट संस्कृतीच्या मुसुलमान समाजाची रग मोडली. सध्यां हिंदुस्थानांतील मुसुलमानांची एकंदर सर्वसाधारण संस्कृती अंत्यजांच्या संस्कृतीहून फारशी वरचढ नाहीं. कारण, अंत्यजोत्पन्न बाटयांचीच संख्या मुसुलमानसमाजांत बेसुमार अधिकतम आहे. सध्यां तर मुसुलमान समाज दक्षिणेंत बहुतेक जातिसंस्थ झाला आहे. व त्यांच्यापैकीं अनेक लोक ग्रामसंस्थांत काजी, मुलाणा, तांबोळी, हलालखोर, मोमीन, बोहरी, वगैरे पिढीजात वृत्त्या व धंदे करून आहेत. कित्येक मुसुलमान गणपति, विठोबा यांचे भक्त असून कित्येक पूर्ण अद्वैती, वेदान्तमार्गी बनले आहेत. अलीगड वगैरे ठिकाणीं हिंदुमय बनलेल्या मुसुलमानांची शुद्ध इस्लामी धर्माकडे प्रवणता करण्याची खटपट चालली आहे. ती कितपत यशस्वी होते, तें कालान्तरानें दिसावयाचें आहे.

पोटजाति व संकरजाति बुजवून टाकण्याची आवश्यकता

जातिसंस्था करून बाह्यांचा समावेश करून घेण्याचा हिंदूसमाजाचा असाधारण स्वभाव आहे. हा स्वभाव भिन्न मत, भिन्न आचार व भिन्न प्रांत, ह्यांनीं हिंदूंच्या जातींत किंचित् महत्त्वाचा फरक झाला तरीहि दिसून येतो. बौद्ध, जैन, लिंगायत, ब्राह्मो, प्रार्थनासमाजी व आर्यसमाजी ह्यांच्या पृथक् जाती धर्ममतभेदामुळें होऊन, सनातनधर्मी हिंदू यांना पाखंडजातींत गणतात. सवाशे, तिरगुळ वगैरे पोटजाती ब्राह्मणांत झाल्या आहेत त्या आचारभिन्नतेचीं फळें आहेत. कोंकणस्थ, कऱ्हाडे, देशस्थ, औदिच्य, गौड, मैथिल वगैरे ब्राह्मणांच्या पोटजाती प्रांतभेदानें बनल्या. इतर वर्णांत व संकरांतहि मतें, आचार व प्रांत ह्यांनीं पोटजाती निर्माण झालेल्या प्रसिद्ध आहेत. मतादिभेद झाला असतां, वृथा तंडत व फुंजत न बसतां, निराळी पोटजात करून सुखानें इष्ट भेदाचा उपभोग घेण्याची हिंदूसमाज परवानगी देतो. पोटजातींत विशेष भिन्नता नसेल, तर शरीरसंबंध होतात. उदाहरणार्थ, माळवाले व जैन गुजराथी वाणी. भिन्नता उत्कट भासली, तर शरीरसंबंध बंद पडतो.

अशा शेंकडों पोटजाती हिंदूसमाजांत झाल्या आहेत व त्या होऊन आतां शेंकडों वर्षें लोटलीं आहेत. भिन्नतेची उत्कटताहि कमी कमी भासूं लागली असून, कित्येक पोटजातींतून भेदाच्या कारणाची स्मृतिसुद्धां बुजून गेली आहे. अशा स्थितींत पोटजाती मोडून जाण्याकडे प्रवृत्ति व्हावी, हें रास्तच आहे. लवकरच मतांमुळें, आचारांमुळें व प्रांतांमुळें, झालेल्या सर्व पोटजाती एक होतील, असा रंग दिसतो. शुद्ध आर्यसंकर जातीहि, शेंकडों पिढ्या बीजक्षेत्रशुद्धि राखून, मूळ पित्याच्या वर्णाला परत जाण्याला योग्य झाल्या आहेत. त्या साक्षर व विद्यावंत झाल्या, म्हणजे मूळ वर्णांत हिंदूसमाज त्यांस आनंदानें घेईल, यांत संशय नाहीं. शुद्ध आर्य जातींतील पोटजाती व शुद्ध आर्यसंकर जाती चातुर्वर्णिकांच्या बीजक्षेत्राच्या व हाडामांसाच्या आहेत. मनूनें व याज्ञवल्क्यानें आज्ञापिलेल्या तीन पिढ्याहून, पांच पिढ्याहून, व सात पिढ्याहून किती तरी जास्त पिढ्या ह्यांची तपश्चर्या झालेली आहे. तेव्हां आतां, ह्या पोटजातींना व संकरजातींना मूळ वर्णांत परत घेण्याची व ह्यांची उन्नति होऊं देण्याची वेळ होऊन चुकली आहे. हें काम चातुर्वर्णिकांची महाधर्मसभा जेव्हां स्थापन होईल, तेव्हां सदयतेनें हटकून घडून येईल. आतांपर्यंत जाती, पोटजाती व शुद्ध संकरजाती जातींतल्या जातींत राहून उच्च वर्णांचे धर्म ग्रामोपाध्यायांच्या अनुमतीनें स्वीकारून, आपल्या जातींची उन्नति आस्ते आस्ते करीत आहेत.

कायस्थादि कित्येक संकरजातींना वेदोक्त संस्काराधिकार न दिल्यामुळें, मोठे राजकीय उत्पात घडलेले आहेत. शूद्र व अंत्यज ह्यांना ब्राह्मणक्षत्रियादींचा आचार, धर्म, विद्या, इतिहास, भक्ति, वेद व वेदान्त ह्यांचा लाभ न झाल्यामुळें, शातवाहन-शकाच्या बाराव्या शतकांत मोठी सामाजिक खळबळ उडून महानुभाव, लिंगायत वगैरे पाखंडें जन्मास आलीं आणि शूद्र व अंत्यज ह्या जातींतील अवाढव्य लोक-संख्येचा पाठिंबा ब्राह्मणक्षत्रियांचा जाऊन, मुसुलमानांच्या हातीं राज्ययंत्र गेलें. अशा संकटसमयीं ज्ञानदेवादि साधुसंतांनीं शूद्र व अंत्यज यांना संस्कृत इतिहास, वेदान्त, भक्ति, वगैरेंचीं द्वारें प्राकृत भाषेच्या किल्लीनें उघडून देऊन, जात्युन्नती नाहीं तर आत्मोन्नती करून घेण्याची सोय केली. अशा ह्या भक्त्यमृतानें आत्मो-न्नत झालेल्या शूद्र व अंत्यज जातींना जात्युन्नती करून देण्याचाहि उपक्रम आतां केला पाहिजे. अंत्यजांची जात्युन्नती कशी करावी, वगैरे प्रश्न प्रकृत समावेशनविषयक विवेचनाच्या किंचित् बाहेरचे असल्यामुळें, त्या प्रश्नांचा ऊहापोह विस्तारानें इतरत्र करणें युक्त होईल. येथें फक्त एका मुद्याचा उल्लेख मात्र करतों.

एकजिनसी हिंदूसमाज बनविणारें नवें धर्मशासन आवश्यक

आर्यसमाजांत गुणकर्मांवरून प्रथम वर्ण उत्पन्न झाले. वर्णभेदाची रूढि सार्वत्रिक होणार अशीं चिन्हें दिसतांच मन्वादि शास्त्रकारांनीं ती रुढि कायदा म्हणून

आपल्या धर्मग्रंथांत ऊर्फ कायद्याच्या पुस्तकांत नमूद केली. नंतर अन्योन्य शरीर-संबंध न करणाऱ्या जाती उत्पन्न झाल्या. त्यांचेंहि प्रख्यापन कायदा म्हणून जाति-विवेकादि-ग्रंथांत धर्मशास्त्रकारांनीं करून ठेवलें. आतां, जातींची व पोटजातींची मूळ वर्णाकडे परत जाण्याची समाजांत उत्कट इच्छा झालेली स्पष्ट दिसत आहे. ती इच्छा कायदा म्हणून धर्मग्रंथांत नमूद झाली पाहिजे, म्हणजे धर्मशास्त्रकारांनीं नूतन शासन निर्माण केलें पाहिजे. नूतन शासन निर्माण करण्याचा परिपाठ गेलीं चार-पांचशें वर्षें बंद पडला आहे; तो पुनरुज्जीवित करणें अत्यंत जरूरीचें झालें आहे. धर्मसभा शिथिल झालेल्या आहेत; त्या पुनः जाग्या करून, नूतन शासन करण्यास आरंभ केला पाहिजे. ह्या आरंभांत जो मुख्य मुद्दा लक्ष्यांत घ्यावयाचा तो हा कीं, जातिसंस्था हिंदूच्या मनोरचनेचा एक महत्त्वाचा भाग असून, ती त्यांच्या हाडामांसांत खिळलेली आहे व तिच्यामुळें त्यांचें पृथक् समाज म्हणून आज हजारों वर्षें संरक्षण झालें आहे. पोटजाती ह्या हंगामी मतादिभेदामुळें उत्पन्न झाल्याकारणानें, तो मतादिभेद कालान्तरानें शिथिल पडत चालला आहे, तेव्हां पोटजातींची आतां जरूर राहिली नाहीं. मुख्य जातींचाहि कल वर्णोन्नतीकडे स्पष्ट दिसत आहे. अशा स्थितींत वर्णोन्नति व धर्मोन्नति व आत्मोन्नति कायदेशीर रीतीनें हक्क म्हणून करून घेण्याचा अधिकार सर्व हिंदूजातींना दिला पाहिजे. हा अधिकार आस्तेआस्ते सर्व हिंदूजातींना अखेर प्राप्त होऊन, सर्व हिंदूसमाज एकजिनसी बनविला पाहिजे, हें निश्चित आहे. हा एकजिनसीपणा यद्यपि आला, तत्रापि मुसुलमान, यूरोपियन, चिनी, जपानी वगैरे एकवर्णी बाह्य समाजाशीं शरीरसंबंध करण्याचा हिंदूसमाजाला तिरस्कार आहे व तसा शरीरसंबंध करण्यापासून समाजसंरक्षणाला साहाय्य होत नाहीं, हें अनुभवानें हिंदूसमाज जाणतो.

भावी एकभाषी व एकजिनसी हिंदुराष्ट्र

रंग, चेहरा, संस्कृती वगैरे कारणें बाह्यांशीं शरीरसंबंध न करण्यास यूरोपियन लोकांना पुरीं होतात. सध्यां यूरोपियन लोक आफ्रिकन, चिनी, जपानी, हिंदू वगैरे बाह्यांच्या संबंधानें केवळ लखोटबंद जाती बनले आहेत. स्वतः एकजिनसी जाती बनून, आपण जातिबद्ध नाहींत, अशी हे लोक फुशारकी मारतात. म्हणजे आपण काय आहोंत व कोणती पद्धत स्वीकारीत आहोंत, हें ह्यांचें यांना अद्याप खुलासेवार स्पष्ट कळलेलें नाहीं. युनायटेड स्टेट्समध्यें एक कोट नीग्रो आहेत. ह्या नीग्रोशीं गोरे सरसहा शरीरसंबंध करीत नाहींत. कारण बीजक्षेत्रशुद्धी बिघडून अकर्माशी प्रजा निपजते. तेव्हां नीग्रो व गोरे अशा युनायटेड् स्टेट्स् मध्यें दोन मुख्य जाती असून, तिसरी इंडियनांची जात आहे हें उघड आहे. शिवाय, अकर्माशांची चवथी जात आहे ती बेगळीच. तात्पर्य, अमेरिकेंत जातिसंस्था अस्तित्वांत आल्या आहेत, इत-

कैंच कीं, त्या जाती आहेत, हें कबूल करण्यास तेथील लोकांस अद्याप धैर्य आलें नाहीं. सर्व मनुष्यप्राणी सारखे आहेत, सर्वांना सारखे हक्क असावेत, वगैरे स्थूल व अशास्त्र कल्पना युरोपियन लोकांत दृढ झाल्यामुळें विचार व आचार यासंबंधानें युरोपियनांत जमीन-अस्मानाचें अंतर असणें साहजिक आहे. यूरोपांतील सर्व ख्रिश्चनधर्मी व शुभ्रवर्णी लोक अन्योन्य शरीरसंबंध करतात. प्रांतभेदामुळें व भाषाभेदामुळें शुभ्रवर्णी व ख्रिश्चनधर्मी लोकांचीं भिन्न राष्ट्रें बनलीं आहेत. कधींतरी हजारों वर्षांनीं भाषाभेद नाहींसे होऊन युरोपांतील सर्व राष्ट्रें मिळून एक संयुक्तराष्ट्र होईल. युनायटेड स्टेट्समध्यें इंग्रज, आयरिश, फ्रेंच, जर्मन, स्विस्, इतालियन, पोलिश, ग्रीक, रशियन, हंगारियन, डेन, स्वीडिश, वगैरे सर्व राष्ट्रांतील लोक स्वभाषा दोन तीन पिढ्यांत सोडून देतां देतां एकजिनसी बनत आहेत. तोच प्रकार यूरोपांत अनुकरणानें व इतर बलवत्तर कारणांनीं होईल. हिंदुस्थानांतील बंगाली, हिंदी, पंजाबी, गुजराथी, मराठी, कानडी, तेलगू, तामील वगैरे सर्व हिंदूराष्ट्रें अमेरिकेंतल्याप्रमाणेंच भाषाभेद सोडून शेंकडों वर्षांनीं एकजिनसी बनतील. हा राष्ट्रीय एकजिनसीपणा येण्याच्या अगोदर एकभाषा बोलणाऱ्या एकेक राष्ट्रांतील पोटजाति व संकरजाति मोडून त्या त्या राष्ट्रांतील सर्व समाज एकजिनसी होईल. हा प्रकार आपल्या डोळ्यादेखत हिंदुस्थानांतील सर्व राष्ट्रांत आजमित्तीस चालू आहे. तो जोरानें व धिम्मेपणानें चालण्यास प्रोत्साहन देणें आपल्या हिताचें आहे. पोटजाति व संकरजाति मूळजातींत व मूळवर्णांत परत जाण्याचा हा स्वभावहि मर्यादेंत ठेविला पाहिजे. नाहींतर धर्मभिन्न, आचारभिन्न, संस्कृतिभिन्न, वंशभिन्न, व बीजक्षेत्रभिन्न अशा पृथ्वीच्या पाठीवरील वाटेल त्या निकृष्ट व उत्कृष्ट लोकांशीं शरीरसंबंध करण्याचाहि मोह उत्पन्न झाल्यावांचून रहाणार नाहीं. हा मोह आपल्या हिंदूपणाला सध्यां मारक आहे. आजवर पांच सातशें वर्षें मुसुलमानांशीं झगडा करून त्यांतून आपण यशस्वीपणानें पार पडलों. त्याला कारण आपली जातिबद्धता होय. यूरोपियनांशीं सध्यां गांठ पडलेली आहे, तींतूनहि सुरक्षितपणें बाहेर पडण्यास आपली एकजिनसी जातिबद्धता आपणाला चांगली उपयोगी पडेल. जातिबद्ध राहून मुसुलमानांचा आंगावर बेमुरवत तुटून पडण्याचा गुण आपण उचलला व मुसुलमानांच्या रानटी छापेंतून मुक्त झालों. युरोपियनांचा मुख्य गुण त्यांची भौतिक, मानसिक व सामाजिक शास्त्रसंपन्नता होय. एकजिनसी जातिबद्धता राखून ही शास्त्रसंपन्नता सध्यां आपणांस हस्तगत करावयाची आहे.

निबन्ध तात्पर्य

प्रस्तुत विवेचनांतील मुख्य मुद्दे स्मरणार्थ येणें प्रमाणें:-

(१) मुसुलमान बाह्यांचें सरमिसळ समावेशन करतात.

(२) युरोपियन रंगादिवरून निवडक सामाजिक समावेशन करतात.

(३) युरोपियन बाह्यांचें समावेशन बिलकुल होऊं देत नाहींत. बाह्य शेजारास आल्यास, त्यांचा समूळ नाश करतात. किंवा त्यांना गुलाम अगर गुलामवजा बनवितात.

(४) मुसुलमान व युरोपियन हे व्यक्तींचें समावेशन करतात.

(५) हिंदू जातिद्वारा समावेशन करतात.

(६) हिंदू बाह्यांचा नाश करीत नाहींत किंवा त्यांना गुलाम बनवीत नाहींत. बाह्यांच्या जाती करून त्यांची पृथक् स्थापना आपल्या शेजारीं प्रगत्यर्थ करतात.

(७) मत, आचार, प्रांत, इत्यादि भेदांस्तव हिंदू पोटजाती बनर्वितात.

(८) जातिसंस्थेनें कोणत्याहि समाजाला चिरंजीवित्व येतें.

(९) आपत्कालीं जातिसंस्था स्वसमाजसंरक्षक होते; आणि संपत्कालीं बाह्य-समाजसंरक्षकहि होते.

(१०) बीजक्षेत्रशुद्धि, वंशशुद्धि, संस्कृति, आचारशुद्धि, हीं जाती बनण्याचीं कारणें आहेत.

(११) पोटजाती मूळजातीला भेदलोपानें परततात.

(१२) जाती बीजक्षेत्रशुद्धीनें मूळ उच्चवर्णांना पोहोंचतात.

(१३) अशा परंपरेनें हिंदूंची एकजिनसी एक जाति भविष्यत्कालीं बनेल.

(१४) ही एकजिनसी हिंदूजाति मुसुलमान किंवा युरोपियन किंवा चिनी, जपानी, यांशीं शरीरसंबंध करून आपलें बीजक्षेत्र, वंश, संस्कृति व आचार स्वसंरक्षणार्थ बिघडवूं इच्छित नाहीं.

(१५) निवडक किंवा सरमिसळ समावेशनापेक्षां जातिद्वारा समावेशन सर्वप्रकारें बहुगुणकारी आहे.

(१६) इंग्रजादि युरोपियन लोक एकजाति व एकजिनसी बनून गेलेले आहेत. बाह्यांशीं एखादादुसरा शरीरसंबंध झाल्यानें, ह्यांची जातिबद्धता बिघडण्यासारखी आतां नाहीं.

(१७) मुसुलमान समाज एकजाति, एकवंशी किंवा एकजिनसी नाहीं. सर्व वर्ण, सर्व वंश, सर्व संस्कृति यांचे सरमिसळ मिश्रण ह्या समाजांत झालेलें आहे. ह्यांचा टिकाव येथून पुढें शास्त्रसंपन्न व एकजिनसी समाजांपुढें लागणें मुष्कील आहे. हा समाज यापुढें युरोपियनांचा गुलाम बनेल, मग त्या गुलामगिरीला वाटेल तें नांव पडो.

५

हिंदुस्थानांतील आर्य लोकांचा वर्ण

युरोपियनांचा वर्ण

पृथ्वीवरील कांहीं लोकांच्या कातडीचा रंग पांढरा, कांहींचा पिंवळा व कांहींचा तांबडा आढळतो. इंग्रज, स्कॉच, आयरिश, स्वीडिश, जर्मन, रशियन वगैरेंच्या कातडीचा रंग सर्वसाधारणपणें श्वेत, पांढरा ऊर्फ गोरा असतो. ह्याचा अर्थ असा नव्हे कीं, इंग्लंडांतील सर्वच माणसें सारखींच गोरीं असतात. गोरेंपण-गोरेपणांत अंतर असतें. गोरेपणाच्या नाना प्रति आहेत, असंख्य प्रति आहेत, असेंहि म्हटलें तरी चालेल. कोणत्याहि एका गोऱ्या माणसाच्या कातडीचा रंग कोणत्याहि दुसऱ्या गोऱ्या माणसाच्या कातडीच्या रंगाहून थोडा-फार भिन्न असतो. परंतु सर्वसाधारणपणें पहातां, इंग्लंडांतील मूळ रहिवाश्यांच्या कातडीचा रंग गोरा, असें म्हणतात. कित्येक पोर्तुगीज, फ्रेंच वगैरे लोक काश्मिरांतील काळसर गोऱ्या लोकांहून किंचित् जास्त गोरे पहाण्यांत आलेलें आहेत. इतालियन, ग्रीक वगैरे दक्षिण युरोपांतील लोकांचा रंग सर्वसाधारणपणें काळसर गोरा असतो. परंतु स्थूलमानानें ह्या सर्व लोकांच्या कातडीचा रंग पांढऱ्यांत काढिला जातो. एवढ्याचकरितां कीं, काळ्या, पिंवळ्या व तांबड्या रंगापेक्षां पांढऱ्याकडे ह्या लोकांच्या कातडीचा रंग जास्त कलतो.

पिवळे व ताम्रवर्णी लोक

चिनी, ब्रह्मी, तिबेटी, भूतानी, जपानी वगैरे लोकांच्या कातडीचा रंग, साधारणपणें, पिंवळट असतो. नीग्रो, हबशी, मिसरी वगैरे लोकांच्या कासडीचा रंग, साधारणपणें, काळा असतो, अमेरिकेंतील इंडियनांच्या कातडीचा रंग तांबडा असतो. ह्या तांबडेपणाची इयत्ता अशी. शंभर वर्षांपूर्वी आपणा मराठ्यांना जे इंग्रजादि लोक भेटत त्यांची गणना आपण ताम्रमुख, ताम्र या नांवानें करीत असूं, म्हणजे आपल्याला इंग्रजादि लोकांचा रंग तांबडा भासे. आपल्या डोळ्यांना तांबडे दिसणारे जे हे इंग्रज त्यांच्या डोळ्यांना अमेरिकेंतील इंडियन लोक इंग्रज लोकांहून तांबडे दिसत. इतके कीं, इंग्रजादींनीं ह्यांचें नांव Red Indians म्हणजे तांबडे इंडियन असें ठेविलें आहे व होतें. म्हणजे तांबड्या रंगाची इयत्ता, अर्थात् सापेक्ष आहे. मराठ्यांना इंग्रजादि तांबडे दिसत, पांढरे दिसत नसत,

परंतु इंग्रजांना आपण स्वतः पांढरे आहोंत असें वाटतें व त्याच्याहूनहि जे तांबडे त्या इंडियनांना ते तांबडे म्हणतात. आपण मराठे त्यांना कोणत्या रंगाचे म्हटलें असतें, कोण जाणें ? कदाचित् इंग्रजांची व Red Indian यांची गणना आपण तांबड्या लोकांत किंवा ताम्रवर्णी लोकांत करूं. त्यांतल्या त्यांत भेद करतां, इंग्रजांना पांढरट तांबूस व Red Indian ना खास ताम्र म्हणण्याकडे आपली प्रवृत्ति होते. तात्पर्य, आपल्या मराठी दृष्टीनें मानवी कातड्याच्या रंगाचें वर्गीकरण निराळें होतें, हें उघड आहे.

आपला वर्ण कोणता ?

आपल्या दृष्टीनें जसें इंग्रजांच्या कातडीच्या रंगाचें वर्णन निराळें होतें, तसें आपल्या मराठ्यांच्या व भारतीयांच्या कातडीचें वर्णन आपण मराठे जें करूं त्याहून इंग्रजादि लोक निराळें करतील, हें संभाव्य आहे. स्थूल दृष्टीच्या नवख्या इंग्रजांना आपला मराठ्यांचा रंग काळा दिसतो व ते आपणा मराठ्यांची गणना वर्णदृष्टीनें निग्रोच्या वर्गांत करतील, हें उघड आहे. परंतु, ही स्थूल दृष्टि झाली. आपणा मराठ्यांत कित्येक इतालियन व ग्रीक लोकांइतके गोरे आहेत व कित्येक निग्रोंच्या जवळजवळ काळे आहेत; परंतु निग्रोंच्या इतके कोळशासारखे किंवा शिश्वीच्या लाकडाइतके किंवा शाळिग्रामाइतके काळे नाहींत–म्हणजे आपल्या कातडीचा रंग शाळिग्राम इतका काळा नाहीं, व बर्फाइतका पांढराहि नाहीं. आपल्या कातडीच्या रंगांत काळ्याचीहि झांक मारते, पांढऱ्याचीहि झांक मारते, तांबड्याचीहि मारते व पिंवळ्याचीहि झांक मारीत नाहीं असें म्हणवत नाहीं. तात्पर्य, वर्तमानकालीन मराठे लोक म्हणून ज्यांना म्हणतात, ते धड काळेहि नाहींत, गोरेहि नाहींत, तांबडेहि नाहींत, व पिंवळेहि नाहींत. ह्या चार रंगांपैकीं कोणताहि एक रंग आपणा मराठ्यांच्या कातडीचा नाहीं. तर मग आपला रंग कोणता ? व त्याचें सर्वसाधारण नांव देतां येण्यासारखें असलें, तर कोणतें ?

आपल्या मराठ्यांच्या कातडीचा रंग सर्वसाधारणपणें कोणता, ह्या प्रश्नावर दोन बाजूंनीं उजेड पडण्यासारखा आहे. इतर लोक महाराष्ट्रीयांच्या कातडीचा रंग कोणता ठरवितात, ही एक बाजू; व आपण स्वतः आपल्या कातडीच्या रंगाला काय म्हणतों, ही दुसरी बाजू. चिकित्सक युरोपियन महाराष्ट्रीयांच्या व आधुनिक भारतीय आर्यांच्या कातडीचा रंग स्वभाषेंत brown ह्या शब्दानें दर्शवितात. Brown या इंग्रजी शब्दाचे मराठी प्रतिशब्द शास्त्रिमंडलोपदिष्ट मोल्स्वर्थ येणेंप्रमाणें देतोः- उदी, बदामी, तपकिरी, मुगदुमी. ह्या अर्थांना मोल्स्वर्थ टीपहि देतोः- Note, these words express different shades of brown. संस्कृत कोशांत brown या शब्दाला कपिश, कपिल, पिशंग, पिंगल, श्याव

हे प्रतिशब्द दिलेले आहेत (आपट्यांचा कोश). Dark-brown ला मोल्स्वर्थ घनसांवळा, कपिश हे दोन प्रतिशब्द देतो; व light-brown ला भुरा हा प्रतिशब्द देतो. तात्पर्य, १ उदी, २ बदामी, ३ तपकिरी, ४ मुगदुमी, ५ कपिश, ६ कपिल, ७ पिशंग, ८ पिंगल, ९ श्याव, १० घनसांवळा, ११ भुरा असे एकंदर ११ प्रतिशब्द brown या इंग्रजी शब्दाला मराठींत व संस्कृतांत आहेत. ह्या अकरांतून महाराष्ट्रीयांची कातडी कोणत्या छायेची आहे ? युरोपियन तुर्कस्थानांतील पुष्कळ लोकांचा वर्ण बदामी असतो. अरबांचा रंग उदी असतो. भुरा म्हणजे पांढुरका असा अर्थ आपण करतों. कपिश, व कपिल म्हणजे महाराष्ट्रांतील कित्येक माकडांचा रंग, हें उघड आहे. पिंगट, पिंगल किंवा पिशंग, हा रंग चिनी लोकांच्या कातडीला लावतां येईल, पण ह्यांपैकीं एकहि शब्द आपणा महाराष्ट्रीयांच्या कातडीच्या रंगाला लावतां येत नाहीं. तेव्हां आपल्या कातडीच्या रंगाला नांव काय द्यावें ?

भरतखंडांतील लोक सांवळे

या प्रश्नावरती हल्ला दुसऱ्या रस्त्यानें करूं. हा रस्ता ऐतिहासिक आहे व लौकिकहि आहे. एखादी नवरी पहावयाला जावें व तेथील प्रौढ बायांना मुलीचा रंग विचारावा. म्हणजे शंभरांतून नव्वद हिश्श्यांनीं उत्तर, मुलगी चारचौघीजणींसारखी काळीसांवळी आहे, असें हटकून येतें. मुलीच्या वर्णासंबंधानें जें उत्तर तेंच मुलाच्या वर्णासंबंधानें येतें. मुलगी जर काळीसांवळी, तर मुलगा अर्थात्, तिच्याहून काळासांवळा ठरलेलाच. सर्व प्राण्यांत प्रायः मादीच्या रंगाहून नराचे रंग उठावदार असतात. तात्पर्य, लौकिकरीत्या पहातां, नवरानवरीचा वर्ण महाराष्ट्रांत प्रायः काळासांवळा असतो. लौकिक रस्त्यानें शोध करतां, महाराष्ट्रांतील लोकांच्या कातडीचा रंग काळासांवळा ठरतो. आतां ऐतिहासिक रस्त्यानें कोणता रंग निवडतो तें पाहूं.

सर्व महाराष्ट्रांत, इतकेंच काय पण सर्व भरतखंडांत, सर्व लोकांना अत्यन्त पूज्य अशा पौराणिक ऊर्फ प्राचीनैतिहासिक व्यक्ति म्हटल्या म्हणजे राम व कृष्ण ह्या होत. दोन्ही व्यक्तींचा रंग पुराणांतून काळासांवळा दिलेला आढळतो. घनश्याम हें कृष्णाचें नांव प्रसिद्ध आहे. काळ्या ह्या प्रेमळ अपशब्दानें भक्तांनीं कृष्णाला आळविलेलें आहे. 'घनश्याम हा राम लावण्यरूपी' हा चरण सर्वप्रसिद्ध आहे. 'कृष्ण काळा, मी गोरी, माझ्या ग आवडीचा;' हें गाणें महाराष्ट्रांत लहान मुलींच्या तोंडीं सर्रहा आहे. सांवळाराम, काळूराम, हीं नांवें महाराष्ट्रांतील पुरुषांचीं आवडीचीं आहेत. प्रायः माणसें आपल्या देवांचीं रूपें आपल्या स्वतःच्या शरीराच्या धर्तीवर बनवीत असतात. अहं ईश्वरोस्मि, अहं ब्रह्मास्मि, हें अद्वैत सिद्धान्ताचें तत्त्व माणूस, मनांत असो किंवा नसो, सदा अमलांत आणीत असतें. यहुद्यांचा यावा, ख्रिस्त्यांचा परमेश्वर, मुसलमानांचा महंमद, बौद्धांचा बुद्ध, त्या त्या लोकांच्या

सर्वसाधारण शरीराचे प्रतिबिंब आहेत. ह्या नियमाला अनुसरून, महाराष्ट्रीयांनीं व भारतीयांनीं राम व कृष्ण हे दोन ऐतिहासिक पुरुष आपल्या देशांतील सर्वसाधारण मानवशरीराकृतीचे पुतळे बनविले आहेत. महाराष्ट्रांत पुरुषसौंदर्याची कल्पना येणेंप्रमाणें आहे. मध्यमाहून किंचित् जास्त उंची, मध्यमाहून किंचित् जास्त रुंदी, चौकोनी मांसल खांदे, भरीव व विस्तीर्ण छाती, अति उंच नव्हे व अति बळकट नव्हे असें नांक, विशाल भाल, व काळासांवळा वर्ण. पैकीं शेवटल्या गुणासंबंधानें आपण विचार करीत आहोंत. तेव्हां, मानसिक व काल्पनिक सृष्टींत पुरुषसौंदर्यांत ज्या अर्थी काळ्यासांवळ्या रंगाची महाराष्ट्रांतील कविजनांनीं व सामान्यजनांनीं तरफदारी केलेली आढळते, त्या अर्थी, काळ्यासांवळ्या वर्णाची म्हणजे स्वतःच्या शरीराच्या वर्णाची तरफदारी ते करीत आहेत, हें गृहीत घेऊन चालावें लागतें. महाराष्ट्रांतील लोक आपल्या शरीराच्या रंगाला काळासांवळा रंग म्हणत, हें लौकिक व ऐतिहासिक प्रमाणानें सिद्ध आहे. युरोपियन लोक ज्या रंगाला brown म्हणतात तो रंग दहा वीस छायांचा आहे. पैकीं काळीसांवळी छाया महाराष्ट्रीयांच्या शरीराच्या रंगाची पूर्ण निदर्शक आहे. पृथ्वीवर काळे, तांबडे, पांढरे व पिंवळे लोक आहेत; त्याप्रमाणेंच सांवळेहि लोक आहेत व ते पृथ्वीच्या लोकसंख्येच्या एकपंचमांश आहेत. काळे लोक आफ्रिकेंत आहेत. गोरे लोक युरोपांत आहेत. पिंवळे लोक पूर्व आशियांत आहेत, तांबडे लोक अमेरिकेंत थोडेफार उरले आहेत. आणि सांवळे लोक ह्या विस्तीर्ण भरतखंडांत आहेत.

सांवळ (ळा-ळी-ळें) हा मराठी शब्द श्यामल किंवा श्यावल या दोन संस्कृत शब्दांचा अपभ्रंश असूं शकेल,

श्यामल = सांवळ (Black)

किंवा

श्यावल = सांवळ (Brown)

पैकीं काळासांवळा या जोड शब्दांतील सांवळ शब्द श्यावल (brown) शब्दापासून निघालेला आहे असें दिसतें. काळासांवळा म्हणजे Black-brown. श्यामल या शब्दापासून सांवळ या शब्दाचा उगम धरला, तर काळासांवळा या जोड शब्दाचा अर्थ Black-black असा होतो व तो प्रकृत संदर्भाला जुळत नाहीं. महाराष्ट्रीयांच्या कातडीचा रंग Black-brown किंवा Brown आहे, Black -black नाहीं, हें तर डोळ्यांनीं दिसतें.

जातिपरत्वें वर्णभेदाचा अर्थ

महाराष्ट्रीयांच्या व भारतीयांच्या कातडीचा रंग सर्वसाधारणपणें सांवळा आहे, हें सिद्ध झाल्यावर, दुसरा एक विशेष लक्ष्यांत घ्यावा लागतो. महाराष्ट्रीयांच्या कातडीचा रंग जातिपरत्वें बदलत गेलेला आढळतो. मनूनें म्हटलेंच आहेः- ब्राह्मण

शुक्लभास्वर रंगाचे; क्षत्रिय तांबडया रंगाचें; वैश्य पिंवळया रंगाचे; व शूद्र काळया रंगाचे असतात. इतर संकरजाती त्या त्या संकीर्ण रंगाच्या असतात. पतंजलीनें व्याकरणमहाभाष्यांत एके ठिकाणीं असा प्रश्न उपस्थित केला आहे कीं, केवळ दृष्टीनें अमुक मनुष्य ब्राह्मण आहे हें कसें ओळखावें; व ह्या प्रश्नाला उत्तर असें दिलें आहे कीं, शुक्लभास्वर रंगावरून ब्राह्मण ओळखावा. म्हणजे पतंजलीच्या व मनुसंहितेच्या काळीं ब्राह्मणांचा रंग शुक्लभास्वर असे, हें कबूल करावें लागतें. पतंजलीला होऊन आज दोन हजार वर्षें झालीं. म्हणजे दोन हजार वर्षांपूर्वी ब्राह्मणांचा रंग शुक्लभास्वर असे, हें उघड झालें. शुक्लभास्वर या जोड शब्दाचे दोन अर्थ होतील. शुक्लभास्वर - म्हणजे white - brilliant व शुक्लभास्वर म्हणजे Clean-brilliant. पांढरा लखलखीत हा एक अर्थ, व स्वच्छ लखलखीत हा दुसरा अर्थ. पैकीं मनूला व पतंजलीला दुसरा अर्थ विवक्षित असावा, असें वाटतें. कारण, मनूच्या व पतंजलीच्या कालीं, ब्राह्मणांचा रंग केवळ पांढराच तेवढा समजत असें नाहीं. यम ही देवता ब्राह्मण आहे व तिचा रंग श्याम आहे, हें प्रसिद्ध आहे. अग्नि हा ब्राह्मण आहे व त्याचा रंग तांबडा आहे, हें निर्विवाद आहे. तेव्हां ब्राह्मण श्याम व ताम्र अशा दोन रंगांचे; निदान पतंजलीच्या कालीं, कदाचित्, त्याच्याहि पूर्वी होते हें स्पष्ट आहे; आणि अशी जर वस्तुस्थिति होती, तर शुक्लभास्वर ह्या शब्दाचा अर्थ स्वच्छ लखलखीत असा पतंजलीला इष्ट होता असें म्हणावें लागतें. B.C.४१५ तला Ktesias नामक ग्रीक वैद्य म्हणतो कीं, हिंदु लोकांचा वर्ण काळा असतो. मनू जेव्हां म्हणतो कीं, ब्राह्मण शुक्लभास्वर रंगाचा असतो, तेव्हां तो एवढेंच म्हणतो कीं, ब्राह्मण मूळ श्याम वर्णाचा असून शिवाय स्वच्छ लखलखीत म्हणजे शुचिर्भूत व लखलखीत असतो. मनू जेव्हां म्हणतो कीं, क्षत्रिय तांबडा असतो, तेव्हां तो इतकेंच म्हणतो कीं, क्षत्रिय श्याम असून शिवाय धंद्याच्या साहसानें व श्रमानें ताम्रवर्णी असतो. त्याप्रमाणेंच वैश्य मूळचा श्याम असून त्याच्या बैठ्या निरुपद्रवी धंद्यामुळें त्याच्यावर पिंवळट रंगाची छाया येते. पतंजलीचा व मनूचा हा असा आशय असावा, असें विचारान्तीं वाटतें. तात्पर्य, भारतीय आर्यांचा मूळचा रंग श्यामल किंवा श्यावल आहे, बर्फासारखा पांढरा कधींहि नव्हता. अगदीं काश्मिरांतला हिंदू घेतला किंवा काफरिस्थानांतला हिंदू घेतला, तरी त्याच्या कातडीचा रंग बर्फासारखा पांढरा बिलकुल नसतो; श्यामल असून पांढुरकेपणाची किंचित् त्याच्यावर झांक मारते. मनु, भृगु, पतंजलि, हीं माणसें मध्य देशांतील आहेत, काश्मिरांतील किंवा काफरिस्थानांतील नाहींत. तेव्हां, त्यांच्या अनुभवाला जे आर्य आले ते प्रायः श्यावल वर्णाचे आले असले पाहिजेत, हें सांगावयाला नको. आणि असेंहि धरून चाललें कीं, काश्मिरांतील किंवा काफरिस्तानांतील ब्राह्मणांचा ते उल्लेख करीत आहेत, तत्रापि तेवढ्यानें असें कांहीं सिद्ध होत नाहीं कीं, काश्मिरांतील किंवा

काफरिस्तानांतील आर्य पुरातन कालीं बर्फासारखे पांढरे होते. पुरातन कालीं ते जर तसे असते, तर त्यांचेच वंशज जे सध्यांचे काश्मिरांतील व काफरिस्तानांतील हिंदू लोक तेहि सध्यां बर्फासारख्या पांढऱ्या कातडीचे असते; आहेत त्याप्रमाणें श्यामवर्ण नसते.

एकंदरींत असा सिद्धान्त निघतो कीं, भारतीय आर्यांचा मूळवर्ण श्यामल किंवा श्यावल आहे, बर्फासारखा पांढरा मागेंहि कधीं नव्हता व सध्यांहि कोठें नाहीं. ह्या श्यामल आर्यांचा वर्ग पांढऱ्या, तांबड्या, पिंवळ्या व काळ्या माणसांच्या वर्गांहून अगदीं स्वतंत्र आहे. भारतीय आर्यांच्या वंशाला मानवांचा सांवळा वंश म्हणणें सर्वथा शास्त्रोक्त असून, इतर रंगांच्या मानवांहून गुणांनीं हा वंश 'अगदीं भिन्न आहे हेंहि मान्य करणें प्राप्त आहे.

६

आमचीं पुराणें व असीरियांतील नवे शोध

मंद ऊर्फ मंदग कोण ?

महाभारताच्या भीष्मपर्वाच्या अकराव्या अध्यायांत खालील श्लोक आहेत :-

तत्र पुण्या जनपदाश्चत्वारो लोकसंमताः ॥ ३५ ॥
मंगाश्च मशकाश्चैव मानसा मंदगास्तथा ।
मंगा ब्राह्मणभूयिष्ठाः स्वकर्मनिरता नृप ॥ ३६ ॥
मशकेषु च राजन्या धार्मिका सर्वकामदाः ।
मानसाश्च महाराज वैश्यधर्मोपजीविनः ॥ ३७ ॥
शूद्रास्तु मंदगा नित्यं पुरुषा धर्मशीलिनः ॥ ३८ ॥
एतदेव च श्रोतव्यं शाकद्वीपे महाजसि ॥ ४० ॥

शाकद्वीपांत मंग ऊर्फ मग, मशक, मानस, व मंदग असे चार वर्ण ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र यांच्या समान आहेत, म्हणून वरील श्लोकांत सांगितलें आहे. विष्णुपुराणांत व भविष्यपुराणांतहि मग व मंदग यांचीं नांवें आलेलीं आहेत. हे लोक शाकद्वीपांतील चातुर्वर्ण्यापैकीं अनुक्रमें ब्राह्मण व शूद्र होत. ह्यांचा उल्लेख ग्रीक किंवा असूर लोकांच्या इतिहासांत कोठें सांपडतो कीं काय, हें पहावयाचें आहे. ग्रीक म्हणजे यवन लोक आणि असुर म्हणजे ज्यांना Assyrian असें नांव अर्वाचीन युरोपीयन लोक देतात ते. प्राचीन यवन लोक यांना असूरियन म्हणत व हे लोक स्वतः आपल्याला अशूर म्हणत. Assyrian हा उच्चार सध्यांच्या युरोपियन लोक जो करितात तो अपभ्रष्ट आहे. Y बद्दल U हें अक्षर पाहिजे आहे. असीरिअन असा उच्चार नाहीं. असूरियन किंवा असुरियन असा खरा उच्चार आहे. स्वतः हे लोक आपल्याला Assur अशूर म्हणवीत हें वर सांगितलेंच आहे. प्राचीन भारतीय आर्य ह्या लोकांना असुर म्हणत व त्यांच्या देशाला असूर्या किंवा असूर्य म्हणत.

असूर्या नाम ते लोका अंधेन तमसा वृताः ।

शच्या ऐवजीं स असा उच्चार प्राचीन भारतीय आर्य करीत. ह्या असूर किंवा असुर लोकांच्या इतिहासांत मंद व मंदग ह्यांचा अनेकवार उल्लेख सांपडतो. Historians' History of the World नामक इंग्रजी ग्रंथमालेच्या दुसऱ्या खंडांत (५५९ वें पृष्ठ पहा). ह्या मंद लोकांची पुष्कळ माहिती दिली आहे ती साक्षेपी व शोधक वाचकांनीं पहावी.

या पृष्ठांतील मजकुरांत Scythians म्हणजेच Manda होत, असें म्हटलें आहे. Scythian हा शब्द उच्चाराच्या व लिहिण्याच्या बाबतींत सध्यांच्या युरोपिअन लोकांनीं अपभ्रष्ट केला आहे. ग्रीक भाषेंत हा शब्द (Skythian) स्कथिअन असा उच्चारला व लिहिला जावा व जातो. शकस्थानीय, सकस्थानीय, स्कथिअन, अशा परंपरेनें ग्रीक भाषेंत हा शब्द अपभ्रष्ट होऊन आलेला दिसतो. ज्यांना ग्रीक लोक स्कथिअन (Skythian) म्हणत त्यांना प्राचीन भारतीय आर्य शक, शकस्थानक, शकस्थानीय म्हणत. प्राचीन पारसिक लोक ह्या शकांना (Sakai) सकै म्हणत. शक, शकीय, सकै, सअइ, से असाहि अपभ्रंश ह्या शब्दांचा सांपडतो. Skythians शक, सकै, से वगैरे सर्व नांवें एकाच लोकांचीं म्हणजे शकांचीं होत. ह्यासंबंधानें सर्व तज्ज्ञांचें एकमत आहे. अर्थात् Skythians म्हणजे शक होत, ह्या विधानाचीं प्रमाणें देऊन सिद्धि करण्याची जरूरी नाहीं. ह्या शक ऊर्फ Skythians लोकांना वरील इंग्रजी ग्रंथांत (Manda) मंद असें म्हटलें आहे. हे (Manda) मंद कोण ?

Herodotus व Ctesias ह्या दोघां ग्रीक इतिहासकारांना Manda कोण हें माहीत नव्हतें, इतकेंच नव्हे तर मंद हें नांवहि त्यांनीं ऐकलें नव्हतें. प्राचीन Medes म्हणून जे लोक होते त्यांच्या नांवाखालीं ह्या मंदांचा इतिहास Herodotus व Ctesias देतात. Herodotus व Ctesias ह्यांची ही चुकी आज पंचवीसशें वर्षें म्हणजे ख्रिस्ती सनाच्या १९ साव्या शतकाच्या अंतापर्यंत तशीच चालली होती. अलीकडे दहा पंधरा वर्षांत असूर ऊर्फ अशूर लोकांचे इष्टिकालेख म्हणजे भाजलेल्या विटांवरचे लेख उदयास आल्यामुळें ही चूक दुरुस्त झाली. Herodotus ज्यांना Medes म्हणतो त्यांचे खरें नांव मंद (Manda) नव्हतें असें आतां कोठें कळलें आहे. खऱ्या Medes लोकांना असूर लोक मद (Mada) म्हणत. ह्याच Medes लोकांना भारतीय आर्य मेद म्हणत. सारांश, खऱ्या Medes लोकांहून म्हणजे मद ऊर्फ मेद लोकांहून (Manda) मंद ऊर्फ Skythians शक लोक भिन्न होते, असें नुकतेंच अलीकडे दहा पंधरा वर्षांत युरोपियन लोकांच्या लक्षांत आलें आहे. 'Historians' History of the World'च्या दुसऱ्या खंडाच्या ५८३ व्या व ५८५ व्या पृष्ठांवर Manda ऊर्फ मंदांच्या पराक्रमाची बरीच हकीकत दिली आहे.

तीवरून (१) मेदां-(Medes) हून मंद निराळे होते व (२) मंद (Manda) हे शक (Skythians) होते हें सिद्ध आहे. मंद नांवाच्या शकांनीं इ. स. पू. ७०० पासून सरासरी इ. स. पू. ५५० पर्यंत राज्य केलें. नंतर Elam प्रांतांतील Derus यानें आपलें राज्य सुरूं करून असूरांचे (Assyrians) राज्य बुडविलें.

असुरांच्या इष्टिका-लेखांत ज्यांचा उल्लेख येतो असे हे शाकवंशीय मंद कोण, असा प्रश्न आहे. ह्याचें उत्तर पहिल्या कलमाच्या प्रारंभीं भारताच्या भीष्मपर्वांतील श्लोक दिले आहेत त्यांत सांपडतें. शाकद्वीपांत जे शक लोक राहतात त्यांच्यांत मंग (ब्राह्मण), मशक (क्षत्रिय), मानस (वैश्य) व मदंग (शूद्र) असे चार वर्णांचे लोक असतात; म्हणून भीष्म सांगत आहेत. पैकीं शाकद्वीपांतील शूद्र जे मंदग तेंच हे असूरांच्या शिलालेखांतील शाक (Skythian) मंद होत. असूर ह्या लोकांना मंद म्हणत व भीष्माच्या वेळचे भारतीय आर्य ह्यांना मंदग म्हणत. भारतीय आर्यांना माहीत असलेल्या नांवांत ग हें अक्षर जास्त आहे. तेव्हां अशी शंका उद्भवते कीं, ह्या शाक लोकांचें खरें नांव कोणतें ? मंद कीं मंदग ? ह्या प्रश्नाचें समर्पक उत्तर देण्यास असुरांच्या शिलालेखांत किंवा भारतीय आर्यांच्या पुराणेतिहासांत जर कोठें कांहीं प्रमाण असेल, तर तें मला माहीत नाहीं. इतकें मात्र निःसंशय आहे कीं, असुरांच्या शिलालेखांत ज्या शाक लोकांना मंद म्हटलें आहे व भारतीय आर्यांच्या भारतांत, विष्णुपुराणांत व भविष्य-पुराणांत ज्या शाक शूद्रांना मंदग म्हटलें आहे, ते लोक एकच होत.

असुरांच्या इष्टिका-लेखांत आणि Herodotus व Ctesias ह्यांचा इतिहासांत जीं वर्णनें व उल्लेख आहेत त्यांवरून असें दिसतें कीं, भीष्माच्या वेळचे भारतीय आर्य जसे या मंद लोकांना शाक शूद्र समजत, तसें असुर व ग्रीक ह्या मंद लोकांना शाक शूद्र समजत नसत, नुसते शाक समजत. ह्याचा अर्थ काय होतो ? ह्याचा अर्थ असा होतो कीं, भीष्माच्या वेळीं शाक लोकांत जें चातुर्वर्ण्य होतें, तें Esarhaddon ह्या असूर राजाच्या वेळेपर्यंत मोडून जाऊन मंद म्हणजे शाक-वंशीय एक कुल, अशी इ. स. पू. ७०० च्या सुमारास प्रख्या झाली. शाक लोकां-तील चातुर्वर्ण्य केव्हां मोडलें, त्याचा इतिहास भारतीय आर्यांच्या पुराणांत सांपडतो. सूर्यवंशांतील सगर राजाच्या वेळीं शाक लोक चातुर्वर्ण्य भ्रष्ट झालें, असें विष्णुपुरा-णाच्या चतुर्थांशाच्या तिसऱ्या अध्यायाच्या शेवटीं सांगितलें आहे. मनुस्मृतीच्या दहाव्या अध्यायांतील

वृषलत्वं गता लोके इमाः क्षत्रियजातयः ।
पौंड्रकाश्चोंड्रद्रविडाः कंबोजा यवनाः शकाः ॥

इत्यादि श्लोकांतहि विष्णुपुराणांतील ह्याच इतिहासाचा उल्लेख आहे. श्रीकृष्णपुत्र सांब यानें शाकद्वीपाहून सूर्यप्रतीमास्थापनार्थ भारतवर्षांतील यादवांच्या राज्यांत मंग नांवाचे ब्राह्मण आणिले, असें भविष्यपुराणाच्या ब्राह्मपर्वाच्या १३९ व्या अध्याया-पासून पुढें वर्णन आहे. या मंगांना भोजक अशीहि संज्ञा असे.

अनुष्ठानविहीना ये न ते भोज्यास्तु भोजकाः ॥ ३० ॥

—भविष्यपुराण, ब्राह्मपर्व, अध्याय १४७.

ह्यावरून श्रीकृष्णपुत्र जो सांब त्याच्या वेळेस शाकद्वीपांतील मंग ब्राह्मणांपैकीं कांहीं स्वधर्मभ्रष्ट झाले होते, असें दिसतें. हा धर्मभ्रष्टतेचा प्रकार सगराच्या पासून चाललाच होता, तो श्रीकृष्णपुत्र सांब याच्यावेळीं फार झाला. तदनंतर इसवी सनाच्या पुढें तर हे शाकद्वीपीय मंग ब्राह्मण क्वचित् कोठें कोठें राहिले.

सारांश, असूरांचा राजा जो Esarhaddon त्याला जे शाक लोक भेटले ते मंद या एकाच नांवानें त्याला माहीत होते. मंद हे शाकद्वीपांतील पूर्वींचे शूद्र होत, हें वर सांगितलेंच आहे. हे शूद्र लोक चातुर्वर्ण्यभ्रष्ट होऊन Esarhaddon च्या वेळेस त्यांनीं लढाईचा पेशा स्वीकारिला होता. Esarhaddon इ. स. पू. ६८१ ते इ. स. पू. ६६८ पर्यंत असूर देशावर राज्य करीत होता.

ह्या हकीकतीवरून एक महत्त्वाचें अनुमान निघतें. तें हें– शक जे मंद त्यांचा उल्लेख इ० स० पू० ६८१ त Esarhaddon च्या इष्टिका-लेखांत निघतो; आणि महाभारताच्या भीष्मपर्वाच्या अकराव्या अध्यायांत मंदांची जी हकीगत किंवा इतिहास दिलेला आहे तो कमींत कमी इ० स० पू० ६८१ च्या सुमाराचा आहे, असें अनुमान निश्चयानें करतां येतें. सबंद भारताच्या कालासंबंधानें मी बोलत नाहीं. भीष्मपर्वांतील ह्या अकराव्या अध्यायांतील मंदांच्या या उल्लेखासंबंधानें बोलत आहे. ह्या उल्लेखांतील इतिहासाचा काळ कमींत कमी अगदीं अलीकडला धरला तर हा इ. स. पू. ६८१ च्या सुमाराचा असावा.

परंतु Esarhaddon च्या वेळीं मंद हे नुसते शाक आहेत, हें असूरांना माहीत असलेलें दिसतें. ते चातुर्वर्ण्यबद्ध नव्हते, एकवर्णी होते. भारताच्या भीष्मपर्वाच्या अकराव्या अध्यायांत तर मंद हे शाकद्वीपांतील चातुर्वर्ण्यापैकीं शूद्र होत, असें वर्णन आहे. अर्थात् हें वर्णन इ० स० पू०, ६८१ च्या समाजस्थितीचें आहे. भीष्मांच्या तोंडीं व्यासांनीं घातलेलें हें वर्णन भीष्मांनीं पुरातन इतिहास म्हणून सांगितला आहे तेंहि युक्तच आहे. कारण, भीष्मांच्यापूर्वी सगर राजाच्या वेळीं शाक लोकांतून चातुर्वर्ण्य नष्ट झालें असा विष्णुपुराणाच्या चतुर्थांशाच्या तिसऱ्या अध्यायाच्या शेवटीं उल्लेख आहे. भारतकर्त्यानें, विष्णुपुराणकर्त्यानें, भविष्यपुराणकर्त्यानें हे उल्लेख– शाक लोकांत चातुर्वर्ण्य आहे, तें सगरराजाच्या वेळेस मोडलें, श्रीकृष्णपुत्र सांब यानें शाकद्वीपांतून भारतवर्षांत मंग ब्राह्मण आणिले, इत्यादि बारीक उल्लेख– तुम्हां आम्हाला फसविण्याकरितां आपल्या कल्पनेंतून कादंबरी म्हणून कांहींतरी कल्पिलेले नाहींत. असूर लोकांचे इष्टिकालेख सांपडले नव्हते व त्यांत मंद हें नांव आहे हें जोंपर्यंत माहीत नव्हतें तोंपर्यंत ह्या उल्लेखांना काल्पनिक व कादंबरीवजा समजण्याकडे प्रवृत्ति होती. परंतु आतां तसें करून भागणार नाहीं. शकासंबंधीं व मंदासंबंधीं पुराणें व भारत जें कांहीं उल्लेखन करीत आहेत, त्याचा नीट इतिहासदृष्ट्या विचार केला पाहिजे.

शक ऊर्फ Skythian लोक Nomad म्हणजे भटकणारे अर्धेमुर्धे रानटी लोक होते असें Herodotus वर्णन करितो, तेंहि विचारांत घेतलें पाहिजे. भारत, विष्णुपुराण व भविष्यपुराण, शक लोक चातुर्वर्ण्य असून मोठे धर्मशील, पुण्यात्मे व महौजस होते, असें वर्णन करतात. तेंहि चांगलेंच जमेस धरलें पाहिजे. मला असें वाटतें कीं, आजमित्तीपूर्वी पांच हजार वर्षांवर शक लोक आर्यलोकांप्रमाणें उत्तम सुधारलेले व सुसंस्कृत होते, त्यांची समाजव्यवस्था चातुर्वर्ण्यात्मक होती, ती समाज-व्यवस्था त्यांनीं जेव्हां सोडली तेव्हां ते अर्ध्यामुर्ध्या रानटी स्थितीस पोहोंचले; आणि ह्या अशा स्थितींत असुरांनीं व Herodotus ह्यानें त्यांना पाहिलें. ह्या अर्ध्यामुर्ध्या रानटी स्थितींत त्यांच्यांत एक शूद्र जातच तेवढी राहिली, ते धर्मलोपानें, व ब्राह्मणा-दर्शनानें वृषलत्वाप्रत प्राप्त झाले, असें मनुसंहिता म्हणतेच आहे. अर्थात् Hero-dotus शकांच्या भटकणाऱ्या Nomadic स्थितीचें जें वर्णन देतो त्याहून भारतांतील, विष्णुपुराणांतील व भविष्यपुराणांतील शकांच्या चातुर्वर्ण्यात्मक संस्कृतीचें वर्णन प्राचीन आहे, असें विधान करणें युक्तिसिद्ध होय.

Cyrus कोण व त्याची जात काय ?

प्रथम एवढें सांगितलें पाहिजे कीं, Cyrus हाहि शब्द अपभ्रष्ट आहे. ह्या शब्दाचा आधुनिक इंग्रज लोक सायरस असा उच्चार करतात, तो बरोबर नाहीं. खरा उच्चार Kyrus कुरुस असा असावा. Y बद्दल येथेंहि U पाहिजे. हा कुरुस् ऊर्फ कुरु Cambyses चा मुलगा होता. " Cambyses म्हणजे Kambujiya, ' Cyrus, ' Father was, just as Herodotus tells us Cambyses (Kambujiya) "

H. H. W.; Vol. II. P. 590.

हा Cambyses शब्दहि अपभ्रष्टच आहे. Historian's History of the World च्या कर्त्यानें कंसांत दिलेल्या Kambujiya रूपावरून Cambyses शब्द निघालेला नाहीं. कंबोजस्, कंबोजः रूपापासून Kambuses शब्द निघाला आहे. येथेंहि Y बद्दल U पाहिजे आहे. कंबोजस् म्हणजे कंबोज देशचा राजा त्याचा पुत्र Cyrus, Kurus, ऊर्फ कुरुस्. तात्पर्य ज्याला इंग्रज व कित्येक युरोपियन लोक Cyrus म्हणतात तो कंबोज देशच्या राजाचा मुलगा होय, किंवा कंबोज देशीय होय, असें म्हटलें असतां जास्त शोभेल. कारण Cyrus च्या पणज्याचें नांव Kambyses होतें आणि मुलाचें व पणज्याचें नांवहि Kam-byses होतें. म्हणजे Cyrus, Kurus, कुरुः ह्याचें कुळ कंबोज होतें हें स्पष्ट आहे. Kurus कुरुः हा Elamite ही नव्हता व Persian हि मूळचा नव्हता. " It must be clearly understood that Cyrus was

not originally a king of Persia, but of the Elamite province of Anshan. Teispes (Ancestor of Cyrus) obtained possession of the Elamity province of Anshan, in the century B. C." तात्पर्य, Cyrus, Kurus, कुरुः मूळचा Persian हि नव्हता व Elamite हि नव्हता, कंबोज होता. हा कंबोज देश सध्यांच्या अफगाणिस्थानच्या पूर्वेस होता. कंबोज देशांतील लोकांना व राजाला कंबोज असें नांव असे.*

Elam व Ellipi देश कोठचे ?

Elam lay to the east and across in mountain range from Babilonia (H. H. of World. Vol. II.; Page 589). They descended upon Ellipi, east of Assyria and stretching to the Caspian Sea. In the Ellipian Capital of Ecbatana etc. - (Page 559, idem.)

म्हणजे Ellipi हा मुख्य देश व Elam हा त्याचा एक प्रांत व Ecbatana मुख्य देशाची राजधानी, असा अर्थ होतो. Assyria च्या पूर्वेस व Babylonia च्या पूर्वेस Caspian Sea पर्यंत पसरलेला जो मुलूख त्याचें नांव Ellipi व त्याची राजधानी Ecbatana. ह्या Ellipi देशाचें नांव भारतीय इतिहासांत व पुराणांत सांपडतें कीं काय, तें पहावयाचें आहे. विष्णुपुराणाच्या द्वितीयांशाच्या दुसऱ्या अध्यायाच्या खालील श्लोकांत जंबुद्वीपाचे येणेप्रमाणें भाग ऊर्फ वर्ष सांगितलेले आहेत.

जंबुप्लक्षाह्वयौ द्वीपौ शाल्मलिश्चापरो द्विज ।
कुशः क्रौंचस्तथा शाकः पुष्करश्चैव सप्तम ॥ ५ ॥
जंबुद्वीपः समस्तानामेतेषां मध्यसंस्थितः ।
तस्यापि मेरुर्मैत्रेय मध्ये कनकपर्वतः ॥ ७ ॥
भारतं प्रथमं वर्षं ततः किं पुरुषं स्मृतं ।
हरिवर्षं तथैवान्यन्मेरोर्दक्षिणतो द्विज ॥ १२ ॥
रम्यकं चोत्तरं वर्षं तथैव तु हिरण्मयं ।
उत्तराः कुरुवश्चैव यथा वै भारतं तथा ॥ १३ ॥
इलावृत्तं च तन्मध्ये सौवर्णो मेरुरुच्छ्रितः ॥ १४ ॥

---

* हे कंबोज लोक मूळचे चातुर्वर्ण्यबद्ध असून क्रियालोपानें वृषल झाले होते, असें मनुसंहिता म्हणते. एवंच Cyrus, the Achæmenes, मूळचा कंबोज होता; Persian, Elamite किंवा Mede (मेद) नव्हता.

येथें सातच वर्ष उल्लेखिले आहेत, परंतु जंबुद्वीपांत एकंदर वर्ष नऊ, त्यांतलें एक वर्ष इलावृत्त. ह्या शब्दांतील त्त चा प्राकृतांत प्प होऊन इलाइप्प असा अपभ्रंश होणें शक्य आहे. इलाइप्प पासून Ellipi हें नांव असूरांच्या इष्टिकालेखांत येतें. तात्पर्य, ज्याला असूर लोक Ellipi म्हणत त्यालाच पुराणें इलावृत्त किंवा इलावृत म्हणत. हें इलावृत वर्ष मेरूच्या पश्चिमेस व Assyria आणि Babylonia ह्यांच्या पूर्वेस असे. इलावृताच्या उत्तरेस Caspian Sea व दक्षिणेस अपर समुद्र आहे.

ह्या इलावृत वर्षांत ऊर्फ Ellipi देशांत Mede लोक रहात. त्यांचा अगदीं पहिला राजा ग्रीकांना जो माहीत झाला तो Deioces होय. हा शब्द दिवौकस् ह्या संस्कृत शब्दासारखा भासतो. Deioces ऊर्फ दिवौकस् याच्या पुढील राजा Phraortes ऊर्फ Frawarti हा होय. Frawarti हा शब्द संस्कृत अभ्रवर्तिसारखा भासतो. अभ्रवर्ति ह्याच्यापुढें Cyaxares राजा झाला. ह्याचें Medo ऊर्फ मेद लोकांच्या भाषेंत नांव Huwakhshatara हुवख्षतर असें होतें. (H. H. of the World Vol. II. Page 581). मेद भाषेंतील Huwakhshatara म्हणजे संस्कृत भुवक्षत्र असें होईल. ह्या भुवक्षत्राचा मुलगा Astyages. ह्याला असूर लोक Ishtuvega म्हणत. Ishtuvegu हें नांव संस्कृत विष्णुवृद्ध अशासारखें भासतें. ह्या Ishtuvegu वर kyrus ह्यानें स्वारी केली व Ellipi चें राज्य घेतलें. Cyrus व Ishtuvegu दोघेहि जंबुद्वीपांतील वृषल समान राजे होते. Cyrus कंबोज होता व Ishtuvegu इलावृतांतील Mede मेद होता. Deioces हा ग्रीक शब्द Daiaukku असा इ. स. पू. ७१३ तील असुरांना माहीत होता. (H. H. W. vol. II. p. 581). देवौक, फ्रवर्ति, हुवख्षतर, एल्लिपि, अग्वतन (अक्षपतन) वगैरे शब्दांवरून असें दिसतें कीं, मेदांची भाषा संस्कृताच्या सन्निकट अपभ्रंशासारखी होती.

Persian पारसिक ऊर्फ Parsu कोण ?

Three years after the Conquest of Astyages, that is in 546 B. C. he (Cyrus) first calls himself King of the Parsu (Parsians). हे Parsu कोण ?

हे दोन नांवांनीं भारतीय आर्यांना माहीत होतेः- पल्हव व पारसीक–पैकीं पल्हव हें नांव पारसीक ह्या नांवाहून प्राचीन आहे, Parsu शब्दांतील र चा ल होऊन व स चा ह होऊन पल्हु असें संस्कृत रूप होतें. पल्हूसंबंधीं जे ते पाल्हव. पाल्हव तेच पल्हव. Ellipi च्या देशांत मेदलोकांच्या प्रांताच्या दक्षिणेस ह्यांचा प्रथमारंभीं एक लहानसा तालुका होता. कंबोज जो Cyrus त्याचें ह्या लोकांवर

राज्य झाल्यापासून इतिहासांत पारसीक Persians ह्या नांवानें इ. स. पू. ५५० च्या सुमारास हे लोक प्रसिद्धीस आले. तत्पूर्वी पर्सु या नांवानें एक लहानसें कुळ म्हणून Ellipi च्या राज्यांत हे लोक फार पुरातनकालापासून म्हणजे इ. स. पू. ४००० पासून इतिहासप्रसिद्ध रहात होते. ह्या अप्रसिद्ध स्थितींत झर्तुष्त याच्या द्वारां त्यांच्या मूळ वैदिक धर्मांत इ. स. पू. १००० च्या सुमारास फरक झाला व तो विपर्यस्त धर्म इ. स. पू. ५०० नंतर बरेच पारसीक लोक स्वीकारते झाले.

पल्हव हा शब्द पार्थव शब्दापासून निघाला, असें कित्येक समजतात; परंतु तें बरोबर नाहीं. Parthians म्हणून ज्यांना Roman लोक म्हणत त्यांना भारतीय आर्य पारद म्हणत. हे लोक प्राचीन गांधाराच्या जवळ पुरातनकालीं राहात.

पल्हव हे पारसीक ह्या नांवानें इतिहासप्रसिद्ध होण्याच्या कालापूर्वी भारतवर्षांत शिरून दक्षिणेंत कालांतरानें पसरले व कांची येथें पल्लव या नांवानें राज्य करते झाले. पल्लव वैदिक धर्मानुयायी होते. तस्मात् झर्तुष्ताचा विपरीत धर्म स्वीकारण्यापूर्वी ते भारत वर्षांत आले असावेत.

Babylonians कोण ?

ह्या शब्दांतीलहि Y च्या स्थलीं U पाहिजे. भारतीय आर्य ज्यांना बर्बर म्हणत तेच हे Babylonians होत. बर्बर = बब्बल = बाबल, अशा परंपरेनें हा शब्द आला आहे. हे बर्बर लोकहि ब्राह्मणादर्शनानें व क्रियालोपानें चातुर्वर्ण्यभ्रष्ट होऊन वृषल झाले, असें शांतिपर्वाच्या पासष्टाव्या अध्यायांत सांगितलें आहे.

यवनाः किराता गांधाराश्चीनाः शबरबर्बराः ।
शकास्तुषाराः कंकाश्च पल्हवाश्चांध्रमद्रकाः ॥


(शांतिपर्व, ६५ अध्याय)

Babylonia त Sumer नांवाच्या आर्य लोकांचें B.c. ६००० पासून ४५०० पर्यंत राज्य होतें. नंतर. Semitic-Babylonians चें राज्य झालें. (H. H. of the World, Vol.I) व हा इतिहास त्यानें आपल्याहून प्राचीन अशा भूवर्णनांतून व इतिहासांतून घेतलेला आहे, केवळ आपल्या कल्पनेंतून काढिला नाहीं. हजारों राजांचीं नांवें व शेंकडों स्थलांचीं नांवें त्यानें नवीन कल्पिलीं, असें म्हणणें केवळ अज्ञानोज्जृंभणाचें होईल.

शक कोण व कोठले ?

Ellipi ऊर्फ इलावृत्त हा देश जंबुद्वीपाचा एक भाग होता. ह्यांच्यांत असूरांच्या कालीं Skythians ऊर्फ शक यांनीं स्वाऱ्या करून राज्यें किंवा लहान लहान

संस्थानें स्थापिलीं. हे शक लोक मूळचे कोठले ? ह्या प्रश्नाचें उत्तर पुराणांत सांपडतें. (१) जंबुद्वीप, (२) प्लक्षद्वीप, (३) शाल्मलद्वीप, (४) कुशद्वीप, (५) क्रौंचद्वीप, (६) शाकद्वीप व (७) पुष्करद्वीप, अशीं पृथ्वीवरील सात द्वीपें विष्णुपुराणांत सांगितलीं आहेत. ह्या सात द्वीपांची स्थिति खालील नकाशावरून लक्षांत येईल.



विष्णुपुराणकाराला सप्त द्वीपांची जी माहिती होती ती ह्या नकाशावरून स्थूल मानानें दिसून येईल. नकाशांत प्रथम मेरु कोठें आहे तो पाहावा. कारण ह्या पर्वताच्या अनुरोधानें पूर्वदिशानुक्रमानें विष्णुपुराणकारानें सप्तद्वीपांचें व विशेषतः जंबुद्वीपाचें भूवर्णन केलें आहे. सातीं द्वीपांच्यामध्यें जंबुद्वीप आहे व त्या जंबुद्वीपाच्या मध्यें उंच मेरु आहे, असें विष्णुपुराणाच्या द्वितीयांशाच्या द्वितीयाध्यायांत म्हटलें आहे. पुढील सर्व हकीगत विष्णुपुराणाच्या द्वितीयांशाच्या पहिल्या पांच अध्यायावरून घेतली आहे. तेव्हां ते अध्याय साक्षेपी वाचकांनीं पहावे.

जंबुद्वीप–

सध्यां युरोपियन नकाशांत काश्मीरच्या उत्तरेस एका बिंदूपासून सहा पर्वतांच्या रांगा निघालेल्या दाखविलेल्या असतात.

(१) हिमालय (२) काराकोरम (३) कुएनलुन (४) थिएनशान (५) हिंदुकुश व (६) सुलेमान. हे सहा पर्वत ज्या मध्यबिंदूपासून निघतात, त्याला विष्णुपुराणकार मेरु पर्वत म्हणतो. हा पर्वत भूपद्माच्या कर्णिकेसारखा आहे. ह्याच्या दक्षिणेस (१) हिमालय (२) हेमकूट व (३) निषध असे तीन वर्षपर्वत आहेत, आणि ह्याच्या उत्तरेस (४) नील (५) श्वेत व (६) शृंगी असे पर्वत आहेत. हिमालय प्रसिद्ध; हेमकूट म्हणजे हिंदुकुश व निषध म्हणजे सध्यांचा सुलेमान. हे मेरूच्या दक्षिणेकडील पर्वत झाले. नील म्हणजे काराकोरम, श्वेत म्हणजे कूरजनूल व शृंगी म्हणजे थियनशान हे मेरूच्या उत्तर दिशेकडील पर्वत होत. हे सहा पर्वत ज्या द्वीपांत आहेत त्याला जंबुद्वीप ही संज्ञा आहे. सध्यांच्या काश्मीरांत जम्मु म्हणून जो प्रांत व शहर आहे त्याच्या नांवांत प्राचीन जंबु हें नांव राहिलेलें आहे. जंबुद्वीपाचें (१) भारतवर्ष (२) किंपुरुषवर्ष (३) हरिवर्ष (४) रम्यक वर्ष (५) हिरण्मयवर्ष, (६) उत्तर कुरुवर्ष, (७) इलावृत्तवर्ष, (८) भद्राश्व वर्ष व (९) गंधमादन वर्ष असे नऊ विभाग आहेत; पैकीं पहिले तीन मेरूच्या दक्षिणेस व दुसरे तीन मेरूच्या उत्तरेस असून ह्या साहींच्या मध्यभागीं विस्तृत असें पश्चिमेस इलावृत्त वर्ष आहे, पूर्वेस भद्राश्व वर्ष आहे व मध्यें गंधमादन आहे. हिमालयाच्या दक्षिणेस व दक्षिणसमुद्राच्या उत्तरेस जें वर्ष आहे तें प्रख्यात भारतवर्ष होय. मानस-सरोवर ज्यामध्यें आहे ते भद्राश्व वर्ष आहे. सध्यांचें अफगाणिस्थान व पर्शिया ज्या टापूंत आहे तें पूर्वीचें इलावृत्त वर्ष होय, आणि मेरूच्या उत्तरेकडील जें वर्ष तें उत्तर कुरु वर्ष होय. इंद्रादि देवलोक जंबुद्वीपाच्या गंधमादन ऊर्फ मेरु प्रदेशांत अतिपुरातन कालीं रहात असत.

प्लक्षद्वीप

सध्यांचें आशियाटिक तुर्कस्थान, युरोपियन तुर्कस्थान व ग्रीस मिळून पूर्वीचें प्लक्षद्वीप होय. ग्रीक लोकांच्या इतिहासांत अति पुरातन लोकांचें Pelagic म्हणून जें नांव येतें त्यांत प्लक्ष हें प्राचीन नांव ओळखतां येतें. पलास्ग हा शब्द प्लक्ष या शब्दाचा अपभ्रंश आहे, यांत बिलकुल संशय नाहीं. Plasg ऊर्फ प्लक्ष लोक द्यौर, पूषन्, द्यावापृथ्वी, वगैरे देवतांचें स्तवन करीत. प्लक्ष-द्वीप क्षारोद समुद्राच्या भोंवतीं आहे. क्षारोद म्हणजे सध्यांचा भूमध्य समुद्र. प्लक्ष-द्वीपांत जंबुद्वीपांतल्या प्रमाणेंच आर्यक, कुरव, विविंश व भाविन असे चार वर्ण असत.

प्लक्षद्वीपादिषु ब्रह्मन् शाकद्वीपांतिकेषु च ।

[विष्णुपुराण, द्वितीयाध्याय, श्लोक १५]

ह्या श्लोकार्धावरून असें दिसतें कीं, शाल्मल, कुश आणि क्रौंच हीं द्वीपें प्लक्ष व शाक द्वीपाच्या मध्यें होतीं. ह्यांत वर्णाश्रमसंस्था होत्या.

शाल्मलद्वीप

सध्यांचा Black Sea म्हणजे इक्षुरसोद. त्याच्या व Caspian Sea च्या मधील टापू जो तो शाल्मल द्वीप. ह्यांतहि चातुर्वर्ण्यसंस्था होती. कपिल, अरुण पीत, व कृष्ण हीं तेथील वर्णांचीं नांवें होतीं.

कुशद्वीप

सध्यांचा Caspian Sea म्हणजे सुरोद व Aral Sea म्हणजे घृतोद. ह्या दोन समुद्रांमधील जो प्रदेश तो कुशद्वीप. दमिन्, शुष्मिन्, स्नेह व मंदेह असे तेथें चार वर्ण होते. कुशद्वीप हिंदुकुश पर्वताच्या उत्तरेस होतें. इतिहासांत असुर व बर्बर लोक कुशद्वीपांतील लोकांना Ko-ssæans असें म्हणत.

B. C. 1785. The Kossæans from the mountains of Elam established a dynasty over Babylonia,

— (H. H. of the World, Vol. I. Page 528)

Kadphises व कनिष्क हे कुश ऊर्फ कुशन Kushan होते. To the east of the Tigris, far in to the hathless districts of the Lagros mountains, dwelt the warlike races of the Kossæans (H. H. of the World Vol. I. Page 341).

क्रौंचद्वीप

घृतोदाच्या पश्चिमेस क्रौंचद्वीप. सध्यांचीं समरकंद व बुखारा शहरें ज्या प्रदेशांत आहेत तो टापू. ह्यांतहि चातुर्वर्ण्य होतें. ह्याचें नांव असूर असून इतिहासांत मला सांपडलें नाहीं.

शाकद्वीप

क्रौंचद्वीपाच्या पूर्वेस उत्तर समुद्राच्या व अलताई पर्वताच्या दिशेनें शाकद्वीप होतें. ह्या द्वीपांत मग, मशक, मानस व मंदग असे चार वर्ण होते. त्यांची हकीगत पहिल्या कलमांत दिलीच आहे. हे लोकसंख्येनें फार असून, यांचें नांव इतिहासांत फार येतें,

संग्रहाचा क्र. ... २३३८५ दि: ...
... ९१३८ नों: दि: २१/७/५४

पुष्करद्वीप

सध्यांच्या चीन देशाच्या उत्तरेकडील जो भाग तो पुष्करद्वीप. ह्यांत सर्व लोक एकवर्णी असत. कुएनलुन पर्वतानें ह्या पुष्करद्वीपाचे दोन विभाग झाले होते. हा कुएनलुन मानसोत्तर ह्या नांवानें विष्णुपुराणकाराला माहीत होता.

एकश्चात्र महाभाग प्रख्यातो वर्षपर्वतः ।
मानसोत्तरसंज्ञो वै मध्यतो वलयाकृतिः ॥ ७५ ॥
पुष्करद्वीपवलयं मध्येन विभजन्निव ।
स्थितोऽसौ तेन विच्छिन्नं जातं तं वर्षकद्वयं ॥ ७७ ॥

(विष्णुपुराण, द्वितीयांश अध्याय ४)

विष्णुपुराणांतील वरील वर्णनावरून शाकद्वीप कोठें होतें, तें कळून येईल. जंबुद्वीपाच्या पश्चिमेस प्लक्षद्वीप व पूर्वेस पुष्करद्वीप, जंबुद्वीपाच्या उत्तरेस शाल्मलद्वीप, क्रौंचद्वीप व शाकद्वीप आणि ह्या सर्वांच्यामध्यें जंबुद्वीप. जंबुद्वीपाचा जो दक्षिण-भाग तो भारतवर्ष. पश्चिमभाग तो इलावृत्त; उत्तरभाग तो कुरुवर्ष व पूर्वभाग तो भद्राश्ववर्ष. उत्तरकुरुवर्षाच्या उत्तरेस उत्तरसमुद्रापर्यंत जो प्रदेश तो शाकद्वीप.

विष्णुराणकाराला पृथ्वीची ही अशी माहिती होती, प्रत्येक द्वीपांतील वर्ष, पर्वत, नद्या, सरोवरें व लोक ह्यांची बरीच बारीक माहिती हा पुराणकार देतो. वर्ष, पर्वत, नद्या, सरोवरें व लोक ह्यांचीं नांवेंहि देतो. हे विभाग व हीं नांवें तो आपल्या कल्पनेंतून काढून बाष्कळपणानें केवळ कादंबरीवजा देतो, असें म्हणणें निव्वळ अन्या-यायाचें होईल. शिवाय बर्बर, असुर व यवन लोकांच्या इतिहासांत विष्णुपुराणकारानें दिलेल्या कांहीं देशांचीं व लोकांचीं नांवें सांपडतात तीं अशीं –

जम्मू = जंबु; हिंदुकुश = हेमकूट; Elam इलावृत्त; Asshur = असूर; Babylon = बर्बर; Pelasg = प्लक्ष; Kossæan = कुश; Skythian = शक; Barses = पारस; Parsu = पल्हव, वगैरे नांवांचीं साम्यें कांहीं आक-स्मिक कादंबरीवजा नव्हत. पुरातन भूवर्णन जें त्याला माहीत होतें तें विष्णुपुराण-कार देत आहे. विष्णुपुराण शकाच्या चवथ्या पांचव्या शकांत रचिलें असेल. परंतु द्वितीयांशाच्या पहिल्या पांच अध्यायांत व चतुर्थांशाच्या चोवीसपर्यंतच्या अध्या-यांत पुरातन भूस्थितीचें व इतिहासाचें वर्णन तो करीत आहे यांत संशय नाहीं.

असुर कोण ?

अश्शुर, Asshur, असूर, असुर हे लोक वर्तमान तैग्रिस नदीच्या व Babylonia च्या उत्तर प्रदेशांत राहणारे लोक. ह्यांनीं निनेव्हे येथें इ. पू. १८३० पासून इ. पू. ५३८ पर्यंत राज्य व पातशाहत केली. ह्यापूर्वीं हे लोक स्वतंत्र राज्य करून नव्हते, Babylonia च्या अमलाखालीं होते. Semitic Babylonians

चे हे संबंधीच होते; परंतु वंशानें शुद्ध Semitic होते. Babylonians सारखी sumer लोकांच्या रक्ताची त्यांच्यांत भेसळ झाली नव्हती. हे असुर लोक धिप्पाड बांध्याचे असत. शत्रूशीं ह्यांची वागणी अत्यंत क्रूर तऱ्हेची व बीभत्स असे. जित शत्रूशीं सभ्य तऱ्हेनें वागण्याची जी आर्यांची चाल ती ह्या असुरांना पसंत नसे. भारतीय पुराणांतून व इतिहासांतून ह्यांचीं वर्णनें सांपडतात त्यांचा व युरोपिअन इतिहासकारांनीं केलेल्या ह्यांच्या वर्णनांचा तंतोतंत मेळ बसतो. तेव्हां असुर्या किंवा असूर्या देशांतील हे असुर लोक पुराणांतील व इतिहासांतील असुर होत, ह्यांत बिलकुल संशय नाहीं. युरोपिअन इतिहासकारांच्या व संशोधकांच्या ही तादात्म्यता ध्यानांत आली असावी. परंतु ती स्पष्टपणें सांगावयास ते अद्याप कचरतात. कारण उघड आहे. Semitic जे असुर त्यांच्यापासून यहुदी संस्कृति निष्पन्न झाली व यहुदी धर्म निष्पन्न झाला आणि तो धर्म सध्यांच्या युरोपिअन लोकांनीं स्वीकारला. क्रूर व असभ्य जे असुर त्यांच्याशीं संबंध कबूल करणें किंचित् लांछनास्पद तर खरेंच. परंतु शास्त्र व सत्य ह्यांच्या संशोधनांत तें काय होय ?

इ. पू. १८३० त निनेव्हे येथें राज्य स्थापण्यापूर्वी इ. पू. ७००० पर्यंत हे लोक लहानसहान संस्थानें करून Babylonia च्या Sumerian आर्य व Semitic राजांच्या अंमलाखालीं असतांना भारतवर्षांत हे लोक आले असावे, असें विधान करण्यास आधार आहे. कृष्ण व पांडव यांच्या कालीं, बकासुर, जरासंध, शिशुपाल, कंस, मयासुर वगैरे बऱ्याच असुरांचीं नावें प्रसिद्ध होतीं. ह्यांपैकीं कांहींना पांडवांनीं मारलें व कांहींना कृष्णानें मारिलें. हे असूर भारतवर्षांत केव्हां आले. इ.स.पू. १८३० पासून इ.स. पू. ५३८ पर्यंतच्या काळांत असुरांचें राज्य सध्यांच्या अफगाणिस्थान व बलुचिस्थान ह्यांच्यापर्यंत देखील कधीं पोहोंचलें नाहीं. तेव्हां इ. स. पू. १८३० च्या पूर्वी Babylonian Semitic राज्य असतांना, परंतु बहुशः Sumerian आर्यांचें Babylon येथें राज्य असतांना, हे असुर लोक भारतवर्षांत आले असल्याचा बळकट संभव आहे; आणि असा जर संभव आहे, तर कृष्णार्जुनांचा काळ इ. पू. १८३० च्या हजार बाराशें वर्षें पाठीमागला असावा असें मानण्याकडे दाट प्रवृत्ति होते. अय्यर वगैरे कित्येक गृहस्थ युधिष्ठिरकाल इ. पू. ११७६ त सुरू झाला असें म्हणतात. कित्येक लोक त्याच्या पाठीमागें पांचचारशें वर्षें जातात. परंतु कृष्णयुधिष्ठिरांच्या काळीं भारतवर्षांत मगध, मथुरा, काठेवाड वगैरे प्रदेशांत असुरांचीं राज्यें असण्याचा इ. पू. १८३० च्या अलीकडे संभवच नसल्यामुळें, परंपरागत इ. पू. ३१७६ किंवा ३१०२ किंवा ३०७६ हाच युधिष्ठिरकाल मान्य करावा, हें युक्तिसिद्ध दिसतें.

अशी खात्री वाटते कीं, असुर व बर्बर लोकांचे इष्टिकालेख जसजसे प्रकाशांत येतील, तसतसा भारतवर्षाच्या प्राचीन इतिहासावर उजेड पडून, इतिहास, पुराणें व

ब्राह्मणें ह्यांतील उल्लेख स्पष्ट कळूं लागतील. ह्या असुर व बर्बर इष्टिकालेखाचे नीट अर्थ उकलण्यास हिंदु लोकांनींहि झटलें पाहिजे.

शितिरपर्ण व एपर्ण—

This gave Esarhaddon an opportunity to revenge himself on the Medes and to conduct a war against their country with great persistance. He penetrated further into it than any of his forefathers-namely to the land of Patusharra (Patiskhoria), which lay deep in Median territory, in the neighbourhood of the Bikni Mountains, where so much cristal was found. There ruled Chitir-Parna and Eparna, two powerful princes whose names appear to be Iranian (Historians History of the World; Vol. I. Page : 425).

ह्या उताऱ्यांत Shitir-parna व Eparna अशीं पर्णशब्दान्त नांवें आलीं आहेत. ह्या दोन नांवांसारखीं नांवें भारतवर्षाच्या इतिहासांत कोठें आलीं आहेत कीं काय तें पाहूं. आंध्रभृत्यांच्या शिलालेखांत व नाण्यांवर नहपान व चतुरपन अथवा चतरपन अशीं नांवें आलेलीं आहेत. (Bombay- Gazetteer Vol. I, Part II Page-154). नहपान does not look like a Greek name. He must have been, therefore, either a Saka or Pahlava (कित्ता Page-155.) असें डॉ. भांडारकर म्हणतात. चतुरपन किंवा चतरपन हें नांव Shitir-parna ह्या असुरलेखांतील नांवासारखें दिसतें. हें Shitir-parna नांव पल्हवाचें म्हणजे Iranian आहे. त्याप्रमाणेंच चतरपन व नहपान हीं नांवें पल्हवांचीं आहेत असें वाटतें. पल्हव लोकांत क्षत्रअैपति (संस्कृत क्षत्रपति, ग्रीक Satrap) ही पदवी होती. नहपान हा महाक्षत्रप होता.

पर्ण–पण्ण–पाण

नहपान हा शब्द नहपाण असा असावा. चतरपण हा शब्द चतरपण्ण असा द्वित्त णकारयुक्त असावा.

Historians' History of the World मधील वरतीं दिलेल्या उताऱ्यांतील हकीकत इ. पू. ५७३ नंतरची आहे. तदनंतर हे पल्हव दोन चार शतकांनीं पंजाब, माळवा, काठेवाड, गुजराथ या दिशेनें कांचीपर्यंत पसरले. कांचीस पल्हव या नांवानें ते प्रसिद्ध झाले.

Cimerians कोण ?

ह्या शब्दांत 'C' च्या बद्दल 'K' पाहिजे. खरा उच्चार Kimmerians असा आहे. Attention may be called to an expedition against Teushpa, the king of kimmirians or Commerians, or more accurately against the Ummanmanda, who dwelt at a great distance, and who were afterwards to be the cause of so much trouble to Asshur and Babylon. (H. H. W. Vol. I. Page 422).

किंपुरुष, किन्नर हे शब्द भारतीय इतिहासांत व पुराणांत प्रसिद्ध आहेत. ह्या किंनरांना Kimnar च ग्रीक इतिहासकार Kimmerians म्हणत असें दिसतें. जंबुद्वीपांतील किंपुरुषवर्ग किंवा किन्नरवर्ष हा एक भाग होता. हे किन्नर लोक शक किंवा मंद लोकांकडून भिन्न होते. Historians' History of the World चा कर्ता यांची गणना मंदांत करतो, तें चुकीनें करतो असें दिसतें.

देव कोण व मानव कोण ?

जंबुद्वीपाच्या मधोमध असणारा जो मेरु पर्वत याच्यावर व आसपास राहणारे जे लोक ते देव.

चतुर्दश सहस्राणि योजनानां महापुरी ।
मेरोरुपरि मैत्रेय ब्राह्मणाः प्रथिता दिवि ॥ २९ ॥
तस्याः समंततश्चाष्टौ दिशासु विदिशासु च ।
इंद्रादिलोकपालानां प्रख्याताः प्रवराः पुरः ॥ ३० ॥

इंद्रादि देवांचें स्थान मेरु पर्वताभोंवतीं होतें, अशी विष्णुपुराणकारांची माहिती होती. ह्या देवांचे मानव हे अनुचर होत. पुढें भारतवर्षांत वसती केल्यावर हे भारतीय आर्य या नांवानें प्रख्यात झाले. पराक्रमी लोकांना ईश्वरांश समजणारे मानव ह्या देव नामक लोकांना फार पुरातन कालापासून ईश्वरांश समजत. हे देव लोक फार पुरातनकालीं नष्ट झाले असावे.

विश्वसनीय व अविश्वसनीय

येणेप्रमाणें (१) मेद, (२) मंद, (३) शक, (४) असुर, (५) बर्बर, (६) सुमेर, (७) पर्सु, (८) पल्हव, (९) पारसीक, (१०) कुश, (११) प्रश्न, (१२) किन्नर, (१३) कंबोज, (१४) देव, (१५) मानव, हे पंधरा लोक कोण व कोठील, याचा इतिहास पुराणांवरून व असुर लोकांच्या इतिहासावरून सांगितला. त्यावरून असें दिसून येतें

कीं, भारतांतून नमूद केलेले वृत्तान्त बऱ्याच अंशानें विश्वसनीय आहेत. हा विश्वसनीय वृत्तांत कांहीं अविश्वसनीय बाबींनीं संवलित झालेला आहे. तो प्रमाणच्छुरिकेनें काढून टाकून, विश्वसनीय वृत्तान्त निवडण्याचीं जीं साधनें असुरादि लोकांच्या इतिहासाच्या अस्सल लेखांत सांपडतात, त्यांचा योग्य उल्लेख केला पाहिजे. उदाहरणार्थ, मेरुपर्वताची जंबुद्वीपांत स्थिति कोठें आहे हें योग्य प्रमाणानें निश्चित केल्यावर मेरुपर्वताची लांबी, रुंदी, उंची व विस्तृति जी विष्णुपुराणांत दिली आहे ती अयथार्थ आहे, असें निश्चित करावें लागतें. एकूण सांगण्याचा मुद्दा एवढाच कीं, पुराणें व इतिहास यांतील मजकूर पारखून घेतला पाहिजे व घेतां येण्यासारखा आहे. प्रायः असें आढळून येतें कीं, पुराणकार जो वृत्तान्त देतांत तो ते कोठें कोठें त्याच्याहून अति प्राचीन अशा इतिहासांतून व आख्यायिकांवरून देतात; इतकेंच नव्हे तर, ज्या प्राचीनतम इतिहासाची व भूभागाची ते माहिती देतात ती माहिती त्यांनीं स्वतः प्रत्यक्ष खरी खोटी पाहून दिलेली नसते. त्यांच्या कालीं प्रचलित असलेल्या भाबड्या समजुती व अयथार्थ दुष्ट ग्रह ह्यांचा जोड ते प्राचीन वास्तव इतिहासकथांना देतात ही गोष्ट सिद्ध आहे. उदाहरणार्थ, भूतलोकांची हकीकत पुराणकार देत आहेत, असें समजा. तर सध्यांच्या भूतान, भूतस्थान ह्या देशांतील जे लोक ते भूत होत, हें त्यांना माहीत नसतें. भूत म्हणजे प्रेतादिवर्गांतील व्यक्तिसमूह, असा त्यांचा समज असतो. ह्या समजाच्या जोरावर ते भूत लोकांच्या फार विलक्षण कादंबऱ्या सजवितात.

भूतभाषामयीं प्राहुरद्भुतार्थां बृहत्कथाम् ।

बृहत्कथा भूतभाषेंत लिहिली गेली, असें या श्लोकार्धांत दंडी म्हणतो. भूतान, भूतस्थान, ह्या देशांत राहणाऱ्या पिशाच्च नामक लोकांच्या पैशाची किंवा भूतभाषेंत बृहत्कथा लिहिली, असा वास्तविक अर्थ आहे. आमचे पुराणकार ह्या श्लोकार्धाचा असा अर्थ करतील कीं, बृहत्कथा भूतांच्या म्हणजे प्रेतांच्या भाषेंत लिहिली गेली. पुराणकारांचा हा गचाळपणा कित्येक प्रमाणाप्रमाणज्ञ आधुनिक पंडितांनाहि पछाडतो. डॉक्टर भांडारकर भूत ह्या शब्दाचा अर्थ Goblins असा करतात. A work of the name of बृहत्कथा written in that form of the प्राकृत, which is called the पैशाची or the language of the goblins is mentioned by दंडिन् in his work the काव्यादर्श (Bhandarkar's History of the Deccan....Section II).

तात्पर्य, पुराणें व इतिहास ह्यांच्यांत जो प्राचीन वास्तव इतिहास आहे, त्याच्यावरील गचाळपणाचीं मलिन व खुळचट पटलें काढून टाकून आधुनिक शोधांच्या साहाय्यानें तो नीट तपासून निवडला पाहिजे.

सहा द्वीपांतील चातुर्वर्ण्य

प्लक्षद्वीप, शाल्मलद्वीप, कुशद्वीप, क्रौंचद्वीप, शाकद्वीप, व जंबुद्वीप या सहा द्वीपांत अतिप्राचीन कालीं चातुर्वर्ण्य संस्था होती, असें विष्णुपुराणकार प्राचीन वर्णन आपल्या पराणांत देतो. म्हणजे प्राचीन कालीं सध्यां ज्या देशांना Greece, Macedonia, Turky, Egypt, Turky in Asia, Persia, Caucasian Regions, Turkestan, Afaganistan, Pamir, India वगैरे नांवें आहेत त्या सर्व देशांत प्राचीनकालीं चातुर्वर्ण्य समाजसंस्था होती, असा अर्थ होतो. पुराणकारांची त्याच्याहून प्राचीन माहितीहि अशी होती. तिला वर्तमान युरोपियन शोधकांच्या माहितीचा प्रत्यंतर पुरावा मिळतो कीं काय तें पाहूं:—

"The President de Goguet is of opinion that a division of the people into tribes and hereditary professions similar to that of the Hindoos existed in the ancient Assyrian empire, and that it prevailed from the highest antiquity over almost all Asia Cecrops distributed into four tribes all the inhabitants of Attica; Theseus afterwards made them three by uniting, as it should seem, the sacerdotal class with that of the nobles or Magistrates. They consisted then of nobles and priests, labourers, or husbandmen, and artificers, and there is no doubt that, like the Egyptians and Indians they were hereditary. Aristotle expressly informs us that in Crete the people were divided by the laws of Minos into classes after the manner of the Egyptians. We have most remarkable proof of a division, the same as that of the Hindoos, anciently established among the Persians. In the Zendavesta, is the following passeage.

"Ormuzed said: There are three measures of conduct, four states and five places of dignity. The states are- that of the priests; that of the soldier; that of the husbandman, the source of riches; and that of the artisan or labourer." There are sufficient vestiges to prove an ancient establishment of the same sort among

the Buddhists of Ceylon and by consequence to infer it among the other Buddhists over so large a bortion of Asia.–H. H. W. Vol. II. Page 515.

सारांश आधुनिक शोधकांचें व प्राचीन पुराणकारांचें ह्या बाबतींत एकमत आहे. दोघांचीहि माहिती परस्पर स्वतंत्र आहे. तेव्हां ती केवळ सिद्धान्तरूप आहे.

ग्रीसपासून चीनपर्यंत जो विस्तीर्ण भूभाग आहे, त्यांत ज्या प्राचीन काळीं चातुर्वर्ण्य समाजव्यवस्था नांदत होती तो काळ कोणता ? माझ्या मतें तो काळ इ. स. ७०० च्या सुमाराचा असावा. त्याकाळीं Babylonia त सुमेर नामक आर्य लोकांचें राज्य होतें व अर्वाचीन ग्रीस देशांत प्रक्ष Pelasg नामक लोक रहात होते.

ह्या चातुर्वर्ण्यबद्ध देशांतून, शक, यवन, पल्हव, पारसिक वगैरे लोक इ. स. पू. २०० पासून भरतखंडांत येत होते. व यद्यपि त्या कालीं त्यांच्यांतून चातुर्वर्ण्य संस्था नष्ट झाली होती, तथापि तिची स्मृति त्यांच्यांतून फारशी बुजून गेली नव्हती. त्यामुळें सूर्य, विष्णु, शिव या देवता कांहीं त्यांना नवीन नव्हत्या. तसेंच हिंदु लोकांनीं जसा बौद्ध धर्म स्वीकारला तसा ह्याहि लोकांनीं सहज स्वीकारला. शक, यवन, पल्हव, या चातुर्वर्ण्यहीन लोकांना याहून तत्कालीन भारतीय आर्यांना कांही नवल वाटलें नाहीं. हे लोक पूर्वी आपल्यासारखेच चातुर्वर्ण्यबद्ध होते, ही गोष्ट तत्कालीन आर्यांना पक्की माहीत होती, हें भारत व पुराणें ह्यांवरून स्पष्ट आहे. शक, यवन, पल्हव, यांना भारतीय आर्य अगदीं परकी समजत नसत. आपल्याच शेजारचे व अंशतः आपल्याच पैकीं हे चातुर्वर्ण्यभ्रष्ट लोक आहेत, अशी यथार्थ समजूत त्या कालीं होती. शक, यवन, पल्हवादि लोकांना सूर्यादि देवतांची उपासना करतांना पाहून कित्येक आधुनिक शोधकांना असें वाटतें कीं, ह्या लोकांनीं भारतवर्षांत आल्यावर हिंदुत्वाचा स्वीकार केला व तत्पूर्वी हे लोक हिंदू नव्हते. वस्तुस्थिति काय होती, तें वरील विवेचनावरून यथास्थित ताडतां येण्यासारखें आहे.

भारतवर्षाच्या दक्षिणेकडील देश

हिमालयाच्या दक्षिणेस, समुद्राच्या उत्तरेस व विंध्याच्या उत्तरेस असणारा जो मुलुख त्याला भारतवर्ष हें नांव पडण्यापूर्वी जम्मूच्या दक्षिणेकडील लहानशा भागाला प्राचीनकाळीं भारतवर्ष ही संज्ञा होती. पुढें भारतीय प्रजा जसजशी पसरत चालली तसतसें भारतवर्ष हें नांवहि विस्तृत प्रदेशाला म्हणजे हिमालयाच्या दक्षिणेकडील व विंध्याच्या उत्तरेकडील साऱ्याच प्रदेशाला लावलें जाऊं लागलें. आतां तर हें नांव कन्याकुमारीपर्यंतच्या सर्व हिंदुस्थानाला लावतात. परंतु प्राचीनकाळीं हें नांव जम्बूच्या दक्षिणेकडील लहानशा टापूला लावीत, हें वर सांगितलेंच आहे. ह्या टापूच्या दक्षिणेस पश्चिमेच्या बाजूनें वरुणलोक व पाताळलोक ऊर्फ नागलोक ऊर्फ सध्यांचें कोकण असे,

७

'मग' ब्राह्मण कोण ?

डॉक्टर भांडारकरांची भलती वाट

डॉक्टर भांडारकर यांनीं पांच महिन्यांपूर्वीं पुण्यास फडक्यांच्या वाडयांत एक व्याख्यान दिलें. त्यांत त्यांनीं एके स्थळीं असें प्रतिपादन केलें कीं, अनार्य, जे 'मग' त्यांना ब्राह्मण बनवून एका देवळाचे पुजारी केल्याचा एका शिलालेखांत उल्लेख सांपडतो. ह्या विधानांत 'मग' हे मूळचे अनार्य होते व नंतर आर्यांच्या चातुर्वर्ण्यांत त्यांचा समावेश झाला असें सांगण्याचा डॉक्टरांचा हेतु होता. डॉक्टरांचें हें विधान कितपत साधार आहे, तें येथें पाहण्याचा इरादा आहे.

इसवी सन १८७९ त वेबरनें कृष्णदासमिश्रकृत मगव्यक्तिनामक चोपडयावर बर्लिनांतील Mocatoc Ichte मध्यें एक लेख लिहून असें प्रतिपादिलें कीं, ख्रिस्ती शकाच्या पहिल्या दोन शतकांत मिश्राची पूजा करणारे 'मग' हिंदुस्थानांत आले व त्यांचा समावेश ब्राह्मणांत त्यावेळीं झाला. म्हणजे 'मग' हे पूर्वींचें ब्राह्मण नसून नंतर ब्राह्मण बनविले गेले, असा वेबरचा अभिप्राय १८७९ त होता. पुढें १८८५ त त्याला असें साश्चर्य आढळून आलें कीं, काशींतील कित्येक पंडितांना 'मग' हे उत्तम ब्राह्मण आहेत हें मत सर्वस्वी ग्राह्य आहे. आश्चर्य वाटण्याचें कारण एवढेंच कीं, अनार्य जे 'मग' त्यांना ब्राह्मण्याचें आदिपीठ जें काशीक्षेत्र तेथील ब्राह्मण श्रेष्ठ समजतात. वेबरची चूक येथें जी झाली ती अशी :– 'मग' पूर्वी अनार्य होते, असें वेबरनें आपलें निराधार मत करून घेतलें व नंतर काशीस्थ ब्राह्मणांना अनार्य मगांचें ब्राह्मण्य कसें पसंत पडलें याचें त्याला आश्चर्य वाटलें ! वस्तुस्थिति अशी होती कीं, 'मग' हे पुरातन कालापासून ब्राह्मणांत मोडत असत, हें काशीक्षेत्रस्थ पंडित जाणून होते व वेबर जाणत नव्हता. भविष्यमहापुराणांत व बृहत् संहितेंत मगांचा उल्लेख आहे; एवढेंच वेबरला माहीत. ह्यापलीकडे वेबरची माहिती नव्हती; ही माहिती काशीस्थ पंडितांना होती. अर्थात् वेबरच्या अध्र्याकच्च्या मताहून काशीस्थ पंडितांचें मत निराळें पडलें.

अपूर्ण माहितीमुळें व यूरोपियनांना सर्वसाधारण असलेल्या पूर्वग्रहामुळें वेबरची फसगत कशी झाली, तें समजण्यासारखें आहे. परंतु आपल्या इकडील लोकांनीं वेबरच्या प्रमाणेंच आपली फसगत करून कां घ्यावी ? तें समजणें जरा कठीण आहे.

डॉक्टर भांडारकर यांना पूर्वपरंपरा समजण्याचे अनेक मार्ग आहेत. काशीस्थ पांडितांचें मत व मनोरचना त्यांना कळण्यासारखी आहे; आणि पुरातन इतिहास, संप्रदाय व परंपरा यूरोपियन पंडितांहून, त्यांना कळण्याची सोय मुबलक आहे. असें असून डॉक्टर असें भलत्या वाटेनें कां जातात ? यूरोपियन लोक ठरवतील तोच इतिहास व ते सिद्ध करतील तेच ऐतिहासिक सिद्धान्त. त्यांच्या पलीकडे पाहण्याचें धैर्य आपल्या इकडील शोधकांनीं दाखवूं नये, हें आश्चर्य होय.

वराहमिहिरावरून निघणारी माहिती

वराहमिहिराच्या बृहत्संहितेच्या प्रतिमाप्रतिष्ठापर्व नामक साठाव्या अध्यायाच्या एकोणिसाव्या श्लोकांत 'मग' शब्द आला आहे.

विष्णोर्भागवतान् मगांश्च सवितुः शंभोः सभस्मद्विजान् ।
मातृणामपि मातृमंडलविदो विप्रान् विदुर्ब्रह्मणः ॥
शाक्यान् सर्वहितस्य शांतमनसो नग्नान् जिनानां विदुः ।
ये यं देवमुपाश्रिताः स्वविधिना तैस्तस्य कार्या क्रिया ॥ १९ ॥

मराठी अर्थ :—

स्वकीय शास्त्रानें ज्यानें ज्या देवाचा उपाश्रय केला आहे त्यानें त्या देवाची (स्थापनादि) क्रिया करावी. विष्णूचें भागवत, सूर्याचे मग, शिवाचे भस्मधारणकर्ते द्विज (ब्राह्मणादि) मातृगणांचे मातृमंडळवेत्ते, ब्रह्म याचे ब्राह्मण, बुद्धाचे शांतमन, शाक्य व जिनांचे नग्न (क्षपणिक) क्रिया करणारे सांगितले आहेत.

ह्या श्लोकांत सूर्याची क्रिया मगांनीं करावी, एवढेंच सांगितलें आहे. 'मग' हे ब्राह्मण आहेत कीं शूद्र आहेत कीं म्लेंच्छ आहेत, ह्याचा निर्देश बिलकुल केला नाहीं.

स्वतः वराहमिहिर, सूर्योपासक होता. त्याच्या बापाचें नांव आदित्यदास. तो आवंत देशांतील उज्जयनी शहरीं रहात असे. तो ब्राह्मण होता कीं शूद्र होता कीं म्लेंच्छ होता तें स्पष्ट कोठें सांगितलेलें नाहीं.

आदित्यदासतनयस्तदवाप्तबोधः ।
कापित्थके सवितृलब्धवरप्रसादः ॥
आवंतको मुनिमतान्यवलोक्य सम्यग् ।
घोरां वराहमिहिरो रुचिरां चकार ॥ ९ ॥

— बृहज्जातक – अध्याय २८.

वराहमिहिर शक ४२७ त होता. वराहमिहिर हें नांव खरें पाहिलें तर संस्कृत नाहीं, अर्वाचीन संस्कृतांत मिहिर, मिहर हा शब्द आहे. परंतु तो मिश्र ह्या झेंद

शब्दावरून साधलेला दिसतो. मिथ्र = मिथर, मिथिर = मिहर, मिहिर. वराह हा शब्द हउर या झेंद शब्दापासून संस्कृतांत आलेला असावा. हउर = हवर = वरह = वराह. एकूण-- हाउरमिथ्र = वराहमिहिर.

सारांश, नांवावरून तरी वराहमिहिर भारतवर्षीय वंशाचा दिसत नाहीं; भारताच्या बाहेरचा दिसतो. परंतु हा प्रश्न कांहीं प्रस्तुत नाहीं. 'मग' लोकांची परंपरा आपल्याला पहावयाची आहे. कदाचित् वराहमिहिर 'मग' असेल, ह्या तर्कानें त्याच्या नांवाची व्युत्पत्ति करण्याचा प्रयत्न केला.

पुराणांतील पुरावा

भविष्य पुराणाच्या ब्राह्मण पर्वाच्या अनेक अध्यायांत (१३९-१७१) मगांची विस्तृत हकीकत दिली आहे.

जंबुद्विपात्परं यस्माच्छाकद्वीप इति स्मृतः ।
तत्र पुण्या जनपदाश्चतुर्वर्णसमन्विताः ॥ ७३ ॥
मगाश्च मगगाश्चैत्र गानगा मंदगास्तथा ।
मगा ब्राह्मणभूयिष्ठा मगगाः क्षत्रियाः स्मृताः ॥ ७४ ॥
वैश्यास्तु गानगा ज्ञेयाः शूद्रास्तेषां तु मंदगाः ।
न तेषां संकरः कश्चिद्धर्माश्रयकृतां क्वचित् ॥ ७५ ॥
तेभ्यो वेदास्तु चत्वारः सरहस्या मयोदिताः ॥ ७६ ॥
मामेव ते च ध्यायंते यजंते मां च नित्यशः ॥ ७८ ॥
अव्यंगधारिणश्चैव विधिदृष्टेन कर्मणा ॥ ७९ ॥
तान् मगान् मम पूजार्थं शाकद्विपादिहानय ॥ ८३ ॥

-- भविष्यपुराण-ब्राह्मणपर्व- अ. १३९.

विष्णुपुराणाच्या द्वितीयांशाच्या चौथ्या अध्यायांत खालील श्लोक आहेतः--

धर्महानिर्न तेष्वस्ति न संघर्षः परस्परं ।
मर्यादाव्युत्क्रमो नापि तेषु देशेषु सप्तसु ॥ ६८ ॥
मगाश्च मागधाश्चैव मानसा मंदगास्तथा ।
मगा ब्राह्मणभूयिष्ठा मागधाः क्षत्रियास्तु ते ॥ ६९ ॥
वैश्यास्तु मानसा ज्ञेयाः शूद्रास्तेषां तु मंदगाः ।
शाकद्वीपे तु तैर्विष्णुः सूर्यरूपधरो मुने ॥ ७० ॥

महाभारताच्या भीष्मपर्वाच्या अकराव्या अध्यायांत मगादींचा येणें प्रमाणें उल्लेख आहेः--

तत्र पुण्या जनपदाश्चत्वारो लोकसंमताः ॥ ३५ ॥
मंगाश्च मशकाश्चैव मानसा मंदगास्तथा ।

मंगा ब्राह्मणभूयिष्ठाः स्वकर्मनिरता नृप ॥ ३६ ॥
मशकेषु च राजन्या धार्मिका सर्वकामदाः ।
मानसाश्च महाराज वैश्यधर्मोपजीविनः ॥ ३७ ॥
शूद्रास्तु मंदगा नित्यं पुरुषा धर्मशीलिनः ॥
एतदेव च श्रोतव्यं शाकद्वीपे महौजसि ॥ ३८ ॥

म्हणजे,

भविष्यपुराणः-- मग, मगग, गानग, मंदग.
विष्णुपुराणः-- मग, मागध, मानस, मंदग.
महाभारतः-- मंग, मशक, मानस, मंदग.

असे निरनिराळे पाठ आहेत. पैकीं भारतांतील (कुंभकोणप्रत) मंग पाठ चुकीचा आहे; तेथें 'मग' असा पाठ पाहिजे. शाकद्वीपांतील क्षत्रिय व वैश्य ह्या दोन वर्णांचें खरें नांव काय होतें तें नक्की ठरविण्यास सध्यां इतर कांहीं मार्ग नाहीं. शाकद्वीपांतील शूद्रांना मंदग म्हणत, ह्याचा निर्देश मागें झालाच आहे. इतकें मात्र निश्चित कीं, शाकद्वीपांत 'मग' नांवाचें ब्राह्मण पुरातनकालीं असलेले भारतकर्त्याला, विष्णुपुराणकर्त्याला, व भविष्यपुराणकर्त्याला माहीत होते. जंबुद्वीपांतल्याप्रमाणेंच शाकद्वीपांत स्वधर्मनिष्ठ असे ब्राह्मण-क्षत्रिय-वैश्य-शूद्रसम मग, मागध, मानस, मंदग नामक चार वर्ण पुरातनकालीं होते. ह्यांच्यांत चारहि वेद असत, परंतु विपरीत असत.

ब्राह्मणानां यथा प्रोक्ता वेदाश्चत्वार एव तु ॥ ३५ ॥
ऋग्वेदोऽथ यजुर्वेदः सामवेदस्त्वथर्वणः ।
ब्राह्मणोक्तास्तथा वेदा मगानामपि सुव्रत ॥ ३६ ॥
त एव विपरीतास्तु तेषां वेदाः प्रकीर्तिताः ।
वेदो विश्वमदश्चैव विद्वद्वहनी रसस्तथा ॥ ३७ ॥
वेदा ह्येते मगानां तु पुरोवाच प्रजापतिः ।

विपरीत भाषांतर केलेले असा अर्थ असावा. शकांच्या भाषेंत चारहि वेद उतरलेले होते, असें भविष्यपुराणकर्ता म्हणतो.

शाकद्वीपांत राहणारे जे मग ते शाक ऊर्फ शक होते, हें उघड आहे. त्यांची भाषा संस्कृत भाषेहून किंचित् निराळी परंतु तत्सदृश होती. पुरातन कालीं शाक लोकांत चातुर्वर्ण्याची संस्था होती. पुढें कालांतरानें ती अपकृष्ट झाली. ह्याला प्रमाण विष्णुपुराणाच्या चतुर्थांशाच्या तिसऱ्या अध्यायांतील खालील पुराणेतिहास आहे.

बाहुर्योऽसौ हैहयतालजंघादिभिरवजितोऽन्तर्वत्न्या महिष्या सह वनं प्रविवेश ॥ १५ ॥ तस्याश्च सपत्न्या गर्भस्तंभनाय गरो दत्तस्तेनास्या गर्भः स सप्तवर्षाणि जठर

एव तस्थौ स च बाहुर्वृद्धभावादौर्वाश्रमसमीपे ममार ॥ १६ ॥ सा तस्य भार्या चितां कृत्वा तमारोप्यानुमरणकृतनिश्चयाऽभूत् । अथैनामतीतानागतवर्तमानकालवेदी भगवानौर्वः स्वस्मादाश्रमान्निर्यायाब्रवीत् । अलमेतेनासद्ग्रहेण, अखिलभूमंडलपति-रतिवीर्यपराक्रमोऽनेकयज्ञकृदरातिपक्षक्षयकर्ता तवोदरे चक्रवर्ती तिष्ठति, मैवं मैवं साहसाध्यवसायिनी भवती, भवतु । इत्युक्ता च सा तस्मादनुमरणसाहसाविरमम ॥१७॥ तेनैव भगवता स्वाश्रममानीयत, कतिपयदिनान्तरे च सहैव तेन गरेण अतितेजस्वी बालको जज्ञे । तस्यौर्वो जातकर्मादिकां क्रियां निष्पाद्य सगर इति नाम चकार । कृतोपनयनं चैनं और्वो वेदाञ्शास्त्राण्यशेषाणि अस्त्रं चाग्नेयं भार्गवाख्यमध्यापयामास । उत्पन्नबुद्धिश्च मातरमपृच्छत् । अंब कथमत्र वयं क्व वा तातः, तातोऽस्माकं कः इत्येवमादि पृच्छतस्तन्माता सर्वमवोचत् । ततः पितृराज्यहरणामर्षितो हैहयतालजंघादि-वधाय प्रतिज्ञामकरोत् । प्रायश्च हैहयाञ्जघान, - शकयवनकांबोजपारदपल्लवा हन्यमाना-स्तत्कुलगुरुं वसिष्ठं शरणं ययुः ॥ १८ ॥ अथैतान्वसिष्ठो जीवन्मृतकान्कृत्वा सगरमाह । वत्स वत्स अलमेभिरतिजीवन्मृतकैरनुसृतैः ॥ १९ ॥ एते च मयैव त्वत्प्रतिज्ञापरि-पालनाय निजधर्मद्विजसंगपरित्यागं कारिताः ॥ २० ॥ स तथेति तद्गुरुवचनमभिवंद्य तेषां वेषान्यत्वमकारयत् । यवनान्मुंडितशिरसोऽर्धमुंडान् शकान् प्रलंबकेशान् पारदान् पल्हवांश्च श्मश्रुधरान् निःस्वाध्यायवषट्कारानेतानन्यांश्च क्षत्रियांश्चकार, ते च निजधर्मपरित्यागाद् ब्राह्मणैश्च परित्यक्ता म्लेंच्छतां ययुः । सगरोऽपि स्वमधिष्ठा-नमागम्यास्खलितचक्रः ससद्वीपवतीमिमामुर्वीं प्रशशास ॥ २१ ॥

— विष्णुपुराणे चतुर्थेंशे तृतीयोऽध्यायः ॥

ह्याच पुराणेतिहासाला अनुलक्षून भृगुसंहितैंतः—

वृषलत्वं गता लोके इमा क्षत्रियजातयः ।

इत्यादि श्लोक लिहिलेले आहेत. म्हणजे सूर्यवंशांतील सगर राजाच्या काळीं शकयव-नादि लोक म्लेंच्छत्वाप्रत प्राप्त झाले. भारतीय युद्धापासून पूर्वी दाशरथी राम याची सुमारें बत्तिसावी पिढी होती. व सगराची पंचावन्नावी पिढी होती. सगराच्या काळीं शकयवनपारदपल्हवादि लोक आर्यभ्रष्ट होऊन वृषल व म्लेंच्छ झाले. सर्वच म्लेंच्छ झालेले दिसत नाहींत.

श्रीकृष्णपुत्र सांब व सूर्यपूजक मगब्राह्मण

कांहीं आर्यधर्मनिष्ठ लोक शाकद्वीपांत राहिले; त्यांपैकींच्च मगांचीं अठरा कुलें सूर्यप्रतिष्ठापनार्थ श्रीकृष्णपुत्र जो सांब त्यानें सांबपुरांत आणिलीं. (भविष्यपुराण, अध्याय १४०).

ह्या अठरा मगकुलोत्पन्न लोकांना सांबानें अठरा भोजक कन्या दिल्या. त्यांच्या-पासून हिंदुस्थानांतील प्रस्तुत शाकद्वीपीय, मगब्राह्मण व शूद्र उत्पन्न झाले, हे मग

कोण, असा प्रश्न भविष्यपुराणांत केला आहे. ह्यांना शूद्रप्राय समजतात; अशीहि शंका काढिली आहे, व हे चांगले शुचिर्भूत ब्राह्मण आहेत, असा निर्णय केला आहे. तात्पर्य, सूर्याची प्रतिष्ठापना करण्यास 'मग' ब्राह्मण योजण्याची पद्धति फार पुरातन आहे. तीच पद्धति डॉक्टर भांडारकरांनीं उल्लेखिलेल्या सूर्यप्रतिमा स्थापनकालीं अनुसरली गेली. अनार्य मगांना आर्य ब्राह्मण करून घेतलें, असें डॉक्टर भांडारकर म्हणतात त्याला आधार बिलकुल नाहीं. युरोपियन पंडितांच्या कच्च्या व निराधार लेखांवर विश्वसून असले अनर्थ करण्यांत सत्यनिष्पत्ति होणें दुरापास्त आहे. युरोपियन पंडित गेल्या पांच चार वर्षांपर्यंत भारतवर्षीय इतिहासासंबंधानें कसे संशोधन करीत होते तें पाहिलें पाहिजे. ग्रीक, चिनी, बौद्ध व मुसुलमान प्रवाशी व इतिहासकार यांच्या लेखांतून भारतवर्षासंबंधानें जे उल्लेख आहेत तेवढ्यांची शहानिशा करण्यांत ते आजपर्यंत गुंतले होते. भारतीय पुराणें व इतिहास ह्यांच्याकडे त्यांनी फारच दुर्लक्ष्य केलें. अलीकडे पांचदहा वर्षांत भारत, रामायण व हरिवंश ह्यांचें पृथक्करण करण्याकडे ते किंचित् वळले आहेत. चिनी लोकांचे पुराणेतिहास त्यांना विश्वास्य वाटतात. बौद्ध लोकांच्या जातककथा त्यांना विश्वासार्ह वाटतात व ग्रीक लोकांचीं कच्चीं प्रवासटिपणें त्यांना विश्वासपात्र वाटतात. परंतु भारतीयांची पुराणें, इतिहास इत्यादींकडे विश्वासबुद्धीनें पहावयाला लागून त्यांना फारच थोडीं वर्षें झालीं आहेत. वेबरला तर, मगासंबंधानें भविष्यपुराण व बृहत्संहिता ह्यापलीकडे विशेष कांहीएक माहिती नव्हती. भारतीय व विष्णुपुराणांत शक जे 'मग' त्यासंबंधानें काय लिहिलें आहे आणि भृगुसंहितेंत शकादि भ्रष्ट क्षत्रियांसंबंधानें कोणता पुराणेतिहास उल्लेखिला आहे त्याची वार्ता त्याला काडीमात्र नव्हती. अशा स्थितींत त्याचें मत ग्राह्य धरून चालणें बरेंच धोक्याचें होतें. डॉक्टर भांडारकरांसारख्या कांटेतोल विचार करणाऱ्यांनीं असलीं लेंचींपेंचीं मतें सिद्धान्तवत् मानण्याची लकब यापुढें सोडून द्यावी हें श्रेयस्कर आहे.

शक, यवन, पल्लव व पारद हे आर्य

शक, यवन, पल्लव, पारद हे पुरातनकालीं आर्य होते. ह्यांच्यांत पुरातनकालीं चातुर्वर्ण्याची संस्था होती. कालांतरानें ती नष्ट झाली. तत्रापि त्या त्या देशांत अगदीं अर्वाचीन कालापर्यंत म्हणजे भविष्यपुराणरचनाकालापर्यंत मगादि ब्राह्मण होते. अर्थात् वृषलप्राय किंवा म्लेंच्छमय झालेल्या या शकादि लोकांना शकाच्या दुसऱ्या तिसऱ्या शतकापर्यंत आपल्या शुद्ध स्थितीची स्मृति होती. ह्या बाबी लक्षांत ठेविल्या म्हणजे शक, पल्लव, यवन, पारद वगैरे लोक हिंदु देवतांचे, रीतिरिवाजांचे, नामांचे, जातीचे व धर्माचे उपासक कसे सहज झाले, तें समजण्याचा मार्ग खुला होतो. भारतवर्षाच्या पश्चिमेस पंजाबापासून उत्तर कोंकणापर्यंत शकांचें राज्य, कांचीस

पल्लवांचें राज्य, यवनपुरास यवनांचें राज्य, वायव्य प्रांतांत पारदांचें राज्य होऊन, ते लोक हिंदु देवतांचे उपासक व बौद्ध धर्माचे पुरस्कर्ते इतक्या सहज व सुलभरीतीनें कसे झाले, तें वरील उलगडयानें स्पष्ट होतें.

शक राजा जो कनिष्क त्याचें नांव भारतांतील कणिक (कणिकनीति सांगणारा) ह्या नांवाशीं फार जुळतें. त्यावरून कणिक नीतीचा अध्याय कनिष्काच्या राज्यानंतर रचला गेला व भारतांत प्रक्षिप्त झाला, असें विधान करण्याकडे मन धांवतें.

शातवाहनांचीं व शकांचीं लग्नें लागलीं. कारण, शातवाहन संकरज शूद्र असून शूद्राहून हीन गणले जात; आणि शकभ्रष्ट क्षत्रिय ऊर्फ वृषल गणले जात. तेव्हां अशांचा शरीरसंबंध झाला, ह्यांत कांहीं विशेष आश्चर्य नाहीं. तत्रापि ह्या शकांचा भ्रष्टपणा शातवाहन राजे जाणून होते. त्यांनीं त्यांचा पराभव केला, व तो करतांना चातुर्वर्ण्यविध्वंसकांचा निःपात झाला म्हणून आनंद व अभिमान मानिला.

— (कार्ले येथील १७ वा लेख).

शक, यवन, पल्लव व पारद यासंबंधानें चर्चा चालली आहे. तेव्हां एका बाबीचा येथें उल्लेख करणें वाजवी आहे. पल्लव हे पारदांपासून भिन्न आहेत. मि. फ्लीट आपल्या Dynasties of the Kanarese District च्या पहिल्या अध्यायांत कांची येथील पल्लवासंबंधानें लिहितांना डॉक्टर Oldhausen चें मत देतात कीं, पल्लव हा शब्द पार्थव Parthava, i. e. Parthian शब्दापासून निघाला आहे. परंतु ही व्युत्पत्ति बरोबर नाहीं. ज्यांना युरोपियन लोक Parthia म्हणतात त्यांना संस्कृत नांव पारद असें आहे. वेबर म्हणतो कीं, पल्हव हे Arsacidon Parthians आहेत. परंतु हेंहि तादात्म्य चुकीचें दिसतें. कारण पल्हव हे पारद ऊर्फ Parthians नाहींत, असें वर सांगितलेंच आहे. अर्थात् ते Arsacidon Parthians हि नाहींत. पाल्हवी भाषा बोलणारे इराणांतील पुरातन जे लोक ते पल्हव. ते दक्षिणेंत कांची प्रदेशांत प्रथम कोणत्या रस्त्यानें व केव्हां उतरले, हें सांगण्यास सध्यां साधन नाहीं. बाकी, हे पल्हव ऊर्फ पल्लव भृगुसंहितेंतील भ्रष्ट क्षत्रिय होत, यांत संशय नाहीं. भ्रष्ट क्षत्रियत्वाची स्मृति जागृत असल्यामुळें, आर्यरीतरिवाज व देवदेवता उचलण्यास, शकांप्रमाणेंच ह्यांनाहि सुलभ गेलें.

यवन हेहि भ्रष्टक्षत्रिय म्हणून विष्णुपुराणांत व भृगुसंहितेंत वर्णिलेले आहेत. सगराच्या कालीं हे लोक क्षत्रियधर्मभ्रष्ट झाले. तो काल म्हणजे शकसंवतापूर्वी चार हजार वर्षांपलीकडील होय. ग्रीस देश म्हणून ज्याला पुढें म्हणूं लागले त्यांत या भ्रष्ट क्षत्रियांनीं म्हणजे यवनांनीं शकसंवतापूर्वी चार हजार वर्षांच्या सुमारास वसाहत करण्याला रस्ता सुधारला. ह्या यवनांची भाषा जी ग्रीक ती झेंदच्या खालोखाल संस्कृताच्या जवळ आहे. प्लेटोनें आपल्या रिपब्लिकमध्यें चातुर्वर्ण्याच्या पद्धतीचें जें वर्णन केलें आहे तें त्याचे पूर्वज जे भ्रष्टक्षत्रिय यवन त्यांच्या पूर्वसमाजस्थितीचें

वर्णन आहे, असें विधान करण्याकडे प्रवृत्ति होते. हे भ्रष्टक्षत्रिय प्रथम आशियामायनॉरच्या पश्चिमेस समुद्रकिनाऱ्यावर राहात असावे. तेथें असतांना होमरनें वर्णिलेलें ट्रोजन युद्ध झालें, हीहि बाब बहुतसूचक आहे.

यवन, शक, पारद व पल्हव हे सगराच्या कालीं क्षत्रियधर्मभ्रष्ट झाले, तत्पूर्वी ते क्षत्रियधर्मनिष्ठ होते, तत्पूर्वी त्यांच्यांत चातुर्वर्ण्याची संस्था होती. ह्या तीन बाबी विश्वसनीय मानल्या म्हणजे असा एक सिद्धान्त निघतो कीं, पांच हजार वर्षांपूर्वी, जंबुद्वीप, शाकद्वीप, प्लक्षद्वीप वगैरे द्वीपांत म्हणजे सध्यांच्या हिंदुस्थान, अफगाणिस्थान, तिबेट, तुर्कस्थान, इराण व आशियामायनॉर ह्या प्रदेशांत चातुर्वर्ण्यबद्ध व संस्कृत किंवा संस्कृतसम भाषा बोलणारे एकवंशी आर्य लोक राहात होते. सगरानंतर ह्या आर्य लोकांपैकीं शक, यवन, पल्हव व पारद हे क्रियाभ्रष्ट होऊन, त्यांच्यांतून यवन लोक पल्हवादींच्या रेटारेटीमुळें ग्रीस देशांत वसाहत करण्यास गेले; धर्मभ्रष्ट झाल्यामुळें जातीधर्म त्यांचा सुटला; परंतु भाषा सुटली नाहीं. देव सुटले नाहींत व दंतकथा सुटल्या नाहींत. आर्यांची आशियांतील कोणत्या प्रदेशांतून केव्हां पांगापांग झाली, त्याचा शोध यूरोपियन लोक जारीनें करीत आहेत. परंतु निश्चयात्मक असा कोणताच निर्णय त्यांचा अद्याप झाला नाहीं. मी जीं प्रमाणें वर दिलीं आहेत त्यांचा विचार जर केला, तर निश्चित सिद्धान्त कोणता तें ठरविण्याची दिशा मुक्कर होईल.

वरतीं सहाव्या कलमांत मगांना भोजकन्या प्रजोत्पादनार्थ दिल्या, असा उल्लेख आहे. हे भोजक द्वारकेच्या भोंवतालील प्रदेशांत राहणारे होते व कृष्णाच्या सवंशीय बांधवांपैकीं व प्रजाजनांपैकीं होते. भोजक हे ब्राह्मण नव्हत, क्षत्रिय होत. त्यांच्या मुली मगांना दिल्या. ह्यावरून मग हे नीच ब्राह्मण होते असा जो प्रवाद प्रचलित झाला होता, त्यांत तथ्यांश होता, असें दिसतें. ह्या भोजक लोकांवरून (कच्छ) भुज ह्या शहराचें नांव निघालें असावें.

शाकद्वीपीय मगांची व द्वारकास्थ भोजकांची जी ही पुरातनकालीं जानपछान झाली व शरीरसंबद्धि झाली त्याचा उपयोग मगांच्या देशबांधवांना व शेजाऱ्यांना पुढें कित्येक शतकांनीं झाला. मुसलमान लोकांनीं इराणांतील पारसीकांना जिंकून छळण्याचा कहर केला असतां पारसीकांचे ब्राह्मण व शूद्र काठेवाड व गुजराथ ह्या प्रांतांत बाराशें वर्षांपूर्वी आश्रयाला आले. आणि तेथें येऊन आपला धर्म रक्षिते झाले. शाकद्वीपांतील पुरातन धर्म अंशांशानें राखणारे जे सध्यांचे पारशी लोक तेच हे लोक होत. उपकार करणाऱ्या व आश्रयस्थान झालेल्या भरतभूचे उपकार हे लोक कसे काय फेडतात तें भविष्यत्कालीं पहावयास सांपडणार आहे.

शक, पल्हव ह्या लोकांत मंत्रवेत्ते जसे मग-ब्राह्मण होते, तसे ते पुरातन मिसर देशांतहि होते, ही गोष्ट इतकी प्रसिद्ध आहे कीं, तिच्या मंडनार्थ पुरावे देण्याची

जरूरी नाहीं. अर्थात् प्राचीन मिसर देशांत चातुर्वर्ण्यासारखी एकादी संस्था होती. म्हणजे चार-पांच हजार वर्षांपूर्वी मिसर देशापासून चीन देशापर्यंत जेवढे म्हणून देश होते त्यांत चातुर्वर्ण्य संस्था व जातिधर्म होते. असूर्यादि देशांतले असूर लोक होते; त्यांच्यांतहि वर्णभेद असावा असें वाटतें. परंतु एकंदरींत असुरांचा, दैत्यांचा, व राक्षसांचा कल एकवर्णाकडे व आचारभ्रष्टतेकडे पडल्यामुळें आणि भारतवर्षाखेरीज इतर देशांत त्यांचेंच विशेष प्राबल्य पुढें पुढें झाल्यामुळें चातुर्वर्ण्य संस्था त्या त्या देशांतून नष्ट झाली. आजमित्तीस भारतवर्षाखेरीज इतरत्र कोठेंहि चातुर्वर्ण्य नाहीं. भारतवर्षांत सध्यां सहा कोट असुरधर्मी लोक आहेत. आचारभ्रंश चालला आहे असाच जर चालला तर बाकी राहिलेले जे वीस कोट चातुर्वर्ण्यधर्मी लोक ते कालांतरानें एकवर्णी व्हावे, असा अंदाज दिसतो.

तात्पर्य, प्राचीनकाळीं पांचहजार वर्षांपूर्वी सुसंस्कृत जगांत सगर राजापर्यंत सर्वत्र चतुर्वर्णात्मक समाजव्यवस्था प्रचलित होती. तिचा आज पांच हजार वर्षें संकोच होत होत एकट्या हिंदुस्थानांत तेवढी ती राहिली आहे. ह्यापुढें ती समूळ नाहींशी होणार किंवा पुनः सर्व जगभर पुढील पांच हजार वर्षांत पसरणार त्याचा निर्णय भविष्यत्काल करील.

धर्मसंस्थापनार्थाय संभवामि युगे युगे ।

-- अशी भगवत्उक्तीहि आहे

मगध

मगध शब्दाची व्युत्पत्ति शब्दकल्पद्रुम " मगं दोषं दधाति इति मगधः " अशी देतो. ' मग ' म्हणजे दोष असा अर्थ शब्दकल्पद्रुमकर्त्यानें कोठून दिला असेल तो असो. कोणत्याहि संस्कृत कोशांत ' मग ' म्हणजे दोष असा अर्थ सांपडत नाहीं. तेव्हां ' मग ' म्हणजे दोष हा अर्थ ऐतिहासिक नाहीं, केवळ काल्पनिक असलेला दिसतो. **वाचस्पत्यांत** ' मग ' या शब्दाचा दोष हा अर्थ येणेप्रमाणें काढिला आहेः-- " मगधः देशभेदः । स च कीकटेतिसंज्ञः अंगदेशस्थः । अंग-वंगकलिंगान्ध्रान् गत्वा संस्कारमर्हति इति मिताक्षरायां देवलः । अतः मगधस्य पाप-जनकत्वात् मगशब्दस्य दोषार्थत्वम् । " ह्या अर्थनिष्पादनपद्धतीनें अंग, वंग, आंध्र हेहि शब्द पापार्थक होऊं लागतील. अर्थात् ' मग ' म्हणजे दोष हा अर्थ ऐति-हासिक नाहीं, ओढून ताणून काढलेला आहे. सबब तिरस्करणीय होय.

माझ्यामतें **मगध** शब्द येणेप्रमाणें व्युत्पादावाः-- " **मगान्** दधाति इति मगधः । " **मग** लोकांना धारण करतो जो देश तो **मगध. मग** म्हणजे शकद्वीपां-(मध्य आशिया) तील ब्राह्मण. ते ज्या देशांत येऊन राहिले तो **मगध** देश. ते त्या देशांत राहूं लागल्याच्या पूर्वी त्या देशाला काय म्हणत असत, तें सांगण्यास कांहीं साधन मला उपलब्ध नाहीं. **मगध** देशांत बुद्धाचा उदय (व कदाचित् जन्म) झाला. बुद्ध हा शाक्य ऊर्फ शकवंशीय होता. बुद्धाला शक म्हणत नाहींत, शाक्य म्हणतात व त्याच्या कुळालाहि शाक्य म्हणतात. ह्याचा अर्थ इतकाच कीं, **मगध** म्हणून जो देश प्रसिद्ध होता त्यांत शकद्वीपांतील शक लोक ब्राह्मण, क्षत्रिय, आदि-करून येऊन वसाहत करते झाले व त्या शक लोकांतील **मग** ब्राह्मणांवरून त्या देशाला **मगध** हें नांव मिळालें.

मगध हा शब्द पाणिनीला माहीत आहे. (४-१-१७०)- ' द्व्यञ् मगध कलिङ्ग सूरमसादण् । ' अर्थात् **मगादि** शकलोक पाणिनीच्या पूर्वी **मगधांत** येऊन राहिले हें उघड आहे.

मगध म्हणजे स्तुतिपाठक असा एक अर्थ आहे. तो ' मगध् ' या संस्कृत धातूपासून निघाला आहे. ' मगध्यन्ते इति मगधाः । मगध् याच्ञायाम् । ' धातुपाठांत ' मगध् परिवेष्टने, नीचदास्ये इति अन्ये ' । असा अर्थ दिला आहे. पैकीं नीच-

दास्यार्थक जो ' मगध ' धातु तो मगध या देशनामावरून निघालेला आहे. ह्यावरून असें दिसतें कीं, ' मगध ' ह्या धातूला नीचदास्यात्मक अर्थ त्या देशांत याच्ञा करणाऱ्या व वंशस्तुति करणाऱ्या कांहीं धंदेवाईक भिक्षेकऱ्यांवरून आला असावा. ' मगध् परिवेष्टने ' हा धातु ' मगध् याच्ञायां ' ह्या धातूहून अगदीं निराळा. इंग्रजींत ' know जाणणें ' हा धातु ' know स्त्रीसंग करणें ' ह्या धातूहून जसा निराळा तसाच ' मगध् परिवेष्टने ' हा धातु ' मगध् याच्ञायाम् ' ह्या धातूहून निराळा. ' know ' जाणणें ह्या धातूचा संबंध संस्कृत ' ज्ञा ' धातूशीं आहे. व ' Know ' स्त्रीसंग करणें ' ह्या धातूचा संबंध संस्कृत ' जन् उत्पन्न करणें ' ह्या धातूशीं आहे. इंग्रजींत दोन्ही धातूंचा अपभ्रंश एकच होऊन त्याचा उच्चार 'नो' असा एकच झालेला आहे. 'ज्ञा'तील 'ज'बद्दल 'K' व 'ञ'बद्दल 'n'; आणि 'जन्' तील 'ज'बद्दल 'K' व 'न'बद्दल 'n' अशा दोन्ही धातूंतील व्यंजनांच्या खुणा इंग्रजी अपभ्रंशांत एकच राहिल्यामुळें दोन्ही धातूंचा एकच उच्चार होतो. अर्थावरून मात्र दोन निरनिराळे धातु आहेत, हें ओळखतां येतें. तद्वतच ' मगध् याच्ञायां ' व ' मगध् परिवेष्टने ' हे दोन निरनिराळे धातु एकाच उच्चारानें यद्यपि उच्चारिले जातात, तत्रापि पूर्ववैदिक भाषांत ' मगध् परिवेष्टने ' ह्या धातूचें कांहीतरी मूळ असावें. ' मगध् याच्ञायां ' या नामधातूची संज्ञा मगध देशाच्या नांवावरून पडली, हें वर दाखविलेंच आहे. हा याच्ञार्थक ' मगध् ' धातु नामधातु आहे. परिवेष्टनार्थक ' मगध् ' धातु नामधातु नाहीं. अचिकित्सक संस्कृत वैयाकरणांनीं हे दोन धातु एक समजून त्याची गणना कण्ड्वादि गणांत केली आहे.

मगध् देशाच्या नांवावरून याच्ञार्थक ' मगध् ' धातु हा ज्याअर्थीं निघालेला आहे, त्याअर्थीं स्तुतिपाठक जे मगध् भिक्षेकरी ते त्या देशांत मग येऊन राहिल्यावर त्या देशाला मगध हें अभिधान प्राप्त झाल्यानंतर इतर प्रांतांत मगध किंवा मागध या नांवानें ओळखिले जाऊं लागले, हें उघड आहे. हा प्रकार कसा झाला त्याचें प्रत्यंतर अर्वाचीन इतिहासांतील एक देतों. महाराष्ट्रांत ' गुजराथी ' या शब्दाचा विशिष्ट जातीचा पाणक्या असा अर्थ आहे. ' भय्या ' किंवा ' पुरभय्या ' ह्या शब्दाचा दारवान असा अर्थ आहे. 'पंजाबी' या शब्दाचा विशिष्ट जातीचा पहिलवान असा अर्थ आहे, व ' गोवेकरीण ' ह्या शब्दाचा विशिष्ट प्रांतीची वेश्या असा अर्थ आहे. आम्ही एक ' गुजराथी ' ठेविला आहे, किंवा ' भय्या ' ठेविला आहे, किंवा ' पंजाबी ' पाळला आहे किंवा ' गोवेकरीण ' राखिली आहे, ह्या वाक्यांत पाणक्या, दारवान्, पंजाबी, वेश्या ह्या अर्थांची प्रतीति जशी सांप्रत कालीं होते तशीच प्रतीति प्राचीन काळीं मगध किंवा मागध हा शब्दश्रवणानें स्तुतिपाठक ह्या अर्थाची होत असे. तात्पर्य, मगध देशांतून राजवंशस्तुतिपाठक प्राचीन कालीं उत्पन्न होत,—इतके फार उत्पन्न होत कीं, स्तुतिपाठक या शब्दाला मगध हा शब्दपर्याय झाला.

९

नट आणि निच्छिवि

जैनधर्माचा संस्थापक महावीर हा नट जातीचा होता, हें प्रसिद्ध आहे. ह्या नट जातीचा उल्लेख मनुसंहितेच्या दहाव्या अध्यायाच्या २२ व्या श्लोकांत केला आहे. व्रात्यक्षत्रियांपासून सवर्ण म्हणजे क्षत्रिय स्त्रीच्या ठायीं जी प्रजा होते तिला नट ही एक संज्ञा असलेली मनुसंहितेंत वर्णिली आहे. तेव्हां त्या व्रात्यक्षत्रिय जातींत महावीर जन्मला हें सांगावयाला नकोच.

ही नटजाति वैशाली नगराजवळ रहात असे. ह्या वैशाली नगरींत लिच्छवि नामक क्षत्रियांचें त्या कालीं वास्तव्य असे. लिच्छवि म्हणजे मनुसंहितेच्या दहाव्या अध्यायाच्या २२ व्या श्लोकांत उल्लेखिलेली निच्छिविनाम व्रात्यक्षत्रियाची जात होय. निच्छिवि या शब्दांतील नि च्या ठिकाणीं लि आदेश होऊन लिच्छिवि हा प्राकृत शब्द निष्पन्न झाला. प्राकृतांत असा न चा च होतो. उदा० निंब (संस्कृत)= लिंब (प्राकृत). ह्या प्राकृत लिच्छिवि शब्दाचा लिच्छवि हा अपभ्रंश किंवा पर्याय आहे.

हा लिच्छिवि जातींतील कुमारदेवींशीं शक २२० च्या सुमारास गुप्तवंशाचा आदिपुरुष जो पहिला चंद्रगुप्त त्यानें लग्न लाविलें. (V. A. Smith's Early History of India, chap. XI).

हा निच्छिवि शब्दाचा भारतांतील शिबि, शिवि या देशवाचक व तद्देशराज-वाचक शब्दांशीं संबंध असलेला दिसतो. शिविदेशाच्या जवळील जो प्रदेश तो निच्छिवि. शिविदेशांतील शिविनामक शुद्धक्षत्रियांपासून जे व्रात्यक्षत्रिय झाले त्यांचा जो देश तो निच्छिवि देश.

निच्छिवि, लिच्छिवि, ऊर्फ लिच्छवि व्रात्यक्षत्रियांचें नेपाळांत शक ५५७ च्या सुमारास राज्य सुरूं झालें.

ह्या लिच्छवि जातीचें नांव गौतमबुद्धाच्या चरित्रांत अति येतें.

१०

प्राकृतिक भाषांचा व वाङ्मयाचा इतिहास

महाराष्ट्रसंदर्भ

आमच्या म्हणण्याप्रमाणें लेख्य इतिहास एकंदर दोन, (१) महाराष्ट्रांतील प्राकृतिक भाषांचा इतिहास व (२) महाराष्ट्रांतील वाङ्मयाचा इतिहास. पैकीं महाराष्ट्रांतील प्राकृतिक भाषांचा इतिहास विचारार्थ प्रथम घेऊं. महाराष्ट्री भाषेला प्राकृत म्हटलें म्हणजे तिजपासून निघालेल्या अपभ्रंशांना आम्ही प्राकृतिक म्हणतों. प्राकृतिक भाषा म्हणजेच नागर मराठी भाषा आणि महाराष्ट्रांतील इतर प्रांतिक व जातिक मराठी भाषा. ह्या सर्व भाषांचा इतिहास म्हणजे मराठी प्राकृतिक भाषेचा इतिहास. भाषेचा इतिहास म्हणजे भाषेचे जे शब्द, प्रत्यय, आगम, स्वर, आघात, वगैरे अवयव त्यांचा इतिहास. इतिहास म्हणजे परंपरा व त्या परंपरेचे नियम. पूर्व भाषेपासून पश्चात्कभाषेचे हे अवयव कसे निघाले हें सांगणें म्हणजे त्यांचा इतिहास देणें. हें सर्व एक दोन वाक्यांत वर्णन करतां आलें खरें. परंतु हें सर्व कागदावर वठवावयाला काय मेहनत लागते तें आतां पाहूं.

भाषेतिहासार्थ शब्दसंग्रह करण्याची गरज

एक सर्वज्ञ मराठीभाषाशास्त्रज्ञ आहे अशी कल्पना करा. त्याला मराठीभाषेच्या वर्तमान, मध्य व प्राचीन अवस्थांचा साक्षात्कार परिपूर्ण झाला अशीहि कल्पना करा. अशा शास्त्रज्ञाच्या मनांत स्वतःचा साक्षात्कार इतरांच्या अनुभवास यावा एतदर्थ उद्योग करण्याचें जर आलें तर तो खालील मार्ग स्वीकारील. प्रथम वर्तमान व भूत नागर, प्रांतिक व जातिक मराठी भाषातील लेखी व तोंडी अखिल शब्द व प्रत्यय तो जमा करील आणि नंतर अपभ्रंश, महाराष्ट्री, जुनी महाराष्ट्री, संस्कृत, वैदिक व पूर्ववैदिक इत्यादि भाषांतील शब्दांशीं व प्रत्ययांशीं त्यांचा संबंध कसा व कोणत्या नियमांनीं झाला तें दाखवून देईल. हीं दोन कृत्यें करतांना त्याला इतर विद्वानांचें साहाय्य त्या त्या भाषांतील शब्द व प्रत्यय टिपण्याकरितां अवश्य घ्यावें लागेल. कारण एका सर्वज्ञ तज्ज्ञाच्याहि हातून हें सर्व प्रायः शारीरिक व बऱ्याच मानसिक श्रमाचें काम संभवनीय कालावधींत होणार नाहीं. अर्धशिक्षितांच्या हातून हें श्रमाचें काम पेलणारहि नाहीं व रेटणारहि नाहीं. काम फार दगदगीचें आहे. तें

चोख झालें पाहिजे. चोखपणा उच्च शिक्षणाशिवाय व शास्त्रीय अभ्यासाच्या संवयीशिवाय येत नाहीं. साहाय्यकांची योग्यता या दर्जाची पाहिजे. कामाचा विस्तारहि अवाढव्य आहे. मराठींतील शब्दसमुद्र अफाट आहे. आमचा अंदाज आहे कीं मोलस्वर्थ्च्या कोशांत वर्तमान व भूत मराठी भाषेंतील शब्दसमुद्राचा सुमारें निम्मा भाग आला असेल नसेल. सबब अखिल शब्दसमुद्र आलोडण्याकरितां साहाय्यकांना वर्तमान व भूत मराठी लेखी व तोंडी वाङ्मय डोळ्यांत तेल घालून धुंडाळलें पाहिजे आणि नवीन शब्द किंवा प्रत्यय किंवा स्वर आढळला कीं साक्षेपानें टिपून ठेविला पाहिजे. कोश रचण्याची मेहनत ज्यांनीं केली आहे त्यांना ह्या श्रमाची कल्पना होईल.

शब्दांच्या व्युत्पत्तींची अन्वेषणा

साहाय्यकांचें हें काम चालूं असतां शास्त्रज्ञाचें सांपडलेल्या शब्दांची पूर्वभाषेंत परंपरा ठरविण्याचें नाजूक काम चालतच असतें. हें काम सर्वांत अवघड. केवढाहि व्युत्पन्न झाला, तरी भेटल्या शब्दाची व्युत्पत्ति ऊर्फ इतिहास चुटकी सरसा त्याला देतां येईल असा अर्थ नाहीं. ऐतिहासिक व्युत्पत्तीची गती भूतावरून वर्तमानावर अनुलोम असते. यास्काच्या निरुक्तांतील काल्पनिक व्युत्पत्तीप्रमाणें वर्तमानावरून भूतावर, अशी असेल, अशीहि असेल व अशी देखील असेल, अश्या प्रकारची धरसोडीची, प्रतिलोम, अनिश्चित व अकिंचित्कर नसते. धरसोडीची प्रतिलोम व्युत्पत्ति यास्काचार्यांनीं गाफीलपणानें केली अशी असमंजस कल्पना करण्याचें धाष्टर्य मात्र करणें युक्त नाहीं. यास्काच्या कालीं वेदभाषाहि इतकी जुनी झाली होती कीं तत्कालीन सामान्य वैदिकांना तिचा अर्थ कळतनासा झाला होता. वेदपूर्व भाषा ऊर्फ पूर्ववैदिक भाषा तर इतकी प्राचीनतम झाली होती कीं यास्काचार्यांच्या कालीं तिचा मागमूसहि राहिला नव्हता. तेव्हां वैदिक शब्दाची अनुलोम व निश्चित व्युत्पत्ति ऊर्फ इतिहास देण्याला यास्काचार्यांना साधनच नव्हतें. अश्या कचाट्यांत व्युत्पत्ति करण्याचें काम यास्काला करावयाचें असल्यामुळें एकाच शब्दाच्या दहा दहा प्रतिलोम व्युत्पत्त्या करून असमाहित समाधान मानून स्वस्थ बसणें त्याला अपरिहार्य झालें. किंवा असाहि विकल्प करतां येईल कीं ज्या पूर्ववैदिक भाषेपासून वैदिक भाषा निघाली तींतून वैदिक शब्दांची व्युत्पत्ति लावण्याचें साधें व सरळ कृत्य यास्काला इतिहासपद्धतीच्या अज्ञानास्तव माहित नव्हतें. कांहींहि असो, मराठी व्युत्पत्तिकाराला ही यास्कीय दुरवस्था ग्राशीत नाहीं. कारण, मऱ्हाठीच्या पूर्वीच्या अपभ्रंश व महाराष्ट्री या दोन भाषा मराठी व्युत्पत्तिकाराला ऊर्फ शब्देतिहासकाराला ऊर्फ भाषेतिहासकाराला साहाय्य करण्यास अद्यापहि अवशिष्ट आहेत. शिवाय संस्कृत व वैदिक या सख्ख्या किंवा चुलत भाषाहि उपलब्ध आहेत. सबब प्रतिलोम अनिश्चित व्युत्पत्ति करण्याचें संकट मराठी भाषेच्या व्युत्पत्तिकारावर कोसळण्याचा संभव सुद्धां नाहीं. सुदैवानें ह्या बाबींत यास्का-

पेक्षां मराठी भाषेच्या इतिहासकाराचा रस्ता सरळ आहे. यद्यपि अशी सुस्थिति ह्या एका बाबीसंबंधानें असली, तत्रापि दुसऱ्या एका बाबींत मराठी निरुक्तकाराचा रस्ता अडचणींच्या घोर व निबिड अरण्यांतून जातो. पूर्ववैदिक वाङ्मय बिलकुल नसल्यामुळें यास्काला ग्रंथवाचनाचे व वैदिक शब्दांचे पूर्ववैदिक पूर्वशब्द धुंडण्याचे श्रम नव्हते. मराठी निरुक्तकाराला महाराष्ट्री, संस्कृत व वैदिक ह्या तीन चार भाषांतील अफाट वाङ्मयाच्या निबिड अरण्यांतील कोणत्या महाराष्ट्री, संस्कृत किंवा वैदिक झुडुपापासून आपल्या जवळील कोणत्या मराठी धलप्या कातलेल्या आहेत याचा बिनचुक पत्ता लावावयाचा असतो. भलती धलपी भलत्याच झाडाची असावी, किंवा एकच धलपी अनेक झाडांची असावी किंवा अनेक धलप्या एकच झाडाच्या असाव्यात, अशी त्रिविध शंका मराठी निरुक्तकाराला गांगरवून सोडते. यास्काप्रमाणें असेंहि असेल, तसेंहि असेल, असें घरसोडीचें उत्तर देऊन भागत नाहीं. उत्तर निश्चित हवें असतें; कारण तें शक्य आहे हें माहीत असतें. उदाहरणार्थ दहा पांच मराठी शब्द घेतों, म्हणजे आम्ही काय म्हणतों तें सहृदयांच्या प्रतीतीस येईल.

(१) मराठी पाणीं शब्द :- जलार्थक पाणीं शब्द संस्कृत पानीयं शब्दाचा अपभ्रंश सर्वमान्य आहे. परंतु, तरवारीचें पाणीं या प्रयोगांतील पाणीं शब्द कोणत्या संस्कृत शब्दाचा अपभ्रंश असावा ? किंवा लक्षणेनें चकाकीवरून तरवारीच्या चकाकीला पाणीं शब्द लावला तर नसेल ? असा विकल्प आला. लक्षणेनें वाटेल तें गाढव वाटेल त्या घोड्यापासून निघूं शकेल म्हणून निरुक्तींत हा लक्षणेचा रस्ता प्रमाणिक धरीत नाहींत. सबब चकाकी-अर्थक पाणी शब्दाची व्युत्पत्ति निराळी असावी असा तर्क. धातुपाठांत पू– शोधनें असा धातू आहे. तरवारीला पाणी देणें म्हणजे तरवार अग्नीनें शुद्ध करणें. पू– पावनीयं = पाअणीअँ = पाणीं. जलार्थक पाणी शब्द पा धातूपासून निघाला आहे व उज्ज्वलनार्थक पाणी शब्द पू धातूपासून निघाला आहे, हा निर्णय. दोन्ही शब्द अगदीं निराळे आहेत व शास्त्रीय कोशांत ते निराळे आहेत असें सांगितलें पाहिजे.

(२) फार:- हा शब्द स्फार शब्दापासून व्युत्पादितात. परंतु फारकरून ह्या अव्ययांतील फार शब्द कसा व्युत्पादावयाचा ? करून याचें फार हें कर्म करतां येत नाहीं. सबब फारकरून हें अव्यय म्हणून एक शब्द समजणें रास्त आहे. संस्कृतांत प्रायस्कृत्वा असें अव्यय आहे. प्रायस्कृत्वा = फारकरून. प्रायस्कृत्वा स न आयास्यति = फारकरून तो येणार नाहीं. तात्पर्य मराठींत दोन फार आहेत, स्फार पासून निघालेला एक व प्रायः पासून निघालेला दुसरा.

ग्रंथालय ग्रंथ संग्रहालय, दा.ण. रत्नागिरी
अनुक्रमांक 23324 दि: 21.6.16
नोंद क्रमांक 2237 नोंः दिः 22/07/16

(३) भीकः– भिक्षापासून भीक सर्वमान्य आहे. परंतु, मी त्याला भीक घालीत नाहीं, या वाक्यांतील पर्वार्थक भीक शब्द कोठून आला ? येथें लक्षणेला फारच ताणावी लागेल तेव्हां भिक्षेपासून पर्वेपर्यंत उडी जाईल. संस्कृतांत भयार्थक भीषा शब्द आहे. भीषा = भीख = भीक. मी त्याला भीक घालीत नाहीं म्हणजे मी त्याला भीत नाहीं. भीक म्हणजे भय, पर्वा, इत्यादि. दोन्ही शब्द निराळे, उच्चार मात्र एक. कोशांत निराळे दाखवणें प्राप्त आहे.

(४) भरणेंः- भृ पासून भरणें सर्वमान्य आहे. परंतु, मला रागें भरला, या वाक्यांतील भरला शब्द कसा काढावयाचा ? रागें भरला म्हणजे कठोर शब्द बोलला. रागावणें हा शब्द रागें भरणें या शब्दप्रयोगाहून निराळा. रागें भरणें या प्रयोगांत बोलण्याची क्रिया दर्शविलेली असते. ती रागावणें या शब्दांत नियत नसते. समाधानः– संस्कृतांत भृ भर्त्सने असा धातू आहे. त्यापासून कठोरशब्दार्थक भरणें. क्रोधेन मां परिभृणाति = क्रोधानें मला रागें भरतो. रागें तृतीया. भर्त्सनार्थक भरणें शब्द पूरणार्थक भरणें शब्दाहून निराळा.

(५) बोलणेंः– माणूस बोलतो, या वाक्यांतील बोलणें शब्द संस्कृत वल्ह धातूपासून निघाला आहे, हें सर्वमान्य. परंतु धंदा बोलतो, या वाक्यांतील बोलणें धातू कोणत्या संस्कृत धातूचा अपभ्रंश असावा ? धंदा बोलतो म्हणजे धंदा भरभराटीस येतो असा अर्थ आहे. समाधानः–संस्कृतांत पुल् वृद्धौ असा धातू आहे. पोलति=वोल्लइ=बोले. भाषणार्थक बोल निराळा व वृद्ध्यर्थक बोल निराळा.

(६) काढणेंः—कृष पासून काढ सर्वमान्य. परंतु, थांब, त्याचें काढतों, तुझें काढतों, या वाक्यांतील काढ कसा निष्पादावयाचा ? येथें काढणें म्हणजे मार देणें असा अर्थ आहे. समाधानः-क्रथ् मारणें असा संस्कृत धातू आहे व त्याचें कर्म षष्ठ्यन्त असतें. तस्य क्राथयामि=त्याचें काढतों. कर्षणार्थक काढ निराळा व मारणार्थक काढ निराळा. क्राथय=काढ.

(७) पाडणेंः—पातय् पासून पाड सर्वमान्य. परंतु,फळ्या पाडणें, फाकी पाडणें, तुकडे पाडणें, यांतील पाड कसा निष्पन्न झाला ? येथें पाडणें म्हणजे कापणें असा अर्थ आहे समाधानः–संस्कृत पाटय् पासून हा पाड निघाला आहे. फलकान् पाटयति=फळ्या पाडतो.

(८) चोरणेंः—चुर पासून चोर सर्वमान्य. परंतु आंग चोरणें, चोरून जाणें, या वाक्यांतील चोर् कोठला ? येथें चोरणें म्हणजे छपून लपून जाणें असा अर्थ आहे. समाधानः-संस्कृतांत त्सर छद्मगतौ असा धातू आहे. त्सरणें चोरणें. अंगत्सरणं=आंग चोरणें. त्स=च.

(९) जाः— संस्कृत या पासून मराठी जा सर्वमान्य. परंतु, येत नाहीं जा !, मेर जा !, या वाक्यांतील जा कोठला ? समाधानः—संस्कृत द्यै न्यङ्करणे धातू आहे. त्याचें आशीर्लिङाचें द्वितीयपुरुषीं एकवचनीं रूप द्याया: होतें. द्याया:, नैष्यामि=जाजा ! येत नाहीं. एथें जाणें या क्रियापदाचा अर्थ तिरस्कार असा आहे. गमनार्थक जा निराळा व तिरस्कारार्थक जा निराळा. द्य=ज्ज.

(१०) दगडः— दृषद्=दखड=दगड अशी परंपरा अश्मार्थक दगड शब्दाची सर्वमान्य. परंतु अरे दगडा, तूं मूर्ख आहेस, एथें दगड शब्द कसा व्युत्पादावयाचा ? कां लक्षणेनें काम भागवावयाचें ? समाधानः— संस्कृतांत असा प्रयोग असेः— रे दग्ध ! मूर्खोऽसि=अरे दगडा, मूर्ख आहेस. दग्ध=दगढ=दगड=डगड— दग्ध म्हणजे निंद्य. निंद्यार्थक दगड निराळा व अश्मार्थक दगड निराळा.

(११) दुड्ढाचार्यः— हा शब्द प्रतिलोम गतीनें व्युत्पादूं गेलों असतां अनेक तर्क करतां येतील. परंतु ते सर्व अनैतिहासिक व अनिश्चित होतील. मूळ संस्कृतांत जेव्हां ह्या मराठी शब्दाचा पूर्वशब्द आपाततः वाचनांत भेटेल तेव्हांच ह्या शब्दाची व्युत्पत्ति निश्चित ठरविणें शक्य आहे. संस्कृतांत दोग्धृ म्हणून शब्द आहे. त्याचा अर्थ भाडोत्री कवि असा आहे. भाडोत्री म्हणजे भिकार कवींत जो श्रेष्ठ त्याला दोग्ध्राचार्य म्हणत. दोग्ध्राचार्य=दोड्ढाचार्य=दुड्ढाचार्य. दुड्ढाचार्य ह्या शब्दाचा मराठींत अर्थ ढोंगी वगैरे आहे. कानडी दोड्डु (मोठा) पासून दुड्ढ व्युत्पादण्यांत स्वारस्य नाहीं.

अशीं आणीक हजारों उदाहरणें देतां येतील. सांगण्याचें तात्पर्य इतकेंच कीं मराठी निरुक्ती यास्कीय निरुक्तीसारखी स्याद्वादी नाहीं, अद्वैतवादी आहे. खेरीज, निरुक्तीचें हें कृत्य हुकमी नाहीं. वैदिक, संस्कृत, महाराष्ट्री, अर्धमागधी, वगैरे ग्रंथ वाचतां वाचतां पूर्वभाषांतील शब्दांची पश्चात्कभाषांतील म्हणजे मराठींतील शब्दांशीं सांगड घालून द्यावयाची असते. म्हणजे ही सांगड घालतांना प्रथम (१) जुन्या व नव्या मराठींतील एकोनएक शब्दांची ओळख निरुक्तकाराला पाहिजे. व (२) नंतर पूर्वभाषांतील शब्द भेटला असतां त्याची गांठ मराठींतील योग्य शब्दाशीं घालून देण्याची हातोटी साधली पाहिजे. ही हातोटी केवळ अनुभवानें येणारी आहे. हजारों चुक्या कराव्या, शेकडोंदा भलत्या पूर्वशब्दाचीं भलत्याच मराठी शब्दाशीं लग्नें लावून द्यावी व नंतर खरी वधूवरें सांपडलीं असतां खोटीं लग्नें निर्लज्जपणें मोडून टाकावीं, असे टक्केटोणपे खातां खातां शब्दशास्त्राचें जोसपण आंगीं बाणत असतें, एरव्हीं नाहीं. यद्यपि जोसपण आंगीं बाणलें तत्रापि मराठींतील वाटेल त्या शब्दाचें महाराष्ट्री किंवा संस्कृत गणगोत

दा. क. ८५५५ ५०

कोणीहि जोशी ताटकन व बिनचूक सांगू शकत नाहीं. पर्वभाषांतील ग्रंथ वाचीत असतांना स्मृति, उपस्थिति, व कल्पकता या त्रयींची ज्या मानानें कृपा होईल त्या मानानें मराठी शब्दांच्या संस्कृत गणगोताचें टिपण करून ठेवावयाचें असतें. अशीं टिपणें ज्यानें दोन चार तपें केलीं त्याला निरुक्ताचार्याच्या पदवीवर न्यायानें हक्क सांगतां येतो. एवंगुणविशिष्ट निरुक्तकार व पूर्वप्रोक्तगुणविशिष्ट पांच चार विद्वान साहाय्यक जेव्हां शब्दमृगांची पारध दहापांच वर्षें करतील, तेव्हां मराठी भाषेच्या इतिहासाचीं प्राथमिक दोन उपकरणें तयार होतील. पहिलें अंग शब्दकोश व दुसरें अंग व्युत्पत्ति. हीं दोन उपकरणें तयार झाल्यावर नंतर भाषेच्या इतिहासाची गोष्ट काढावयाची.

मराठी भाषेचा इतिहास म्हणजे काय ?

मराठी भाषेचा इतिहास म्हणजे काय ? हा इतिहास म्हणजे एक बंडच आहे. त्याचे अनेक भाग व उपकरणें आहेत. पाल्हाळ न लावतां आणि लांबलचक वाक्यें व परिच्छेद ह्यांची रचना करण्यांत वेळ न घालवितां, संक्षेपानें त्यांचें थोडक्यांत परिगणन करतों. भाषा म्हटली म्हणजे तिचे खालील अवयव सर्वसामान्य असतातः- (१) उच्चार, (२) उच्चाराच्या खुणा ऊर्फ अक्षरें, (३) शब्द, (४) वाक्य, (५) आगम, आदेश, प्रत्यय इत्यादि, (६) स्वर व आघात. हे सहा अवयव मातृभाषेंतून अपत्यभाषेंत कोणत्या रूपान्तरानीं उतरले व अपत्यभाषेच्या जन्मापासून अद्यतन ह्यातीपर्यंत त्या रूपान्तरांत कोणकोणते फेरफार झाले या बाबीची नियमबद्ध हकीकत सांगणें म्हणजे मराठी भाषेचा इतिहास लिहिणें. मातृभाषेला दुसरीं अपत्यें व चुलतेमामे असल्यास त्या सोदरांच्या व चुलत्यामामांच्या रूपाहून विवक्षित अपत्याचें रूप कोणत्या बाबींत समविषम आहे व कां आहे याचाहि ऊहापोह भाषेच्या इतिहासांत करण्यापासून त्या भाषेचें रूप ठळकपणें व वैशिष्ट्यानें ध्यानांत येण्यास मार्ग होतो. तसेंच ज्या समाजांत, संस्कृतींत व हवापाण्यांत मातृभाषा जन्मली व वाढली त्या समाजाहून, संस्कृतीहून किंवा हवापाण्याहून निराळ्या परिस्थितींत अपत्यभाषा जन्मल्यामुळें व वाढल्यामुळें अपत्याचें रूप कसें व किती बदललें वगैरे प्रश्नहि याच इतिहासांत पडतात. असला हा इतिहास निर्माण करतांना खालील तीन प्रकरणें सिद्ध होतात. (१) आदेशप्रक्रिया जीस यूरोपांत Phonetics म्हणतात ती, (२) वर्तमान व भूत व्याकरण, व (३) वाक्यरचनेचा इतिहास. (१) आदेशप्रक्रियेंत पूर्वभाषेंतून पश्चात्कभाषेंत शब्दादिरूपान्तरें कशीं व कोणतीं होतात तें निरूपण केलेलें असतें. (२) व्याकरणांत भाषेच्या वर्तमान व भूत रूपाचें पृथक्करण केलेलें असतें. आणि (३) वाक्येतिहासांत गद्यपद्यवाक्यांची रचना वेळोवेळ कसकशी वाढत व बदलत गेली हें दाखविलेलें असतें. तात्पर्य, मराठी भाषेचा इतिहास रचावयाचा म्हणजे खालील पांच प्रकरणांची निर्मिती करावयाची:—

(१) कोश ऊर्फ निघंटु, (२) निरुक्तं, (३) व्याकरण, (४) आदेशप्रक्रिया आणि उच्चार व अक्षरें यांचा इतिहास, (५) वाक्यप्रक्रिया.

पांच प्रकरणांचें विवरण

(१) पैकीं भाषेचा विस्तार कळण्याकरितां अखिल भूत व वर्तमान शब्दांचा कोश ऊर्फ निघंटु तयार करणें भाग पडतें. मराठींतील अखिल शब्दजात ज्यांत आलें आहे असा निघंटु मराठींत नाहीं. मोलस्वर्थचा कोश व रघुनाथशास्त्री गोडबोले यांचा हंसकोश ह्या दोहोंत मिळून मराठींतील सरासरी निम्मे शब्द संग्रहीत झाले आहेत. सबब, मराठी भाषेतिहासकाराला अखिल शब्दांचा निघंटु तयार करणें अवश्य झालें आहे.

(२) निघंटु सिद्ध होत असतांना व झाल्यावर अखिल शब्दांची व्युत्पत्ति पूर्वभाषेंतून दाखवून देणें हें दुसरें कृत्य आहे. व्युत्पादनालाच शब्दांचा इतिहास म्हणतात. संस्कृतांत व्युत्पादनाला निरुक्त म्हटलें आहे. मराठींत व्युत्पत्तीचे कांहीं अत्यन्त प्राथमिक प्रयत्न झाले आहेत. राजवाड्यांनीं हजारों शब्दांच्या ऐतिहासिक व्युपत्त्या यद्यपि दाखवून दिल्या आहेत, तत्रापि आणीक हजारों व्युत्पत्त्या द्यावयाच्या राहिल्याच आहेत. तेव्हां हेंहि उपकरण मराठी भाषेच्या इतिहासकाराला इतिहास लिहिण्यापूर्वी सिद्ध करून घेतलें पाहिजे. त्याशिवाय पुढील इमारत शक्य नाहीं.

(३) इतिहासाचें तिसरें उपकरण व्याकरण हें होय. या उपकरणांत वाक्यांतील शब्दरूपांचें व शब्दांचें पृथक्करण केलेलें असतें. हें पृथक्करण संस्कृतांत पाणिनीनें अनुपम केलेलें आहे. तसें पृथक्करण अद्याप मराठी भाषेचें झालेलें नाहीं. दादोबा, गोडबोले, दामले, वगैरेंचीं व्याकरणें अत्यंत अशास्त्र व अपूर्ण आहेत. त्यांतल्यांत्यांत दामल्यांचें व्याकरण इतर दोघांच्याहून बरेसें आहे. अशी दुःस्थिति असल्यामुळें शास्त्रीय मराठी व्याकरण रचणें अपरिहार्य आहे. पाणिनीय पद्धती व ऐतिहासिक पद्धती ह्या दोन्ही पद्धतींचें साहाय्य घेऊन मराठी भाषेचें व्याकरण रचिलें पाहिजे. इतिहास कोणत्या बाबींचा द्यावयाचा हें वर्तमानकालीन व भूतकालीन व्याकरणाशिवाय इतिहासकाराला सांगतां यावयाचें नाहीं.

(४) अक्षरें, उच्चार व आदेश यांचा इतिहास पाणिनीनें दिला नाहीं, हें मोठें आश्चर्य आहे. त्याला वैदिक व संस्कृत हीं दोन भाषेचीं रूपें माहीत होतीं व ह्या दोहींची रूपसिद्धि त्यानें केली आहे. परंतु वैदिक भाषेंतून संस्कृत भाषेंत शब्द येतांना त्यांच्यांत फेरबदल कोणत्या नियमांनीं झाले, हें सांगण्याचें स्वप्नसुद्धां त्याच्या ग्रंथांत नाहीं. वैदिक ही पूर्वभाषा व संस्कृत ही पश्चात्क भाषा असेंहि स्पष्ट त्यानें कोठें सांगितलेलें आढळत नाहीं. संस्कृताहून वैदिक निराळी एवढें त्याला माहीत आहे. भाषा व छंदस् हे दोन शब्द तो योजतो आणि दोहींना तो समकालीन समजतो.

जुनी ज्ञानेश्वरी मराठी व वर्तमान चिपळूणकरी मराठी समकालीन समजून नव्या मराठीतल्याहून जुन्या मराठींत रूपसिद्धि अमक्या तऱ्हेनें निराळी होते असें जसें आधुनिक मराठी वैय्याकरणानें कालानपेक्ष बोलावें तसाच प्रकार पाणिनीचा झाला आहे. हें कालदुर्लक्ष्य त्यानें मुद्दाम केलें असें आमचें मत आहे. कारण पाणिनिपूर्वकालीन उपनिषदांतून शब्दांची व्युत्पत्ति म्हणजे इतिहास जुन्या भाषेंतून केल्याचीं उदाहरणें आहेत. कालाकडे म्हणजे इतिहासाकडे दुर्लक्ष्य केल्यामुळें, पाणिनीच्या निरुपम कृतींत मोठाच दोष घुसला आहे. गम्‌चें गच्छ् होतें व अस्मत्‌चें अहं होतें एवढेंच फक्त पाणिनि सांगतो; परंतु गच्छ् व अहं हीं रूपें पूर्ववैदिक भाषेंतील असावींत किंवा हे आदेश असे कां होतात, याचा शोध करण्याकडे त्यानें लक्ष्य दिलेलें नाहीं. सार्वधातुकामागें दृश्‌चें पश्य् होतें व आर्धधातुकांमागें दृश्‌च रहातें. एवढेंच सांगून पाणिनि गप्प बसतो. परंतु असें कां होतें हें सांगण्याच्या खटपटींत तो पडला नाहीं. कारण ऐतिहासिक दृष्टीला त्यानें मुद्दाम मारून टाकिली होती. ही ऐतिहासिक दृष्टि वररुच्यादि प्राकृत वैय्याकरणांना बरीच आलेली होती.

ह्या प्राकृत वैय्याकरणांच्या ग्रंथांना व्याकरण हें नांव यद्यपि देतात, तत्रापि त्यांच्या ग्रंथांत प्राकृत भाषांच्या व्याकरणाच्या ऊहापोहापेक्षां आदेशप्रक्रियेचाच भाग बव्हंशानें असतो. शेषं संस्कृतवत्, असें म्हणून व्याकरणाचा भाग ते पाणिनीवर सोंपवितात. तात्पर्य, प्राकृत वैय्याकरण हे, वस्तुतः, आदेशप्रक्रियाकार म्हणजे Phoneticians आहेत व एका अर्थानें प्रातिशाख्यकारांचे वंशज आहेत. ह्या प्राकृत आदेशप्रक्रियाकारांचें व्यंग असें आहे कीं आदेशांचें संपूर्ण क्षेत्र आक्रमण करण्याचा सायास त्यांनीं केला नाहीं व महाराष्ट्र्यादि भाषांतील अनेक शब्दांचे संस्कृतांतील पूर्वशब्द त्यांना दाखवून देतां आले नाहींत. महाराष्ट्र्यादि भाषांचे संपूर्ण कोशहि त्यांनीं तयार केले नाहींत. संपूर्ण कोश नसल्यामुळें संपूर्ण व्युत्पत्तीहि त्यांच्या हातून झाली नाहीं. संपूर्ण व्युत्पत्ति हाताशीं नसल्यामुळें संपूर्ण आदेशप्रक्रिया त्यांना शक्य नव्हती. मराठींत अशी अपूर्णता न रहावी अशी आपणा आधुनिकांची इच्छा असणार हें उघड आहे. ही इच्छा केवळ इच्छाच राहिली नसून तिला थोडेंबहुत मूर्त स्वरूपहि आलेलें आहे. ग्रियर्सन, भांडारकर, व ब्लोश ह्या तिघांनीं जर्मनी, महाराष्ट्र व फ्रान्स या तीन देशांत मराठीच्या आदेशप्रक्रियेसंबंधानें शोध प्रसिद्ध केले आहेत. सर्वांत भांडारकरांचे प्रयत्न सर्वांच्या पूर्वीचें आहेत. तिन्हीं प्रयत्न अपुरे आहेत, त्यांना परिपूर्णता आणण्याची नवी खटपट होणें अगत्याचें आहे. ब्लोश यांनीं आपला ग्रंथ छापून अद्याप दोन वर्षेंहि झालीं नसतील. परंतु, हे तिन्ही प्रयत्न परभाषांतून झाले आहेत. त्यामुळें आपल्याला त्यांची माया कमी. मराठीच्या आदेशप्रक्रियेवर मराठींत अद्याप ग्रंथ नाहीं. तो झाला म्हणजे मराठी भाषेच्या व्युत्पत्तीच्या नियमांचें ज्ञान होईल व त्या भाषेच्या इतिहासाच्या सिद्धीला साहाय्य होईल.

(५) उच्चार, अक्षरें व शब्द यांचा प्रपंच झाल्यावर, वाक्यांचा प्रपंच ओघानेंच येतो. वाक्यांतील शब्दांचे अन्योन्यसंबंध व प्रयोग यांच्या स्वभावांत वेळोवेळ कोणकोणते फरक झाले हें इतिहासाच्या ह्या भागांत प्रथम सांगून, नंतर वाक्यांतील शब्दरचना संस्कृताप्रमाणें समस्त आहे कीं इंग्रजीप्रमाणें व्यस्त आहे कीं तुर्कीप्रमाणें श्लिष्ट आहे कीं चिनीप्रमाणें अगदीं सुटी व एकपदी आहे व ती तशी पूर्वभाषेंतून पश्चात्कभाषेंत कशी झाली ह्या बाबींचें ऐतिहासिक निरूपण करावयाचें असतें. वाक्य दोन प्रकारचें, गद्य व पद्य. पैकीं पद्यवाक्याच्या विचाराला छंदःशास्त्र म्हणतात. पूर्वभाषेंतून पश्चात्कभाषेंत गद्याच्या व पद्याच्या पद्धती कश्या उत्पन्न झाल्या व त्यांची पश्चात्कभाषेंत वाढ कशी झाली, हा विषय गद्यपद्यवाक्येतिहासाचा असतो. वाक्यविचार झाल्यानंतर वाक्यसमूहाकडे इतिहासकाराला वळावें लागतें. येथें रीति, शैली ऊर्फ पद्धती इचा ऊहापोह होतो. तो ऊहापोह होतांना लालित्य, सौष्ठव, योग्यता, काठोर्य इत्यादींचा इतिहास देऊन व रीतीचे वेळोवेळचे मासले देऊन व तींत वेळोवेळीं झालेले फेरफार दाखवून भाषेतिहासाची समाप्ति करावयाची असते. ह्या प्रकरणाच्या बैठ्या स्वरूपाला संस्कृतांत साहित्यशास्त्र म्हणतात. बैठ्या साहित्यशास्त्राचा विचार संस्कृतांत अत्युत्तम झालेला आहे. साहित्याच्या इतिहासाचा मात्र त्या भाषेंत पूर्ण अभाव आहे. तो इतिहास भाषेतिहासाचें अंग म्हणून मराठींत नव्यानेंच निर्माण केला पाहिजे. मराठींतील छंदांचा इतिहास देण्याचा प्रयत्न अन्यत्र एका विस्तृत निबंधांत केला आहे. वाक्येतिहासाच्या बाकीच्या अंगाची ओळखहि मराठीला अद्याप नाहीं.

एणेंप्रमाणें मराठी भाषेचा इतिहास रचावयाचा म्हणजे खालील पांच ग्रंथ तयार करावयाचे :—

१ कोश ऊर्फ निघंटु, २ निरुक्त, ३ व्याकरण, ४ आदेशप्रक्रिया, ५ वाक्येतिहास ऊर्फ साहित्याचा इतिहास.

पैकीं निघंटु व व्याकरण हीं दोन भाषेचीं बैठीं रूपें असल्यामुळें, तीं इतिहासांत पडत नाहींत, इतिहासाच्या उपकरणांत पडतात. हीं दोन उपकरणें आधींच मराठींत तयार असतीं, तर तीं नव्यानें सिद्ध करून घेण्याची यातायात न पडती. तशीं सोय नाहीं, म्हणून इतिहासचिकीर्षूंला तीं स्वतः तयार करून घेतलीं पाहिजेत. शब्देतिहास ऊर्फ निरुक्त, आदेशप्रक्रिया व साहित्येतिहास हीं तीन प्रकरणें तर त्याच्या श्रमाचे ऐन विषय होत. तेव्हां हीं पांचहि प्रकरणें मराठी भाषेतिहासकाराला निर्माण करावयाचीं आहेत. एखाद्या भाषाशास्त्रज्ञाच्या हाताखालीं चारपांच साहाय्यक विद्वान् निदान पांच चार वर्षें जेव्हा खपतील, तेव्हां हीं पांच प्रकरणें मनाजोगतीं सिद्ध होतील. ह्या मेहनतीला खर्च काय येईल त्याचा अंदाज दुसऱ्या एका प्रकरणाचा ऊहापोह झाल्यानंतर पुढें करूं.

कोश, निरुक्त, व्याकरण व आदेशप्रक्रिया हीं जीं चार प्रकरणें सांगितलीं त्यांत फक्त शब्दाचा विचार होतो. शब्दशक्ति म्हणून जी बाब आहे तिचा विचार बिलकुल होत नाहीं. म्हणजे ह्या चार प्रकरणांत भाषेच्या बहिरंगाचा ऊर्फ शरीराचा फक्त विचार होतो. अंतरंगाचा म्हणजे शक्तीचा ऊर्फ अर्थाचा बिलकुल विचार करावयाचा नसतो. पांचवें प्रकरण जें वाक्यप्रक्रियेचें तिचा साहित्य म्हणून जो भाग आहे त्यांत शब्दाचाहि विचार होतो व शब्दशक्तीचाहि विचार होतो. लालित्य, पारुष्य, सौष्ठव व इतर बहिरलंकार केवळ शब्दाचे म्हणजे बहिरंगाचे होत. आणि ध्वनि, व्यंजना, लक्षणा, व इतर अंतरलंकार केवळ अर्थाचे होत. म्हणजे साहित्याच्या प्रांतांत आपण शिरलों म्हणजे भाषेच्या बहिरंगापेक्षां अंतरंग जो अर्थ त्याचेंच प्रस्थ प्रधान असलेलें आढळून येतें. शब्द म्हणजे टरफल व अर्थ म्हणजे मगज असा भेद साहित्यप्रांतांत एथें प्रथम नजरेस येतो. एथेंच वाङ्मय म्हणून ज्याला म्हणतात त्या प्रांताचा प्रारंभ होतो.

वाङ्मयाचा प्रांत


मनुष्यजातीच्या मुखांतून जें जें म्हणून सार्थ व संपूर्ण विधान शब्दरूपानें भूत, वर्तमान व भविष्यकालीं बाहेर पडलें, पडतें व पडेल तें तें सर्व वाङ्मय होय. वाङ्मयांत अर्थाकडे सर्व लक्ष्य असतें, शब्दाकडे बिलकुल नसतें. वाङ्मय दोन प्रकारचें, (१) तोंडी (२) लेखी. अक्षरांचा शोध लागल्यावर लेखी वाङ्मयाचा उदय होतो; व तत्पूर्वी सर्व वाङ्मय तोंडी असतें. अक्षरांचा शोध भारत वर्षांतील आर्यांना लागण्यापूर्वी आर्यांचें सर्व वाङ्मय तोंडी होतें, हें वाङ्मय ह्या शब्दावरूनच सिद्ध होतें. असलें हें तोंडी व लेखी वाङ्मय पुनः दोन प्रकारचें असतें. (१) ऐहिक व (२) पारलौकिक. इहलोकांतील खटाटोपाशीं ज्यांचा अनन्यसंबंध असतो तें ऐहिक व परलोकांतील विषयांशीं ज्याचा अनन्यसंबंध असतो तें पारलौकिक. ऐहिक वाङ्मयाचे तीन भाग आहेत (१) ज्ञानवर्धक, (२) व्यवहारवर्धक व (३) प्रसारक. आंतर व बाहिर सृष्टीचा शोध ज्या वाङ्मयानें प्रकाशित व प्रदर्शित होतो त्या वाङ्मयाला ज्ञानवर्धक ऊर्फ शास्त्रीय वाङ्मय म्हणतात. व्यावहारिक म्हणजे व्यवहारवर्धक कलांचें प्रकाशन किंवा प्रदर्शन ज्या वाङ्मयानें सिद्ध होतें तें व्यवहारवर्धक ऊर्फ कलात्मक वाङ्मय होय. आणि समाजांतील लहानमोठ्या बालवयस्क व्यक्तींना शास्त्रज्ञानाचें व कलाज्ञानाचें बालबोध किंवा मनोरंजक किंवा मूलतत्त्वात्मक ज्ञान ज्याच्या द्वारा होतें त्या वाङ्मयाला कला व शास्त्र यांचें **प्रसारक** वाङ्मय ही संज्ञा आहे. **प्रसारक वाङ्मय** दोन प्रकारचें, (१) **बालोपयोगी** व (२) **बालेतरोपयोगी**. कनिष्ठ शाळा, मध्यम शाळा व उच्च पाठशाळा यांतील चार वर्षांपासून पंचवीस वर्षांपर्यंतच्या शालेय बालांमध्यें म्हणजे अज्ञांमध्यें शास्त्रांच्या व कलांच्या मूळ तत्त्वांचा प्रसार **बालोपयोगी**

प्रसारक वाङ्मय करतें. आणि शालेय अवस्थेच्या पलीकडे गेलेल्या बालेतर अज्ञांना शास्त्रज्ञान व कलाज्ञान यांची कणशः वरवर माहिती ज्याच्या द्वारा होण्याची सोय केलेली असते त्या वाङ्मयाला बालेतरोपयोगी प्रसारक वाङ्मय हें यथार्थ अभिधान आहे. हें बालेतरोपयोगी प्रसारक वाङ्मय ज्ञानप्रसाराचें काम मनोरंजक प्रबंधांच्या द्वारा करतें. काव्यें, नाटकें, कादंबऱ्या, गोष्टी, पवाडे, लावण्या, पदें, नीतिनिबंध, मनोरंजक चरित्रें, आल्हादकारक इतिहास, शास्त्रांच्या व कलांच्या माहितींचीं चटकदार चित्रालंकृत चोपडीं, सामान्य वर्तमानपत्रें व मासिक पुस्तकें, हीं सर्व ह्या बालेतरोपयोगी प्रसारक वाङ्मयाच्या सदरांत पडतात. पैकीं उच्च दर्जाचीं काव्यें, नाटकें, कादंबऱ्या, पदें, निबंध, नीतिप्रबंध, यांना विदग्ध वाङ्मय ऊर्फ सारस्वत हें नामाभिधान आहे. ह्या विदग्ध वाङ्मयाचें ऊर्फ सारस्वताचें कार्य महशूर आहे. शास्त्रें व कला यांचें आकलन करण्याची सोय कोणत्याहि कारणांनीं ज्यांना नाहीं त्यांना सभ्य, नीतिमान व नागर बनविण्याचें काम विदग्ध वाङ्मय करीत असतें. ह्या विदग्ध वाङ्मयाचा असाधारण धर्म म्हटला म्हणजे तें चमत्कृतिजनक शब्दांनीं व वाक्यांनीं अवतीर्ण झालेलें असतें. आणि ही चमत्कृति बालेतर अज्ञांचें चित्त वेधून घेऊन मम्मटानें म्हटल्याप्रमाणें स्त्रियांच्या गुलगुल गोष्टीच्या धर्तीवर अज्ञांना शास्त्रांच्या व कलांच्या कणांचा आस्वाद घेण्यास प्रवृत्त करते. ध्वनि, व्यंजना, लक्षणा, अर्थालंकार, व रीति ऊर्फ style इत्यादि रूपांचें सोंग घेऊन चमत्कृति चित्ताकर्षण करते व स्मृति, उत्प्रेक्षा, प्रत्यक्षीकरण इत्यादि रूपांनीं श्रोत्यांचें किंवा वाचकांचें हृदय उत्तेजित करते. आकर्षक व उत्तेजक असल्यामुळें ह्या विदग्ध वाङ्मयावर सामान्य जनांची निरतिशय भक्ति बसते व ह्या वाङ्मयाचे जे अत्यन्त कुशल कारागीर असतात त्यांचीं स्तुतिस्तोत्रें गाण्यांत सामान्य जन दंग होतात. शिवाय समाजांत सामान्य जनांचीच बहुसंख्या असल्यानें, विदग्धवाङ्मयकारांचा व्हावा त्याहून बेसुमार बोलबाला होतो. अशी वाजवीहून फाजील चहा समाजांत विदग्धवाङ्मयाची यद्यपि असलेली दिसते, तत्रापि एवढें विसरतां येणें मुष्कील आहे कीं हें वाङ्मय किती झालें तरी प्रसारक आहे, शास्त्रीय वाङ्मयाप्रमाणें निर्मायक नाहीं किंवा कलिक वाङ्मयाइतकें उपयोगी नाहीं. ऐहिक वाङ्मयाचा एकंदर विस्तार व वर्गीकरण एवंस्वरूपक आहे.

पारमार्थिक वाङ्मयांत परमार्थासंबंधानें विचार केलेला असतो. त्याचे तीन प्रकार, (१) शास्त्र, (२) कला व (३) प्रसार. पारलौकिक शास्त्रज्ञान म्हणजे अध्यात्मविद्या. पारलौकिक कलाज्ञान म्हणजे भक्ति, तंत्र, यज्ञयाग, इत्यादि. व पारलौकिकप्रसारकवाङ्मय म्हणजे बाल व बालेतर यांच्यांत अध्यात्मशास्त्र व भक्ति वगैरेचें ज्ञान पसरविणारें सुबोध किंवा कथात्मक किंवा मूलतत्त्वात्मक वाङ्मय.

वाङ्मयेतिहासाचे प्रकार

ऐहिक व पारलौकिक अश्या तोंडी व लेखी वाङ्मयाचा असा हा प्रांत आहे. ह्या द्विविध वाङ्मयाचा जो इतिहास त्याला वाङ्मयाचा इतिहास म्हणतात. सारस्वताचा ऊर्फ विदग्धवाङ्मयाचा इतिहास हा वाङ्मयेतिहासाचा एक अंश आहे व तोहि अत्यन्त महत्त्वाचा भाग आहे अशांतली बाब नाहीं. वाङ्मयाचा हा जो प्रांत रेखाटला त्याचा नकाशा एणें प्रमाणें:-



ह्या पंचविध वाङ्मयाचा इतिहास लिहावयाचा म्हणजे त्याचे, अर्थात्, पांच खंड होतील. ते एणें प्रमाणें :—

(१) शास्त्रेतिहास, (२) कलेतिहास, (३) बालोपयोगीशास्त्रकलाज्ञानप्रसारक-वाङ्मयेतिहास, (४) विदग्धवाङ्मयेतिहास अथवा चमत्कृतिजनकवाङ्मयेतिहास, (५) परलोकसंबंधकवाङ्मयेतिहास.

यूरोपीयन भाषांतून पंचवीस तीस वर्षांपूर्वी जे लहानमोठे वाङ्मयेतिहास झाले त्यांच्यांत शेंकडा नव्वद भर विदग्धवाङ्मयावर दिलेला आढळतो. शास्त्र, कला, बालशिक्षण, व परलोक, या वाङ्मयाच्या ज्या चार मोठमोठ्या शाखा त्यांचा परामर्श हे इतिहास फारच अल्पस्वल्प घेत, किंबहुना मुळींच घेत नसत. पांचपंचवीस वर्षांपूर्वीचे हे असले यूरोपीयन इतिहास पाहून, आमच्या इकडील लोकांचीहि वाङ्मयेतिहासाची कल्पना यूरोपीयन इतिहासकारांच्या प्रमाणें अर्धवट बनली. कवींचीं चरित्रें, त्यांच्या काव्याचें गुणदोषविवेचन व त्यांचें गुणग्रहण हा वाङ्मयाच्या इति-

हासाचा मुख्य प्रांत होय, अशी अपक्व कल्पना साहित्यपरिषदेची व महाजनींचीहि असलेली दिसते. परंतु ती अपूर्ण व अर्धवट आहे, हें वरील प्रपंचावरून ध्यानांत येईल. वाङ्मयाचा इतिहास वाङ्मयाचा सर्व प्रांत व्यापून राहिला पाहिजे. केवळ विदग्धवाङ्मयावर भूक भागवून रहाणें सध्यांच्या काळांत शक्य नाहीं व इष्टहि नाहीं.

वाङ्मय व इतिहास

वाङ्मयाचा इतिहास असा प्रयोग आपण केलेला आहे. त्यावरून उघडच होतें कीं वाङ्मय व इतिहास ह्या दोन वस्तु भिन्न आहेत. इतिहास ही वस्तु वाङ्मयांत प्रधानत्वेंकरून पडत नाहीं. असें जर आहे म्हणजे इतिहास हा जर वाङ्मयाचा अस्सल भाग नाहीं, तर मग इतिहास कशांत पडतो ? इतिहास ही काय चीज आहे ? ह्या प्रश्नाला उत्तर असें आहे कीं इतिहास ही वाङ्मयाची वृत्ति आहे. काल हा जसा बुद्धीची वृत्ति आहे, तसा इतिहास हा बुद्धीचें प्रदर्शक जें वाङ्मय त्याची वृत्ति आहे. अखिल वाङ्मय कालावर पसरलेलें आहे म्हणजे त्यावर कालाचें आवरण आहे. कालाचे दोन किंवा अधिक टापू घेऊन त्या अवधींत वाङ्मयाचीं कोणतीं स्थित्यन्तरें झालीं तें इतिहास कथन करतो. इतिहास म्हणजे वाङ्मयाची गतकालीन हकीकत. ही हकीकत दोन तऱ्हांनीं सांगतां येते. शास्त्रीय पद्धतीनें सांगण्याची पहिली तऱ्हा व ज्ञानप्रसारहेतूनें सांगण्याची दुसरी तऱ्हा. गणन, कार्यकारणसंबंधदर्शन व वर्गीकरण ह्या दृष्टीनें वाङ्मयाचीं स्थित्यन्तरें सांगणें म्हणजे वाङ्मयाचा शास्त्रीय इतिहास रचणें. आणि अज्ञ बालांच्या किंवा अज्ञ प्रौढांच्या माहितीकरतां मनोरंजक शब्दांनीं वाङ्मयाची बालबोध किंवा चमत्कृतिजनक हकीकत सांगणें म्हणजे सामान्यजनप्रिय इतिहास तयार करणें. पैकीं कोणती तऱ्हा आपणाला अभिप्रेत आहे या बाबीचा खुलासा महाजनींनी स्पष्ट केलेला नाहीं. लोकप्रिय इतिहासाची रचना शास्त्रीय इतिहासाच्या पायावर होणारी म्हणजे तत्पश्चात्क होणारी ज्याअर्थीं आहे, त्याअर्थीं शास्त्रीय इतिहास साहित्यपरिषदेसारख्या विद्वन्मंडळाला मुख्यतः अभिप्रेत असावा, अशा दृष्टीनें महाराष्ट्रांतील वाङ्मयाच्या इतिहासाचा व्याप कियन्मर्यादाक आहे त्याची शहानिशा करतों.

महाराष्ट्रीय लोकांचें वाङ्मय

शक ५०० पासून शक १८४० पर्यंतच्या १३४० वर्षांत महाराष्ट्रांत महाराष्ट्रांतील लोकांनीं खालील भाषांतून वाक्प्रदर्शन केलें, (१) संस्कृत, (२) मराठी,

(३) फारसी, (४) व्रज व (५) इंग्रजी. पैकीं संस्कृतांत शास्त्रें, कला व विदग्धवाङ्मय ह्या तीन शाखांचें प्रदर्शन झालेलें आहे. मराठींत शास्त्रीय किंवा कलिक किंवा बालशिक्षक वाङ्मय फारसें नाहीं, फक्त पारलौकिक व किंचित् ऐहिक विदग्ध वाङ्मय झालेलें आहे. फारसींतून व व्रजभाषेंतून अत्यंत अल्प प्रदर्शन झालेलें आहे, परंतु झालेलें आहे. आणि इंग्रजींतून सध्यां अर्थशास्त्र व प्राचीन शोध यांच्या संबंधानें शास्त्रीय प्रदर्शन होत आहे. भाषावार महाराष्ट्रांतील वाङ्मयाचा हा असा व्याप आहे.

११

मराठ्यांचा इतिहास कसा लिहावा ?

मराठ्यांचा इतिहास लिहावा तरी कसा असा प्रश्न साहजिक उद्भवतो. ह्याला उत्तर असें आहे कीं मराठ्यांचा इतिहास शास्त्रीय पद्धतीनें लिहिला तरच त्याला कांहीं किंमत देतां येईल. इतिहास लिहिण्याला प्रस्तुतची संधि महाराष्ट्रांतील लोकांना मोठी उत्तम आली आहे. इतिहास उत्तम तऱ्हेनें कसा लिहितां येईल ह्याची फोड युरोपांतील शास्त्रयांनीं करून ठेविलेली आहे. ह्या फोडीचा फायदा करून घेऊन मराठ्यांच्या इतिहासाची इमारत उभारली पाहिजे. युरोपांत सतराव्या व अठराव्या शतकांत इतिहासकारांनीं व चरित्रकारांनीं ज्या चुक्या केल्या त्याच जर आपण एकोणिसाव्या शतकाच्या शेवटीं करूं लागलों तर एकोणिसाव्या शतकांतील युरोपाशीं आपला परिचय व्यर्थ झाला असें होईल.

इतिहासरचनेचीं पांच कलमें

मराठ्यांच्या इतिहासाचा अभ्यास करणाऱ्यांनीं खालील कलमें लक्ष्यांत बाळगिलीं पाहिजेत. (१) कोणताहि पूर्वग्रह घेऊन इतिहास किंवा चरित्रें लिहावयास लागूं नये. आतांपर्यंत लिहिलेल्या बहुतेक चरित्रांतून हा दोष ढळढळीत दिसून येतो. महादजी शिंदे, गोविंदपंत बुंदेले, परशरामभाऊ पटवर्धन, बापू गोखले, पहिला बाजीराव, वैगेरे सर्व सेनानायक एकासारखे एक अप्रतिम योद्धे होते असा त्या त्या ग्रंथकारांचा सांगण्याचा झोंक असतो. आतां पहिल्या बाजीरावाच्या बरोबरीला ह्यांपैकीं एकहि योद्धा बसवितां येणार नाहीं हें उघड आहे. तसेंच बाजीरावाच्या खालोखाल महादजीच्या तोडीचा ह्यांत एकहि सेनापति नाहीं. परशरामभाऊ पटवर्धन दुय्यम प्रतीचा सेनानायक होता असें मला वाटतें. गोविंदपंत बुंदेले व बापू गोखले हे कनिष्ठ प्रतीचे सेनापति होत. हें कोणीहि समंजस मनुष्य कबूल करील. बापू गोखल्यानें तर कोण्या एका गोऱ्याचें सर्टिफिकेट घेऊन ठेविलें होतें ! सर्टिफिकेट्या सेनापतीची किती किंमत करावयाची तें मुद्दाम फोड करून सांगितली पाहिजे असें नाहीं ! हें सेनापतित्वासंबंधीं झालें. कित्येकांचा पूर्वग्रह मराठे सर्व प्रकारें श्रेष्ठ होते असें दाखविण्याचा असतो; कित्येकांचा ह्याच्या उलट असतो. तेव्हां पूर्वग्रहांना टाळा देणें ही मुख्य गोष्ट होय. (२) भरपूर अस्सल माहिती मिळाल्याशिवाय चरित्र किंवा इतिहासाचा भाग लिहिण्याचा खटाटोप करूं नये. (३) तशांतूनहि लिहावयाचा

संकल्पच असेल तर आपल्याला माहिती कोणती नाहीं तें स्पष्ट लिहावें. अस्सल भरपूर लेखसंग्रह जवळ असल्यावांचून जो कोणी इतिहास लिहावयाला जाईल त्याला माहिती नाहीं असा शेरा पुष्कळच प्रसंगांसंबंधीं द्यावा लागेल. (४) अस्सल भरपूर माहितीवरून कांहीं सिद्धान्त काढावयाचा तो काढावा. हें चवथें कलम पहिल्या कलमाचेंच एका प्रकारचें रूपांतर आहे अशी समजूत होण्याचा संभव आहे; परंतु तसा प्रकार नाहीं. पहिल्या कलमांत पूर्वग्रहप्रधान पद्धतीचा निर्देश केला आहे व ह्या चवथ्या कलमांत पश्चाद्ग्रहप्रधानपद्धतीचा निर्देश केला आहे. पूर्वग्रह मनसोक्त काढिलेलाच असतो. पश्चाद्ग्रह अस्सल भरपूर आधारांतून जात्या जो निघेल तोच घ्यावयाचा असतो.

अलीकडे जे इतिहास व चरित्रग्रंथ लिहिले गेले आहेत त्यांत ह्या पूर्वग्रहाच्या पद्धतीचें प्राधान्य विशेष दिसून येतें. कित्येक ग्रंथांतून ह्या दोन्ही पद्धतींची भेसळ झालेली आढळून येते. उदाहरणार्थ, एका ग्रंथांतील शिवाजी महाराजांच्या अष्टप्रधानात्मक राज्यपद्धतीविषयीं क्लृप्ति पहा. ह्या क्लृप्तींत तीन सिद्धांत ठरवावयाचे आहेत. (अ) शिवाजीची राज्यपद्धति अष्टप्रधानात्मक होती; (ब) ती मुसुलमानांच्या राज्यपद्धतीहून निराळी होती; (क) व युरोपांतील क्याबिनेट गव्हरमेंटसारखी ती होती. ह्या क्लृप्तींतील पहिला भाग तेवढा बव्हंशीं पश्चाद्ग्रहोत्पन्न म्हणजे साधार आहे. शिवाजीच्या ज्या बखरी व एक दोन अस्सल कागदपत्र आजपर्यंत प्रसिद्ध झाले आहेत त्यांच्या आधारावर शिवाजीची राज्यपद्धति (अष्ट) प्रधानात्मक होती असें विधान करण्यास कांहीं एक हरकत नाहीं.

आतां त्या प्रधानांची संख्या आठ होती किंवा त्याहून जास्त होती ह्या गोष्टीचा विचार करणें जरूर आहे. काव्येतिहाससंग्रहांतील ४०४ हें पत्र शिवाजीच्या राज्याभिषेकाच्या वेळचा कानूजाबता आहे. ह्या पत्रांत मुख्य प्रधान, अमात्य, सचीव, सेनापति, पंडितराव, न्यायाधीश, मंत्री, चिटणीस, सुमंत, बक्षी, सेनाधुरंधर, अशा अकरा अधिकाऱ्यांची प्रधानांत गणना केली आहे. युद्धादि प्रसंग किंवा राजपत्रांवर चिन्ह करण्याचा अधिकार ज्यांना असेल ते प्रधान होत असा ह्या कानूजाबत्यांतील मायन्याचा आशय दिसतो. याप्रमाणें वर दिलेले अकरा अधिकारी प्रधान ठरतात. परंतु ह्या कानूजाबत्यांच्या शेवटल्या कलमांत ह्या प्रधानमंडळाला अष्टप्रधान म्हणून संज्ञा दिली आहे. तेव्हां अष्टप्रधान ही संज्ञा विशिष्ट संख्यावाचक नसून केवळ समुदायवाचक आहे असा सिद्धांत काढणें अवश्य होतें. ह्या सिद्धांताला पोषक असें शिवाजीच्या कारकीर्दीतील दुसरें एखादें पत्र अद्यापपर्यंत उपलब्ध नाहीं; परंतु राजारामाच्या कारकीर्दींत अष्टप्रधानांत एकंदर नऊ असाम्या होत्या असें राजारामाच्या बखरीवरून ठरतें. तसेंच शाहूमहाराजांच्या कारकीर्दींतहि नऊ असाम्या होत्या असें काव्येतिहाससंग्रहांतील ४०५ पत्रावरून कबूल करावें लागतें. अष्टप्रधानांची

संख्या शिवाजीच्या पुढें आठच नव्हती हें ह्या दोन आधारांवरून सिद्ध आहे, व तोच प्रकार शिवाजीच्या वेळींहि होता, हें ४०४ पत्रावरून उघड आहे. हा वाद आठ ह्या संख्येपुरताच आहे. बाकी शिवाजीची राज्यपद्धति (अष्ट) प्रधानात्मक होती हा सिद्धान्त साधार आहे हें निर्विवाद आहे.

आतां ही राज्यपद्धति शिवाजीनें अजीबात नवीन शोधून काढिली किंवा मुसुलमानांपासून घेतली किंवा पूर्वीच्या संस्कृत नीतिशास्त्रांतून घेतली ? माझ्या मतें शिवाजीनें ही राज्यपद्धति मुसुलमानांपासून घेतली. पेशवा, मुजुमदार, वाकनीस, सुरनीस, डबीर वगैरे अधिकाऱ्याचीं नांवें मुसुलमानांच्या दरबारांतील आहेत. त्यांना मुख्य प्रधान, अमात्य, मंत्री, सचीव, सुमंत वगैरे संस्कृत नांवें शिवाजीनें दिलीं. बाकी शिवाजीची पद्धति मुसुलमानांच्या पद्धतीचेंच हुबेहूब अनुकरण होतें.

ही अष्टप्रधानात्मक पद्धत प्रस्तुतच्या युरोपांतील क्याबिनेट पद्धतीप्रमाणें तर नव्हतीच, परंतु सतराव्या शतकांतील यूरोपांतील कित्येक देशांतील क्याबिनेट पद्धती-प्रमाणें ती कांहींशी होती. शिवाजीच्या पद्धतींत व सतराव्या शतकांतील युरोपियन पद्धतींत अंतर असें आहे कीं शिवाजीचे न्यायाधीश व पंडितराव ह्या दोन प्रधानां-खेरीज बाकीचे सर्व प्रधान लढाया करीत व युरोपांतील प्रधानांना हा शिपायगिरीचा धंदा बहुशः माहीत नसे. सारांश, शिवाजीच्या प्रधानमंडळींचें साम्य यूरोपांतील कोणत्याहि शतकांतील क्याबिनेटशीं नाहीं. शिवाजीनें केवळ मुसुलमानांचा कित्ता गिरविलेला आहे. तेव्हां त्या क्लृप्तींत सूचित होणारी (ब) आणि (क) हीं कलमें पूर्वग्रहात्मक होत हें उघड आहे. सत्यासत्य पद्धतींची भेसळ होते ती ही अशी होते. ह्या भेसळीला फार जपलें पाहिजे. (५) उपमान प्रमाणावर कोणताहि सिद्धांत ठरवूं नये. हीं पांच कलमें लक्ष्यांत ठेवून इतिहासरचना केली असतां ती सन्मान्य होईल ह्यांत संशय नाहीं.

मराठ्यांच्या इतिहासाच्या शाखा

मराठ्यांच्या राष्ट्राच्या जीवनचरित्राचा अभ्यास अनेक दिशांनीं केला पाहिजे. (१) मराठ्यांचा सामाजिक इतिहास, (२) मराठ्यांचा राजकीय इतिहास, (३) मराठ्याच्या धर्माचा इतिहास, (४) मराठ्यांच्या संस्कृतीचा इतिहास, (५) मराठ्यांच्या भाषेचा इतिहास, (६) मराठ्यांच्या मोहिमांचा इतिहास, (७) मराठ्यांच्या लष्कराचा इतिहास, (८) मराठ्यांच्या आरमाराचा इतिहास, (९) मराठ्यांच्या कायदेकानूंचा इतिहास, (१०) मराठ्यांच्या किल्ल्यांचा इतिहास, (११) मराठ्यांच्या जमीनमहसुलाचा इतिहास वगैरे शाखांचा सशास्त्र व सोपपत्तिक असा अभ्यास झाला पाहिजे. मराठ्यांच्या राजकीय इतिहासाचा सध्यां येथें विचार चालला आहे, तेव्हां त्याचे विभाग सशास्त्र किती करितां येतील तें स्थूलमानानें सांगतों. (१) इ. स. १६४६ पर्यंत

शिवाजीच्या पूर्वीचा इतिहास, (२) १६४६ पासून १६८० पर्यंतचा स्वातंत्र्यार्थ लढाईचा इतिहास, (३) १६८० पासून १७०७ पर्यंतच्या स्वातंत्र्यार्थ लढाईच्या शेपटाचा इतिहास, (४) १७०७ पासून १७३१ पर्यंतचा स्वराज्यस्थापनेचा व हिंदुपदबादशाहीचा इतिहास, (५) १७३१ पासून १७६१ पर्यंतचा ब्राह्मणपदबादशाहीचा इतिहास, (६) १७६१ पासून १७९६ पर्यंतचा ब्राह्मणपदबादशाहीच्या जगवणुकेचा इतिहास,(७) १७९६ पासून १८१८ पर्यंतचा महाराष्ट्रसाम्राज्याच्या ऱ्हासाचा इतिहास, (८) १८१८ पासून १८९८ पर्यंतचा महाराष्ट्राच्या अवनतीचा इतिहास. मराठ्यांच्या इतिहासाच्या ह्या विभागांबरोबर महाराष्ट्राच्या भूज्ञानाचाहि अभ्यास झाला पाहिजे.

१२

महाराष्ट्राची वसाहत

महाराजिक व महाराष्ट्रिक

हे महरट्ट ऊर्फ माहाराष्ट्रिक लोक कोण, या बाबीचा प्रपंच " महाराष्ट्राचा वसाहतकाल " या लेखांत कांहीं केला आहे. ' महाराजाछन् ' ह्या सूत्रांत पाणिनी सांगतो कीं महाराज हा ज्यांच्या भक्तीचा विषय त्यांना माहाराजिक म्हणतात. महाराज म्हणजे कोण ? महाराज या शब्दाचे पाणिनीकालीं दोन अर्थ होते. महाराज म्हणजे इंद्र व महाराज म्हणजे केवळ सामान्य राजांहून जो मोठा राजा तो. पैकीं पहिला अर्थ घेतला तर माहाराजिक हे लोक इंद्राचे भक्त ठरतात. आणि दुसरा अर्थ घेतला तर महाराजसंज्ञक किंवा महाराजपदवीधर भूपतीचे जे भक्त ते माहाराजिक ठरतात. माहाराजिक शब्दाचे दोन्ही अर्थ घेतले, तत्रापि माहाराजिक शब्दाचा माहाराष्ट्रिक शब्दाशीं संबंध काय ? हा प्रश्न रहातोच. हा प्रश्न असा सोडवितां येतो. राजा ज्या भूमीवर राज्य करतो त्या भूमीला राष्ट्र म्हणत आणि राष्ट्र हें ज्यांच्या भक्तीचा विषय त्यांना राष्ट्रिक म्हणत. त्याप्रमाणेंच महाराजा ज्या भूमीवर माहाराज्य करी त्या भूमीला महाराष्ट्र म्हणत आणि महाराष्ट्र हें ज्यांच्या भक्तीचा विषय त्यांना माहाराष्ट्रिक म्हणत. महाराजा हा ज्यांच्या भक्तीचा विषय त्यांना माहाराजिक म्हणत व महाराजाचें महाराष्ट्र तें ज्यांच्या भक्तीचा विषय त्यांना माहाराष्ट्रिक म्हणत. तात्पर्य, महाराज या व्यक्तीच्या अनुलक्षानें माहाराजिक हा शब्द व महाराष्ट्र या देशाच्या अनुलक्षानें माहाराष्ट्रिक हा शब्द असे हे दोन्ही शब्द वस्तुतः एकार्थक आहेत.

वसाहतकार महाराष्ट्रिक, राष्ट्रिक व वैराष्ट्रिक

एणेंप्रमाणें माहाराजिक तेच माहाराष्ट्रिक, ही बाब निश्चित झाल्यावर, आतां दुसरा असा प्रश्न निघतो कीं दक्षिणारण्यांत वसाहत करण्यास जेव्हां माहाराष्ट्रिक लोक निघाले तेव्हां उत्तरहिंदुस्थानांत महाराजपदवी धारण करणारे कोण भूपति होते व महाराष्ट्र हें नांव ज्याला साजेल असा कोणता देश होता ? सांगावयाला नकोच कीं असा देश म्हणजे त्याकाळीं मगध होता. प्रद्योत, शैशुनाग, नंद व मौर्य ह्यांनीं एका पाठीमागून एक जें माहाराज्य केलें तें मगधांत केलें. माहाराज्य म्हणजे काय ? त्या

कालीं एकछत्री सत्तेला माहाराज्य म्हणत. ऐतरेय ब्राह्मणांत (३८।३९ अध्याय) साम्राज्य, भौज्य, स्वाराज्य, वैराज्य, पारमेष्ठ्य, राज्य, माहाराज्य, आधिपत्य, स्वावश्य, आतिष्ठ्य व एकराज्य, असे अकरा प्रकारचे नरपति ख्यापिले आहेत. मगधांतील भूपति एकछत्र ऊर्फ एकराट् होते, म्हणजे राज्य, साम्राज्य, माहाराज्य इत्यादि दहा प्रकारच्या सत्ता भोगणाऱ्यांहून श्रेष्ठ होते, तेव्हां ते महाराज होते हें सिद्धच आहे. ह्या मगधदेशाधिपति महाराजांचे जे भक्त ते माहाराष्ट्रिक म्हणून स्वतःला म्हणत आणि दक्षिणारण्यांत वसाहती जेव्हां ह्यांनीं केल्या तेव्हां माहाराष्ट्रिक अशी ह्यांची प्रख्या सहजच झाली.

मगधांतील माहाराष्ट्रिक लोक बौद्धक्रांतीला कंटाळून ज्याप्रमाणें दक्षिणारण्यांत शिरले त्याचप्रमाणें राष्ट्रिक ह्या नांवाचेहि दुसरे लोक त्याकालीं दक्षिणेंत उतरले. हे राष्ट्रिक लोक म्हणजे अशोक आपल्या शिलालेखांत ज्यांना रास्टिक म्हणतो ते. राष्ट्रिक लोक मगधांतले नव्हत. ह्या लोकांचा देश ज्याला कुरुपांचाल म्हणत तो. तात्पर्य, राष्ट्रिक निराळे व माहाराष्ट्रिक निराळे. ऐतरेयब्राह्मणाच्या अडतिसाव्या अध्यायांत खालील वाक्य आलें आहे.

" एतामेव देवानां विहितिं अन्वथैनं अस्यां
ध्रुवायां मध्यमायां प्रतिष्ठायां दिशि
साध्याश्चाप्त्याश्च देवा षड्भिश्चैव पञ्चविंशै-
रहोभिः अभ्यषिञ्चन् एतेन च तृचेन एतेन च
यजुषा एताभिश्च व्याहृतिभी राज्याय, तस्माद् अस्यां
ध्रुवायां मध्यमायां प्रतिष्ठायां दिशि ये के च
कुरुपाञ्चालानां राजानः सवशोशीनराणां राज्याय एव
तेऽभिषिञ्चन्ते राजेत्येनान् अभिषिक्तान् आचक्षते "

भारतवर्षाच्या पूर्व, पश्चिम, दक्षिण व उत्तर ह्या दिशांच्यामध्यें असणाऱ्या कुरुपांचालांतील नरपतींना राजा हा किताब असतो असा वरील वाक्याचा मुख्य अभिप्राय आहे. अर्थात् ह्या कुरुपांचालांतील राजांच्या राज्याला राष्ट्र ही विशिष्ट संज्ञा असे व त्या राष्ट्राचे जे भक्त त्यांना राष्ट्रिक हें विशिष्ट अभिधान असे. अशोक माहाराष्ट्रिकांचें नांव काढीत नाहीं. राष्ट्रिकांचें काढतो. त्यावरून दिसतें कीं राष्ट्रिक हे त्याच्या अंमलाखालीं होते आणि माहाराष्ट्रिक नव्हते. तात्पर्य, राष्ट्रिक हे माहाराष्ट्रिकांहून निराळे लोक होते.

बौद्धक्रांतिकालांत आणीक तिसरे लोक दक्षिणारण्यांत वसाहती करण्यास आले. त्यांचें नांव वैराष्ट्रिक. हे लोक विराट् नामक राजांच्या देशांतले म्हणजे उत्तरकुरु व उत्तरमद्र या देशांतले रहिवाशी ऊर्फ जनपद होत. विराज हें ज्या राजांचें नांव त्याच्या राज्याला विराष्ट्र म्हणत व विराष्ट्रावर भक्ति करणारे जे लोक त्यांना वैराष्ट्रिक म्हणत.

असे हे तीन प्रकारचे व तीन देशांतले लोक महाराष्ट्रांत बौद्धक्रांतिकालीं वसाहती करण्यास उतरले. पैकीं, माहाराष्ट्रिकांनीं नर्मदेपासून भीमेपर्यंतचा सह्याद्रिकिनारा व देवगिरीपासून पैठणप्रांतापर्यंतचा देशभाग व्यापिला. महरट्टांचे उल्लेख नाशिक, जुन्नर कान्हेरी, इत्यादि प्रांतांतील शिलालेखांत सांपडतात. वैराष्ट्रिक लोकांनीं पुण्याच्या दक्षिणेस सध्यां ज्याला वायदेश म्हणतात त्याच्या आसपासचा विस्तीर्ण मुलूख आक्रमण केला. वाईप्रांताला विराटदेश म्हणण्याची चाल माहात्म्यांतून व दंतकथांतून असलेली आढळते. खुद्द वाई शहराला विराटनगरी आणि जवळील किल्ल्याला विराटगड ऊर्फ वैराटगड हीं नांवें अद्यापहि प्रचलित आहेत. पांडवांनीं अज्ञातवासाचीं चवदा वर्षें ज्या देशांत काढिलीं तो विराटदेश हाच होय, अशी लौकिक समजूत आहे. परंतु तींत विशेष तथ्य नाहीं, हें सांगावयाला नको. वैराटगड ऊर्फ वैराडगड हा शब्द वैराष्ट्रिक गड ह्या संस्कृत शब्दाचा अपभ्रंश आहे. असें दिसतें कीं, वैराष्ट्रिक लोकांनीं ह्या गडावर वसाहतकालीं ठाणें देऊन भोंवतालील प्रांतांवर अंमल केला आणि गडाला आपलें नांव दिलें. कदाचित् उत्तरकर्नाटकांतील बेरड हे लढवय्ये लोक वैराष्ट्रिकांचे (वैराष्ट्रिक = बेरट्ट = बेरड) वंशज असावे असा मला संशय येतो. राष्ट्रिक लोकांनीं सध्यां ज्याला दक्षिण महाराष्ट्र म्हणतात तो प्रांत व निजामच्या राज्यांतील बीडपासून म्हैसूरजवळील सौंदत्ती वगैरे प्रांतापर्यंतचा सर्व मुलूख आटोपिला. रट्टांच्या ऊर्फ राष्ट्रिकांच्या नांवावरून रट्टपाटी, रट्टगिरि, रट्टपळ्ळी, रट्टेहल्ली, रट्टज्जुन (राष्ट्रकार्जुनकं), रड्डी, रेडी, इत्यादि कितीतरी गांवांचीं, प्रांतांचीं, व्यक्तींचीं व जातींचीं नांवें महशूर आहेत. तात्पर्य, माहाराष्ट्रिक उत्तरेस, वैराष्ट्रिक मध्यभागीं आणि राष्ट्रिक दक्षिणभागीं दंडकारण्यांत वसाहत करते झाले. कालान्तरानें उत्तरेकडील माहाराष्ट्रिकांचें प्राबल्य व प्राधान्य सर्वांहून अधिकतम होऊन, ह्या सर्वांना माहाराष्ट्रिक ही एकच संज्ञा लागू झाली व तिघांचे तीन देश मिळून त्रिमहाराष्ट्रक असें त्रिकलिंग, त्रिगर्त त्रिकूट, त्रिपुर, ह्या नांवाच्या धर्तीचें नांव पडलें. ह्या त्रिमहाराष्ट्रक देशांत शकाच्या सहाव्या शतकांत नव्याण्णव हजार गांवें होतीं म्हणून ताम्रपटांत लिहिलेलें आढळतें तें अक्षरशः खरें आहे. खानदेश, नाशिक, अहमदनगर, पुणें, सातारा, सोलापूर, बेळगांव, धारवाड, विजापूर, कारवार, रत्नागिरि, कुलाबा, ठाणें, मिळून सुमारें चाळीस हजार गांवें आहेत. ह्यांत औरंगाबाद, बीड, बेदर, नांदेड, वगैरे निजामच्या राज्याचा मराठवाडा मिळविला व म्हैसूरचा उत्तरभाग मिळविला म्हणजे नव्याण्णव हजारांची संख्या सहज होईल. त्यांत एवढें मात्र लक्ष्यांत घेतलें पाहिजे कीं, सध्यां सुमारें चतुर्थांश गांवठाणें ओसाड आहेत. सध्यां पंचाहत्तर हजार ग्रामसंख्या भरली म्हणजे सहाव्या शतकांतील नव्याण्णव हजार संख्या झाली, असा अर्थ घेण्याला कांही एक हरकत नाही.

राष्ट्रिक, वैराष्ट्रिक व माहाराष्ट्रिक हे लोक मगध, कुरुपांचाल व उत्तरकुरु या नर्मदोत्तर देशांतून दक्षिणेंत आले, या बाबीला प्रत्यंतर पुरावा भाषेचा देतां येतो.

माहाराष्ट्रिकां संबंधानें एवढें लक्ष्यांत ठेविलें पाहिजे कीं ते यद्यपि मगधदेशीय महाराजाचे म्हणजे अधिपतींचे अनुयायी होते तत्रापि ते मूळचे मगधदेशांतील रहाणारे नव्हत. ते मूळचे हिमालयापलीकडे देवांच्या अनुषंगानें रहाणारे जे देवयोनि व गणदेव त्यांपैकीं होते. त्यांची मूळभाषा वैदिक भाषेच्या समकालीन अशी एक उपभाषा होती व त्यांना माहाराजिक अशी संज्ञा होती. मगधांत आल्यावर मगध-देशांतील प्राकृत जनांच्या भाषेंतील कांहीं लकबा त्यानीं उचलल्या. वैराष्ट्रिक हेहि मूळचे हिमालयापलीकडील लोक होते व ते पंजाबांतील मत्स्यदेशांत विराटराजांचे पुढें राष्ट्रिक बनले. राष्ट्रिक हे लोक कुरुपांचालांतील होते व तें आपली भाषा घेऊन दक्षिणेंत उतरले. वैराष्ट्रिकांची भाषा जीस अपभ्रंश म्हणून म्हणत ती होती व राष्ट्रिकांची भाषा जीस पुढें सौरसेनी म्हणून नांव पडलें ती होती. असे हे तीन लोक आपापल्या भाषा घेऊन दक्षिणेंत उतरले

इतर चार भाषांमुळें महाराष्ट्री भाषेचें रूपान्तर

वसाहतकारांत वजनांनें व कर्तबगारीनें माहाराष्ट्रिक लोक सर्वांहून वरचढ असल्यामुळें त्यांच्या भाषेपुढें इतरांच्या भाषा फिक्या पडल्या, तत्रापि त्यांच्या भाषांतील कांहीं लकबा माहाराष्ट्रिकांच्या भाषेला चिकटल्याशिवाय राहिल्या नाहींत. वैराष्ट्रिकांच्या, राष्ट्रिकांच्या व मगधांच्या भाषांच्या माहाराष्ट्रिकांच्या महाराष्ट्री भाषेवर परिणाम होऊन त्यापासून काय फल झालें तें उदाहरणार्थ कित्येक शब्द देऊन स्पष्ट करतों. संस्कृत 'रत्न' या शब्दाचें महाराष्ट्रींत रूप रअण होतें. परंतु महाराष्ट्रीपासून निघालेल्या मराठींत लेणें असें रूप प्रचलित आहे. येथें असा प्रश्न येतो कीं, रत्न शब्दांतला संस्कृत र चा र च ठेवणारी महाराष्ट्री मराठी होतांना रचा ल काय म्हणून करत्ये ? प्रश्नाला उत्तर असें:— मागधींत संस्कृत रच्या स्थानीं ल नियमानें होई. इतक्या नियमानें कीं र हा उच्चारच मुळीं मागधींत नव्हता. सबब, संस्कृत रत्न शब्दांतील रच्या स्थानीं मागधी ल उच्चार करी. महाराष्ट्री ची मराठी होतांना मगधांतील लोकांच्या संगतीनें रअण हा उच्चार लअण=लयण= लइण=लेणें असा मराठींत लकारयुक्त झाला. लयन (रहाण्याची जागा) पासून निघालेला लेणें हा मराठी शब्द रत्नपासून निघालेल्या लेणें या शब्दाहून निराळा, हें लक्ष्यांत ठेवावें. संस्कृत षचा महाराष्ट्रींत स किंवा ह होतो. विषय=विसअ. परंतु, मराठींत विषये ह्या सप्तम्यन्त शब्दाच्या ऐवजीं विशीं असा उच्चार येतो. महाराष्ट्री स च्या ऐवजीं मराठींत हा श कसा आला ? तर, मागधींत स व ष हे उच्चारच मुळीं नाहींत. माहाराष्ट्रींतून मराठींत येतांना विसअम्मि या रूपांतील स चा श मागधी भाषा बोलणाऱ्यांच्या संगतीनें झाला हें उघड आहे. सध्यां मराठींत हंसी=हंशी, माउस्सिआ=माउशी, असा–अश्यास, ठसा–ठश्यास, पास–पाशीं, फास–फाशीं,

इत्यादि ठिकाणीं जो शकार शिष्टांच्या बोलण्यांत येतो तो आणि सामान्य लोकांच्या बोलण्यांत ष च्या ऐवजीं जो श ऐकूं येतो तो हे दोन्ही ठिकाणचे श महाराष्ट्रीची मराठी होतांना मागधीची जी संगती लागली तिचीं चिन्हें आहेत. य मुळें श उच्चार होतो. वगैरे कारणें वरवरचीं केवळ साहचर्य दाखविणारीं विधानें होत; उच्चाराच्या बदलाचीं खरीं कारणें नव्हत. महाराष्ट्री मराठीचें रूप घेत असतां, मागधीचा तिच्यावर जो परिणाम झाला त्याचीं अशीं अाणीक शेकडों उदाहरणें देतां येतील. त्यांवरून माहाराष्ट्रिक लोक एके काळीं मगधदेशांत वसती करून होते या विधानाला पोषक असें एक भाषिक कारण उपलब्ध होतें.

राष्ट्रिकांची जी सौरसेनी भाषा तिचाहि महाराष्ट्रीवर परिणाम झालेला आहे, हें मराठीवरून ताडितां येतें. महाराष्ट्रींत सर्वस्माद् व्यंजनात् परः पूर्वस्थश्च रेफो लोप्यो भवति (चंड). परंतु सौरसेनींत तसा प्रकार होतोच असें नाहीं. उदाहरणार्थ, सौरसेनींत मूर्खचा अपभ्रंश विकल्पानें मुरुख्ख असा होतो, रचा लोप होत नाहीं. महाराष्ट्रीची मराठी बनतांना मुरुख्ख या रूपाचा अपभ्रंश मुलूख असा होऊन, मुलूख असा शब्द निष्पन्न झाला व तो " तो साऱ्या मुलखाचा शहाणा आहे " ह्या मराठींत आढळतो. येथें मुलखाचा म्हणजे मूर्खाणाम् असा अर्थ आहे. मुलूख म्हणजे प्रांत असा अर्थ नाहीं. मुलूख म्हणजे प्रांत हा अरबी शब्द आहे. तो साऱ्या मुलखाचा शहाणा आहे या वाक्याचें शब्दशः संस्कृत भाषांतर ' स सर्वेषां मूर्खाणां विचक्षणः अस्ति ' असें आहे. फारसी मुलूख शब्द या वाक्यांत अभिप्रेत असता तर मुलखांतला असा प्रयोग शक्य होतो, मुलखाचा असा चान्त प्रयोग शक्य नव्हता. येथें सौरसेनी लकब महाराष्ट्रीनें मराठी बनतांना उचलली हें उघड आहे. महाराष्ट्रींत व सौरसेनींत विशेष व उत्कट अंतर नसल्यामुळें दक्षिणारण्यांत त्या दोघींचा मिलाफ होण्यास फारश्या यातना पडल्या नाहींत

महाराष्ट्री मराठी होत असतांना अपभ्रंशाच्या ज्या कित्येक लकबा तिनें उचलल्या त्यांपैकीं एकीचा येथें उल्लेख करितों. ' अपभ्रंशे अधो रेफस्य लोपो न भवति ' म्हणून चंड सांगतो. महाराष्ट्रींत अधो-रेफाचा लोप होतो. व्याघ्रः हा शब्द अपभ्रंशांत, म्हणजे चंडकालीन अपभ्रंशांत, वाघ्रो असा होत असे. मराठींत माहाराष्ट्रींतून आलेलें वाघ असें रूप असून, शिवाय अपभ्रंशाच्या संगतीनें अधोरेफयुक्त वाघ्रूं असें रूप अशिष्ट व ग्राम्य जनांत आढळतें.

तात्पर्य, महाराष्ट्री भाषा ही जरी मराठीची मुख्य जननी आहे तरी तिनें अधूनमधून सौरसेनी, मागधी, अपभ्रंश व पैशाची या दायांचें दूध चाखिलें आहे. आणि ह्याचें विशेष आश्चर्य मानण्याचें कारण नाहीं. माहाराष्ट्रिक, राष्ट्रिक व वैराष्ट्रिक हे लोक मगध, कुरु, पांचाल, मत्स्य व उत्तरकुरु इत्यादि उत्तरेकडील देशांतून दक्षिणेंत आले असल्यामुळें त्या त्या देशांतील भाषांच्या लकबा माहाराष्ट्री मराठी

होत असतांना तिच्या आंगवळणीं पडाव्या हें साहजिक आहे. शिष्ट मराठी खेरीज महाराष्ट्रांत सध्यां ज्या प्रांतिक व जातिक उपभाषा आहेत त्या उत्तरेकडून वसाहत करण्यास आलेल्या त्या त्या उत्तरप्रांतीय जातींच्या भाषांपासून निघालेल्या आहेत, हें त्या त्या प्रांतिक व जातिक उपभाषांच्या विशिष्ट लकबांवरून ओळखतां येतें.

वसाहतकारांचे पुरोहित उत्तर हिंदुस्थानचे

माहाराष्ट्रिक, राष्ट्रिक व वैराष्ट्रिक लोक उत्तरेकडील देशांतून आले या बाबीला दुसरा प्रत्यंतर पुरावा माहाराष्ट्रिकादि लोकांच्या पुरोहितांच्या शाखा व गोत्रें ऊर्फ आडनांवें यांच्यामध्यें सांपडतो. माहाराष्ट्रिकादि लोक वैदिकधर्मी पडल्यामुळें, यज्ञयागार्थ त्यांनीं आपले पुरोहितहि आपल्या बरोबर वसाहतींत आणिले. सध्यां महाराष्ट्रांत नागपूर, वऱ्हाड, खानदेश, नाशिक, औरंगाबाद, बीड, सातारा, वगैरे प्रांतांत यजुर्वेदी ब्राह्मणांची संख्या बहुतम आहे, त्यांच्या खालोखाल ऋग्वेद्यांचा भरणा आहे आणि त्याच्या खालीं काण्व, मैत्रायणीय, इत्यादि शाखांची वसती आहे. सामवेदी व अथर्ववेदी ब्राह्मण महाराष्ट्रांत हाताच्या बोटांवर मोजण्याइतके असतील नसतील. माहाराष्ट्रिकादि लोक मगध, कुरु, पांचाल, मत्स्य, उत्तरकुरु व उत्तरमद्र या देशांतून आले, तेव्हां त्यांचे पुरोहितहि त्याच देशांतून आले असले पाहिजेत हें सांगणें नलगे. करतां नर्मदोत्तर प्रदेशांत सध्यां कोणत्या शाखांच्या ब्राह्मणांचा भरणा कोणत्या देशांत विशेष आहे तें पाहूं. त्या त्या प्रांतांत त्या त्या शाखा पुरातनकालापासून अभिजन आहेत असें धरून ही पहाणी करावयाची आहे. काश्मीर हा अर्वाचीन देश म्हणजे ऐतरेय ब्राह्मणकालीन उत्तरकुरु व उत्तरमद्र ह्या देशांचा दक्षिण भाग आहे. ह्या देशांतील ब्राह्मण कृष्णयजुर्वेदी, कठशाखी व लौगाक्षिसूत्री आहेत. ह्यांच्यांत जीं आडनांवें सध्यां प्रचलित आहेत त्यांपैकीं कांहीं तत्सदृश मराठी आडनांवांसह देतोः—

काश्मिरी	मराठी	काश्मिरी	मराठी
१ भैरव	बेहरे	९ छात्री	छत्रे
२ भूत	भुते	१० बास	व्यास
३ त्रकारी	टकारे	११ वारिकी	वारके
४ वैष्णव	वैष्णव	१२ डुली	डुले
५ भट	भट	१३ पांडे	पांडे
६ राक्ष्यस	राक्षे	१४ विचारी	विचारे
७ काली	काळे	१५ चंद्र	चंद्रे
८ बंगी	बंगी		

सध्यांचा पंजाब म्हणजे प्राचीन मत्स्यदेशाचा कांहीं भाग. त्यांतील सर्व सारस्वतब्राह्मण शुक्लयजुर्वेदी व माध्यंदिनशाखी आहेत. त्यांचीं कांहीं आडनांवें येणें प्रमाणें:--

१ नवले	२१ भारथे	४१ आचारिये
२ खडे	२२ ऋषि	४२ डोकरे
३ पंडित	२३ ब्रह्मी	४३ केसर
४ तिखे	२४ भिंडे	४४ लाट
५ बागे	२५ भूत	४५ प्रोहित
६ मालिये	२६ ओझे	४६ बलिये
७ काळिये	२७ पाध्ये	४७ सुखे
८ कपूरिये	२८ तोटे	४८ भुरे
९ पाठक	२९ मढरे	४९ सांगड
१० भारद्वाजी	३० भटारे	५० मुंडे
११ जोशी	३१ व्यास	५१ उपाध्ये
१२ दत्त	३२ मैत्र	५२ घोडे
१३ वैद्य	३३ लट्टू	५३ गुहलिये
१४ श्यामे	३४ अग्निहोत्री	५४ सिरखंडिये
१५ कटपळे	३५ कोटपाल	५५ किरले
१६ घोटके	३६ सुंदर	५६ गोसाई
१७ पराशर	३७ पांडे	५७ गोकुलिये
१८ कपाल	३८ गांडे	५८ कवडे
१९ नागे	३९ तगाले	५९ रोड
२० वसिष्ठ	४० दीक्षित	६० जड

वरील यादींतील पंजाबी सारस्वत ब्राह्मणांच्या नांवांशीं तत्सदृश माहाराष्ट्रीय ब्राह्मणांच्या नांवांची समान्तर याद वाचकांना सहज सुचण्यासारखी असल्यामुळें ती येथें देत नाहीं. सिंधप्रांतांतील ब्राह्मण शुक्लयजुर्वेदी व माध्यंदिनशाखी आहेत. कान्यकुब्जांतील मिश्र ब्राह्मणांपैकीं बहुतेक शुक्लयजुर्वेदी व काण्वशाखी आहेत. आणि थोडे ऋग्वेदी आहेत. त्यांच्यांत गर्ग, अवस्थि, बाला, गौतमी, तारा, करयव, इत्यादि आडनांवें आहेत. कान्यकुब्जांतील डुबे ब्राह्मण बहुतेक शुक्लयजुर्वेदी, काण्वशाखी व गोभिलसूत्री असून, कांहीं थोडे सामवेदी आहेत. त्याच देशांतील पाठक ब्राह्मण यजुर्वेदी आहेत. तसेंच तेथील चोबे व दीक्षित ब्राह्मण यजुर्वेदी माध्यंदिन आहेत. रजपुताऱ्यांतील पोखर सेवग ब्राह्मण, जयपुरांतील पारिख ब्राह्मण, मारवाडांतील दायिम ब्राह्मण, सर्व यजुर्वेदी माध्यंदिन आहेत. मैथिल

ब्राह्मणांपैकीं ओझे किंवा झा ब्राह्मण माध्यंदिन आहेत. व मिश्र ब्राह्मण यजुर्वेदी व सामवेदी असे दोन वेदांचे आहेत. नेपाळांतील ब्राह्मण यजुर्वेदी असून त्यांच्यांत भट्ट, आचार्य, पर्वत्य, अधिकारी, पंडित, इत्यादि आडनांवें आहेत. गुर्जर ब्राह्मण ऋग्यजुःसाम असे तीनवेदी आहेत. वंग ब्राह्मणांत सामवेदी फार. कलिंग ब्राह्मण शुक्लयजुर्वेदी काण्व असून, ओड्र देशांतील नंद ब्राह्मणहि शुक्लयजुर्वेदी आहेत. हे नंद ब्राह्मण शातवाहनांच्या वेळीं पैठणास आले. ह्या नंद ब्राह्मणांची नंदभाषाहि त्यांजबरोबर माहाराष्ट्रांत आली. हे नंद ब्राह्मण प्रतिष्ठानीं सराफी करून असत. ह्या यादीवरून स्पष्टच झालें कीं काश्मीरपासून मगधपर्यंतचा सर्व मुलूख शुक्लयजुर्वेदी माध्यंदिन ब्राह्मणानीं भरलेला असून, त्यांत ऋग्वेदी व सामवेदी ब्राह्मणांची तुरळक वसती आहे व काण्वांचीहि थोडीबहुत संख्या आहे. हे माध्यंदिन, काण्व व ऋग्वेदी ब्राह्मण माहाराष्ट्रिक, राष्ट्रिक व वैराष्ट्रिक क्षत्रियांबरोबर दक्षिणेंत आले.

पैकीं विदर्भांत यजुर्वेदी माध्यंदिन ब्राह्मण बाहुल्यानें आहेत. ह्यांचा उल्लेख त्रिविक्रमभट्टानें शतपथिनः म्हणून नलदमयंती चंपूत केला आहे. नागपूरप्रांतीं झाडे ब्राह्मण माध्यंदिनशाखी व काण्वशाखी असे दोन्ही शाखांचे आहेत. खानदेश, नाशिक, पंढरपूर, इकडेहि माध्यंदिन ब्राह्मण सडकून आहेत. तात्पर्य, माहाराष्ट्रांत शुक्लयजुर्वेदी माध्यंदिन ब्राह्मणांची संख्या सर्वांहून जास्त आहे. ऋग्वेदी, काण्व व आपस्तंब यांच्या अल्पसंख्येची तुलना माध्यंदिनांच्या प्रचंड संख्येशीं केली म्हणजे माहाराष्ट्र हा देश भूरित्वानें माध्यंदिनांचा आहे, असें म्हणणें भाग पडतें. माध्यंदिनांत काण्वांची भर टाकिली म्हणजे ही शुक्लयजुर्वेद्यांची संख्या त्याहूनहि मोठी होत्ये. शुक्लयजुर्वेद्यांच्या वाजसनेयी संहितेचा मूळ उत्पादक याज्ञवल्क्य असल्यामुळें, तत्प्रणीत धर्मादिसूत्रें त्यांनीं महाराष्ट्रांत वसाहतकाळीं आणिलीं. दक्षिणेंत याज्ञवल्क्यस्मृति प्रमाण धरतात त्याचें मुख्य कारण, महाराष्ट्रांतील शुक्लयजुर्वेदी ब्राह्मणांची बहुतम संख्या.व ह्या ब्राह्मणांचे अनुयायी जे माहाराष्ट्रिकादि क्षत्रिय त्यांची संख्या वाजसनेय शाखेची अनुयायी आहे, हें आहे. येणेंप्रमाणें भाषेच्या प्रमाणावरून व वेदशाखांच्या प्रमाणांवरून निश्चित झालें कीं माहाराष्ट्रिकादि लोक व त्यांचे वाजसनेयादि पुरोहित काश्मीरपासून मगधपर्यंतच्या उत्तरहिंदुस्थानांतील देशांतून बौद्धक्रांतिकालांत दक्षिणेंत उतरले.

बौद्धक्रांतिकालीं महाराष्ट्रांत उतरलेले दुसरे अनेक जन

उत्तरहिंदुस्थानांतून बौद्धक्रान्तिकालीं माहाराष्ट्रिकादि लोकांबरोबर आणीकहि कांहीं लोक दक्षिणेंत उतरले. त्यांचीं नांवें अशोकानें आपल्या शिलालेखांत दिलीं आहेत. ते लोक म्हणजे भोज, पेतेनिक, सतियपुत, केरलपुत, पांड्य व चोल हे होत. पैकीं भोज म्हणजे ऐतरेयब्राह्मणाच्या अडतिसाव्या अध्यायांत " दक्षिणस्यां दिशि

ये के च सत्वतां राजानो भौज्यायैव ते अभिषिच्यंते भोजेति एनान् अभिषिक्तान् आचक्षते " म्हणून ज्यांचें वर्णन केलें आहे ते लोक होत. कुरुपांचालाच्या दक्षिणेस जो मथुरा प्रांत आहे तो ह्या सत्वत् लोकांच्या भोज नांवाच्या राजांचा देश होय. हे भोज लोक दक्षिणापथांतील विदर्भदेशांत वसाहत करून राहिले. म्हणजे विदर्भांतील भोज लोक मथुरावृंदावनाकडील उत्तरहिंदुस्थानांतील लोक होत हें स्पष्ट झालें. ह्या संस्कृत भोज शब्दाला स्वार्थक ल प्रत्यय लागून मराठी भोजले-भोसले हा सुप्रसिद्ध शब्द झाला.

पेतेनिक म्हणजे प्रतिष्ठानक लोक मूळचे प्रयागाच्या समोरील जुनाट प्रतिष्ठान शहरचे व प्रांतांतले रहाणारे लोक. प्रयागाजवळच्या प्रतिष्ठान प्रांतांतील ह्या लोकांनीं दक्षिणेंत गोदावरी-तीरीं येऊन प्रतिष्ठान ऊर्फ पैठाण हा प्रांत व शहर स्थापून ह्या शहरांत व प्रांतांत वसति केली. म्हणजे हे प्रतिष्ठानकहि लोक उत्तरहिंदुस्थानातील होत. सतियपुत म्हणजे सत्वत्पुत्र. मथुरावृंदावनप्रांतांतील भोज हे ज्या सत्वत् लोकांचे राजे त्या सत्वत् लोकांपासून सत्वत्पुत्रांची ऊर्फ सतियपुतांची उत्पत्ति झाली. ह्या सतियपुतांची वसति सांवतवाडी म्हणजे सत्वद्वाटिका प्रांतांत होती. एवंच, हे सतियपुतहि उत्तरेकडीलच लोक होत.

सतियपुतांप्रमाणेंच केरलपुतहि उत्तरेकडूनच मलबारांत कोकणांतून उतरले. कुरुदेशाच्या उत्तरेस अतिनिकट कुलिंद देश होता त्याच्या शेजारीं केरल देश प्राचीनकाळीं होता. केरलदेशच्या सुधार्मिक राजाचा पुत्र जो चंद्रहास त्याची कथा आबालवृद्धांस महशूर आहे. ह्या उत्तरहिंदुस्थानांतील केरलदेशांतून निघून केरलपुत ह्या लोकांनीं दक्षिणेंत मलबारकिनाऱ्यावर वसाहत केली व त्या वसाहतीला केरल हें नांव दिलें. केरलांप्रमाणेंच चोल हे उत्तरेकडील लोक होते. पैशाची भाषेच्या एका पोटभेदाला चूलिकापैशाची असें नांव आहे. ह्या सामासिक शब्दांतील चूलिका हा शब्द निःसंशय देशवाचक आहे. ह्या. उत्तरेकडील चूलिका देशातील चौल ऊर्फ प्राकृत चोल, चोळ लोकांनीं दक्षिणेंत वसति करून आपल्या वसाहतीला चोल हें अभिधान दिलें. पांड्य हे उत्तरहिंदुस्थानांतील कुरुदेशाशेजारील पांडुराष्ट्रांतील पांडुलोकांचे वंशज होत. कात्यायन पांडोर्ड्यण् ह्या वार्तिकांत ह्या पांडुदेशाचा उद्धार करतो. पांडुराष्ट्रांतील पांडुलोकांचे वंशज जे पांड्य त्यांनीं दक्षिणेंत येऊन वसाहत केली व त्या वसाहतीला पांड्य हें नांव दिलें. पांड्य, चोल, केरल, सत्वत्पुत्र, भोज, पेतेनिक वगैरे लोकांच्या हकीकतीशीं सध्यां आपणांस कांहीं कर्तव्य नाहीं. फक्त राष्ट्रिक हें पद ज्यांच्या नांवांत येतें त्या राष्ट्रिक, वैराष्ट्रिक व विशेषतः माहाराष्ट्रिक लोकासंबंधानें आपणास येथें विचार कर्तव्य आहे.

ह्या माहाराष्ट्रिक लोकांना माहाराष्ट्रकहि म्हणत व असें दिसतें कीं माहाराष्ट्रहि म्हणत. राष्ट्रिक, वैराष्ट्रिक ह्या लोकांत वजनानें व कर्तबगारीनें माहाराष्ट्र लोक प्रमुख

असल्यामुळें, "स एषां ग्रामणीः" ह्या सूत्रांत सांगितलेल्या रिवाजाप्रमाणें ह्या साऱ्यांना माहाराष्ट्रक अशी संज्ञा कालान्तरानें प्रचलित झाली. माहाराष्ट्रिकांना माहाराष्ट्रिन् असेंहि नांव असे. माहाराष्ट्रिन् या शब्दाचें स्त्रीलिंगी रूप माहाराष्ट्रिणी. माहाराष्ट्रिणी ह्या संस्कृत शब्दाचें प्राकृत रूप महारठिणी हें भाजें, बेडसें व कार्ले येथील कांहीं शिलालेखांत येतें. तात्पर्य, माहाराष्ट्र, माहाराष्ट्रक, माहाराष्ट्रिक व महाराष्ट्रिन् अश्या चार तऱ्हांनीं ह्या लोकांच्या नांवाचा उच्चार होत असे. ह्यांच्या माहाराष्ट्रिन् या नांवावरून ह्यांच्या स्त्रियांना जसें महाराष्ट्रिणी, महारठिणी हें नांव पडलें, तसेंच ह्यांच्या माहाराष्ट्र या नांवावरून ह्यांच्या भाषेला माहाराष्ट्री असें प्रथम नांव पडलें. माहाराष्ट्री ह्या संस्कृत शब्दाचा अपभ्रंश महरट्टी असा होऊन त्याचें पुनः संस्कृतीकरण महाराष्ट्री असें झालें. महाराष्ट्री असा उच्चार सर्व प्राकृत वैय्याकरण निरपवाद देतात.

माहाराष्ट्रिकांची प्राचीन संस्कृति

महाराष्ट्री भाषा बोलणारे हे माहाराष्ट्रिक लोक बौद्धक्रांतिकालीं जेव्हां दक्षिणेंत उतरले तेव्हां ह्यांची संस्कृति कोणत्या दर्जाची होती तें आतां पाहूं. ह्यांच्या संस्कृतीचें परीक्षण राजकीय दृष्ट्या, समाजदृष्टया व भाषादृष्टया अश्या तीन दृष्टयांनीं करतां येण्यास साधनें आहेत. महरट्ट ऊर्फ माहाराष्ट्रिक लोक चातुर्वर्ण्यबद्ध असून, पुरोहितांखेरीज त्यांचें एक पाऊलहि पुढें पडत नसे. झल्ल, मल्ल, निच्छिवि, नट, इत्यादींच्या सारखे ते सावित्रीपतित व्रात्यहि झालेले नव्हते व ओड्र, द्रविड, कांबोज, इत्यादींच्या प्रमाणें ब्राह्मणादर्शनानें ते शूद्रहि बनले नव्हते. उत्तरहिंदुस्थानांतील व्रात्य व शूद्रप्राय अश्या पाखंडमतानुयायी क्षत्रियांच्या जुलमाला कंटाळून ते दक्षिणेंत आले होते. मातृसावर्ण्याचा कायदा पसार होण्याच्यापूर्वी त्यांच्यांत शूद्रभार्योत्पन्न निकृष्ट क्षत्रियांची भरती इतर वर्णांच्या प्रमाणेंच होऊन गेलेली होती; ती तो कायदा पसार झाल्यावर कायदेशीर रीतीनें बंद झाली. परंतु बेकायदेशीर रीतीनें चालूं असली तत्रापि त्या बेकायदेशीर संबंधापासून होणाऱ्या प्रजेच्या पृथक् जाती बनूं लागल्यामुळें शुद्ध क्षत्रियत्वाला त्यापासून बट्टा लागण्याचा संभव नव्हता. माहाराष्ट्रिक आपली उपजीविका मगधांत आयुधांवरती करीत म्हणजे ते आयुधोपजीवी ऊर्फ शस्त्रोपजीवी संघ होते. मगधांतील महाराजांचे ते गण होते म्हणजे भाडोत्री सैनिक होते.

ह्या शस्त्रोपजीवी संघांत मूळ अशी चाल होती कीं, गणांतील सर्व स्त्रिया गणांतील सर्व पुरुषांना सामान्य असत व ह्या गणांतील स्त्रियांना गणिका म्हणत. गणिका म्हणजे विश्वयोषिता, हा अर्वाचीन अर्थ एथें घ्यावयाचा नाहीं. गणिका म्हणजे गणांतील सर्वांना सामान्य असणाऱ्या सर्व स्त्रिया एवढाच अर्थ येथें विवक्षित आहे. ह्या गणांतील गणांनीं गणांतील स्त्रियांशीं केलेल्या प्रणयविधीचीं वर्णनें गाथा-

सप्तशतींत आलेलीं आहेत. त्यांवरून स्पष्ट दिसतें कीं ह्या गणसंघांत स्त्रियांचें दांपत्य-नियमन विशेष दृढ नसून, बरेंच सैल होतें. ह्या स्त्रीपुरुषसंबंधाच्या बाबींत मगधांतील जे महाराजशब्दधारी क्षत्रिय त्यांच्याहून हे माहाराष्ट्रिक गण बरेच प्राचीन म्हणजे मागासलेले होते. तत्रापि मगधांतील शिष्ट क्षत्रियांच्या व ब्राह्मणांच्या सान्निध्यानें त्यांच्यांतील स्त्रीपुरुषसंबंधांतील हें शैथिल्य आस्तेआस्ते क्षय पावून वैयक्तिक पतिपत्नीत्वाची चाल त्यांच्यांत रुजत होती.

माहाराष्ट्रिक लोक मुळचे इंद्र, अग्नि, इत्यादींचे भक्त असून, बौद्धकालीं जेव्हां शिव, विष्णु, इत्यादि देवतांची स्थापना ब्राह्मणांनीं केली तेव्हां ह्या नवीन देवांचेहि ते भक्त बनले. माहाराष्ट्रिकांची सामाजिक, धार्मिक, व कौटुंबिक स्थिति ही अशी प्राथमावस्थिक होती.

त्यांचीं गणराज्यें

त्यांची राजकीय घटनाहि ह्या प्राथमिक अवस्थेहून फारशी दूर नव्हती. मगधांत व मगधाच्या जवळील चेदि वगैरे प्रांतांत असतांना, झल्ल, मल्ल, निच्छवि, शाक्य, नट, इत्यादि व्रात्यांच्यांतल्या प्रमाणेंच ह्यांच्यांतहि गण म्हणून जी राजकीय संस्था ती प्रचलित होती. ह्या गणनामक राजकीय संस्थेंत गणांतील सर्वच पुरुषव्यक्ति राजे असत व सर्व व्यक्ति आपणास राजा ह्या पदानें भूषवीत. सध्यां शहाण्णव कुळांतील सर्व मराठे आपणास व्यक्तिशः राजे म्हणवितात त्याचें कारण त्यांच्या प्राचीन पूर्वजांतील ही गणराज्याची संस्था होय. गणराज्य तीन प्रकारचें असे. एका प्रकारांत गणांतील सर्व व्यक्ति अधिकार चालवीत. ह्या प्रकाराला बहुनायकी गणराज्य म्हटलें असतां चालेल. दुसऱ्या प्रकारांत कांहीं प्रमुख व्यक्तींच्या हातीं राज्याधिकार सोंपविलेला असे. ह्याला महाजनकी गणराज्य हें नांव शोभण्यासारखें आहे. आणि तिसऱ्या प्रकारांत एका सर्वश्रेष्ठ व्यक्तीला सर्वाधिकारी करीत. ह्याला एकराज्य म्हणणें रास्त आहे. हे तिन्ही प्रकार माहाराष्ट्रिक लोकांत प्रचलित होते. आणि हे तिन्ही प्रकार घेऊन माहाराष्ट्रिक दक्षिणेंत उतरले.

आंध्रभृत्यकालीं ही गणसंस्था माहाराष्ट्रिकांत होती. नाणेघांटांतील आंध्रभृत्यांच्या भित्तिचित्रांतील एका चित्राखालील महारठिगनकयिरो हीं अक्षरें सुप्रसिद्ध आहेत. माहाराष्ट्रिकगणकवीरः या सामासिक पदांत एकनायकी गणराज्यापेक्षां बहुनायकी गणराज्याचा ध्वनि ऐकूं येतो. समुद्रगुप्ताच्या अलाहाबाद येथील स्तंभावर व्याघ्रराज, नीलराज, कुबेर, मंटराज, इत्यादि राजांचीं नांवें आलीं आहेत, तीं जर माहाराष्ट्रिकांचीं असतील तर त्यावरून दिसतें कीं शालिवाहनाच्या तिसऱ्या चवथ्या शतकांत दक्षिणेंत एकनायकी गणराज्यें बनून गेलीं होतीं व बहुनायकी गणराज्यें अस्तास गेलीं होतीं. तात्पर्य, शकोत्तर चारशेंपर्यंत माहाराष्ट्रिकांत गणराज्यसंस्था, एकनायकी किंवा बहुनायकी,

प्रचलित होती. ही गणराज्यसंस्था माहाराष्ट्रिकांनीं नवीन शोधून काढून प्रचलित केली असा समज करून घेण्याचें कारण नाहीं. ही संस्था माहाराष्ट्रिक जेव्हां माहाराजिक होते तेव्हांपासून त्यांच्यांत प्रचलित होती.

देवयोनि व गणदेवता यांच्यांत गणराज्यसंस्था फार प्राचीन काळापासून विद्यमान होती. तसेंच प्राचीन ऋषींमध्येंहि ही संस्था अस्तित्वांत होती. ही गणराज्यसंस्था इतकी प्राचीन आहे कीं ऋग्वेदकालीन ऋषींनीं हिचें हृदयंगम वर्णन केलें आहे.

ब्रह्मणस्पति गणप्रमुख

ऋग्वेदाच्या दुसऱ्या मंडळांत ब्रह्मणस्पतीचीं सूक्तें ऊर्फ सुवर्णनें दिलीं आहेत त्यांत गणसंस्थेचा राजा जो गणराज ऊर्फ ब्रह्मणस्पति त्याच्या सामर्थ्याचें कीर्तन केलेलें आहे. गणानां त्वा गणपतिं हा मंत्र विख्यात आहे. संस्कारादि कार्यांत प्रथमतः गणपतीचें आवाहन या मंत्रानें याज्ञिक करतात. परंतु, ह्या मंत्रांत कोणाचें व कशाचें वर्णन आहे एतद्विषयीं त्यांच्या कल्पना विचित्र आहेत. त्यांच्याच तेवढ्या कल्पना विचित्र आहेत असें नव्हे, तर सायणाच्याहि कल्पना अश्याच विचित्र आहेत. हे लोक ब्रह्मणस्पतीला देव समजतात. वस्तुतः ब्रह्मणस्पति म्हणजे ब्रह्मन् यांचा मुख्य पुढारी असा अर्थ ऋग्वेदकालीं म्हणजे हें ब्राह्मणस्पत्य सूक्त मूळ रचिलें गेलें त्या काळीं होता.

अंत्योदात्त ब्रह्मन् (पुं.) शब्दाचा अर्थ स्तुति करणारा, स्तावक असा आहे व आद्योदात्त ब्रह्मन् (नपुं.) शब्दाचा अर्थ स्तुति, स्तवन असा आहे. आद्योदात्त ब्रह्मन् शब्द घेतला, तर ब्रह्मणस्पति या शब्दाचा अर्थ स्तुतीचा पति असा होतो. ह्या अर्थापासून कांहीं बोध होत नसल्यामुळें, सायणानें ब्रह्मन् (नपुं.) ह्या शब्दाचा अन्न असा अर्थ निघंटूंतून घेतला व ब्रह्मणस्पति म्हणजे अन्नाचा पालन करणारा असा अर्थ केला. असा कांहीं तरी अर्थ केल्यावांचून त्याला गत्यन्तर नव्हतें असें मात्र म्हणतां येत नाहीं. ब्रह्मणस्पते ह्या संबोधनांत सर्व पदें अनुदात्त आहेत. तेव्हां ब्रह्मणस्पते या संबोधनांत ब्रह्मणः हें पद अंत्योदात्त किंवा आद्योदात्त असें वाटेल तसें घेतां आलें असतें. परंतु येथें परंपरागत संहितापाठ व स्वरप्रक्रिया त्याच्या आड आली. ब्रह्मणस्पति ह्या सामासिक शब्दांतील दोन्हीं पदें आद्योदात्त आहेत असें स्वरप्रक्रिया सांगते. तेव्हां आद्योदात्त ब्रह्मन् शब्द स्वीकारून त्याचा अर्थ स्तुति किंवा अन्न करण्याखेरीज दुसरी तोड सायणाला सुचण्यासारखी नव्हती. संहिता ज्यांनीं संपादिली ते लोक व संहिता प्रमाण धरून ज्यांनीं स्वरप्रक्रिया रचिली ते वैयाकरण मूळ ऋग्वेदरचनाकाळापासून अत्यन्त दूर पडल्याकारणानें ह्या ऋचेंतील ब्रह्मणां ह्या पदाचे व ब्रह्मणस्पति ह्या सामासिक शब्दाचे स्वर देण्यास चुकले असतील, असा संशय सायणाला येणें शक्य नव्हतें. परंतु, संस्थाचे इतिहास जाणणारे आधुनिक जे आपण

त्यांना असें स्पष्ट दिसत आहे कीं, ह्या ऋचेंतील ब्रह्मणां हें पद अंत्योदात्त आहे व ब्रह्मन् हा शब्द ब्रह्मणां व ब्रह्मणस्पते या दोन्ही स्थलीं पुल्लिंगी आहे. एणेंप्रमाणें ब्रह्मन् हा शब्द पुल्लिंगी घेतला म्हणजे ह्या ऋचेचा अन्वय व अर्थ असा लागतोः-

ऋचा

गणानां त्वा गणपतिं हवामहे कविं कवीनां उपमश्रवस्तमम् ॥
ज्येष्ठराजं ब्रह्मणां ब्रह्मणस्पते आ नः शृण्वन्न् ऊतिभिः सीद सादनम् ॥१॥

अन्वय

ब्रह्मणस्पते ! गणानां गणपतिं, कवीनां कविं, उपमश्रवस्तमं, ब्रह्मणां ज्येष्ठराजं त्वा हवामहे । नः शृण्वन् ऊतिभिः सादनं आसीद ।

अर्थ

हे स्तावकांच्या पुढाऱ्या ! गणांचा नायक, शहाण्यांचा शहाणा, ज्याचें यश इतरांच्या यशाला अत्यन्त उपमानभूत होतें, स्तावकलोकांचा सर्वश्रेष्ठ राजा, असा जो तूं त्या तुला आम्हीं बोलावितों. आमचें ऐकून, देणग्यासह आसंदीवर विराजमान हो.

ब्रह्मन् लोकांत म्हणजे स्तावक असे जे ऋषि म्हणजे ब्राह्मण त्या लोकांत हे सूक्त रचण्याच्या काळीं गणसंस्था व गणराज्य म्हणून ज्यास म्हणतात ती संस्था विद्यमान होती. ह्या ऋषींच्या म्हणजे ब्राह्मणांच्या गणाच्या पुढाऱ्याला गणपति व ब्रह्मणस्पति अशा संज्ञा रूढ होऊन गेल्या होत्या. गणपति व ब्रह्मणस्पति हे शब्द संज्ञा बनल्याकारणानें, सभेचा सभापति व देशाचा भूपति किंवा गांवचा गावुंडा हे शब्द पुनरुक्तीला न जुमानतां ज्याप्रमाणें सध्यां आपण योजितों त्याप्रमाणें गणानां गणपतिं व ब्रह्मणां ब्रह्मणस्पतिं हे शब्द पुनरुक्तीला न जुमानतां योजिले जात. ह्या ब्रह्मगणांत सर्व व्यक्ति राजशब्दोपजीवी असत. पैकीं सर्वांत वयानें, अनुभवानें, शहाणपणानें व यशस्वी कृत्यांनीं जो ज्येष्ठ त्याला ज्येष्ठराज म्हणत, व त्याच्या हुकमतीखालीं सारे वागत. प्रायः ज्येष्ठराज सर्व ब्रह्मगणाचा साक्षात् पिता असे (जनिता ब्रह्मणां असि).

ब्रह्मणस्पतीला दुसरी संज्ञा बृहस्पति म्हणून असे. बृह् धातूला मन् प्रत्यय लागून जसा ब्रह्मन् शब्द होतो तसाच त्या धातूला अस् प्रत्यय लागून बृहस् शब्द त्याच अर्थानें होई. बृहस् म्हणजे स्तावक, स्तुति करणारा. बृहस्पति ऊर्फ ब्रह्मणस्पति ऊर्फ गणपति ऊर्फ ज्येष्ठराज भीम (भयंकर), अमित्रदंभन, रक्षोहण असून तो ज्यांना आपल्या संरक्षणाखालीं घेई (यं रक्षसि ब्रह्मणस्पते) त्याला संकट शिवत नसे (न तं अंहो न दुरितं अरातयः तितिरुः). तो शत्रूंना जाळणारा (निष्टप्ता शत्रुं), स्वजनांना मार्गांत रक्षण करणारा (पथिकृत्) असे. ज्याला ज्याला म्हणून गणपतीचें साहाय्य मिळे (यं यं युजं कृणुते ब्रह्मणस्पतिः) तो तो शत्रूंचा विध्वंस करतो (वनुष्यतः

वनवत्). जो ब्रह्मणस्पतीला तुपाचीं पक्कानें नेऊन देतो (यो अस्मै हव्यैः घृतवद्भिः अविधत्) त्याला तो पूर्वेकडील देशांत विजयानें वसाहत करण्यास नेतो (तं प्राचा प्र नयति). तात्पर्य, गणांच्या पुढाऱ्याचा महिमा या सूत्रांत कवीनें वर्णिलेला आहे.

गणसंस्था व गणराज्य ज्या ब्रह्मगणांत रूढ झालें होतें त्यांच्यांत अशी चाल होती कीं गणांतील सर्व स्त्रिया गणपतीकडून प्रजोत्पादन करून घेण्यांत भूषण मानीत. एतत्संबंधानें यजुर्वेदाच्या वाजसनेयसंहितेचा तेविसावा अध्याय पहावा. त्यांत गणांच्या गणपतीला स्त्रिया एणेंप्रमाणें आव्हान करतात :-

यजुः

गणानां त्वा गणपतिं हवामहे
प्रियाणां त्वा प्रियपतिं हवामहे
निधीनां त्वा निधिपतिं हवामहे
वसो मम
आहं अजानि गर्भधम्
आ त्वं अजासि गर्भधम्

अर्थ

हे आमच्या गणांच्या पुढाऱ्या ! तुला आम्ही बोलावितों,
हे आमच्या प्रियांच्या प्रिय पुढाऱ्या ! तुला आम्हीं बोलावितों,
हे आमच्या ठेव्यांच्या मुख्य ठेव्या ! तुला आम्हीं बोलावितों,
हे माझ्या वसू !
मी आपलें घब्राड हलवितें किंवा ओढतें,
तूं आपलें घब्राड हलव किंवा ओढ.

गर्भध = घब्राड म्हणजे गर्भ धारण करण्याचा अवयव. गणपतिअथर्वशीर्षांत गणांच्या पुढाऱ्याचें रूप वर्णिलेलें आहे. गणांचा हा लढाऊ पुढारी हातांत पाश, अंकुश व हत्तीचा एक दात ही शस्त्रें घेऊन व तांबडीं वस्त्रें लेऊन, शत्रूंचा धुव्वा उडवून देई. असा हा ब्रह्मन् लोकांचा ऊर्फ ऋषींचा पुढारी जो ब्रह्मणस्पति ऊर्फ गणपति तो असे. त्याची आराधना प्रथम केल्यावांचून गणांतील गणांचें कोणतेंहि कृत्य निर्विघ्नपणें तडीस जाण्याचा संभव नसे. सबब कोणतेंहि लहानमोठें कृत्य करावयाच्या प्रारंभीं गणाच्या पुढाऱ्याचें साहाय्य प्रथम मिळवावें लागे. गणपतीचें आवाहन करण्याच्या ह्या प्राचीन चालीचें आपण सध्यां नुसतें नाटकी अनुकरण करतों, परंतु प्राचीन काळीं जेव्हां गणराज्यसंस्था ब्रह्मन् लोकांत प्रचलित होती तेव्हां गणाच्या प्रत्यक्ष पुढाऱ्याची कोणत्याहि कृत्याला संमति घ्यावी लागे, अशी ही प्राचीन गणराज्यसंस्था माहाराष्ट्रिक ऊर्फ महरट्ट लोकांत प्रचलित होती.

राज्य करण्याची ही अगदीं प्राथमिक पद्धति माहाराष्ट्रिक लोकांत असल्यामुळें ते जेव्हां दंडकारण्यांत वसाहती करण्यास आले, तेव्हां त्यांनीं नागपूरपासून तुंगभद्रेपर्यंतच्या प्रांतांत अक्षरशः हजारों चिमकुलीं चिमकुलीं अशीं गणराज्यें स्थापिलीं. बहुतेक प्रत्येक तर्फेला म्हणजे दहावीस मैल लांबीच्या प्रदेशाला एकेक गणराज्य असून, तेथील मुख्य राजधानीच्या गांवाला राजपुरी, राजुरी, रायरी, राजगड, रायगड अशीं नांवें असत. महाराष्ट्रांत राजपुऱ्या, राजुऱ्या, रायऱ्या, इत्यादि राज हें आद्याक्षर असणारीं जीं अनेक गांवें सांपडतात त्याचें कारण महरट्टांचीं ही प्राथमावस्थिक गणराज्यसंस्था होय.

माहाराष्ट्रिकांची राजकीय स्थिति ज्याप्रमाणें अगदीं प्राथमावस्थिक होती त्याचप्रमाणें त्यांची भाषा जी महाराष्ट्री तीहि तितकीच प्राथमावस्थिक होती. संस्कृतांत जसें व्याकरण, धर्म, न्याय, मीमांसा, इतिहास, इत्यादि शाखांत विपुल व भव्य वाङ्मय त्याकालीं होतें, तसें भव्य व विपुल वाङ्मय महाराष्ट्री भाषेंत असण्याचा संभवसुद्धां नव्हता. माहाराष्ट्रिक लोक दक्षिणेंत बौद्धक्रांतिकालीं जेव्हां उतरले तेव्हां त्यांचें वाङ्मय लौकिक स्त्रीपुरुषप्रणयविषयक लावण्यांच्या स्वरूपाचें असून, तें अद्याप अक्षरनिविष्टहि झालें नव्हतें, फक्त माहाराष्ट्रिक जनतेच्या तोंडीं होतें.

उत्तर हिंदुस्थानच्या उच्चतर आर्यांचें आधिपत्य

उत्तरहिंदुस्थानांतील तत्कालीन उच्च क्षत्रियांहून व उच्च अशोकादि राज्यकर्त्या वृषलांहून सुधारणेच्या बऱ्याच खालच्या पाह्यरीवर असलेल्या ह्या माहाराष्ट्रिक गणांची बौद्धक्रांतिकालीं अशी ही सामाजिक, राजकीय व भाषिक हालहवाल होती. दक्षिणेंत वसाहती करून राहिल्यावर ह्यांच्या सामाजिक, राजकीय व भाषिक स्थितींत काय फेरबदल झाले त्याचें आतां वर्णन करावयाचें. पैकीं राजकीय स्थिति प्रथम घेऊं. आपापल्या गणापुर्तीं लहानशीं गणराज्यें चालविण्याइतकीच ऐपत असल्यामुळें, ह्यांच्याहून वरिष्ठदर्जाच्या राज्यपद्धति ज्यांच्या आंगवळणी पडल्या होत्या अशा उत्तरेकडील व पूर्वेकडील जास्त सुधारलेल्या लोकांच्या अंमलाखालीं ह्या लोकांना शकपूर्व १०० पासून शकोत्तर १५५१ पर्यंत म्हणजे सोळाशें वर्षें रखडावें लागलें.

शातवाहन, चालुक्य, राष्ट्रकूट, यादव इत्यादि उत्तरेकडील साहसी राज्यकर्त्यांनीं दक्षिणेंत जीं साम्राज्यें उभारिलीं तीं परकीय व अल्पसंख्याक परंतु संस्कृतीनें वरचढ अशा लोकांनीं कमतरसंस्कृतीच्या माहाराष्ट्रिकांवर उभारलेलीं अधिराज्यें होतीं हें लक्ष्यांत ठेविलें पाहिजे. ह्या परकीय अल्पसंख्याक राजकर्त्यांचे गुण उचलण्याची ऐपत किंवा बुद्धि माहाराष्ट्रिकांच्या ठाईं अत्यल्प होती, किंबहुना मुळींच नव्हती म्हटली असतां चालेल. शातवाहनांचे विहार, चालुक्यांचीं व यादवांचीं सुंदर देवालयें व राष्ट्रकूटांचीं लेणीं ह्या परकीय राज्यकर्त्यांच्या राशियतींतील स्थापत्यकलाविषयक

प्राचीण्याची साक्ष देतात. फर्दापूर व दौलताबाद येथील मूर्तिकर्म व चित्रकर्म ह्या राज्यकर्त्यांच्या वेळच्या अद्‌भुत कारागिरीचीं मूर्तिमत स्मारकें आहेत.

पण, ह्या परकीय स्थापत्यकलेचा, मूर्तिकर्माचा किंवा चित्रकलेचा गंधहि माहाराष्ट्रिकांना कधीं शिवलेला दिसत नाहीं. हे परकीय राज्यकर्ते अस्तंगत झाल्याबरोबर त्यांच्या कलाहि त्यांच्याबरोबर अस्तास गेल्या. ह्या कला जर महाराष्ट्रांतील महरट्ट लोकांच्या असत्या, तर चालुक्यराष्ट्रकूटादि राज्यकर्ते गेल्याबरोबर देशांतून त्या समूळ नाहींश्या झाल्या नसत्या. पुढें मराठ्यांच्या अमलांत त्या पुनः उदयास आल्या असत्या म्हणावें तर दोन अडीचशें वर्षांच्या मराठ्यांच्या अमदानींत एकहि देऊळ किंवा एकहि मूर्ति किंवा एकहि चित्र असें दाखवितां यावयाचें नाहीं कीं जें चालुक्यादींच्या देवालयाशीं किंवा मूर्तीशीं किंवा चित्राशीं दूरचीहि बरोबरी करील. ह्या साऱ्या रडगाण्याचा अर्थ असा कीं माहाराष्ट्रिक लोक बऱ्याच कनिष्ठ संस्कृतीचे लोक होते. साम्राज्यें चालविण्याची कला जशी त्यांच्या आटोक्याच्या बाहेरची होती तश्याच इतरहि उच्च कला त्यांच्या होऱ्यांत येण्यासारख्या नव्हत्या.

प्राचीन महाराष्ट्रिकांचें भाषा व वाङ्मय मागासलेलें

भाषेच्या व वाङ्मयांच्याहि प्रांतांत माहाराष्ट्रिक लोक असेच मागासलेले होते. शातवाहनांच्या कारकीर्दीत राज्यकर्ते प्राकृत भाषा बोलणारे पडल्यामुळें, महाराष्ट्री भाषेला किंचित् उत्तेजन मिळालें. त्या उत्तेजनाचें फल एवढेंच झालें कीं शें-दोनशें महाराष्ट्री कवि किंचित् गुणगुण करूं लागले. गाथासप्तशतींत बऱ्याच महाराष्ट्री कवींच्या कृतींतील उतारे हाल शातवाहनानें दिले आहेत. ह्या काव्यप्रांताखेरीज शास्त्र, व्याकरण, मीमांसा, गणित, ज्योतिष, स्थापत्य, इतिहास इत्यादि गहन विषयांवर महाराष्ट्रींत एक ओळहि लिहिली गेली नाहीं. रावणवहो, गौडवहो, कर्पूरमंजरी, हीं हलक्या वाङ्मयावरील पांच चार मोठीं म्हणावयाचीं पुस्तकें काय तीं महाराष्ट्री भाषेंतील ग्रंथसंपत्ति होय, आणि हेहि पांच चार ग्रंथ महाराष्ट्री भाषा मृत्युपंथास लागल्या काळचे आहेत, महाराष्ट्रीच्या ऐन तारुण्यांतील नव्हत. जैनमहाराष्ट्रीहि निराळीच बोली असल्यामुळें, तींतील धर्मादिविषयक ग्रंथ प्रस्तुतप्रकरणीं जमेस धरण्यासारखे नाहींत. संस्कृत नाटकांत उच्च स्त्रियांच्या तोंडीं जीं पद्यें कवींनीं घातलेलीं आढळतात तीं एवढेंच दाखवितात कीं महाराष्ट्री भाषेंत सुंदर पद्यरचना बरीच कमाविली गेली होती. उच्च स्त्रियांच्या तोंडीं महाराष्ट्री पद्यें घालीत ह्याचें कारण असें होतें कीं, हिंदुस्थानांतील बहुतेक सर्व राजे माहाराष्ट्रिक स्त्रियांशीं विवाह करण्यांत भूषण मानीत, अश्या करितां कीं ह्या माहाराष्ट्रिक ऊर्फ माहाराजिक लोकांचा वंश त्या कालीं अत्यंत शुद्ध गणिला जाई. असा हा माहाराष्ट्रिकांच्या भाषेचा एकंदर पल्ला होता. वाङ्मयवैपुल्याच्या दृष्टीनें किंवा भारदस्तपणाच्या

दृष्टीनें हा पल्ला अत्यन्त क्षुद्र होता. पण तोहि थोडक्याच अवधींत संपुष्टांत आला. शक पांचशेंच्या सुमारास महाराष्ट्री भाषेला उतरती कळा लागली. शक पांचशें पर्यंत शिलालेख, ताम्रपट, काव्यग्रंथ, वगैरे लिखाण प्राकृत भाषेंत होत असे, तें चालुक्यांच्या अमदानीपासून बंद पडून संस्कृत भाषेंत होऊं लागलें.

व्रात्यांच्या व पतितांच्या व पाखंडांच्या बौद्धक्रांतीला व त्यांच्या प्राकृत भाषांना आळा घालतां घालतां, वैदिक धर्माचें व संस्कृत भाषेचें पुनरुज्जीवन ब्राह्मणांना व त्रैवर्णिकांना शक चारशें पाचशेंच्या सुमारास शक्य झालें. संस्कृतसिंह आखाड्यांत उतरल्याबरोबर प्राकृतमर्कटांनीं भयानें बहुतेक प्राणत्याग केला.

महाराष्ट्रिकांत नागलोकांचें व त्यांच्या भाषेचें मिश्रण

महाराष्ट्री भाषा सरकारदरबारांतून मागें पडावयाला वैदिक धर्माचें पुनरुज्जीवन हें तर एक कारण झालेंच. परंतु ह्याहूनहि जबरदस्त कारण कित्येक शतकें महाराष्ट्री भाषेला समाधि देण्याचें काम संथपणें करीत होतें. तें कारण सामाजिक होतें. माहाराष्ट्रिक लोक ज्या कालीं दक्षिणारण्यांत वसाहती करण्यास उतरले त्या कालीं त्यांना ह्या प्रदेशांत त्यांच्याहूनहि संस्कृतीनें कनिष्ठ असे दुसरे एक लोक भेटले. हे लोक म्हणजे ज्यांना नागलोक म्हणतात ते. जनमेजयानें जेव्हां सर्पसत्र म्हणजे नागांचा नायनाट आरंभिला तेव्हां हे लोक उत्तरेतून दक्षिणेंत आले. जनमेजयाच्या वेळची जी जुनाट संस्कृत म्हणजे वैदिक भाषा तिचा अपभ्रंश हे नागलोक बोलत. ह्या नागलोकांची एकंदर संस्कृति माहाराष्ट्रिकांच्या संस्कृतीहूनहि खालच्या दर्ज्याची होती. ह्यांशीं शरीरसंबंधादि मिलाफ माहाराष्ट्रिकांचा होऊन आस्तेआस्ते माहाराष्ट्रिक व नाग ह्यांच्या मिश्रणापासून एक नवीन राष्ट्र उत्पन्न होत होतें. हें नवीन राष्ट्र म्हणजे ज्यांना महरट्टे, म्हराटे, मऱ्हाटे, मराठे म्हणतात ते. एक भाषा बदलून तिच्या स्थानीं तत्सदृश अशी दुसरी भाषा जेव्हां प्रचलित झालेली दिसते तेव्हां त्या भाषान्तरप्रचलनाच्या बुडाशीं दोन राष्ट्रांचें किंवा लोकांचें सम्मेलन झालेलें नियमानें आढळतें. सामाजिक संमेलन ज्या मानानें दाट किंवा विरळ असेल त्या मानानें त्या दोन भाषांचें मिश्रण दाट किंवा विरळ होतें. एक समाज दुसऱ्या समाजाहून अतीच अतीं बलिष्ठ असला व हे दोन समाज शेजाराला आले व त्यांच्यांत विशेष संघट्टन झालें, तर कनिष्ठ समाजाची भाषा अजीबात मरून जाते व तो कनिष्ठ समाज बलिष्ठ समाजाची भाषा अपभ्रष्ट रूपानें सर्वस्वीं बोलूं लागतो. त्रैवार्णिक व एतद्देशज शूद्र या दोन समाजांचें जेव्हां सम्मेलन झालें तेव्हां हा प्रकार घडून आला. शूद्रांची मूळभाषा सपशेल बुडून गेली. नागांचा व आर्यांचा जेव्हां उत्तर हिंदुस्थानांत जनमेजयकालीं व तत्पूर्वी संगम झाला, तेव्हांहि हाच प्रकार घडला. नागांची मूळ भाषा अजीबात लोपून गेली व ते वैदिक भाषेचा अपभ्रष्ट उच्चार करून ती आर्यभाषा बोलूं लागले.

माहाराष्ट्रिकांचा व नागांचा जेव्हां दक्षिणेंत संगम, सहवास व शरीरसंबंध झाला, तेव्हां नागांचा जुनाट वैदिक भाषापभ्रंश व माहाराष्ट्रिकांची महाराष्ट्री ह्या दोन अपभ्रष्ट आर्यभाषांचा मिलाफ होऊन दोन्हींच्या लकबा जींत दृष्टयुत्पत्तीस येतात ती मराठी भाषा जन्मास आली. मराठी भाषेंत महाराष्ट्रींत नाहींत परंतु वैदिक भाषेंत आहेत व संस्कृत भाषेंत नाहींत परंतु वैदिक भाषेंत आहेत असे प्रयोग व प्रत्यय व क्रियापदरूपें जीं दृष्टीस पडतात त्याचें कारण नागांची महाराष्ट्री भाषेहून जुनी अशी वैदिक भाषापभ्रंश भाषा होय.

महाराष्ट्रींत नाहींत परंतु वैदिक भाषेंत आहेत अश्या दोन लकबा उदाहरणार्थ येथें उतरतों. मराठींत करूनश्यानी, जेऊनश्यानी, घेऊनश्यानी असें एक धातुसाधित अव्यय शूद्रांच्या व देशस्थांच्या बोलण्यांत येतें. हा श्यानी प्रत्यय आर्ष, मागधी, महाराष्ट्री, सौरसेनी, पैशाची, अपभ्रंश किंवा प्राकृतभाषा ऊर्फ पाअडभाषा ऊर्फ पाली भाषा अश्या कोणत्याच प्राकृत भाषेंत नाहीं. हा प्रत्यय पाणिनीय संस्कृत भाषेंतहि नाहीं, हा फक्त वैदिक भाषेंत आहे व तोहि अत्यंत तुरळक आहे. वैदिकभाषेंत सन् ला इ प्रत्यय लागून सनि असें सप्तम्यन्त रूप धातूंना जोडून कांहीं थोडीं धातुसाधित अव्ययें बनतात; जसें, गृणीषणि, तरीषणि, नेषणि इ. इ. इ. ह्या सनि-षणि प्रत्ययापासून मराठी श्यानि प्रत्यय आला आहे. आतां श्यानि प्रत्यय मराठींत महाराष्ट्रींतून तर आला नाहीं, कारण महाराष्ट्रींत असा प्रत्ययच मुदलांत नाहीं. तेव्हां मराठींत तो आला कोणत्या द्वारानें ? मराठीचा व वैदिक भाषेचा निकट सहवास तर कालान्तरामुळें कधींच शक्य नव्हता. तेव्हां एकच तोड राहिली. हा प्रत्यय नागलोकांच्या वैदिक अपभ्रंशांतून मराठींत आला. दुसरें उदाहरण झडकरि, चटकरि इत्यादि धातुसाधित अव्ययांचें. करि हें धातुसाधित अव्यय कोणत्याच प्राकृतांत नाहीं. फक्त वैदिक भाषेंत इ प्रत्यय धातूंना लागून दृशि, बुधि, संचक्षि अशीं धातुसाधितें आढळतात. कर् धातूला इ प्रत्यय लागून झालेलें हें करि धातुसाधित नागांच्या वैदिक अपभ्रंशद्वाराच तेवढें मराठींत येण्याचा संभव आहे. तात्पर्य, माहाराष्ट्रिकांचा व नागांचा मिलाफ शकोत्तर पांचशेंच्या सुमारास परिपूर्ण होऊन, केवळ महाराष्ट्री भाषा बोलणारे लोक महाराष्ट्रांत राहिले नाहींत. माहाराष्ट्रिक नागोत्पन्न अशी सर्व प्रजा मराठी अपभ्रंश बोलूं लागली. महाराष्ट्री भाषेला असा हा मृत्यु नागांच्या संमेलनानें आला.

महाराष्ट्री भाषा बोलणारेच कोणी न राहिल्यामुळें, त्या भाषेचा उपयोग शकोत्तर चार-पांचशेंच्या सुमारास चालुक्यादि परकीय संस्कृत भाषा समजणाऱ्या राजकर्त्यांनीं सार्वजनिक शिलालेखांत व ताम्रपटांत वगैरेंत सहजच केला नाहीं. मराठींत ताम्रपटें व शिलालेख कोरावे तर त्या नव्या भाषेला अद्याप शिष्टमान्यता आली नव्हती. तेव्हां चालुक्यादींच्या सार्वजनिक लेखांत संस्कृतभाषेचा उपयोग करण्याशिवाय गत्यन्तर राहिलें नाहीं. नाटकांतून वगैरे ग्रंथांतून महाराष्ट्रीचा उपयोग कवि करीत, परंतु तो

उपयोग केवळ परंपरागत रूढि म्हणून करीत, महाराष्ट्री भाषा जिवंत होती म्हणजे ती भाषा बोलणारे कोणी लोक शकोत्तर पांचशें नंतर राहिले होते म्हणून करीत नसत.

येणें प्रमाणें शक पांचशेंच्या सुमारास मराठे म्हणून ज्यांना म्हणतात ते लोक माहाराष्ट्रिक व नाग यांच्या हजारपांचशें वर्षांच्या संगमापासून महाराष्ट्रांत निपजले. ह्या मराठ्यांची संस्कृति, अर्थात्, माहाराष्ट्रिक व नाग ह्यांच्या संस्कृतींहून निराळी नव्हती, दोहोंच्या संस्कृतींचें मिश्रण होती. ह्या मिश्रणांत नागांचें प्रमाण किती व माहाराष्ट्रिकांचें प्रमाण किती, तेंहि अजमाविण्यास साधनें आहेत. महाराष्ट्री पुत्त व मराठी पूत् (तोंडी) ह्या शब्दांचीं विभक्तिरूपें देतों व त्यांत माहाराष्ट्रिकांच्या महाराष्ट्रीचा अंश किती व नागांच्या वैदिक अपभ्रंशाचा भाग किती त्याचा निर्णय करतों. ह्या निर्णयावरून मराठी संस्कृतींत महाराष्ट्री व नाग ह्या दोन संस्कृती कोणत्या प्रमाणांत मिश्र झाल्या त्याचा स्थूल अंदाज करतां येईल.

	महाराष्ट्री	अपभ्रंश	मराठी
		(१)	
	पुत्त	पुत्त	पूत् (तोंडी)
१	पुत्तो	पुत्तु	पूतु (प्राचीन), पूत् (अर्वाचीन तोंडी)
२	पुत्तं	पुत्तु	पूतु (प्रा.) पूत् (अर्वा. तोंडी)
३	पुत्तेण	पुत्तिण,	पुतेँ (लेखी), पूतानें. पूतेँ, पूतानँ (तोंडी)
४	पुत्ताअ	पुत्ताअ	पूता
५	पुत्तत्तो पुत्ताहिंतो पुत्ताउ पुत्ताहि	पुत्तहु	पूतातून् पूनाहून्
६	पुत्तस्स	पुत्तह	पूता
७	पुत्तम्मि पुत्ते	पुत्ति पुत्तहिँ	पूतीँ पूताँत
८	पुत्त पुत्ता		पूत् (तोंडी) पूता

... संशोधन मंडळ, पुणे. २
... २३३८६ दि: ...
... ७१३४ ... नों: दि: ... ३३
१९।७।५८

१	पुत्ता	पुत्ता, पुत्त	पूत् (तोंडी)
२	पुत्ता	पुत्ता, पुत्त	पूत् (तोंडी)
३	पुत्तेहिँ	पुत्तेहिँ	पूतांहीं
		पुत्तहिँ	पूतांनीं
			पूतीँ
४	—	—	पूताँ
५	पुत्ताउ	पुत्तहुँ	पूताँहून
	पुत्तत्तो		पूतांतून्
६	पुत्ताणँ	पुत्ताहँ	पूताँ
७	पुत्तेसु	पुत्तिहिँ	पूतीँ
८	पुत्ता	पुत्तहो	पूतानों, पूतहो (तोंडी)

महाराष्ट्री पुत्त शब्द मराठींत पुत् होतो म्हणजे त्त या संयोगाचा त् असा असंयोग होतो व संयोगाच्या पूर्वील स्वर ऱ्हस्वाचा दीर्घ होतो. जे माहाराष्ट्रिक त्त असा पूर्वी उच्चार करीत ते स्वतःच त् असा नंतर उच्चार करूं लागले, असें म्हणून भागणार नाहीं. त्त चा त् उच्चार होण्याला कांहीं तरी बहिःकारण पाहिजे. हें बहिःकारण नागलोक होत. नागांना (१) जोडाक्षरें उच्चारण्याचा कंटाळा असे. तसेंच (२) अन्त्य अ उच्चारण्याचाहि कंटाळा असे. (३) संयोगापूर्वील स्वर दीर्घ उच्चारण्याचीहि त्यांना खोड असे. माहाराष्ट्रिकांचा व नागांचा जेव्हां मिलाफ झाला तेव्हां नागांच्या ह्या तिन्ही खोडी माहाराष्ट्रिकांवर लादल्या गेल्या आणि त्या खोडी नागमाहाराष्ट्रिकोत्पन्न जे मराठे त्यांच्या मराठी भाषेंत दिसूं लागल्या. माहाराष्ट्रिकांचे फक्त प्, उ आणि त् हे तीन उच्चार तेवढे राहिले. महाराष्ट्री पुत्तोतील (४) अन्त्य ओ चा नागांनीं उ करून पूतु असें रूप बनविलें. ओ उच्चाराहून उ उच्चार नागांना सोपा वाटे. महाराष्ट्री पुत्तेणचें अन्त्य अ गाळून व (५) न् चा अनुनासिक करून नागांनीं पूतेँ असें उच्चारण केलें. माहाराष्ट्रिकांना स्वरापुढें स्वर संधि न करतां उच्चारण्याची खोड फार. (६) ती खोड नागांनीं मोडून टाकून पुत्ताअचें पूता बनविलें. महाराष्ट्री पुत्तत्तोतील ओचा उ करून, जोडाक्षरांचीं साधीं अक्षरें करून व (७) अनुनासिक लटकावून पूतातून् असें पंचमीचें रूप बनविलें. पुत्ताउतील (८) उचा हु, हुचा हूँ व हूँचा हून् बनवून पूताहून् हें रूप रचिलें. पुत्तस्स मधील (९) स चा ह व हचा अ करून पूता असें रूप निर्मिलें. हे नऊ फेरफार फारसे चमत्कारिक नाहींत. सर्वांत अत्यन्त चमत्कारिक फेरफार म्हटला म्हणजे (१०) पूताँ, पूताँही, पूताँनी, पूताँहून्, पूताँतून्, पूतानों, ह्या अनेक-

वचनीं रूपांतील ता वरील अनुनासिकाचा होय. मराठींत पूता हें चतुर्थीचें एकवचन आहे व पूताँ हें चतुर्थीचें अनेकवचन आहे. तसेंच संबोधनाचें एकवचन पूता आहे व अनेकवचन पूतानोँ आहे. पूतानोँ हा पूतान्हो ह्या रूपाचा अपभ्रंश आहे.

येथें असा प्रश्न येतो कीं, पूताँ व पूतान्हो या अनेकवचनीं रूपांत अनुनासिक व न्कार कोठून आला ? हाच प्रश्न थोडा विस्तृत करून असा प्रश्न येतो कीं मराठींत पुत्रांस्, पुत्रांना, पुत्रांतें, पुत्रांहून, इत्यादि रूपांत अनेकवचनीं अनुस्वार व अनुनासिक कोठून येतात ? महाराष्ट्रींत तर हे अनुनासिक-अनुस्वार नाहींत. प्रश्नाला उत्तर असें आहे कीं हे अनुनासिक-अनुस्वार मराठींत नागभाषेंतून आले. पूर्ववैदिकभाषेंत पुत्र ह्या शब्दाचें प्रथमेचें अनेकवचन (१) पुत्रासः, (२) पुत्राः, (३) पुत्रे व (४) पुत्रान् असें चार प्रकारांनीं होत असे. 'संस्कृत भाषेचा उलगडा' ह्या निबंधांत हा चतुर्विध प्रकार मीं दाखवून दिला आहे. वेदांत पुत्रान् ह्या सांच्याचें म्हणजे अन् प्रत्ययान्त रूप अनेकवचनी प्रथमेचें क्वचितच् येतें. अन् प्रत्ययान्त रूप द्वितीयेच्या अनेकवचनाचें असतें हें सर्वांच्या नित्यपरिचयाचें आहे. परंतु वेदांत क्वचित् हें अन्-प्रत्ययान्त रूप प्रथमेच्या अनेकवचनी योजिलेलें पाहून, सायणाचार्यांनीं छंदसि बहुलं या घबाड नियमाचा आश्रय करून, हें अन्प्रत्ययान्त रूप प्रथमेच्या अनेकवचनाचें आहे असें विधान स्वच्छ केलें. आहे. आणि असें विधान केल्यावांचून दुसरी गति नव्हती. सायणाच्या ह्या साहसी विधानाबद्दल तुच्छतादर्शक आश्चर्य दर्शविण्याचें कारण नाहीं. पूर्ववैदिक भाषेंत व वैदिक भाषेंतहि प्रथमेचें अनेकवचन अन्प्रत्यय लागून होत असे हें मला नुकतेंच अलीकडे दोन वर्षांखालीं कळून आलें आहे. पुत्रान् हें प्रथमेचें अनेकवचन ज्या एका पूर्ववैदिक भाषेंत होतें त्या पूर्ववैदिक भाषा बोलणाऱ्या ऋषिलोकांचा व नागांचा मिलाफ होऊन नागांनीं हें अन्प्रत्ययान्त रूप उचललें. ह्या पूर्ववैदिक पुत्रान् रूपाचा अपभ्रंश नागभाषेंत पुत्तां, पुत्ताँ असा होऊन त्या नागभाषेच्या द्वारा मराठींत पूतां, पूताँ अश्या रूपानें तो प्रविष्ट झाला. पूतांस्, पूतानों, इत्यादि मराठी अनेकवचनी रूपांत अनुस्वार-अनुनासिक कोठून आले त्याचा हा असा हिशेब आहे. त्याँना व त्यान्ला, त्याँतून् व त्यान्तून, त्यांचे व त्यान्चे, अशीं अनुनासिक-अनुस्वार- न्कारयुक्त रूपें येतात, त्याचें कारण वैदिक भाषेंतून नागलोकांनीं उचललेलें हें प्रथमेचें अनेकवचनी अन्प्रत्ययान्त रूप होय. पूतान्हो - पूतानों या मराठी रूपांत तर हें अन् प्रत्ययान्त रूप स्पष्ट दिसतें. महाराष्ट्रींत संबोधनाच्या अनेकवचनीं अन्प्रत्ययान्त किंवा अनुस्वार-अनुनासिकयुक्त रूप नाहीं.

वर दिलेल्या सोळा मराठी विभक्तिरूपांत असेच आणिक निदान दहा बारा नागभाषेंतील विशेष दाखवून देतां येतील. म्हणजे सोळा महाराष्ट्री रूपांत नाग-भाषेच्या संसर्गानें सुमारें वीस पंचवीस फेरफार झाले, अशी फलनिष्पत्ति होत्ये. सबंद

महाराष्ट्री भाषा सबंध मराठी भाषेशीं जर तोलली तर नागभाषेचा संस्कार महाराष्ट्री भाषेवर एकास दीड ह्या प्रमाणावर झालेला आढळावा असा स्थूल अंदाज आहे. ह्या नैरुक्तिक विधानाचा समाजदृष्ट्या असा अर्थ होतो कीं माहाराष्ट्रिक लोकांत नागलोकांचें मिश्रण एकास दीड ह्या प्रमाणांत होऊन मराठे लोक ज्यांस म्हणतात ते निर्माण झाले. माहाराष्ट्रिकांची संस्कृति नागलोकांच्या संस्कृतींहून किंचित् श्रेष्ठ असल्यामुळें, नागमाहाराष्ट्रिकोत्पन्न नव्या लोकांना मराठे हें नांव माहाराष्ट्रिक ह्या नांवावरून प्रचलित झालें, नागलोकांच्या नांवावरून नागे असें नांव प्रचलित झालें नाहीं.

नागस्त्रियांशीं आस्तिकादि ऋषींचे व अर्जुनादि क्षत्रियांचे शरीरसंबंध होऊन पितृसावर्ण्यानें ब्राह्मण व क्षत्रियप्रजा झालेली महाभारतादि इतिहासांतून प्रसिद्ध आहे. महाभारतांत व विष्णुपुराणादि पुराणेतिहासग्रंथांत कश्यपाच्या तेरा स्त्रियांपैकीं कद्रूच्या पोटीं नागांची उत्पत्ति सांगितली आहे. ह्या दंतकथेंत इतिहासभाग असा समजावयाचा कीं कश्यप समुद्राभोंवतालील म्हणजे अर्वाचीनकाळीं यूरोपियन लोक ज्याला क्यास्पियन समुद्र म्हणतात त्याच्या भोंवतालील प्रांतांतून राक्षस, गरूड, नाग, इत्यादि लोक अत्यंत प्राचीनकालीं रहात असत. तेथून परिभ्रमण करीत करीत नागलोक काश्मीर, तक्षशिला, सिंधु, मथुरा, इत्यादि प्रदेशांतून पाताळांत म्हणजे नर्मदेच्या दक्षिणेस उतरले. दक्षिणेंत वसाहती करून त्यांनीं अनेक गांवें वसविलीं व क्षुद्र राज्यपद्धति निर्माण केल्या, नागलोकांचीं शंभर कुळें होतीं. पैकीं जनमेजयानें वासुकी, तक्षक, ऐरावत इत्यादिकांचीं अनेक कुळें मारिलीं. ह्या नागलोकांत स्त्रियांचें प्राबल्य प्रधान असे. अर्वाचीन नायर लोक नागांचे वंशज होत. नाग शब्दाला संबंधार्थक प्राकृत केर प्रत्यय लागून नागकेर हा प्राकृत शब्द झाला. ह्या नागकेर शब्दाचा अपभ्रंश नाअएर, नाएर, नायर.

यलबुर्ग्याचे सिंद (शक ९००–११००) नागवंशीय होते व ह्यांच्या ध्वजेवर नागांचें चित्र असे. सध्यां ग्वालेरच्या शिंद्यांच्या मुद्रेवरहि दोन नागांच्या प्रतिमा असतात. शिंदा हा शब्द शक ९०० तील सिंदः ह्या शब्दाचा अपभ्रंश आहे. सेंद्रकः शब्दापासून सिंदा शब्द झाला अशी कित्येकांची समजूत आहे, परंतु ती साधार नाहीं. सेंद्रक शब्दांपासून शेंद्रे हें मराठा आडनांव होतें. तात्पर्य, हे नागलोक माहाराष्ट्रिक लोकांच्या फार पूर्वी नर्मदेपासून त्रावणकोरपर्यंतच्या मुलखांत पसरले होते.

माहाराष्ट्रिकांचा व नागांचा मिलाफ शकपूर्व ६०० पासून शकोत्तर ४०० पर्यंत एक हजार वर्षें होऊन, त्या दोघांच्या मिश्रणानें मराठे म्हणून ज्यांस म्हणतात त्या लोकांची उत्पत्ति झाली. दोन्ही लोक गणराज्यांसारख्या क्षुद्रराज्यपद्धति चालविणारे असून, त्यांना त्याहून वरिष्ठ राज्यपद्धति चालविण्याची ऐपत व अर्थात अक्कल आलेली नव्हती. तेव्हां उत्तरेकडील चालुक्य, राष्ट्रकूट, यादव, वगैरे सम्राटांची पाइकी करण्यांत ह्यांचें क्षात्रतेज खर्ची पडे तें यथायोग्य होतें. माहाराष्ट्रकांच्या महाराष्ट्रभाषेंत

कांहीं काव्यवाङ्मय तरी असे. नागांच्या नागभाषेंत जें काय वाङ्मय असे तें सर्व तोंडी असून त्याला अक्षरसंनिवेश कधींच मिळाला नाहीं. अशा ह्या निरक्षर नागांचे व ईषदक्षर माहाराष्ट्रिकांचे प्रज जे मराठे त्यांच्यांत ह्या दोन्ही वंशांतील दोष व गुण उतरून त्यांची संस्कृति माहाराष्ट्रिकांहून कमतर व नागांहून किंचित् उच्चतर अशी निपजली. माहाराष्ट्रिक हे वंशानें सूर्यवंशी क्षत्रिय होते आणि नाग हे शेषवंशी क्षत्रिय होते. ह्या दोन वंशांचा मिलाफ होऊन जे मराठे लोक शक चारशेंच्या सुमारास निपजले त्यांच्यांत सहजच सूर्यवंश व शेषवंश असे दोन वंश दिसूं लागले. देवधर्माच्या बाबतींत माहाराष्ट्रिक पुराण वैदिक धर्माचे व बौद्धक्रांतिकालानन्तर उद्भवलेल्या रामकृष्णादींच्या उपासनामार्गाचे अनुयायी होते.

नागलोकांवरील प्रभाव

नागलोक फार पुरातनकालापासून सर्पपूजक व वनदेवताभजक असून, बौद्धक्रांतिकालानंतर बौद्धधर्माचाहि पगडा त्यांच्यावर बसला. बौद्ध भिक्षु व श्रमणक दक्षिणेंत सर्वत्र पसरून जेथें जेथें नागांची वसति होती तेथें तेथें त्यांनीं आपले विहार व धागोबा स्थापिले. दक्षिणारण्यांतील नागांच्या वसतीची कोणतीहि डोंगरी किंवा मैदानी तर्फ घ्या, तेथें तेथें बौद्धांच्या विहार व धागोबा यांच्या खुणा मुबलक सांपडतात. उदाहरणार्थ, पुण्यापासून खंडाळ्यापर्यंतच्या तीस मैलांच्या डोंगरी तर्फेंत (१) पर्वती, (२) भांबुर्डे, (३) घोरवडी, (४) इंदुरी, (५) फिरंगाइचा डोंगर, (६) माजे, (७) बेडसें, (८) कार्ले ह्या आठ स्थलीं बौद्धांच्या धर्माचे अवशेष आढळतात. पुण्यापासून पळसदेवापर्यंतच्या मैदानी टापूंतहि बौद्ध अवशेष असेच विपुल आहेत. तात्पर्य बौद्धांची छाप नागलोकांवर त्याकालीं अतिशय बसली.

प्राचीन मराठ्यांतील राजकीय निष्ठेच्या अभावाचें कारण

नागमाहाराष्ट्रिकोत्पन्न मराठ्यांच्यावर, अर्थात्, वैदिक धर्माची, उपासनामार्गाची वनदेवतापूजेची, सर्पोपासनेची व बौद्धधर्माची अशी पंचविध छाप बसून, त्यांच्या मनोभूमिकेचा देवधार्मिक भाग एकनिष्ठ न रहातां चित्रविचित्र रंगविला गेला. त्यामुळें अमूक देवधर्माचे मराठे कट्टे विश्वसनीय अनुयायी आहेत असें म्हणण्याची सोय राहिली नाहीं. सगळ्याच देवधर्मांचे जे अनुयायी ते कोणत्याच देवधर्माचे कट्टे भक्त रहाणें शक्य नव्हतें. अशी ह्या मराठा क्षत्रियांची देवधार्मिक स्थिति शक चारशें पाचशेच्या पुढील तीन चार शतकांच्या अवधींत होती. त्यांना धड आर्य ऐतिह्यहि माहीत नव्हतें, धड बौद्ध ऐतिह्यहि अवगत नव्हतें, आणि नागांच्या वन्यदेवधर्मांत मुळीं ऐतिह्यच नव्हतें. त्यामुळें मराठे म्हणजे महाराष्ट्रांत त्या कालीं एक अडमुठ्यांचा अव्यवस्थित जमाव होऊन बसला होता. निश्चित देव नाहीं, निश्चित धर्म नाहीं,

अक्षर नाहीं, ऐतिह्य नाहीं, असे हे लोक राज्यकर्त्यांच्या व देवब्राह्मणांच्या अखंड पराभवाला कारण होऊन गेले. जो खावयाला देईल त्याच्या बाजूनें लढावयाचें, एवढा एकच ह्यांचा धंदा राहिला. आज चालुक्याच्या बाजूनें लढले, उद्यां राष्ट्रकूटांच्या तैनातींत शिरून चालुक्यांना पाडिलें, पर्वा यादवांची पाइकी स्वीकारून चालुक्यांचा धुव्वा उडविला, आणि शेवटीं मुसुलमानांचे बंदे बनून यादवांचें उच्चाटन केलें, असा हा मराठा क्षत्रियवर्ग अजाणतेपणें देशांत राजकीय अस्वस्थतेला कारण झाला होता. पोट्याला घालण्याला जेव्हां कोणी धनी मिळत नसे तेव्हां रिकामपणाच्या अवधींत हे दंगेखोर लोक एकमेकांशीं लढून प्रतिपक्ष्याची दहा पांच मैल जमीन सर करण्यांत गुंतलेले असत. असल्या अंतःस्थ कलहाच्या हकीकती कांहीं मी छापिल्या आहेत व कांहीं मजजवळ अद्याप अप्रकाशित राहिल्या आहेत. हे नागमाहाराष्ट्रिकोत्पन्न लोक म्हणजेच शहाजीकालीन अराष्ट्रीय ऊर्फ अधम संस्कृतीचे मराठे लोक होत.

मराठ्यांचा उद्धार करणारी उच्च उत्तरीय आर्यांची संस्कृति

शहाजीकालीन मराठे म्हणजे कोण लोक होते व हे लोक इतके पराकाष्ठेचे अराष्ट्रीय व अधम कसे बनले ह्या प्रश्नाचा उलगडा करण्याच्या खटाटोपाप्रीत्यर्थ ६३ व्या कलमापासून ९९ व्या कलमापर्यंतचें ३६ रकाने तपशील द्यावा लागला. हे मराठे लोक क्षत्रिय खरे, परंतु रामकृष्णजनकादि आत्मानात्मविचार करणाऱ्या व साम्राज्यें चालविणाऱ्या थोर क्षत्रियांचे हे साक्षात् वंशज नव्हत, रामकृष्णादिकांच्या काळच्या कांहीं कमसुधारलेल्या आयुधजीवी क्षत्रियांचे व नागांचे हे मुख्यत्वेंकरून वंशज होत. ह्यांच्याखेरीज दुसरे एक लोक आपणास मराठा क्षत्रिय म्हणून म्हणविणारे शहाजीकालीं होते. परंतु तत्संबंधक मराठा क्षत्रिय ह्या शब्दाचा अर्थ महाराष्ट्रदेशांत कांहीं शतकें राहिलेले उत्तर हिंदुस्थानांतील क्षत्रिय असा होता, नागमाहाराष्ट्रिकोत्पन्न मऱ्हाटा असा नव्हता. ह्या महाराष्ट्रदेशनिवासी मराठा क्षत्रियांत चालुक्य, यादव, पल्लव, भोज इत्यादि थोर राजघराण्यांतील क्षत्रियांच्या वंशजांचा समावेश होतो. चाळके, यादव, जाधव, पालवे, भोसले, हे शब्द चालुक्य वगैरे संस्कृत शब्दांचे मराठी अपभ्रंश होत. ह्या थोर राजघराण्यांत पुलकेशिन्, अमोघवर्ष, विक्रमादित्य, सिंघण, अपरार्क इत्यादि बडीं बडीं घेंडें होऊन गेलीं आणि ह्यांच्याच वंशांत शहाजी व शिवाजी हे अवतारी पुरुष निपजले. जसा महाराष्ट्र-ब्राह्मण ह्या शब्दाचा मराठा-ब्राह्मण हा मराठी अपभ्रंश आहे. तसाच महाराष्ट्र-क्षत्रिय ह्या शब्दाचा मराठा-क्षत्रिय हा मराठी अपभ्रंश आहे. महाराष्ट्र-ब्राह्मण म्हणजे महाराष्ट्रदेशांतील चिरनिवासी ब्राह्मण असा जसा अर्थ केला जातो, तसाच अर्थ महाराष्ट्र-क्षत्रिय म्हणजे महाराष्ट्रदेशांतील चिरनिवासी क्षत्रिय असा अर्थ केला जात असे.

हे भोज, यादव, चालुक्य, राष्ट्रकूट, निकुंभ इत्यादि क्षत्रिय संस्कृतादि भाषा जाणणारे असून वैदिक संस्कृतीचे मोठे पुरस्कर्ते असत. ह्यांच्याच आश्रयानें विज्ञानेश्वर, भास्कराचार्य, हेमाद्रि वगैरे नामांकित पंडितांनीं संस्कृतसरस्वतीची अपूर्व सेवा केली. नागमाहाराष्ट्रिकोत्पन्न मराठ्यांच्या आश्रयानें भास्कराचार्यादि प्रतिभासंपन्न शोधकांचा निर्वाह झाला नाहीं व झाला नसता. कारण हे पंडित काय करतात व ह्यांच्या कर्तबगारीचा उपयोग काय, हेंच मुळीं समजण्याची अक्कल नागमाहाराष्ट्रिकोत्पन्न मराठ्यांत नव्हती. भोजचालुक्यादि महाराष्ट्र-क्षत्रिय व नागमाहाराष्ट्रिकोत्पन्न मराठे ह्यांच्या संस्कृतींत हा असा जमीनअस्मानाचा फरक होता. आणि असा फरक पडल्यामुळें भोजचालुक्यादि महाराष्ट्र-क्षत्रिय नागमाहाराष्ट्रिकादि मराठ्यांशीं विवाहादि शरीरसंबंध करण्यात कमपक्ष मानीत. हा भेद महाराष्ट्रांत भोसल्यांच्या राजवटींतहि प्रचारांत होता. भोसल्यांचा शरीरसंबंध विवक्षित पंचकुळींत व दसकुळींतच होत असे, हव्या त्या मराठा कुळीशीं होत नसे. कारण भोसले हे महाराष्ट्र-क्षत्रिय असल्यामुळें नागमाहाराष्ट्रिकोत्पन्न मराठ्यांशीं संबंध करण्यांत त्यांना कमीपणा वाटे. ह्या रूढीचा एक चमत्कारिक व हास्यकारक परिणाम होई. भोसले हे पंचकुळीच्या बाहेरील मराठ्यांना परमार्थानें संस्कृतिदृष्ट्या कमतर समजत, तर उलट बाहेरील मराठे लोक भोसले व त्यांची दसकुळी व पंचकुळी ह्यांना रागानें कमअस्सल म्हणून नांवें ठेवीत ! महाराष्ट्र-क्षत्रिय व नागमाहाराष्ट्रिकोत्पन्न मराठे हे दोघेहि क्षत्रियच. फक्त संस्कृतींत तेवढा जमीनअस्मानाचा फरक, एका पक्षाची साम्राज्यें चालविण्याची योग्यता तर दुसऱ्याची सामान्य देशमुखीहि टिकविण्याची अयोग्यता. एक चतुरस्र विद्येचा भोक्ता; दुसरा विद्येचा पिढीजात शत्रु. एक सनातनधर्माचा व गोब्राह्मणांचा कैवारी; दुसरा भेटेल त्या देवधर्मांचा व साळूमाळूचा अनुयायी. एक सुवर्णयज्ञोपवीत धारण करण्यांत भूषण मानणारा, तर दुसरा नागनरसोबा डोक्यावर घेऊन नाचणारा. असल्या ह्या कनिष्ठ दर्ज्याच्या क्षत्रियाची व्यवस्था कशी लावावी, त्याला सनातन धर्माकडे कसा वळवावा व तो वाटेल त्याची पाइकी न करील अशी व्यवस्था कशी करतां येईल, ही अडचण राष्ट्रकूट, यादव, वगैरे राज्यकर्त्यांना त्या त्या कालीं सहजच पडे. सदरील विवंचनेचें परिमार्जन त्या कालीं कसें व कितपत करतां आलें ह्या बाबीची स्फुटता पुढें करतों.

चालुक्यादींच्या राजवटींत नागमाहाराष्ट्रिकोत्पन्न मराठ्यांची व्याप्ति महाराष्ट्र-देशांत सामान्य शेतकऱ्यांपासून तों पाटील-देशमुखांपर्यंत झालेली होती. प्रथम जेव्हां माहाराष्ट्रिक दंडकारण्यांत व दक्षिणेंत वसाहती करूं लागले तेव्हां तर्फे तर्फेनें त्यांनीं गणराज्यें स्थापिलीं. गणराज्यांतील मुख्य जो ज्येष्ठराज त्याच्याकडे गणाचें पुढारपण असें व गणसंघांतील गण त्याचे अनुयायी असत. चालुक्यादि सम्राटांच्या अमदानींत ज्येष्ठराज देशमुख बनले व गणांतील गण पाटील व कुणबी बनले, आणि

गणराज्यसंस्था लुप्त झाली. पाटील म्हणजे पट्टकील. पट्टकील ह्या सामासिक शब्दाचा अर्थ त्यांतील अवयवशब्दांवरून स्पष्ट आहे. अशोकादींच्या वेळीं कापसाचें विणलेले पट्ट लिहिण्याकरितां वापरीत, जमीनीच्या मालकीची नोंद ह्या पट्टांवर करीत आणि ते पट्ट कीलकांत म्हणजे वेळूच्या पोकळ कांडांत घालून सुरक्षित ठेवीत. पट्टकील म्हणजे पट्ट ज्यांत ठेविले आहेत तीं वेळूचीं पोकळ कांडें. हें पट्टकील ज्याच्या ताब्यांत असत त्या गांवच्या ग्रामणीला पट्टकीलक म्हणत. पट्टकीलक या शब्दाचा अपभ्रंश पट्टकील. पट्टकील या शब्दाचा मराठी अपभ्रंश पाटैलु, पाटेल, पाटील. तांब्याच्या पत्र्यांवर जमिनीच्या मालकीची नोंद करण्याची कला निघाल्यावर पाटैलु जवळ ताम्रपत्रेंहि संग्रहार्थ रहात. चालुक्यादींच्या कारकीर्दीत गणसंघांतील कांहीं गण गांवगन्नाचे पाटैलु बनले आणि कांहीं गण कुणबी बनले.

कुणबी म्हणजे कुलपति. कुलपतीचा अपभ्रंश कुळवइ, कुळवी, कुणबी. कुणबी म्हणजे शूद्र नव्हे. कुणबी म्हणजे जमीन करणारा. तो निरपवादपंणें चालुक्यांच्या चातुर्वर्णिक अमदानींत नागमाहाराष्ट्रिकोत्पन्न मराठा असे, शूद्र निखालस नसे. शूद्रांचें काम फक्त सेवा करण्याचें. तात्पर्य, चालुक्ययादवांच्या राशियतींत जमीन करणारे कुणबी, कुणब्यांचे पुढारी पाटील व पाटलांचे पुढारी देशमुख एथून तेथून सर्व देशभर नागमाहाराष्ट्रिकोत्पन्न मराठे असत. सध्यां कुणबी थोडासा गबर झाला म्हणजे तो आपल्याला मराठा कां म्हणवितो व सामान्य कुणब्याला पाटील या नांवानें संबोधिलें असतां तो खुष कां होतो त्याचें बीज असें आहे कीं, कुणबी हा वंशानें मराठा आहे व मराठा म्हणवून घेण्याचा त्याला जन्मसिद्ध व वंशसिद्ध हक्क आहे. ही कुणबी, पाटील व देशमुख मराठामंडळी मराठी भाषा बोलणारी असून आर्य संस्कृतीच्या अगदीं खालच्या पाय्यरीवर होती व त्यांना आर्य संस्कृतीचा अभिमान जेणें करून येईल ते उपाय महाराष्ट्र-क्षत्रियांना व ब्राह्मणांना कर्तव्य होते.

त्याकालीं महाराष्ट्रांतील शूद्र, कुलपतीच्या म्हणजे कुणब्याच्या म्हणजे शेतकऱ्याच्या, प्रतिष्ठेप्रत चढला नव्हता. माहाराष्ट्रिकांची व नागांची दक्षिणेंत जेव्हां गांठ पडली तेव्हां नागलोकांत तीन वर्ण ऊर्फ जाति अस्तित्वांत होत्या, (१) नाग-क्षत्रिय, (२) नागशूद्र व (३) नाग अतिशूद्र. पैकीं नाग-क्षत्रियांशीं माहाराष्ट्रिकांचा शरीर-संबंध होऊन मराठे लोक निर्माण झाले. नाग-अतिशूद्र म्हणजे सध्यां ज्यांना आपण महार म्हणतों ते. ह्यांच्या नांवापुढें नाग=नाक हा प्रत्यय अद्यापहि असतो, जसें रामनाक, कामनाक, इ. इ. इ. नाग-शूद्र जे होते तेच मराठे लोक अस्तित्वांत आले त्या समयींचे ह्या देशांतील शूद्र होत. माहाराष्ट्रिक लोक दक्षिणेंत उतरले तेव्हां त्यांच्या बरोबर उत्तरेंतील शूद्रातिशूद्र सहजींच फार थोडे आले. आर्य वसाहतकार जेथें जेथें जात तेथें तेथें त्यांना जे भूमिज अर्धरानटी लोक भेटत त्यांना ते दास्यकर्म करावयास लावून शूद्र व अतिशूद्र बनवीत. दक्षिणेंत माहाराष्ट्रिकांना

नाग-शूद्र व नाग-अतिशूद्र आयतेच नागलोकांत असलेले आढळले. ह्या नागशूद्रांत माहाराष्ट्रिकांच्या बरोबर आलेले उत्तरदेशीय अनिरवसित शूद्र, वैश्य व नाग-क्षत्रिय यांचे शरीरसंबंध होऊन शूद्र-कुणबी म्हणून ज्यांना म्हणतात ते शहाजीकालीन लोक निर्माण झाले. तेव्हां नवीन शूद्र बनविण्याची खटपट करावी लागली नाहीं. हे नागशूद्र व अतिशूद्र नाग-क्षत्रियांहूनहि नीचतर संस्कृतीचे असत, हें सांगणें नलगे. ह्यांच्यांतहि आर्य संस्कृतीचा अभिमान उत्पन्न करणें महाराष्ट्र-क्षत्रिय व ब्राह्मण यांना आवश्यक भासत होतें.

माहाराष्ट्रिक लोकांबरोबर उत्तरेकडील ब्राह्मण, विशेषतः यजुर्वेदी ब्राह्मण, दक्षिणेंत पुरोहितकर्मसंपादनार्थ उतरले व माहाराष्ट्रिकांबरोबर गांवगन्ना पसरले. नागमाहाराष्ट्रिकोत्पन्न मराठ्यांच्या गांवढळ संगतीनें हे यजुर्वेदी ब्राह्मणहि अत्यन्त अज्ञ बनून गेले होते. ह्यांनाहि उजळा देण्याचें काम महाराष्ट्र-क्षत्रिय व विद्वान ब्राह्मण यांना जरूरीचें भासत होतें.

एणेंप्रमाणें चालुक्यराष्ट्रकूटयादवादींच्या अमदानींत (१) अल्पसंख्याक भोजयादवादि उत्तरदेशीय महाराष्ट्र क्षत्रिय व ब्राह्मण (२) नागमाहाराष्ट्रिकोत्पन्न मराठे देशमुख, पाटील व कुणबी, (३) नाग-शूद्र व अतिशूद्र आणि (४) जोसपण कुलकरण करणारे गांवढ्यागांवचे यजुर्वेदी ब्राह्मण असे चतुर्विध संस्कृतीचे लोक देशांत होते आणि अल्पसंख्याक महाराष्ट्र-क्षत्रिय व ब्राह्मण यांच्याकडे ह्या राष्ट्राचें व समाजाचें नियंतृत्व व चालकत्व होतें. अल्पसंख्याक महाराष्ट्र क्षत्रियांचें व ब्राह्मणांचें बल काय तें त्यांच्या बरोबर उत्तरेकडून आलेल्या थोडयाश्या क्षत्रियांचें व ब्राह्मणांचें. उत्तरदेशीय क्षत्रिय व विद्वान् ब्राह्मण राष्ट्रांतील वरिष्ठ लष्करी व मुलकी अधिकार चालवीत. बाकीं सैन्यांतील दरोबस्त जिल्हर शिपायगिरी व पायकी आणि मुलकी खात्यांतील व धर्मखात्यांतील दरोबस्त कारकुनी व ग्रामवृत्ति नागमाहाराष्ट्रिकोत्पन्न मराठ्यांकडे व गांवढळ यजुर्वेदी ब्राह्मणांकडे असे. हे निकृष्ट मराठे व यजुर्वेदी ब्राह्मण मराठी भाषा बोलत व वन्यदेवादि नाना प्राकृत देवधर्मांचे उपासक असत. झुकानेवाला भेटला कीं हे झुकण्यास अज्ञानानें एका पायावर तयार असत. जैन, लिंगायत, मानभाव, गोरखपंथी, इत्यादि नाना पाखंडी या लोकांना भुलवीत व हे लोक त्या भुलवण्याला बळी पडत. इतकेंच नव्हे तर नवव्या दहाव्या शतकांच्या सुमारास नंदुरबार प्रांतांतील कित्येक यजुःशाखीय व्यवहाऱ्यांनीं व सराफांनीं व रंगाऱ्यांनीं इराण, अरबस्थान व शामळदेश ह्यांच्याशीं बेपार करतां करतां कांहीं मुसुलमान अवलियांचें शिष्यत्व पतकरिलें. जो कोणी पोटाला देईल, मग तो स्वधर्मी असो कीं विधर्मी असो, त्याची सेवा करण्यास हे नागोत्पन्न मराठे व यजुर्वेदी ब्राह्मण सारखेच तयार असत. मराठ्यांचा हा असा स्वभाव बनण्यास मुख्य कारण म्हटलें म्हणजे ह्यांचें नागवंशत्व होय. वांशिक ऊर्फ

सामाजिक कारणांचे व्यावहारिक, राजकीय व धार्मिक बाबतींवर परिणाम घडल्याशिवाय रहात नाहींत त्याचें हें एक उदाहरण आहे.

अशा ह्या अज्ञानपंकांत डुबलेल्या प्राकृत जनांना त्याकालीं संस्कृत प्रांतांत फोफावलेल्या संस्कृतीचें बाळकडू पाजिल्याशिवाय राष्ट्रचालकांची व ह्या प्राकृत जनांची समरसता होणें दुरापास्त होतें. बाळकडू संस्कृतभाषा द्वारा पाजूं म्हटलें तर तें अशक्य होतें, कारण प्राकृतांना संस्कृत भाषेची ओळख नव्हती. प्राकृतांची जी मराठी भाषा तींतून प्राकृतांना बाळकडू पाजावें, तर मराठी भाषा अद्याप अक्षरनिविष्टहि झाली नव्हती. त्यांतल्या त्यांत एक बाब मात्र समाधानाची होती. ती अशी कीं, सर्व महाराष्ट्रदेशभर देशमुख्यांपासून रंकापर्यंत सर्व जातींची व सर्व लोकांची मराठी ही शालिवाहनाच्या पांचव्या शतकापासून नवव्या शतकापर्यंतच्या अवधींत जन्मभाषा बनून गेली होती. प्रांतिक भेदानें मराठी भाषा प्रांतोप्रांतीं किंचित् भिन्न उच्चारिली व बोलिली जाई. परंतु देवगिरी प्रांतांतील मराठी भाषा मध्यवर्तित्वामुळें सर्व प्रांतांना सहज कळण्यासारखी असे. सबब, देवगिरीय मराठी भाषेला शिष्टत्व देऊन तिच्या द्वारा उच्च आर्यसंस्कृतीच्या प्राकृतजनांत फैलाव करण्याचा निश्चय राज्यकर्त्या ब्राह्मणक्षत्रियांनीं केला. प्राकृतजनांत उच्च आर्यसंस्कृतीचा फैलाव करणें म्हणजे आर्यसंस्कृतींत जे वर्णधर्म, आश्रमधर्म, शौचधर्म, जातिधर्म, कुलधर्म, राष्ट्रधर्म व देशधर्म त्या कालीं विद्यमान होते व जें ऐतिह्य, शास्त्र व कलाज्ञान वृद्धिंगत झालें होतें तें प्राकृतजनांत पसरविणें. हे धर्म व हें ज्ञान प्राकृतजनांत त्या कालीं नव्हतें, असा ह्या विधानाचा अर्थ होतो. कां नव्हतें, तर हे प्राकृत लोक महाराष्ट्र क्षत्रियांच्या व ब्राह्मणांच्या राष्ट्राचे अवयव नव्हते, फक्त परकीय कामकरी होते. मराठे लोक नाग व माहाराष्ट्रिक या दोन लोकांच्या मिश्रणानें नुकतेच नवे लोक बनून फक्त पांच चारशें वर्षें लोटलीं होतीं. ह्या नव्या लोकांचें नवें महाराष्ट्र बनविण्याचा उच्च संकल्प तत्कालीन परकीय महाराष्ट्र क्षत्रिय व ब्राह्मण यांच्या मनांत स्वहितार्थ व स्वसंरक्षणार्थ उपरिनिर्दिष्ट समरसतेच्या सिद्धयर्थ आला. उत्तरेकडून स्वकीय क्षत्रिय व ब्राह्मण दक्षिणेंत येण्याचें अनेक राजकीय व सामाजिक कारणांनीं जसजसें उत्तरोत्तर बंद होत चाललें, तसतसें महाराष्ट्रांतील मराठा, कुणबी, शूद्र व अतिशूद्र यांचा ममतेचा पाठिंबा मिळविणें राज्यकर्त्यांना अगत्याचें होऊन बसलें.

समरसता चार द्वारांनीं उत्पन्न करण्याचें ठरलें. पहिलें द्वार भक्तीचें. असंस्कृत बुद्धीच्या अव्युत्पन्न मराठ्यालोकांत राम, कृष्ण इत्यादि दैवतांची भक्ति पसरविण्याकरितां अभंग, ओव्या, इत्यादि छंदांत काव्यनिर्मिति शक ९०० पासून मराठींत ब्राह्मण कवींनीं रचिली. दुसरें द्वार ऐतिह्याचें. भारत, भागवत व रामायण ह्यातील प्रसंगांवर गद्यपद्य रचना करून भारतीय ऐतिह्याचें ज्ञान मराठ्यांत फैलाविण्याचा

उपक्रम ह्याच कालीं झाला. तिसरें द्वार वेदान्ताचें. शांकरीय वेदान्ताचा प्रसार करण्याकरितां छिंदवाड्यांतील सिंद राजांचा आश्रित जो मुकुंदराज त्यानें ग्रंथरचना संस्कृतांत व प्राकृतांत ह्याच कालावधींत केली आणि पांचरात्रीय वेदान्त ज्ञानदेवानें ह्याच मोसमांत गायिला. चवथें द्वार ग्रामजोश्यांच्या व कुणब्यांच्या उपयोगाचें ग्रहज्योतिषाचें व फलज्योतिषाचें. श्रीपतीनें आपली ग्रहगणिताची रत्नमाला असंस्कृतज्ञ ग्रामजोश्यांना ग्रहगणित करून पंचांगें बनवितां यावीं म्हणून याच कालीं मराठींत गुंफिली आणि सहदेवभाडळीनें मेघमाला व संवत्सरफलें मराठींत कुणब्यांच्या माहितीकरितां संस्कृत ग्रंथांतून ह्याच कालीं उतरलीं. अश्या रीतीनें मराठी भाषेचा ग्रंथावतार मराठा लोकांच्या अनुग्रहार्थ शक ९०० पासून शक १२०० पर्यंत होत होता व मराठा राष्ट्र आस्ते-आस्ते साक्षर बनत होतें. तों इतक्यांत मुसुलमानांची धाड महाराष्ट्रावर येऊन शक १२४० त महाराष्ट्र यवनाधीन झालें व मराठी भाषेचा राजाश्रय नाहींसा झाला.

ह्या संकटसमयांत आर्यसंस्कृतीचें बीज मराठ्यांच्या मनोभूमींत गेल्या तीनशें वर्षांत कितपत रुजलें होतें त्याची नामी परीक्षा उतरली. मराठा कुणबी शूद्र व महार हे आर्यधर्माला व हिंदू रूढीला बेमालूम बिलगले व यांच्यांतून फारच थोड्या लोकांनीं धर्मान्तर केलें. परंतु, आर्यधर्माच्या बाहेरील जे हलालखोर, कसायी, रंगरेज इत्यादि अन्त्यावसायी लोक, ज्यांच्यांत आर्यसंस्कृतीचा फैलाव अद्याप झाला नव्हता, ते सबंदच्या सबंद मुसुलमान बनले. हिंदू संस्कृतीच्या सीमाप्रदेशावरील अंत्यावसायी लोक मुसुलमान बनण्यांत मोठासा चमत्कार नव्हता. कारण, हे अंत्यावसायी लोक मुळांत हिंदू नव्हतेच. आर्यसंस्कृतिप्रसाराचें वारें देशांत कितपत भिनलें होतें त्याची परीक्षा दुसऱ्याहि एका तऱ्हेनें झाली. मुसुलमानी अंमलाच्या भर ज्वानींत आर्यधर्मप्रसाराचें सत्कृत्य अठरापगड जातींतील संतांनीं अनन्वित छल सोसूनहि पुढें चालूं ठेविलें. तें इतक्या जोरानें ठेविलें कीं भारतांवर भारतें, रामायणांवर रामायणें व भागवतांवर भागवतें मराठी भाषेंत शक १२०० पासून पुढील पांचशें वर्षांत लिहिलीं गेलीं. हा असला चिनखळ मारा मराठा, कुणबी, शूद्र व अतिशूद्र समाजावर करणें त्याकालीं अत्यन्त आवश्यक होतें. कारण शक १२०० शेंच्या पूर्वील माऱ्यानें धर्मान्तर करण्यापासून मराठा समाज यद्यपि परावृत्त झाला होता तत्रापि हा समाज अद्याप बनावा तसा राष्ट्रीय बनला नव्हता. अद्याप परकीय मुसुलमान राज्यकर्त्यांविरुद्ध उत्कट द्वेष त्यांच्या ठाईं जसा बाणावा तसा बाणण्यास अवकाश होता. अद्याप पोटाकरतां धर्मद्वेष्ट्यांची सेवा करण्यास मराठा लोकांस जशी लज्जा वाटूं लागावी तसी लागली नव्हती. अद्याप मूर्ति फोडलेल्या, स्त्रिया भ्रष्ट केलेल्या, सज्जनांची अब्रू गेलेली, गोमातेचा वध झालेला उघड्या डोळ्यानें बघण्याची मराठ्यांना खंती वाटत नव्हती.

अश्या राजकीय दृष्ट्या अधंवट, लज्जास्पद व अधम स्थितींत दक्षिणेंतील नागमाहाराष्ट्रिकोत्पन्न मराठे लोक असतां, उत्तरेकडील ऐतरेयब्राह्मणानें गायिलेल्या भोजक्षत्रियांचे वंशज जे शहाजीराजे भोसले त्यांनीं यवनाशीं करामतीनें व पराक्रमानें झुंझून स्वराज्याचा पाया घालण्याचा साहसी उपक्रम स्वतःच्या एकट्याच्या हिंमतीवर रचिला. आर्यक्षत्रियांचें नांव पुनरपि त्रिभुवनभर गाजविलें आणि अखिल आर्यांच्या बेचाळीस पिढ्यांचा उद्धार केला !

उत्तरदेशीय महाराष्ट्र क्षत्रिय व नागमाहाराष्ट्रिकोत्पन्न मराठा क्षत्रिय हे ह्याच्या पुढील काळांत मिसळून व एकवट्टून जाऊन दोघांनाहि मराठा ही संज्ञा सारखीच कशी पडत चालली तो इतिहास अंशतः शहाजीकालाच्या नंतरचा असल्यामुळें, त्या संबंधाच्या तपशिलांत शिरण्याचें प्रस्तुत कारण नाहीं. महाराष्ट्र क्षत्रियांचा सोमवंश, माहाराष्ट्रिकांचा सूर्यवंश व नागांचा नागवंश असे तीन वंश मिळून सध्यांचें मराठा राष्ट्र, अथवा खरें पाहिलें तर सध्यांचे मराठे लोक, बनले आहेत. चवथा परमार इत्यादिकांचा अग्निवंश. हा अग्निवंश केवळ कल्पित आहे असें चिंतामणराव वैद्य प्रतिपादितात. तत्रापि, एवढें खरें कीं परमार वगैरे ढुंढारदेशीय कुलें माहाराष्ट्रिकांच्या बरोबर दक्षिणेंत उतरलीं. त्यांची संस्कृति माहाराष्ट्रिकांच्या संस्कृतीसारखीच असल्यामुळें, नागवंशमिश्रणानें माहाराष्ट्रिकांत जो बदल झाला तसला बदल परमारादींच्या मिश्रणानें झाला नाहीं.

१३

महाराष्ट्र व उत्तरकोंकणची वसाहत

प्रांतिक भाषाभेदांचें एकीकरण

मांगेली, वारली, ठाकरी, कातकरी, कोळी, कुणबी, पातेणी, चित्पावनी, कऱ्हाडी, सारस्वती, गोमांतकी, गोकर्णी, सोंधेकरी, मिरजी, पंढरपुरी, मंगळवेढी, बेदरी, नांदेडी, रायपुरी, मूळतापी, लाडी, इत्यादि प्रांतिक व जातिक महाराष्ट्री भाषेचे लहान लहान पुंज महाराष्ट्रदेश म्हणून ज्याला सध्यां म्हणतात त्या देशाच्या सीमा-प्रदेशावर दोन अडीच हजार वर्षांपूर्वी व पाणिनिकालाच्या नंतर ठिकठिकाणीं वसती करून राहिले. ह्या सीमा प्रदेशाच्या आंतील विस्तीर्ण टापूंत नागपुरी, अलजपुरी, वऱ्हाडी, खानदेशी, पैठणी, नाशिकी, जुनरी, पुणेरी, भिमथडी, बालेघाटी, नगरी, कोल्हापुरी, मावळी, इत्यादि प्रांतिक महाराष्ट्री भाषेचे शेकडों पुंज वसाहतकालीं स्थिर झाले. रूपसाम्यावरून हे अन्योन्य भिन्न प्रांतिक भाषा बोलणारे पुंज, शालिवाहनाच्या पांचव्या शतकाच्या सुमारास मराठी भाषा हें थोर नांव महाराष्ट्रिक व नाग ह्यांच्या मिश्रणापासून बनलेल्या मराठ्यांच्या ज्या भाषेस पडलें, त्या भाषेशीं आस्तेआस्ते राजकीय, वैयापारिक, धार्मिक व वाङ्मयिक कारणांनीं समरस होत होत सध्यां बहुतेक शिष्ट मराठी बनले आहेत. शकाच्या पांचव्या सहाव्या शतकापर्यंत हे पुंज थोडेफार तुटकतुटक असत. ते राजकीयादि कारणांनीं समरस बनून त्यांच्या सबंद प्रांताला प्रथम त्रिमहाराष्ट्रक व नंतर महाराष्ट्र हें नांव कायमचें मिळालें.

महाराष्ट्र जितका महाराष्ट्रिकांनीं बनविला तितकाच बहुतेक मांगेले, वारली, कोळी, कातवडी, लाडी, रांगडी, इत्यादि पुंजांनीं बनविला आहे. हे पुंज जर सीमा-प्रदेशावर नसते तर मराठी भाषेचा विस्तार सध्यां जो दिसत आहे, त्याहून बराच संकुचित व मर्यादित दिसता. सीमाप्रदेशावरील पुजांच्या भाषेंतील प्रांतिक लकबा साधुसंतनिर्मित वाङ्मयप्रसारानें पूर्वी निघून जात व शालोपयोगी छापील पुस्तकपठ-नानें सध्यां निघून जात आहेत. मांगेले, वारली वगैरे लोकांनीं महाराष्ट्रीय भाषेचीं सीमाप्रदेशावर ठाणीं व टापू पुरातनकालीं तयार केले. शंभर वर्षांपूर्वी तेंच काम ग्वालेर, बुंदेलखंड, माळवा, विलासपुर, बडोदें, म्हैसूर, तंजावर, मिरज, अथणी, बेळगांव, विजापूर, गुत्ती, वगैरे महाराष्ट्रबाह्य प्रदेशावर चालुक्य, राष्ट्रकूट, यादव, भोसले व भट राज्यकर्त्यांनीं मध्यकालीं व अर्वाचीनकालीं पुढें चालविलें. पानिपत

येथें महाराष्ट्रधर्म सर्व भारतवर्षांत पसरविण्याचा मराठ्यांचा हव्यास किंचित् विराम पावून शक १७४० त तर अगदींच थंडा पडला. तोच उद्योग माळवा, पंजाब, काफरिस्थान व चित्रळ ह्या प्रदेशांत मानभावांच्या भक्तिमार्गानें गेलीं आठशें वर्षें चालविला आहे. महाराष्ट्राचा राष्ट्रीय देह जर पुनः सजीव झाला तर पूर्वीचा महाराष्ट्र-धर्म, अर्थात् महाराष्ट्रभाषा, भरतखंडभर पसरविण्याचा पूर्वजन्मींचा धागा त्याला सोडून चालतां येणार नाहीं असें भविष्य वर्तविण्याचें कारण नाहीं. जीवमात्राचा हा निसर्गधर्मच आहे.

संस्कृतोत्पन्न नदी-ग्राम-पर्वतनामें

दमणपासून मुंबईपर्यंतच्या व समुद्रापासून सह्याद्रिपर्यंतच्या टापूंतील मांगेले, वारली, कोळी, ठाकर, कातवडी, वगैरेंच्या प्रांतांतील नद्या, डोंगर व गांवें ह्यांचीं नांवें पहातां तीं सर्व संस्कृतोत्पन्न आहेत. हीं नांवें वारली वगैरे लोकांनीं वसाहत करतांना दिलीं असावीं हें एक किंवा ब्राह्मणादि लोकांनीं दिलीं असावीं हें दुसरें. पैकीं वारल्यांच्या व डोंगरी कोळयांच्या प्रांतांत ब्राह्मण व मराठे यांची वसती सध्यां तर मुळींच नाहीं व पूर्वीहि थोडी देखील असेल असें म्हणवत नाहीं. औषधाला एखाद दुसरा ब्राह्मण किंवा मराठा ह्या प्रदेशांत प्राचीन काळीं असल्यास असेल. तेव्हां नद्या, डोंगर व गांवें ह्यांना संस्कृत नांवें मूळ दिलीं कोणी हा प्रश्न उद्भवतो. उदाहरणार्थ, कांहीं नांवें येथें देतों.

नद्यांचीं नांवें

१ दमणगंगा नदी
२ काळू नदी
३ वरोळी नदी
४ जोगणी नदी
५ गाउंडा नदी
६ बाणगंगा नदी
७ दूध नदी
८ वळई नदी
९ गोळझरी नदी
१० सूर्या नदी
११ घोघती नदी
१२ कबूर्की नदी
१३ वैतरणा नदी
१४ सर्वर नदी
१५ वांदरी नदी
१६ तानसा नदी
१७ देहर्जी नदी
१८ टांकी नदी
१९ दिंडी नदी
२० कामान नदी
२१ सुपरी नदी
२२ उल्हास नदी
२३ जोमदंरी नदी

ग्राम नामें

१ दमण (दामनीयकं)
२ उंबरगांव (उदुंबरग्राम)
३ फणसें (पनसीयं)
४ बोरीगांव (बदरीग्राम)
५ दाभळें (दर्भपल्लं)
६ शिरगांव (श्रीग्राम)

७ कुसुंबें (कौशांबी)
८ महुली (मधुपल्ली)
९ बौरी (भौरिकिविधं)
१० साकरी (शर्करीयं)
११ काशीळ (काशिलं)
१२ वाशीळ (वाशिलं)
१३ आर (अरीहणं)
१४ साकशी (सांकाश्यं)
१५ बळें (बल्यं)
१६ चुळें (चुल्यं)
१७ आनिक (आणकीयं)
१८ साकी (साखेयं)
१९ पळशी (पालाशिका)
२० इकटें (इक्कटिकं)
२१ जव्हार (यवसाहार प्रेक्षादिगण)
२२ पालें (पालेयं सख्यादिगण)
२३ सुपारें (सौपर्यं संकाशादिगण)
२४ नळें (नल्यं वलादिगण)
२५ दातिवरें (दात्तामित्रीयं)
२६ इडें पाडळें (इकडीयं उत्करादिगण)
२७ आंधेरी (अंधकगिरी)
२८ थळ (स्थल)
२९ दांडें (दंडं ऋश्यादिगण)
३० माळवणी (मल्लवनं)
३१ चिंचवळी (चिंचापल्ली)
३२ माहीम (मत्स्यमत्)
३३ तारापूर (तारापुरं)
३४ केळवें (कदलीवहं)
३५ वाघोली (व्याघ्रपल्ली)
३६ देवनरें (देवनगरं)
३७ धारदिवी (धारद्वीपिका)
३८ मोरवें (मयूरवहं)
३९ वानरें (वननरकं)
४० शिवरी (सीमापुरी, शिवपुरी, शाल्मलीपुरी)
४१ नौपाडा (नौपाटकः)
४२ तुळशी (तूलसीकं)
४३ मोगरें (मुद्गरकं)
४४ कोंडिवली (कुंडिनपल्ली)
४५ भुईगांव (भूग्राम)
४६ मरदेश (मरुदेश)
४७ राजोडी (राजवाटिका)
४८ कसराळें (कशेरुपल्लं)
४९ सैवन (सागवनं)
५० कामनदुर्ग (कामवनदुर्ग)
५१ नागली (नागपल्ली)
५२ कावेसर (कामेश्वर)
५३ दहीसर (दधीचेश्वर)
५४ धनसर (धनेश्वर)
५५ नागांव (नागग्राम)
५६ कुडें (कूटकं)
५७ गुहिरी (गुहागिरी)
५८ भोपोली (बाहुकपल्ली)
५९ वीरवाडी (वीरवाटिका)
६० सालवड (सालवाटकं)
६१ खंबाळें (स्कंभपल्लं)
६२ रानशेत (अरण्यक्षेत्रं)
६३ सोनाळें (सुवर्णपल्लं)

इत्यादि आणीक पांचशें गांवांची यादी देतां येईल. कान्हेरी हें डोंगराचें नांव कृष्णगिरि ह्या संस्कृत शब्दापासून निघालेलें सर्वांच्या परिचयाचें आहे. तात्पर्य नदी-नामें, ग्रामनामें व पर्वतनामें येथूनतेथून सर्व संस्कृत किंवा संस्कृतोत्पन्न प्राकृत आहेत. कांहीं ग्रामनामें जातिनामांवरून पडलीं आहेत तीं अशीं:—

१ माछीवाडा (मत्स्यकवाटः)
२ महारवाडा (महारवाटः)
३ मगरवाडा (मकरवाटः)
४ भिलाड (भिल्लवाटः)
५ किराट (किरातवाटः)
६ वारलीवाडा (वारुडकिवाटः)
७ ठाकरियापाडा (तस्करकपाटकः)
८ कर्कुट पाडा (कर्कुटपाटकः)
९ भोयपाडा (भौमपाटकः)
१० बर्बराचापाडा (बर्बरीयपाटकः)
११ मांगेलवाडा (मांगेलवाटः)
१२ कोळवाडा (कोलवाटः)
१३ नागपाडा (नागपाटकः)
१४ ब्रामणवाडी (ब्राह्मणवाटिका)
१५ आगरवाडी (आगरिकवाटिका)

हीं सर्व नांवें किंवा ह्यांपैकीं बहुतेक सर्व नांवें मांगेले, वारली, कोळी वगैरे संस्कृतोत्पन्न प्राकृत भाषा बोलणाऱ्या लोकांनीं मूलतः ठेविलीं असें म्हटल्याखेरीज दुसरी वाट नाहीं. सोपारें, वालुकेश्वर, ठाणें, कल्याण, दमण, वगैरे किंचित् अपभ्रष्ट किंवा पूर्णपणें संस्कृत नांवें वारली वगैरेंच्या नंतर आलेल्या नल, मौर्य, शिलाहार, दामनीय, इत्यादि पश्चात्क लोकांनीं यद्यपि दिलीं असण्याचा संभव आहे. तत्रापि बाकींचीं बहुतेक सर्व नांवें वारली वगैरे लोकांनीं दिलीं असावीं. सोपारें हें नांव शिलालेखांतून व ताम्रपटांतून शूर्पारक असें नमूद केलेलें आढळतें. परंतु सोपारें ह्या प्राकृत उच्चाराचा हा संस्कृत उद्धार आहे इतकेंच. मूळ नांव सौपर्यम्. सुपरि हा शब्द पाणिनीय संकाशादिगणांत नमूद आहे. तसेंच, शेवलसुपरि० (५-३-८४) ह्या पाणिनीय सूत्रांतहि पठित आहे. सुपरिणा निवृत्तं नगरं सौपर्यम्. सुपरि नामें कोणी एक व्यक्ति, त्यानें वसविलेलें जें नगर तें सौपर्यम्. सौपर्यम् चा अपभ्रंश सोंपरें, सोपारें, सुपारें. कश्याचा अपभ्रंश काय आहे हें न शोधिल्यामुळें सोपारें ह्या शब्दाचें संस्कृत शूर्पारक असें शिलालेख लिहिणाऱ्या व रचणाऱ्या अडाणी लोकांनीं व अर्धवट संस्कृतज्ञांनीं केलें. शूर्पार असा शब्द संस्कृत भाषेंत बिलकुल नाहीं. शूर्प असा शब्द आहे. परंतु अर किंवा आर प्रत्यय शूर्प शब्दाला कोठून लागला आणि कशा करतां लागला हें कोणीं पाहिलें नाहीं व अर्धवट संस्कृतज्ञ पहातहि नाहींत. प्राकृत ग्रामनामांचें असलें धेडगुजरी संस्करण अन्यत्रहि अनेक ठिकाणीं आढळतें. उदाहरणार्थ, जूर्णनगर (जुन्नर), शीर्णनगर (सिन्नर), विराटनगर (वाई), महिकावती (माहीम), इत्यादि.

वसाहतकार विविध लोक

दमण, नळें, मोरें, मोरकुरण, केरौली, आंधेरी, इत्यादि ग्रामनामांवरून दिसतें कीं आर्यांच्या किंवा आर्यसमांच्या पहिल्या वसाहती उत्तरकोंकणांत दामनीय, नल, मौर्य, कोरव्य, अंधक इत्यादि लोकांनीं केल्या. त्यांच्या अगोदर वारली, कोळी, ठाकर हे लोक कोंकणांत येऊन स्थिर झाले होते. नंतर बहुशः आंध्रभृत्यांच्या

कारकीर्दीच्या आगें मागें मांगेले आले. कातडीं पांघरणारे कातवडी सर्वांच्या आधीं येथें वसती करून आहेत. नागलोक कातवड्यांच्या नंतर व वारली, कोळी ह्यांच्या थोडे अगोदर कोंकणांत आले. ह्या सर्व लोकांची कालानुक्रमानें शेजवार परंपरा येणेंप्रमाणें लागेल. कालनिर्देशावांचून कोणताहि ऐतिहासिक प्रसंग हृत्पट्टि-केवर नीट बिंबत नाहीं. करतां अत्यन्त स्थूल मानानें ह्या लोकांच्या आगमनाचा अंदाजी काल देतों. तो शातवाहनांच्या पर्यंत फक्त अंदाजी आहे, नक्की नाहीं, हें लक्ष्यांत ठेवावें.

लोकनाम			अंदाजी काल
अतिप्राचीन लोक	गुहाशय		स्वयंभू शकपूर्व २००० च्या पूर्वी
	कातवडी		
मध्यप्राचीन लोक	नाग	वारली, कोळी, ठाकर	शकपूर्व २०००–१०००
	वारली		
	कोळी		
	ठाकर		
अव्यवहित प्राचीन ऊर्फ पाणिनिकालीन व बौद्धकालीन लोक	दामनीय		शकपूर्व ९००-३००
	महाराष्ट्रिक		
	शातवाहन		शकपूर्व ३००-शकोत्तर २००
	आंध्र		
	मांगेले		
	नल		शकोत्तर २०० – ४००
	मौर्य		
जुने मराठे	त्रैकूटक		शकोत्तर ३००–५००
	शिलाहार		शकोत्तर ७००–११००
	चालुक्य		शकोत्तर ५००–११००
	राष्ट्रकूट		
	चालुक्य	बिंब व यादव	शकोत्तर १०६०–११६३
	बिंब		
	व		
	यादव		
	नागरशादि राजे		शकोत्तर ११६३–१२७०
	प्रताप बिंब यादव		शकोत्तर १२१६–१२५४
मुसुलमान	दिल्लीचे मुसुलमान		शकोत्तर १२७०–१३६०
	अमदाबादकर सुलतान		शकोत्तर १३६३–१४६०

युरोपियन	पोर्तुगीज	शकोत्तर १४२२-१४३४-१४६०
नवे ऊर्फ अर्वाचीन मराठे	मराठे	शकोत्तर १६६०-१७२५
युरोपियन	इंग्रज	शकोत्तर १७२५-१८४६

कातवडी हे शकपूर्व पांच सहा हजार वर्षांपासून आजपर्यंत येथें स्वयंभू आहेत. नाग, वारली, कोळी व ठाकर शकपूर्व दोन हजार पासून पाणिनिकालापर्यंत हें रान धरून आहेत. शकपूर्व नऊशें पासून शकोत्तर चारशें पर्यंत म्हणजे पाणिनीय व बौद्ध कालाच्या ऱ्हासापर्यंत दामनीय, माहाराष्ट्रिक, आंध्र, मांगेले, नल व मौर्य कोंकणांत शिरले. शक चारशेंपासून त्रैकूटक, शिलाहार, चालुक्य, राष्ट्रकूट, यादव, बिंब, नागरशादि राजे, वगैरे जुन्या मराठ्यांनीं शक बाराशें सत्तर पर्यंत आठशें सत्तर वर्षें राज्य केलें. मुसुलमानांचा अंमल शक बाराशें सत्तरपासून शक चौदाशें साठ पर्यंतची दोनशें वर्षें होता. नंतर दोनशें वर्षें पोर्तुगीजांनीं हा प्रांत आक्रमण केला. तदनंतर नव्या मराठ्यांनीं साठ वर्षें स्वराज्य भोगिलें. आणि अलीकडे सवाशें वर्षें इंग्रजांच्या पंजाखालीं उत्तर कोंकण आहे. मुसुलमानांचीं दोनशें वर्षें, पोर्तुगीजांची दोनशें वर्षें व इंग्रजांचीं सवाशें वर्षें मिळून पांच सवापांचशें वर्षें कोंकण परकीय अंमलाखालीं खितपत पडलें आहे. जुन्या व नव्या मराठ्यांच्या ताब्यांत उत्तर कोंकण साडे नऊशें वर्षें होतें. आणि शातवाहननलमौर्यादींच्या अंमलाखालीं तेराशें वर्षें होतें. मिळून साडेबावीसशें वर्षें उत्तर कोंकण हिंदूंच्या अंमलाखालीं होतें व सवापांचशें वर्षें अहिंदूंच्या अंमलाखालीं आहे. कातवड्यांना नागांनीं व वारल्यांनीं रेटलें, नागांना आंध्र मौर्य व महाराष्ट्रिक यांनीं जिंकलें, ह्यांची जागा शिलाहार, चालुक्य, राष्ट्रकूट व यादव ह्यांनीं घेतली, ह्यांच्या उरावर मुसुलमान बसले, मुसुलमानांना पोर्तुगीजांनीं उखाडलें. पोर्तुगीजांना मराठ्यांनीं टांग मारली व मराठ्यांना इंग्रजांनीं खो दिला. हा खेळ गेल्या तीन हजार वर्षें चालला. येथें असा प्रश्न उद्भवतो कीं नवे नवे सत्ताधीश पूर्व पूर्व सत्ताधीशांची उचलबांगडी करीत असतां, कातवडी, नाग, महाराष्ट्रिक, जुने मराठे, मुसुलमान, पोर्तुगीज अस्सल, व बाटे, नवे मराठे, हे कोंकणांत कायमची वसती करून राहिलेले लोक निमूटपणें नव्या सत्तेला कितपत राजी होत गेले व नव्या सत्तेला कितपत प्रतिरोध करते झाले? ह्या भानगडीच्या प्रश्नाचें स्थूल उत्तर थोडेंबहुत देण्याचा प्रयत्न प्रस्तुत प्रकरणाला व इतिहासाभ्यासाला उपकारक म्हणून केला असतां वावगें होणार नाहीं.

शकपूर्व दोन हजार वर्षांपूर्वी किती हजार वर्षें कातवडी उत्तर कोंकणांत आहेत त्याचा अंदाज होत नाहीं. हे लोक कधींहि मच्छीमार नाहींत, नव्हते व समुद्रकिनाऱ्याच्या बाऱ्यासहि हे कधीं उभे राहिले नाहींत. ह्यांची वसती सह्याद्रीच्या

रानांत. ह्यांच्या समकालीं समुद्रावर कोण लोक होते तें कळण्यास मार्ग नाहीं. मिसरी व असुर लोकांशीं भरतखंडाचा व्यापार त्यावेळीं म्हणजे शकपूर्व दोन हजार वर्षांपूर्वीं जर कोंकणच्या किनाऱ्यावरील बंदरांच्या द्वारा होत असेल, तर एवढें मात्र निश्चित कीं दमणपासून मुंबई-चेऊल पर्यंतच्या वर्तमान बंदरांपैकीं एकहि बंदर व्यापारी पेठेच्या पदवीस त्याकालीं पोहोंचल्याचा संशयसुद्धां घेण्यास जागा नाहीं, दमण, सोपारें, वसई, घोडबंदर, ठाणें, कल्याण, हीं बंदरें त्या प्राचीन कालानंतर दोन हजार वर्षांनीं इतिहासप्रांतांत डोकावूं लागलीं. सह्याद्रीच्या माऱ्यांवर कातवडी वसती करून असतांना समान्तर समुद्रकिनाऱ्यावर व सह्याद्रीच्या तळरानांत मनुष्याची हालचाल प्रायः नसावी असा अंदाज आहे. परंतु सह्याद्रीच्या शिखरांखालील कपाऱ्यांत व गुहांत प्राचीन गुहाशय माणसांची तुरळक वसती कातवड्यांच्या माऱ्यांच्या वरल्या भागास असावी. माऱ्यांवर कातवडी व डोंगरकपारींत व गुहांत गुहाशय, असा प्रकार कित्येक हजार वर्षें चालला असावा. गुहाशयांहून कातवडी जास्त सुधारलेला. कातवडी कातडीं तरी पांघरी. गुहाशयांना तीहि कला अवगत नव्हती. सध्यां जीं बुद्धांचीं लेणीं सह्याद्रीच्या शिखरांखालीं खोदलेलीं दिसतात तीं गुहाशयांच्या मूळच्या ओबडधोबड स्वभावसिद्ध कपाऱ्यांच्या व गुहांच्या सुधारलेल्या आवृत्त्या आहेत. नागड्या गुहाशयांचा व कातडीं पांघरणाऱ्या कातवड्यांचा कित्येक शतकें शेजार होऊन शेवटीं कातवडी शिलक राहिला. सह्याद्रींत दोघांनाहि विपुल अन्न होतें. एकानें दुसऱ्यास ठार केलेंच पाहिजे असा प्रकार नव्हता. गुहाशय निर्वंश झाल्यावर कातवड्याच्या शेजाराला नाग, वारली, कोळी व ठाकर लोक आले. त्यांनाहि रानांत व किनाऱ्यावर मुबलक अन्न मिळण्यासारखें होतें. तेव्हां कातवड्यांच्या व नागादींच्या लढाया वैगेरे न होतां नागादींनाहि ह्या प्रदेशांत बिगर अडथळा रहातां येऊं लागलें. नंतर आंध्र, मांगेले व माहाराष्ट्रिक आले. त्यांनाहि येथें विपुल अन्न सांपडलें व तेहि ह्या प्रांतांत गुण्यागोविंदानें नांदूं लागले. पुढें चालुक्यादि जुने मराठे आले. तेहि ह्या देशांत समावले. कालान्तरानें मुसुलमान व पोर्तुगीज कोंकणांत शिरले व तेहि सुखानें पोट भरून येथें आहेत. जो जो म्हणून येथें येतो तो तो सुखासमाधानानें देशांत कायमचा बिनबोभाट समावला जातो. ह्याचा अर्थ इतकाच कीं, ह्या देशांत उद्भिज्ज व प्राणिज संपत्ति ऊर्फ अन्न इतकें मुबलक आहे कीं येईल त्याला येथें रहाण्यास यथेच्छ वाव आहे.

मुबलक अन्न व यथेच्छ जागा यांचा सामाजिक परिणाम

मुबलक अन्न व यथेच्छ जागा असल्यामुळें, कोंकणांत जीवनार्थ कलह युरोपांतील किंवा मध्यआशियांतील भुकेबंगाल देशांतल्याप्रमाणें जाज्वल्य नाहीं. संपन्नतेनें आपला वरद हस्त एकट्या कोंकणावरच ठेविला असें समजूं नये. भरतखंड म्हणून

ज्या खंड़ाला म्हणतात त्या बहुतेक सर्व खंडावर अन्नपूर्णेची अशीच पूर्ण कृपादृष्टि आहे. ह्या कृपादृष्टीचा परिणाम येथें रहावयास आलेल्या कायमच्या सर्व लोकांच्या स्वभावांत दृष्टीस पडतो.

वाटेल त्यानें येथें यावें व थोडीशी खडबड व गडबड करून आपल्याला हवी तशी व मिळेल तशी जागा करून घ्यावी. काळजी एवढीच घ्यावी कीं, दुसऱ्याला आपल्यापासून तोशिस पोहोचूं नये. एखादा रानटी मोगल किंवा हापापलेला युरोपीयन प्रथम प्रथम बेवकूबपणें मारामाऱ्या व रक्तपात करतो. परंतु वस्तुस्थिति ध्यानांत व अनुभवांत आल्यावर तोहि आस्तेआस्ते निवळत जातो व इतरांच्या प्रमाणेंच सालस, निरुपद्रवी व पाहुणचारी बनतो. तात्पर्य, हिंदुस्थानांत माणसाचा स्वभाव अन्नसंपत्तीच्या मुबलक व सहजलभ्य पुरवठ्यामुळें मुक्तद्वारी बनतो. पहिली भीड चेपेतोंपर्यंत काय घासाघीस होईल तेवढीच. तदनंतर दोन्ही समाज शेजारधर्मानें परंतु तुटकपणें रहातात. तुटकपणाचा हा कल समाजापुरताच न थांबून समाजांतील कुटुंबांना व व्यक्तींनाहि पछाडतो. कारण समाजाला जसें अन्न अल्पश्रमानें मिळूं शकतें तसेंच कुटुंबांना व व्यक्तींनाहि तें तितक्याच किंवा त्याहूनहि अल्पतर श्रमानें मिळतें. अन्नाच्या सहज-लभ्यतेमुळें अन्योन्यावलंबित्व बहुतेक नसल्यासारखें होऊन, सर्व देश पृथक् पृथक् व अन्योन्यस्वतंत्र अशया व्यक्तींचा बनून जातो. व्यक्तिस्वातंत्र्याचा अत्यन्त अतिरेक झालेला जर कोठें पहावयाचा असेल, तर तो हिंदुस्थानांत पहावा. हिंदुस्थानांत शेकडों खेडेगांवें अशीं आहेत कीं त्यांतील बहुतेक सर्व गरजा गांवांतल्या गांवांत भागल्या जातात. तेल, मीठ, बोंबील, गूळ व कपडा ह्यांची बेगमी जवळच्या जत्रेंत करून ठेविली म्हणजे खेड्यांतल्या कुटुंबाला सगळें जग वर्षभर धाब्यावर बसवितां येतें.

सरकार संस्थेबद्दल उदासीनता

येणेंप्रमाणें अन्नाच्या वैपुल्यानें हिंदुस्थानांतील माणसांचा स्वभाव जसा मुक्त-द्वारी बनतो तसाच अन्नाच्या सौलभ्यानें तो तुटक निपजतो. दुसऱ्याची विशेष पर्वा बाळगण्याची अपेक्षा रहात नाहीं. मुक्तद्वार पडल्यामुळें देशांत चाहेल त्यानें शिरावें आणि स्वभावांत तुटकपणा असल्यामुळें जुटीच्या अभावीं आगंतुक परकीयाला कमींत कमी अडथळा व्हावा, असा ह्या देशांतला मनुष्यस्वभाव आहे. पुढें वाढून ठेविलेलें सुग्रास अन्न टाका आणि परकीय बाह्याला शत्रू समजून त्याशीं लढण्यांत कदाचित् प्राण वेचा, हा खुळचट धंदा हिंदुस्थानांतला शहाणा माणूस सहजच करीत नसे. अशा स्थितींत पृथ्वीवरील कोणीहि माणूस असेंच आचरण करता. भारतबाह्य परकीयांना प्राण वेंचून अन्न मिळवावयाचें असे. भारतीयांना प्राण वेंचून हातचें अन्न गमवावयाचें असे. विपुल अन्न आणि सुलभ अन्न हाताशीं तयार असल्यामुळें, हिंदुस्थानांतील माणसाला पोलिसाची म्हणजे सरकार म्हणून ज्या संस्थेला संज्ञा आहे त्या संस्थेची अडगळ

फारच थोडी खपे. श्वापदांपासून व चोरचिलटांपासून अन्नाचें संरक्षण करण्याला महार व कुत्रा असला म्हणजे हिंदू गांवाचें काम भागे. पंचायत, महार व कुत्रा ह्याहून जास्त भानगडीचें, भव्य किंवा भयंकर सरकार हिंदू ग्रामसंस्थेला नको असे. गेल्या तीन हजार वर्षांत हिंदुस्थानांत जीं देशी व परदेशी सरकारें होऊन गेलीं तीं सर्व एका प्रकारच्या पोटबाबू चोरांचीं झालीं व सरकार म्हणजे एक उपटसुंभ चोरांची टोळी आहे, अशी हिंदूगांवकऱ्याची अंतस्थ प्रामाणिक समजूत असे. त्यामुळें सरकारच्या बऱ्यावाईटाकडे हिंदू गांवकरी स्वतः होऊन बिलकुल लक्ष्य देत नसे. जुनें सरकार मोडो किंवा नवीन सरकार जुडो, त्याचें सुखदुःख गांवकऱ्याला तितपतच असे. अपरिहार्य आपत्ति म्हणून सरकार नांवाच्या चोराचें देणें एकदां कसें तरी देऊन टाकलें म्हणजे वर्षभर पीडा चुकली, इतपत प्रेम सरकार नांवाच्या संस्थेवर गांवकऱ्याचें असे. ह्या भावनेचा असा परिणाम झाला कीं शातवाहन, जुने मराठे, मुसुलमान व पोर्तुगीज इत्यादि सरकारांचें जन्म व मृत्यू हिंदू गांवकऱ्यांनीं होतील तसे होऊन दिले. त्यांच्या भानगडींत आपण होऊन ते कधीं पडले नाहींत. जुन्या सरकाराच्या मृत्यूबद्दल गांवकरी कितपत रडले व नव्या सरकाराच्या जन्माबद्दल गांवकरी कितपत हसले, ह्या प्रश्नाची ऐतिहासिक व मानसिक विवेचना ही असल्या मासल्याची आहे. हिंदू गांवकऱ्याची सृष्टिसिद्ध, परिस्थितिसिद्ध व अन्नसिद्ध मनोरचना इतकी मुक्तद्वारी, तुटक व स्वयंपूर्ण बनलेली असे कीं देशी किंवा परदेशी कोणतेंच सरकार त्याला मनापासून नको असे.

राज्यांच्या घडामोडीशीं साधारण लोक उदासीन

सरकार नांवाच्या कृत्रिम, उपटसुंभ, चोरट्या व जुलमी संस्थेसंबंधानें गांवकरी जर इतका पराकाष्ठेचा उदासीन असे, तर असा प्रश्न उत्पन्न होतो कीं, येणारें नवें सरकार व जाणारें जुनें सरकार ह्यांच्या मधील युद्धें, तंटे, मारामाऱ्या व झटापटी कोण खेळे ? हिंदुस्थानचा राजकीय इतिहास ऊर्फ सरकारांचा इतिहास तर अथपासून इतिपर्यंत मारामाऱ्यांनीं तुडुंब भरलेला आहे. ह्या मारामाऱ्या कोण करी ? मृत सरकाराबद्दल कोण रडे ? आणि नव्या सरकाराची जयंती कोण करी ? ह्या प्रश्नाचें उत्तर असें आहे कीं, ज्या मूठभर उपटसुंभांनीं सरकार स्थापिलें ते मूठभर लोक जुन्या सरकाराच्या वतीनें नव्या सरकाराशीं झुंजत, तंडत व पराभूत झाले असतां रडत आणि विजयी झाले असतां खिदळत. हिंदुस्थानांत सरकार ही संस्था सदा कांहीं अत्यल्पसंख्याकांची असे, सार्वलौकिक कधींहि नसे. एवढें मोठें मोंगलांचें साम्राज्य; परंतु त्यांतील मुख्य घटकावयवांची संख्या राजघराण्यांतील पुरुषांच्या संख्येहून म्हणजे पांच पंचवीस राजपुरुषांहून जास्त नसे, कमाल ओढाताण केली तर साम्राज्यांतील मुलकी व लष्करी सुभे व नायबसुभे मिळून दीड दोन हजारांहून जास्त नसे. हे दीड दोन हजार लोक

मोंगल साम्राज्याकरितां लढत, तंडत, मरत व रडत. बाकीच्या कोट्यवधि हिंदवासीयांना मोंगल, मराठा, पोर्तुगीज इत्यादि सर्व एकाच दर्जाचे चोर भासत. तात्पर्य, हिंदुस्थानांत होऊन गेलेलीं सर्व सरकारें मूठभर अल्पसंख्याकांची आहेत व ह्या मूठभर अल्पसंख्याकांचें सरकार त्यांच्याच सारख्या इतर मूठभर परंतु समबल किंवा वरचढबल अल्पसंख्याक सरकाराच्या ऊर्फ टोळीच्या हातून नाश पावतें. त्यांत गांवकऱ्याचा हात शपथेला सुद्धां नसतो.

शिवाजीचा आग्ऱ्यास दरबारांत प्रवेश व त्याचें इंगित

एतत्संबंधानें अनेक ऐतिहासिक उदाहरणांतून एक अत्यंत ठळक असें उदाहरण येथें नमूद करतों व तें मराठ्यांच्या इतिहासांतलें घेतों. शिवकालीं मराठे व मुसुलमान ह्यांच्यामध्यें घनघोर झगडा सुरू होता, अशी भाषा वापरलेली सामान्य इतिहासांतून आढळते. त्या भाषेंत कितपत तथ्य आहे तें पाहूं. शिवाजीच्या बाजूला एकोन एक सर्व मराठे होते असें म्हणतां येत नाहीं. महाराष्ट्रांतील सर्व मराठ्यांपैकीं शेंकडा नव्वद मराठे अवरंगझेबाचे प्रजाजन होते व त्यापैकीं कांहीं त्याचे सैनिक होते. मुसुलमानांपैकीं शेंकडों लोक शिवाजीचे प्रजाजन होते व कांहीं त्याच्या सैन्यांत होते. तेव्हां शिवाजी व अवरंगझेब यांच्यांत जीं युद्धें झालीं त्यांना मराठे व मुसुलमान ह्या दोन लोकांमधील युद्धें म्हणणें इतिहासाला धरून नाहीं. हीं लोकांलोकांमधील युद्धें नव्हतीं. हीं दोन्हीं बाजूच्या अल्पसंख्याक राज्यकर्त्यांचीं म्हणजे सरकारांचीं युद्धें होतीं. सामान्य गांवकरी ह्या दोघांहिकडे ढुंकून सुद्धां पहात नसे. तो केवळ उदासीन असल्यामुळें त्याचीं संमतीं घेण्याचा किंवा त्याचें औदासीन्य घालविण्याचा किंवा त्याला शिक्षण देण्याचा किंवा त्याला राजकीय उपदेश पाजण्याचा खटाटोप करण्याची जरूर नव्हती. त्याला सरकारें बनविण्याची गरज भासत नसल्यामुळें, कोणत्याहि पक्षाच्या वतीनें युद्धाच्या नाटकांत तो सोंग घेईल ही आशाच करावयाला नको होती. ही बाब शिवाजी व औरंगझेब दोघेहि जाणून होते. भाषा मात्र दोघेहि अघळपघळ वापरीत. धर्माकरितां, देशाकरितां, लोककल्याणाकरितां लढावयाचें व शत्रूचा निःपात करावयाचा अशी भाषा दोघेहि योजीत. त्या भाषेंतील तथ्य एवढेंच असें कीं शिवाजी ह्या व्यक्तीला ठार करण्यास औरंगझेब प्रयत्न करी व औरंगझेब ह्या व्यक्तीचा प्राण घेण्याकरितां शिवाजी टपून बसे. पुढाऱ्याची उत्सवमूर्ति व तिचे हजार पांचशें प्रमुख सरदार उडविले म्हणजे दौलत गारत झाली, ही बाब दोघेहि जाणून होते.

एकमेकांचा प्राण घेण्याचे दोघांचे असे डांवपेंच चालले असतां, शिवाजीच्या मनांत अवरंगझेबाला उडविण्याची व पातशाही काबीज करण्याची एक अचाट परंतु सर्वथा व्यवहार्य कल्पना आली. अवरंगझेब स्वतः जातीनें दक्षिणेस चार वर्षें आला

नव्हता व पुढेंहि कित्येक वर्षें येण्याचा संभव नव्हता. अवरंगझेबाला उचलावयाचें म्हणजे तो स्वतः दक्षिणेंत आला पाहिजे किंवा शिवाजीनें तरी उत्तरेस आग्र्याला गेलें पाहिजे. पहिला मार्ग नाहीं; तर शिवाजीनें दुसरा मार्ग पतकरिला. कस तरी करून खुद्द आग्र्यास जावयाचें व तेथें अवरंगझेबाचा म्हणजे त्याच्या पातशाहीचा कबजा घ्यावयाचा असा बेत शिवाजीनें केला आणि तो बेत अत्यन्त शिताफीनें अमलांत येण्याच्या मार्गास लाविला. शाहिस्तेखानादि अनेक मुसुलमान सरदारांना खडे चारणारा शिवाजी जयसिंगापुढें दातीं तृण धरून केवळ गाय झाला. इतका गाय झाला कीं जयसिंग सांगेल तें करण्यास तो राजी झाला. जयसिंग तोंडांतून शब्द काढण्याचा अवकाश कीं शिवाजीनें त्याप्रमाणें केलेंच म्हणून समजावें. किल्ले द्या म्हटल्याबरोबर जयसिंगाच्या स्वाधीन शिवाजीनें किल्ले केले. हात बाधून भेटावयाला या म्हटल्याबरोबर शिवाजी बंदा गुलाम म्हणून जयसिंगाच्या तंबूंत गेला. भिकार पंचहजारी व्हा म्हटल्याबरोबर सगळ्या जगाला पालाण घालणारा तो महावीर क्षुद्र पातशाही सरदार बनला. आणि आग्र्यास चला म्हटल्याबरोबर पातशाहाला आदबीनें कुरनीस करण्याकरतां, शिवाजी आग्र्यास निघाला. जयसिंगानें हा शेवटला हुकूम करावा व तो आपण क्षणाचाहि विलंब न लावतां ताबडतोब अमलांत आणावा ह्याच पर्वणीची वाट शिवाजी चातकाप्रमाणें पहात होता.

अवरंगझेबाची प्रत्यक्ष व समक्षासमक्ष भेट होण्याचा व भेटीच्या प्रसंगीं पातशाहत व पातशाहा गारत करण्याचा हा कधीं न येणारा कपिलाषष्ठीचा योग शिवाजीनें लग्नमुहूर्ताप्रमाणें उत्सुकतेनें साधिला. अवरंगझेबाच्या खुद्द मामाचीं बोटें छाटणारा व मामाच्या पोराचा जीव घेणारा शिवाजी पातशाहाला कुर्निसा करावयाला निघालेला पाहून संन्यास घेतलेल्या लांडग्याची आठवण जयसिंगाला व्हावयाला हवी होती. परंतु, तसा कांहींएक प्रकार न होतां खुळ्या जयसिंगाला आपण बडी पातशाही कामगिरी बजावीत आहों अशी फुशारकी वाटली. हेंच शिवाजीला हवें होतें. शिवाजीनें लीनतेचें सोंग इतकें कांहीं बेमालूम आणिलें कीं शिवाजीला आपण नरम केला अश्या वल्गना जयसिंग बडबडूं लागला. दिल्लीन्द्राचें पद पटकविण्याची ईर्ष्या शिवाजी आजन्म बाळगीत होता, हें हिंदुस्थानांतील मुत्सद्दी जाणत होते व जयसिंगाच्याहि कानावर गेलें नव्हतें असें नव्हतें. " शिवप्रभृतिभूपालाः दिल्लीन्द्रपदलिप्सवः " असें शिवाजीचें वर्णन जयसिंगाचा प्रशस्तिकार करण्याइतकी जगजाहीर ही आकांक्षा झाली होती. तत्रापि शिवाजीची हड्डी आपण मोकळी केली अशी फुशारकी जयसिंग मारीतच होता व स्वतःच्या मामाचा हात तोडणाऱ्या व मामाच्या मुलाचा वध करणाऱ्या आततायाची भेट घेण्यास अवरंगझेब सिद्ध झाला होता. जन्मभेवर फुंकर घालणाऱ्या शिवाजीनें अवरंगझेबाला ही जी मुरळ पाडली ती पाहून तत्कालीन शहाण्यांनीं तोंडांत बोटें घातलीं असतील ह्यांत संशय नाहीं.

सरकारी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलांक.
क्रमांक ... . दि: ....
महाराष्ट्र व उत्तरकोंकणची वसाहत ..... नों: दि: .....१५५....

शिवाजी अवरंगझेबाला स्नेहालिंगन देण्यास कडेकोट बंदोबस्त करून निघाला. बरोबर हजार-पांचशें करोल व जातिवंत सरदार जीवाचे जीवलग व छातीचे निधडे असे त्यानें घेतले आणि मजल दरमजल दहा-दहा पांच-पांच माणसें ठेवीत ठेवीत आग्र्यांतील व्याघ्राच्या गुहेंत सरज्यानें प्रवेश केला. प्रथम भेटीच्या प्रसंगीं कुरनीस करण्याच्या वेळीं पातशाहाची व आपली जी लगट होईल त्या लगटींत सिंहासनावर उडी मारून पातशाहाचा निकाल लावावा आणि दरबारांत जमा झालेल्या उमरावांची कत्तल करून तेथल्या तेथें हिंदुपदपातशाहीची स्थापना करावी आणि सरहद्दीवर जय्यत ठेविलेल्या सैन्याच्या जोरावर व धाकावर ती पातशाही स्थिर करावी असा शिवाजीचा बूट होता. चंद्रराव, अफजलखान, शाहिस्तेखान, इत्यादींचा फडशा शिवाजीनें असाच पाडला होता. तेंच दूरदृष्टिमिश्रित अघटित साहस ह्या प्रसंगीं फलद्रूपतेस आणण्याचा शिवाजीचा आशय होता. परंतु शिवाजीच्या बारश्यास जेवलेल्या अवरंगझेबाला त्याचें दैव थोर म्हणून दरबारांत शिवाजीला आपल्यापासून शंभर हात दूर उभे करण्याची बुद्धि आयत्यावेळीं झाली म्हणून निभावलें; नाहीं पक्षीं, चकत्यांच्या पातशाहीचा रामेबोलो त्याच समयीं होण्याचा प्रसंग बहुतेक ठेवल्यासारखाच होता. खुद्द पातशाहा व त्याचे हजार पाचशें सरदार उडविल्यावर, मुक्तद्वारीं, तुटक व सुखाची भाकर खाण्यास चटकलेले हिंदू-मुसुलमान प्रजाजन शिवाजीची पातशाहात निमूटपणें बिनतक्रार चालूं देते, ही खूणगांठ शिवाजीनें पक्की बांधून ठेविलेली होती.

तात्पर्य, राज्ययंत्राच्या व राज्यकर्त्यांच्या बऱ्या वाईटाकडे विपुल व सुलभ अन्न मिळणाऱ्या हिंदवासीयांचें बिलकुल लक्ष्य नसे. उघडच झालें कीं ह्या देशांत ज्याला राज्य आक्रमण करावयाचें असे त्याला तें मिळविण्यासाठीं सामान्य लोकांची मनधरणी करण्याची जरूर पडत नसे, राज्ययंत्रचालकांच्या लहान कंपूची वासलात लाविल्यानें त्याचें काम बेश साधे.

समाजशैथिल्य

सामान्य लोक राज्ययंत्राकडे बिलकुल लक्ष्य कां देत नसत ह्या बाबीची ही अशी मीमांसा आहे. अन्नवैपुल्य व अन्नसौलभ्य हें ह्या उदासीन वृत्तीचें कारण असे. ही उदासीन वृत्ति व हा तुटकपणा जसा राजकारणक्षेत्रांत भासमान होई, तसाच तो समाज, वेदान्त, धर्म, भक्ति, संसार, सारस्वत, व्यापार व देव इत्यादि क्षेत्रांतहि वावरतांना आढळे. जातिसंस्था व वर्णसंस्था ह्या देशांत मूळ उत्पन्न होण्याचीं जीं अनेक कारणें आहेत, त्यांत अन्नवैपुल्यांचें व अन्नसौलभ्याचें कारण बरेंच प्रमुख आहे. प्रत्येक जातीनें आपापलें अन्न आपापला धंदा करून तुटकपणें सुखानें खावें. प्रत्येक माणसानें आपापला पृथक् देव करून खुशाल तदेकभक्त व्हावें.

प्रत्येक माणसानें समाजापासून विलग होऊन सन्यस्त होण्यांत परम पुरुषार्थ मानावा, इत्यादि सर्व स्थानीं उदासीन वृत्तीचा पाया भक्कम रोविलेला दिसे. उदासीन, संन्यस्त, तुटक, मुक्तद्वारी अश्या व्यक्तींनीं जर हा देश व्यापिलेला असे, तर ह्या सर्व व्यक्ती मिळून समाज म्हणून ज्या संस्थेस नांव आहे ती संस्था कितपत बने ? समाज हें नांव हिंदुस्थानांतील व उत्तरकोंकणांतील तत्कालीन लोकांना कितपत लागू पडे ? तत्कालीन हिंदी लोक एक भरींव समाज होते काय ?

ह्या प्रश्नाला उत्तर द्यावयाचें म्हणजे समाज ह्या अर्थाची व्याख्या सांगितली पाहिजे. कांहीं एका अर्थाच्या सिद्धयर्थ अन्योन्योपकारक व्यक्तींचा जो सहकारी समवाय तो समाज. अशी व्याख्या केल्यास, उत्तरकोंकणांतील तत्कालीन मनुष्य-समूहाची समाजत्वासंबंधानें परीक्षा करण्यास सोपें जाईल. तत्कालीन म्हणजे शालिवाहन शकाच्या सोळाव्या शतकापर्यंतचा जो काल त्या काळांतील, असा अर्थ विवेचनसुखार्थ घेऊं. त्याकालीं उत्तर कोंकणांत वन्य, यहुदी, मुसुलमान, खिस्ती, पारशी, अंत्यज, शूद्र, वैश्य, क्षात्रिय व ब्राह्मण असे दहा प्रकारचे लोक कायमची वस्ती करून असत. देवधर्मदृष्ट्या पाहिलें तर वन्य, यहुदी, मुस्लीम, खिस्ती, पारशी व हिंदू असे सहा गट असत. ह्या सहा गटांत हिंदूंची संख्या अधिकतम असे. हे सहाहि गट अन्योन्योपकारक म्हणण्यापेक्षां अन्योन्यापकारक जरी नव्हत तरी अनेक बाबतींत अन्योन्योदासीन असत. एका बाबींत मात्र, हे सहाहि गट अन्योन्योपकारक होते असें म्हणतां येण्यासारखें आहे. ती बाब म्हणजे दोनप्रहरच्या अन्नाची. सहाही गट परस्परांत कोणत्या नाहीं कोणत्या तरी रूपानें अन्नविनिमय करीत. कातकरी करवंदें, तोरणें व फाटीं विकी; यहुदी तेल पुरवी; मुसुलमान आफ्रिका, मलबार व अरबस्थान ह्या देशांत भाताची वगैरे ने-आण करी; खिस्ती-बाट्या शेती पिकवी; आणि पारशी आधेंमधें कोठें तरी लुडबुड करून दैन्यवाणें पोट भरी.

अहिंदूंपैकीं बाकी राहिला यूरोपीयन खिस्ती जो पोर्तुगीज तो. त्याचें एकच एक काम राज्ययंत्र हाकून अन्नशोषण करण्याचें. हिंदूंना किंवा अहिंदूंना पोर्तुगीजाच्या राज्ययंत्राची बिलकुल जरूर नसे. त्याच्या यंत्राखेरीज ते आपला बचाव व संरक्षण महार व कुत्रा ह्यांच्याद्वारा चोरांचिलटांपासून व पशूंपाखरांपासून करण्यास पूर्ण समर्थ होते. पोर्तुगीजांच्या धाडीपासून मात्र बचाव करण्याचें मानस त्यांच्या ठाई नव्हतें. कारण हिंदू व अहिंदू असे सर्व लोक मुक्तद्वारी, तुटक व उदासीन असत. करतां, स्वतःच्या धाडीपासून हिंदूंचा व अहिंदूंचा बचाव करण्याकरितां पोर्तुगीज लोक जबरदस्तीनें राजयंत्र चालवीत, म्हणजे दुसरें तिसरें कांहींएक करीत नसत, करांच्या रूपानें लोकांपासून अन्न व पैसा उकळीत, अथवा स्पष्ट सांगावयाचें म्हणजे हिंदू व अहिंदू ह्यांच्या कष्टावर चरत. परोपजीवी अश्या ह्या पोर्तुगीजांचा वर्ग सोडला, म्हणजे बाकी राहिलेले सर्व अन्नोत्पादनाच्या बाबतींत एकमेकांचें साह्य्य

करीत. तात्पर्य, फक्त अन्नोत्पादनाच्या दृष्टीनें कोंकणांतील ह्या दहाहि सहकारी जातींना एकसमाज म्हटलें असतां चालण्याजोगें आहे. इतर सर्व दृष्टींनीं प्रजोत्पादन, विद्योत्पादन, मोक्षोत्पादन, वगैरे इतर व्यवसायांत हे गट स्वयंस्फूर्तीनें अन्योन्यसाहाय्य करीत नसत, अथवा खरें म्हटलें असतां करण्याच्या स्थितींत नसत.

एकजीव समाज निर्माण न होण्याचीं कारणें देव, वंश व जाति

कातवडी, यहुदी, मुसुलमान, पारशी, खिस्ती व हिंदू हे सर्व गट आचारानें, व्यवहारानें, प्रायश्चित्तानें, विद्येनें, देवधर्मानें, अथवा संकलित भाषेनें बोलावयाचें म्हणजे संस्कृतीनें इतके कांहीं विसदृश होते कीं ह्या सर्वांचा थोड्या काळांत म्हणजे हजार दोन हजार वर्षांत एकजीव होणें अशक्यांतलें होतें. कातवडी जेव्हां सह्याद्रीच्या माच्यांवर एकटाच रहिवासी होता तेव्हां तो त्या वनींचा एकमेव अद्वितीय राजा होता. पुढें कोळी, वारली, ठाकर, मांगेले वगैरे जास्त सुधारलेले लोक आले. ते आचारादींनीं भिन्न पडल्यामुळें कातवड्यांत शरीरसंबंधानें मिसळून गेले नाहींत, अगदीं पृथक् राहिले. म्हणजे महाराष्ट्रिकादि चातुर्वर्णी लोक उत्तरकोंकणांत येण्यापूर्वीच येथें अन्योन्यशरीरसंबंधव्यावृत्त अश्या जाती निर्माण होऊन गेल्या. नाग लोक आले त्यांत क्षत्रिय नाग व महार नाग अश्या दोन जाती होत्या. नंतर महाराष्ट्रिक आले. त्यांच्यांत चातुर्वर्ण्य असून, शिवाय सुतार, लोहार इत्यादि जाती होत्या. यहुदी व पारशी आले. त्यांच्याहि ह्या जातिबद्ध समाजांत शरीरसंबंधव्यावृत्त जाती बनून गेल्या. शेवटीं मुसुलमान व खिस्ती आले. तेहि ह्या जातिबद्ध समाजांत जातिरूपस्थ होऊन बसले. जातिरूपस्थ होऊन बसल्यामुळें, अन्योन्य बेटीव्यवहार म्हणजे प्रजोत्पादनाच्या कामीं सहकार ह्या निरनिराळ्या गटांत होणें अशक्य झालें. आणि कधींकाळीं हे सर्व गट मिळून एक भरींव सजातीय समाज होणें प्रायः असंभाव्य होऊन बसलें.

अवास्तव देवकल्पना

एकटा देवधर्म घेतला आणि त्या दृष्टीनें ह्या गटांकडे पाहूं गेलें तर, कातकरी पिशाचपूजक होता, यहूदी, मुसुलमान व खिस्ती मनुष्याकार एकदेवपूजक होते, पारशी अग्निपूजक ऊर्फ पंचभूतांपैकीं एका भूताचा पूजक होता, आणि हिंदू पशुपक्षिमनुष्याकार अनेकदेवपूजक असून शिवाय अग्न्यादिपंचभूतें, पिशाच्चें, एकदेव, झाडें व दगड, ह्यांचा भक्त होता, इतकेंच नव्हें तर स्वतःच देव, ईश्वर व ब्रह्महि होता. देव एक आहे हें जितकें खरें तितकेंच ते कोट्यवधि आहेत हेंहि खरें असल्यामुळें, म्हणजे दोन्ही कल्पना केवळ बागुलबोवाप्रमाणें असत्य असल्यामुळें, कातकरी, यहुदी, मुसुलमान, पारशी, खिस्ती व हिंदू हे सारेच अनेक निराधार व

अवास्तव कल्पनांच्या पाठीमागें धांवत होते व आपापल्या कल्पनांचा अनिवार उपभोग घेण्यांत सौख्य मानीत होते. अश्या ह्या नाना प्रकारच्या देवकल्पनांनीं पछाडलेल्या गटांचा एक भरींव समरस समाज बनवावयाला एकच तोडगा होता. तो हा कीं, ह्या सर्वांच्या डोक्यांतील निराधार व अशास्त्र अशी जी देवकल्पना तीच मुदलांत उपटून काढली पाहिजे होती, निदान एकसमाजत्वाप्रीत्यर्थ ह्या देव-कल्पनेला व देवधर्माला गबाळांत गणून इतर राजकीय, वैय्यापारिक व शास्त्रीय व्यवहारांत तिला नितांत गौणत्व दिलें पाहिजे होतें. तें जोंपर्यंत झालें नव्हतें, तोंपर्यंत हे सहाहि गट एकसमाजत्वाला उपकारक होण्याची आशा नव्हती. देवकल्पनेचें असत्य युग पांच चार हजार वर्षें चालून समाप्तीस येण्याच्या रंगांत आहे हें ह्या देवभोळ्या लोकांच्या अद्याप लक्ष्यांत आलें नव्हतें. एकट्या अद्वैतवेदान्त्यानें तेवढें देवकल्पनेला लाथाडलें होतें, परंतु अद्वैतवेदान्त्यांची चिमुकली संख्या देवभोळ्यांच्या प्रचंड संख्येच्या पासंगालाहि पुरेशी नव्हती.

उत्तरकोंकणांतील हे लोक देव, वंश व जाति ह्या तीन कादंबऱ्यांचें बेसुमार पान करून झिंगल्याकारणानें, त्यांच्यांत एकसमाजत्वाचा प्रादुर्भाव होणें जितकें अशक्य होतें तितकेंच एकराज्यत्वाचा उदय होणें असंभाव्य होतें. कातवड्याला प्राचीन कालीं राजा, राज्य व राष्ट्र हे शब्द देखील अपरिचित होते. आर्यांच्या संसर्गानें तो पुढें आपल्याला वनचा राजा म्हणूं लागला इतकेंच. राजा हा शब्द कातवड्याच्या मूळ भाषेंतील अनार्य नाहीं. यहुदी व पारशी हे इतके पराकाष्ठेचे दुर्बल, पंगू व भुकेबंगाल होते कीं राजा हा अर्थ यद्यपि त्यांना अवगत होता तत्रापि त्या अर्थाचा साक्षात्कार करून दाखविण्याची धमक उत्तरकोंकणांत ते कधीं दाखवितील अशी कल्पनाहि संभाव्य कोटींतील नव्हती. बाकी राहिले मराठे, मुसुलमान व पोर्तुगीज. हे तिघेहि बाहेरून उत्तरकोंकणांत प्रवेश करून, मुक्तद्वारी व तुटक अश्या विपुलान्न व सुलभान्न लोकांत येऊन त्यांना जिची यत्किंचित् जरूर नव्हती त्या राज्यसंस्थेची ऊर्फ सरकारची स्थापना जबरदस्तीनें स्वार्थासाठीं म्हणजे स्वतःचें पोट जाळण्यासाठीं करिते झाले, आणि राज्यस्थापनेनंतर देशांतील इतर लोकांप्रमाणें अन्न-वैपुल्यामुळें व अन्नसौलभ्यामुळें मुक्तद्वारी, तुटक, उदासीन व राजकारणविमुख बनले.

एकराष्ट्रत्वाच्या आवश्यकतेचा अभाव

हिंदूंतील क्षत्रिय व ब्राह्मण ह्यांचा तर राजा, राज्य व राष्ट्र ह्या तीन शब्दांचा घोष वेदकालापासून चालू आहे. जेथें जातील तेथें राष्ट्र उत्पन्न करण्याचा ब्राह्मणक्षत्रियांचा मोठा हव्यास. ऋग्वेद, यजुर्वेद अथर्ववेद व त्यांचीं ब्राह्मणें ह्यांच्यांत राजा, राज्य, राष्ट्र, साम्राज्य, बृहद्राज्य, एकराट्, विराट्, गणराट्, अधिराट्, इत्यादि राजकीय शब्दांची रेलचेल पाहिली व राज्यविषयक प्रार्थना पाहिल्या म्हणजे राजा व राष्ट्र हे

अर्थ ब्राह्मणक्षत्रियांच्या हाडींमाशीं किती खिळले होते त्याची कल्पना होते. असे हे ब्राह्मणक्षत्रिय सुद्धां उत्तरकोंकणांतील विपुलान्न हवेंत इतर लोकांच्या प्रमाणेंच राजसंस्थोदासीन होऊन बसले. ते इतके कीं आफ्रिकेंतील अर्धरानटी, शामळ व मध्यआशियांतील उनाड मोंगल ह्यांनीं अधाशीपणें राज्ययंत्र पटकाविलें असतां तुडुंब पोट भरलेल्या ब्राह्मणक्षत्रियांनीं तिकडे कानाडोळा केला. मुसुलमानांनींहि पोर्तुगीजांपुढें तोच कित्ता गिरविला. पुढें पोर्तुगीजांची व त्यांच्या बाट्यांची पाळी आली तेव्हां चित्पावनांपुढें बाट्ये तर पहिले छूट वठणीस आले. परंतु पोट न भरलेल्या अस्सल पोर्तुगीजांनीं मात्र प्रिय अन्नाला चिकटून रहाण्याचा हट्ट प्राण जाईतोपर्यंत मुंग्याप्रमाणें धरिला. अन्नसंपन्न उत्तरकोंकणांत राजा, राज्य, राष्ट्र व राज्ययंत्र एतत्संबंधानें माणूस उदासीन कां व कसें होतें त्याचा हा असा इतिहास व हिशेब आहे. राज्ययंत्राची येथें फारशी जरूरच नाहीं. उत्तरकोंकणचा हा दाखला सबंद भारतवर्षाला खुशाल लावावा. राष्ट्र, राष्ट्र, राष्ट्र म्हणून वेदघोष करणारे अन्नतृप्त ब्राह्मणक्षत्रिय जेथें राष्ट्रविन्मुख व समाजसंन्यस्त होण्यांत भूषण मानूं लागले, तेथें मुदलांतच नको असलेलें राज्ययंत्र चालविण्याचे काबाडकष्ट भुकेबंगाल पोर्तुगीजादि यूरोपीयन लोक व आरब, अफगान, मोंगल वगैरे आशियाटिक लोकच फक्त करूं इच्छीत. तदितरांना हा खटाटोप निरर्थक भासे. राष्ट्र व एकराष्ट्र हा अर्थ ह्या अन्नसंपन्न देशांत रुजण्यासारखा व आवश्यक भासण्यासारखा नसे. राष्ट्र होण्याची ज्यांना जरूर नव्हती त्यांना एकसमाजहि होण्याची आवश्यकता नव्हती हें सांगावयाला नकोच.

असंतुष्ट अल्पसंख्याक वर्गांची राजकीय महत्त्वाकांक्षा

सामान्यतः सर्वसाधारण लोकांना जबरदस्त व भपकेबाज किंवा सालस व शिष्ट अशा कोणत्याहि सरकाराची, राज्ययंत्राची व राष्ट्रत्वाची जरूरी यत्किंचित्हि भासत नव्हती हें जरी खरें आहे; तत्रापि भारतवर्षांत सदा असा एक अल्पसंख्याक वर्ग वेळोवेळीं विद्यमान असे कीं त्याला राष्ट्रत्वाची व राज्ययंत्राची मालकी आपल्या हातांत राखण्याची आवश्यकता उत्कटत्वानें भासे. हा अल्पसंख्याक वर्ग म्हणजे ज्यांच्या हातचें राज्ययंत्र नवीन आलेल्या राज्यकर्त्यांनीं काढून घेतलें त्यांचा व नवीन आलेल्या राज्यकर्त्यांच्या हातचें राज्ययंत्र स्वहस्तगत करूं इच्छिणाऱ्या देशी किंवा विदेशी बुभुक्षितांचा. नामोहरम झालेले पूर्वीच्या राशियतींतील असंतुष्ट लोक व ताज्या दमानें राज्ययंत्र बळकविण्याची इच्छा करणारे नवीन बुभुक्षित लोक हिंदुस्थानांतील राजकारणाचा धागा गेल्या तीन हजार वर्षें अविनतूट चालवीत आलेले आहेत. तत्रापि हेहि बुभुक्षित लोक अन्नसंतृप्त होऊन अल्पावधीनें मुक्तद्वारी, तुटक, संन्यस्त व उदासीन बनत. हे भारतबाह्य व भारतांतर्गत बुभक्षित व असंतुष्ट

लोक जर नसते तर राजकारण हा पदार्थ हिंदुस्थानांत औषधालाहि न मिळता. ज्यांनीं ज्यांनीं म्हणून राज्ययंत्राचें ओझें अन्नाकरितां आपल्या शिरावर घेतलें ते ते एकोनएक लोक अन्नसंतृप्त होऊन शिरावरील ओझें खालीं ठेवण्याला उत्सुक झालेले दिसले आहेत. तारुण्यांत राज्यभार वाहणारा जनकराजा वार्धक्यांत वेदान्ताचीं प्रवचनें करतांना दृष्टीस पडतो. तारुण्याच्या पहिल्या तडफेंत रक्तपात व लांडीलबाडी करून राज्य आक्रमणाऱ्या चंद्रगुप्ताचा मुलगा जो अशोकराजा तो भर तारुण्यांत अहिंसेची शपथ घेतो. खुनांचा सडा पाडणारा अवरंगझेब कुराणाच्या नकला करून व रमजानचे उपास करून पापनिर्मुक्त होण्याची खटपट करतो. सर्व हिंदुस्थानभर हुतूतू घालणाऱ्या पहिल्या बाजीरावचा नातू जो दुसरा बाजीराव तो राज्यभाराची दगदग विसरण्याकरितां स्नानसंध्येंत विश्रांति घेण्याचा रस्ता धरतो. आणि पूर्ववयांत राजकारणीं दंग झालेला महादजी शिंद्या उत्तर वयांत रडके अभंग रचीत बसतो. ह्या सर्व दाखल्याचा अर्थ इतकाच कीं हिंदुस्थानांत राजकारण, तदंगभूत मारामाऱ्या व राज्ययंत्र ह्यांची वास्तविक जरूरी नव्हती. कृत्रिमपणें राज्ययंत्र निर्माण करतांना व मारामाऱ्यांत दंग होतांना कांहीं अर्धपोटी अल्पसंख्याक लोक हिंदुस्थानांत दिसत. परंतु बाकीच्या सर्व अन्नसंतृप्त लोकांस त्यांच्या ह्या धांगडधिंग्याचा व रानटीपणाचा पूर्ण तिटकारा वाटे. एकाच वाक्यांत सांगावयाचें म्हणजे हिंदुस्थानांत इतकें मुबलक अन्न असें कीं येथें तल्लक्ष्यर्थ राज्ययंत्र, राष्ट्र, मारामाऱ्या व मुत्सद्देगिरी पैदा करण्याची जरूरी नसे. सर्वसामान्य लोकांच्या दृष्टीनें येईल त्याला येथें मुक्तद्वार असे, मज्जाव नसे. मज्जाव, अडथळा व प्रतिबंध जो होई तो अल्पसंख्याक भुकेबंगाल राज्यकर्त्यांकडून होई.

राष्ट्रपराङ्मुखतेचें कारण आर्थिक

येणेंप्रमाणें उत्तरकोंकणांतील हिंदी लोक ऊर्फ कायमची वसती करून राहिलेले नाना वंशांचे, नाना वर्णांचे, नाना देवधर्मांचे, नाना आचारांचे व नाना भाषांचे सर्व लोक जे इतके राजकारणपराङ्मुख, राष्ट्रपराङ्मुख, समाजपराङ्मुख, मुक्तद्वारी, तुटक, संन्यस्त व व्यक्तितंत्र दिसतात त्याचें एकच एक आदिमूळ आर्थिक आहे. अन्नाचें वैपुल्य व सौलभ्य हें ह्या एकसमाजविन्मुखतेचें कारण आहे. अशा परिस्थितींत मानवांचा कोणताहि वंश अशाच स्वभावाचा बनला असता. पश्चिम यूरोपांतील ख्रिस्ती लोक बद्धद्वार, एकजूट, समाजनिष्ठ व राष्ट्रनिष्ठ जे दिसतात त्याचेंहि मूळ व मुख्य कारण आर्थिकच आहे. अन्नाचें दौर्भिक्ष्य व दौर्लभ्य हें ह्या एकसमाजसन्मुखतेचें कारण आहे. संघविहीन लोकांवर घाला घालून अन्न मिळविण्याकरितां एकसंघ व एकसमाज केल्या विना त्यांना तरुणोपाय नव्हता. ह्यावरून असें विधान करणें शक्य होतें कीं उत्तरकोंकणांतील व हिंदुस्थानांतील समाजपराङ्मुख व राष्ट्रपराङ्मुख लोकांना एकसमाजनिष्ठ व राष्ट्रनिष्ठ करावयाचें असल्यास, त्यांच्यांत अन्नदौर्भिक्ष्य व

अन्नदौर्लभ्य उत्पन्न झालें किंवा केलें पाहिजे. नाना जाती करून रहाणें घातक आहे, नाना भाषा वापरणें ऐक्यसाधक नाहीं, नाना धर्मांना कवटाळून बसणें राष्ट्रनाशक आहे, वगैरे कोरड्या व कच्च्या उपदेशानें हें कार्य साधणार नाहीं. अनन्नत्वाचा जेव्हां पेंच लागेल तेव्हां हे लोक जगावयाचें असल्यास, एकसमाजनिष्ठ व एकराष्ट्रनिष्ठ झाल्यावांचून रहाणार नाहींत.

नाना भाषा, नाना वंश, नाना धर्म व नाना जाती ह्यांच्यामुळें हिंदू लोक दुर्बल झाले आहेत हें म्हणणें खोटें आहे. हिंदुस्थानांतील, मुसुलमान लोकांत नाना जाती, नाना वंश, नाना धर्म व नाना भाषा नाहींत. एक वंश, एक जात, एक भाषा व एक धर्म आहे. तत्रापि तेहि हिंदूलोकांप्रमाणेंच तुटक, उदासीन, समाजविन्मुख व राष्ट्रपराङ्मुख आहेत. तेव्हां हिंदूमुसुलमानांच्या राष्ट्रपराङ्मुखतेचें कारण वंश, धर्म, जाती व भाषा ह्या चार राशींत हुडकींत बसणें युक्तिसिद्ध नाहीं. पराङ्मुखतेचें मुख्य व एकच एक कारण सुलभ व विपुल अन्नसंपत्ति आहे. हीं संपत्ति अपुरी भासण्यास हिंदुस्थानांत आहे तीहून लोकसंख्या तिप्पट चौपट वाढली तरी पाहिजे किंवा आहे त्या लोकसंख्येच्या रहाणीची इयत्ता दसपटीनें वाढली तरी पाहिजे किंवा बहिःस्थ राज्यकर्त्यांनीं अन्नशोषण करून तें अत्यन्त दुर्मीळ तरी करून टाकिलें पाहिजे. ह्या आर्थिक, सामाजिक व राजकीय विषयाचा खल इत्थंभूत व सविस्तर होण्यास एखादा स्वतंत्र ग्रंथ रचिला पाहिजे; बखरीच्या पडवींतील तुटपुंज्या जागेंत त्याचा निर्वाह होणार नाहीं.

उत्तरकोंकणांतील राष्ट्रपराङ्मुखता

उत्तरकोंकणांतील लोक राष्ट्रपराङ्मुख व एकसमाजपराङ्मुख किती होते ह्या विधानाला पोषक असे तीन प्रसंग प्रस्तुत बखरींतून व बिंबाख्यानांतून निर्दिष्ट करतों. (१) केशवाचार्य व नायकोराव यांनीं शक १३७० त माल्हजापुरीं जो लोकसमूह जमविला तो जमविण्याचा हेतू तुर्कांना हांकून देण्याचा राजकीय नव्हता, तर विसरत चाललेला महाराष्ट्रधर्म लोकांना कळविण्याचा आचारविषयक होता. (२) तुर्कांनीं उत्तरकोंकणांत बळजबरीनें राज्य स्थापिलें, तेव्हां त्यांच्या विरुद्ध खटपट करण्यांत लोकांची शक्ति खर्च झाली पाहिजे होती, अशी साधी समजूत करून घेण्याचा मोह वाचकांना पडण्याचा संभव आहे. परंतु खरा प्रकार असा होता कीं तुर्कांचा द्वेष करण्याऐवजीं आपसांतील क्षुद्र मानापमानाचे खटले अजाण अश्या तुर्क अधिकाऱ्यांच्या मार्फत लडिवाळपणें निवडून घेण्यांत निरनिराळ्या जाती व लोक भूषण मानीत. ह्याचा अर्थ असा कीं राज्ययंत्र कोणाचेंहि असलें तत्रापि त्यांचा द्वेष लोक करीत नसत, का कीं द्वेष करण्याचें तितकें प्रयोजन भासत नसे. फार झालें तर एका भुकेबंगाल उपटसुंभाचें लिगाड जाऊन दुसऱ्या भुकेबंगाल अधाशाचें पिशाच्च आलें, एवढी भाषा लोक वाप-

रीत. शिपाई, कारकून, मोजणीदार, सुभेदार इत्यादि लहानमोठ्या सरकारी हस्तकांना भामटे, चोर व भिक्षेकरी मनांतल्या मनांत म्हणत आणि त्यांच्या आंगावर लांकूड, फाटें, गवत व वैरण महाराकरवीं तुच्छतेनें फेंकून देत. ह्याहून प्रखर प्रतिकार करण्याचें गांवकऱ्यांच्या किंवा देशांतील लोकांच्या स्वप्नीं सुद्धां नसे. (३) राज्यकर्ते व सर्वसामान्य लोक ह्यांच्या दर्म्यान प्रेमभाव व सहानुभूति किती अल्प होती तिचा निदर्शक असा एक उतारा मजजवळील लेखी बिंबाख्यानांतला देतों. संकटसमयीं सर्वसामान्य लोकांचा आपल्याला विशेष उपयोग होणार नाहीं व निर्वाणीच्या प्रसंगीं गांठीं बांधून ठेविलेलें द्रव्य तेवढें उपयोगीं पडेल, अशा बालंबाल खात्रीनें बिंबदेव जाधवानें अगणित द्रव्य जागोजागीं पुरून ठेविलें. त्याची हकीकत बिंबाख्यानांत द्रव्यचिकिंछासांखळि नांवाच्या समासीच्या अध्यायांत दिली आहे ती अशी :—

॥ श्रीगणेशाय नमः ॥

॥ अथ द्रव्यचिकिछाः ॥

आतां थोडकसा प्रश्न ॥ प्रतापपुरिं महाल जाण ॥
रायें केलें अनुसंधान ॥ सर्व खजीन्यां साटीं ॥ १ ॥
तेथें ××× भुयार केलें ॥ तेथें येक पूर्व दिसेस स्थान केलें ॥
तये स्थानि अगणित द्रव्य सांठविलें ॥ कोणास अंत न लागे ॥ २ ॥
त्याचि येक खुण ॥ तेथें चिरे रुंद जाण ॥
त्याचे उत्तरेस आंगण ॥ ठेविलें असें ॥ ३ ॥
×××××× जाण ॥ सर्व धातुमय पूर्ण ॥
खणो खणि जाण ॥ ××××× असे ॥ ४ ॥
असें पुरिलें असंख्य धन ॥ राणिं कारणें सांगितलि खुण ॥
हें तुम्हा लागि जाण ॥ द्रव्य असे ॥ ५ ॥
आगाशिचे डोंगरि वरि ॥ सीळा असे फार बरि ॥
×××× म उखळ धरि ॥ तये खालिं ॥ ६ ॥
खालि च्यार लक्ष हिरण्य ॥ रायें ठेविलें आपण ॥
प्रधानास आज्ञा करोन ॥ ठेविलें असें ॥ ७ ॥
विश्वनाथ नाईक यजुःशाखि ॥ त्यास राज्यान केलें सबनिस ॥
त्यास माहित सर्व स्थानें किं ॥ त्या प्रमाणें लिहिलें असे ॥ ८ ॥
आणिक सांगतो येक ॥ आगाशिचे पश्चमे कडे तटाक ॥
वासुंदरें नाम देख ॥ त्यांत पात्रक असे ॥ ९ ॥
दक्षण पाळिस जाण ॥ चिरे मृत्तिका हे कठिन ॥
नाहि ठेविलें कारण ॥ पुन्हा हो न्यावयाचि ॥ १० ॥
वांदरें वरि विस्तीर्ण ॥ तेथें डोंगरि येक जाण ॥

तिचें नांव सेलिन ॥ तिचे मस्तकिं ॥ ११ ॥
आहे येक ××× लोखंडी जाण ॥ त्यांत दोन कोटि मोहोरा भरोन ॥
ठेविला रखवालिस जाण ॥ जनार्दन भास्कर ॥ १२ ॥
ऐसिं धनें गुप्त फार ॥ जागो जागां ठेविलि फार ॥
त्याचें करोन टिपण पत्र ॥ आपले ताईतेंत ठेविलें असे ॥ १३ ॥
म्हणे लक्षुमण ॥ उघडें करावें हें न कारण ॥
याज करितां दुसरिं स्थानें ॥ गुप्त ठेविली ॥ १४ ॥
मोरोसि पर्वत थोर ॥ तेथें खडक असे किर ॥
त्यास छिद्र वर्तुळ ॥ अपूर्व किं ॥ १५ ॥
त्याज वर खुण ॥ पाउले चर्मपूर्ण ॥
लहान थोर जाण ॥ लिखितार्थ एक असे ॥ १६ ॥
त्या खडकाचे दक्षण भागें ॥ कढई एक निके ॥
तये मध्यें मोहोरा सिके ॥ चार लक्ष भार असे ॥ १७ ॥
दुसरि पूर्वें कडिल खुण ॥ साडे तिन वोळि जाण ॥
ते वाचितां परिपूर्ण ॥ नीधान असे ॥ १८ ॥
खडखास भयंकर फार थोर ॥ मिरें सेजारि डोंगरि ॥
तेथें डोंगरि वरि ॥ रायें ठेविलें पांच कुंड ॥ १९ ॥
कासिया मागें पूर्वदिसेस जाणा ॥ एक कुंड बांधिलें जाणा ॥
उदक सुंदर पूर्ण ॥ तये कुंडि ॥ २० ॥
तेथें द्रव्य सांठविलें जाण ॥ रायें आपुलें अनुसंधान ॥
करोन ठेविलें जाण ॥ प्रताप दावावयासिं ॥ २१ ॥
वरसावें बोरभाट जाण ॥ तेथें खजीन्याचें केलें स्थान ॥
तेथें द्रव्य असंख्य सुवर्ण ॥ रायें ठेविलें ॥ २२ ॥
तेथें यक पाटांगण ॥ सिळा आहे जाण ॥
तये वरि लिखित जाण ॥ करोनि ठेविलें उफराटें ॥ २३ ॥
अक्षरें उफराटिं लिहिलिं जाण ॥ त्यावरिं चंद्रसूर्याचें स्थान ॥
एक गर्धव जाण ॥ स्त्रिये वरि ॥ २४ ॥
ऐसा केला बंदोबस्त ॥ रायें रक्षक ठेविले तेथें ॥
आपण आले माहिमास ॥ खेडा वरि ॥ २५ ॥
तेथे माहाल उत्कर्ष केले ॥ तिन कुंडें बांधिलीं ॥
त्यांसि कुलुपें केलिं ॥ तये स्थानिं ॥ २६ ॥
त्यांत भरिला सर्व खजिना ॥ नाना तरेचें नाणें जाणा ॥
आणि हिरे परि पाचु जाणा ॥ ठेविले असति ॥ २७ ॥

ऐसा केला बंदोबस्त ॥ राजा राहिला निवात ॥
राज्य चालत असे स्वस्त ॥ बिंबदेवाचें ॥ २८ ॥
या खेरीज जाण ॥ जागो जागा निधान ॥
रायें ठेविलें पुरोन ॥ बिंबदेवें ॥ २९ ॥

॥ सांखळि ॥ १ ॥

ह्या एकोणतीस ओव्यांची शाई ओली असतांना, लेखकानें सर्व लिखाणावर उलटा ठसा घेण्याकरितां कागद दाबिला. त्यामुळें बरींच अक्षरें पुसून चिताड झालीं. तत्रापि बहुतेक अक्षरें वाचतां येण्यासारखीं आहेत. दहा वीस अक्षरें अगदींच पुसटून गेलीं होतीं तेवढ्यांच्या कोऱ्या जागीं फुल्या छापिल्या आहेत. ओव्यांत उल्लेखिलेल्या स्थळीं द्रव्यलब्धीचा जरी फारसा संभव नसला तत्रापि बिंबदेवकालीन प्राचीन अवशेष सांपडण्याचा संभव आहे.

भारतीयांची स्वभावतः राजकारण निवृत्ति

येथपर्यंत केलेल्या विवेचनाचा इत्यर्थ असा कीं भारतवर्षांत फार पुरातन कालापासून दोन स्वभावाचे लोक वावरत आलेले आहेत. राज्ययंत्र चालवून पोट भरणारे बहिःस्थ भुकेबंगाल लोक व अन्नसंपत्ति निर्माण करून सालसपणें कालक्रमणा करणारे अंतःस्थ अन्नसंतृप्त लोक. जेव्हांकेव्हांपासूनचा भारतवर्षाचा इतिहास आपणास माहीत आहे, तेव्हांपासून हे दोन वर्ग दृष्टिपथांत येतात. दुसऱ्या वर्गास बहिःस्थ वैदिक लोक विश् या संज्ञेनें ओळखीत. विश् म्हणजे बैठे लोक म्हणजे बिछायत पसरून शेतकी व व्यायाम करणारे लोक. विश् लोक संपत्ति कमाविण्यास लागणाऱ्या करामतीनें मारामाऱ्या करण्यांत पटाईत अशा क्षत्रिय लोकांहून जास्त सुधारलेले असत. विश् लोकांत राजा, राज्य, राष्ट्र, इत्यादि राजकीय अर्थांचा ह्व्यास अत्यन्त अल्प प्रमाणाचा असे. कदाचित् राजन् ही पदवी विश् लोकांना क्षत्रियांची गांठ पडेतोंपर्यंत माहीतहि नसावी. क्षत्रियांना व ब्राह्मणांना मात्र राजा, राज्य, राष्ट्र व प्रजा हे चार अर्थ फार प्राचीन कालापासून माहीत होते. कारण ते पृथ्वीच्या ज्या प्रदेशांत रहात असत त्या प्रदेशांत अन्नाची टंचाई पराकाष्ठेची असे. अन्न दे, प्रजा दे, राजा दे, गाई दे, मेंढ्या दे, अशा मायन्याच्या प्रार्थनांनीं चारहि वेद भरलेले आहेत. Give us our daily bread, ही जशी यूरोपीयन लोकांची निकडीची प्रार्थना त्याच मासल्याची ब्राह्मणक्षत्रियांची भुकेबंगाली प्रार्थना असे. राजा व प्रजा ही संस्था ब्राह्मणक्षत्रियांनीं भारतवर्षांत आणिली.

प्रत्येक बाप आपल्या प्रजेचा म्हणजे संततीचा राजा असे. राजा म्हणजे रक्षण करणारा. मूळ राज् या धातूचा किंवा खरें म्हटलें म्हणजे शब्दाचा अर्थ रक्षण करणें असा होता. संततीचें रक्षण, पाळण व पोषण करणारा जो तो राजा. राजा ह्या शब्दा-

सारखाच पितृ हा शब्द आहे. पितृ म्हणजे पाळण, रक्षण, पोषण करणारा. राजा व त्याच्या पोटची प्रजा मिळून राष्ट्र होई. पोटच्या संततीसच तेवढी प्रजा ही संज्ञा असे. प्रजेला व्यक्तिदृष्ट्या राष्ट्रीय म्हणत. राज् रक्षण करणें ह्या धातूला ऐश्वर्यवान् होणें, अधिकार चालविणें इत्यादि अर्थ लक्षणेनें नंतर आले. मूळचा राजन् हा शब्द पितृ ह्या शब्दाचा समानार्थक होता. प्रजा हा शब्द केवळ पोटची संतति ह्या अर्थाचा वाचक होता. Subject म्हणजे खालीं दडपिलेला ह्या अर्थी प्रजा हा शब्द त्या प्राचीन कालीं योजिला जात नसे. विश् जेव्हां भेटले तेव्हां Subject ह्या अर्थी दास हा शब्द अस्तित्वांत आला. तोंपर्यंत राजा व प्रजा ह्या संस्थेंत दास नव्हते. मूळचें आर्य लोकांचें राष्ट्र म्हणजे राजा व पोटची प्रजा. ह्या आर्यांना अर्य भेटले. अरेः इदं अर्यं. अर्य म्हणजे शत्रू जे विश लोक त्यांना आर्यांनीं दास हें टोपण नांव दिलें. दास म्हणजे देणारे. दाला सिप् किंवा सन् होऊन दास हा शब्द झाला आहे. दास म्हणजे कर देणारा. विश् जो दास तो राजाला कर देई. संतती जी प्रजा ती कर देत नसे. प्रजा वयांत आली म्हणजे ती राजा ह्या पदवीला पोहोचे. दास जे विश् ते राजा ह्या पदवीला किंवा प्रजा ह्या पदवीला पोहोंचत नसत. ते केवळ कर देणारे जित लोक असत. प्रत्येक पितृ राजन् असल्यामुळें अनेक पितृ मिळून जो गण होई त्या गणांतील सर्व पितृ आपणास व्यक्तिशः राजन् म्हणवीत. टोळींतील असे अनेक राजे मिळून गणराज्य होई.

गणाचा जो पुढारी त्याला गणराज्, गणपति किंवा गणनायक ही संज्ञा असे. गणराजा जेव्हां आपल्या हातीं सर्व सत्ता बळकावी तेव्हां त्याला एकराज् म्हणत किंवा संक्षेपानें राज् म्हणत. राज् व गणनायक हे दोन शब्द प्राचीन इतिहासदृष्ट्या अत्यन्त महत्त्वाचे आहेत. रोमन् राजार्थक rex शब्द राज् ह्या धातूला सिप् किंवा सन् होऊन बनला आहे. राज्+स=राक्स्=रेक्स्. गणनायक=कोणआअग= konig= king अश्या अपभ्रंशानें किंग, कोनिग हा राजार्थक इंग्लिश व जर्मन शब्द बनला आहे. Konig, King ह्या शब्दाचा मूळ अर्थ heap of the horde, leader of the horde, असा आहे. ह्या व्युत्पत्त्यांपासून असें निगमन प्राप्त होतें कीं, राज् हा शब्द ज्या काळीं वैदिक आर्यांत अधिपति, ईश्वर ह्या अर्थांचा वाचक झाला त्या कालीं वैदिक आर्य व रोमन लोकांचे पूर्वज एकमेकांच्या शेजाराला होते; तसेंच, गणराज् गणनायक, हे शब्द ज्या कालीं गणराज्यसंस्थेच्या अनुषंगानें वैदिक आर्यांत प्रचलित झाले त्या कालीं जर्मनादि लोकांचे पूर्वज वैदिक आर्यांच्या शेजाराला होते. रोमन व जर्मन लोक वैदिक आर्यांच्या शेजाराला होते व आर्यभाषा बोलत होते म्हणून ते आर्यवंशी होते, असें मात्र समजण्यांत अर्थ नाहीं. जर्मन, साक्सन्, रोमन वगैरे लोक वंशानें आर्य नव्हते. राक्षस्, दानव, यातु, वगैरे अनार्यवंशांतले हे आर्यभाष लोक होते.

अशी ही प्राचीन गणराज्यसंस्था घेऊन भारतवर्ष हें नांव ज्या देशांस पुढें कालान्तरानें पडलें त्या देशांत आर्यांची धाड शिरली व त्या धाडीनें एकराज्य, वैराज्य, साम्राज्य, माहाराज्य इत्यादि राजकारणाचे नाना प्रयोग केले, आणि प्रयोग करून थकल्यावर व अन्नसंतृप्त झाल्यावर मुक्तद्वारी, तुटक, संन्यस्त, वेदान्ती, समाज-पराङ्मुख व राष्ट्रपराङ्मुख होऊन बसले. सुदासादि ऋग्वैदिक राजांपासून तो तहत बाजीरावादि चित्पावन राजांपर्यंत हा क्रम थोड्या फार फरकानें ह्या खंडांत चालूं आहे. अन्नसंतृप्त, संन्यासप्रवण व व्यक्तिस्वतंत्र लोकांचे थरावर थर ह्या देशांत गेल्या पांच हजार वर्षें क्रमानुक्रमानें बसत आले आहेत. त्यांच्या करवीं राजकीय, देवधार्मिक, वैयापारिक, भाषिक, राज्यमारक किंवा राज्यसाधक असें कोणतेंहि सामुदायिक कार्य स्वयंस्फूर्तीनें किंवा परस्फूर्तीनें आजपर्यंत कधींच झालेलें नाहीं. हीं सर्व कार्यें पोटाकरितां राज्ययंत्र पटकविण्याची हाव धरणाऱ्या बहिःस्थ किंवा अंतःस्थ असंतुष्ट अल्पसंख्याक लोकांच्या हातून वेळोवेळ पार पडलेलीं आहेत.

अपरंपार अशी अन्नसंपत्ति, साही ऋतूंत अत्यल्प कपडालत्त्यावर शीतोष्ण-निवारण होईल अशी हवा, कित्येक शतकें पुरून उरेल अशी जागा, वगैरे साधनांची सुलभ अनुकूलता असल्यामुळें, ह्या देशांत जे जे लोक स्थायिक रहिवाशी होतात ते ते बाहुल्यानें मुक्तद्वारी, संन्यस्त, व्यक्तिनिष्ठ, समाजपराङ्मुख व राष्ट्रपराङ्मुख बनतात, ही कहाणी गेल्या दहा रकान्यांत सांगितली. अन्नाकरितां दाही दिशा हिंडणाऱ्या व चोऱ्यामाऱ्या, खून, कत्तली, जबरदस्ती, दंगे व लढाया ह्यांत चूर झालेल्या गेल्या तीन हजार वर्षांतील मध्यआशियांतल्या मोंगलादि बिनसुधारलेल्या उनाड लोकांकडे तिरस्कारानें दुर्लक्ष करून, अलीकडील चारशें वर्षांतील सुसंस्कृत म्हणविणाऱ्या युरोपीयन लोकांना हे मुक्तद्वारी, संन्यस्त, व्यक्तिनिष्ठ व राष्ट्रपराङ्मुख लोक असा प्रश्न करीत कीं, सरकारें बनवून कर उकळीत न बसतां, सालसपणें, निमूटपणें, व शांततेनें ह्या देशांत इतरांप्रमाणें अन्न खात राहिलात तर काय बिघडेल ! एकसमाज करून, राज्ययंत्रें बनवून, राष्ट्रें निर्मून, शास्त्रें रचून, शस्त्रास्त्रें घडवून, एक जूट होऊन, स्वदेशांतील लक्षावधि मोलमजुरांची व भिकार-भणंगांची उपासमार करून व परदेशांतील अन्न लुटून शेवटीं पोटाची खळी भरण्यापलीकडे कोणतें शतकृत्य साधता ?

आमच्या देशांत आम्हाला ज्याप्रमाणें सरकार ही संस्था जरूरीची भासत नाहीं त्याप्रमाणें तुमच्याकडील शेंकडा नव्वद लोकांनाहि समाजाच्या अंतर्बाह्य जिकडे-तिकडे घुसणारी सरकार ही संस्था मनापासून नको आहे. तेव्हां, कांहीं उपद्व्यापी अल्पसंख्याक लोकांनीं स्वतःची चैन भागविण्याकरितां स्थापिलेल्या व सर्व पृथ्वीला पीडा करणाऱ्या सरकार ह्या कृत्रिम व अनावश्यक संस्थेला तुम्हीं आम्हीं सर्व मिळून मातींत गाडून टाकूं या. सर्व पृथ्वीभर फर्लांगा फर्लांगावर एकेकां कुटुंबाला कोंकणां-तल्याप्रमाणें एकेक घरवाडा देऊन जुलुमाचीं व पापाचीं जन्मस्थानें जीं शहरें त्यांचा

प्रथम नायनाट करूं. ज्याला ज्या देशांत रहावेंसें वाटेल त्यानें त्या देशांत जाऊन जागा असेल तेथें बिनहरकत रहावें. भय काय तें चोराचिलटांचें, पृथ्वीच्या पाठीवरील अर्धरानटी उनाड लोकांचें किंवा बडे जमीनदार, जंगी पेढीवाले व धंदेवाईक मुत्सद्दी यांचें. पैकीं चोराचिलटांचा मागमूस फर्लांगा फर्लांगावर घरें झाल्यानें मुदलांतच रहात नाहीं, असा दक्षिण कोंकणांतील अनुभव आहे. तोच अनुभव सर्व पृथ्वीभर येईल व चोराचिलटांच्या निवारणार्थ महार व कुत्रीं ह्यांचें देखील सरकार निर्मिण्याची आवश्यकता रहाणार नाहीं. अर्धरानटी लोकांचा एक मोठा जमाव आफ्रिकेच्या मध्य भागांत आहे आणि दुसरा मोठा जमाव मध्य आशियांत आहे. ह्या दोन्हीं अर्धरानटी जमावांना पाठीमागून रेटून पुढें ढुसकून देण्यास त्यांच्याहून रानटी व भुकेबंगाल लोक आतां राहिले नाहींत. करतां, हेहि समाज आपपल्या मूळभूमींत स्थिर होण्याचा संभव आहे. तेव्हां त्यांचा प्रतिकार करण्यासाठीं सरहद्दीवरून सैन्य ठेवणाऱ्या सरकारांची आतां आवश्यकता राहिली नाहीं. सबब, दंडधारी सरकारांना येथून पुढें कायमची रजा देणें युक्त नव्हे काय? बडे जमीनदार, जंगी पेढीवाले आणि धंदेवाईक मुत्सद्दी यांनीं सर्व पृथ्वीभर मोंगलादि अर्धरानटी लोकांप्रमाणें धूमाकूळ घालण्याकरितां व आपली अनिवार द्रव्यतृष्णा भागविण्याकरितां जुलमीं व घातकीं सरकारें चालविलीं आहेत. त्यांचा हा परोपघातक स्वार्थी धंदा बंद पाडण्याची वेळ होऊन गेली नाहीं काय? भारतवर्षांतील व उत्तरकोंकणांतील उदासीन व निवृत्त अश्या बहुतम लोकांचा शकाच्या सोळाव्या व सतराव्या शतकांतील इतिहास जर कांहीं विचारीत व शिकवीत असला तर हे प्रश्न विचारीत व शिकवीत आहे.

१४

मराठी राज्याचा हेतु

शिवाजीच्या चरित्राची गुरुकिल्ली

पंधराव्या व सोळाव्या शतकांत आणि सतराव्या शतकाच्या पूर्वार्धांत महाराष्ट्राची स्थिति फारच विपन्न झाली होती. त्यावेळचें वर्णन करितांना समर्थ म्हणतात:— "तीर्थक्षेत्रें मोडिलीं। ब्राह्मणस्थानें भ्रष्ट झालीं। सकळ पृथ्वी आंदोळली। धर्म गेला॥" यवनांनीं हिंदु धर्माचा उच्छेद करून टाकिला तेव्हां "देव, धर्म, गो, ब्राह्मण ह्यांचें संरक्षण करण्यास" शिवाजीराजे अवतीर्ण झाले व त्यांनीं यवनांच्या सर्वोच्छेदक गतीचा प्रतिरोध केला. ह्या महत्कृत्याला अनुलक्षून समर्थ शिवाजीराजास लिहितात कीं, "तुम्हीं झाला म्हणून महाराष्ट्र धर्म कांहींतरी राहिला" व पुढें सप्रेम विनवणी करितात कीं "आपण धर्मस्थापनेची कीर्ति उत्तरोत्तर अशीच संभाळिली पाहिजे." धर्मस्थापनेची कीर्ति संभाळण्यास काय करावें म्हणाल तर "अमर्याद फितवेखोर लोकांचा संहार करावा; न्याय सीमा उल्लंघूं नये; नेटके बंद बांधावे; तुरंग, शस्त्र आणि स्वार जमवावे" आणि सर्वांत पहिलें काम काय करावें तर "मराठा तितका मेळवावा; आणि जिकडे तिकडे महाराष्ट्रधर्म वाढवावा." आपला महाराष्ट्रधर्म वाढविण्यास आणखी उपाय कोणते तर "बहुत लोक मेळवावे। एक विचारें भरावें। कष्टें करून घसरावें। म्लेंच्छावरी॥" आणि इतकें करून झाल्यावर मग, "आहे तितकें जतन करावें। पुढें आणीक मेळवावें। महाराष्ट्र राज्य करावें। जिकडे तिकडे॥" समर्थांच्या ह्या उक्तींवरून कळून येईल कीं, सतराव्या शतकाच्या पूर्वार्धांत महाराष्ट्रांतील विचारी पुरुषांचीं मनें एका जबर कल्पनेनें भारून गेलेलीं होतीं. ती कल्पना कोणती तर महाराष्ट्रधर्माची स्थापना करणें ही. ही कल्पना सफल करण्याचें अवघड काम शिवाजीनें केलें. शिवाजीच्या एकंदर चरित्राची गुरुकिल्ली हीच कल्पना होय.

ही कल्पना ध्यानांत ठेवून मग शिवाजीच्या व त्याच्या अनुयायांच्या कृत्यांचा विचार करावा म्हणजे त्या कालीं महाराष्ट्रांत व कर्नाटकांत जिकडे तिकडे मराठे निष्कारण धांवतांना परकीय इतिहासकारांना जे दिसतात ते मनांत कांहीं विशिष्ट हेतु धरून शिस्तवार मोहिमा करीत आहेत असें भासूं लागतील. शिवाजीला चोर व त्याच्या अनुयायांना गनीम म्हणून यवनांनीं टोपणनांवें दिलीं. त्यांचा वाच्यार्थ घेण्याची जी परकीय इतिहासकारांना खोड लागली आहे ती ते टाकून देतील व देव, धर्म आणि

स्वराज्य ह्यांची स्थापना करणाऱ्या पृथ्वीवरील महापुरुषांच्या मालिकेंत ह्या पुण्यश्लोक व परमप्रतापी पुरुषाला आडेवेढे न घेतां गोवूं लागतील. आतां हा महाराष्ट्रधर्म म्हणजे काय ? ख्रिस्तीधर्म, महमुदीधर्म, यहुदीधर्म ह्यांच्यासारिखाच हा महाराष्ट्रधर्म आहे कीं काय ? तर तो तसा नाहीं. महाराष्ट्रधर्म म्हणजे हिंदुधर्मच कीं नाहीं ? तर महाराष्ट्रधर्म म्हणजे हिंदुधर्महि केवळ नव्हे. महाराष्ट्रधर्माची व्याख्या हिंदुधर्मांहूनहि जास्त व्यापक आहे. महाराष्ट्रांत त्या काळीं चालणारा हिंदुधर्म व भरतखंडांतील इतर प्रांतांत चालणारा हिंदुधर्म ह्यांच्यांत महदंतर होतें. त्या काळीं भरतखंडांत सर्वत्र यवनांचें राज्य होतें व त्या राज्याच्या अमलाखालीं महाराष्ट्रेतर प्रांतांत प्रजा आपला हिंदुधर्म म्हणजे व्रतें, उद्यापनें, उपासना, पूजा इत्यादि धर्मांचा यवनांकडून कमजास्त त्रास पोंहचत असतांहि निमूटपणें चालवीत असत.

महाराष्ट्रांतील प्रजा मात्र इतकी सोशीक नव्हती. देव फोडणाऱ्या, विजापूर, अहमदनगर, खानदेश, जुन्नर, कोंकण वगैरे प्रांतांवर अंमल करणाऱ्या यवनांनीं मराठ्यांना एका बाजूनें अगदीं सतावून सोडिलें होतें व दुसऱ्या बाजूनें त्यांच्यांतील प्रमुख सरदारांना व मुत्सद्यांना मोठमोठ्या मानाच्या जागा दिल्या होत्या. त्यामुळें त्या वेळच्या मराठ्यांत यवनांविषयीं संताप व तो परिहार करण्याचें सामर्थ्य हीं एकाच वेळीं उत्पन्न झालीं. धर्म भ्रष्ट करणाऱ्या, गाई मारणाऱ्या व ब्राह्मणांचा छळ करणाऱ्या यवनांविषयीं द्वेषबुद्धि महाराष्ट्रांत दामाजीपंताच्या वेळेपासून धुमसत होती व ती शिवाजीमहाराज अवतीर्ण व्हावयाच्या कालीं तर अत्यंत उत्कट झाली होती. यवनांचा उच्छेद करावयाचा हें त्या कालीं महाराष्ट्रांतील हिंदुधर्मांचें एक कलम होऊन गेलें होतें. यवनांचा उच्छेद करावयाचा एवढाच त्या वेळच्या मराठ्यांचा हेतु नव्हता तर धर्माची स्थापना करून गोब्राह्मणांचा प्रतिपाल करावयाचा त्यांचा मुख्य हेतु होता. हा उत्तमोत्तम हेतु साध्य होण्यास नुसता यवनांचा उच्छेद करून काम भागण्यासारखें नव्हतें, तर स्वराज्याची स्थापना करणें जरूर होतें. तेव्हां स्वराज्याची स्थापना करणें हेंहि एक महाराष्ट्रांतील हिंदुधर्मांचें मुख्य कलम होऊन बसलें.

स्वराज्याची स्थापना करण्यास दोन गोष्टी केल्या पाहिजेत असें शिवाजीच्या लक्ष्यांत आलें. मराठ्यांचें एकीकरण केलें पाहिजे ही एक गोष्ट व त्यांचें धुरीधरण म्हणजे पुढारपण स्वीकारिलें पाहिजे ही दुसरी गोष्ट. कोणत्याहि वेळीं "बहुत लोक मेळवून एक विचारें भरल्या" शिवाय स्वराज्यस्थापनेची तयारी होत नसते व एवढेंच करून काम भागत नाहीं; तर एक विचारानें भरलेल्या लोकांचें धुरीणत्वहि पत्करण्यास व ते पत्करून इष्ट हेतु तडीस नेण्यास महापुरुषांनीं सिद्ध व्हावें लागतें. " बहुत लोक मेळवून एक विचारें भरण्याचें " काम शिवाजीनें संतमंडळींकडून करविलें. ह्या कलमीला अनुलक्षून समर्थ म्हणतातः—" ब्राह्मणमंडळ्या मेळवाव्या । भक्तमंडळ्या मानाव्या । संतमंडळ्या शोधाव्या । भूमंडळीं ॥ " ह्या एक विचारानें

भरलेल्या मंडळयांचें पुढारपण शिवाजीनें व त्याच्या मुत्सद्यांनीं स्वीकारिलें; आणि स्वराज्याची स्थाप्रना करण्याचें अतिमानुष कृत्य घडवून आणिलें. येणेंप्रमाणें महाराष्ट्रेतर प्रातांतील हिंदुधर्म + धर्मस्थापना + गोब्राह्मणप्रतिपाल + स्वराज्यस्थापना + एकीकरण + धुरीधरण म्हणजे महाराष्ट्रांतील हिंदुधर्म होतो अशी त्या काळीं समजूत होती. ह्याच समजुतीला महाराष्ट्रधर्म म्हणून समर्थांनीं संज्ञा दिली आणि ह्या धर्माची स्थापना व प्रसार करण्याकरितां शिवाजीमहाराज व त्यांचे अनुयायी ह्यांनीं प्राणांचा व वित्ताचा अपरंपार व्यय केला. महाराष्ट्रेतर प्रातांतील हिंदुधर्मास सहिष्णु हिंदुधर्म म्हटल्यास व महाराष्ट्रांतील हिंदुधर्मास जयिष्णु हिंदुधर्म म्हटल्यास ह्या दोन्ही धर्मांतील भेद उत्कटत्वेंकरून स्पष्ट होईल. दामाजीपंताच्या वेळचा स्तब्ध विठोबा सहिष्णु हिंदुधर्माची मूर्ति आहे व समर्थांचा उद्धाण करणारा मारुति जयिष्णु हिंदुधर्माची पताका आहे. सारांश, १६४६ पासून १७९६ पर्यंत ह्या कल्पनेला मराठे साक्षात् स्वरूप देत होते व बरोबर १५० वर्षें ह्या कल्पनेच्या धोरणानें मराठे चालले होते. महाराष्ट्रधर्माची ही कल्पना मराठ्यांच्या ह्या १५० वर्षांतील हालचालींची केवळ प्राणभूत आहे. आतां ह्या कल्पनेचा निरनिराळ्या काळीं कसकसा आविष्कार झाला तें सांगतों.

स्वराज्याची साधना

(अ) स्वराज्यस्थापना हें एक महाराष्ट्रधर्मांतील मुख्य अंग. तत्साधनार्थ शिवाजी महाराजांचे सर्व प्रयत्न चालले होते. दुर्दैवानें शिवाजी महाराजांचा अस्सल लेख अद्यापपर्यंत एखादा दुसराच उपलब्ध आहे. काव्येतिहाससंग्रहांतील ४११ वें पत्र शिवाजीमहाराजांनीं १६५९ त लिहिलें आहे. त्यांत राज्य आक्रमिण्याकरितां परराज्यांतील देसाई, देशपांडे यांस ते काय काय लालुचा दाखवून बांधून घेत असत हें अंशतः कळण्यासारिखें आहे. ह्या पत्राचा सबंद उतारा खालीं देतों.

तहनामा राजश्री खेमसावंत व लखमसावंत देसाई बहादूर प्रांत कुडाळ यांजकडील पितांबर शेणवई कारभारी येऊन ठराव करून दिला. सुरू सन तिस्सा-खमसैन अलफ.

प्रांत मजकूरचे महाल वगैरे चालत आहेत. आकार होईल त्याचा ऐवज दरसाल निम्मे हुजूर पावता करावा. निम्मा आकार राहील त्यांत तीन हजार लोक पायदळ हेटकरी ठेवावे आणि ज्या वेळेस हुजूर चाकरीस बोलाविले जातील तेव्हां तीन हजार लोकांनिशीं सेवा करावी.

स्वराज्य साधनाच्या ठायीं वकिलापाशीं मध्यें राहून तुरुक लोकांचें साधान करावें ..... कलम १.

प्रांतांतील जमाबंदीच्या चौकशीस हुजरून कारकून व लोक राहतील ते ठेवून त्यांच्या नेमणुकीबद्दल हुजूर अम्मलपैकीं पावतें करावें..... कलम १.

खासा जातीनें येण्याचें प्रयोजन पडेल तेव्हां बोलावणें होईल. तेव्हां येत असावें. ... ... कलम १.

किल्ले फोंडो प्रांत तालुका घेऊन हुजूर ठेविला त्यास हरएक प्रसंगास कुमक राखीत जावी. बिदनूर वगैरे संस्थानच्या खंडण्या घेण्यास स्वारी होईल त्यांच्या कुमकेस जात असावें. .... कलम १.

प्रांतमजकुरची देशकत वतनें तुमचीं व बहादूर किताब अजरामत चालेल. त्यांतील किल्ले, कोट व ठाणीं तुमच्या स्वाधीन केलीं आहेत. तेथें दास्तान करून जतन करावीं. तेथें हुजूरचे कारकून व लोक येतील ते ठेवावे..... कलम १.

शके १५८० विलंबीनामसंवत्सरे फाल्गुन वद्य ७ एकूण पांच कलमें करार करून तहनामा दिला असे. मोर्तब.

हा तहनामा १६५९ च्या मार्चांत झाला आहे. ह्याचा उल्लेख ग्रांटडफ्नें १६५९ सालच्या हकीकतीखालीं केला आहे. ह्यांत स्वराज्यसाधनाचें कलम आहे. शिवाजीनें मुधोळच्या घोरपडयांस पाठविलेलें एक विस्तीर्ण पत्र मजजवळ आहे त्यांतहि हाच हेतु दर्शित केला आहे.

(ब) स्वराज्य, गनीमाई, सरदेशमुखी व चौथाई ह्या मागण्या मोंगलाईंतून मागण्याचा शिवाजीनें परिपाठ ठेविला. ह्यांत स्वराज्यसाधनाचा बराच इतिहास गर्भित आहे. आपण मोंगलाच्या राज्यांतील प्रांताचे सरदेशमुख आहोंत, मोंगलाच्या अमलांतील प्रांत पूर्वी मराठ्यांच्या स्वराज्यांत मोडत होता व मोंगल लोक मराठयांना गनीम म्हणत त्याअर्थी गनीमाईचा पैसा त्यांच्यापासून चोपून घेऊन उणें अक्षर बोलल्याची आठवण जन्मोजन्म त्यांना व्हावी, इत्यादि अर्थ ह्या शब्दापासून ध्वनित होतात.

(क) महाराष्ट्रधर्मांत म्हणजे महाराष्ट्रसंस्थांत अष्टप्रधानघटित राज्यव्यवस्थेचाहि अंतर्भाव होतो. राष्ट्राच्या कल्पनेंत राष्ट्रभाषेचाहि समावेश होतो. शिवाजीराजे अवतीर्ण होईतोंपर्यंत दक्षिणेंतील मुसुलमानांच्या संसर्गानें जावली, शृंगारपूर इत्यादि स्थलींच्या मराठया राजांच्या दरबारीं व शिवाजी राजाच्या पराक्रमाला सुरुवात होऊन त्यांच्या अभिषेककालापर्यंत खुद्द शिवाजीच्या दरबारीं देखील निरुपायानें फारसी व मुसुलमानी भाषेंतील शब्दांचाच प्रचार उत्कटत्वेंकरून सर्वत्र चालत असे. ह्या परदेशीय प्रचारामुळें स्वराज्याची व स्वराष्ट्राची शुद्ध कल्पना मराठयांच्या मनांत गढूळ व अस्पष्ट असण्याचा संभव होता. म्हणून शिवाजीनें फारशी शब्द टाकून त्यांच्या ऐवजीं संस्कृत व महाराष्ट्र शब्दांचा उपयोग करण्याचा परिपाठ घातला.

येणेंप्रमाणें स्वराज्य साधून महाराष्ट्रधर्म वाढविण्याचा विचार शिवाजीच्या राजनीतींत प्रधान होता. संभाजीराजालाहि महाराष्ट्रधर्म पसरविण्याचा उपदेश

समर्थांनीं केला आहे. राजाराम व त्याच्या वेळचे मुत्सद्दी व सेनापति ह्यांनींहि हा स्वराज्यसाधनाचा कित्ता उत्तम गिरविला. पुढें शाहूमहाराज आले. त्यांनीं १७०७ पासून १७१४ पर्यंत जो प्रांत ताराबाईच्या हातून त्यांना मिळाला तेवढ्याची व्यवस्था करून नंतर १७१४ त बाळाजी विश्वनाथास स्वराज्यसाधन करण्याकरितां मतलबाची खालील याद करून दिली.

१ स्वराज्य थोरले कैलासवासी स्वामींचे वेळेप्रो रायगड व वरकड कोट देखील करून घेणें–ठाणीं मागून घेणें ... ... कलम.

१ खटाव १ आकळूज १ कासेगांऊं १ मंगळवेढें. १ मिरज. १ पेडगांव १ जुन्नर किल्ले समत. १ चौल समत किल्ले. १ सांगोलें १ नाझरें. १ चाकण. १ बेळगाऊं. १ कल्याण भिवंडी समत किल्ले ... ... कलम.

१ त्रिंबक मागोन घेणें ... कलम.

१ तोफा दर संस्थानीं घेतील त्यांची चौथाई करून घेणें. ... ... कलम.

१ चांदाचें राज्य कान्होजी भोंसले यांनीं साधिलें आहे तें स्वराज्यांत करून घेणें. ... ... कलम.

१ सहा सुभे खेरीज गुजराथ, माळवा साधेल तेथवर साधणें. ... ... कलम.

१ नबाब बल्लोलखानाची दौलत फत्तेसिंगबाबाचें नांवें करून घेणें ... ... कलम.

१ मातुश्री व मदनसिंग देखील कबिले व दुर्गाबाई सेवक लोक मागोन घेणें. ... ... कलम.

१ पेशजी मतलब लिहून दिल्हे आहेत त्याचे फर्मान सनदा करून घेऊन येणें ... ... कलम.

१ कोंकणपट्टी देखील राजपुरी चौथ सरदेशमुखी, स्वराज्य व वरकड साधेल त्याचे फर्मान पृथकाकारें करून घेणें. ... ... कलम.

१ सरदेशमुखी इनाम दरमहालास एक गांव करून घेणें. ... ...कलम.

१ चंदीप्रांतीं राज्यगडकोट देखील करून घेणें. ... ...कलम.

१ जयसिंग पालकर येथील तरी मागून घेणें. ... . कलम.

ह्या यादींतील मतलबाचें साधन करण्याकरितां बाळाजी विश्वनाथ १७१८ त हुसेनअल्लीबरोबर दिल्लीस गेला. १७१९ च्या फेब्रुवारींत व मार्चांत वर दिलेल्या यादींतील स्वराज्याच्या मतलबाच्या सनदा सय्यदबंधूंकडून त्यानें करून घेतल्या; त्या सनदा घेऊन तो साताऱ्यास परत आला व थोड्याच दिवसांत म्हणजे १७१९ च्या आक्टोबरांत मरण पावला. बाळाजी विश्वनाथाच्या मृत्यूचा सन १७२० आक्टोबर असावा असें ग्रांटडफ् म्हणतो तें मला अनेक कारणांकरितां ग्राह्य दिसत नाहीं. पुढें १७२० च्या एप्रिलांत बाजीरावाला पेशवाई मिळाली. त्या वेळीं बाळाजी विश्वनाथाला

दिलेली यादी शाहूनें बाजीराव बल्लाळाला दिली (भारतवर्षांतील पत्रें व यादी ४०).* कारण कीं, बाळाजी विश्वनाथ दिल्लीहून जे फर्मान घेऊन आला त्यांची अंमलबजावणी करण्यास तो जगला नाहीं. तेव्हां बाजीरावाला पेशवाई देतांना साधावयाच्या राहिलेल्या मतलबांची याद जशीच्या तशीच शाहूनें त्याच्या स्वाधीन केली. बाजीरावाच्या कारकीर्दींतील पहिलीं दहा अकरा वर्षें ह्या यादींतील मतलब साधण्यांत गेलीं. १७३१ साच्या सुमाराला बाजीरावानें वरील यादींतील कलमें सर्व साधिलीं. येथपर्यंत म्हणजे १७३१ पर्यंत स्वराज्यसाधनार्थ मराठ्यांच्या सर्व खटपटी झाल्या. ह्यापुढें आतां मराठ्यांच्या राजनीतीनें दुसरें स्वरूप धारण केलें. तें स्वरूप म्हणजे हिंदुपदबादशाहीची स्थापना करणें हें होय.

हिंदुपदबादशाहीची स्थापना

हिंदुपदबादशाहीची स्थापना करण्याची प्रस्तावना बाजीरावानें शाहूपुढें केलेली सर्वश्रुत आहेच. १७३१ पासून १७४० पर्यंत बाजीरावाची सर्व खटपट ह्याच स्थापनेच्या प्रीत्यर्थ झाली. दक्षिणेस तुंगभद्रा, उत्तरेस यमुना, पश्चिमेस समुद्र व पूर्वेस निजामुल्मुल्काचा प्रांत व पूर्वसमुद्र ह्या वाढत्या हिंदुपदबादशाहीच्या सीमा झाल्या. हें एवढें काम करून बाजीराव बल्लाळानें आपला अवतार संपविला. बाजीरावाच्या पश्चात् राज्याची धुरा बाळाजी बाजीरावानें उचलली. १७४० पासून १७५० पर्यंत बाजीरावानें जिंकलेल्या प्रदेशांची व्यवस्था करण्यांत बाळाजीचा काळ गेला व अधून मधून काशी, प्रयाग, कटक, गढेमंडळ, बहादुरभेंडा इत्यादि प्रदेशांकडे आपली दृष्टि फेंकिली. परंतु ही दृष्टि रघोजी भोंसल्याचा पाडाव करण्यापुरती व दक्षिणेंत पूर्वापार चालत आलेले हक्क प्रस्थापित करण्यापुरती होती. १७५० पर्यंत मराठ्यांचें आधिपत्य सातारच्या छत्रपतींकडे होतें. त्यांच्या नांवानें हिंदुपदबादशाहीचा प्रसार व स्थापना करण्याची मेहनत बाजीराव बल्लाळानें व बाळाजी बाजीरावानें केली. शाहूराजापेक्षां मुत्सद्देगिरीनें व पराक्रमानें बाजीराव बल्लाळ अतिच श्रेष्ठ होता. परंतु शाहूचें आधिपत्य कमी करण्याकडे त्याचा बिलकुल कल नव्हता. बाळाजी बाजीरावाला पेशवाई मिळाल्यापासून मात्र शाहूचे व त्याच्यानंतर येणाऱ्या छत्रपतींचें माहात्म्य कमी करण्याचा प्रयत्न झाला. शाहू असे तोंपर्यंत

---

* भारतवर्षांत छापिलेल्या पत्रें व यादींतील ४० वें पत्र व काव्येतिहाससंग्रहांत छापिलेल्या थोरल्या शाहूमहाराजांच्या चरित्रांतील ४० व्या पृष्ठावरील याद अक्षरशः एकच आहेत. भेद म्हणून एवढाच कीं, चरित्रांतील याद बहुतेक शुद्ध छापलेली आहे व भारतवर्षांतील याद येथून तेथून चुकांनीं ओथंबलेली आहे. तुलना करण्याकरितां भारतवर्षांतील याद जशीच्या तशीच येथें देतों.

बाह्यात्कारें छत्रपतींची सेवा अनन्यभावें करण्याचा बाळाजीनें बहाणा केला व तो वारल्यानंतर रामराजा गादीवर आला असतां त्याची पायमल्ली बाळाजीनें.

यादी मतलब घेणें म्हणोन शाहूमहाराज यांणीं बाजीराव बल्लाळ यांजकडे पाठविली तीः—

श्री.

यादी मतलब करून घेणें.

स्वराज्य थोरले कैलासवासी स्वामींचेप्रमाणें " रायगडावरकड " गडकोट देखील करून घेणें.

ठाणीं मागोन घेणें.

१ खटाव.
१ आकलुज.
१ कासेगांव.
१ सांगोलें.
१ मंगळवेढें.
१ नाझरें.
१ मिरज.
१ चाकण.
१ पेडगांव.
१ " बालेगड ".
१ जुन्नर " समेत " किल्ले.
१ कल्याण भिंवडी "समेत" किल्ले.
१ चेऊल " समेत " किल्ले.

१३

" तालुके " दरसंस्थांनीं करून " घेतला" त्याची चौथाई करून घेणें.

नवाब " बाकीखानाची " दौलत फत्तेसिंगबाबाचे नांवें करून घेणें.

चांदाचें राज्य कान्होजी भोंसले याणीं साधिलें आहे, तें स्वराज्यांत करून घेणें.

" चंदीप्रांतीचें राज्य गडकोट देखील करून घेणें. मातोश्री व "मर्दानसिंग " देखील " कदीम " व दुर्गाबाई, जानकीबाई व सेवक लोक " मागील " घेणें.

पेशजी मतलब लिहून दिले आहेत, त्याचे फर्मान सनदा करून घेणें.

कोंकणपट्टी देखील राजपुरी चौथ व सरदेशमुखी, स्वराज्य व वरकड " साधले " त्याचे फर्मान " पृथक् कोरे " करून घेणें.

सरदेशमुखीस इनाम दरमहा " कसगांव " करून घेणें.

जैसिंग पालकर येतील तरी मागोन घेणें.

त्रिंबक मागोन घेणें

" सांभाळून " याखेरीज गुजराथ माळवा साधेल तेथवर साधणें

येणेंप्रमाणें खमग्ग़ाम करून घेणें. बहुत लिहिणें तरी सुज्ञ असा. मोर्तब असे,

मनःपूत परंतु, मोठ्या युक्तीनें केली. बाळाजीच्या खऱ्या पराक्रमाला व त्याच्या मनांत घोळत असलेल्या अवाढव्य हेतूंना स्वरूप शाहूच्या मरणानंतर म्हणजे १७५० पासून येऊं लागलें. ह्या वर्षापासून बाळाजी मराठ्यांचा खरा पुढारी झाला व सातारच्या छत्रपतीचें आधिपत्य अस्तास गेलें. ह्या १७५० सालापासून तों १७६१ सालापर्यंत सर्व भरतखंड महाराष्ट्रमय करून टाकण्याचा बाळाजीनें उद्योग केला. सारांश, ह्या १७५० सालापासून ब्राह्मणपदबादशाहीचा प्रारंभ झाला व हिंदुपदबादशाही हा शब्द मागें पडला.

ब्राह्मणपदबादशाहींत रूपान्तर

पुढील विवेचनांत बाळाजीनें १७५० पासून १७६१ पर्यंत बहुतेक सर्व हिंदुस्थानभर मराठ्यांची सत्ता प्रस्थापित कशी केली व खुद्द महाराष्ट्रांत सातारच्या छत्रपतीचें व त्यांच्या राजमंडळाचें महत्त्व कमी करून आपलें महत्त्व कसें स्थापिलें ह्याचा विचार केला आहे.

ह्या १७५० सालापासून हिंदुपदबादशाहीच्या ऐवजीं ब्राह्मणपदबादशाहीचें नांव नव्यानेंच ऐकूं येऊं लागलें. सातारच्या महाराजांचें प्रस्थ ह्या सालापासून अगदींच मावळलें व पेशवे मराठेमंडळाचे मुख्य झाले. ही क्रांति कशी घडून आली तें ह्या विवेचनांत स्पष्ट करितों.

शाहूराजाच्या मृत्यूनंतर १७५० च्या जानेवारीपासून पुढें सर्व हिंदुस्थान व सर्व दक्षिण, महाराष्ट्रमय करण्याचा प्रयत्न बाळाजीनें केला व सदाशिव चिमणाजी तर खुद्द रूमशामची सरदेशमुखी पटकविण्याच्या गोष्टी बोलूं लागला. १७५० पासून १७६१ पर्यंतच्या ११ वर्षांतील बाळाजी बाजीरावाच्या धोरणाचें खालीं लिहिल्याप्रमाणें पृथक्करण करितां येतें. (अ) हिंदुस्थानांत पश्चिमोत्तर दिशेनें उत्तर रजपुताना, अंतर्वेद, रोहिलखंड, मुलतान, लाहोर, ठट्ठा व भकर ह्या प्रांतांत अंमल बसवावयाचा (लेखांक १). (ब) हिंदुस्थानांत पूर्वेकडे काशी, प्रयाग, अयोध्या,

---

मोडी वाचण्याच्या चुका ह्या एका पत्रांत सुमारें १६।१७ झाल्या आहेत. भारतवर्षाच्या संपादकांनीं काव्येतिहाससंग्रहांतील यादी वाचण्याची खटपट केली असती तर ह्या चुका झाल्या नसत्या. ह्या मासिकपुस्तकांत मोडी वाचनाच्या इतरत्रहि अशाच चुका झाल्या आहेत. बऱ्याच टिपा इतिहासाला सोडून लिहिलेल्या आहेत. ह्या पत्राला भारतवर्षकारांनीं एक टीप दिली आहे, तींत ही याद शाहूनें बाजीराव बल्लाळाला पाठविली नसावी असा साशंक व साश्चर्य ध्वनि काढिला आहे. परंतु ही याद बाजीराव बल्लाळालाच शाहूनें पाठविली हें वरील विवेचनांत स्पष्ट केलें आहे.

बंगाला इत्यादि प्रदेशांवर मोहीम करावयाची (काव्येतिहाससंग्रह, पत्रें व यादी ३६२, ३७३, ३८७, ३८८. प्रस्तुत ग्रंथांतील लेखांक ३१, ३७, ३९ इत्यादि). (क) दक्षिणेंत पूर्वेकडे सलाबतजंगाचा प्रदेश घ्यावयाचा; ऐन कर्नाटकांत श्रीरंगपट्टणाला हिंदुराजांच्या ताब्यांत तें होतें तोंपर्यंत अंकित करून टाकावयाचें व पुढें मुसुलमानांच्या ताब्यांत गेल्यावर जिंकून घ्यावयाचें. (ड) कोंकणांत सुरत, जंजिरा वगैरे ठिकाणें खालसा करावयाचीं. (ई) खुद्द महाराष्ट्रांत सातारची व कोल्हापुरची गादी एक करावयाची. (फ) आणि सरदारांची व्यवस्था लावावयाची. येणेंप्रमाणें बाळाजी बाजीरावाच्या राजनीतीचें धोरण सहा प्रकारचें होतें. पैकीं (अ), (ब), (क), (ड) आणि (फ) ह्या प्रकारांची माहिती ह्या पुस्तकांत, काव्येतिहाससंग्रहांत व ऐतिहासिक-लेखसंग्रहांत छापलेल्या पत्रांतून बरीच आली आहे. त्यावरून त्या वेळच्या महाराष्ट्रमुत्सद्यांच्या मनांत कांहीं विशिष्ट हेतु होते व तत्सिद्धयर्थ त्यांचे व्यवस्थित प्रयत्न चालले होते हें स्पष्ट दिसून येईल.

पश्चिमोत्तर दिशेकडील प्रदेश दिल्लीच्या पातशहानें १७५० त मराठ्यांना बहाल करून टाकिले. तेव्हां १७६१ पर्यंत त्यांत अंमल बसविण्याचा उद्योग करणें त्यांना अवश्यच झालें होतें. ..... अबदालीला तंबी देण्याचें वचन मराठ्यांनीं १७५० त पातशहाला दिलें होतें. तेव्हांपासूनच अबदालीचा व मराठ्यांचा सामना होणार हें ठरून गेल्यासारिखें होतें. रघुनाथरावानें १७५८ त लाहोर घेतलें. त्यामुळें अबदाली चवताळला व मराठ्यांच्या अंगावर पानिपतचा घोर प्रसंग आला असें ग्रांट्डफ् म्हणतो, तें फारसें विश्वसनीय नाहीं. हें १७५० तच अबदालीला तंबी देण्याचा मराठ्यांनीं पत्कर घेतला होता ही गोष्ट ध्यानांत धरिली म्हणजे कळून येईल व रघुनाथरावाला विनाकारण दोष देण्यांत अर्थ नाहीं अशी खात्री होईल. पूर्वेकडील काशी व बंगाला हे प्रदेश घेण्याचा बाळाजीचा १७४२ पासूनच प्रयत्न चालला होता. १७४७ त स्वतः बाळाजी काशींत जाऊन आला. १७५२ च्या डिसेंबरांत भालकीचा तह झाल्यावर जयाप्पा १७५३ च्या मेंत हिंदुस्थानांत जावयास निघाला त्यावेळीं काशीचें काम उरकून घ्यावयाची कामगिरी बाळाजीनें जयाप्पाला सांगितली होती. पुढें जयाप्पा कुंभेरचा वेढा झाल्यानंतर काशीकडे जाणार तों त्याला नागोरची कामगिरी आली व काशीचें काम तसेंच तहकूब ठेवून द्यावें लागलें. तरी देखील विजेसिंगाचें पारपत्य केल्यावर काशीकडे जाण्याचा त्याचा उत्कट मनोदय होता. लेखांक ३१ त १७५४ च्या मार्चांत बाबूराव महादेवाला जयाप्पा लिहितो, "तुमचा उपराळा करून श्रीचें काम शेवटास न्यावें यापरतें दुसरें अधिकोत्तर नाहीं". पुढें १७५४ च्या आगष्टांत जयाप्पा पुनः लिहितो, "त्यांचें पारपत्य यथायुक्त करून श्रीक्षेत्रांत अंमल खुलासा करणें हे गोष्ट चित्तांत फारशी आहे." जयाप्पा १७५५ त वारल्यानंतर १७५९ त दत्ताजीला काशी,

प्रयाग व बंगाल ह्या प्रांतांवर स्वारी करण्यास बाळाजीनें सांगितलें; परंतु, अब्दालीच्या गडबडीमुळें तें काम तसेंच राहिलें व पुढें कधीं श्री मराठ्यांच्या हातांत आली नाहीं. दक्षिणेंत सलाबतजंगावर १७५१, १७५२, १७५७ व १७६० ह्या सालीं पुण्याकडून व १७५३, १७५४ व १७५५ ह्या सालात खानदेश, अलजपूर, येलगंदल वगैरे प्रांतांच्या रोखें मराठ्यांनीं सलाबतावर स्वाऱ्या केल्या व त्याच्या हातांतून " बहुतेक सगळी दक्षिण १७६० त मोकळी केली " (लेखांक १६६). १७५१ त चार लाखांचा मुलूख, १७५२ त पन्नास लाखांचा मुलूख, १७५७ त पंचवीस लाखांचा मुलूख व १७६० त साडेएकसष्ट लाखांचा मुलूख सलाबतापासून बाळाजीनें घेतला. शिवाय १७५५।५६ त पंधरा लाखांचा मुलूख परशुराम महादेवाच्याहस्तें मिळाला, तो निराळाच (लेखांक ६५). तसेंच जानोजी भोंसल्यानेंहि पाईनगंगेच्या अलीकडे आपलें घोडें बरेंच ढकलिलें होतें. साराश, १७६० त सलाबताजवळ तेलंगणाचा पट्टा तेवढा उरला होता. बाकीचा सर्व मुलूख मराठ्यांच्या ताब्यांत आला होता.

१७५९ पर्यंत बहादूरभेंडा, बेदनूर, होळांहोन्नूर, सावनूर, सोंधें वगैरे ठिकाणचे पाळेगार बहुतेक सर्व पादाक्रांत करून पेशव्यानीं म्हैसूरचें राज्य बहुतेक संपुष्टांत आणिलें. पुढें तें संस्थान हैदरअल्लीच्या ताब्यांत गेलें. तेव्हां तें अजीबात खालसा करावें असा सदाशिवरावभाऊचा मनोदय होता. परंतु, अबदालीच्या गडबडीमुळें तें काम लांबणीवर टाकणें भाग पडलें. कोंकणांत शामळाची कासें, उंदेरी वगैरे स्थलें व तुळाजीचें विजयदुर्ग वगैरे किल्ले बाळाजीनें घेऊन, बहुतेक सर्व कोंकणपट्टी सोडवून घेतली. येणेंप्रमाणें १७६० पर्यंत, लाहोर, मुलतान, ठट्टा, भकर, अंतर्वेद, रोहिलखंड, कटक, नागपूर, माळवा, गुजराथ, काठेवाड, खानदेश, औरंगाबाद, विजापूर, कोंकण व किल्ले कोपलपर्यंत सर्व मुलूख मराठ्याच्या साक्षात् अमलाखालीं बाळाजींच्या राजनीतीनें आणिला. येथपर्यंत मजल आणून ठेपल्यावर महाराष्ट्रधर्माचा प्रसार आणीक करावयाचा तों अबदालीची धाड आली आणि कांहीं कालपर्यंत आहे तेंच राखण्याच्या खटपटींत पेशव्यांस पडावें लागलें. ती खटपट १७६१ च्या पुढली असल्यामुळें तिचा विचार मी येथें करीत नाहीं. इतकेंच सांगून ठेवितों कीं, ह्याहि खटपटींत व्यवस्थित धोरण होतें (भारतवर्षांतील पत्रें, यादी वगैरे ८, कलमें ३।४।८।११). हे इतकें महाराष्ट्रधर्माचा प्रसार व ब्राह्मणपदबादशाहीची प्रस्तावना व विस्तार करण्याकरिता मराठ्यांनीं काय काय खटपटी केल्या तत्संबंधीं झालें. आतां पुढील विवेचनात सातारच्या छत्रपतींची व्यवस्था करण्यांत पेशव्यांचें काय धोरण होतें त्याचा विचार करितों.

पेशव्यांचें छत्रपतीसंबंधीं धोरण

महाराष्ट्रधर्माचा म्हणजे संस्थांचा प्रसार व ब्राह्मणपदबादशाहीची स्थापना करणें हें बाळाजीच्या राजनीतीचें सर्वस्व होतें. ह्या मतलबाच्या सिद्धयर्थ महाराष्ट्रांत

व महाराष्ट्राच्या बाहेर त्यांचे प्रयत्न चालले होते. पैकीं महाराष्ट्राच्या बाहेर त्यानें काय खटपटी केल्या त्याचें दिग्दर्शन वरील विवेचनांत केलें आहे. आतां खुद्द महाराष्ट्रांत त्यानें काय खटपट केली तें सांगतों. बाळाजी विश्वनाथापासून बाळाजी बाजीरावासुद्धां सर्व पेशव्यांचा मुख्य हेतु स्वतःचें महत्त्व सर्वांहून अधिक वाढविण्याचा होता. धनाजी जाधवाच्या मृत्यूनंतर चंद्रसेन जाधव शाहूचा सेनापति झाला. त्याला बाळाजी विश्वनाथानें प्रथम पिटून लाविलें. नंतर त्यानें बहिरोपंत पिंगळ्याला एकीकडे मारिलें व आपण मुख्य प्रधानकीचा अधिकार म्हणजे मराठ्यांचें धुरीणत्व मिळविलें. बाजीरावाचे मुख्य प्रतिस्पर्धी म्हटले म्हणजे श्रीपतराव प्रतिनिधि, त्रिंबकराव दाभाडे व रघोजी भोंसले हे होत. ह्यांपैकीं पहिल्या दोघांचें महत्त्व १७२१ च्या आंत त्यानें पूर्णपणें नाहींसें केलें व पुढील ९ वर्षें मराठ्यांचें धुरीणत्व अनन्यसामान्यत्वेंकरून चालविलें. रघोजीचें प्रस्थ कांहीं राहिलें होतें तें बाळाजी बाजीरावानें १६ जानेवारी १७४४ त मोडून त्याला आपला स्नेही केलें.

शाहूच्या मृत्यूनंतर १७५० सालीं बाळाजीचे लहानसहान प्रतिस्पर्धीहि वर डोकें करूं लागले व काहीं वेळ त्याचे स्नेहीसुद्धां त्याच्याविरुद्ध उठले. ताराबाई, जगजीवनराव प्रतिनिधी, यमाजी शिवदेव, बाबूराव बारामतीकर, दमाजी गायकवाड व दाभाडे ह्यांना जागच्याजागीं बसविण्यांत बाळाजीला १७५० पासून १७५३ पर्यंत खटपट करावी लागली. ह्या अवधींत सदाशिव चिमणाजी व रामचंद्रबाबा शेणवई ह्यांना देखील प्रतिस्पर्धेच्या पिशाचिकेनें सोडिलें नाहीं. खुद्द रामराजाहि बाळाजीविषयीं उदासीन राहूं लागला. तेव्हां पहिल्या दोघांना मायावीपणानें फितवून बाळाजीनें रामराजावर आपला सर्व राग काढिला. सातारच्या छत्रपतींविषयीं बाळाजी बाजीरावाच्या मनांत फारशी प्रेमबुद्धि कधींच नव्हती. खुद्द शाहूमहाराजांशींहि बाळाजी बाजीरावाचें वर्तन धरसोडीचेंच होतें. परंतु बाळाजी बाजीरावानें हें धरसोडीचें वर्तन प्रथम घालून दिलें असें मात्र कोणीं समजूं नये. १७४० त चिमाजीअप्पा कोंकणांत असतां कांहीं राऊत गोवळकोंड्याकडे पाठवून द्यावे म्हणून शाहूनें चिमाजीला लिहिलें. तें चिमाजीला मान्य न होऊन चिमाजीचा व शाहूचा बराच खटका उडाला (भारतवर्ष पत्रें व यादी ३८).

एकछत्री मराठी राज्य स्थापूं पाहणारा बाळाजी

बाळाजी बाजीरावानें पेशवाईचीं वस्त्रें १७४० त घेतलीं. तीं त्याला महत्प्रयासानें प्राप्त झालीं. कां कीं रघोजी भोंसल्यानें बाबूजीनाईक बारामतीकराला पेशवाई देवविण्याचा घाट घातला होता. परंतु महादोबा पुरंधरे व गोविंदराव चिटणीस ह्यांच्या विद्यमानें बाळाजीनें कशीतरी पेशवाई मिळविली. ह्यावेळीं जो त्रास झाला त्याचा सूड बाळाजीनें अंतःस्थ रीतीनें उगवून घेतला. इहिदे आर्बैन रौद्री नामसंवत्सरीं

म्हणजे इ. स. १७४० सालीं कोल्हापूरचे संभाजी महाराज साताऱ्यास आले असतां त्यांच्याशीं बाळाजी बाजीरावानें एक गुप्त करार केला. त्यांत खालील कलम आहे :– "शाहूमहाराज यांचा जीवात्मा आहे तों बाह्यात्कारी त्यांचे सेवक, अंतर्यामी स्वामींचे. शाहूमहाराज यांणीं कैलासवास केल्यावर दोहीं राज्यांवर स्वामींची (सत्ता) आणि आम्ही सेवक स्वामींचे" (काव्येतिहाससंग्रह, पत्रें, यादी वगैरे ४२८।४२९). ह्याप्रमाणें शाहूवर सूड उगविल्यानंतर, त्यानें रघोजीचा समाचार घेतला. १७४३ त रघोजीचा पराभव करून १७४४ त रघोजी साताऱ्यास आला असतां शाहूकडून रघोजीला हिंदुस्थानांतील प्रांतांची वांटणी करून देविली (भारतवर्ष, ४६।४७।४८।४९). रघोजीच्या गर्वाचा परिहार केल्यावर त्यानें बाबूजीनाईकावर दृष्टि फिरविली. नाईक, सोंधें बिदनूर, सावनूर वगैरे संस्थानिकांच्या प्रांतांत जाऊन चौथ सरदेशमुखी गोळा करीत असे. सावनूरच्या पठाणाला व इतर संस्थानिकांना आंतून फूस देऊन नाईकाचें सर्वस्वीं नुकसान करण्याचें बाळाजीनें आरंभिलें. (का. पत्रें, यादी वगैरे ६७।६८।७७।७८). बाळाजीनें शाहूला, रघोजीला व बाबूजी नाईकाला हा असा त्रास दिला. शिवाय, शाहूचें कर्ज फेडण्यास बाळाजी विलंब लावूं लागला. शाहूच्या राण्यांचींहि कर्जें फेडण्यास बाळाजी अळमटळम करी. तेव्हां शाहूला बाळाजीचा राग अर्थातच आला व १७४७ त बाळाजीचा अधिकार काढून घेण्याचा त्यानें विचार केला. ह्या प्रसंगाला अनुलक्षून भारतवर्षांतील नंबर ४५ चें पत्र आहे.* त्यावरून बाळाजीला निरोप देण्याचा शाहूचा विचार होता हें स्पष्ट होतें. शाहूला ह्यावेळीं बहुतेक वेड़ लागण्याचा समय येऊन तो पुढें दोन वर्षांनीं १७४९ साच्या डिसेंबराच्या १५ तारखेला मरण पावला. शाहूच्या मरणापूर्वी तीन महिने बाळाजी साताऱ्यास येऊन बसला होता व महाराजांच्या मरणोत्तर गादीवर कोणास बस-

---

* ह्या पत्रांत भारतवर्षकार, नाईक कोण म्हणून विचारतात ते हे बाबूजी-नाईक बारामतीकर होत. भाऊंनीं १७४६ आक्टोबरपासून १७४७ च्या मेपर्यंत सावनुरावर व बहादूरभेंड्यावर स्वारी केली (काव्येतिहाससंग्रह, पत्रें, यादी ६८). त्यावेळीं ते सोंधें बिदनूर प्रांताजवळ असल्याकारणानें गोवेंकरांना सहजासहजीं भीति वाटून सांवतांकडील पोर्टुगीज लोकांचा शह चुकेल अशी बाळाजीची अटकळ होती (पत्रें, यादी वगैरे ७७।७८). सावनूरचा नबाब सोंध्याकडे आला म्हणजे सदाशिवराव-भाऊला शह बसून गोवेंकरांचा शह उडून जाईल असें बाळाजीचें म्हणणें होतें. ह्यासंबंधीं बोलणें करीत बाळाजी साताऱ्यास असतांना हें पत्र लिहिलें आहे. शाहूनें बाळाजीची स्वामिभक्ति पाहण्याच्या इच्छेनें त्याला निरोप देण्याचें म्हणजे काढून टाकण्याचें ढोंग केलें म्हणून शाहूमहाराजांच्या बखरींत लिहिलें आहे. परंतु, शाहूचें हें ढोंग नसून मनःपूर्वक करणें होतें हें स्पष्ट आहे.

वावें ह्या खटपटींत निमग्न होता. सातारच्या गादीला त्यावेळीं हक्क सांगणारे दोन पुरुष होते. (१) पहिला हक्कदार, ताराबाईचा नातू रामराजा व (२) दुसरा, कोल्हापूरचा संभाजी राजा. पैकीं संभाजी राजाकडे बाळाजीचा १७४० पासून ओढा होता हें वर सांगितलेंच आहे. परंतु, तो शाहूमहाराजांना पसंत नव्हता. राजाराम महाराजांचा वडील पुत्र जो शिवाजी त्याचा मुलगा रामराजा हयात आहे असें शाहूला नुकतेंच कळलें होतें. तेव्हां त्याला दत्तक घेऊन राज्य चालवावें असें शाहूचें साग्रह व सशास्त्र म्हणणें पडलें. त्यावेळीं बाळाजीला शाहूनें एक चिठ्ठी लिहिली आहे ती खालीं देतों.

* "राजमान्य राजश्री बाळाजी प्रधान पंडित यांस

आज्ञाः—

तुम्ही फौज धरनें. आज्ञा केली त्याच्या दैवीं नाहीं.

महाराजास दुखनें झालें. नाहीं;[1] बरें होत नाहीं. राज्यभार चालला पाहिजे. तरी पुढें वंश[2] बसवन. कोल्हापुरचें न करनें. चिटणिसास सर्व सांगितलें तसें करनें. वंस होईल त्याच्या आज्ञेंत चालनें. राजमंडळ चालवनें. चिटणीस स्वामीचे इसवासू. त्याच्या विचारें राज्य राखनें. वंस होईल तो तु †† करनार नाहीं. सुदन असा."

ह्या चिठ्ठीवरून बाळाजीवर शाहूचा फारसा विश्वास होता असें दिसत नाहीं. रघोजी भोसले व दाभाडे ह्यांना बोलाविलें असतां ते येऊं पावले नाहींत. तेव्हां "फौज धरनें" त्यांच्या दैवीं नाहीं अशीं शाहूची खात्री झाली. त्यांना सामर्थ्य असतें व अक्कल असती तर ते महाराजांच्या आज्ञेबरहुकूम केव्हांच येऊन पावते. ते आले नाहींत तेव्हां बाळाजीच्या स्वाधीन फौजेचा (१)अधिकार देण्याखेरीज शाहूला गत्यंतरच राहिलें नाहीं. बाळाजीचा ओढा संभाजीराजाकडे विशेष. तेव्हां (२) त्याला बिल-

---

* ही चिठ्ठी काव्येतिहाससंग्रहांत छापलेली प्रसिद्ध आहे. विराम चिन्हें देऊन तीमीं येथें छापिली आहे. १ नाहींच्या बद्दल कांहीं, २ 'वंश' ह्याबद्दल वंस, †† ह्या फुल्यांबद्दल 'ह्यास अंतर' शब्द असावे असें सुचविणें मला योग्य वाटतें. मूळ लेखाची जशीच्या तशी नकल काव्येतिहाससंग्रहांत छापिलेली नाहीं. कारण, झालें, वंश, इत्यादि शब्द मूळांत जाले, वंस, असे लिहिले असले पाहिजेत. अस्सल लेख जशाचा तसा मिळाल्यास अनेक शंकांचें निवारण होईल. (अ) अक्षर शाहूचें आहे कीं नाहीं तें कळेल. (ब) कागदावरून व शाईवरून लेख बनावट आहे कीं काय त्याचा निर्णय होईल. (क) व मूळ लेखांतील अक्षरें जशींच्या तशींच काय आहेत तीं कळतील. चिटणीसांच्या बखरींतील हकीकतीवरून हा लेख अस्सल असावा असें बव्हंशीं म्हणण्यास हरकत नाहीं. इतकेंच कीं बखर लिहिणाऱ्याच्या पूर्वजाच्या हातांत ही चिठ्ठी शाहूनें दिली असल्यामुळें, तिच्या खरेपणाविषयीं थोडा संशय येतो.

कुल आणूं नये असें शाहूनें लिहून ठेविलें. (३) वंश आहे तोच चालवावा म्हणजे राजारामाचा पुत्र जो शिवाजी त्याचा मुलगा रामराजा ह्याला गादीवर बसवावें ही शाहूची तिसरी आज्ञा होती. तसेंच (४) सरदार लोकांचेंहि पूर्वीप्रमाणेंच चालवावें अशी शाहूची चवथी आज्ञा होती. ह्या चार आज्ञांपैकीं फौजेचा अधिकार मिळविण्याकरितां बाकींच्या तीन आज्ञा मनांतून नसतांहि बाळाजीनें मान्य केल्या व पुढें समयानुसार रामराजाचें व सरदारांचें महत्त्व कमी करण्यास कमी केलें नाहीं व कोल्हापुरच्या संभाजीशीं पुढील दहा वर्षें मोठें प्रेमाचें वर्तन ठेविलें. इतकेंच नाहीं; तर रामराजा जिवंत असतां नवा राजा करावा असा त्यानें पुढें १७६१ त घाट घातला (लेखांक २८९).

बाळाजीची संभाजीराजावर किती ममता होती हें काव्येतिहासांतील ३३५ व्या पत्रांवरून कळून येईल. संभाजीराजा १७६० च्या डिसेंबरांत वारला. त्यानंतर १७६१ च्या जूनच्या ९ तारखेला हें पत्र लिहिलें आहे. त्यांत संभाजीशीं बाळाजीचा केवढा स्नेह होता तें जिजाबाईनें मोठ्या सलगीनें ध्वनित केलें आहे व स्पष्ट लिहिलेंहि आहे. कोल्हापुरची व सातारची गादी एक करावी व सर्व सत्ता आपल्या हातीं ठेवावी हा बाळाजीच्या मनांतला द्विविध हेतु होता. ही एकी करण्याची कल्पना शाहूराजाच्या डोक्यांत शिरली नाहीं. त्यामुळें 'करवीरचें न करनें' म्हणून बाळाजीला त्यानें आज्ञा केली. हा हेतु साध्य झाला असतां मराठ्यांचें राज्य एकछत्री झालें असतें अशी बाळाजीची योजना होती. परंतु, शाहूच्या हट्टामुळें व अज्ञानामुळें बाळाजीला हा फार दिवसांचा हेतु एकीकडे ठेवावा लागला आणि शाहूच्या आज्ञा त्या वेळेपुरत्या तरी शिरसा मान्य कराव्या लागल्या. ह्या आज्ञा मान्य करण्यांत बाळाजीचें अतोनात नुकसान झालें. दोन्हीं राज्यें एक होण्याची आयती संधि येत होती ती गेली ती गेलीच; परंतु, स्वतःची सत्ता कायम ठेवण्यास त्याला नंतर तीन वर्षें एकसारखी धडपड करावी लागली. कारण, रामराजा राज्यावर आल्यानें ताराबाईचें महत्त्व अतिशय वाढलें. १७०० त राजाराम महाराज वारल्यावर ह्या बाईनें त्या वेळच्या मुत्सद्यांच्या व शाहूच्या विरुद्ध वागून सर्वांचा द्वेष जोडिला होता. शाहूराजे १७०७ त मोंगलांच्या कह्यातून सुटल्यावर त्यांच्याशींहि १७१२ पर्यंत ह्या बाईनें वाद मांडिला होता. १७३० त ह्या बाईला शाहूनें धरून सातारा येथें कैदेंत ठेविलें. १७४९ पर्यंत ही साताऱ्यास प्रतिबंधांत होती. पुढें हिचा नातू जो रामराजा त्याला गादी मिळावी असें शाहूनें ठरविलें. तेव्हां हिचें महत्त्व वाढून आपल्या नित्याच्या स्वभावाप्रमाणें हिनें बाळाजीशीं प्रतिस्पर्धा मांडली; दादोबा प्रतिनिधि व यमाजी शिवदेव ह्यांचें खूळ माजविलें; बाबूजी नाईकांस भर दिली; सलाबतजंगाचा दिवाण जो रामदासपंत त्याच्याशीं राजकारण केलें. बाळाजीची पेशवाई रामदासपंताचे भावास देण्याचा बेत केला; महादोबा पुरंदऱ्याला देखील फितविलें (का० पत्रें, यादी वगैरे ३५९); व त्याच्या करवीं रामचंद्रबाबा शेणवई व सदाशिव चिमणाजी ह्यांचें व बाळाजीचें

वांकडें आणिलें; दमाजीला साताऱ्यास बोलाविलें; उमाबाई दाभाडिणीस चढी लाविलें; खुद्द शिंदेहोळकरांच्याहि बुद्धीचा भेद करून पाहिला व रघोजीला मोंगलाकडे जाण्यास भर दिली.

हा खेळ एकसारखा १७५० पासून १७५३ पर्यंत चालला होता व तो चालत असतां रामराजा ताराबाईच्या मुठींत राहून बाळाजीच्या धडपडीकडे उदासीनपणें पहात होता. रामराजा उदासीन राहिला तो कांहीं मतलब साधावा अशा हेतूनें राहिला असा अर्थ नव्हे. तर त्याच्या नैसर्गिक कर्तृत्वहीनतेमुळें त्याला हें औदासिन्य पत्करावें लागलें. रामराजा खुळा आहे अशी इतर लोकांप्रमाणें बाळाजीची खात्री झाली होती. त्याच्याविषयीं कोणाच्याच मनांत आदरबुद्धि नव्हती. गयाळ म्हणून ताराबाई त्याचा द्वेष करी. कर्तृत्वहीन म्हणून सरदारांचें त्याच्या ठिकाणीं प्रेम नसे आणि प्रतिस्पर्धी म्हणून कोल्हापुरकर त्याचा मत्सर करी. एवंच रामराजा कोणालाच हवा असें वाटत नव्हतें. शाहूराजाची इच्छा म्हणून बाळाजीनें रामराजाला पानगांवाहून आणिला व गादीवर बसविला. त्याला कांहींतरी राजकारण करून काढून टाकावें अशी बाळाजीची इच्छा होती असें जरी खास म्हणतां येत नाहीं तत्रापि त्याचें महत्त्व होईल तितकें कमी करण्याच्या इच्छेनें बाळाजीनें त्याचा शिक्का तीन वर्षें चालूं केला नाहीं. ह्या ग्रंथांतील १७५० तील ३० जानेवारीच्या (लेखांक २६) पत्रावर, काव्येतिहाससंग्रहांतील १७५१ च्या २९ सप्टंबरच्या (३३४ पत्रें, यादी वगैरे) पत्रावर, १७५२ च्या १२ एप्रिलच्या (पत्रें यादी, वगैरे ३७४) पत्रावर व १७५२ च्या १५ आक्टोबरच्या (पत्रें, यादी वगैरे ३९५) पत्रावर शिक्का शाहूराजाचाच आहे. ह्यावरून रामराजाला शाहूराजाच्या इच्छेबरहुकूम बाळाजीनें यद्यपि मान्य केलें होतें, तत्रापि त्याचा शिक्का चालविण्यांत तीन वर्षें तो धरसोड करीत होता असें दिसतें. अर्थात् दुसरा राजा करावयाचा म्हणजे संभाजीला साताऱ्यास आणावयाचा त्याचा बेत होता असें अनुमान करण्यास प्रवृत्ति होते. नाहींतर शाहूच्या मृत्यूनंतर तीन वर्षें शाहूचा शिक्का चालविण्याच्या कामीं धरसोड करण्यांत बाळाजीचा कांहींच मतलब नव्हता असें होईल.तसेंच परराष्ट्रांशीं केलेल्या तहांतहि सातारच्या छत्रपतींचें नांव १७५० सालापासून १७६१ पर्यंत कोठेंहि नाहीं. जेथें तेथें बाळाजी बाजीरावाचेंच नांव प्रमुखलेलें दिसतें (लेखांक १।६५।१२९।१३०। १४५). पुढें १७५३ च्या व १७५४ च्या शेवटीं ताराबाईची धुसपुस बाळाजीनें मोठ्या युक्तीनें बंद केली व रामराजाला निव्वळ बाहुलें करून सोडिलें.

भारतभर ब्राह्मणपदबादशाहीची सिद्धि कां झाली नाही ?

सातारच्या छत्रपतीचें महत्त्व समूळ नाहींसें केल्यावर आणीक एक गोष्ट बाळाजीस करावयाची राहिलीच होती. ती गोष्ट म्हणजे कोल्हापुरची व सातारची गादी

एक करून मराठ्यांचें राज्य एकछत्री करणें ही. ह्या हेतूच्या साधनार्थ १७४०त संभाजीशीं त्यानें गुप्त करार केला. १७५०त हा हेतु साध्य होण्याचा समय आला असतां शाहूच्या हट्टामुळें तो फसला गेला. तरी पुढें अशीच एकादी संधि येईल ह्या आशेनें बाळाजीनें संभाजीशीं पूर्वीचा स्नेह कायम ठेविला (का० पत्रें, यादी वगैरे ३३५). कारण संभाजीहि वृद्ध झाला असून लवकरच मरणासन्न होईल असा संभव होता. हा संभव ज्यावेळीं केव्हां खरा ठरेल त्यावेळीं संभाजीचा वारस जो रामराजा त्याला कोल्हापुरची गादी मिळून सातारचें व कोल्हापुरचें राज्य एक करण्याचा फारा दिवसांचा हेतु साध्य होईल असा बाळाजीचा बेत होता. परंतु, ज्या हट्टानें व अज्ञानानें १७४९ त शाहूला पछाडिलें त्याच हट्टानें व अज्ञानानें १७६० त संभाजीला गांठिलें व त्यानें मरणापूर्वी खानवटकर भोसल्याच्या कुळांतील एक मुलगा दत्तक घ्यावा असें ठरविलें. पुढें १७६२ त जिजाबाईनें ह्या मुलाला दत्तकहि घेतलें. संभाजीच्या ह्या कृत्यानें बाळाजीचा बेत ह्यावेळीं दुसऱ्यांदा फसला. परंतु एवढ्यानें नाउमेद होऊन बाळाजी स्वस्थ बसला नाहीं. खानवटकरांच्या घराण्यांतील जो मुलगा जिजाबाई दत्तक घेणार होती त्यालाच रामराजाच्या मांडीवर देऊन रामराजास वनवासास जावयास सांगावें असा बाळाजीचा त्यावेळीं मनोदय होता (लेखांक २८९ व चिटणिसांची बखर). ह्या खानवटकरांच्या कुळांतील नवा राजा करण्यांत मतलब असा कीं पुढें मागें कोणतीहि एक गादी निपुत्रिक झाली असता ज्या गादीवरील वंश हयात असेल त्याला निपुत्रिक गादीवर हक्क सांगतां यावा व हीं दोन्हीं राज्यें एक व्हावीं. पानिपतची लढाई झाल्यावर नवा राजा करण्याचा बाळाजीचा बेत होता (लेखांक २८९). परंतु बाळाजीला पुढें मृत्यूनें लवकरच गांठिल्यामुळें तो बेत तसाच राहिला. असो. महाराष्ट्रांत अव्वल प्रतीचें घराणें म्हटलें म्हणजे सातारच्या छत्रपतीचें. त्याचें महत्त्व कमी करण्यास बाळाजीनें वर सांगितलेल्या खटपटी केल्या. येणेंप्रमाणें बाहेर मेहनत करून बाळाजीनें १७६० त बहुतेक हिंदुस्थान व बहुतेक सर्व दक्षिण जिंकून टाकिली व आंत मेहनत करून सातारचे छत्रपती व त्याचें राजमंडळ ह्यास बहुतेक संपुष्टांत आणून आपलें वर्चस्व स्थापित केलें व ब्राह्मणपदबादशाहीची कल्पना खरी करून दाखविण्याचा प्रसंग जवळ आणून ठेविला.

पानपतच्या लढाईंत पेशव्यास यश येतें तर त्या यशाच्या दराऱ्याच्या जोरावर सर्व भरतखंड महाराष्ट्रमय त्यानें करून टाकिलें असतें व बाळाजी विश्वनाथाचा वंश ब्राह्मणपदबादशाहीचा आधारस्तंभ झाला असता. तसेंच पानिपतच्या लढाईंत पेशव्यांस यश येतें तर ह्या दुर्बल छत्रपतींचा मागमूसहि न रहाता, असा तर्क करण्यास जागा आहे. कारण पेशव्यांचें महत्त्व १७२० पासून १७६१ पर्यंत जसजसें वाढत चाललें तसतसें छत्रपतींचें कमी कमी होत चाललें हें विवेचनावरून दिसून येण्यासारिखें आहे. अर्थात् पेशव्यांचें महत्त्व १७६१ त झेनिथाला जाऊन पोंचलें

असतें तर छत्रपतींचें महत्त्व नाडिराला जाऊन बुडलें असतें ह्यांत संशय नाहीं. सातारच्या छत्रपतींना पुढें पुढें कोणी अगदीं विचारीत नाहींसें झालें ह्याचा दाखला पाहिजे असल्यास नाना फडणिसाच्या आत्मचरित्रांत उत्तम पहावयास मिळतो. आम्ही पेशव्यांचे सेवक, आम्हांस छत्रपतीशीं कर्तव्य नाहीं असें नाना फडणवीस लिहितो. ह्यावरून छत्रपतीविषयीं इतरांच्या मनांत किती आदरबुद्धि होती ह्याचें अनुमान करितां येईल. परंतु मराठ्यांच्या दुर्दैवानें तो सुयोग जुळून आला नाहीं.

सामान्य नीतीच्या दृष्टीनें पहातां ह्या दुर्बल छत्रपतींचें महत्त्व बाळाजीनें संपुष्टांत आणिलें हें बरेंच गर्हणीय आहे. परंतु बुद्धीनें व शक्तीनें बलिष्ठ अशा पुरुषाच्या किंवा पुरुषांच्या हातांत कोणत्याहि राष्ट्राचीं सूत्रें असणें मोठें हितकर असतें ह्या राजनीतीच्या धोरणानें बाळाजीच्या प्रयत्नांचा विचार केल्यास झालें तें योग्यच झालें असें म्हणणें प्राप्त होतें. इतकेंच कीं, जें झालें तें पानिपत येथील घोर संकटामुळें पूर्णपणें झालें नाहीं. एवढेंच नव्हें; तर जें झालें तें अंशतः न झाल्यासारिखेंच झालें हें पाहून मन किंचित् उद्विग्न होतें. उद्विग्न होण्याचें कारण असें आहे कीं, ही पानिपत येथील विपत्ति पर्यायानें व परंपरेनें मराठ्यांच्या नाशास कारण झाली. ती कशी झाली व तिचीं कारणें प्रस्तुत ग्रंथांत छापिलेल्या पत्रांच्या आधारानें काय होतीं त्याचा पुढील विवेचनांत सविस्तर प्रपंच केला आहे.

पानिपतची विपत्ति

या सर्व विवेचनांवरून दिसून येईल कीं, मराठ्यांनीं १७६१ पर्यंत जीं जीं कृत्यें केलीं त्या सर्वांत एकच धोरण होतें. महाराष्ट्रधर्म वाढविणें हा मुख्य मुद्दा होता. हा मुद्दा अस्पष्ट रीतीनें त्यावेळच्या मुत्सद्यांच्या मनांत होता असा बिलकुल प्रकार नाहीं. महाराष्ट्रधर्माची कल्पना व तत्साधनार्थ योजिलेल्या उपायांचें व्यवस्थित स्वरूप तत्कालीन मुत्सद्यांच्या, विचारी पुरुषांच्या व सेनापतींच्या मनांत स्पष्टपणें आविर्भूत झालेलें दिसतें. हिंदुधर्माची प्रस्थापना, गोब्राह्मणांचा प्रतिपाल, स्वराज्याची स्थापना, मराठ्यांचें एकीकरण व त्याचें पुढारपण, हीं जीं महाराष्ट्रधर्माचीं मुख्य अंगें त्यांचा उच्चार शिवाजी राजाच्या तरुणपणीं जसा स्पष्टपणें झालेला दिसतो तसाच खर्ड्याच्या लढाईनंतर नाना फडणिसानें निजामाशीं केलेल्या तहांतहि दिसून येतो. ह्या तहांत धर्म, गोब्राह्मण व स्वराज्य ह्यांच्या संरक्षणार्थ कलमें आहेत. तेव्हां १६४६ पासून १७९६ पर्यंत महाराष्ट्रधर्माची प्रसृति होत असतां मराठ्यांचें पुढारपण वेळोवेळीं निरनिराळ्या जातींनीं घेतलें. प्रथम स्वराज्याची शुद्ध कल्पना उत्पन्न झाली. तत्साधनार्थ मराठ्यांचें पुढारपण शिवाजी, राजाराम, शाहू व अनुषंगानें बाळाजी विश्वनाथ ह्यांनीं घेतलें. ह्या चार पुरुषांच्या प्रयत्नानें ज्याला स्वराज्य म्हणून प्रथम संज्ञा दिली गेली तो सर्व प्रदेश मराठ्यांच्या ताब्यांत आला. स्वराज्याचें साधन केल्यावर मराठ्यांच्या वाढत्या

पराक्रमाला स्वराज्यांतर्गत प्रदेश संकुचित भासूं लागला व तो उफाड्यानें स्वराज्याच्या मर्यादेच्या बाहेर पसरूं लागला. म्हणजे सार्वभौमत्वाची कल्पना त्यावेळीं अवश्य होऊन तिचा स्पष्ट उच्चार बाजीरावानें शाहूपुढें करून दाखविला. ह्या कालापासून हिंदुपदबादशाहीची प्रस्तावना झाली. हिंदुपदबादशाहीची प्रस्तावना बाजीरावाच्या पुढारपणाखालीं झाली हें जरी खरें आहे, तरी ती शाहूराजाच्या सल्ल्यानें झाली म्हणून तिला मी हिंदुपदबादशाही हें नांव दिलें आहे.

शाहूराजा वारल्यानंतर किंवा वारण्याच्यापूर्वी देखील सातारच्या छत्रपतीचें तेज मावळत जाऊन महाराष्ट्राचें पुढारपण पेशव्यांच्या हातांत आलें. म्हणून बाळाजी बाजीरावाच्या उत्तरार्धापासून ब्राह्मणपदबादशाहीचा प्रारंभ झाला म्हणून मी म्हटलें आहे. ब्राह्मणपदबादशाही म्हणजे हिंदुपदबादशाहीच होय. १७५० पर्यंत ह्या बादशाहीची प्रस्तावना भोसल्याच्या कुळाच्या नांवानें होत असे. आतां ती पेशव्यांच्या कुळाच्या नांवानें होऊं लागली. पहिलीस भोंसलेकुलबादशाही अथवा मराठपदबादशाही व दुसरीस भटकुलबादशाही किंवा ब्राह्मणपदबादशाही म्हटल्यास चालेल. नाव पाहिजेल तें द्या. वस्तुस्थिति ध्यानांत आली म्हणजे झालें. महाराष्ट्रधर्म व महाराष्ट्रराज्य जिकडे तिकडे करण्याचा प्रयत्न ह्या काली मराठ्यांचा चालला होता. प्रसंगोपात्त ह्या प्रयत्नाचा पुढाकार कधीं महाराष्ट्रातील मराठ्यांनीं व कधीं महाराष्ट्रांतील ब्राह्मणांनीं केला. हेतु पाहिला तर दोघाचाहि एकच होता. महाराष्ट्रांतील मराठ्यांनीं व ब्राह्मणांनी दोघांनीं मिळून महाराष्ट्रधर्माचा व राज्याचा प्रसार करण्याचें काम चालविलें होतें. ह्या कामीं येणाऱ्या यशापयशाचा वांटा ह्या दोघांनाहि सारखा घ्यावा लागे. इ. स. १६४६ पासून १६८० पर्यंत शिवाजीच्या पुढाराखालीं मराठ्यांस उत्तरोत्तर यशच येत गेलें. १६८९ पासून १७०७ पर्यंत मराठ्याना अवरंगजेबाशीं लढावें लागलें. शिवाजीच्या वेळीं आलेल्या संपत्ती व त्याच्या पश्चात् आलेल्या विपत्तीचे वांटेकरी ब्राह्मण व मराठे हे दोघेहि झाले. त्या मरणप्रायसंकटांतून निघून मराठ्यांनीं पेशव्यांच्या पुढारपणाखालीं समुद्रवलयांकित पृथ्वीचें सार्वभौमत्व मिळविण्याचा सुमुहूर्त १७६० च्या सुमारास आणिला. परंतु १७६१ सालीं अबदालीशीं युद्ध होऊन मराठ्यांचा कधींहि झाला नव्हता असा पराभव पानिपत येथें झाला.

ह्याहि गंडांतरांतून निभावून थोडक्याच कालांत त्यांनीं आपली पूर्वीची सत्ता बहुतेक कायम केली; परंतु पूर्वीची भट्टी जी ह्यावेळीं बिघडली ती पुनः कधीं नीट सावरतां आली नाहीं. १७३० त सर्व हिंदुस्थानाला म्हणजे उत्तरेस मुलतान, लाहोर, ठट्ठा, भकर, रोहिलखंड, अंतर्वेद, काशी, प्रयाग, अयोध्या व बंगाला; दक्षिणेस श्रीरंगपट्टण, तंजावर व रामेश्वर आणि पूर्वेस तैलंगण व पूर्वसमुद्र इतक्या प्रदेशांवर मराठ्यांची सत्ता कायम करावयाची असा सदाशिवरावभाऊचा व बाळाजी बाजीरावाचा

बेत होता. परंतु १७६१ नंतर पश्चिमोत्तरेकडील मुलतान, लाहोर, ठट्ठा, भकर व पूर्वोत्तरेकडील प्रयाग, अयोध्या व बंगाला; दक्षिणेकडील श्रीरंगपट्टण व रामेश्वर व पूर्वेकडील तैलंगण व पूर्वसमुद्र, हे प्रांत मराठ्यांच्या ताब्यांत पुढें कधींच आले नाहींत. १७६० पर्यंत मराठ्यांचें पाऊल एकसारखें पुढें पडत चाललें होतें तें १७६१ पासून यमुना व तुंगभद्रा ह्या दोन नद्यांच्या आंत आलें. हें जें आंत पाऊल आलें हीच पानिपत येथील पराभव केवढा भयंकर होता ह्याची उत्तम साक्ष आहे.

१५

मराठ्यांच्या इतिहासाचें कार्य व पराभव

स्वधर्मरक्षक स्वराज्य स्थापण्याचा हेतु

मराठ्यांचें हिंदुस्थानांत कार्य काय ? ह्या प्रश्नाचें उत्तर मागील विवेचनांत बहुतेक उल्लेखिलेंच आहे. ह्या विवेचनांत त्याचा निर्देश आणखी विस्तृत करून दाखवितों. मराठ्यांचें हिंदुस्थानांत मुख्य कार्य म्हटलें म्हणजे महाराष्ट्रधर्माचा प्रसार करणें हें होय. समर्थांनीं ज्याला महाराष्ट्रधर्म म्हणून संज्ञा दिली तो केवळ हिंदुधर्मच नव्हे. महाराष्ट्रधर्मांत स्वराज्यस्थापनेचा व गोब्राह्मणप्रतिपालनाचाहि अंतर्भाव होतो. हिंदुधर्म, स्वराज्य व गोब्राह्मणप्रतिपालन ह्या तीन गोष्टींची स्थापना करावयाची म्हटलें म्हणजे राष्ट्रांतील लोकांची एकी झाली पाहिजे व त्या एकीचा पुढाकार करण्यास कर्त्या लोकांनीं पुढें सरसावलें पाहिजे. हीहि गोष्ट त्यावेळच्या मराठ्यांच्या स्पष्टपणें ध्यानांत आली होती. मराठ्यांखेरीज हिंदुस्थानांतील इतर लोकांच्या ध्यानांत ही गोष्ट अगदींच आली नव्हती असें नाहीं. हिंदुधर्माची स्थापना व गोब्राह्मणांचें प्रतिपालन केलें पाहिजे ही कल्पना शीख लोकांच्या व बुंदेल्यांच्या डोक्यांत अकबराच्या वेळेपासून, कदाचित् त्याच्याहि पूर्वी, आली होती असें म्हणण्यास आधार आहे. परंतु ही कल्पना साक्षात् सिद्ध करून दाखविण्यास जी तडफ, जो निश्चय, जी जूट व जें पुढारपण लागतें त्याचें अस्तित्व ह्या लोकांच्या ठायीं होतें असें इतिहासावरून दिसत नाहीं. सुदैवानें ह्या गुणांचें अस्तित्व त्या कालीं मराठ्यांच्या अंगीं होतें व म्हणूनच त्यांच्या हातून स्वराज्याची स्थापना होऊन हिंदुधर्माचें व गोब्राह्मणांचें प्रतिपालन झालें.

१६४६ पासून १७०७ पर्यंत महाराष्ट्रधर्माची शुद्ध कल्पना महाराष्ट्रांत विराजत होती. तोंपर्यंत हिंदुधर्माचा, स्वराज्याचा व गोब्राह्मणांचा छळ अवरंगझेबाच्या हातून होत होता. त्याच्यापुढें हा छळ बंद झाला, स्वराज्याची स्थापना झाली आणि गोब्राह्मणांचो व हिंदुधर्माची दीन दशा कायमची संपली. १७२० च्या सुमारास महाराष्ट्रांत महाराष्ट्रधर्माची पूर्ण स्थापना झाली व महाराष्ट्रांतील हिंदुधर्माला व गोब्राह्मणांना कोठूनहि भीतीचें कारण उरलें नाहीं. सारांश, स्वराज्याच्या स्थापनेमुळें महाराष्ट्रांतील लोकांना सुखाचे दिवस दृष्टीस पडले. परंतु महाराष्ट्राबाहेरील प्रांतांतील लोकांना महाराष्ट्रांतील लोकांच्या सुखाचे वांटेकरी हा वेळपर्यंत होतां आलें नाहीं. खरें म्हटलें असतां अवरंगझेबाच्या कारकीर्दींत यवनांच्या सत्तेला उतरती कळा लागली होती;

तेव्हां मराठ्यांच्याप्रमाणें हिंदुस्थानांतील इतर लोकांनीं उठाव करून आपल्या प्रांतांत स्वराज्याची स्थापना करून धर्माचें व गोब्राह्मणांचें प्रतिपालन करावयाचें. परंतु हा पराक्रम त्या लोकांच्या हातून झाला नाहीं. कां कीं, त्या लोकांच्या अंगीं स्वराज्यस्थापनेस एकजूट, पुढारपण वगैरे जे उदात्त गुण लागतात ते नव्हते. शिवाजीच्या प्रोत्साहनानें बुंदेलखंडांत छत्रसालानें कांहीं वेळ यवनांच्याविरुद्ध कंबर बांधिली होती हें खरें आहे. परंतु मराठ्यांच्याप्रमाणें टिकाव धरून बसण्याइतका चिवटपणा बुंदेल्यांच्या अंगीं नसल्यामुळें स्वराज्याचें बीं त्या प्रांतांत जसें रुजावें तसें रुजलें नाहीं. महाराष्ट्राबाहेरील हिंदुस्थानांतील इतर प्रांतांची ही अशी स्थिति होती. स्वतः त्या लोकांच्या अंगीं स्वधर्माचें संरक्षण व स्वराज्याची स्थापना करण्याचें सामर्थ्य नव्हतें. तेव्हां ह्या लोकांना यवनांच्या कचाटींतून सोडवून आपल्या अमलाखालीं आणावें व हिंदुधर्माचें व गोब्राह्मणांचें प्रतिपालन करावें असा महाराष्ट्रांतील कर्त्या पुरुषांचा त्यावेळीं विचार झाला. १७२० च्या पुढें मराठ्यांनीं आपल्या सत्तेचें जाळें जें सर्वत्र हिंदुस्थानभर पसरिलें त्याचें मुख्य कारण हा विचार होय. १६४६ पासून १७९६ पर्यंत कोणताहि महत्त्वाचा तह घेतला असतां त्यांत स्वराज्याचें व स्वधर्माचें कलम नाहीं असें बहुशः व्हावयाचें नाहीं.

समर्थ रामदासांनीं उत्पन्न केलेलें स्वधर्मप्रेम

मराठ्यांची सत्ता सर्व हिंदुस्थानभर पसरण्यास वर सांगितलेला विचार मुख्य कारण झाला. ह्या विचारानें प्रोत्साहित होऊन मराठ्यांनीं यवनांच्या हातून १७६० च्या सुमाराला बहुतेक सर्व हिंदुस्थान सोडविलें. परंतु सोडविलेल्या प्रांतांत आपली सत्ता कायम करण्यास जे उपाय योजिले पाहिजेत ते १७२० पासून १७६० पर्यंत योजिले गेले नाहींत. खुद्द महाराष्ट्रांत १६४० पासून १७०७ पर्यंत स्वराज्यस्थापनेच्या वेळीं जे उपाय योजिले गेले त्यांचा उपयोग महाराष्ट्रेतर प्रांतांत १७२० पासून १७६० पर्यंत जे मुत्सद्दी झाले त्यांनीं केला नाहीं. स्वराज्यस्थापनेची कल्पना महाराष्ट्रांतील विचारी पुरुषांच्या मनांत जेव्हां प्रथम आली तेव्हां यवनांच्यासंबंधीं द्वेष व स्वधर्मासंबंधीं प्रेम महाराष्ट्रांतील सामान्य जनांच्या मनांत भरवून देण्याकरितां कथा, पुराणें, यात्रा वगैरे संस्थांच्या द्वारें कित्येक पिढ्या प्रयत्न चालले होते. त्यांच्या योगानें महाराष्ट्रांतील लोकमत जागृत झालें व सर्व लोकांची एकजूट बनविण्याचें बिकट कृत्य साध्य होणें शक्य झालें. पुढें शिवाजीमहाराजांनीं स्वराज्याची मुहूर्तमेढ १६४६त रोविल्यावर निराळेंच एक संकट उद्भवलें. तें हें कीं, महाराजांच्या सेवकसमुदायांत म्हणजे मुत्सद्दीमंडळांत व सेनानायकांत परस्पर मत्सरभाव उत्पन्न होऊं लागला व स्वामिहित व देशहित साधण्याच्या कामीं व्यत्यय येऊं लागले (समर्थांचा सेवाधर्म, दासबोध). तेव्हां समर्थांसारिख्या थोर विभूति पुढें येऊन

त्यांनीं ह्या स्वामिद्रोहरूपी व देशद्रोहरूपी रोगांचें उत्पाटन केलें (सेवाधर्म, दास-बोध). आयुष्याची इतिकर्तव्यता काय, स्वामिद्रोह व देशद्रोह केल्यापासून आपलेंच अहित आपण कसें करितों, वगैरे विषयांची चर्चा करून, कुचर सेवकांना ताळ्यावर आणण्यास, सुचर सेवकांची भक्ति दृढ करण्यास, लोकांचे विचार सन्मार्गास लावण्यास व राजाला नीतीनें वर्तन करविण्यास, समर्थांसारख्या थोर, विचारी महापुरुषांच्या ग्रंथांचा अत्यंत उपयोग झाला. महाराष्ट्रांत स्वराज्य स्थापण्याच्या कामीं मराठ्यांच्या शौर्याचें व मराठ्यांच्या जुटीचें जितकें साहाय्य झालें तितकेंच, किंबहुना त्याहूनहि जास्त, साहाय्य समर्थांच्या उपदेशाचें झालें. राष्ट्रांतील लोकांना दिशा दाखविण्यास असल्या महात्म्यांची आवश्यकता सदा असते.

समर्थ १६८१ त वारले. तदनंतर पंचवीस तीस वर्षें समर्थांच्या उक्तींचा नाद महाराष्ट्रांतील लोकांच्या कानांत घुमत होता. त्या नादाच्या गुंगींत मराठ्यांनीं १७२० पर्यंत स्वराज्याची स्थापना केली. पुढें बाजीराव बल्लाळानें व बाळाजी बाजीरावानें हिंदुपदबादशाहीची स्थापना करण्याच्या इराद्यानें बहुतेक सर्व हिंदुस्थान देश पादाक्रांत केला. त्यावेळीं ह्या मुत्सद्यांवर तिहेरी जोखीम आलें. पूर्वी शिवाजी व रामदास यांच्या वेळीं (१) सामान्य जनांचीं मनें तयार करावयाचीं व (२) सेवकलोकांत मत्सर शिरूं द्यावयाचा नाहीं एवढें दुहेरीच जोखीम त्यावेळच्या मुत्सद्यांच्या व विचारी पुरुषांच्या शिरावर होतें. आतां (अ) सातारच्या महाराजांचें सूत्र राखावयाचें, (ब) राजमंडळांतील व इतर सरदारांची मनधरणी करावयाचें (क) व जिंकिलेल्या प्रदेशांतील लोकांचीं मनें आपल्याकडे वळवून घ्यावयाचें तिहेरी काम बाजीराव बल्लाळ व बाळाजी बाजीराव ह्या मुत्सद्यांना अवश्य झालें. ह्या तिहेरी कामाचें पहिलें कलम म्हणजे शाहूमहाराजाचें सूत्र राखण्याचें काम ह्या मुत्सद्यांनीं उत्तम साधिलें. त्या कामीं धावडशी येथील भार्गवराम बोवांचें साहाय्य पेशव्यांना चांगलें झालें. भार्गवरामाचें शाहूवर वजन फार असून बाजीराव बल्लाळ व बाळाजी बाजीराव ह्यांच्याकडेहि पोटच्या पोराप्रमाणें त्याचा ओढा असे. त्यामुळें शाहूचें मन न दुखवितां पेशव्यांचें हित करून देणें धावडशीकर स्वामीला शक्य झालें.

पेशव्यांच्या संबंधीं परप्रांतांत आत्मीयत्वाचा अभाव

ज्याप्रमाणें शाहूराजाचें सूत्र ब्रह्मेंद्रानें राखिलें त्याप्रमाणें सरदारांची मनधरणी करण्यास न जिंकिलेल्या प्रदेशांतील लोकांचीं मनें मराठ्यांच्याकडे वळवून घेण्यास पेशव्यांनीं कांहीं व्यवस्था केली होती असें दिसत नाहीं. कांयगांवकर वासुदेव दीक्षित टोक्यास व काशीस राहून सलाबताच्या राज्यांत व काशीकर ब्राह्मणांत कांहीं खटपट करीत असत; परंतु त्यांच्या खटपटीहूनहि अवाढव्य खटपट करणारे व विचार पसरविणारे महापुरुष मराठ्यांच्या वाढत्या समाजांत एकजूट उत्पन्न करण्यास हवे

होते. कानडे, तेलंग, द्रवीड, गुजराथी, बुंदेले, रांगडे, पुरभय्ये, शीख वगैरे लोकांच्या मनांत महाराष्ट्रधर्माविषयीं प्रेम उत्पन्न करण्याकरितां कोणत्याहि संस्था पेशव्यांनीं स्थापिलेल्या दिसत नाहींत किंवा त्या कामीं कोणा महापुरुषाचें साहाय्य घेतलेलेंहि आढळत नाहीं. ह्यामुळें तरवारीच्या जोरावर व मुत्सद्यांच्या युक्तीवर भिस्त ठेवून पेशव्यांना हिंदुस्थानांत आपली सत्ता चालवावी लागे. मुसुलमानाप्रमाणें पेशवेहि परकीय आहेत असा दुजा भाव जिंकलेल्या प्रदेशांत कायम राही व परशत्रू आला असतां पेशव्यांचें जूं झुगारून देण्यास तेथील लोक तयार असत.

आपली सत्ता किती अस्थिर आहे ह्याचा अनुभव पेशव्यांना पानिपतच्या मोहिमेंत पहिल्यांदा आला व तो मोठा भयानक आला. त्यावेळीं हिंदुस्थानांतील यच्चयावत् लोक मराठ्यांच्या विरुद्ध झाले. पानिपतची शेवटची लढाई होईतोंपर्यंत ह्या लोकांचा द्वेष पुरता कळून आला नाहीं हें कबूल आहे. परंतु सदाशिवराव विजयी झाला असता तर तो द्वेष कधीं कळूनहि न येता हेंहि कबूल आहे. परंतु, अपजय आला असता हे सर्व लोक आपल्याला खाऊन टाकतील हें समजत असूनहि पेशव्यांनीं त्याचा उपशम करण्याची कांहींएक खटपट केली नाहीं हेंहि कबूल केल्याशिवाय गत्यंतर नाहीं. जिंकलेल्या लोकांचीं मनें आकर्षून घेण्यास व नवीन वळणावर नेण्यास पेशव्यांनीं व्यवस्थित प्रयत्न केले नाहींत हा त्यांचा मोठा दोष होता. परंतु तो दुसऱ्या एका दोषाच्या मानानें केवळ क्षुद्र आहे असें दृष्टोत्पत्तीस येईल. मल्हारराव होळकर, गोविंदपंत बुंदेले वगैरे कपटी, कुचर व स्वामिद्रोही सरदारांना ताळ्यावर व वठणीस आणण्यास पेशव्यांनीं कांहींच व्यवस्था केली नाहीं. ह्या सरदारांची स्वामिभक्ति कायम असती म्हणजे जिंकिलेल्या प्रदेशांतील लोकांना जुलमानें वागवूनहि आपली सत्ता पेशव्यांना कायम ठेवितां आली असती. कदाचित् प्रथम प्रथम लहानसहान बंडें झालीं असतीं; परंतु, घरांतल्या घरांत भेद होऊन नाश होण्यापेक्षां तीं बंडें झालेलीं पुरवलीं असतीं. ह्यासंबंधानें रघुनाथरावदादानें एक मार्मिक वाक्य लेखांक २ त लिहिलें आहे. तो म्हणतो "स्वजनविरोध व परराज्यांतील कलहाचें मूळ अजीपासूनच लागलें आहे." सारांश, शिवाजीप्रमाणेंच बाळाजी बाजीरावानें व सदाशिव चिमणाजीनें हें स्वजनविरोधाचें बंड आधीं मोडून टाकिलें पाहिजे होतें. सरदारांची मनधरणी करण्याचें काम केवळ दपटशानें किंवा गोड बोलण्यानें भागण्याजोगें नव्हतें. त्याला रामदासासारखेच तिन्हाईत गृहस्थ सरदारांची कानउघाडणी करण्यास, हिंदुपदपातशाहीची दिशा दाखवून देण्यास व स्वामिभक्तीचें शिक्षण लावण्यास ह्यावेळीं हवे होते.

परंतु १७५० पासून १७६१ पर्यंतच्या अवधींत रामदासासारिख्यांचा टाहो कांहीं उपयोगीं पडला असता किंवा कसें ह्याची शंकाच आहे. शिवाजीच्या वेळीं रामदासाला कांहीं मर्यादित विवक्षित प्रदेशांत उपदेश द्यावयाचा असल्यामुळें त्याचें बोलणें

सर्वांना ऐकूं जाणें शक्य होतें. आतां महाराष्ट्रसाम्राज्याची मर्यादा बहुतेक आसमुद्र पसरली होती. मराठ्यांचे सरदार हिंदुस्थानांतील दूरदूरच्या प्रदेशांत वर्षेंच्यावर्षें वास्तव्य करून राहिले होते. त्यांना स्थानिक प्रीतीनें व स्थानिक द्वेषानें पछाडलेलें होतें. त्यांची व पेशव्यांची भेट दहा दहा पांच पांच वर्षांनींहि झाली तर होत असे. अशांचीं मनें सन्मार्गीं राखण्यास पेशव्यांच्या वतीनें शेंकडों रामदास वेळोवेळीं टोले मारण्यास त्यांजवळ राहिले पाहिजे होते. ज्यावेळीं एकहि रामदास सबंद महाराष्ट्रसाम्राज्यांत नव्हता त्यावेळीं शेंकडों रामदास असण्याची अपेक्षा करणें प्रायः दुरापास्त होतें. सारांश, सरदारांच्या उच्छृंखलवृत्तीला आळा घालतां येण्याजोगीं साधनें त्याकालीं पेशव्यांच्या जवळ नव्हतीं असेंच कबूल करणें ओघास येतें. सरदारांच्याप्रमाणें जिंकलेल्या प्रांतांतील लोकांचीं मनें आकर्षून घेण्याचींहि साधनें पेशव्यांजवळ नव्हतीं. कथा, पुराणें, वगैरे यात्रा सतराव्या शतकातल्याप्रमाणें अठराव्या शतकांतहि चालूं होत्या. परंतु, सतराव्या शतकांतला जिवंतपणा अठराव्या शतकांतील कथापुराणांत राहिला नव्हता. येणेंप्रमाणें मराठ्यांच्या राजकारणाला सरदारांचीं व प्रजेचीं मनें उपयोगीं पडण्यास योग्य जेणेंकरून होतील अशी–ग्रंथ, व्याख्यानें वगैरे–साधनसंपत्ति पेशव्यांनीं तयार न केल्यामुळें हिंदुस्थानांतील मराठे सरदार व तद्देशीय संस्थानिक व सामान्यजन पानिपतच्या मोहिमेच्या अगोदर व नंतर मराठ्यांच्या विरुद्ध उठले ह्यांत तिळमात्र संशय नाहीं. ग्रंथसमूहाचा, धर्मव्याख्यानांचा, साधुसंतांचा व यात्राजत्रांचा उपयोग राष्ट्रांतील लोकांच्या मनाला नीट वळण देण्यास केवढा मोठा होतो ही गोष्ट शहाजी व शिवाजी ह्यांच्या मनांत जशी बिंबली होती तशी बाळाजी बाजीरावाच्या व सदाशिव चिमणाजीच्या मनांत भरलेली दिसत नाहीं. शिवाजी व बाळाजी ह्यांच्यामधील महदंतर हेंच होय. राज्यें मिळविण्यास जसा तोफांचा व शिपायांचा उपयोग होतो तसा तीं कायम राखण्यास व जतन करण्यास व्याख्यानांचा व विचारी पुरुषांचाहि होतो.

अपयशाचें कारण – मागासलेली संस्कृति

हें तत्त्व पेशव्यांच्या ध्यानांत कां आलें नाहीं ह्याचें कारण शोधण्यास फारसें लांब जावयास नको. त्यावेळीं महाराष्ट्रांत विद्येची व शिक्षणाची स्थिति कशी होती ह्याचा विचार केला असतां ह्या कारणाची अटकळ बांधितां येण्यासारखी आहे. त्यावेळच्या विद्येचे स्थूल मानानें तीन भाग करितां येतीलः— (१) वैदिक (२) शास्त्रीय व (३) व्यावहारिक. वैदिक ब्राह्मण दश ग्रंथांचें पठन करीत; षट्शास्त्रांचा जिम्मा शास्त्रीपंडितांनीं घेतला होता; व ब्राह्मणवैश्यादि इतरजन व्यवहाराला उपयोगीं जें ज्ञान तें संपादन करीत. वैदिक व शास्त्रीपंडित ह्यांना राजाश्रय असे व व्यावहारिक शिक्षणाच्या शाळेंतील पंतोजींना लोकाश्रय असे. व्यवहारशिक्षणांत अक्षरांचे किस्से, संसारचोपडी, वरावर्दीगणित, मराठ्यांच्या व मुसुलमानांच्या बखरी व तवारिखा,

विक्रमबत्तीशी, वेताळपंचविशी, शुकबहात्तरी, लटकचाळिशी, भारत, भागवत व रामायण ह्या "इतिहासग्रंथांतील" आख्यानांच्या मराठी बखरी, रामरक्षादि स्तोत्रें, जमाखर्चाच्या पद्धति भूमापन, पत्रें लिहिण्याचे मायने, मराठी कविता, वगैरेंचा समावेश होत असे. पुरुषांप्रमाणें अत्यंत कुलीन स्त्रियानांहि लिहितां वाचतां येत असे. व्यवहारशिक्षण बहुतेक सर्व ब्राह्मणांना, वैश्यांना व उच्चप्रतीच्या मराठ्यांना मिळत असे. गृहस्थ, ब्राह्मण व मराठे ह्यांचे धंद्याच्या मानानें तीन वर्ग करितां येतील:— (१) स्वतःची शेतीवाडी पहाणारे, (२) कारकुनी धंदा करणारे, (३) व शिपायगिरीचा पेषा स्वीकारणारे. ह्या तिन्ही धंद्यांतील लोकांना वर सांगितलेल्या व्यवहारशिक्षणाच्या पलीकडे माहिती म्हटली म्हणजे वयपरत्वें येणाऱ्या जगाच्या अनुभवाखेरीज जास्त कांहीं एक नसे. कारकुनांना व शिपायांना हिंदुस्थानचें भूज्ञान स्वतः हिंडून जें कांहीं मिळें त्यापलीकडे बिलकूल नसे. हिंदुस्थानाव्यतिरिक्त इतर देशांचें भूज्ञान ह्या लोकांना कांहींच नसे. निपाणीजवळ भोज येथील कुळकर्ण्याच्या येथें मला एक अठराव्या शतकांतील पृथ्वीचा नकाशा सांपडला. त्यांत सप्तसमुद्रात्मक पृथ्वी शेषाच्या मस्तकावर दिली असून, चीन, इंग्लंड, रावणाची लंका वगैरे देशांच्या दिशा स्थूल मानानें बरोबर दाखविल्या आहेत व हिंदुस्थान चतुष्कोणाकृति काढिला असून तासगांव हिंदुस्थानचा मध्य धरिला आहे. परंतु हें भूगोलज्ञान सामान्य जनांचें झालें.

स्वतः पेशवे व त्यांचे सरदार ह्यांचें भूगोलज्ञान ह्या लोकांच्यापेक्षां अर्थात् जास्त विस्तृत व व्यवस्थित असे. फिरंगी, फराशिस, वलंदेज, डिंगमार, आफ्रंदोर, दुराणी, तुराणी, अरब, गिलच्ये, हबशी, शामळ, तुर्क, यवन, इराणी, शिद्दी, इंग्रज, मोरस, आफरीदी, वगैरे अठरा टोपीवाल्यांचे देश, व हिंदुस्थानांतील राजांचे छपन्न देश पेशव्यांना व त्यांच्या मुत्सद्यांना कित्येक नांवानें व कित्येक स्वदृष्टीनें माहीत होते. देशोदेशीचे वकील पेशव्यांच्या दरबारीं मोठ्या इतमानानें राहत असत (का० पत्रें, यादी वगैरे १३४). त्यांजपासूनहि, त्यांच्या देशांची माहिती पेशव्यांना मिळत असण्याचा अवश्य संभव आहे. हिंदुस्थानांतील निरनिराळ्या प्रांतांचे नकाशे पेशव्यांजवळ असत. लढाया झाल्या म्हणजे तह ज्याअर्थी होत त्याअर्थी पेशव्यांजवळ नकाशे असत हें मुद्दाम सांगण्यांत विशेष मुद्दा आहे, असें नाहीं. महाराष्ट्रांत बखरी वाचण्याचा व लिहिण्याचा प्रघात फार असे. तेव्हां मराठ्यांच्या व यवनांच्या इतिहासाचें ज्ञान महाराष्ट्रांत बहुशः सार्वत्रिक होतें असें म्हणण्यास प्रत्यवाय नाहीं. पानिपतच्या बखरीचा कर्ता रघुनाथ यादव यानें त्या बखरीच्या १९ व्या पृष्ठावर मराठ्यांच्या सर्वव्यापी सत्तेचा प्रसार कसकसा होत गेला व सर्व हिंदुस्थान हिंदुमय करून टाकण्याचा मराठ्यांचा मनोदय होता वगैरे गोष्टी अबदालीच्या तोंडून वदविल्या आहेत. त्यावरून इतिहास व भूगोल ह्यांचें ज्ञान रघुनाथ यादवाला थोडें थोडकें नव्हतें असें दिसून येतें.

रूमशाम म्हणजे कुस्तुंतुनिया येथें इ. स. १७३० पासून १७५४ पर्यंत राज्य करणाऱ्या सुलतान महमदाचेंहि नांव रघुनाथ यादवाला माहीत होतें. (र. या. पा. ब. पृ. १९, टीप) असें त्यावरून ठरतें. भूगोल व इतिहास ह्यांची माहिती बाळाजी बाजीरावाला व सदाशिव चिमणाजीला आपल्या कामापुरती यथास्थित होती ह्यांत संशय नाहीं. परंतु युरोपांत तत्कालीन दरबारांतून म्हणजे पंधरावा लुई, बडा फ्रेडरिक, दुसरा जॉर्ज ह्याच्या दरबारांतून व राज्यांतून भूगोलाचें व इतिहासाचें जें ज्ञान त्यावेळीं होतें त्याच्या मानानें पेशव्यांच्या दरबारचें इतिहासाचें व भूगोलाचें ज्ञान अगदींच क्षुद्र होतें हें कबूल करणें योग्य आहे. कपिल, कणाद वगैरे पुराण मुनींनीं प्रणीत शास्त्राच्या व्यतिरिक्त युरोपांत ठाऊक असलेल्या शास्त्रांचा गंधहि पेशव्यांच्या राज्यांत कोणाला नव्हता. पाठशाला, विद्यापीठें, विद्वत्सभा, अजबखाने, वादसभा, शोधसभा, पृथ्वीपर्यटणें, वगैरे युरोपियन संस्था पेशव्याच्या राज्यांत नव्हत्या. इतकेंच नव्हे, तर त्या दुसरीकडे कोठें आहेत किंवा काय ह्याचाहि पत्ता महाराष्ट्रांत कोणाला नव्हता. ह्या नकारात्मक वाक्यांचा इत्यर्थ एवढाच कीं, १८ व्या शतकाच्या पूर्वार्धांत व उत्तरार्धांत मराठ्याची संस्कृति यूरोपांतील प्रगत राष्ट्रांच्या संस्कृतीहून कमी दर्जाची होती. ती कोणकोणत्या गोष्टींत तशी होती त्याचा अंशतः निर्देश वर झालाच आहे. एक दोन विशेष मुद्द्यांचा विचार पुढें करितों.

मराठ्यांच्या व युरोपच्या संस्कृतीची तुलना

अठराव्या शतकांतील पश्चिम युरोपांतील संस्कृतीची व महाराष्ट्रांतील संस्कृतींची तुलना करूं पाहतां शेंकडों भेद दृष्टीस पडतात. पैकीं कांहींचाच उल्लेख करणें येथें इष्ट आहे.

(१) मराठ्यांच्या संस्कृतींत प्रथम व्यंग म्हटलें म्हणजे त्यांना छापण्याची कला माहीत नव्हती व ती माहीत करून घेण्याचा त्यानीं कधीं प्रयत्नहि केला नाहीं. १४९८ च्या ११ मे ला गामानें हिंदुस्थान शोधून काढिलें. तेव्हापासून १७६० पर्यंत फिरंग्यांच्या व मराठ्यांच्या मुलाखती अनेक ठिकाणीं झाल्या. गोमांतक, सावंतवाडी, वसई, कोची, दाभूळ, दिव, दमण वगैरे स्थलीं मराठ्याच्या फिरंग्याशीं गाठी पडलेल्या आहेत. वलंदेज (डच्) व डिंगमार (डेन) ह्या लोकांनाहि मराठे ओळखत असत. मुसाबूसी वगैरे फ्रेंच लोकांशीं तर मराठ्यांची चांगलीच घसट असे. मुंबई, सुरत, बाणकोट, विजयदुर्ग, राजापुरी, दाभोळ वगैरे ठिकाणीं इंग्रजांचीहि जानपछान मराठ्यांना झाली होती. मुंबईंतील परभू, शेणवई, पारशी, भाटे व वाळुकेश्वरचे छत्रे, भातखंडे वगैरे ब्राह्मण पुजारी व बैरागी इंग्लिश लोकाशीं हरहमेश दळणवळण ठेवीत. कित्येकांना चांगलें इंग्रजी लिहितां व बोलतां येत असे. त्यांनीं छापील पुस्तकें पाहिलीं होतीं ह्यांत संशय नाहीं. नाना फडणिसाच्या दफ्तरांत छापील इंग्रजी नकाशे

अद्यापहि आहेत. मोरोबादादाच्या घरच्या पुस्तकालयांत एक इंग्रजी चोपडी होती असें त्यांच्या पुस्तकाच्या यादीवरून कळतें. असें असून म्हणजे यूरोपांतील सर्व देशचे लोक त्यांच्या दारीं उभे असून मराठ्यांनीं छापण्याची कला कशी घेतली नाहीं ह्याचें मोठें आश्चर्य वाटतें. मराठ्यांच्या वाढत्या साम्राज्यांत योग्य कल्पनांचें बी पेरण्यास ह्या कलेचाच प्रवेश महाराष्ट्रांत झाला पाहिजे होता. घोरपडे, शिंदे, होळकर, भोसले, कोल्हापूरकर, सावंत, आंग्रे वगैरे सरदारांच्या पदरीं फिरंगी, फराशिस, इंग्रज वगैरे बरेच्च देशचे लोक पेशवाई जाईतोंपर्यंत व पुढें देखील होते; असें असून ज्याअर्थीं मराठ्यांनीं ही कला उचलली नाहीं त्याअर्थीं त्यांच्या ग्राहकशक्तीच्या कीर्तीला बराच्च कमीपणा येतो हें निर्विवाद आहे. (२) मुद्रणकलेसारखा उघड उघड डोळ्यावर येणारा गुण ज्या लोकांच्या ध्यानांत आला नाहीं त्याचें भूगोलाचें व इतिहासाचें ज्ञान कोतें असावें ह्यांत मोठें नवल नाहीं. (३) परंतु ज्या वस्तूंची मराठ्यांना दर घडीस अत्यंत जरूर लागत असावी असा आपण तर्क करितों त्यांपैकींहि कांहीं वस्तू मिळविण्याची मराठ्यांनीं इच्छा दर्शविली नाहीं व प्रयत्न केला नाहीं. धुळपांना व आंग्ऱ्यांना लोहचुंबकाची व तारवें बांधण्याच्या गोद्यांची जरूर विशेष होती. या दोन्ही गोष्टी त्यांनीं इंग्रजांच्या गलबतांतून व मुंबईत पाहिल्या होत्या. परंतु, त्या स्वतः बनविण्याची उत्कट इच्छा त्या प्रांतांतील लोकांना किंवा पुणें येथील मुत्सद्यांना झाली नाहीं हें मोठ्या कष्टानें कबूल करावें लागतें, ह्या इतक्या बाबींत मराठ्यांचें पाऊल मागें होतें.

१६

मराठी राज्याचा विकास

त्यावेळच्या मराठ्यांच्या राजकारणाचें रूप दोन प्रकारचें होतें. अंतस्थ व्यवस्था ठेवण्याचें राजकारण करणें हें एक रूप व सर्व भरतखंड हिंदुपदबादशाहींत आणणें हें दुसरें रूप. पैकीं पहिलें रूप कालान्तरानें बनत बनत कसें बनलें हें पाहणें मोठें मनोवेधक आहे. शहाजीच्या पूर्ववयांत जी एक लहानशी जहागीर होती, ती शिवाजीनें १६४६ त विजापूरच्या पातशाहींतून फोडून स्वतंत्र संस्थानाच्या पदवीस आणून सोडिली. विजापूरच्या पातशाहींतून स्वतंत्र झालेलें हें मावळांतील शकल वाढत वाढत १६७४ त सह्याद्रीच्या पृष्ठवंशाच्या पूर्वेस व पश्चिमेस बागलणापासून फोंड्या-पर्यंत वीस पासून तीस मैलांच्या अंतरानें पसरलें. ह्या प्रसाराला 'स्वराज्यस्थापन' अशी संज्ञा आहे. ह्यावेळीं राजा व अष्टप्रधान हींच काय तीं राज्याचीं अंगें होतीं. शिवाजीचें महाराष्ट्र त्यावेळीं वंशपरंपरेनें चालणारें व अष्टप्रधानोपदिष्ट असें एकसत्तात्मक राज्य होतें. शिवाजीच्या नंतर २७ वर्षांनीं शाहू राज्यासनीं आल्यावर ह्या एकसत्तात्मक राज्यांत मांडलिक ऊर्फ सरंजामी सरदार उत्पन्न झाले. सरंजामी सरदारांनीं आपापल्या प्रांतांतील मुलकी, दिवाणी व लष्करी व्यवस्था पाहून छत्रपतींना पेषकष देऊन रहावें असा निर्बंध बाळाजी विश्वनाथाच्या कारकीर्दीत पडला. सरंजामी सरदार उत्पन्न व्हावयाला व शिवाजीच्या स्वराज्याच्या बाहेर मराठ्यांची सत्ता पसरण्याला एकच गांठ पडली.

स्वातंत्र्यार्थ लढाईचा निकाल औरंगझेबाच्या मृत्युसमयीं मराठ्यांच्या तर्फेनें लागल्यावर, मराठ्यांच्या शक्तीचा जोर स्वराज्याला पुरून परराज्यांत वावरूं लागला. मोंगलांची पिछेहाट झाल्यावर मराठ्यांची पेषामद व्हावी हें पराकाष्ठेची मेहनत करून स्वतंत्र झालेल्या राष्ट्रांचें कुलक्रमागत व्रतच आहे. मोंगलांच्या प्रांतांत मराठ्यांची ही पेषामद मोठी चमत्कारिक झाली. राजाराम महाराज जिंजीस असतांना व राजाराम महाराज मृत्यु पावल्यावर खंडेराव दाभाडे, कंठाजी कदम बांडे, कान्होजी भोसले, चिमणाजी दामोदर, कान्होजी आंग्रे वगैरे सरदार बहुतेक स्वतंत्रपणें मोंगलांच्या प्रांतांत व मोंगलांनीं जिंकिलेल्या स्वराज्यांतील प्रांतांत अम्मल चालवीत होते. राज्यावर येण्याच्या समयीं व नंतर आपल्या पक्षाला बळकटी यावी या हेतूनें शाहूनें ह्या बहुतेक स्वतंत्र सरदारांना आपल्या राज्याचे बहुतेक स्वतंत्र असे सरंजामी

सरदार अथवा मांडलिक केले. मोंगलांच्या प्रांतांत अंमल करणाऱ्या ह्या सरदारांस सरंजाम दिल्यावर स्वराज्यांतील अष्टप्रधान व इतर योद्धे यांसहि सरंजाम देणें शाहूस भाग पडलें. फितूर झालेल्या जाधव, निंबाळकर वगैरे सरदारांना निजामुल्मुलुखानें सरंजाम दिल्यामुळें, तितक्याच योग्यतेची लालुच आपल्याहि सरदारांना देण्याशिवाय दुसरी सोय शाहूजवळ राहिली नाहीं. सरदारांना सरंजामी करून टाकिल्यावर अंष्टप्रधानांच्या उरावर शाहूनें एक मुख्य प्रधान अथवा पेशवा म्हणून अधिकारी नेमिला.

येथून पुढें पेशवा मुख्य व अष्टप्रधान गौण [illegible] प्रकार झाला. अष्टप्रधानांतील बरीच मंडळी ताराबाईच्या पक्षाची असल्यामुळें शाहूला ही तोड काढावी लागली. येणेंप्रमाणें मराठ्यांच्या राज्यपद्धतींत सरंजामी सरदारीचा नवीन प्रवेश झाला, व तींतून अष्टप्रधानपद्धतीचा हळूंहळूं लोप होत गेला. बाळाजी विश्वनाथाच्या कारकीर्दींत मराठी राज्यपद्धतीला, वंशपरंपरेनें चालणारी, एक प्रधानघटित मांडलिक-संस्थानोपवर्ति, संयुक्त लष्करी एकसत्तात्मक पद्धति अशी संज्ञा तंतोतंत लागूं पडते. सारांश, शाहू व बाळाजी विश्वनाथ ह्यांच्या कारकीर्दींत संयुक्त साम्राज्याचें स्वरूप महाराष्ट्र राज्यपद्धतीला येत चाललें होतें, अथवा खरें म्हटलें असतां, आलेंच होतें. महाराष्ट्राच्या ह्या संयुक्त साम्राज्याचें रूप एका आधुनिक राष्ट्राच्या संयुक्त साम्राज्याच्या रूपासारखेंच होतें. इंग्लंड व इंग्लंडच्या वसाहती ह्यांचा जो संयोग सध्यां बनत चालेला आपण पहात आहों तोच संयोग महाराष्ट्र व महाराष्ट्राच्या बाहेरील सरंजामी सरदारांचीं संस्थानें ह्यांचा त्यावेळीं बनत होता. भेद इतकाच कीं, इंग्लंडांत प्रतिनिधिनिक्षिप्त व बहुप्रधानघटित, वंशपरंपरेनें चालणारी एक सत्ता आहे आणि महाराष्ट्रांत त्यावेळीं एकप्रधानघटित अथवा पंतप्रधानघटित वंशपरंपरेनें चालणारी एक सत्ता होती. युनायटेड स्टेट्स, क्यानडा, ट्रान्सव्हाल ह्यांनीं जशी इंग्लंडच्या विरुद्ध आजपर्यंत वेळोवेळीं खटपट केली, त्याप्रमाणेंच आंग्रे, दाभाडे वगैरेंनीं महाराष्ट्राच्या विरुद्ध केली. वसाहतींतील संस्थानांचे हितसंबंध इंग्लंडच्या हितसंबंधांशीं गोवून टाकण्याचा ब्रिटिश मुत्सद्दी ज्याप्रमाणें सध्यां प्रयत्न करीत आहेत त्याप्रमाणेंच शाहू व बाळाजी विश्वनाथ यांनीं नवीन उत्पन्न झालेल्या सरदारांचे हितसंबंध आपल्या हितसंबंधांशीं गोवून टाकिले. सरदेशमुखी, बाबती, साहोत्रा वगैरे बाबींची वाटणी सरदारांच्या संस्थानांतून व जिंकलेल्या प्रांतांतून छत्रपति व सरदार ह्याच्यामध्यें त्यांनीं अशी करून टाकिली कीं मुख्य सत्तेचा स्पर्श सरदारांच्या सदा अनुभवास यावा व सरदारांच्या हालचाली सदा मुख्य सत्तेच्या देखरेखीखालीं रहाव्या. बाळाजी विश्वनाथाच्या ह्या शिस्तीलाच ग्रांट डफ् ब्राह्मणाचा कावा म्हणून दूषण देतो (Duff. chap. XII). कोणतेंहि राष्ट्र संयुक्तसंस्थानाच्या पदवीला येऊन पोहोंचलें म्हणजे संयोगांतर्गत संस्थानाचे हितसंबंध मुख्य सत्तेच्या

हितसंबंधांशीं गोवून टाकणें अत्यंत आवश्यक कसें होतें ह्याचा अनुभव डफ्ला नसल्यामुळें मुत्सद्देगिरीच्या ह्या धोरणाला तो 'ब्राह्मणांचा कावा' म्हणून दूषण देतो. परंतु संयुक्त साम्राज्याचें ओझें डोक्यावर येऊन पडलेल्या डफ्च्या नातवांना बाळाजी विश्वनाथाच्या ह्या धोरणाचा अर्थ जास्त उदात्त रीतीनें करतां येईल यांत संशय नाहीं. प्रसिद्ध इतिहासतत्त्ववेत्ते कैलासवासी महादेव गोविंद रानडे यांनीं बाळाजी विश्वनाथाच्या ह्या सरंजामी पद्धतीचे गुणानुवाद मोठ्या भारदस्त शब्दांनीं गायिले आहेत व ते, तत्कालीन वस्तुस्थिति लक्षांत घेतां, सर्वथैव योग्य आहेत. शिवाजीनें रचिलेल्या अष्टप्रधानघटित राज्यपद्धतीचें अनुकरण हिंदुस्थानांत ब्रिटिश मुत्सद्यांनीं केलें आहे असें ह्या तत्त्ववेत्त्याचें म्हणणें होतें. त्याचप्रमाणें मराठ्यांच्या साम्राज्याच्या हितार्थ बाळाजी विश्वनाथानें रचिलेली सरंजामी राज्यपद्धति, ब्रिटिश साम्राज्याशीं वसाहतींतील संस्थानांचे हितसंबंध जखडून टाकण्यास ब्रिटिश मुत्सद्यांनीं योजिलेल्या पद्धतीसारखीच आहे.

बाळाजी विश्वनाथाच्या सरंजामी पद्धतींतील कांहीं कलमें येणेंप्रमाणें होतीं. (१) आपापल्या ताब्यांतील प्रांतांत सरदारांनीं मुलकी व लष्करी अधिकार चालवावे. (२) प्रांतांतील उत्पन्नाचे हिशेब सरकारच्या सरदारांना दाखवून सरकारांत रुजू करावे. (३) छत्रपति हुकूम करतील त्या मोहिमेस सरदारांनीं जावें. (४) सरकारच्या हुकुमाशिवाय परराष्ट्रांशीं तह किंवा लढाई करूं नये. (५) ठरविले पेषकष सरकारांत दरवर्षीं भरणा करावी. (६) सरंजामी सरदारी वंशपरंपरा नसून सरकारास वाटेल त्यास ती देतां यावी, (७) छत्रपतींनीं दिलेले किताब नांवापुढें चालवावे. (८) राज्याच्या बाबी प्रथम वसुलांतून काढून ठेवाव्या. (९) वसुलाच्या बाबी सरदारांनीं देशपरत्वें ठरवाव्या. (१०) येणाऱ्या व जाणाऱ्या मालावर जकात बसवावी. ह्या पद्धतींतील हीं दहा कलमें मुख्य आहेत. ह्या पद्धतीअन्वयें, दाभाडे, आंग्रे, बांडे, भोसले, वगैरे सरदारांशीं करारनामे बाळाजी विश्वनाथाच्या कारकीर्दीत ठरले होते. ह्या कलमांतील कराराच्या विरुद्ध जो जाईल त्याचें पारिपत्य करणें छत्रपतींच्या अधिकारांतील होतें.

महाराष्ट्राच्या सिंहासनावर शाहूच्या आरोहणानें ज्याप्रमाणें सरंजामी सरदारांची उत्पत्ति झाली, त्याप्रमाणेंच अवरंगझेबाच्या मरणानें मराठ्यांच्या संयुक्त सत्तेची अथवा साम्राज्याची प्राणप्रतिष्ठा झाली. अवरंगझेबाची व अवरंगझेबाच्या सैन्याची वाताहत केल्यावर ह्याच्या साम्राज्याचा उपभोग घेण्याचा प्रयत्न कसकसा होत गेला ह्याचाहि वृत्तान्त मोठा मनोरंजक आहे. १७०७ त दिल्लीच्या पातशाहांचा मांडलिक ह्या नात्यानें शाहू प्रथम महाराष्ट्रांत आला. शाहू महाराष्ट्रांत येण्याच्या अगोदर जाधव, दाभाडे, बांडे, आंग्रे, भोसले वगैरे सरदारांनीं अवरंगझेबाच्या भोंवतालील वऱ्हाड, खानदेश, गुजराथ, कोंकण, मिरज वगैरे प्रांतांत अंमल बसवून चौथाई व सरदेशमुखी

वगैरे बाबी वसूल करण्याचा उपक्रम चालविलाच होता. शिवाजीच्या स्वराज्याच्या बाहेरील मोंगलांच्या प्रांतांत अंमल बसविण्याचा हा जो उद्योग तोच मराठ्यांचें साम्राज्य स्वराज्याच्या बाहेर पसरविण्याचा ओनामा होय. स्वराज्याच्या बाहेर उद्योग करणाऱ्या ह्या सरदारांना आपल्या पक्षाकडे ओढून घेऊन, शाहूनें मराठ्यांचें साम्राज्य पसरविण्याच्या व्रताचाहि स्वीकार केला. परंतु हा स्वीकार शाहूनें मोठ्या नाजूक युक्तीनें केला. १७१८ त सय्यद बंधूंना साहाय्य करण्याकरितां जेव्हां बाळाजी विश्वनाथ दिल्लीस गेला तेव्हां खानदेश, वऱ्हाड, गुजराथ, कोंकण व विजापूर ह्या प्रांतांत मराठ्यांनीं मिळविलेला मुलूख दक्षिणच्या सहा सुभ्यांच्या सनदेबरोबर पातशहाकडून बहाल व्हावा अशी अट सय्यदांकडून शाहूनें कबूल करून घेतली. चिनकुलीचखानाचा म्हणजे निजामुल्मुलुखाचा पक्ष दुर्बल करण्यास, सय्यदांचा मराठ्यांना ही अट बहाल करण्यांत फायदाच होता. गुजराथ, वऱ्हाड, बंगाला, ओढ्या, माळवा, औरंगाबाद, विजापूर, कोंकण वगैरे प्रांतांत जेथें जेथें सय्यदांचे शत्रू असतील तेथें तेथें त्यांना मराठ्यांकडून तंबी बसावी हा तर सय्यदांचा मुख्य हेतु होता. दिल्लीच्या पातशहाच्या हुकुमानें त्या त्या प्रांतांतील मुसलमान सुभेदारांशीं आपण भांडत आहोंत असा राजरोस हक्क सुभेदारांचे प्रांत जिंकण्यांत मराठ्यांनाहि सांगतां आला. ह्यावेळीं पातशहानें नेमिलेले मुसलमान सुभेदार दिल्लीपतीचे शत्रू म्हणून नांवाजले गेले व मराठे आज्ञाधारक सेवक म्हणून दुनियेंत प्रसिद्ध झाले. निजामुल्मुलूख, सुरबुलंदखान, जंजिरेकर, दयाबहादूर वगैरे सुभेदारांशीं मराठ्यांचीं जीं युद्धें झालीं तीं मराठे दिल्लीपतीचे सेवक ह्या नात्यानेंच झालीं. सारांश, मराठ्यांचें साम्राज्य दिल्लीपतीची सेवा करतां करतांच वाढलें.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम..... विः ....
क्रमांक ..... नोंः दिः .....

मराठेशाहीचा पाया घालणारा शहाजी

जयराम म्हणतो त्याप्रमाणें स्वराज्य स्थापून स्वधर्म, स्वदेश, स्वभाषा व स्वजन यांचें पालन, लालन व संरक्षण करावें, ह्यांत तो आपल्या जीविताचें साफल्य मानी. आजपर्यंत अशी समजूत होती कीं, स्वराज्य, स्वधर्म, स्वभाषादि संरक्षण करण्याच्या कल्पनेचा प्रथमोदय शिवकालीं झाला. आजपर्यंत अशी समजूत होती कीं, पाच्छाही नोकरी व चाकरी करून भाकरी मिळविण्यापलीकडे शहाजीची उडी गेली नव्हती. आजपर्यंत अशी समजूत होती कीं, संस्कृतप्राकृत भाषांना प्रथमाश्रय शिवाजीनें दिला. आजपर्यंत अशीहि समजूत होती कीं, मराठे लोकांच्या अंगीं माणूसकी प्रथम शिवाजीनें आणिली. परंतु ह्या कल्पना जयरामाच्या प्रत्यक्ष साक्षीपुढें व कालानुक्रमिक राजकीय चरित्रापुढें ह्यापुढें टिकणें शक्य नाहीं. स्वराज्यस्थापनेच्या कल्पना शहाजीच्या वेळींच अत्यंत अंधुकपणें व अल्पांशानें कां होईना पण उदय पावल्या होत्या.

शहाजीचे स्वराज्यस्थापनेचे अनेक प्रयत्न

शहाजीचा प्रकटपणें स्वतंत्र स्वराज्यस्थापण्याचा पहिला उद्योग शक १५५१त लोदीच्या बंडाच्या वेळीं झाला. परंतु, शहाजहानाच्या व आदिलशहाच्या जोड प्रतिरोधापुढें तो उद्योग फार काळ टिकला नाहीं. नंतर स्वराज्य स्थापनेचा दुसरा उद्योग शक १५५५ त निजामशाही पुनरुज्जीवित करून तिची पेशवाई करतां करतां व विशेष वैपरीत्य भासूं न देतां राजकीय प्रसंगांच्या सहज ओघांत राज्यासन स्वतः आक्रमिण्याचा होता. तोहि शहाजहानाच्या प्रबल विरोधामुळें व महमदशहाच्या नरमपणामुळें साधला नाहीं. नाहींतर, त्याचवेळीं प्रच्छन्न स्वराज्यस्थापनेचा योग बहुतेक जुळून आला होता. राज्यस्थापनेचा हा दुसरा प्रच्छन्न बार हुकल्यावर, शहाजीनें पुनः दहा वर्षें खटपट व जुळवाजुळव करून स्वराज्याची कर्नाटकांत पुनः तिसऱ्यांदा रचना केली व ती त्यावेळीं साधली. कारण त्या कामीं शहाजहानासारख्या प्रबल शत्रूचा प्रतिबंधहि नव्हता आणि शिवाजी व संभाजी यांच्या शस्त्रप्रहारानें आदिलशाही हतप्रभहि झाला होता. परंतु ह्या कर्नाटकांतल्या स्वराज्यांत व भीमगडच्या स्वराज्यांत महदन्तर होतें. कर्नाटकांतलें शहाजीचें स्वराज्य म्हणजे परक्या कानडी लोकांवरचें

परक्या मराठ्यांचें राज्य. आणि भीमगडचें स्वराज्य म्हणजे मराठ्यालोकांवरचें म्हणजे स्वजनांवरचें मराठ्यांचें राज्य. असें हें कर्नाटकांतल्या स्वराज्यांत व्यंग होतें. परंतु परिस्थितीपुढें त्याला कांहीं उपाय नव्हता. शहाजीच्या ह्या कानडी स्वराज्यांत दुसरी एक अशी गोम होती कीं, आदिलशाहीपासून शहाजीचें स्वराज्य धक्काबुक्की होऊन तुटून विभक्त झालेलें नव्हतें; म्हटलें तर स्वतंत्र, म्हटलें तर परतंत्र अश्या लिबलिबीत स्थितींत होतें. परंतु, शहाजीला ज्या परिस्थितींतून रस्ता काढावयाचा होता त्या परिस्थितींतून ह्याहून श्रेष्ठ फल तत्काल मिळण्यासारखें नव्हतें, आस्ते आस्ते कालान्तरानें अलगज हातांत आपण होऊन पडण्यापैकीं होतें. आणि तो प्रकार पुढें झालाहि. परंतु राज्याक्रमणाचे हे दोन्ही प्रकार यद्यपि स्वल्पिष्ट घर्षणाचे असले तत्रापि परिणामीं कर्त्याला गौणत्व आणून कधींकधीं अडचण उत्पन्न करणारे असतात. दुर्बल राजाची पेशवाई किंवा सरलष्करकी करतां करतां, त्याला हळूंच ढकलून देणाऱ्या स्वराज्यस्थापकावर कृतघ्नतेचा व स्वामिद्रोहाचा आरोप प्रतिपक्षी आणूं शकतात व ते आरोप निमूटपणें ऐकून घ्यावे लागतात. मूळ धन्याचें मांडलिकत्व पतकरितां पतकरितां तें प्रसंगीं झुगारून स्वराज्य स्थापण्याचा प्रकारहि असाच स्वामिद्रोहाच्या आरोपास पात्र होतो. कर्नाटकांतील स्वराज्यस्थापनेंतील हें गौणत्व शहाजी जाणून होता.

शिवाजीच्या यशांत शहाजीचा भाग

करतां, मिंधेपणाचा गंधहि ज्या स्थापनेंत आढळून येणार नाहीं, असें स्वराज्य दादाजी कोंडदेव, जिजाबाई व शिवाजी यांच्या द्वारा शहाजीनें चौथ्यानूदा स्थापिण्याचा उद्योग बंगळूराहून पुणें प्रांतीं करविला. आदिलशाहीशीं व मोंगलाईशीं फटकून वागून, हा उद्योग मुद्दाम जाणूनसवरून करण्यांत आला. अश्या करतां कीं, ह्या उद्योगावर स्वामिद्रोहाचा किंवा कपटकूटाचा आरोप प्रतिपक्षांना आणण्याची बिलकुल सोय राहूं नये. पुणें प्रांतांतील हें स्वराज्य स्वजनांचें स्वजनांवर असल्यामुळें तें टिकाऊ, भरींव व चिरंजीवी होऊन, मनमोहक व आदरणीय झालें. महाराष्ट्रांतील ह्या चौथ्या स्वराज्यस्थापनेचें सर्व श्रेय शिवाजीच्या पदरांत पडलें हें खरें. परंतु, मूळ कल्पना व योजना शहाजीची असल्यामुळें, शहाजीलाहि ह्या श्रेयाचा वाटेकरी करणें इतिहासास प्राप्त आहे. पिंगळे, अत्रे, दादाजी, पानसंबळ, रोझेकर, जेधे, बांदल, हे सर्व मुत्सद्दी व सरदार शहाजीचे, जहागीर शहाजीची, तोफा, हत्ती, घोडे वगैरे किल्लोकिल्लीं व ठाणोठाणीं सांठविलेला जंगी सरंजाम शहाजीचा. त्यांच्या जोरावर शिवाजीनें आपली इमारत मूळ रचिली. आकाशांतून पडला आणि धांवायला लागला. अशांतला कांहीं प्रकार शिवाजीचा नव्हता. बापाच्या खांद्यावर उभा राहून शिवाजी पाहिल्यानूदा उच्चासनस्थ झाला. निंबाळकर, मोहिते, जाधव,

महाडीक, गायकवाड, इत्यादि थोर मराठा कुळांशीं शहाजीचा पिढीजात शरीरसंबंध असल्यामुळें, शहाण्णव कुळींतील नामांकित मराठ्यांचें साहाय्य शिवाजीस मिळालें. तात्पर्य, दरबारी मुत्सद्दी, लष्करी सरदार, लढाऊ सामान, शहाण्णव कुळींच्या जेधे आदिकरून मराठ्यांचें साहाय्य व शहाजीच्या नांवाचा दरारा व दिमाख, ह्या देणग्या शहाजीकडून शिवाजीस मिळाल्या. शिवाय, अडचणीच्या प्रसंगीं वेळोवेळ शहाजीची मदत शिवाजीस पोहोंचत असे ती निराळीच. शक १५८३ तील शिवाजीचा अदिलशाहाशीं तह शहाजीनें आपण होऊन घडवून आणिला. ह्या सगळ्याचा मथितार्थ एवढाच कीं, स्वराज्यस्थापनेचा धागा शहाजीच्या अथपासून इतिपर्यंतच्या सबंध चरित्रांत शक १५५१ पासून शक १५८३ पर्यंत अनुस्यूत झालेला आढळतो. पहिला १५५१ तला स्वराज्यस्थापनेचा प्रगट प्रयत्न चार सहा महिन्यांत आटोपला. शक १५५५ तील दुसरा प्रच्छन्न प्रयत्न शहाजहानानें हाणून पाडिला. शक १५७० तील कर्नाटकांतील मांडलिकी राज्यस्थापनेचा तिसरा प्रयत्न बराच सफल झाला. परंतु शिवाजीच्या द्वारा सुरू केलेला शक १५७२ तील पुण्याकडील पूर्णपणें स्वतंत्र स्वराज्यस्थापनेचा चौथा प्रयत्न मात्र अंदाजाबाहेर फलद्रूप झाला.

पक्ष, सैन्य व हत्यार यांची जुळणी व त्याची तत्त्वमीमांसा

धोरण व इतिकर्तव्यता ह्यांचा खुलासा झाल्यानंतर, ज्या साधनांच्या चाकांवर धोरण व इतिकर्तव्यता यांचा गाडा चालवणें शक्य होतें व ज्या साधनांच्या अभावीं मनांतले थोर राजकीय विचार जागच्या जागीं शुष्क होऊन जातात त्या साधनांची निर्मिति व जोपासना शहाजीनें कशी केली तेंहि शोधणें क्रमप्राप्त होतें. एवढें मोठें हजारोनें मोजतां येण्यासारखें प्रबल सैन्य शहाजीनें कोठून आणिलें आणि त्याला रोजमुरा कोठून दिला हा साधनसंबंधक पहिला प्रश्न. आणि दोन-तीन वेळां स्वराज्यसाधनिकेंत फसला असतां खचून न जातां उत्तरोत्तर ज्या नव्या दमानें शहाजी कामास लागलेला दिसतो तो दम त्याला कोठून पैदा झाला हा दुसरा प्रश्न. हे प्रश्न सोडवितांना प्रथम लक्ष्यांत धरिलें पाहिजें कीं, शहाजी हा प्राधान्यें करून व्यवहारचतुर मुत्सद्दी होता, केवळ कल्पनातरंगावर वाहवत जाणारा शेखमहंमद नव्हता. त्याच्या आधीं व त्याच्या कालीं राष्ट्र सुधारण्याचे प्रयत्न करणारे शेखमहंमद थोडेथोडके झाले नव्हते.

कलीं मातला, सबब समाजाला दैन्य आलें व तें भोगिल्या खेरीज गत्यंतर नाहीं, असें रडगाणें गाऊन स्वस्थ बसणारे ऐदी किती तरी होते. विठोबा सर्व कांहीं योग्य वेळीं नीट करील, त्याला जनतेची काळजी आहे, असें समाधान करून घेणारे भक्तिमार्गी तर असंख्य होते. मुसुलमानी पेहराव, मुसुलमानी चालीरीति, मुसुलमानी भाषा व मुसुलमानी धर्म स्वीकारून समाजाच्या यातना बंद करूं पहाणारे किती तरी

हिंदू प्रांतोप्रांतीं पीर होऊन बसले होते. यवनांवर रुसून त्यांच्याशीं व्यवहार बंद करून त्यांचें मुखावलोकन न करणारी दासोपंतादि मंडळीहि आपल्याकडून यवनांच्या पारिपत्याचे प्रयत्न करीतच होती. यवनसेवा करून जनतेचा परामर्ष घेऊं पहाणारे दामाजीपंतहि अनेक होऊन गेले. यवनांविरुद्ध बंड करून स्वराज्य मिळविणारेहि कांहीं वेडे निपजले. मंत्रतंत्रांनीं यवनांना स्तंभित करण्याचा कित्येकांचा खटाटोप होता. यज्ञयागांचा व देवदेवालयांचा जीर्णोद्धार करून धर्मसंरक्षण करण्यांत कित्येकांनीं सर्वस्व खर्चिलें. गोरक्षण करून प्रजेंत जोम उत्पन्न करूं पहाणारे गोरखनाथीहि देशांत वावरत होते. कथाकीर्तनें व रामायणभारतें देशभाषेंत बनवून देशांतील लोकांच्या आंगीं स्फुरण चढवूं पहाणारे कीर्तनकार व ग्रंथकार तर त्या कालीं शेंकडोनें मोजावे लागत. असे नाना प्रकारचे बरेबुरे उपाय जो तो आपापल्या परी करीतच होता. परंतु असले हे सर्व उपाय तीनशें वर्षें करूनहि यवनांचें काडीमात्र कोणी नुकसान करूं शकलें नाहीं. तेव्हा जो तो समाधान असें करून घेई कीं, बीं रुजत घातलें आहे, तें योग्य वेळीं रुजून त्याला फळें आल्याशिवाय रहाणार नाहींत. ही भविष्यवादी विचारसरणी निरुत्तर करणारी असल्यामुळें, भविष्यकाळीं तिची साफल्यता अनुभवास यावयाची असल्यामुळें, व भविष्यकाळाला अंत नसल्यामुळें, ह्या आशेची निराशा तीनशें वर्षें निघून गेलीं तरीहि कधींच झाली नाहीं. अशातला आशावादी शहाजी नव्हता.

तो पक्कें जाणत होता कीं, यवनाचें राज्य हें विधर्मी परदेशी अल्पसंख्याकांचें राज्य आहे. तें हिंदूंच्या हत्याराहून श्रेष्ठतर हत्यारांच्या जोरावर व जरबेवर चाललें आहे, आणि ह्या परदेशी अल्पसंख्यांक राज्यकर्त्यांत आपसांतील यादवीमुळें किंवा ऐषआरामोत्पन्न आलस्यामुळें दौर्बल्य निर्माण झाल्यासहि त्यांच्याहून श्रेष्ठतर, निदान त्याच्या बरोबरीचीं हत्यारें जित लोकांनीं पैदा केल्याशिवाय त्याचा पाडाव होणें अशक्य आहे. तो हेंहि आणीक स्वानुभावानें जाणत होता कीं, हिंदुस्थानांत व महाराष्ट्रात अश्या किती तरी लढाऊ जाती आहेत कीं, ज्या वाटेल त्या स्वधर्मी किंवा परधर्मी धन्याची लष्करी नोकरी करून केवळ भाकरी करितांहि स्वतःचा प्राण देण्यास व दुसऱ्याचा घेण्यास एका पायावर तयार आहेत. तो हेंहि पहात होता कीं, महाराष्ट्रातील एकाच गांवातल्या व एकाच कुळांतल्या व गोतातल्या भाऊबंदांपैकीं कांहीं लोक मराठ्या सरदारांच्या लष्करी तैनातींत आहेत व कांहीं मुसुलमान सरदारांच्या व बादशहांच्या लष्करी तैनातींत आहेत, आणि त्यांपैकीं कोणीहि धन्याच्या देशाची, राष्ट्राची, धर्माचीं, हेतूची किंवा कशाचीच विचारपूस, इष्टानिष्टता, आवडनिवड किंवा श्रेष्ठकनिष्ठता पहात नाहीं. स्वतःचें भोंसले कूळ पहावें तर, तो व त्याचा बाप हे निजामशाही नोकर होते, त्याचे चुलतभाऊ मोंगलाई नोकर होते व त्याचे कुळभाऊ आदिलशाही व बेरीदशाही सैन्यांत होते. अश्या स्थितींत स्वतःचा स्वतंत्र पक्ष,

स्वतःची स्वतंत्र फौज व स्वतःचीं श्रेष्ठतर हत्यारें कशीं निर्माण करावीं ह्या तीन बाबींचा त्यानें खल केला.

(१) पक्ष निर्माण करणें म्हणजे ज्यांचा पक्ष निर्माण करावयाचा त्यांच्यांत कोणती तरी सामान्य आकांक्षा अस्तित्वांत असली पाहिजे. धर्म, जाति, देव, देश हीं चार स्थानें उत्तम पुरुषांच्या ठाईं समान आकांक्षेचे विषय होऊं शकतात. परंतु त्या कालीं मराठ्यांच्या मनोरचनेंत ह्या स्थानांना, बिलकुल म्हटलें तरी चालेल, अवकाश नव्हता. अशा द्विपाद पशुतुल्य अधम लोकांत समानबंधनत्व फक्त एकच सांपडण्याजोगें होतें. तें हेंच कीं, ह्या द्विपादांच्या पोटापाण्याची व्यवस्था करून त्यांना आपल्या हुकमतींत बैलांप्रमाणें किंवा गाढवाप्रमाणें राबविणें आणि मनाजोगी कामगिरी करून घेतल्यावर दोन ममतेचे शब्द बोलून पाठ थोपटणें. तात्पर्य, पोटाला भाकर देणारा धनी हा ह्या अधम संस्कृतीच्या लोकांचा समानबंधनत्वाचा विषय होता. तो पाठीवर असला म्हणजे हे लढावयाचे. तो मेला किंवा पळाला तर पोटाच्या भीतीनें हे पळावयाचे. लढाईंत धनी मेला कीं हिंदुस्थानांतील शिपुर्डीं पळ कां काढितात, याचें खरें बिंग न कळल्यामुळें, अनेक परकीय इतिहासकार या पळकुट्यांना भेकड म्हणतात. परंतु हें म्हणणें अवास्तव आहे. हिंदुस्थानांतील शिपायांना मरणाचें भय इतकें वाटत नाहीं. त्या पशूंना मुख्य भय पोटाचें. धनी मेल्यावर पोटाला घालणारा मेला, म्हणून हे लोक पोटाला घालणारा दुसरा धनी पहाण्याकरितां जीव बचावून पळतात. अशी ही ह्यांच्या पलणाची मीमांसा आहे. शहाजी हें सर्व जाणून होता.

(२) शहाजीस ह्या लोकांना पदरीं बाळगण्याची म्हणजे आपल्या फौजेंत त्यांची भरती मनसबदार ह्या नात्यानें राजरोस करण्याची मुभा होती. हें सैन्य जमवून स्वपक्ष निर्माण करण्याच्या कामीं मनसबदारी त्याच्या आयती पथ्यावरच्च पडली. तो मनसबदार नसता व आपल्या पाटिलकीच्या गांवीं पाटील किंवा देशमुख म्हणून असता व फौज जमविण्याचा उद्योग करता, तर त्याची गणना बंडखोर पुंडांत झाली असती व त्याचें शासन ताबडतोब झालें असतें. जुलमी परकीय राजांचा नाश करावयाचा म्हटला म्हणजे त्यांची नोकरी करून व विश्वास संपादून योग्य समयीं त्यास गचांडी देण्याचा मार्ग जित लोकांना सदा श्रेयस्कर, सुरक्षित व न्याय्य गणलेला आहे. तो मार्ग शहाजीच्या बापानें चोखाळून आपल्या मुलाला साफ करून ठेविला होता. तात्पर्य, निजामशाही मनसबदार असल्यामुळें त्याला फौज बिनबोभाट जमवितां येणें सहज झालें होतें. आणि ही फौज म्हणजेच शहाजीचा पक्ष बनला होता. साधनांपैकीं पक्ष आणि फौज बापाच्या मृत्यूनंतर त्याच्या हुकमतींत आल्यावर, शहाजीनें आपल्या गोड वागणुकीनें फौजेला आपली इतकी कांहीं ममता लाविली कीं बखरकार लिहितो, फौजेंतील शिपायाला व अंमलदारांना असें वाटे कीं नोकरी करावी तर ती राजा शहाजीची करावी. शहाजी केवळ

आपला मायबाप आहे. मायेनें असा आपलेपणा फौजेंत उत्पन्न केल्यावर शहाजीनें पाहिलें कीं केवळ मायेनेंच सर्व काम भागत नाहीं व माया पोटभर दाखविली म्हणजे शिपाई जास्त कर्तबगार होतो अशांतलाहि अर्थ नव्हे. मायेनें फार तर शिपाई इमानी बनेल. परंतु इमानाइतकीच कर्तबगारीची किंमत असल्यामुळें, आपल्या फौजेची कर्तबगारी व कार्यक्षमता जेणें करून वृद्धिंगत होतील तें साधन शहाजीनें पैदा करण्याच्या योजना केल्या. तें तिसरें साधन म्हणजे श्रेष्ठतर हत्यारें.

हत्यार चोख पाहिजे आणि तें प्रतिपक्ष्याच्या हत्याराहून श्रेष्ठतर पाहिजे, ह्या बाबीची जाणीव शहाजीच्या ठाईं स्वकालीन अनुभवानें अत्युत्कट बाणलेली होती. पूर्वेतिहासहि त्याला तेंच शिकवीत होता. कोणत्याहि राष्ट्राच्या संस्कृतीचा श्रेष्ठकनिष्ठपणा त्या राष्ट्राच्या हत्याराच्या स्वरूपावरून ओळखतां येतो. फार काय सांगावें, हत्यार हें राष्ट्राच्या एकंदर संस्कृतीचें मापक आहे. जशी ज्या राष्ट्राची संस्कृति तसें त्या राष्ट्राचें हत्यार. पशुपक्ष्यांचीं हत्यारें म्हणजे नांग्या, दांत, नखें, खूर, सोंडा, शेपट्या, पिसें वगैरे त्यांचे अवयव होत. त्यांहून उच्चतर कोटींतला वानर क्वचित् धोंडे, फांद्या, वगैरे सहजोपलब्ध बाह्य साधनांचा उपयोग करूं शकतो. त्यांहून श्रेष्ठ जो अर्धवट रानटी माणूस, तो गारेच्या बोथाट्या वगैरे ओबडधोबड दगडी हत्यारें घासून तयार करतो व प्रसंगीं उपयोगी पडावीं म्हणून संग्रहीं जमा करून ठेवितो आणि पशुपक्ष्यांचा संहार करतो. त्याच्याहून श्रेष्ठ पाह्यरीचा आर्य माणूस खाणी खणण्याचा व त्यांतून तांबें, लोखंड वगैरे धातू काढण्याचा शोध लाविती व त्या धातूंचे भाले, बरच्या, तिरांचे फाळ, सुऱ्या वगैरे धारेचीं दूरवर फेकतां येण्याजोगीं हत्यारें बनवितो व केवळ आंगलट करून झोंबाझोंबी किंवा मारामारी करणाऱ्या अर्धरानटी समाजाला जिंकून गुलाम बनवितो. धनुर्धारी राम ह्या खनिकर्मकुशल आर्यांपैकीं होता व तो आपल्या शेकडों लोखंडी बाणांनीं एतद्देशज रानटी भिल्ल, गोंड, कातकरी, राक्षस, वगैरे लोकांचा नायनाट करी व त्यांपैकीं कित्येकांना शूद्र करून आपलीं काबाडकष्टाचीं कामें करवी. लोखंडी बाणांहूनहि दूर पल्ल्याच्या हत्यारांचा म्हणजे दारूनें उडणाऱ्या वेळूच्या कांडांचा शोध लावणाऱ्या आर्यांनीं केवळ लोखंडी तीरानें लढणाऱ्या आर्यांचा पराभव करून आपलें रसायणमिश्रणज्ञान जगाच्या अनुभवास आणिलें. त्याहि पुढें मजल मारून लोखंडी नळयांत दारू भरून अर्ध्या पांव कोसावरून शत्रूचा पाडाव करणाऱ्या मुसुलमानांनीं ख्रिस्ती, हिंदू, वगैरे कनिष्ठ संस्कृतीच्या लोकांचा पराभव केला. पुढें यूरोपीयन लोकांनीं नाना शास्त्रीय शोधांच्या द्वारा नेमकें काम करणाऱ्या व दूरवर पल्ल्यांच्या तोफा, बंदुका, वगैरे संगीन हत्यारांच्या जोरावर मुसुलमानांची यूरोपांतील स्पेन वगैरे देशांतून हकालपट्टी केली व पृथ्वीवरील अमेरिका, आफ्रिका व हिंदुस्थान हे देश जिंकिण्याची खात्रीपूर्वक हिंमत बांधिली. एवढी मोंगलांची अफाट व प्रबळ सत्ता, परंतु पोर्तुगीझ चांच्यांनीं

कितींदा तरी समुद्रावर त्यांची इज्जत घेतली. ह्याच कालीं कुस्तुंतुनियाच्या तुर्कांनीं व्हेनिशियन लोकांपासून श्रेष्ठ बंदुका व तोफा आणि दारूगोळा तयार करण्याची सर्वश्रेष्ठ कला अर्धीमुर्धी व उष्टीमाष्टी किंचित् आपलीशी केली होती. त्या अर्धवट तुर्क कारागिरांना पदरीं ठेवून, दिल्लीचा मोंगल व दक्षिणेंतील शहा हत्यारें व दारूगोळा बनवून त्याच्या जोरावर देशांतील अर्धवट सुधारलेल्या टाळकुट्या हिंदूंना व परस्परांना भिवडवीत असत. हा सर्व चमत्कार शहाजी पहात होता.

उत्तम कारीगार हत्यार कोठून पैदा होतें व कोण आणून देतें ह्याचा अनुभव जुन्नरच्या घाटाखालील कोंकणांत त्याला आला होता. दमण, दीव, वसई, गोवा, सुरत, तेलीचेरी इत्यादि स्थलींच्या टोपीवाल्यांकडून कारीगार हत्यारें पैदा करून निजामशाही, आदिलशाही व मोंगलाई सैन्याहून शहाजी आपली फौज जास्त कर्तबगार ठेवूं लागला. अश्या तऱ्हेनें पक्ष, सैन्य व हत्यार शहाजीनें निर्माण केलें आणि त्यांच्या जोरावर प्रगट स्वराज्य, प्रच्छन्न स्वराज्य, मांडलिकी स्वराज्य व निर्भेळ स्वतंत्र स्वराज्य उत्तरोत्तर स्थापित असतां, वेळोवेळीं येणाऱ्या विपत्तींत दम न सोडतां पूर्वीच्याहून जास्त हुरुपानें पुढील कर्तव्य तो बजावीत राहिला. सैन्य व हत्यार ह्यांच्यावरील त्याचा विश्वास मोठ्या विपत्तींतहि कधीं ओसरला नाहीं. शेवटीं ह्या साधनांच्या जोरावर आपण विजयी होऊंच होऊं अशी त्याची बालंबाल खात्री होती व परिणामावरून पहातां ही खात्री साधार होती. शहाजीच्या अलौकिक निर्धाराची व दमाची ही अशी मीमांसा आहे.

हत्यारें विकत घेणाऱ्या भारतीयांची संस्कृति पाश्चात्त्यांपेक्षां कमदर्जाची

येथें एक आनुषंगिक प्रश्न असा निघतो कीं, टोपीवाल्यांकडून कारीगार बंदुका तोफा, व दारुगोळा जो शहाजी घेई तो त्यानें महाराष्ट्रांत त्या बरहुकूम बनविण्याची व्यवस्था कां केली नाहीं ? अथवा शहाजीचा मुलगा शिवाजी त्यानें तरी कां केली नाहीं ? किंबहुना बाजीराव बल्लाळ, बाळाजी बाजीराव व नाना फडणवीस ह्या गृहस्थांनीं कां केली नाहीं ? उत्तम हत्यारांकरितां दुसऱ्यांचें मिंधें रहाण्याची लज्जा यांना कशी वाटली नाहीं ? प्रश्नाला उत्तर एकच आहे व तें अगदीं साधें आहे. तें हें कीं, उत्तम रेखीव व नेमकें हत्यार बनविण्याची कला पैदा होण्यास शास्त्रीय ज्ञानाची जी पूर्व तयारी राष्ट्रांत व्हावी लागते ती त्या कालीं महाराष्ट्रांत नव्हती. शहाजीच्या हयातींत युरोपांत डकार्ट, बेकन, इत्यादि विचारवंत सृष्टपदार्थसंशोधनकार्याचे वाली ज्यारीनें पंचभूतांचा शोध लावण्यास लोकांना प्रोत्साहित करीत होते. आणि आपल्या इकडे एकनाथ, तुकाराम, दासोपंत, निपटनिरंजन, इत्यादि संत पंचभूतांना मारून ब्रह्मसाक्षात्कारांत राष्ट्राला नेऊन मुक्त करण्याच्या खटपटींत होते. अश्यांना स्क्रू, टांचणी, बंदूक व तोफ यांचा विचार वमनप्राय वाटल्यास त्यांत नवल कसचें ? थोडक्यांत

आगस्ट कौंट याच्या भाषेंत सांगावयाचें म्हणजे महाराष्ट्र त्या कालीं Metaphysical अवस्थेंत होतें आणि Positive अवस्थेंत येण्यास त्याला अद्याप पांचशें वर्षें अवकाश होता. म्हणजे शक २००० च्या सुमारास महाराष्ट्र Positive बनणार होतें. अश्या अवस्थेंत आपल्याला बनवितां येत नाहींत तीं श्रेष्ठ हत्यारें दुसऱ्यांकडून विकत घेण्याखेरीज शहाजीला गत्यंतर नव्हतें.

सध्यां महमन्द, आफ्रीडी, चित्रळी, अफगाण, इराणी इत्यादि अर्धसुधारलेल्या लोकांची जी अवस्था आहे तीच आपली शहाजीच्या कालीं होती. उत्तम जर्मन, फ्रेंच किंवा रशियन बंदूक घेऊन जो आफ्रीडी माणूस चोऱ्या, दरवडे व हल्ले करतो, त्यांहून शहाजीकालीन मराठा ज्यास्त सुधारलेला होता हें खरें. परंतु शस्त्राकरितां तो युरोपियनांचा आफ्रीडीच्या इतकाच परावलंबी होता. ह्या परावलंबित्वाचा अर्थ शहाजीच्या कालीं कोणाच्या लक्ष्यांत कितपत आला असेल तें सांगण्यास साधन नाहीं. परंतु विष जें आहे तें जाणून खा कीं नेणून खा, आपला अंमल केल्याशिवाय जसें रहात नाहीं, तसेंच ज्याचें हत्यार त्याचें राज्य हा नियम—कोणाला समजो कीं न समजो—आपलें कार्य केल्याशिवाय रहात नाहीं. अर्थात्, मूळ हत्यार तयार करणारे जे फिरंगी, फ्रेंच, डच किंवा इंग्रज वगैरे युरोपियन त्यांना राज्य कमावून देण्याकरितां नजाणतेपणें शहाजी जिवापाड मेहनत करीत होता असा अर्थ झाला. आणि हा अर्थ शहाजी व त्याचे ब्राह्मण मुत्सद्दी यांच्या लक्ष्यांत यावा तसा नव्हे तर मुळींच आला नाहीं. ज्या दिवशीं व्हास्कोनें कालिकतच्या चामुरीच्या थोबाडींत मारिली तोच हिंदुस्थानचें साम्राज्य युरोपीयनांच्या हातांत जाऊं लागण्याचा पहिला दिवस होय. मूठभर फिरंगी लोकांनीं एका हिंदु राजाला पहिले छुट कुंठित करावें असें त्यांच्याजवळ कोणतें बरें सामर्थ्य होतें ? काय त्यांना दहा तोंडें व वीस हात होते ? कीं ते इजार नेसत होते व बायबल पढत होते म्हणून ते इतके प्रबल झाले ? तर अनेक शोधांच्या साहाय्यानें सिद्ध झालेलीं लांब पल्ल्याचीं कारीगार हत्यारें त्यांत त्यांचें सामर्थ्य होतें. हीं हत्यारें म्हणजे युरोपीयन शास्त्रीय संस्कृतीचा केवळ निष्कर्ष होत. ह्या हत्यारांच्या जोरावर एक युरोपीयन हजार हिंदुमुसुलमानांना भारी होता. हा अर्थ शहाजीसारख्या धोरणी, दूरदर्शी, मतलबी व जागरूक सरदाराच्या लक्ष्यांत न यावा अशीच तत्कालीन महाराष्ट्रसमाजाची स्थिती होती. तेव्हां दोषाचा वाटा शहाजी प्रमाणेंच तत्कालीन समाजावर पडतो, हें उघड आहे. सगळेंच आंधळें, त्यांत एकालाच सुळावर चढविण्यांत मतलब काय ? ह्या बाबींत शहाजीच्या पंक्तीस अकबर, शहाजहान, मीरजुमला व औरंगझेब असे सारेच बसतात. तेव्हां हा तत्कालीन भारतवर्षीय संस्कृतींतलाच सर्वसाधारण दोष होय हें कबूल करावें लागतें.

हा एक सर्वसामान्य दोष सोडला तर दुसरा कोणताहि मूढ दोष शहाजीच्या चरित्रांत दिसून येत नाहीं. पक्ष, सैन्य, हत्यार ही तीन साधनें जुळविण्यांत शहाजीनें जशी मेहनत घेतली तशीच मुख्य धनी जो बुऱ्हाणशहा त्याची मर्जी संपादण्यांतहि शहाजीनें बहुत चातुर्य दाखविलें. मलिकंबर, फतेखान, जाधवराव, इत्यादि साऱ्यांना मागें सारून बुऱ्हाण निजामशहाच्या गळ्यांतील केवळ ताईत शहाजी झाला. त्यामुळें आपलें राज्यस्थापनेच्या हेतूची सिद्धता करण्याचें त्याचें काम बरेंच सुकर झालें. दुसऱ्याच्या मनांत शिरून त्याला आपला करण्याची करामत शहाजीच्या इतकी तत्कालीन ऐतिहासिक व्यक्तींत फारच थोड्यांच्या ठाईं आढळण्यांत येते.

शहाजी व रामदास-शिवाजींची जोडी

शहाजीचें उत्तरचरित्र म्हणजे शक १५६२ पासून शक १५८५ पर्यंतच्या तेवीस वर्षांतील चरित्र शिवाजीच्या तत्कालीन चरित्राशीं समान्तर आहे, इतकेंच नव्हें तर शिवाजीच्या चरित्राचें प्रोत्साहक आहे. शहाजी, दादाजी कोंडदेव, हणमंते, पिंगळे, अत्रे, पानसंबळ, जिजाबाई, इत्यादींनीं शिवाजीच्या चरित्राला स्वतंत्रस्वराज्योन्मुख वळण देण्याची शिस्त कशी बांधून दिली तें शहाजीच्या चरित्रांतील उत्तरकालीन खटपटीवरून स्पष्टपणें नजरेस येतें. तेव्हां आतां असा प्रश्न येतो कीं, शहाजी वगैरेंनीं जर शिवाजीचा स्वतंत्र स्वराज्य आक्रमिण्याचा मार्ग आखून ठेविलेला होता, तर रामदासाचा शिवाजीच्या चरित्रावर कोणता परिणाम घडला ? अथवा हाच प्रश्न दुसऱ्या तऱ्हेनें असा विचारितां येतो कीं, महाराष्ट्रराज्यसंस्थापनेंत रामदासाचें कार्य काय ? ह्या प्रश्नाचें उत्तर देतांना, दुसरा एक प्रश्न विचारांत घेतला असतां, प्रश्नाचें उत्तर शोधण्याचें काम साधें होतें. दुसरा प्रश्न असाः– रामदास झाला नसता, तर स्वराज्यसंस्थापनेच्या कार्यांत काय व्यंग राहिलें असतें ? कारण रामदास झाला असता किंवा झाला नसता, तत्रापि शहाजीनें योजिल्याप्रमाणें शिवाजीनें स्वतंत्र स्वराज्य स्थापिलेंच होतें व स्थापिलेंच असतें. रामदासाच्या शिकवणीनें शिवाजीच्या स्वराज्यसंस्थापनेच्या रूपांत असा कोणता स्पृहणीय फरक पडला कीं ज्यामुळें शिवाजीनें व शिवोत्तर मराठ्यांनीं रामदासाचें सदा ऋणी रहावें ? शहाजीनें गोब्राह्मणप्रतिपाल, वैदिक संस्कृतीचें संगोपन, संस्कृत, मुराठी, हिंदी वगैरे भाषांचें संवर्धन, देवालयादींचा जीर्णोद्धार, वगैरे हिंदू संस्कृतीचीं प्रोत्साहक कृत्यें थोडींफार, परिस्थितीला संभाळून, आरंभिलींच होतीं, तीं शिवाजीनें, रामदास नसता तरी, जास्त प्रमाणावर चालविलीं असतीं ह्यांत बिलकुल संशय नाहीं. सध्या देखील शिवाजीचा मोठेपणा गातांना ह्याच कृत्यांचा प्रामुख्यानें आपण उल्लेख करतों की नाहीं ? ह्यांहून आणीक कोणतें महत् कृत्य शिवाजीकडून रामदासानें करवून घेतलें ? असा आक्षेप प्रस्तुत प्रकरणीं घेतां येतो.

ह्या आक्षेपाला उत्तर असें आहे कीं, शहाजीला जें करतां आलें नाहीं, असें एक कृत्य करण्याची सल्ला रामदासानें शिवाजीला दिली आणि तसली सल्ला रामदासापर्यंत दुसऱ्या कोणीहि शहाजीला किंवा शिवाजीला दिली नाहीं. आजपर्यंत शहाजीच्या कारकीर्दीत काय होत असे कीं, देशांतील मराठ्यांची बहुमत संख्या यवनादींची सेवा करण्यांत पाप मानावयाच्या ऐवजीं प्रायः भूषणच मानीत असे. तो देशघातक व राष्ट्रघातक ओघ बदलून, देशांतील सर्व मराठा असेल नसेल तेवढा एका ठायीं म्हणजे स्वराज्याच्या ठायीं मेळवावा, ही उच्चतम राष्ट्रीकरणाची सल्ला रामदासानें शिवाजीस दिली. शहाजीच्या सैन्यांत मराठा, पुरभय्या, पंजाबी, हिंदू, मुसुलमान, बेरड, वगैरे सर्व जातीचे लोक व सरदार असत व सर्व जातीचे लोक ठेविल्याशिवाय शहाजीला परिस्थितीमुळें गत्यंतरहि नव्हतें. शिवाजीला रामदासानें एकजात मराठे सरदार व शिपाई ठेवण्याची सल्ला दिली. ती अश्याकरितां दिली कीं स्वराज्य आपलें आहे व तत्प्रीत्यर्थ जीव खर्ची घातला असतां महाराष्ट्रधर्म टिकावयाचा आहे, अशी बुद्धि बाळगिण्यांत प्रत्येक मराठ्याला अभिमान वाटावा. आजपर्यंत मोंगलादींच्या सैन्यांत मराठे असत, परंतु धनी मारला गेल्यास, कश्याकरितां लढावयाचें तें न समजून ते प्रायः सैरावैरा पलायन करून इतस्ततः पांगत असत. आज हा धनी तर उद्या तो, असा त्यांचा व्यवहार असे. तो व्यवहार सुटून सर्व मराठ्यांच्या ठायीं कोणता तरी प्रबल सामान्यधर्म उत्पन्न व्हावा व धनी गेला, मेला किंवा पराभूत झाला, तत्रापि सामान्यधर्माच्या बचावाकरतां मराठ्यांनीं जास्तच आवेशानें प्राण खर्ची घालावे, एतदर्थ रामदासांनीं शिवाजीस ही बहुमोल सल्ला दिली व त्या चतुरस्र मुत्सद्यानें व वीरपुरुषानें ती सर्वांशानें यद्यपि नव्हे तत्रापि बरीच अमलांत आणिली. 'मराठा तेवढा मेळवावा आणि आपुला महाराष्ट्रधर्म राखावा व वाढवावा' ह्या उपदेशाची देणगी रामदासानीं शिवाजीला व तत्कालीन मराठ्यांना दिली, म्हणजे महाराष्ट्रांत रामदासांनीं राष्ट्रीयत्व व राष्ट्रभावना म्हणून जी म्हणतात ती उत्पन्न केली. कल्पक रामदास व कर्ता शिवाजी.

ह्या महाराष्ट्रधर्माच्या ऊर्फ राष्ट्रभावनेच्या समानधर्माचा मराठ्यांत अवतार झाल्यानें, शिवाजीच्या पश्चात् संभाजी व राजाराम यांच्या कारकीर्दीत, धनी नसतांहि, मराठा सरदारांनीं औरंगझेबाला मट्टयास आणिलें. ही राष्ट्रभावना जर नसती-आणि नाहीं अशी औरंगझेबाची प्रथम कल्पना होती-तर शिवाजीच्या मृत्यूनंतर त्यानें स्थापिलेलें राज्य थोड्याच दिवसांत लयास गेलें असतें. आतां रामदासाला प्रथम कल्पक म्हटल्यानें व शिवाजीला कर्ता म्हटल्यानें असें समजावयाचें नाहीं कीं, महाराष्ट्रधर्माची म्हणजे समानराष्ट्रधर्माची जाणीव शिवाजीच्या ठायीं मूलतः अगदींच नव्हती. शिवाजीच्या ठायीं ही कल्पना अभावरूपानें म्हणजे यवनांच्या द्वेषरूपानें बाळपणापासूनच होती. इतकेंच कीं तिला भावरूप अद्याप आलें नव्हतें. तें

रामदासांनीं उच्चस्वरानें पुकारिल्यामुळें व त्याची सोपपत्तिक तत्त्व म्हणून मांडणी केल्यामुळें, भावरूपानें म्हणजे मराठ्यांची एकजूट करण्याच्या रूपानें शिवाजीच्या मनांत उत्कटत्वानें वास करितें झालें. रामदास नसते, तर शिवाजीनें हें राजकीय तत्त्व शोधून काढिलें असतें कीं नसतें, हा वाद घालण्यांत कांहीं हांशील नाहीं. कदाचित् काढिलें असतें व कदाचित् काढिलें नसतें. रामदास नसते आणि शिवाजीनें तें स्वतः शोधून काढिलें असतें तर कल्पकत्वाचा मान आम्हीं शिवाजीस दिला असता. एकंदर विवेचनाचा मथितार्थ असा कीं शहाजीच्या वेळीं राष्ट्रधर्माची कल्पना उदय पावली नव्हती आणि शिवाजीच्या वेळीं ती उदय पावली होती. रामदासांनीं ती पुकारल्याबरोबर समानशीलत्वास्तव व हितगर्भत्वास्तव शिवाजीनें तिचें तात्काल मंडन व ग्रहण केलें. तें मंडन व ग्रहण शहाजीच्या स्वतःच्या हातून त्या कालीं होण्यासारखें नव्हतें.

शहाजीच्या वेळींहि यवनद्वेष नव्हता असें नाहीं. परंतु त्या द्वेषाला भावरूप देणें म्हणजे केवळ मराठ्यांची तेवढी एकजूट करून त्यांच्या जोरावर स्वराज्य मिळविणें शहाजीला शक्य नव्हतें. तीन प्रयत्न करतां करतां चवथ्या प्रयत्नांत मुसुलमानाचें मांडलिकत्व तेवढें त्याला स्वतःला साधतां आलें. अशा स्थितींत यवनांचा द्वेष प्रकटपणें करणें शहाणपणाचेंहि नव्हतें व सोईचेंहि नव्हतें. शहाजीच्या कालीं यवनांना बाद करण्याच्या गोष्टी शहाजीच्या दरबारांत निघाल्याचें जयराम लिहितो.

राजा हो नृप शहाजी यवन करावे बाद ।
हेजिब विधिसिं बोलिला ऐसा द्विजसंवाद ॥ ९६ ॥

बाद करणें म्हणजे राज्यच्युत करणें असा मात्र अर्थ हा संवाद करणाऱ्या ब्राह्मणांच्या डोक्यांत नव्हता. कारण, पुढील श्लोकांत बाद करणें म्हणजे काय करणें तेंहि जयराम नमूद करतो.

व्यापिली हे अवनी यवनीं मुण वैदिक वाक सिणोन निजेली ।
या वरि साहेकीर्तिची मूर्तिच आपलि हे जीव हेजिब केली ।
शाहजिराजे व बादशाह असि वृत्ति करूं जगत्रयि विधिसंनिधि गेली ॥९७॥

यवनांनीं सर्व पृथ्वी म्हणजे भरतखंड व्यापिलेलें पाहून, वेदविद्या त्रासून मूर्च्छित झाली. परंतु शहाजीराजाच्या पराक्रमानें ती सावध झाली, आणि ब्रह्मदेवाकडून भरतखंडाच्या राज्यवृत्तीची वांटणी शहाजीराजे व शहाजहान पातशहा या दोघांत तिनें करून देवविली. यवनाला नर्मदेच्या उत्तरेस वांटणी दिली आणि शहाजीराजे यास नर्मदेच्या दक्षिणेस वांटणी दिली. तात्पर्य, या श्लोकांत बाद करणें म्हणजे वांटणी करून देणें असा अर्थ अभिप्रेत आहे, यवनांना उच्छिन्न करून त्यांची पातशाहत आक्रमण करणें असा अभिप्राय नाहीं. शहाजीच्या कालीं ह्याहून जास्त भाषा सार्थ झाली नसती. परंतु रामदास व शिवाजी यांच्या कालीं यवनांना उच्छिन्न करण्याची भाषा उत्कटत्वानें

महाराष्ट्रांत रामदासांनीं वापरिली आहे. यवनांच्या पातशाहीला रामदास बहुता दिवसांचें बंड म्हणतात व कुत्ते मारून परते घालावे म्हणून निक्षून सांगतात. शहाजी व शिवाजी ह्यांच्या कालांत राजकीय विचारांत केवढा हा फरक ! बुडाला औरंग्या पापी दुष्ट चांडाळ घातकी, ही भाषा शहाजीकालीं संभाव्यसुद्धां नव्हती, प्रकटपणें बोलणें तर दूरच राहिलें.

भारतव्यापी मुसलमानी सत्तेच्या दौर्बल्याचें स्वरूप

स्वतःच्या दरबारांत यवनांची किंचित् कुचेष्टा झालेली शहाजीला खपत असे. बाहेर कागदोपत्रीं शहाजी आदिलशहाला आपला अधिराज म्हणून आदबीनें संबोधी आणि घरीं दरबारांत त्याचे कवि शहाजीनें आदिलशहाचें राज्य राखिलें आहे म्हणून शहाजीची प्रौढी गात. बाहेर बोलावयाचें झालें म्हणजे शहाजहानाला शहानशहा म्हणून किताब लावावा आणि घरांत बोलतांना त्याच्याशीं वांटणी करून बसलों आहों अशी बरोबरीची भाषा वापरावी, असा दुटप्पी प्रकार शहाजीचा असे. आणि हा सर्व प्रकार आदिलशहा, शहाजहान, वगैरे लोकांच्या कानावर त्यांचे अखबरनवीस घालीत असत. परिणाम असा होई कीं, शहाजी संबंधानें आदिलशहा किंवा शहाजहान यांच्या मनांत सदा संशय वास करी. त्याच्यावर विश्वास कोणाचाच नसे. कामापुरता शहाजीला जवळ करावयाचा आणि काम संपलें म्हणजे त्याला हाकून द्यावयाचा असा प्रकार शहाजीच्या चरित्रांत कितींदा तरी घडला आहे. ह्या दुटप्पी वर्तनानें जी मानखंडणा होई ती शहाजीच्या आंगवळणी पडलेली होती. स्वतःचा कार्यभाग कसा साधेल, इतकेंच शहाजीचें पहाणें असे. त्यांत मानखंडणा होते कीं मानमंडना होते ह्याचा कीस करीत बसण्यास त्याला अवकाश नव्हता. परंतु, शिवाजी सारख्यांना ही धरसोड व तज्जन्य मानहानि बिलकूल खपत नसे.

एकदा एतत्संबंधानें वृद्ध सोनोपंत डबीर व तरुण शिवाजीराजे यांच्यामध्यें एक मोठा मनोरंजक संवाद झाला तो बृहदीश्वरशिलालेखकारानें दिलेला मनन करण्यासारखा आहे. शिवाजी म्हणतो :– "वडील प्रथम निजामशहाच्या संगतीस होते. ते आदिलशहाच्या बोधनेवरून त्याकडे गेले. परतून निजामशहांनीं बोलवितांच त्यांजकडे आले. पुनः बिनसून आदिलशहाकडे गेले. अश्या दोनतीन येरझारा झाल्या. वडील आपल्याकडून सर्वांचीं कामें निर्मळ मनानें करीत. परंतु, आज इकडे उद्यां तिकडे, अश्या करण्यांनीं सर्वांस कपटी म्हणून भासूं लागले. कार्य अडलें म्हणजे वडिलांचा ते शहा बहुमानहि करीत, परंतु मनांत किंतू धरीत. खरें पाहिलें तर, थोर मनुष्यांनीं ज्याची एकदां संगती धरिली त्यांशीं कदापि बिघडूं नये आणि कदाचित् बिघाड झालाच तर पुनः त्याजपाशीं परतून येऊं नये. ही नीति आहे. ती न पाळल्यामुळें यवनांनीं वडिलांशीं कृत्रिम वर्तन केलें. परंतु वडील शूर व निर्मळ म्हणून

संग्रहालय, ठाणे स्थापना
23324 वि:
9932 नों: दि: 9/10/

बचावले. " शिवाजीचा सिद्धान्त खरा होता यांत संशय नाहीं. परंतु शहाजीचा व्यवहार त्या सिद्धान्ताहूनहि खरा होता, हें व्यवहारज्ञ स्वतःच्या अनुभवानें सांगूं शकतील. अपवाद खरे असतात, म्हणूनच सिद्धान्तांना चिकटविलेले असतात ! स्थितीच अशी होती कीं, दुटप्पीपणाशिवाय शहाजहान, औरंगझेब, मीरजुमला, महमदशहा, फतेखान, मुस्तफाखान, इत्यादि कपटनाटक्यांच्या मध्यें शहाजीचा सरळपणानें टिकाव लागला नसता.

प्रकट स्वराज्य, प्रच्छन्न स्वराज्य, मांडलिकी स्वराज्य व स्वतंत्र स्वराज्य म्हणजे स्वतःचे व्यक्तिमात्राचें राज्य स्थापिण्याचे उत्तरोत्तर प्रयत्न करणें ही शहाजीची इतिकर्तव्यता होती. ही इतिकर्तव्यता अथपासून इतिपर्यंत विकास पावत असतां, शत्रू, मित्र व उदासीन यांच्याशीं प्रसंगाला अनुकूल दिसेल तें शत्रुत्वाचें, मित्रत्वाचें किंवा उदासीनतेचें वर्तन ठेवणें, हें शहाजीचें घरसोडीचें धोरण होतें. आणि हें धोरण अमलांत आणण्याकरितां करोल सैन्य व सामुग्री ह्यांच्या साहाय्यानें त्यानें स्वतःचा पक्ष निर्मून साधनसंपत्तीची जोड केली होती. शहाजीच्या इतिकर्तव्यतेची ही अशी मीमांसा आहे. ह्या इतिकर्तव्याचें तत्कालीन हिंदुस्थानच्या इतिहासांत कार्य काय त्याचा आतां निर्णय करूं. शहाजीच्या हयातींत हिंदुस्थानांत एकंदर पांच स्वतंत्र मुसुलमानीं राज्यें होतीं, (१) दिल्लीची मोगलाई, (२) दौलताबादची निजामशाही, (३) विजापुरची आदिलशाही, (४) गोवळकोंड्याची कुतुबशाही व (५) बेदरची क्षुद्र बेरीदशाही, ह्या पांच मुसुलमान शाह्यांनीं तुंगभद्रेच्या तीरापासून हिमालयापर्यंतचा व आसामपासून इराणपर्यंतचा सर्व टापू आक्रमिला होता. तुंगभद्रेच्या दक्षिणेस कर्नाटकांत कांहीं क्षुद्र हिंदू पाळेगार तेवढे थोडेबहुत स्वतंत्र राहिले होते. त्यांचें स्वातंत्र्य निजामशहानें हरण करावें कीं आदिलशहानें हरण करावें कीं कुतुबशहानें हरण करावें कीं दिल्लीवाल्यानें हरण करावें, एवढाच काय तो मत्सराचा प्रश्न घुटमळत राहिला होता. बाकीचें सर्व भरतखंड यवनांच्या कब्ज्यांत जाऊन, हिंदुत्वाच्या हयातीचें माप भरत आलें होतें. सहाशें वर्षें झगडतां झगडतां इस्लामाच्या हांतून आर्यसंस्कृतीचा पाडाव आणीक पांचपन्नास वर्षांत परिपूर्ण झाला असता. ह्या पांच पातशाह्या अन्योन्य मत्सरानें एकमेकांचें बल क्षीण न करत्या आणि स्नेहवृद्धीचे तह करून इस्लामी संस्कृतीचा विजय करणें हें एकच धोरण अक्षत पाळत्या, तर हिंदुसंस्कृती पृथ्वीतलावरून उच्छिन्न होऊन गतेतिहासाचा करुण विषय झाली असती.

इस्लामी धर्माचा प्रसार करण्याची प्रतिज्ञा प्रत्येक पातशहा करी; परंतु ती दुसऱ्याच्या हातून सफल न होतां आपल्या हातून व्हावी अशा अभिमानान एक दक्षिणीशहा दुसऱ्या दक्षिणीशहाच्या उरावर बसे. दक्षिणी सर्व शहा शियापंथी पडल्यामुळें उत्तरेकडील सुनी मोगल त्यांना धर्मभ्रष्ट समजत व हिंदूप्रमाणेंच त्यांचाहि

उच्छेद करण्याचा पैगाम बांधीत. अशी दुफळी नव्हे, त्रिफळी नव्हे, पंचफळी मुसुलमान पातशाह्यांमध्यें होती. तीहि झाली, तत्रापि देखील मुसुलमान पातशहा एका बाबीची खबरदारी घेते, तर हिंदूसंस्कृतीचा त्यांच्या हातून नायनाट झाला असता. पंचफळीमुळें फार झालें तर पांच शाह्यांतून कोणत्या तरी एका शाहीच्या हातांत सर्व राज्यसत्ता जाती व त्या सार्वभौम यावनी राजसत्तेच्या द्वारा आर्यसंस्कृतीचा परिपूर्ण नाश होता. फक्त एका बाबीकडे त्यांनीं त्रिलकूल दुर्लक्ष्य करतां कामा नव्हतें. ती बाब ही कीं, त्यांनीं कोणाहि हिंदुधर्मी लढवय्याला मनसबदारी किंवा सरदारी देऊन प्रबल बनूं द्यावयाचें नव्हतें. हें अनुभवसिद्ध सामान्य धोरण त्या कालीं मुसुलमान पातशहांना माहीत नव्हतें असेंहि म्हणतां येत नाहीं. शहाजहान व औरंगझेब यांच्या तर तें मुखोद्गत होतें. दक्षिणेंतील शहांनाहि तें अवगत होतें.

हिंदुत्वाचा विजयी वाली शहाजी

परंतु कोणतेंहि धार्मिक, वैय्यापारिक किंवा राजकीय धोरण कितीहि महत्त्वाचें असलें तत्रापि तें स्वसंरक्षणाच्या व खास बचावाच्या धोरणापुढें फिकें पडतें. अकब्बरानें जेव्हां निजामशाही घशाखालीं उतरविण्याचा घाट घातला व निजामशाहींतील दक्षिणी व परदेशी मुसुलमानांचे दोन्हीं पक्ष शहाच्या खांद्यावर कुरघोडी करूं लागले, तेव्हां निजामशहानें मालोजी भोंसले या लढवय्याला मनसबदारी देऊन स्वसंरक्षणार्थ विश्वासूक असा मराठ्यांचा तिसरा पक्ष निर्माण केला. प्रथम मालोजीची मनसबदारी पंचहजारी अशी बेताचीच होती. परंतु धन्याचा विश्वास बसत बसत व लढाईच्या निमित्तानें वाढत वाढत, शहाजीच्या हाताखालीं ती मनसबदारी एखाद्या शहाला शोभेल अशी तोलदार फौज बाळगणारी झाली. असल्या मनसबदारीला कह्यांत ठेवणें मोठें जीवावरचें, नाजुक व संकटाचें काम असतें. सुखविली तर ती आयतीच अलगज प्रेमानें उरावर बसत्ये आणि दुखविली तर रागावून प्राण घेत्ये.

सनातनधर्मी प्रबल मनसबदार जो शहाजी त्याला मलिकंबर व मूर्तिजाशहा ह्यांनीं ज्या दिवशीं दुखविलें त्या दिवशीं हिंदुस्थानांत सहाशें वर्षें बांधींत आणिलेल्या इस्लामच्या तटांत पहिलें भगदाड पडलें आणि सनातन संस्कृतीवरील इस्लामच्या मगरमिठींतील पहिली गांठ मोकळी झाली. शहाजी संतापून निजामशाहींतून निघून गेल्यावर मलिकंबराला मूर्तिजानें ठार केलें, मूर्तिजाला फत्तेखानानें मारिलें व फत्तेखानाला शहाजहानानें पकडिलें. बेगमेनें शहाजीचें साह्य घेतांच निजामशाहीला पुनः जीव आला आणि तिनें शहाजीला सोडतांच निजामशाहीचा कायमचा अंत झाला शहाजहानालाहि ह्या वेळीं शहाजीच्या प्राबल्याचा व करामतीचा अनुभव आला. शक १५५८ तील मोहिम पावसाळ्याच्या आंत खलास करण्याचे शहाजहानाचे सर्व अंदाज

शहाजीनें हुकविले आणि शहाजी म्हणेल त्या अटीवर मोहिम कशी तरी शहाजहानास संपवावी लागली. ह्यापुढें शहाजीच्या वाटेस शहाजहान कधीं गेला नाहीं. आदिलशाहींत गेल्यावर शहाजीनें कर्नाटक कसें सर केलें, शहाजीला अटक केल्यामुळें कर्नाटकांत व पुणें प्रांतांत कसा धुमाकूळ उडाला, सुटल्यावर औरंगझेबाचा हस्तक व कुतुबशाहीचा प्रधान जो मीरजुमला त्याला शहाजीनें कसा बेदम बडविला, बंगळूरास स्वराज्यस्थापन शहाजीनें कसें केलें आणि पुणें प्रांतांत स्वतंत्र राज्यस्थापन शिवाजीकडून कसें करविलें, वगैरे कथानक मागें सविस्तर वर्णिलें आहेच.

तात्पर्य, एक हिंदुधर्मी प्रबल मनसबदार बनूं देण्याच्या एका चुकीचा हा सर्व परिणाम झाला. त्या एका चुकीनें नुसती निजामशाहीच खाल्ली नाहीं, तर कुतुबशाही खांकेंत मारिली, आदिलशाहीचे लचके तोडिले, बेरीदशाहीचा चकनाचूर होऊं दिला आणि शेवटीं दिल्लीची मोंगलाई रसातळास पोहोंचविली. औरंगझेबानें शिवाजीस निसटून जाऊं देण्याची एक चुकी केली, तर त्याला सव्वीस वर्षें दक्षिणेंत वनवास भोगावा लागून शेवटीं हताश मरावें लागलें. शहाजीला मनसबदारी देण्याच्या एका चुकीनें त्याहूनहि घोर धक्का इस्लामला बसला. इस्लामी राज्यसत्ता हिंदुस्थानांतून कायमची बाद होण्याचा मार्ग खुला झाला. हिंदुस्थानाच्या तत्कालीन राजकारणांत शहाजीच्या इतिकर्तव्यतेचें कार्य हें असल्या स्वरूपाचें म्हणजे यवनांची सत्ता खिळखिळी करून मोडण्याच्या पंथास लावण्याचें होतें. थोडक्यांत सांगावयाचें म्हटलें तर शहाजी ह्यावेळीं हिंदुत्वाचा विजयी वाली बनला होता.

नव पाश्चात्त्य संस्कृतीचा उदय व इस्लामी सत्तेचा ऱ्हास

येथें असा आचंबा उद्भवण्यासारखा आहे कीं, इराणपासून आसामपर्यंत व पूर्वसमुद्रापासून पश्चिमसमुद्रापर्यंत ज्याची अमर्याद सत्ता त्या दिल्लीच्या मोगल पातशहाला किंवा दक्षिणेंतील शहांना शहाजी व शिवाजी यांना, अथवा व्यक्तिनामें टाकून बोललें तर, मराठ्यांना चिरडून टाकितां कसें आलें नाहीं ? ह्या प्रश्नाला उत्तर द्यावयाचें म्हणजे तत्कालीन ऊर्फ तद्युगीन सार्वजनिक मानवी हालचालींकडे व संस्कृतिप्रवाहाकडे नजर फेंकिली पाहिजे. पहिली व सर्वांत मुख्य अशी एकच एक बाब एतत्संबंधक म्हटली म्हणजे ही कीं, ह्या कालीं इस्लामी विकृति म्हणून जिला म्हणतां येईल तिचें पृथ्वीतलावरील कार्य संपून तिची शक १४०० पासून शक १५०० पर्यंतचीं शंभर वर्षें एका प्रचंड संस्कृतिप्रवाहाच्या रेट्यापुढें सारखी पिछेहाट होत चालली होती. हा प्रचंड संस्कृतिप्रवाह म्हणजे ज्याला आधुनिक भौतिक शास्त्रीय संस्कृति म्हणतात तो. ह्या शास्त्रीय संस्कृतिप्रवाहानें एकट्या इस्लामी विकृतीलाच तेवढें क्षीण केलें असें नाहीं. ह्या प्रवाहानें खिस्ती विकृतीलाहि दुर्बल करून सोडिलें. ही संस्कृति कालान्तरानें हिंदूविकृतीला व बौद्धविकृतीलाहि मुरगाळून टाकणार होती.

अश्या ह्या अजिंक्य व त्रिभुवनविजयी व कालत्रयव्यापक सनातन भौतिक शास्त्रीय संस्कृतीच्या धगधगीत तेजापुढें जुनाट मध्ययुगीन व रानटी इस्लामी विकृति शक १४०० पासून क्षय पावत पावत शक १५५० च्या सुमारास अतिच क्षीण झाली. तिला पहिला धक्का स्पेनमध्यें बसला, दुसरा धक्का पोलंडमध्यें मिळाला आणि तिसरी गचांडी आरबी समुद्रांत, व बंगाली समुद्रांत व पासिफिक समुद्रांत दिली गेली. मुस्लीम विकृतीला लत्ताप्रहार करणारीं हीं तीन राष्ट्रें म्हणजे स्पेन, पोलंड व पोर्तुगाल हीं होत. पहिल्या धक्क्यानें इस्लामाची भूमध्यसमुद्रांतून उचलबांगडी झाली. दुसऱ्या धक्क्यानें इस्लामाला पश्चिम यूरप बंद झालें. आणि तिसऱ्या धक्क्यानें आफ्रिकेच्या पूर्वेकडील सर्व समुद्रांना इस्लाम कायमचें मुकलें. इस्लामला हे प्राणघेण्ये धक्के देणारीं तिन्हीं राष्ट्रें खिस्ती विकृतीनें पछाडिलेलीं होतीं. परंतु तीं खिस्ती होतीं म्हणून त्यांनीं इस्लामाचा पराभव केला असें मात्र समजावयाचें नाहीं. त्यांच्या जयाचें मुख्य कारण त्यांच्यांत नव्या जोमानें उत्पन्न झालेली भौतिक शास्त्रीय संस्कृति होय.

ही भौतिक शास्त्रीय संस्कृति त्यांच्यांत उत्पन्न होण्याच्या अगोदर तीन चारशें वर्षें यूरोपांतील सर्व खिस्ती राष्ट्रांनीं पालस्टैन घेण्याकरितां इस्लामाशीं झुंजण्यांत जंगजंग पछाडले, पण इस्लामाचें त्यांच्याच्यानें अणुमात्रहि वांकडें झालें नाहीं. परंतु, भौतिक शास्त्रीय संस्कृतीचा पाठिंबा मिळतांच आगीपुढें लोणी जसें वितळावें तसा इस्लाम शास्त्रसंस्कृत यूरोपाच्या पुढें केवळ विरघळत गेला, आणि खिस्ती राष्ट्रांच्या अन्योन्य मत्सराची थोडी फार थंडाई मिळवून आस्ते आस्ते विरघळतां विरघळतां आतां गेल्या दोन वर्षांपाठीमागें म्हणजे शक १८४० त केवळ नामशेष राहिला. हा सर्व प्रभाव भौतिक शास्त्रीय संस्कृतीचा होय. अरबी समुद्रांत इस्लामला जो धक्का बसला त्याचा परिणाम असा झाला कीं हबस, श्यामळ, अरबस्थान, इराणी आखात, काठेवाड, गुजराथ व कोंकण ह्या प्रदेशांच्या किनाऱ्यानें हबशी, श्यामळ, अरबस्थानी, इराणी, मोंगल, निजामशाही व आदिलशाही मुसुलमान व्यापाऱ्यांच्या हालचाली संपुष्टांत आल्या, आणि हबस, श्यामळ, अरबस्थान व इराण ह्या देशांतून आदिलशहा व निजामशहा यांच्या सैन्यांत व दरबारांत लढाऊ व कारकुनी पेशाच्या मुसुलमान लोकांचा भरणा उत्तरोत्तर कमी होत गेला. त्यामुळें देशांतील मराठा शिपायांचा व सरदारांचा व ब्राह्मणांचा पाठिंबा मिळविणें या दोन्ही शहांना अपरिहार्य झालें. यूरोपीयन भौतिक शास्त्रीय संस्कृतीच्या रेट्याचा दक्षिणी शहांवर हा असा परिणाम झाला.

दिल्लीच्या मोंगलांवरहि अशीच छाप शास्त्रशस्त्रसंपन्न पोर्तुगीज लोकांची बसली. प्राजक्ताचें झाड हलविलें असतां फुलें जशीं टपटपा गळून पडतात, तशीं गुजराथ, कोंकण, व बंगाल या देशांच्या किनाऱ्यावरील बंदरें पोर्तुगीज लोकांच्या शस्त्रांच्या व अस्त्रांच्या दणक्यानें पटापट युरोपियनांच्या पदरांत पडलीं. त्यामुळें दिल्लीच्या मोंगलांचीहि गुर्मी समुद्रावर जिरविणारे शेरास सवाईशेर कोणीतरी पृथ्वीच्या

पाठीवर फिरंगी म्हणून लोक आहेत अशी हिंदुस्थानभर आख्या झाली व तितक्या पुरता मोंगलांच्या इज्जतीस धक्का बसला. मोंगल एक काफर तर फिरंगी सात काफर, असें हिंदुस्थानांत लोकमत बनलें. फिरंग्यांना जिंकिणें म्हणजे मोठें शतकृत्य करणें, असें हिंदुस्थानांतील लोकांस वाटूं लागलें.

शहाजीनें फिरंग हातांत धरली म्हणजे फिरंग्यांचा रंग जातो, अशी जी जयरामानें शहाजीची स्तुति केली आहे त्यांतील मतलब असा आहे कीं, अजिंक्य फिरंग्यांनाहि ज्यानें जिंकिलें तो शहाजी मोंगलाची विशेष तमा बाळगीत नव्हता हें जाहीर व्हावें. ह्या सर्व तपशिलाचें तात्पर्य एवढेंच कीं, हिंदुस्थानांतील व विशेषतः ज्यांना पोर्तुगीजांचा निकट शेजार होता त्या महाराष्ट्रांतील लोकांच्या मनांतून आदिलशहा, निजामशहा व मोंगल या तिघांच्या संबंधानें आदर व इज्जत उतरत्या कळेस लागली. हा युरोपियन संसर्गाचा परिणाम झाला.

इज्जत उतरण्याला दुसरींहि आणीक कारणें वावरत होतीं. मोंगल पातशहा वंशानें तुराणी, विद्येनें इराणी व धर्मानें अरबी होते. मूळचे मध्य आशियांतील मोंगल लोक अर्धवट रानटी असून, शेजारास असलेले त्यांच्या देवधर्माहून श्रेष्ठ असे देवधर्म ते स्वीकारीत असत. पूर्वी कित्येक शक ऊर्फ मोंगल लोकांनीं वासुदेवभक्ति घेतली होती, कित्येकांनीं बौद्धमत अंगीकारिलें होतें, आणि सध्यां ते महम्मदाच्या देवधर्माचे अनुयायी बनले होते. हिंदुस्थानांत आल्यावर खिस्ती, झरदुष्ट्री व वेदान्ती कल्पनांचा पगडा त्यांच्या मनावर बसून, निर्भेळ इस्लाम मतापासून ते च्युत होत चालले होते. अकब्बर, जहांगीर, शहाजहान, ह्या मोंगल पातशहांनीं अनेक हिंदू चाली उचललेल्या होत्या, हें सर्वप्रसिद्ध आहे. इब्राईम आदिलशहाला ललितकलांचा इतका कांहीं शोक असे कीं त्यापुढें तो मुस्लीमधर्म तुच्छ मानी, अशी काजी मुल्ला वगैरे धर्माचार्यांना भीति पडली. मोंगल लोकांचे देवधर्मविकार असे शिथिल होत असतां, त्यांच्या इराणी विद्यासंस्कारांतहि बदल होत गेले. फारसी भाषा मोंगल भाषेहून श्रेष्ठ पडल्यामुळें व मध्यआशियांतील सर्व दरबारी व्यवहार फारसींत चालत असल्यामुळें, ह्या अर्धरानटी मोंगल लोकांनीं इराणची परकीय अशी फारसी भाषा स्वीकारिली व फारसींत लिहिणारे इराणी कारकून व मुत्सद्दी पदरीं बाळगिले. ह्या इराण्यांहून हिंदू कारकून व मुत्सद्दी वरचढ असत, सबब सर्व दरबारी व्यवहार आस्ते आस्ते काय-स्थांच्या हातीं गेला. देवधर्म व फारसी विद्या यांची अशी पायमल्ली होत असतां मोंगलांची वंशशुद्धिहि भेसळ होत गेली. रजपूत वगैरे हिंदूजातीशीं शरीरसंबंध होऊन, शुद्ध मोंगलत्व उत्तरोत्तर बिघडत गेलें व त्याबरोबर मोंगल स्वभावहि अपकृष्ट होत गेला. गनीमी काव्यानें लढण्यांत मूळ मोंगलांची व तुराण्यांची मोठी ख्याती. पण हिंदुस्थानांत ती कीर्ति त्यांनीं गमाविली. मराठ्यांच्या गनीमी पेंचांपुढें व हुलकावण्यापुढें, हिंदुस्थानांत सुखावलेले मोंगल कच खाऊं लागले. असा चोहोंकडून यूरोपांत,

समुद्रांत, हिंदुस्थानांत, धर्मांत, विद्येंत व वंशांत ऱ्हास होत गेल्यामुळें, शहाजी व शिवाजी ह्या मराठ्यांना चिरडून टाकण्याचें सामर्थ्य दक्षिणेंतील किंवा उत्तरेंतील मुसुलमानांत राहिलें नाहीं. शहाजीनें मुसुलमानांचीं हीं व्यंगें ओळखून, तदनुसार आपली कारवाई चालविली व तींत त्याला यावें तसें यश आलें. मुसुलमान पातशाह्या दिसण्यांत खूप ढब्बू दिसत, परंतु आंतून रोगांनीं पोकरल्या गेल्या होत्या, हें शहाजीस ओळखतां आलें, ह्यांतच शहाजीचें मोठेंपण दिसून येतें. दिल्लीन्द्र म्हणजे केवळ अजिंक्य, ही जी तत्कालीन सामान्य समजूत, तींत तथ्यांश कितपत आहे, हें शहाजीनें व शिवाजीनें व त्यांच्या ब्राह्मण मुत्सद्यांनीं उत्तमोत्तम जोखिलें होतें.

शहाजी शक्कर्ता कीं शिवाजी

शहाजीच्या चरित्रांतील मुख्य धोरण काय होतें, तो आपली इतिकर्तव्यता काय मानीत होता, धोरण अमलांत आणण्यास त्यानें कोणतीं साधनें निर्माण केलीं व त्याच्या कालीं, महाराष्ट्राची, भारतवर्षाची, यूरोपची, मुसुलमान समाजाची व त्याची स्वतःची मनोरचना व विकृतिसंस्कृति कोणत्या स्वरूपाची होती इत्यादि महत्त्वाच्या बाबींचा खल झाल्यावर, आतां चटणी कोशिंबिरोदाखल एका लहानश्या बाबीचें मनोरंजनार्थ किंचित् पेषण करूं. पंधरा वीस हजार फौजेचा मालक असतांना ज्यानें निजामशाही पुनरुज्जीवित केली, ज्याला गप्प बसविण्याचे शहाजहानाचे सर्व प्रयत्न फोल ठरले, साठ सत्तर हजार फौज चालवून ज्यानें मीरजुमल्यासारखा रूमशामपर्यंत गाजणारा जवाहिऱ्या सरदार सह्याप्रमाणें गुत्तींत पकडला, ज्याच्या दराऱ्याखातर औरंगझेबाचे आदिलशाही खालसा करण्याचे विचार लांबणीवर पडले, ज्याचें गणगोत व शरीरसंबंध जाधवराव, निंबाळकर, मोहिते, इत्यादि मोठमोठ्या मराठा घराण्याशीं पिढ्यान्‌पिढ्यां होत आलेले, त्या शहाजी महाराजाच्या दिगंतकीर्ति लेकाला आमचे बंगाली व्यवसायबंधू जदुनाथ सरकार obscure, of no high family influence व of very small means म्हणून लिहिण्याच्या झोकांत सहज शिफारसपत्र देतात आणि चार ओळी लिहून संपल्या नाहींत तोंच ह्या क्षुद्र व तुटपुंजा माणसानें गडा पाठीमागून गड हबकण्याचा सपाटा लाविला म्हणून तक्रार करतात ! दरिद्री व तुटपुंजा इसम फार तर पैशा अधेल्याची चोरी करील; पण किल्ल्या पाठी किल्ला खिशांत कसा घालील, तें सांगण्यास खरोखर बंगाली जादूगारच हवा होता ! कदाचित् दरिद्री व तुटपुंज्या शिवाजीनें हें किल्ल्यावर किल्ले पटकाविण्याचें अजब कृत्य मंत्रसामर्थ्याच्या जोरावर केलें असावें, असा जदुनाथांचा गर्भित आशय असल्यास, शिवाजीच्या जादूगारीसंबंधाचा हा नवीन शोध लाविल्याबद्दल प्रोफेसर सरकार यांचें आम्ही आनंदानें व खुल्या दिल्यानें अभिनंदन करण्यांत सौख्य

मानितों आणि मुसुलमान तवारीखकारांचे एकनिष्ठ फोनो बनण्यांत प्रावीण्य दाखविल्याबद्दल त्यांचें कौतुक करण्यांत दंग होतों.

प्रोफेसर सरकार यांनीं शिवाजीवर हा जो जादूगारीचा व मंत्रसामर्थ्याचा गर्भित आरोप नकळत आणिलेला आम्हांस दिसला, तसला आरोप चुकूनहि शहाजीवर आजपर्यंत कोणी केलेला नाहीं व पुढें करणार नाहीं. शहाजी आपली कुलदेवता अंबाबाई व कुलदेव शिखरशिंगणापूरचा महादेव यांचें स्मरण संकटसमयीं करीत असे, परंतु शिवाजीप्रमाणें अंबाबाई किंवा शंभुमहादेव त्याच्या अंगांत येऊन त्याच्या तोंडून भविष्यवाणी कधीं वदवीत नसे. बापलेकांत महदंतर जें होतें तें हेंच होतें. आपल्याला अंबाबाई व शंभुमहादेव प्रसन्न आहे व त्यांच्या वरदहस्तानें स्वधर्म रक्षिण्यासाठीं स्वराज्यस्थापना आपणांस अवश्य कर्तव्य आहे, ही शिवाजीची भाषा शहाजीच्या तोंडून कधीं निघाली नाहीं. हें मंत्रसामर्थ्य शिवाजीसारख्या राष्ट्ररचना करणाऱ्या जादूगाराच्या ठाईंच संभाव्य होतें. महाराष्ट्रांतील देवभोळ्या लोकांना अत्यंत प्रिय जीं शंकरपार्वती दैवतें तींच मुळीं शिवाजीच्या आंगांत संचार करून दुष्टांचा संव्हार व साधूंचें रक्षण करूं लागल्यावर, सामान्य जन शिवाचा अवतार जो शिवाजी त्याचें शुभचिंतन व समनुयान करणें आपलें कर्तव्य समजूं लागल्यास आश्चर्य नाहीं. मुसुलमानांवर पातशाहत करूं पहाणाऱ्या नापोलियोनें आपण इस्लामचे कट्टे अनुयायी आहों ही भाषा सुरू केली आणि तसा प्रसंगच येता तर त्यानें एकादें नवीन कुराणहि रचिलें किंवा रचविलें असतें. तोच प्रकार शिवाजीचा होता. हे अतिमानुष लोक सामान्य देवधर्माच्या वरचे होत. अंबाबाईचशी काय, कोणतेंहि दैवत शिवाजीच्या तोंडून भविष्य बोलण्यांत अभिमान मानतें. ही देवांचेंहि आधिपत्य करण्याची शिवाजीची किंवा नापोलियोची पात्रता शहाजीसारख्या व्यावहारिकांना शक्य नव्हती. काळ, वेळ, प्रसंग पाहून चार लोकांत गोड दिसून आपलें कार्य बाताबेतानें परंतु निखालस सिद्धीस जेणें करून जाईल तो सर्वमान्य रस्ता चोखळणाऱ्या उत्तम पुरुषांपैकीं शहाजी हा बऱ्याच वरच्या कोटींतील पुरुष होता.

येथपर्यंत शहाजीच्या चरित्राचा जा त्रोटक तपशील दिला आणि त्याच्या धोरणाचें व इतिकर्तव्यतेचें जें अल्प विवेचन केलें त्यांत स्पष्टपणें आपल्या नजरेस आलें कीं स्वराज्य,– मग तें स्वतंत्र असो, प्रच्छन्न असो, किंवा मांडलिकी असो,– स्थापन करण्यांत शहाजीचीं तारुण्यापासून वृद्धापकालापर्यंतचीं पंचेचाळीस वर्षें गेलीं, आणि शेवटीं मांडलिकी स्वराज्य स्थापण्यांत त्याला यश आलें. हें मांडलिकत्व यद्यपि नांवाचेंच होतें, तत्रापि तें मांडलिकत्व होतें यांत वाद नव्हता. आतां शहाजी बड्या सैन्याचा धनी पडल्याकारणानें वरिष्ठ धनी जो आदिलशहा तोच उलटा त्याला वचकून असे हें खरें. त्यामुळें शहाजीची आपल्या राज्यावरील सत्ता पूर्णपणें अनियंत्रित होती, असें म्हणणें वस्तुस्थितीपासून फारसें दूर नव्हतें. शहाजीवर काय थोडासा

वचक बसावयाचा तो त्याच्या मुत्सद्यांचा व वरिष्ठ मराठा सरदारांचा. ह्याखेरीज परदेशी कर्नाटकी प्रजेंतून कोणाचाहि दाब त्याच्यावर असणें शक्य नव्हतें. मुत्सद्दी व सरदार ह्यांचें काम राजा बोलावील तेव्हां सल्ला मसलत सांगण्याचें. अमुक केलेंच पाहिजे आणि तमुक केलें नच पाहिजे, असें सांगण्याचा हक्क ह्या सरदारांना किंवा मुत्सद्यांना मुळींच नव्हता. तात्पर्य, शहाजीचें कर्नाटकांतील राज्य पूर्णपणें अनियंत्रित होतें. तत्रापि जमीन महसुलाच्या व न्यायमनसुबीच्या पुणें प्रांतांतील जुनाट पद्धति शहाजीनें कर्नाटकांत इतक्या नामी बसवून दिल्या कीं सर्व प्रजाजन त्याचा दुवा गाऊं लागले. परंतु सर्वांत ज्या कृत्यानें शहाजी कर्नाटकांत अत्यंत प्रिय झाला तें हें कीं तो राज्य करूं लागल्यापासून मुसुलमानांच्या हांतून देवालयें छिन्नभिन्न होण्याची, बायकांवर जुलूम जबरदस्ती गुदरण्याची, शेटसावकारांपासून पैसा उकळला जाण्याची व शेतकऱ्यांचें सर्वस्व नागविण्याची पीडा कर्नाटकांतून कायमची बाद झाली. आदिलशहा, कुतुबशहा किंवा मोंगल यांचें मुखावलोकनहि घेण्याची कर्नाटकांतील हिंदूंना व इतर जातींना इच्छा राहिली नाहीं. देशाला असा सुरक्षितपणा आल्या कारणानें, शहाजीच्या कर्नाटकांतील राज्यासंबंधानें भरतखंडांतील सुज्ञ व कळकळीच्या विचारी हिंदूंना सानंद अभिमान वाटूं लागला.

वैदिक, पंडित, शास्त्री, मल्ल, गायक, कवि, साधु, संत, शैव, वैष्णव, रामानुज असे गुणीजन व भिन्नपंथीय लोक शहाजीच्या दर्शनास येऊं लागले. भाट, चारण इत्यादि बंदीजन देशोदेशीं शहाजीचीं कवनें व पवाडे गाऊन, एक नवीन हिंदूराज्य दक्षिणेंत नुकतेंच स्थापन झालें आहे व तें स्थापन करणारा महाराज शहाजीराजा भोसला या नांवाचा वीरपुरुष दक्षिणेंत अवतरला आहे, अशी आख्या चोहोंकडे पसरवीत. जयराम कवीनें तर युधिष्ठिर, विक्रम व शालिवाहन हे शककर्ते शहाजीशीं तुलण्याला योग्य नाहींत असा आपला अभिप्राय दिला आहे. शक १२०० पासून शक १५०० पर्यंतच्या तीनशें वर्षांत शहाजी एवढा थोर हिंदू राज्यकर्ता दुसरा कोणी झाला नाहीं, ही बाब लक्षांत घेतां, जयराम कवीची ही उक्ति सार्थ नव्हती असें कोण म्हणेल ? जयराम कवीच्या लिहिण्यांतील एका शब्दाच्या चमत्कारिक उपयोगा संबंधानें किंचित् टीका करणें येथें योग्य दिसतें. शक हा तो टीकेय शब्द होय. युधिष्ठिर, विक्रम व शालिवाहन यांना जयराम शक म्हणतो.

युधिष्ठिर विक्रम शालिवाहन शक ।
त्याहूनि महाराजा कीर्तिनें अधिक ॥

ह्या ओव्यर्धांत, तसेंच

अवतार तूं शाह तुझा महिमा शक हो असके न सकेत करूं ।

ह्या चरणांत जयराम, युधिष्ठिर, विक्रम व शालिवाहन यांना शक म्हणतो. येथें शक ह्या शब्दाचा अर्थ काय ? शक म्हणजे अहिंदू जे हूणादि शक लोक ते जयरामाला विव-

क्षित नव्हते हें सांगावयाला नकोच. मग हे तीन शककर्ते शक कसे ? असें दिसतें कीं शक् ऐश्वर्ये या धातूला अ प्रत्यय लागून शक हा शब्द बनलेला आहे. शक्पासून जसा शक्र शब्द कर्तृवाचक निघतो तसाच शक् पासून शक शब्द जयरामानें कर्तृवाचक बनविला.

शक्र ह्याचा विशिष्ट अर्थ यद्यपि इंद्र असा आहे, तत्रापि सामान्य अर्थ ईश्वर, राजा, समर्थ, अंमल गाजविणारा असा आहे. तोच अर्थ शक ह्या शब्दाचा आहे. शक म्हणजे समर्थ, ऐश्वर्यवान् व कालप्रवर्तक राजा. ह्या अर्थानें युधिष्ठिर, विक्रम व शालिवाहन यांना जयराम शक हें विशेषण लाविती तें ठीक दिसतें. जयरामाचा हा जर अभिप्राय सर्वत्र संमत झाला, तर पुराणेतिहासांतील एक गूढ कायमचें उकललें गेलें असा अर्थ होईल. कालप्रवर्तक राजा ह्या अर्थाचा शक शब्द आणि अहिंदू अश्या एका म्लेच्छजातीचा वाचक शक शब्द उच्चारांत सारखे असल्यामुळें शालिवाहन शक ह्या सामासिक शब्दाचा अर्थ करतांना अनेक संशोधक बुचकळ्यांत पडत आलेले आहेत. शक नृपकाल, शककाल, शके, शाके, इत्यादि शब्दांत म्लेच्छ जे शकलोक त्यांच्या राजांचा कांहीं तरी संबंध असावा, असा साहजिक तर्क करून, कितीतरी पुराणेतिहाससंशोधकांनीं शककालाचा प्रारंभ म्लेच्छ जे शकलोक त्यांच्या एखाद्या राज्याच्या राज्यारंभाशीं जोडण्याचा खटाटोप केला आहे. परंतु त्या सर्व खटाटोपांत एक अशी गोम राही कीं हिंदू लोक आपल्या धर्मकृत्यांत अहिंदू अतएव धर्मबाह्य कालगणनेचा उपयोग कालत्रयींहि करणार नाहींत. तोच जयरामकवीचा शकशब्दाचा अर्थ घेतला, म्हणजे सर्वच अडचणी दूर होतात. कालप्रवर्तक म्हणून शालिवाहनाला शक म्हणत. शक् धातूला अ प्रत्यय लागून क्रियार्थक शक शब्द बनतो. क्रियार्थक शक शब्दाचा अर्थ सत्ता, अधिकार, अंमल; आणि या अर्थानें शक हा शब्द मराठींत अद्याप सरास योजिला जातो. शिवाय, युधिष्ठिरशक, विक्रमशक, हे किंवा इत्यादि प्रयोग शकशब्दाचा सत्ता, अंमल हा अर्थ घेतला म्हणजे अदुष्ट ठरतात व शकशब्द युधिष्ठिर, विक्रम, शिव, शिलाहार, इत्यादि नामांपुढें लागला असतां त्यांत कोणतेंहि वैपरीत्य भासत नाहीं.

शहाजी संबंधानें शक या शब्दाची योजना जयरामकवीनें जी केली आहे ती वरून एक अनुमान असें करतां येतें कीं, देशांत कांहीं तरी नवीन मनू सुरू होत आहे, यवनांची सत्ता ऱ्हास पावत असून तिच्या जागीं हिंदूंची सत्ता प्रचलित होत आहे व ह्या सत्तेचें रूप विक्रम किंवा शालिवाहन या शककर्त्यांच्या सत्तेसारखें भासत आहे, अश्या कल्पना त्या कालीं कित्येक लोकांच्या मनांत येऊं लागल्या होत्या. ही शककर्ती सत्ता शहाजीच्या अंमलाच्या रूपानें प्रगट होणार कीं काय याचा अंदाज साहजिकपणेंच त्यावेळीं कोणालाच करतां येण्यासारखा नव्हता. शहाजी बनतां बनतां शककर्ता बनेल, अशीहि अटकळ कित्येकांनीं बांधिली असावी. परंतु, त्या अटकळींत फारसा जीव नव्हता, हें तीनशें वर्षांनंतर आतां आपण सांगूं शकतों,

कारण, शहाजीच्या इतिकर्तव्यतेचें साफल्य आपल्या डोळ्यासमोर अथपासून इतिपर्यंत समग्र मांडलें गेलें आहे, त्यावरून आपण निश्चयानें सांगूं शकतों कीं, शहाजीची सत्ता शककर्त्यांच्या सत्तेपैकीं नव्हती. ती मांडलिकी सत्ता होती म्हणून शककर्ती नव्हती, असा मात्र अर्थ नव्हे, शिरजोर मांडलिकी सत्ता वरच्या दुर्बल अधिराजाला पदच्युत करून स्वतः अधिसत्ता बनूं शकते. परंतु त्या शिरजोर मांडलिकी सत्तेला राष्ट्र म्हणून ज्याला म्हणतात त्या शक्तीचें अधिष्ठान पूर्वसिद्ध असावें लागतें. तें अधिष्ठान शहाजीच्या मांडलिकी सत्तेला असावें तसें नव्हतें. शहाजीची सत्ता वैयक्तिक होती. तो असे तोंपर्यंत त्या सत्तेचा शिरजोरपणा गोचर होणार, तो गेला म्हणजे तिचा शिरजोरपणाहि जाणार. अश्या वैयक्तिक सत्तेच्या पायावर कालप्रवर्तकत्वाची इमारत उठूं शकत नाहीं.

शककर्तृत्वाच्या इमारतीला राष्ट्रत्वाचा भक्कम पायाच लागतो. शहाजीच्या कालीं महाराष्ट्र देशांतील मराठा समाज राष्ट्र या पदवीला पोहोंचला नव्हता, फक्त लोक ही पदवी त्यानें आक्रमण केली होती. आपल्या देशाचा सर्व कारभार विशेषतः राजकीय कारभार आपण स्वतः करणार, ही भावना ज्या समाजांतील बहुतम व्यक्तींच्या ठायीं प्रादुर्भूत झाली व तत्प्रीत्यर्थ ज्या समाजांतील लोक प्राणहि खर्चिण्यास सिद्ध झाले तो समाज राष्ट्र या पदवीला पोहोंचला म्हणजे राष्ट्र झाला. ही भावना समाजांत जोंपर्यंत उद्भूत झाली नाहीं तोंपर्यंत समाज लोक ह्या पदवींतच असूं शकतो. त्या लोकांत एक देश, एक भाषा, एक आचारविचार, एक वंश, एक धर्म व एक कायदा इतकीं सारीं सामान्य बंधनें यद्यपि विद्यमान असलीं आणि राजकीय कारभार स्वतः करण्याची म्हणजे राज्य करण्याची ऊर्फ स्वराज्य करण्याची उत्कट इच्छा नसली, तर त्या लोकांना राष्ट्र म्हणतां येत नाहीं. शहाजीकालींन महाराष्ट्रांतील मराठ्या लोकांत ही राजकीय भावना फारच थोड्या इसमांच्या ठायीं उद्भवली होती. असेंहि म्हटलें असतां अतिशयोक्त होणार नाहीं कीं राज्य करण्याची प्रबल इच्छा व तत्प्रीत्यर्थ प्राणहि वेंचण्याची तयारी फक्त एकट्या शहाजीच्या व त्याच्या कांहीं ब्राह्मण मुत्सद्यांच्या ठायींच तेवढी त्याकालीं प्रज्वलित झाली होती. आणि ती तशी जाज्वल्य प्रज्वलित झाली होती म्हणून तर चार यवनी पातशहांशीं चाळीस वर्षें झगडत झगडत शेवटीं त्यानें लंगडेंपांगळें कां होईना पण स्वराज्य पैदा करण्याचें वीर कृत्य स्वतः व्यक्तिमात्रापुरतें मूर्त करून दाखविलें. ह्या वीरवृत्तीचें मराठा समाजांत अनुकरण होऊन, शिवाजीच्या कालीं त्या समाजांतील बहुतम लोकांनीं स्वराज्य करण्याच्या प्रखर उत्कंठेनें प्रेरित होऊन राष्ट्र ही उच्च पदवी प्राण खर्चून पैदा केली. त्या अद्भुत कथानकाचा प्रांत शककर्त्या श्रीशिवाजी महाराजांच्या कारकीर्दीतील पडल्यामुळें, तत्संबंधक विवेचनास प्रस्तुत स्थलीं जागा देणें न्याय्य होणार नाहीं.

स्वराज्याचा पाया शहाजीनेंच कां व कसा घातला ?

आतां शेवटीं दोन महत्त्वाच्या प्रश्नांचा उडत उडत उल्लेख करून, हा प्रास्ताविक लेख आटोपता घेऊं. पहिला प्रश्न तत्कालीन संस्थानिकांचा. रामनगर, बागलाण, जव्हार, फलटण, जत, मुधोळ, सावंतवाडी, सोंधें, प्रभानवल्ली, शृंगारपुर, जावळी, इत्यादि स्थलींचे लहानमोठे हिंदू व मराठा संस्थानिक महाराष्ट्रांत शहाजीकालीं विद्यमान असतां, मुसुलमानी सत्ता उलथून पाडण्याचा किंवा खिळखिळी करण्याचा उद्योग त्यांच्यापैकीं कोणीहि कां केला नाहीं ? शंहाजीसारख्या नवख्या मनसबदारावर ही प्रचंड कामगिरी कशी येऊन पडली ? खरें पाहिलें तर, सैन्य, पैसा, प्रजा, मुत्सद्दी, विचारवंत, लढवय्ये व पुढारी पैदा करण्याची किंवा होण्याची सोय शहाजी-सारख्या उपटसुंभ मनसबदारांपेक्षां ह्या पुरातन पिढीजाद संस्थानिकांपाशीं जास्त असण्याची शक्यता होती. असें असून, देशाचे हे स्वभावसिद्ध नायक निर्माल्यवत् निस्तेज व सुस्थ कां राहिले ? जव्हार हें संस्थान सर्वस्वी रानटी कोळी लोकांनीं वसलेलें असल्यामुळें, त्यांच्या ठायीं मराठ्यांची उच्चतर महत्त्वाकांक्षी राजकीय मनोरचना त्या कालीं प्रगट होणें शक्य किंवा संभाव्य नव्हतें. सबब, त्या रानटी संस्थानाला प्रस्तुत उल्लेखांतून वगळणें रास्त आहे. बाकी राहिलेले सर्व संस्थानिक शहाजीप्रमाणेंच उच्च मराठे होते. ते सुस्थ व स्वस्थ काय म्हणून राहिले ? फलटण, जत, मुधोळ, सावंतवाडी व जावली, एथील संस्थानिक आदिलशाही, निजामशाही किंवा मोंगलाई मनसबदार बनून त्या मनसबदारींतच समाधान मानून शहाजीशीं कधीं विरोधानें व कधीं उदासीनतेनें वागत असत. सोंधें, प्रभानवल्ली व शृंगारपुर ह्या डोंगराळ मुलखांतील मराठा संस्थानिकांना मुसुलमानांचा स्पर्श फारच स्वल्प होत असल्यामुळें, ते आपापल्या कुहरांत स्वस्थ झोपा घेत पडलेले होते व बाहेरच्या जगांत होत असलेल्या उलाढालींची वार्ता त्यांच्या गांवींहि नव्हती. निजाम-शाही व मोंगलाई यांच्या सरहद्दीवर असलेलीं रामनगर व बागलाण हीं क्षत्रिय संस्थानें, खरें पाहिलें तर, त्यांच्या भोंवतीं चाललेल्या गडबडीनें खडबडून जागीं व्हावयास पाहिजे होतीं. परंतु, तींहि गलितावस्थेंत रममाण होऊन निश्चिंत पडलीं होतीं.

ह्या सार्वत्रिक निश्चेष्टपणाचें कारण काय ? महाराष्ट्रांतील यच्चयावत् सर्व मऱ्हा-ट्यांच्या व ब्राह्मणांच्या राजकीय निश्चेष्टपणाचें जें सार्वत्रिक कारण मागें सांगितलें तेंच ह्या संस्थानिकांच्या निश्चेष्टतेचें कारण होय. राष्ट्र होण्याची म्हणजे सर्व महाराष्ट्राचा राजकीय कारभार स्वतः पाहण्याची उत्कट व जिवंत भावना ह्या संस्थानिकांच्या ठायीं उद्भूत झाली नव्हती. त्यामुळें होते त्या नीच स्थितींत समाधान मानून व वरिष्ठ मुसुलमानी अधिराजे करतील तो अपमान व सत्तासंकोच निमूटपणें सहन करून

हे संस्थानिक कालक्रमणा करीत असत. ह्यांच्या निश्चेष्टतेचें हें एक कारण झालें. ह्या कारणाला राष्ट्रभावनाभाव म्हटलें असतां चालेल. निश्चेष्टतेचें दुसरें कारण, आहे तें गमाविण्याची भीति. मुसुलमानी अधिसत्तेविरुद्ध पैगाम बांधून हातीं असलेलें क्षुद्र संस्थानवैभव हातचें घालविण्यापेक्षां तें संभाळून रहाणें ह्या अल्पात्म्यांना पसंत पडे. तिसरें कारण असें होतें कीं, मुसुलमानी अधिसत्तेपासून फार दूर अंतरावर हे संस्थानिक रहात, त्यामुळें त्या अधिसत्तेंत दुर्बलपणा कोठें व केव्हां उत्पन्न झाला किंवा होईल, याचा पत्ता ह्यांना नसे. चौथें कारण असें होतें कीं ह्यांचें सैन्य व फौजफाटा अत्यंत क्षुद्र असे. करोल सैन्य जय्यत तयार ठेविण्याची व उत्तरोत्तर वाढविण्याची करामत ह्या क्षुद्र व ऐदी संस्थानिकांनीं कधींच दाखविली नाहीं. निश्चेष्टतेचें पांचवें कारण म्हणजे कारीगार हत्यार पैदा करण्याकरितां करावयाचें, कोठून करावयाचें व कोठच्या पैश्यानें करावयाचें, ही अक्कलच मुळीं यांच्या हृदयभूमिकेंत कधीं उगवली नाहीं. साहावें कारण असें होतें कीं जपजाप्य करणारीं क्षुद्र भिक्षुकें व पोटभरू भिकार खर्डेघाश्ये ह्यांनीं ह्या संस्थानिकांच्या दरबारचें मुत्सद्दीपण पटकाविलेलें होतें. ह्या भटभिक्षुकांच्या व खर्डेघाश्यांच्या नेतृत्वाखालीं इंद्रालाहि निंद्रपद प्राप्त झालें असतें, मग अडाणी व अर्धरानटी मराठा संस्थानिकांना नीचतम पदवी प्राप्त झाल्यास नवल कसचें ?

ह्या अधम संस्थानिकांच्या अगदीं उलट प्रकार शहाजीचा होता. (१) राष्ट्र होण्याची प्रबल इच्छा, (२) राज्य व राष्ट्र कमाविण्यांत सर्वस्वाची आहुती देण्याची पूर्ण तयारी, (३) मुसुलमानी अधिसत्तेच्या केंद्रस्थानीं वसती पडल्यामुळें, तेथील व्यंगें, मत्सर, विकार, बल, ऐश्वर्य, इत्यादींची खडान्खडा माहिती, (४) करोल सैन्य, (५) कारीगार हत्यार, (६) चाणाक्ष व चतुर मुत्सद्दी जवळ करण्याची पुण्यबुद्धि, (७) ह्या सर्व साधनांचा योग्य वेळीं योग्य उपयोग करण्याची अप्रतिहत अक्कल, (८) त्या अकलेला मूर्त रूप देण्यास लागणारें शौर्य, (९) आणि मनुष्यमात्राला आपल्या कह्यांत वागविण्याचें दुर्मीळ कसब, शहाजी राजाच्या ठायीं जन्मानें व कर्तबगारीनें सिद्ध झाल्यामुळें, त्याच्या हातून जुनाट संस्थानिकांच्या स्वप्नांतहि नव्हतें त्या स्वराज्यस्थापनेच्या महत्कृत्याचा पाया घातला गेला. जुने संस्थानिक व नवा शहाजी ह्यांच्यांत हें असें जमीनअस्मानाचें अंतर होतें.

१८

शिवाजीची गुणसंपदा

शिवाजीखेरीज इतर कोणत्याहि व्यक्तीचें स्वभाववर्णन बखरकारांनीं केलेलें आढळत नाहीं. व्यवस्थित विभाग व योग्य वर्गीकरण करून लिहिण्याचें वळण बखरकारांस नसल्यामुळें त्यांच्या ग्रंथांत असल्या स्वतंत्र सदराची अपेक्षा करणें अप्रस्तुत आहे. आतां यद्यपि शिवाजीच्या स्वभाववर्णनाचें स्वतंत्र सदर ह्या बखरकारांनीं दिलेलें नाहीं, तत्रापि त्यांच्या ग्रंथांतून शिवाजीच्या स्वभाव वर्णनाचे व कर्तृत्ववर्णनाचे चुटके वेळोवेळीं आढळून येण्यासारखे आहेत. हे सर्व चुटके एकत्र केले असतां शिवाजीचा स्वभाव व त्याचें कर्तृत्व ह्यांची इयत्ता थोडीबहुत ठरवितां येण्याजोगी आहे.

विविध गुण

बखरकार, पोवाडे रचणारे शाहीर व इतर ग्रंथकार ह्या सर्वांचे लेख व उल्लेख लक्षांत घेतले तर ह्या महात्म्याच्या स्वभावाचीं व कर्तृत्वाचीं निरनिराळीं अंगें नानाप्रकारांनीं दृष्टोत्पत्तीस येतात. (१) बालपण, (२) तारुण्य, (३) प्रौढपण, (४) अंतकाळ, (५) मित्रवात्सल्य, (६) मातृप्रेम, (७) पितृप्रेम, (८) बंधुप्रेम, (९) स्त्रीप्रेम, (१०) पुत्रप्रेम, (११) देशप्रीति, (१२) धर्मश्रद्धा, (१३) गुरुभक्ति, (१४) धर्मसंस्थापनार्थ उद्योग, (१५) महाराष्ट्रधर्मपालना, (१६) विद्याव्यासंग, (१७) कवित्वशक्ति, (१८) शूरसंभावना, (१९) विद्वत्संभावना, (२०) सभ्यता, (२१) वीरश्री, (२२) साहस, (२३) श्रमसहिष्णुता, (२४) कार्यबाहुल्य, (२५) शिष्टाई, (२६) राजकारणधुरंधरता, (२७) कानूनसाक्षी, (२८) नीति, (२९) औदार्य, (३०) गुणग्राहिता, (३१) समयसूचकता, (३२) नम्रता, (३३) औद्धत्य, (३४) ऐश्वर्य, (३५) सेनानीत्व, वगैरे शिवाजीच्या शेंकडों गुणांचे दाखले थोडे फार बखरींतून व इतरत्र सांपडतात. ह्या दाखल्यांवरून शिवाजीच्या आंगीं असलेल्या गुणगणांचा अंदाज अंशतः होण्यासारखा आहे. (१) रामदासासारख्यांशीं नम्रत्व, (२) अवरंगझेबासारख्यांशीं औद्धत्य, (३) तानाजी मालुसऱ्यांसारख्यांशीं स्नेह, (४) श्रीशैलमल्लिकार्जुनाच्या देवालयांत दाखविलेलें साहस, (५) वर्षोनवर्षें चारी ऋतूंत सारखें सुरूं असलेलें उद्योगपरा-

यणत्व, वगैरे गुणांचें सोदाहरण निरूपण करण्याचें हें स्थल नसल्यामुळें केवळ दिग्दर्शनावरच येथें समाधान मानून राहिलें पाहिजे.

अवतार कार्य

बैठ्या खेळांपैकीं सोंगटयांचा गडबड्या, घांदल्या, व ठोकाठोकीचा खेळ शिवाजी कधीं कधीं खेळत असे. (तानाजी मालुसऱ्याचा पोवाडा); पंताजी काका, तानाजी मालुसरे, वगैरे घरोब्यांतील मंडळींशीं थट्टामस्करी शिवाजी कधीं कधीं करीत असे. (तानाजीचा पोवाडा); अफजलखानाला बत्तीस दातांच्या बोकड, व अवरंगझेबाला सैतान व शिखानष्ट, अशीं उपपदें द्वेषजन्य थट्टेनें व तिरस्कारानें नवीन बनविण्याची कला शिवाजीला माहीत होती; राजाराम पालथा जन्मला असतां तो अपशकून, शुभशकून आहे असें ठरविण्याची समयसूचकता शिवाजीच्या आंगीं होती, वगैरे नाजूक व मासलेवाईक चुटके बखरकारांनीं अधूनमधून दिले आहेत. ह्या सर्वांचा संग्रह भावी इतिहासकाराला बखरकारांच्या लेखांतून आयता तयार असलेला मिळणार आहे. आतां ह्या लहानसहान गोष्टी बखरकार मोठ्या महत्त्वाच्या मानीत नाहींत हें खरें व वाजवी आहे.

बखरकारांचा मुख्य कटाक्ष शिवाजी शंकराचा अवतार होता; व धर्मसंस्थापना हें शिवाजीचें मुख्य कार्य होतें, वगैरे महत्त्वाचे मुद्दे सांगण्याकडे विशेष आहे व तो यथायोग्य आहे. शिवाजी ईश्वरांश होता ह्या मुद्यावर विशेष कटाक्ष असल्यामुळें, शिवाजीची तुलना बखरकार समकालीन किंवा दोनचारशें वर्षांअलीकडच्या सामान्य राजांशीं करीत नाहींत. रघू, दिलीप, धर्म, शिबी, श्रियाळ, विक्रम, शालिवाहन, भोज, नैषध, कर्ण, अर्जुन वगैरे असामान्य पौराणिक राजांचीं नांवें शिवाजीच्या बरोबर घ्यावीं असा बखरकारांचा रोख आहे. हा किती वास्तव आहे, ह्याचें प्रत्यंतर आधुनिक लेखकांच्या लिहिण्यांत अत्युत्कृष्ट रीतीनें भासमान होतें. बखरकार ज्याप्रमाणें शिवाजीची तुलना लोकोत्तर अशा पौराणिक राजांशीं करतात, त्याप्रमाणेंच आधुनिक महाराष्ट्र लेखक त्याची तुलना युरोपांतील प्राचीन व अर्वाचीन अशा लोकोत्तर वीरांशीं करतात. अलेक्झांडर, सीझर, नेपोलियन, शार्लमान्य, क्रामवेल, वाशिंग्टन, इत्यादि पाश्चात्त्य महापुरुषांचीं नांवें शिवाजीच्या संबंधानें सुचविलेलीं वारंवार वाचण्यांत येतात. शिवाजीचें कर्तृत्व व महत्त्व लक्षांत घेतलें असतां ह्या पाश्चात्त्य पुरुषांना शिवाजीच्या बरोबरीनें गणणें सामान्य घरसोडीच्या लेखांत अश्लाघ्य होईल असें नाहीं. परंतु परीक्षात्मक ऐतिहासिक लेखांत साधार अशा पायावरच तुलना झाली असतां खपली जाते. सबब प्रस्तुत प्रसंगाच्या संबंधानें ह्या विधानाची सत्यता सिद्ध करण्याकरितां, शिवाजीच्या स्वभावाचें व कर्तृत्वाचें मेजमाप घेणें जरूर आहे.

पाश्चात्त्य वीरांशीं तुलना

शिवाजी ही विभूति महाराष्ट्रांत कोणतें कार्य साधण्याकरितां अवतीर्ण झाली ? लोकांच्या स्वातंत्र्याचा अपहार करून दिग्विजय करण्याकरितां शिवाजी उत्पन्न झाला ? किंवा स्वराज्य व स्वधर्म ह्यांचें संरक्षण करण्याकरितां त्याचा अवतार होता ? स्वराज्य व स्वधर्म ह्यांचें संरक्षण करण्याचा उच्च, उदात्त व पवित्र हेतु मनांत धरून शिवाजीचे प्रयत्न चालले होते हें सर्वत्र मान्य आहे. तेव्हां परकीय लोकांचें स्वातंत्र्य हरण करणाऱ्या, अर्थात् एका नीच, दुष्ट व अपवित्र हेतूनें प्रोत्साहित झालेल्या अलेक्झांडर, सीझर किंवा नेपोलियन ह्या दिग्विजयी पुरुषांशीं शिवाजीची तुलना करणें अयोग्य आहे. धैर्य, शौर्य, पराक्रम, कर्तृत्वशक्ति, इत्यादि गुणांसंबंधानें शिवाजीशीं ह्या पुरुषांची तुलना केली असतां चालेल. परंतु हेतूच्या पवित्रतेसंबंधीं जेथें विचार करावयाचा असेल, तेथें ह्या दिग्विजयी व दुष्ट पुरुषांची डाळ शिजणार कशी ? अशा ठिकाणीं स्वातंत्र्यार्थ खटपट करणाऱ्या पवित्र महापुरुषांचाच तेवढा प्रवेश होणें योग्य आहे. हालंडचा वुइल्यम दि सायलेंट किंवा युनायटेड स्टेटस्चा वाशिंग्टन ह्या पुरुषांची तुलना शिवाजीशीं केली तर एकवार चालण्यासारखें आहे. आतां पाश्चात्त्य महापुरुषांशीं तुलना केल्यानेंच म्हणजे शिवाजीच्या महत्त्वाची इयत्ता ठरणार आहे असा प्रकार बिलकूल नाहीं. शिवाजीची योग्यता स्वयंसिद्ध आहे. अलेक्झांडराप्रमाणें शिवाजीनें आपल्या स्नेह्यासोब्त्यांस ठार मारिलें नाहीं; सीझराप्रमाणें आपल्या बायकोस सोडून दिलेलें नाहीं; बोनापार्टनें डफ डांगियाचा जसा अन्यायानें वध केला तसा शिवाजीनें कोणाचा केला नाहीं; क्रामवेलनें ऐरिश लोकांस सरसहा ठार मारिलें, त्याप्रमाणें शिवाजीनें कोण्या प्रांतांतील लोकांची कत्तल उडविली नाहीं; फ्रेडरिक दि ग्रेटप्रमाणें शिवाजीच्या आंगीं नीच दुर्गुण नव्हते.

शिवाजीचें वर्तन न्यायाचें, नीतीचें, पराक्रमाचें, स्वधर्मपरायणतेचें व परधर्मसहिष्णुतेचें होतें. दोन चारशें लढाया मारून त्यांत विजयी होणें; तीन चारशें किल्ले मैदानांत, डोंगरावर व समुद्रतीरावर बांधणें; नवीन सैन्य तयार करणें; नवीन आरमार निर्मिणें; नवे कायदे करणें; स्वभाषेला उत्तेजन देणें; स्वतः पद्यरचना करणें; कवींना आश्रय देणें; नवीं शहरें वसविणें; स्वधर्माचें संरक्षण करणें; गोब्राह्मणांचा प्रतिपाल करणें; सारांश, स्वदेशाला स्वतंत्र व सुखी करणें; ह्या लोकोत्तर कृत्यांनीं जर कोण्या पुरुषानें ह्या भूमंडळाला अक्षय ऋणी करून ठेविलें असेल तर तें शिवाजीनेंच होय. शिवाजीची खाजगी वर्तणूक व सार्वजनिक पराक्रम इतके लोकोत्तर होते कीं, त्याच्याशीं तुलना करावयास जी जी म्हणून व्यक्ती घ्यावी ती ती, ह्या नाहीं त्या गुणानें शिवाजीहून कमतरच दिसेल. ह्या अवतारी पुरुषासंबंधीं लिहितां लिहितां समर्थ म्हणतात "तयाचे गुणमहत्त्वासी तुलना कैची ? यशवंत, कीर्तिवंत, व समर्थवंत, नीतिवंत,

जाणता, आचारशील, विचारशील, दानशील, कर्मशील, सर्वज्ञ, सुशील, धर्ममूर्ति, निश्चयाचा महामेरु, अखंड निर्धारी, राजयोगी " अशीं नानापरीचीं विशेषणें शिवाजीला रामदासांनीं लाविलीं आहेत. निस्पृही व स्पष्टवक्त्या अशा समकालीन ग्रंथकारानें हें गुणवर्णन केलेलें आहे हें लक्षांत घेतलें असतां शिवाजीच्या अंगीं असलेल्या जाज्वल्य गुणांच्या इयत्तेचा अंदाज सहजासहजीं करतां येतो व कित्येक इंग्रज व मुसुलमान बखरकारांनीं ह्या महापुरुषाची निंदा केलेली पाहून त्यांच्या परगुणा-सहिष्णुतेबद्दल तिरस्कार उत्पन्न होतो व त्यांच्या हृदयांतील कुत्सितपणाचा ठाव घेण्यास संधी मिळते.

लूट, दरोडा व वध यांचा राजकीय अर्थ

कुत्ता, मूसक, सैतान, गनीम वगैरे अपशब्द योजिणाऱ्या मुसुलमान तवारिख-कारांचे लेख प्रस्तुत कोणी फारसे वाचीत नाहीं, तेव्हां त्यांच्याबद्दल येथें कांहीं लिहिलें नाहीं तरी चालण्यासारखें आहे. इंग्रज लेखकांसंबंधीं मात्र इतकें औदासीन्य दाखवितां येत नाहीं. शिवाजी अक्षरशून्य होता येथपासून सुरुवात करून, (२) त्यानें दरोडे, (३) लुटारूपणा, (४) खून वगैरे अनुचित पापें केलीं असें सांगण्याचा इंग्रज लेखकांचा मुख्य रोख आहे. पैकीं पहिला आरोप निराधार आहे हें मागें दाखवून दिलें आहे. बाकीचे तीन आरोपहि अज्ञानानें व कुत्सित बुद्धीनें केलेले आहेत हेंहि साधार सिद्ध करतां येतें. शके १५६० पासून शके १५६८ पर्यंत कोंकणांत कांहीं ठिकाणीं यवनांच्या विरुद्ध लहानसहान बंडें झालीं व यवनांच्या बाजूच्या लोकांचीं घरेंदारें लुटलीं गेलीं. ह्या लहानसहान बंडांना मुसुलमान तवारिखकार दरोडे म्हणून संज्ञा देतात. दरोडे हा शब्द मूळ कोणत्या अर्थीं योजिलेला आहे, हें इंग्रज लेखकांना न कळल्या-मुळें, या शब्दाचा वाच्यार्थ खरा धरून हे लोक समाधान मानितात. ग्रांट डफनें आपल्या पुस्तकाच्या अकराव्या भागांत कृष्णराव खटावकरांचें एक पत्र टिपेंत दिलें आहे. त्यांत दहा हजार स्वारांच्या सेनापतींना चोर, लुटारू, दरोडेखोर, वगैरे अप-शब्द लाविले आहेत. ते ज्याप्रमाणें अज्ञानमूलक आहेत त्याप्रमाणेंच शिवाजीला दरोडेखोर हा अपशब्द लाविणें अज्ञानव्यंजक होय. सतराव्या शतकांत मुसुलमान लोक मराठ्यांना चोर, दरोडेखोर हे अपशब्द द्वेषानें चरफडून लावीत असत. हा असला पोरकट व भागूबाईपणाचा प्रकार युरोपांतील इतिहासांतहि कित्येक ठिकाणीं झालेला दृष्टीस येतो. स्पेनच्या दुसऱ्या फिलीपाच्या विरुद्ध डच लोकांनीं बंड केलें व त्यांत ते विजयी झाले. बंड होत असतांना डच लोकांना स्पॅनिश लोकांनीं thieves, robbers, चोर, दरोडेखोर हे अपशब्द लाविले. तोच प्रकार महा-राष्ट्रांत झाला. डच robbers नीं स्पॅनिश लोकांची जशी खोड मोडली त्याप्रमाणेंच महाराष्ट्रांतील दरोडेखोरांनीं मुसलमानांचीं नाकें कापून त्यांच्या हातांत दिलीं.

ह्या अपमानानें चिरडीस जाऊन मुसलमान लोक मराठ्यांना व शिवाजीला दरोडेखोर म्हणत तें योग्यच होतें. परंतु इंग्रज लोकांनीं मुसुलमान लोकांच्या लिहिण्याचा वाच्यार्थच तेवढा घेऊन कां मानावें तें समजत नाहीं.

सदर लेखकांनीं समर्थांचा दासबोध पाहिला असता तर खरे दरोडेखोर व बंडवाले कोण होते तें त्यांना कळून चुकलें असतें. शिवाजीराजाला नीतीचा उपदेश करतांना समर्थ म्हणतात " प्रस्तुत यवनांचें बंड " झालेलें आहे. तसेंच यवनांच्या शिवन्या स्वभावाला अनुलक्षून समर्थ लिहितात, " दुष्ट भाषणें करिती, नाना परी जाचती, रघुपतीसी नावडती, म्हणूनी (तुमची) योजना केली. " असो. दरोडेखोर या शब्दाची ही अशी मीमांसा आहे. लूट व वध या शब्दांचीहि मीमांसा याहून निराळी नाहीं. " मोठ्या प्रमाणावर मालमत्ता फरारी करणें " असा, लुटणें ह्या शब्दाचा अर्थ ग्रांट डफादि मंडळी करतात. परंतु सतराव्या व आठराव्या शतकांतील बखरकारांच्या ग्रंथांत, लुटणें ह्या शब्दाचा अर्थ फारच निराळा आहे. " लढाई देऊन शत्रूची मालमत्ता राजरोस रीतीनें व हक्कानें नेणें, " असा, लुटणें ह्या शब्दाचा अर्थ बखरकार समजतात. प्रस्तुत ग्रंथांत छापलेल्या " पेशवाईच्या अखेरच्या अखबारींत " लुटणें हा शब्द इंग्रजांच्या संबंधानें वारंवार योजिलेला आहे. तेथें जो लुटणें ह्या शब्दाचा अर्थ करणें जरूर आहे तोच अर्थ शिवाजीच्या बखरींतील लुटणें ह्या शब्दाचा केला पाहिजे. दुसरा अर्थ करणें अशास्त्र आहे. शिवाजीनें सुरत लुटली म्हणजे शिवाजीनें शत्रूच्या प्रांतांवर स्वारी करून त्याची मालमत्ता लढाईच्या हक्कानें नेली, असा अर्थ करावा लागतो. शिवाजीनें सुरत लुटली म्हणजे शिवाजीनें सुरतेवर दरोडा घातला असा अर्थ मराठी भाषा ज्यांस समजत नाहीं त्यांखेरीज इतर कोणी करणार नाहीं.

अफजलखान-वधाची कथा व अर्थ

लूट ह्या शब्दाप्रमाणेंच वध या शब्दाचाहि अर्थ ह्या लेखकांस नीट समजला नाहीं. आपल्या इतिहासाच्या नवव्या भागाच्या शेवटीं शिवाजीच्या कृत्यांची व स्वभावाची मीमांसा करतांना Afzool Khan was murdered असा वाक्यांश लिहून ग्रांट डफनें शिवाजीवर खुनाचा चोरून प्रहार केला आहे. लक्ष्मणराव चिपळोणकर ह्यांनीं आपल्या इतिहासांत ग्रांट डफच्या इतर आक्षेपांना मुद्देसूद उत्तर देण्याचा प्रयत्न केला आहे. परंतु अफजलखानी प्रकरणाची मुख्य हकीकत देण्यांत डफप्रमाणें चिपळोणकरहि चुकले असल्यामुळें त्यांच्या उत्तरांत जितका जोर यावा तितका आला नाहीं. तशांत त्यांच्या लक्षांतून वर नमूद केलेला वाक्यांश चुकून राहिल्यामुळें ग्रांट डफ त्यांच्या कैचींतून अजीबात सुटून गेला आहे. " अफजलखान शिवाजीला मोकळ्या मनानें शिष्टाचाराप्रमाणें जों भेट देतो तों शिवाजीनें त्याच्या पोटांत वाघनख खुपसलें " असें वर्णन डफनें आपल्या इतिहासाच्या चवथ्या भागांत केलें

आहे. " इतुकिया उपरि अब्दुल मनीं खवळला पुरा । कव मारिली अब्दुल्यानें । सरजा गवसून धरला सारा । चालविली कट्यार " ही हकीकत अगीनदासानें पोवाड्यांत दिली आहे. अफजलखानाचा पोवाडा बहुतेक पूर्णपणें विश्वसनीय असल्यामुळें त्यांत दिलेली हकीकत खरी मानणें प्राप्त आहे. अफजलखानानें प्रथम कट्यार चालविली, तेव्हां शिवाजीनें स्वसंरक्षणार्थ खानाच्या पोटांत बिचवा खुपसला. अशी खरी कार्यपरंपरा आहे. ह्या स्वसंरक्षणाच्या कृत्याला बखरकार वध ही संज्ञा देतात. ग्रांट डफनें योजिलेला murder हा शब्द वध ह्या शब्दाहून अर्थानें निराळा आहे. वध म्हणजे righteous killing व murder म्हणजे unrighteous killing. अफजलखानी प्रकरणाची खरी हकीकत माहीत नसल्यामुळें, बखरकारांनीं अफजलखानाच्या वधासंबंधानें शिवाजीची जी तारीफ केली आहे तिचाहि ग्रांट डफनें विपरीतच अर्थ केला आहे. " राजकीय कारणाकरितां खून करणें न्याय्य आहे असे मराठे लोक समजतात. " म्हणून डफनें मराठ्यांची विनाकारण निंदा केलेली आहे. ती किती अवास्तव व कोत्या बुद्धीची किंवा कुबुद्धीची दर्शक आहे हें वरील उद्घाटन वाचून सहज ध्यानांत येण्यासारखें आहे. शिवाजीनें खून केला ही गोष्ट कबूल करून तिचें मुख्य कारण मराठ्यांची त्या वेळची नीतिमत्ता होय असा राष्ट्रापमानकारक व व्यक्तिगुणापकर्षक पुरावा रा. चिपळोणकर यांनीं दिला आहे व ग्रांट डफनें केलेली शिवाजीची व भूत व वर्तमान मराठ्यांची निंदा कांहीं कारण नसतां, कबूल केली आहे; परंतु असला अयोग्य प्रकार करण्याचें कांहींएक कारण नव्हतें. अफजलखानाला मारण्यापेक्षां अफजलखानास कैद करणें शिवाजीच्या जास्त हिताचें होतें ही गोष्ट लक्षांत घेतली असतां वध करण्यास अफजलखानानें शिवाजीला भाग पाडलें हीच हकीकत विश्वसनीय दिसते. त्या काळच्या चालीप्रमाणें दोघेहि हत्यारबंद होते. अफजलखानानें प्रथम शस्त्र चालविल्यावर शिवाजीनें गप्प कां बसावें तें सांगणें कठीण आहे. कुत्ता ह्या शब्दाचीहि फोड रामदासांनीं मोठी नामी केली आहे. " धर्मद्वेष्टे तेवढे कुत्ते " म्हणून ते दासबोधांत लिहितात. असो. बखरकारांचा व तवारिखकारांचा आशय नीट समजून न घेतल्यामुळें इंग्रज ग्रंथकारांच्या हातून ज्या अनेक चुका व जे अनेक गैरसमज झाले आहेत त्यांपैकीं कांहींचें दिग्दर्शन वर केलें आहे. शिवाजीचें स्वभाववर्णन बखरकारांनीं व रामदासांनीं कसें केलें आहे तें दाखवून देतांना हा उपवाद मध्येंच उपस्थित झाला. मराठा वीरपुरुषांवर परकीय लेखकांनीं लादलेले दोष अलीकडील दहावीस वर्षांत महाराष्ट्रांत कोणी खरे मानतो म्हणून हा वाद उपस्थित केला अशांतला भाग नव्हे. ज्या अर्थी परकीय लेखकांनीं मराठ्यांवर नसते दोष लादण्याचे श्रम घेतले त्या अर्थी त्यांचें निरसन करण्याची मेहनत कोणी तरी करणें अवश्यच झालें होतें म्हणून ही लहानशी झटापट सहजासहजीं आटपून घेतली आहे.

दासबोध स्वल्प वाटे नरा । तो जाणावा आत्महत्यारा ॥
जेथें अतिसूक्ष्मचि विचारा । फटके होती ॥२१॥ दशक ६ ॥

कुबडी.

स्वामींच्या वाङ्मयाची लोकमनावरील छाप

नाशकापासून कोल्हापुरापर्यंतच्या महाराष्ट्राला श्रीमत् समर्थ रामदासस्वामी आनंदवनभूवन ह्या नांवानें ओळखत असत (स्वामींची बखर, आवृत्ति २ री, पृष्ठ ४९९). ह्या आनंदवनभूमींतील प्रायः प्रत्येक शहरांत व खेड्यांत स्वामींचा कोणता ना कोणता तरी ग्रंथ कोणाच्या तरी संग्रहाला असतोच असतो. समर्थांच्या विचार-सरणीनें महाराष्ट्रांतील लोकांच्या मनाचा भेद इतका खोल केलेला आहे कीं, त्यांनीं रचलेल्या मनाच्या श्लोकांपैकीं एखाद्या श्लोकाचा चरणहि ज्याच्या कानावरून गेला नाहीं, असा एकहि माणूस अठरा पगड जातींत मिळणें केवळ अशक्य आहे. समर्थांच्या मनाच्या श्लोकांच्या व्यासीची बरोबरी कांहीं थोड्याशा अंशानें देवीदासाच्या व्यंकटेशस्तोत्रानें केली तर सांगवत नाहीं. परंतु व्यंकटेशस्तोत्राची ओळख शूद्रादि-कनिष्ठ वर्णांत फारशी नसल्यामुळें, रामदाशी मनाच्या श्लोकांचें सर्वव्यापित्व अनन्य-साधारणच रहातें. ह्या श्लोकांच्या सर्वव्यापित्वाचें कारण असें आहे कीं, ते फार सुबोध आहेत, इतकेंच नव्हे, तर ते अत्यंत अशिक्षित अशा मनुष्याच्या मनालाहि चटका लावणारे आहेत. हे श्लोक म्हणण्यालाहि फार सोपे जातात. शिवाय ह्यांच्या रचनेंत एक ऐतिहासिक गूढ आहे. तें हें कीं, ह्या श्लोकांची वृत्तरचना मुसुलमानी फकिरांच्या फारशी, उर्दू व मराठी सवालांच्या वृत्तरचनेसारखी हुबेहूब आहे. उदाहरणार्थ, करीमांतील पहिला चरण देतों :-

करीमा बिबक्षायि बर्हालि मा

ह्याच्याशीं तुलना करावयाला मनाच्या श्लोकांपैकीं पहिल्या व दुसऱ्या श्लोकांचे प्रथम चरण देतों :-

गणाधीश जो ईश सर्वां गुणांचा ॥
मना सज्जना भक्ति पंथेंचि जावें ॥

रामदाशी मनाच्या श्लोकांचें वृत्त भुजंगप्रयात आहे. त्या वृत्तांत व फारशी करीमाच्या वृत्तांत भेद एवढाच की करीमाच्या चरणांत अंत्य यगणाचें गुरू अक्षर नाहीं.

दासांच्या वेळीं मुसुलमानी पीर व त्यांचे तकिये महाराष्ट्राच्या लहानशा खेड्यांतूनहि अति झाले होते; आणि अज्ञ जो सामान्यजनसमूह तो ह्या पीरांच्या, तकियांच्या व फकिरांच्या मायावी कचाटींत इतका सांपडला होता की समर्थांना व शिवाजी महाराजांना त्याला मुक्त करण्यास नाना प्रकारचे लहान थोर उपाय योजावे लागले. त्यापैकीं फकिरांच्या सवालाच्या अनुकरणानें सुचलेला हा वृत्तरचनेचा लहानसा परंतु मोठा गुणकारी उपाय होता. रामदाशी श्लोक व फकिरी सवाल एकसमयावच्छेदानें ऐकून गांवोगांवच्या मार्मिक लोकांना पाच्छाई धर्माची परीक्षा करण्यास केवढी सवड झाली असेल तें सांगावयास नकोच !

या साधूचीं चरित्रें

स्वधर्म व स्वदेश ह्यांच्या प्रीतीनें समर्थांनीं जे हे लहान मोठे प्रयत्न केले, त्यांचीं फळें त्यांच्या हयातींत तर त्यांनीं पाहिलींच; परंतु त्यांच्या पश्चात्हि ह्या फळांच्या माधुरीची स्मृति महाराष्ट्रांत अखंड जागृत आहे. गेल्या सहाशें वर्षांत महाराष्ट्रांत जे अनेक उत्तम पुरुष झाले, त्यांतून समर्थ रामदासस्वामी व छत्रपति शिवाजी महाराज ह्या दोन वीर पुरुषांच्या चरित्रांइतकीं चरित्रें दुसऱ्या कोणत्याच पुरुषांचीं झालेलीं नाहींत. अठराव्या शतकांत झालेल्या पद्यात्मक संतचरित्रांत समर्थांचीं त्रोटक चरित्रें आलेलीं सर्वांस महशूर आहेत. परंतु त्यांशिवाय त्यांचीं आणिक पांच चरित्रें त्या व पुढील शतकांत त्यांच्या शिष्यपरंपरेंतील साधूंनीं लिहून ठेविलीं आहेत. पैकीं दोन पद्यात्मक व तीन गद्यात्मक आहेत. (१) गंगाधर स्वामीनीं शके १६४० त सांगितलेलें चरित्र, (२) उद्धवसुत केशवशिष्य लक्ष्मणकृत ओंवीबद्ध चरित्र, (३) आत्मारामबोवाकृत ओंवीबद्ध चरित्र, (४) श्रीहनुमंतस्वामीकृत रामदासस्वामींची बखर, व (५) ठाणें येथें सूर्योदयांत छापलेलें चरित्र. पैकीं पहिलें चरित्र छापलेलें नाहीं. शेवटलीं चार चरित्रें, प्रस्तुत लेखकास जशीं असावीशीं वाटतात तशीं जरी नाहींत तरी, बरींच विस्तृत व मुद्देसूद आहेत. ह्या चार चरित्रांखेरीज, तुकारामबोवा, वामनपंडित, अनंतकवि, मोरोपंत वगैरे कवींनीं व वर्तमानकालीन लहानमोठ्या लेखकांनीं व वक्त्यांनीं दासांचे शेंकडो पवाडे वेळोवेळीं गायिलेले सांगू गेल्यास एक ग्रंथ होईल. शिवाजी महाराजांचीं चरित्रें हीं अशींच नाना प्रकारचीं आहेत. ह्यावरून महाराष्ट्रांतील लोकांना साधुपुरुष व वीरपुरुष ह्यांच्या चरित्रांची गोडी फार पूर्वीपासून आहे हें तर सिद्ध होतेंच. परंतु ह्याबरोबर हेंहि सिद्ध होतें कीं, स्वेतिहासानभिज्ञतेचा आरोप जो पाश्चात्त्य ग्रंथकार हिंदुस्थानांतील यच्चयावत् लोकांवर सरसकट आणतात, तो निदान महाराष्ट्रापुरता, सर्वांशीं जरी नव्हे तरी, बऱ्याच अंशानें अवास्तव आहे.

व दिवसेंदिवस लोकांच्या अभिरुचीवरून अशीं हीं थोडीं थोडीं चिन्हें दिसत आहेत कीं, हा आरोप समूळ नाहींसा व्हावयाला फार काळ लागणार नाहीं. इतकेंच कीं सर्वांनीं झटून ह्या कामीं हातभार लाविला पाहिजे. मग, स्वतःच्या पदराला खार लागला तरी बेहत्तर आहे.

मराठी साधु व कवि यांच्या वाङ्मय प्रकाशनाची स्थिति

समर्थांचीं चरित्रें ज्याप्रमाणें अनेक झालीं, त्याप्रमाणें त्यांच्या ग्रंथांच्या आवृत्याहि, मुद्रणकला, ह्या प्रांतांत सुरू झाल्यापासून गेल्या ऐशीं वर्षांत, अनेक निघाल्या. ज्यानें म्हणून छापखाना घातला त्यानें समर्थांचा एक तरी ग्रंथ छापला, असें झाल्यावांचून प्रायः राहिलें नाहीं. एकटा दासबोध घेतला, तरी तो दहा पांच ठिकाणीं निरनिराळा छापलेला आढळेल. अशीं समर्थांच्या ग्रंथांचीं असामान्य लोकप्रियता आहे. ह्या लोकप्रियतेच्या आदरानें स्वामींचे समग्र ग्रंथ कित्येक प्रकाशकांनीं अलीकडील दहा बारा वर्षांत छापून काढिले आहेत. परंतु त्यांनीं काढिलेल्या ग्रंथांना समग्र हें विशेषण बिलकुल शोभत नाहीं. १८९० त माडगांवकरांनीं स्वामींचे समग्र ग्रंथ छापिले. त्यांत पुण्याच्या ज्ञानप्रकाश छापखान्यांत १८७९ त छापिलेल्या पुस्तकांतील बरींच प्रकरणें आलीं नाहींत. पुढें १८९१ त तेंडुलकरांनींहि दासांचे समग्र ग्रंथ प्रसिद्ध केले. त्यांत ज्ञानप्रकाशांतल्या पुस्तकांतील बरींच प्रकरणें नसून, शिवाय दासबोधहि नाहीं; आणि इतकीं व्यंगें असून त्यांच्या पुस्तकाच्या नांवांत समग्र हीं अक्षरें आहेतच. अलीकडील दोन महिन्यांत गोंधळेकरांनीं स्वामींचे समग्र ग्रंथ निर्णयसागर छापखान्यांतून छापून काढिले आहेत. त्यांतहि स्वामींचीं पुष्कळ प्रकरणें छापिलेलीं नाहींत. माडगांवकरांनीं टाकून दिलेली कुबडी गोंधळेकरांनीं बगलेंत मारिली आहे. परंतु तेवढ्यानें त्यांची लंगडशाई छपली असें मात्र झालें नाहीं. तेंडुलकरांच्या ग्रंथांतील व ज्ञानप्रकाशांतल्या ग्रंथांतील बरींच प्रकरणें त्यांनीं सोडून दिलेलीं आहेत. हीं प्रकरणें स्वामींचीं नव्हत म्हणून त्यांनीं तीं सोडून दिलीं, असा प्रकार नाहीं. प्रकार शुद्ध अज्ञानाचा आहे. आपण जें काम करण्यास उद्युक्त झालों त्यासंबंधानें आपल्या अगोदर इतरत्र काय झालेलें आहे, ह्याचा शोध ह्या प्रकाशकांनीं केला नाहीं, हा ह्यांचा मुख्य दोष आहे. ठाणें किंवा मुंबई येथील ग्रंथसंग्रहालयांत जाऊन त्यांनीं तपास केला असता किंवा स्वतःच्या दुकानांतील पुस्तकांच्या राशी उलगडून पाहिल्या असत्या, तर, स्वामींचे एकंदर ग्रंथ आहेत किती, त्यापैकीं आजपर्यंत छापले किती, व आपण छापूं घातलेल्या पुस्तकाला समग्रपणा येण्यास मिळवावयाचे किती, ह्याची कल्पना त्यांस सुरेख आली असती. दिवटी-बुधली घरीं ठेवून लोकांच्या घरीं गोंधळ घालावयाला जाणाऱ्या शहाण्या गोंधळ्याप्रमाणेंच आमच्या इकडील प्रकाशकांची स्थिति आहे. त्यांना वर्तमान काळाचा महिमा जसा कळावा तसा कळत नाहीं. त्यांनीं हें

पक्केपणीं समजून राहिलें पाहिजे कीं, वाटेल तें पुस्तक वाटेल तसें वेडेंबागडें छापून बाजारांत मांडण्याचा आतां काळ राहिला नाहीं. जें कांहीं काम करावयाचें तें चोख केलें तरच पत रहाणार आहे.

गेल्या सहाशें वर्षांत जे अर्वाचीन मराठी कवि व साधू झाले, त्यांच्या ग्रंथांचा अभ्यास लोक पूर्वी भाविक पद्धतीनें करीत असत. ह्या भाविक लोकांत जे विशेष चिकित्सक असत, ते आपल्या आवडत्या साधूंचीं काव्यें प्रयत्नानें मिळवून व स्वतः लिहून काढून संग्रह करून ठेवीत. त्यामुळें, कोणत्याहि साधूची समग्र कृती पाहण्याची जिज्ञासा झाली, तर त्या साधूच्या एखाद्या चिकित्सक भक्ताकडे ती आद्यंत पाहण्यास मिळण्याचा संभव असे. ही स्थिति मुद्रणकाळाच्या पूर्वीची झाली. अलीकडील ऐशीं वर्षांत ह्या साधूंचीं कांहीं त्रोटक काव्यें शिळेवर व ठशांवर छापलेलीं मिळूं लागलीं. त्यामुळें, लेखी पोथ्यांकडे लोकांचें दुर्लक्ष होत चाललें. लेखी पोथ्यांपेक्षां छापील पुस्तकें दिसण्याला सुबक, वापरण्याला आटोपशीर व किंमतीनें स्वस्त असतात, हें तर जगजाहीर आहे. छापील पुस्तकांच्या ह्या तीन गुणांचा परिणाम असा झाला कीं, लेखी पोथ्या मागें पडून, घरोघर छापील पुस्तकांचें व पोथ्यांचें राज्य सुरूं झालें. अर्थात् चिकित्सक रसिकांनीं लिहून ठेवलेल्या संग्रहाकडे कोणी पहात नाहींसें झालें; व त्यांना जुन्या बाडांचें स्वरूप आलें.

पाश्चात्त्यांच्या संसर्गानें गेल्या ऐशीं वर्षांत असा एक काळ येऊन गेला कीं, त्यावेळीं ज्यांना रसिक म्हणून म्हणतां येईल, त्यांच्या रुचीचा प्रवाह देशी सारस्वताच्या उलट वाहूं लागला. आधीं स्वदेश भिकार, मग स्वदेशांतील लोक भिकार आणि शेवटीं स्वदेशांतील लोकांनीं केलेलीं काव्यें तर अगदींच भिकार, अशी ह्या रसिकवरांची भावना झाली. जेथें रसिकवरांनींच देशांतील ग्रंथसंपत्तीला रद्दींत काढिलें, तेथें सामान्य लोकांच्या नित्याच्या पाठांतील कांहीं लहानसहान प्रासादिक ग्रंथांखेरीज, बाकीच्या प्रासादिक ग्रंथांचा समूळ नायनाट होण्याचा प्रसंग आल्यास नवल कसचें ? परंतु आपलें भाग्य थोर कीं, अशाहि संकटांतून कांहीं प्रासादिक ग्रंथ कोण्या कोण्या भाग्यवंताच्या घरीं अजूनहि चुकूनमाकून शाबूत राहिले आहेत. प्रत्येक कवीचे व साधूचे सर्वच ग्रंथ सांपडण्याची तर आतां आशा नकोच. आतां आशा इतकीच करावयाची कीं, जे ग्रंथ अद्यापि कोठें कोठें सांपडण्यासारखे असतील ते शोधून काढून नीट व शुद्ध छापून काढिले पाहिजेत. त्यांत गबाळपणा करून उपयोगाचें नाहीं. ह्या गबाळपणानें फार नुकसान होतें. (१) अगदीं नवीन आवृत्तींत जितके ग्रंथ छापिले असतील, तितकेच काय ते मूळ कवीचे, अशी वाचकांची खोटी समजूत होते. (२) पूर्वीच्या आवृत्तींत छापिलेले ग्रंथ–जे ह्या नवीन आवृत्तींत आले नसतील ते – कवीचे नसावे अशी शंका येते. (३) ह्या दुहेरी गरसमजुतीनें काळजीनें अभ्यास करणाऱ्या वाचकांना बुचकळ्यांत पडल्यासारखें होऊन ठाम असा कोणताच

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
संख्या .. .. दि: ....
नोंद .... नों: दि: .....

सिद्धांत करतां येत नाहीं. कवींचे व साधूंचे ग्रंथ राष्ट्रीय सारस्वत होत. ह्यांच्या सूक्ष्म परिशीलनानें व परीक्षणानें तत्कालीन राष्ट्रीय विचाराची दिशा काय होती हें ठरवावयाचें असतें. हे मूळ ग्रंथच जर गबाळपणानें संपादिले व छापले गेले, तर त्यांवरून राष्ट्रीय विचारांच्या दिशेचें अनुमान निघावें तसें निघणार नाहीं हें उघड आहे. तेव्हां ही चूक प्रकाशकांनीं सुधारली पाहिजे. ही सुधारणा करण्यास एकच उपाय आहे. तो हा कीं, ज्यांनीं महाराष्ट्रकवितेचा अभ्यास केला आहे, अशा विद्वान् गृहस्थांचें साहाय्य प्रकाशकांनीं घेतलें पाहिजे.

अशांचें साहाय्य गेल्या तीस चाळीस वर्षांत छापकांनीं व प्रकाशकांनीं घेतलें होतें. परशुरामपंत गोडबोले, शंकर पांडुरंग पंडित, जनार्दन बाळाजी मोडक, वामन दाजी ओक, अण्णा मोरेश्वर कुंटे ह्या पांच गृहस्थांचें साहाय्य घेऊन ज्यांनीं मराठी कवींचे ग्रंथ छापिले त्यांचे ग्रंथ बरेच शुद्ध छापून निघाले आहेत. ह्या चार गृहस्थांच्या पाठीमागेंहि कांहीं विद्यमान गृहस्थ मराठी कवितेचे ज्ञाते आहेत. रा. रा. नारायण चिंतामण केळकर, रा. रा. विनायक लक्ष्मण भावे, रा. रा. लक्ष्मण गणेश पांगारकर, नागपुरचे प्रो. परांजपे, अशासारख्या विद्वानांच्या साहाय्यानें जर कोणी महाराष्ट्र कवींचे ग्रंथ शोधवून घेईल, तर तो सहृदय वाचकांच्या शाबासकीला लायक होईल ह्यांत संशय नाहीं. ह्या गृहस्थांना आपल्या अंगावर सोंपविलेल्या कामाचा जसा व्यापक अंदाज होईल तसा इतरांना होण्याचा संभव कमी. अमुक कवीनें एकंदर काव्यें केलीं किती, त्यापैकीं आजपर्यंत छापिलीं गेलीं किती, न छापलेल्यांपैकीं उपलब्ध किती, अनुपलब्धांपैकीं कोणत्या प्रदेशांत मिळण्याचा संभव किती, वगैरे बऱ्याच गोष्टी ह्या लोकांना माहीत आहेत. ह्या माहितीचा फायदा ते कोणाहि योग्य प्रकाशकाला मोठ्या आनंदानें करून देतील हें सांगावयाला नकोच.

रामदासांच्या ग्रंथांच्या प्रकाशनाचा प्रश्न

अशा एखाद्या तज्ज्ञाच्या साहाय्यानें कोण्याहि प्रकाशकानें रामदासस्वामींचे समग्र ग्रंथ अद्यापपर्यंत छापिले नाहींत. जनार्दन बाळाजी मोडक यांनीं काव्येतिहास-संग्रहांत स्वामींचीं कांहीं थोडीं प्रकरणें बरीच शुद्ध अशीं छापिलीं आहेत. त्यांच्यापुढें स्वामींचे समग्र ग्रंथ गेल्या पंधरा वर्षांत शोधकबुद्धीनें छापण्याचा कोणीच प्रयत्न केलेला दिसत नाहीं. तेंडुलकर, माडगांवकर, गोंधळेकर, वगैरे छापकांनीं समग्र ह्या अवास्तव विशेषणानें विशिष्ट असे कांहीं ग्रंथ बाहेर काढिलेले आहेत. परंतु ते अपूर्ण आहेत हें, कोठेंहि न छापलेलीं नवीन प्रकरणें विचारांत न घेतलीं तरी, एकमेकांशीं तोलून पाहतां सहज समजण्यासारखें आहे. तेव्हां पुढें मागें कोण्या प्रकाशकाला स्वामींचे समग्र ग्रंथ प्रसिद्ध करण्याची सदिच्छा झाली, तर त्याच्याकरितां ह्या ग्रंथांची मला माहीत असलेली यादी पुढें देतों. नारायणबोवा कावनईकर ह्या नांवाचे एक तरुण

व चिकित्सक रामदासी कोल्हापुरांत होते. ते गेल्या वर्षी वारले. त्यांनीं दासांच्या बऱ्याच ग्रंथांचा संग्रह केलेला आहे. पैकीं एक दासबोधाची पोथी गुरुपरंपरेनें त्यांजपाशीं आली. ही पोथी समर्थांच्या हयातींतील आहे असें कळतें. अर्थात् ही पोथी दोनशें वर्षांची आहे. इतरहि दुसरे ग्रंथ त्यांजपाशीं होते. ते त्यांचे शिष्य रा. शेवडे यांनीं माझ्या स्वाधीन केले. त्यावरून व इतर माहितीवरून खालील यादी तयार केली आहे. ह्या यादींत गोंधळेकरांच्या ग्रंथांत जीं प्रकरणें दिलीं नाहींत तीं देतों. गोंधळेकरांचा ग्रंथ म्हणजे माडगांवकरांचा ग्रंथ + कुबडी आहे.

१ एकवीससमासी. २ चतुः समासी. ३ सप्तसमासी. ४ दासप्रबोध ५ अक्षरमालिका. ६ कृतनिर्वाह. ७ चतुर्थयोग. ८ पंचमान. ९ मानपंचक. १० मुखवस्त्र. ११ एकविसावा दशक. १२ श्लोकबद्ध रामगीता. १३ चतुर्थमान. १४ मारुतीची आर्ती. १५ संकल्प. १६ भूपाळी. १७ अनामक प्रकरण. १८ अष्टाक्षरी पंचीकरण. १९ गद्यपद्य पंचीकरण.

शिवाय समर्थांच्या वेळीं रचिलेलीं खालील स्फुट पद्यें आहेत :-

१ मनोहरस्वामिकृत आर्ती. २ कल्याणस्वामिकृत आर्ती. ३ मनोहरस्वामिकृत कटाव. ४ मनोबोधाची आर्ती.

इतकीं प्रकरणें माझ्या संग्रहास असलेलीं गोंधळेकरांच्या ग्रंथांत छापिलीं नाहींत. ह्यापैकीं कांहीं प्रकरणें इतरत्र छापलेलीं आहेत. ह्याशिवाय दुसरींहि स्वामींचीं अनेक प्रकरणें आहेत. रामायणाचीं तीनच कांडें प्रसिद्ध आहेत. बाकीचीं अद्याप उपलब्ध नाहींत. तसेंच उद्धवसुत केशवशिष्य लक्ष्मणकृत ओवीबद्ध चरित्रांत जागोजागीं समर्थांचीं पदें व अभंग दिलेले आहेत. त्यांपैकीं बराच भाग गोंधळेकरांच्या ग्रंथांत नाहीं. येणेप्रमाणें अद्यापि बरींच प्रकरणें सांपडावयाचीं आहेत. तेव्हां जेवढीं सध्यां सांपडलीं आहेत व जेवढीं निरनिराळ्या आवृत्त्यांतून प्रसिद्धी पावलीं आहेत, तेवढ्यासंबंधानें मला काय म्हणावयाचें आहे तें सांगतों.

सनातनधर्म संस्थापक दासबोधाची रचना

समर्थांचा सर्वांत मोठा व मान्य ग्रंथ म्हटला म्हणजे दासबोध हा होय. ह्याचे वीस दशक व दोनशें समास आहेत (दशक २०, समास १०). हा ग्रंथ दहा पंधरा वर्षें बनत बनत शके १५८१ त म्हणजे इ. स. १६६० त संपूर्ण झाला (दासबोध, दशक ६, समास ४). शके १५७८ त म्हणजे इ. स. १६५६ त वामनपंडित समर्थांच्या भेटीस आले त्यावेळीं दासबोध चालला होता. दासांवरती वामनानें स्तोत्र केलें त्यांत, ' ग्रंथाश्चापि जगत्प्रबोधपटवः संसारमाशंसिनः ' असें म्हटलें आहे (चरित्र, पृष्ठ ३०४). इंदुराहून उद्धव गोसावी यानें समर्थांस १६५५ त पत्र पाठविलें त्यांत-

मला वाटतें, अंतरी त्वा वसावें, ।
तुझ्या दासबोधासि त्वा बोधवावें; ॥

हें श्लोकार्ध आहे (चरित्र, पृष्ठ ३०५). इ. स. १६५९ च्या डिसेंबरांत अफजलखानाचा वध करून शिवाजी रामदासांस भेटण्यास आले. त्या दिवशीं अठराव्या दशकाचा उत्तमपुरुषनिरूपण नांवाचा सहावा समास समर्थांनीं संपूर्ण केला (चरित्र, पृष्ठ १७३). बखरींत विकारी संवत्सराला शकाचा १५७१ आंकडा चुकून पडला आहे. तेथें खरा आंकडा १५८१ पाहिजे. इ. स. १६४९त समर्थांनीं शिवाजीस दासबोधांतील तेराव्या दशकांतला लघुबोध नांवाचा सहावा समास सांगितला (चरित्र, पृष्ठ १२६). समर्थ शके १५६६ त, तारण संवत्सरीं कृष्णातीरास आले (चरित्र, पृष्ठ ७०). चरित्रांत तारण संवत्सराला १५५६ शक जोडला आहे तो चूक आहे. तारण संवत्सरीं शिवाजीचें वयमान सतरा वर्षांचें होतें म्हणून पुढें दुसऱ्या ओळींतच म्हटलें आहे (चरित्र, पृष्ठ ७०, पंक्ति ३). त्यावरून १५६६ हाच शक खरा ठरतो. शिवाय शके १५५४ अंगिरा नाम संवत्सरीं समर्थ पंचवटीहून पृथ्वीपर्यटणास निघाले, ते बरोबर बारा वर्षांनीं परत आले, असें बखरींत म्हटलें असल्यामुळें, समर्थांचा कृष्णातीरीं येण्याचा १५६६ हाच शक होय हें निश्चित आहे. शके १५६६त समर्थांचें वयमान ३६ होतें. ह्या सुमारास दासबोधाला प्रारंभ होऊन त्याची समाप्ति शके १५८१त झाली. इ. स. १६५९ च्या डिसेंबरांत ज्या अर्थी अठरावा समास चालला होता त्या अर्थी शके १५८१च्या फाल्गुनांत म्हणजे इ. स. १६६० च्या मार्च-एप्रिलांत विसावा दशक संपून सबंध ग्रंथाची उजळणी व तपासणी त्यांच महिन्यांत झाली असावी. ही तपासणी करतांना सहाव्या दशकांतल्या चवथ्या समासांत गतकलीची गणना ४७६० समर्थांनीं केली. येणेंप्रमाणें ह्या ग्रंथाची रचना बरोबर पंधरा वर्षें चालली होती. ग्रंथसमाप्तिसमयीं समर्थांची पन्नाशी उलटून गेली होती, व शिवाजीमहाराज ऐन बत्तिशींत आले होते. तिशीपस्तिशीच्या भर ज्वानींत असतांना समर्थांनीं ह्या ग्रंथास प्रारंभ केला आणि पन्नाशीच्या पोक्त अशा अनुभवपूर्ण अमदानींत त्याची समाप्ति केली.

शके १५५४ म्हणजे इ. स. १६३२ ह्या सालीं नाशकांतील पंचवटींत असतांना, यवनांनीं आक्रमिलेल्या महाराष्ट्राचा उद्धार व सनातनधर्माची स्थापना करण्याचा संकल्प समर्थांनीं केला होता. त्या संकल्पाचा मूर्तिमंत अवतार हा दासबोध ग्रंथ होय. निर्माण होत असतांना, अनेक लहानथोर स्त्रियांनीं व पुरुषांनीं हा परम आस्थेनें ऐकिला; व संपूर्ण झाल्यावर ह्याच्या प्रती सर्व महाराष्ट्रभर पसरल्या. मुद्रणकला ह्या देशांत सुरूं झाल्यापासून तर ह्याच्या अनेक आवृत्त्या निघाल्या. हा जुन्या चालीच्या लोकांना अत्यंत प्रिय आहे हें प्रसिद्धच आहे. परंतु नव्या चालीच्या सुधारकांना व उद्धारकांनाहि ह्या ग्रंथानें मोहून टाकिलें आहे.

असा हा दासबोध ग्रंथ आहे तरी काय ? हा काव्य आहे कीं इतिहास आहे कीं वेदान्त आहे ? ह्याचें प्रमेय काय ? ह्याचें प्रयोजन काय ? ह्याचें फल काय ? हा वाचिल्यापासून वाचकांच्या मनांत भावना कोणती होते ? वगैरे अनेक प्रश्न ह्या ग्रंथा-संबंधानें मनांत येण्यासारखे आहेत. त्यांचीं उत्तरें देण्याचा अल्प प्रयत्न पुढें करतों.

रामदासकृत कवित्वाची व्याख्या

एकंदर विचार केला असतां, दासबोध हा ग्रंथ काव्य नाहीं. ह्या ग्रंथाचें रूप पद्य आहे, परंतु ह्यांत जे विषय निरूपिले आहेत ते काव्याचे विषय नाहींत. गीता, अमरकोश, वैय्यासिकन्यायमाला, ज्ञानेश्वरी, अनुभवामृत, यथार्थदीपिका, अष्टांगहृदय, लीलावती हे ग्रंथ पद्य असूनहि ज्याप्रमाणें काव्य नाहींत, त्याप्रमाणेंच दासबोध हा ग्रंथ काव्य नाहीं. स्वतः खुद्द रामदास आपल्याला कवि म्हणवितात. परंतु दासांच्या कवि ह्या शब्दाचा अर्थ फार व्यापक आहे. कवि गद्य व पद्य ग्रंथ लिहि-णारे असून नाना शास्त्रांचे ऊहापोहहि करणारे असतात; इतकेंच नव्हे, तर ते प्रासा-दिक असावे लागतात, असें दासांनीं पहिल्या दशकाच्या सातव्या समासांत म्हटलें आहे. धीट व पाठ ह्या सदराखालीं जी कविता येते तें खरें कवित्व नव्हे, तर निव्वळ करमणूक होय, असें दासांचें म्हणणें आहे.

नेमकेंच बोलणें, । तात्काळची प्रतिवचन देणें, ।
शीघ्रचि कवित्व करणें. । हें ज्ञान नव्हे. ॥ (५-५-२६)
नाना गती, नाना व्युत्पत्ती, । नाना मती, नाना स्फूर्ती, ।
नाना धारणा, नाना धृती, । या नांव कवित्व. ॥
शंका, आशंका, प्रत्यंतरें, । नाना वाक्यें शास्त्राधारें, ।
तुटे संशय निर्धारें । निर्धारितां. ॥
नाना प्रसंग, नाना विचार, । नाना तत्त्वचर्चासार, ।
नाना योग, नाना विवर, । या नांव कवित्व. ॥
नाना साधनें, पुरश्चरणें, । नाना तपें, तीर्थाटणें, ।
नाना संदेह फेडणें, । या नांव कवित्व. ॥
जेणें अनुताप उपजे, । जेणें लौकिक लाजे, ।
जेणें ज्ञान उपजे, । या नांव कवित्व. ॥
जेणें सद्वस्तु भासे, । जेणें भास हा निरसे, ।
जेणें भिन्नत्व नासे, । या नांव कवित्व. ॥ (१४-३-४४ ते ५१).

दासांची कवित्वाची व्याख्या ही अशी आहे. विषय, संदेह, संगति, पूर्वपक्ष व सिद्धांत, हे जे शास्त्राचे पांच अवयव ते दासांच्या कवित्वांत असावे लागतात. तत्त्व-चर्चा, योग, विवरण, ज्या ग्रंथांत असतील तो कवित्वाचा ग्रंथ होय. कवित्व ग्रंथ-

रूपानेंच असलें पाहिजे असें नाहीं. कवित्व आचरणरूपहि असूं शकतें. साधनें, पुरश्चरणें, तपें, तीर्थाटणें, धैर्य, शौर्य, धृति, ह्या वस्तुदेखील कवित्वांतच मोडतात. सारांश, ज्या ज्या वस्तूंत, विचारांत व आचारांत ईश्वरी अंश आहे, तें सर्व, दासांच्या मतें, कवित्व होय. आधुनिक भाषेमध्यें ह्या म्हणण्याचा अर्थ असा होतो कीं, जें जें म्हणून कांहीं प्रतिभासंपन्न असतें तें सर्व, कवित्वाखालीं मोडतें. दासांची कवित्वाची कल्पना म्हणजे निव्वळ सध्यांच्या काळच्या प्रतिभेची कल्पना होय. सर्व जग ह्या प्रतिभावान् पुरुषांच्या व स्त्रियांच्या पुढारपणाखालीं चालतें हें तर आपण प्रत्यक्ष पाहतों. हाच विचार लक्षांत घेऊन, दासांनीं कवींना म्हणजे प्रतिभावान् व्यक्तींना, पुरुषार्थाचें वैभव, स्वधर्माचा आश्रय, अध्यात्मरत्नांच्या खाणी, योग्यांचा गुप्त पंथ, मोक्षाचे पडिभर, भाग्याचें भूषण, सुखाचे संरक्षक, स्वदेशाचे उद्धारक, वगैरे नाना तऱ्हेच्या प्रशंसेनें आळविलें आहे. ह्या दृष्टीनें पाहिलें म्हणजे समर्थांचा दासबोध हा प्रतिभासंपन्न ग्रंथ आहे हें स्पष्ट होतें.

दासबोध काव्य आहे काय ?

आतां यद्यपि हा ग्रंथ प्रतिभासंपन्न आहे तत्रापि तो, आपण ज्याला काव्य म्हणून आधुनिक परिभाषेंत म्हणतों, तें नाहीं. आधुनिक भाषेंत काव्य ह्या संज्ञेनें ज्या ग्रंथांना आपण ओळखतों ते सर्वस्वीं रसात्मक असावे लागतात. संसारांतील कोणता तरी एक विषय किंवा प्रसंग घेऊन तो नव रसांनीं रुचिर करून दाखविण्याचें काम कवींचें होय. कवींच्या ग्रंथांत संदेह, संगति, पूर्वपक्ष, सिद्धांत वगैरे शास्त्रीय परंपरा आणणें म्हणजे काव्याच्या आत्म्याचा शतधा भंग करण्यासारखें आहे. दास-बोधांत, तर, ही परंपरा अथपासून इतिपर्यंत आहे. अर्थात् दासबोध हा ग्रंथ, आधुनिक परिभाषेंतील, काव्य नाहीं. दासांचे रामायण वगैरे ग्रंथ काव्य आहेत. ते रसात्मक आहेत. त्यांचा विषय कांहीं तरी एकच प्रसंग आहे. तसा दासबोधाचा नाहीं. दासबोधांत वेदान्ताचें गूढ निरूपण आहे, पढतमूर्खांचें वर्णन आहे, कीर्तन कसें करावें तें सांगितलें आहे, राजनीति आहे, व्यवहारनीति आहे, चातुर्यनिरूपण आहे, कवि, तापसी, योद्धे, गुरु, शिष्य, वगैरेंचीं विस्तृत वर्णनें आहेत, असे नाना प्रकार आहेत. ह्या सर्व प्रकारांना परमार्थतः काव्यांत गोवणें म्हणजे अपरंपार अरसिकतेचें प्रदर्शन करणें होय.

समर्थांच्या दासबोधाची गणना काव्यग्रंथांत लोक करतात त्याला एक कारण आहे. तें हें कीं वर्णनाच्या व विवेचनाच्या भरांत दृष्टान्तांची ह्या ग्रंथांत रेलचेल उडविलेली आहे. परंतु दासबोधांत ह्या दृष्टान्तांची योजना काव्यग्रंथांतल्याप्रमाणें चमत्कृति उत्पादिण्याकरितां केलेली नाहीं. दृष्टान्त देण्यांत त्या त्या विषयाचा परि-पोष करणें हाच एक मतलब आहे. शिवाय काव्यांत ह्या ग्रंथाची गणना होण्यास

दुसरेंहि एक कारण झालेलें आहे. तें हें कीं, ग्रंथ वक्तृत्वप्रचुर आहे. गचाळ किंवा मिळमिळीत असें एकहि वाक्य ह्या ग्रंथांत नाहीं. बोलण्याचा ओघ इतका अप्रतिबद्ध आहे, शब्दांची योजना इतकी समर्पक आहे, आणि विवेचनाची सरणी इतकी चित्तवेधक आहे, कीं सिद्धान्तविषय गहन असूनहि तो काव्याप्रमाणें आल्हादकारक वाटतो. आणि इतकें असून, भाषा अत्यंत साधी, सोपी व सरळ आहे. ह्या दिसावयाला सहज, परंतु बहुत मेहनतीनें कमविलेल्या, वक्तृत्वाला भुलून वाचकवर्गाला आपण एखादें काव्यच वाचतों आहों कीं काय असा भास होतो. अत्यंत गहन असे शास्त्रीय ग्रंथ अशा वक्तृत्वपूर्ण व कवित्वसदृश भाषेंत लिहिलेले निरनिराळ्या भाषांत कांहीं कांहीं आहेत. हंबोल्ट्चा विश्वावरील 'Cosmos' नांवाचा ग्रंथ, किंवा क्रिस्टोफर नॉर्थचे भूगर्भावरील ग्रंथ, किंवा व्होल्टेअरचा 'चौदाव्या लुईचें मन्वंतर' नांवाचा इतिहासावरील ग्रंथ, दासकृत बोधाच्याच कमजास्त मासल्याचे आहेत. आतां एवढें खरें आहे कीं, ह्या तिन्हीं यूरोपियन ग्रंथकारांना दासांच्या लेखनपद्धतींतील मोहकपणाची बरोबरी जशी करतां यावी तशी आली नाहीं. हे तिघेहि उच्च प्रतीच्या प्रतिभेचे मालक होते. तिघांनींहि त्या त्या शास्त्रीय विचारांचें प्रदर्शन मोहक व काव्यप्रचुर अशा पदपद्धतीनें केलें आहे. म्हणून, तेवढ्यावरून त्या त्या ग्रंथांचे कर्ते ह्या नात्यानें त्यांस कोणी कवि ही संज्ञा लावीत नाहींत. ज्या शब्दरचनेनें व पदपद्धतीनें कवींची प्रतिभा उदय पावते त्या रचनेचें व पद्धतीचें रूप ह्या ग्रंथकारांच्या लेखनपद्धतीनें स्वीकारिलेलें आहे. पण, आंतील विषय शुद्ध शास्त्रीय असेच आहेत.

हाच न्याय रामदासांनाहि लागूं केला पाहिजे. रामायण ह्या काव्याचा कर्ता ह्या नात्यानें रामदासांची गणना कवींत करणें भाग पडतें. परंतु दासबोध ह्या ग्रंथाच्या कर्तृत्वाच्या दृष्टीनें पहातां कवि ही संज्ञा समर्थांस लावणें उचित होणार नाहीं. कवि म्हणजे प्रतिभावान् स्त्री किंवा पुरुष,– मग तो कवि असो, गणिती असो, वेदान्ती असो, योद्धा असो, चित्रकार असो, साधु असो, दाता असो किंवा शिल्पी असो—, ह्या समर्थांच्या लक्षणानें पाहिलें म्हणजे समर्थांना कवि ही संज्ञा खुशाल बिनहरकत लावावी. दासबोधाचा कर्ता ह्या नात्यानें, मात्र, समर्थ काव्यें करणारे कवि आहेत असें म्हणणें सर्वथा अनुपपन्न होईल. समर्थ प्रासादिक उपदेशग्रंथाचे कर्ते आहेत. ग्रंथ म्हणजे काय ह्याचें निरूपण दास सातव्या दशकाच्या नवव्या समासांत करतात. तेथें ग्रंथत्वाचीं जीं लक्षणें दिलीं आहेत तींच कवित्वाचींहि लक्षणें आहेत.

कवींचे प्रकार व श्री. पांगारकर

समर्थांनीं निरूपिलेल्या कवित्वाची व्यापकता यथास्थित ध्यानांत न आल्यामुळें, रा. रा. पांगारकरांसारख्या कित्येक आधुनिक वक्त्यांनीं व महाराष्ट्रकवितेचा आस्था-

पूर्वक अभ्यास करणाऱ्यांनीं मुकुंदराजाचें परमामृत, ज्ञानदेवाची ज्ञानेश्वरी, रामदासाचा दासबोध, वगैरे शास्त्रीय ग्रंथ कवितेच्या सदरांत काढिले आहेत. दासांनीं धीट, पाठ व प्रासादिक असे कवींचे तीन वर्ग केलेले आहेत. हें पांगारकरांप्रमाणें मलाहि मान्य आहे. मेलेल्या मांजरावर कविता करणारा कौपर, किंवा तेरड्याच्या फुलांवर कविता करणारा वर्ड्स्वर्थ, किंवा बाभळीच्या झाडावर अन्योक्ति रचणारा कृष्णशास्त्री, हे धीट कवी होत. ह्या कवींच्या कवितेपासून मनाला चमत्कृति होते. गट्टूलालासारखे शीघ्रकवि, किंवा प्रासयमकांच्या योजनेंत गुंतणारे वामनमयूरभारव्यादि कवी, किंवा पोप, जान्सन वगैरे अनुकरणप्रिय व भाषांतऱ्ये कवी, हे पाठ कवी होत. ह्या कवींची कांहीं कविता बळेंज हटानें रचिलेली असून, तींत तादृश चमत्कृति करण्याची शक्ति नसते. दोरीवरून चालणारा हंडीबाग जें कौतुक हृदयांत उत्पन्न करतो तेंच ह्या कवींच्या शब्दालंकारांपासून उत्पन्न होतें.

ह्या दोन वर्गांहून भिन्न असा जो तिसरा वर्ग तो प्रासादिक ह्या नांवानें दासांनीं वर्णिला आहे. व्यवहार शिकविणारा, अनिष्टापासून रक्षण करणारा व ममतेनें उपदेश करणारा, असा हा तिसरा वर्ग आहे. ह्यांत व्यास, वाल्मीकि, मुक्तेश्वर, कालिदास, शेक्स्पीयर, लोपड, व्हीगा वगैरे कवींची गणना होते. दासांच्या प्रासादिक प्रतिभावान् लोकांतच हा कविवर्ग मोडतो. ह्यांना लौकिकभाषेंत महाकवि ही संज्ञा आहे. ह्या महाकाव्यें निर्मिणाऱ्या कविवर्गाबरोबर तपस्वी, योद्धे, शास्त्रज्ञ वगैरे महाप्रतिभावान् लोकांची गणना समर्थ करतात. व त्यांना कवी असें नांव देतात. राष्ट्रोद्धारक इतर पुरुषांच्या बरोबरीनें महाकवींची गणना समर्थ करतात तें यथायोग्य आहे. ह्या कवींचें सामर्थ्य तसेंच अलौकिक असतें. परंतु ह्या महाकवींच्या कोटींत विद्यावीर, रणवीर, सभावीर, शास्त्रवीर, वगैरे वीरांची, कवी ही जी संज्ञा देऊन, समर्थ गणना करितात ती रा० रा० पांगारकरादि गृहस्थांना बुचकळ्यांत पाडते. एकाच शब्दांत अनेक अर्थांचा समावेश समर्थ करीत आहेत. तो वीर ह्या दृष्टीनें, उद्धारक ह्या दृष्टीनें, श्रेष्ठ पुढारी ह्या दृष्टीनें ते करीत आहेत; काव्यें करणारे कवी ह्या दृष्टीनें ते करीत नाहींत. समर्थ कोणत्या अर्थानें बोलत आहेत हें लक्ष्यांत न घेतल्यामुळें ज्ञानेश्वरी, दासबोध वगैरे ग्रंथ काव्यें आहेत अशी समजूत झाल्यामुळें, व हे ग्रंथ भक्तिमार्गाचे आहेत हें स्पष्ट दिसत असल्यामुळें, प्रासादिक कवी म्हणजे यूरोपियन कवीहून अत्यंत भिन्न असे भक्तिमार्गी कवी होत, असा एक सिद्धांत पांगारकरांनीं महाराष्ट्रकाव्योदधींत मज्जन करून घाईघाईनें शोधून काढिला आहे. ह्या सिद्धान्तांत ते असेंहि म्हणतात कीं, यूरोपियन कवींत भक्तिमार्गी कवी नाहींत; व महाराष्ट्रकवींत सर्व कवी भक्तिमार्गी आहेत; तेव्हां भक्तिमार्गी जेवढे कवि तेवढेच प्रासादिक कवी होत; अर्थात् इतर देशांतील कवी धीट किंवा पाठ ह्या दोन वर्गांतील कोणत्या तरी वर्गांत मोडतात. वर जें विवेचन केलें आहे, त्यावरून हा चतुर्विध कोटिक्रम भ्रममूलक आहे हें अंशतः

दिसतेंच आहे. तरी ह्या भ्रमाचें पूर्ण उन्मूलन करण्याकरितां यूरोपांतील कवींकडे थोडासा वळतों.

युरोपांतील कवि

समर्थांनीं दासबोधाच्या चवदाव्या दशकाच्या तिसऱ्या समासांत कवित्वाचें लक्षण केलें आहे. त्यांत जी कविता केवळ शृंगारिक, हास्यरसप्रचुर, विनोदी, कुटिल, असेल ती अधम होय, असें ते म्हणतात. ह्या व्यतिरिक्त बाकीची कविता, दासांच्या मतें, प्रासादिक होय. ज्या कवितेपासून संसाराचा पोकळपणा कळेल, विरक्तीचा उदय होईल व भक्तीचा पवाडा वाढेल, ती कविता दासांनीं प्रासादिक म्हणून ठरविली आहे. ह्या न्यायानें पहातां बरीच युरोपियन कविता प्रासादिक या सदराखालीं येईल. चॉसर्चें बोडकीचें काव्य, बट्लर्चें ह्यूडब्रास, शेरिडन्चीं शृंगारिक नाटकें, वगैरे कुटिल काव्यें समर्थांनीं वर्णिलेल्या बाष्कळ काव्यांत मोडतात. ह्या काव्यांपासून मनाच्या रंगेल वृत्तीला करमणूक होते. परंतु ह्या नरदेहाचें सार्थक होण्याचें साधन ह्या काव्यांत नाहीं. अशी कुटिल कविता यूरोपियन सारस्वतांत कांहीं आहे.

आतां उदात्त भावनांचा उदय करून व मलिन उपाधींचे कोश फाडून जीवाला शिवाची ओळख करून देणारीं काव्यें हि ह्या सारस्वतांत थोडीं नाहींत. शेक्सपियरच्या बहुतेक सर्व नाटकांत उदात्त भावनांचीच चिकित्सा केलेली आहे. टायमनांत संपत्तीचें चंचलत्व, आथेलोंत मत्सराचें नैर्घृण्य व हॅम्लेटांत असंतोषवृत्तीची दुष्टता कवीनें अत्युत्कट चातुर्यानें दाखविलेली आहे. गेटीचें सर्वांत उत्कृष्ट प्रकरण जें डॉक्टर फास्टस त्याचा मुख्य आणि एकच हेतू संसाराची असारता, मायेचा मोह, ईश्वराची वत्सलता, भक्तीचें बळ, व धर्माची सनातनता स्पष्ट करण्याचा आहे. शिलर, रासीन, ह्यूगो, टेनिसन, वगैरे अनेक प्रासादिक कवींचा हेतु सर्वोत्तम जो परात्पर आत्मा त्याच्याकडे मनुष्यांचीं मनें वळविण्याचाच आहे, हेंहि विस्तार केला असतां दाखवून देतां येईल. परंतु केवळ धर्माचे व भक्तीचेच पवाडे गाणारे उत्कृष्ट कवि हवे असल्यास तेहि यूरोपांत झालेले आहेत. मिल्टनची येथून तेथून सर्व कविता भक्तिप्रचुर आहे. Paradise Lost, Paradise Regained, Samsom, व इतर किरकोळ स्तोत्रें बायबलांतील कित्येक प्रसंगांवर मिल्टन्नें रचिलीं. दुष्ट लोक रौरव नरकांत कसे पडतात हें डांटीनें Inferno त वर्णिलें. शिवाय आपल्या इकडील अभंग, भूपाळ्या, वगैरेंसारखी ईश्वरस्तुतिपर कविता यूरोपांतील प्रत्येक भाषेंत हवी तितकी आहे. येणेप्रमाणें भक्तिपर कविता नाहीं असें सारस्वत बहुधा कोठेंच सांपडावयाचें नाहीं.

भक्तिपर कविता एकट्या महाराष्ट्रांतच सांपडेल असें विधान करणें व्यर्थ आहे. तसेंच सर्व महाराष्ट्रकवि केवळ भक्तिपरच आहेत असेंहि नाहीं. मुक्तेश्वराच्या भारताला,

रघुनाथपंडिताच्या नलदमयंतीला, रामजोशाच्या फटक्यांना, होनाजीच्या लावण्यांना व शाहीरांच्या पवाड्यांना भक्तिपर कसें म्हणावयाचें ? इतर राष्ट्राप्रमाणें महाराष्ट्रांतहि भक्तिपर कवींप्रमाणें अन्यविषयपर कवी आहेत. हे अन्यविषयपर कवी केवळ धीट किंवा पाठ नसून प्रासादिक आहेत. सारांश, इकडील कवींची कोटी इतर राष्ट्रांतल्या कवींच्याहून भिन्न नसून, त्यांचीं लक्षणें इकडील कवींस यथास्थित लागू पडतात. भेद कवींत नाहीं; भेद दासांच्या विवेचनांत नाहीं; भेद रा. रा. पांगारकरांच्या कल्पनेंत आहे. नाटकादि रचना आपल्याइकडील कवींनीं केली नाहीं, ह्यामुळें जें व्यंग भासतें त्यानें हा भेद उत्पन्न होतो. खेरीज, महाराष्ट्र सारस्वताची, अभ्यासाभावामुळें, परीक्षा करण्यास सर्वथा अनधिकारी अशा विल्सनप्रभृति परकीयांनीं, मराठी कवी अमुक कोटींतील आहेत व तमुक कोटींतील नाहींत अशीं, जीं निरर्गल विधानें ठोकून दिलीं आहेत त्यांचाहि परिणाम इकडील रसिकांच्या मनावर न कळत होतो. ह्या आगंतुक आणि अपक्व संस्कारांस एकीकडे सारून आणि पाश्चात्त्य व पौर्वात्य सारस्वताचा स्वबुद्धीनें विचार करून, महाराष्ट्र सारस्वतासंबंधानें जें कांहीं बोलायचें तें बोललें पाहिजे.

दासबोधाचा प्रतिपाद्य विषय व उद्देश

असो. वर्तमानकालीन परिभाषेंत ज्याला काव्य म्हणून म्हणतात तें जर दासबोध नाहीं, तर तो आहे तरी काय ? आतां दासबोध आहे काय हा प्रश्न नव्यानेंच निघाला आहे असें नाहीं. हा प्रश्न खुद्द रामदासांच्या वेळींहि उद्भवला होता (कुबडी, दशक १, ओवी ५). कोणी ह्याला समुच्चयवादाचा ग्रंथ म्हणूं लागले; कोणी ह्यांत त्रिकांडनिरूपण आहे म्हणून प्रतिपादिलें; व कोणाला हा ग्रंथ केवळ व्यवहारज्ञान शिकवितो असेंहि वाटलें. आणि हीं तिन्हीं म्हणणीं खरीं होतीं. ह्या ग्रंथांत ज्ञानाचें, कर्माचें, भक्तीचें व व्यवहाराचें निरूपण आहे. केवळ वेदान्ती जे होते त्यांना ह्यांत ज्ञाननिरूपण दिसलें; केवळ कर्ममार्गी लोकांना ह्यांत कर्माचा ऊहापोह सांपडला; केवळ भक्तिमार्गाच्या चहात्यांना ह्यांत भक्तीचे पवाडे आढळले; आणि नुसत्या व्यवहाराकडेच ज्यांची दृष्टी होती त्यांना हा ग्रंथ व्यवहारनीतीचा असावा असें वाटलें. ही लोकांची दृष्टी झाली. आतां स्वतः ग्रंथकाराची दृष्टी काय होती तें पाहूं. आपल्या ग्रंथाचें रूप काय हें स्वतः ग्रंथकारानें दासबोधाच्या पहिल्या दशकाच्या पहिल्या समासांत सांगितलें आहे.

(१) नाना किंतू निवारून, नाना संशय छेदून, नाना आशंका फेडून, भक्तीचा, वैराग्याचा, मोक्षप्राप्तीचा, आत्मज्ञानाचा, उपदेश करण्याचा ह्या ग्रंथाचा मुख्य हेतू आहे.

(२) ह्या हेतूच्या अनुषंगानें, नाना मतें, कवित्व, चातुर्य, राजकारण, गुरुत्व, शिष्यत्व, वगैरे व्यवहारज्ञानाचें निरूपण केलेलें आहे.

(३) ह्या निरूपणाच्या निदिध्यासानें अज्ञान नष्ट होऊन बद्ध मुमुक्षू होतात, मुमुक्षूंच्या अंगीं वैराग्य बाणतें, अवलक्षणी मनुष्यें सुलक्षणी होतात, धूर्त व विचक्षण समयज्ञ बनतात, आळशी साक्षेपी होतात, व मूर्खांस दक्षता प्राप्त होते. अशी ह्या ग्रंथाची त्रिविध रचना आहे. मोक्षदर्शन हा मुख्य हेतू, उपदेश हें त्याचें मुख्य साधन, व मुमुक्षा हें मुख्य फळ, अशी ह्या ग्रंथाची त्रिविध घटना आहे. ही घटना स्पष्ट ध्यानांत येण्याकरितां पृथक्करण करून, विस्तारानें लिहिणें जरूर आहे.

ह्या अखिल जगतामध्यें, ह्या सर्व जंगमामध्यें नित्य वस्तू एक आहे. ती शुद्ध ज्ञान ही होय (दशक ५, समास ६). शुद्ध विमळ ज्ञानालाच स्वरूपज्ञान म्हणतात. हें शुद्ध ज्ञान पदार्थविज्ञानाहून निराळें आहे. पदार्थविज्ञानाला समर्थ बहुधाज्ञान म्हणतात व त्याचें निरूपण त्यांनीं पांचव्या दशकाच्या पांचव्या समासांत केलें आहे. त्यांत शास्त्र किंवा विज्ञान म्हणून ज्याला यूरोपियन लोक म्हणतात त्या सर्वांचा समावेश होतो. पशुज्ञान, रोगज्ञान, ओषधिज्ञान, यंत्रज्ञान, धातुज्ञान, शस्त्रज्ञान, वस्त्र-ज्ञान, गीतज्ञान, तर्कज्ञान, शब्दज्ञान, अंतर्ज्ञान ह्या सर्व वर्गीकरणात्मक विज्ञानांचा अंतर्भाव त्यांत होतो. हीं सर्व विज्ञानें म्हणजे मायेनें उत्पन्न केलेल्या दृश्य पसाऱ्याचें केवळ वर्गीकरण आहेत, ह्यापेक्षां जास्त कांहीं नाहींत. हें शुद्ध ज्ञान नव्हे, हें तत्त्वज्ञान नव्हे, ही सर्व अविद्या आहे, माया आहे, मोह आहे. ही केवळ अनित्य वस्तूंची याद आहे. ह्या अनित्य सृष्टीच्या पलीकडील जें ज्ञान त्याला नित्यज्ञान म्हणतात. ह्यालाच आत्मज्ञान असेंहि नांव आहे.

नित्य असा जो आत्मा त्याचें ज्ञान व अनित्य असे जे पदार्थ त्यांचें विज्ञान ह्यालाच नित्यानित्यविवेक अशी संज्ञा आहे. क्षेत्री आणि क्षेत्र किंवा द्रष्टा आणि दृश्य किंवा नित्य आणि अनित्य ह्यांच्या संबंधानें जो विवेक तो सर्व ज्ञानाचा मुकुटमणि होय. क्षेत्री, द्रष्टा अथवा आत्मा हा सत्, शाश्वत, निरुपाधिक व निर्विकार आहे. क्षेत्र, दृश्य अथवा देह असत्, अशाश्वत, सोपाधिक व सविकार आहे (६, ५). आत्मा सूक्ष्म परंतु देह स्थूल आहे. आत्मा स्वयंभू, व व माया परभू आहे. माया फुटते, ब्रह्म फुटत नाहीं. असा हा आत्मा व अनात्मा ह्यांत अखंड भेद आहे. परंतु सर्वांत मुख्य भेद म्हटला म्हणजे आत्मा स्वतंत्र व स्वाधीन आहे. आणि माया परतंत्र व पराधीन आहे.

ह्या स्वतंत्र आत्म्याचा परतंत्र मायेशीं संयोग झाला, आत्म्याला मायेचा लेप झाला, आत्मा मायेनें दिग्ध झाला, म्हणजे तो देही होतो. आत्म्याला मायेचा देह म्हणजे लेप बसला म्हणजे मायेच्या विषानें दिग्ध असा हा आत्मा सुखदुःखाचा भोक्ता होतो (दशक १३, समास ९). आतांपर्यंतचा हा स्वतंत्र आत्मा ह्यापुढें बद्ध होतो.

मायेचें हें बंधन म्हणजेच नरदेहाचा जन्म होय. आत्म्याला नरदेह प्राप्त झाला कीं त्याच्या संसाराला व तापत्रयाला प्रारंभ झाला. ह्या तापत्रयाचें तपशीलवार वर्णन

दासांनीं बोधाच्या तिसऱ्या दशकाच्या दाही समासांत जन्मापासून मृत्यूपर्यंत केलें आहे. ह्या तापत्रयाचें एकच कारण ही त्रिगुणात्मक माया होय. सत्व, रज आणि तम ह्यांच्या न्यूनाधिक्यानें भ्रांत होऊन ह्या नरदेहाच्या ठिकाणीं अहंकाराचा प्रादुर्भाव होतो. मी असा आहे, मी तसा आहे, मी यंव केलें मी त्यंव केलें, मी शहाणा, मी कर्तृत्ववान्, मी दुसऱ्यांना मारीन, छळीन, अशा वेड्यावाकड्या भावना होऊन मनुष्य ह्या तापत्रयांत व संसारांत मग्न होऊन जातो. संसाराच्या मोहानें व बंधनानें डोळ्यावर धुंदी येऊन आपण कोण, हें हा देही विसरून जातो व मूर्खांच्या व पढतमूर्खांच्या सदरांत गणण्यास सर्वथा योग्य होतो (दशक दुसरा). मूर्खत्वाचीं व अज्ञत्वाचीं हीं लक्षणें आंगीं बाणलीं म्हणजे मग ह्याच्या दुःखाला काय पारावार आहे ? ह्यानें दुसऱ्यांना छळावें व दुसऱ्यांनीं ह्याला छळावें असा क्रम सुरू होतो. हा असा क्रम कां चालतो, दुःख कां होतें, दुःख हेंच सुख कां वाटतें, हें कळेनासें होऊन, प्राणी भांबावून जातो. कालांतरानें त्याला ह्या देहाचा व संसाराचा वीट येतो, द्वेष होतो आणि तिटकारा वाटतो. नरदेह खोटा, ह्याच्या पायीं दुःख हें ठेवलेलें, अशी त्याची खात्री होते. सत्व, रज आणि तम ह्यापैकीं शेवटल्याचें अतिरेकानें सेवन केल्यामुळें आपली ही अशी दशा झाली, हें ह्या प्राण्याला कळत नाहीं; व जो नरदेह वाईटाप्रमाणें चांगल्याहि कामाला लावतां येण्याची शक्यता व संभव असतो त्याची तो व्यर्थ निंदा करूं लागतो. आपल्याला नाचतां येईना हें विसरून तो सर्व दोष अंगणालाच लावूं पहातो. आपण बिघडून ज्याच्या आश्रयानें आपण राहिलों त्या देहावर हा करंटा अपेशाचें सर्व खापर फोडूं जातो.

अशा ह्या गृहकलहाच्या संकटसमयीं प्राण्याला सद्गुरू भेटला तर त्याचें भाग्य उदेलें समजावें; न भेटला तर त्याचा पाय संसृतीच्या खोल पाण्यांत जास्तच जातो व नरदेहाचें सार्थक्य न करतां तो ह्या महोदधींत बुडून निरयगतीचा मार्ग धरतो.

येथें समर्थांच्या ग्रंथाची प्राथमिक भूमिका संपली. संसार हा दुःखमय आहे, आत्मा देही झाला, संसारी झाला म्हणजे तो तापत्रयाचा धनी होतो, हा जो सार्वत्रिक अनुभव आहे, त्याचें येथपर्यंत निरूपण झालें. हें निरूपण वेदान्ताच्या सर्व ग्रंथांत जसें आलेलें आहे; तसेंच तें समर्थांच्याहि ग्रंथांत निरूपिलें आहे. ह्यापुढीलहि निरूपण म्हणजे दुःखापासून सुटका कशी व्हावयाची ह्याचें निरूपण, समर्थांच्या पूर्वी झालेल्या संस्कृत व प्राकृत अशा अनेक ग्रंथांत केलेलें प्रसिद्ध आहे. त्याचाच अनुवाद समर्थांनीं दासबोधांत केलेला आहे. परंतु दासबोधांत विशेष हा आहे कीं, महाराष्ट्राच्या तत्कालीन स्थितीला ज्याप्रकारचें निरूपण पाहिजे होतें त्याप्रकारचें तें ह्या ग्रंथांत आहे. गीतादि ग्रंथांत केलेलें निरूपण सर्व कालीं सर्व देशांना लागूं पडणारें

असून सूत्रवत् त्रोटक आहे. तसा प्रकार दासबोधाचा नाहीं. दासबोधांत गीतेंतील निरूपण तत्कालीन महाराष्ट्राला अनुलक्षून स्पष्ट भाषेंत विस्तृत केलेलें आहे.

दासबोधाचें वैशिष्ट्य

संसारांतील तापत्रयानें त्रस्त मनुष्याला सद्गुरू भेटला तर त्याच्या उपदेशानें व संगतीनें केवढा चमत्कार होतो म्हणून सांगावा ! जो नरदेह हा वेळपर्यंत केवळ निंदा वाटत असतो, तो ह्यापुढें वंद्य व स्तुत्य वाटूं लागतो. गुरूच्या उपदेशानें दृष्टि शुद्ध होऊन आपल्याला ह्या जगांत कांहीं कर्तव्य आहे, कांहीं साध्य आहे, त्या साध्याच्या कामीं आपला हा नरदेह उपयोगी पडण्यासारखा आहे, नरदेह नसता आणि पशुदेह असता तर हें साध्य आपल्या हातून सिद्ध होण्याची शक्यता नव्हती, वगैरे गोष्टी कळूं लागून, हा दुर्लभ नरदेह प्राप्त झाल्याबद्दल आनंद वाटूं लागतो (दशक १ , समास १०). परंतु, हा अपूर्व चमत्कार घडून येण्यास एका गोष्टीची अपेक्षा असते. ती कोणती तर सद्गुरु मिळणें ही. लाभ कांहीं लहानसहान नाहीं. नरदेहाची माती करणारे गुरू पायलीचे पंधरा व अडक्याचे तीन हवे तितके मिळण्यासारखे असतात (दशक ५, समास २). कसें तरी करून व कांहीं तरी करून पोट भरण्याची विद्या भाड्यानें शिकविणारे पामर गुरू, कोणत्याहि काळीं, अगदीं स्वस्त मिळतात. परंतु, समूळ अविद्या छेदून, व अहंकारासुद्धां सर्व आंतर व बाह्य इंद्रियांचें दमन शिकवून, भवाचा पैलपार दाखविणारा सद्गुरू अत्यंत विरळा. हा असला हा असला गुरुराज पैशानें मिळत नसतो. ह्याला पूर्वपुण्याईचीच जरूर असते. परंतु ही पूर्वपुण्याई फळास आणण्यास सद्गुरूनें आपण होऊन पुढें आलें पाहिजे. असद्विद्येचा समाजांत प्रसार होतो तो केवळ शिष्यांचाच दोष नाहीं. हा दोष बऱ्याच अंशानें गुरूंकडे असतो. पाखंड आणि बजबजपुरी समाजांत अथवा समुदायांत माजते त्याचा दोष एकट्या असच्छिष्यांकडेच येत नाहीं; तर असद्गुरूंकडेहि बऱ्याच अंशानें येतो (दशक ५, समास ३). शिष्य म्हणजे अज्ञ, ही गोष्ट लक्षांत घेतली असतां, ह्या ठिकाणीं शिष्याला शब्द लावून बिलकुल भागावयाचें नाहीं. समाजाला नीट वळण लावण्याची सर्व जबाबदारी सद्गुरूच्याच माथ्यावर आहे (दशक ५, समास ३, ओवी १५). सर्वज्ञ असे जे सद्गुरू, ज्ञानानें, अनुभवानें, व विरक्तीनें समाजाचें पुढारपण स्वीकारण्याचा ज्यांचा सहज अधिकार, त्यांनीं शिष्यसमुदायाला म्हणजे अर्थात् समाजाला योग्य वळण लावून दिलें नाहीं, तर दुसऱ्या कोणी द्यावें ? सद्गुरू उपदेश करण्याला सिद्ध झाले म्हणजे सच्छिष्य तो ऐकण्यालाहि उत्सुक होतात. अशी ही मेघचातकांची कृष्णार्जुनवत् जोडी मिळाली, म्हणजे परमार्थाचा विचार होण्यास प्रत्यवाय कोणता ?

हा परमार्थ कोणता ?

समर्थ म्हणतात हा परमार्थ म्हणजे दुसरें तिसरें कांहीं नाहीं. तत्त्वमसि, तें तूं ब्रह्म आहेसी (दशक १३, समास २, ओवी २०), ह्याचा अनुभव म्हणजेच हा परम अर्थ होय. हाच अर्थ दुसऱ्या शब्दांनीं सांगूं गेलें असतां, जीवात्म्याची परमात्म्याशीं सायुज्यता होणें हा परमार्थ होय. हाच अर्थ तिसऱ्या शब्दांनीं सांगावयाचा म्हटलें तर, मायेच्या बंधनापासून सुटून मुक्तीच्या स्थितीला जाऊन पोहोंचणें म्हणजे परमार्थ मिळविणें होय.

ह्या परमार्थ लाभाला, ह्या मोक्षप्राप्तीला, तत्त्वमसीला, ह्या मुक्तांच्या स्थितीला जाऊन पोहोंचण्याला मार्ग कोणता ? ज्ञानमार्गानें मुक्ति मिळेल, कीं योगमार्गानें मिळेल, कीं कर्ममार्गानें मिळेल, कीं भक्तिमार्गानें मिळेल ? बंधापासून मुक्तता होईल कशी ? असे नाना प्रकारचे प्रश्न काढून, समर्थ त्यांचीं उत्तरें पांचव्या दशकाच्या सातव्या समासापासून विसाव्या दशकाच्या दहाव्या समासापर्यंत मोठीं समर्पक देतात. त्यांचें निरूपण येथें संक्षेपानेंच करणें भाग आहे.

प्रायः सर्व जीवमात्राच्या व विशेषतः मनुष्यमात्राच्या बद्ध, मुमुक्षु साधक व सिद्ध, अशा चार कोटी आहेत. पैकीं बद्ध जो आहे तो ह्या प्रपंचांतच धडपड करीत असतो. त्याला ह्या धडपडीचा पस्तावा झाला म्हणजे तो बद्धस्थितींतून सुटून जाण्याचा प्रयत्न करतो. गुरूपदेशानें बद्धस्थितींतील तामस वृत्ति सोडून, आपण बद्ध नाहींत, स्वतंत्र आहोंत, अशी त्याची खात्री होते. आतांपर्यंत आपण बद्ध आहोंत असें त्याला भ्रांतीनें वाटत होतें इतकेंच.

कोणासीच नाहीं बंधन, । भ्रांतीस्तव भुलले जन ।
दृढ घेतला देहाभिमान, । म्हणोनिया; ॥ (५–६–५७)

ही बंधनभ्रांति उडून गेली, म्हणजे मुमुक्षेचा उदय झाला. ह्या अवस्थेंत मोक्षाची अपेक्षा उत्पन्न होते. ही अपेक्षा उत्पन्न झाली म्हणजे सत्व वृत्तीचा अभ्यास मनुष्य करूं लागतो. ह्या वृत्तींत तो सर्वथा परोपकारी होतो. असा हा निरभिमान मनुष्य साधक बनतो; परंतु ह्याचा संदेह मावळत नाहीं. हा संदेह ज्याचा मावळला, तूं आणि तें ह्यांच्या ऐक्याची निःसंदेह प्रतीति ज्याला झाली, तो सिद्ध ह्या पदवीला पोहोंचला.

समाजांत असे हे चार प्रकारचे लोक असतात. त्यांपैकीं सर्वांना मुक्ति मिळण्याची शक्यता असते, असें वेदान्त सांगतो व दास अनुवादतात.

सिद्ध बोलून चालून स्वतंत्र असतात. साधकहि त्याच स्थितीला जाऊन पोहोंचण्याच्या मार्गांत असतात. मुमुक्षूंची स्वतंत्रस्थितीला जाऊन पोहोंचण्याची उत्कट इच्छा असते, अर्थात् ह्या तीन कोटींतील लोक मुक्तीच्या, मोक्षाच्या अथवा स्वतंत्रतेच्या स्थितीला जाऊन पोहोंचलेले असतात किंवा पोहोंचण्याच्या मार्गांत असतात. आतां राहतां राहिले बद्ध लोक. ह्यांना मुक्तीच्या मार्गाला आणण्याचा प्रयत्न सिद्धांना व साधकांना मुमुक्षूंच्या साहाय्यानें करावयाचा असतो. (२–९–१९). हा

प्रयत्न सफल झाला म्हणजे सर्वांना परमार्थलाभ झाला व जन्माचें सार्थक्य झालें. अर्थात् सर्वांना परम अर्थ मिळाल्यावर म्हणजे पूर्ण स्वातंत्र्य मिळाल्यावर, कोणाला कांहींच मिळवावयाचें रहात नाहीं व अखिल मनुष्यजातीचा उद्धार होतो. हा उद्धार होतांना जी धडपड होते, जी खळबळ चालते. जे प्रयत्न चालतात, त्यालाच मनुष्यजातीचा इतिहास म्हणतात. ही धडपड व हा इतिहास आज हजारों वर्षें सारखा चालत आला आहे व पुढेंहि परमार्थाची प्राप्ति यच्चयावत् मनुष्यांना होईतोंपर्यंत असाच अव्याहत चालत राहील.

दासबोधांत प्रतिपादिलेले तीन मार्ग

सिद्धांनीं व साधकांनीं (२-८-२४) मुमुक्षूंच्या साहाय्यानें (२-९-३८) बद्धाचा उद्धार कसा करावा ह्याचें निरूपण करण्यांत दासबोधाचा बहुतेक सर्व भाग दासांनीं खर्चिला आहे. ह्या निरूपणांत समाजाच्या उद्धरणाचे तीन मार्ग सांगितले आहेत. ते तीन मार्ग हे होत :- नीतिस्थापना, धर्मस्थापना व राज्यस्थापना. (१) हरिकथा निरूपण, (२) नेमस्तपणें राजकारण, (३) वर्तायाचें लक्षण, तेंहि असावें (११-६-४). ह्या तीन स्थापनांचे उपाय कशाकरितां करावयाचे तर ह्या उपायांनीं समाज अनन्य राहतो म्हणजे अन्यतंत्र म्हणजे परतंत्र म्हणजे बद्ध रहात नाहीं म्हणून (११-५-३) समाज जर मुक्त व्हावा, स्वतंत्र व्हावा, परमार्थाचा भोक्ता व्हावा, अशी इच्छा व आवश्यकता असेल तर सिद्धांनीं व साधकांनीं ह्या तीन उपायांची योजना म्हणजे स्थापना केली पाहिजे. समाज परमार्थाचा भोक्ता व्हावा ह्यांत समाजाचें तर हित आहेच; परंतु सिद्धांचेंहि आहे. समाजांतील मनुष्यांचें दुःख व विपन्न स्थिति पाहून सिद्धहि दुःखी व विपन्न होतात. अर्थात् समाज ज्या मानानें दुःखी, विपन्न व बद्ध असेल त्या मानानें सिद्धहि दुःखी विपन्न व बद्ध होतात. तेव्हां समाजाला म्हणजे समाजांतील मनुष्यांना बंधमुक्त होण्याचा मार्ग दाखविण्यांत आपल्याहि बंधमोक्षाचा मार्ग सिद्ध पहात असतात. तात्पर्य, ह्या तीन उपायांची योजना करणें सर्वांना सारखेंच अगत्याचें आहे.

पैकीं, सर्वांत नीतीची स्थापना प्रथमारंभीं केली पाहिजे. बद्ध जे आहेत त्यांच्याठायीं नीतीचा अत्यंत लोप झालेला असतो (दशक ५, समास ७). स्वधर्म, भूतदया, आत्मज्ञान ह्यांची तर त्यांना ओळख नसतेच. परंतु, निंदा, द्वेष, अनीति, भ्रष्टाचार, कापट्य, कलह, पाखंड, पैशुन्य, क्रौर्य, कार्पण्य, दुराशा, ह्यांचें आवरण त्यांच्या आत्म्यावर फारच बिकट बसलेलें असतें. हें आवरण काढून टाकणें हें पहिलें काम आहे. हें काम नीतीचें आहे. नीतीनें मलिन वृत्ति विमल होऊन, प्राणी सुधारण्याच्या मार्गाला लागतो. सत्व, रज आणि तम, हे जे मायेचे तीन गुण, त्यांपैकीं ग्राह्य कोणतें व त्याज्य कोणतें हें सद्गुरूच्या शिकवणीनें कळलें

म्हणजे एक मोठेंच कार्य उरकलें. ह्या नीतिशिक्षणाचें व नीतिस्थापनेचें महत्त्व अत्यंत हितकारी आहे हें सर्वांच्या लक्षांत यावें म्हणून त्याच्या विशदीकरणार्थ दासांनीं बोधाचा दुसरा दशक व पहिल्या दशकाचा दहावा समास लिहिला आहे. नरदेह जसा नीतीकडे तसाच अनीतीकडे लावतां येणें शक्य आहे असा प्रस्ताव करून, शहाणा आणि मूर्ख, कुविद्या आणि सुविद्या, सत्वगुण आणि तमोगुण, ह्यांचें निरूपण दुसऱ्या समासांत केलें आहे. अज्ञ जो आहे त्याला नीति माहीतच नसते, तेव्हां तो कुलक्षणी बनल्यास मोठेंसें आश्चर्य नाहीं. असे लोक उपदेशानें सुधारण्याचा पूर्ण संभव असतो. परंतु ह्या अज्ञ जनांशिवाय विद्वन्मन्य असा एक पढतमूर्खांचा वर्ग असतो त्याची नीति सुधारणें मोठें बिकट कृत्य आहे. हे पढतमूर्ख बहुश्रुत आणि व्युत्पन्न असून, ब्रह्मज्ञानाच्या लांब लांब गोष्टी सांगणारे असतात. परंतु क्रोध, मत्सर, अभिमान आणि दुराशा ह्यांनीं पछाडून गेल्यामुळें, ते स्वधर्माची निंदा, भक्ति-मार्गाची टवाळी आणि भूतदयेचें विस्मरण, स्वतः करतात आणि अज्ञजनांना करावयाला लावतात. ह्या अश्वलक्षणी पढतमूर्खांचीहि नीति सुधारणें अत्यंत आवश्यक असतें. अशा ह्या नेणत्या व पढियंत्या अनीतिमान् लोकांची नीति सुधारावयाचा प्रयत्न करणें व तत्प्रीत्यर्थ संस्था स्थापणें हें परमार्थाचा मार्ग दाखवून देण्याचें पहिलें साधन आहे.

2—परमार्थप्राप्ती अज्ञजनांना करून देण्याचें दुसरें साधन म्हणजे धर्मस्थापना होय. धर्म म्हणजे परमेश्वराची उपासना अथवा भक्ति. ही भक्ति नऊ प्रकारची आहे (दशक ४). त्यांत आत्मनिवेदनरूप भक्ति सर्वांत श्रेष्ठ आहे. इतर आठहि भक्तींत जीवात्मा व परमात्मा ह्यांच्यांत भेद आहे असा भाव रहाण्याचा संभव असतो. भक्तीचा विषय जो ईश्वर तो, व भक्ति करणारा जो भक्त तो ह्या दोहोंत भेद आहे अशी भावना पहिल्या आठ प्रकारांत कदाचित् रहाते. परंतु ह्या नवव्या भक्तींत भक्ताच्या मनांत विभक्तपणाचा भाव रहाणें अशक्य आहे अशी ऐक्यवृत्ति उत्पन्न होते. ही उपासना म्हणजेच आत्मज्ञान होय. उपासना आणि ज्ञान ह्या दोन गोष्टी, दासांच्या मतें, भिन्न नाहींत. उपासना ज्ञानस्वरूप आहे, उपासना म्हणजे ज्ञान होय (२०–४–२०), अशीं विधानें दासांनीं वारंवार केलेलीं आहेत. अध्यात्मविद्येचें श्रवण, देवपूजन, भजन, स्नानसंध्यादि कर्में, ह्या सर्वांचा अंतर्भाव उपासनेंत होतो. सारांश, कर्म व ज्ञान, ह्यांचा अंतर्भाव उपासनामार्गांत अथवा भक्तिमार्गांत होतो. ह्या भक्तिमार्गांत प्रतिमांची पूजा सांगितली आहे. परंतु प्रतिमा म्हणजे परमेश्वराचीं चित्रें हें दास कंठरवानें सांगतात. ज्याच्या प्रतिमा तो परमात्मा कैसा आहे तें ओळखलें पाहिजे, म्हणून दास अकराव्या दशकाच्या नवव्या समासाच्या सहाव्या व सातव्या ओव्यांत सांगतात–

थोर लोक मरोनि जाती । त्यांच्या सुरता करोनि पहाती ।
तैशीच आहे ही गती । उपासनेची ॥ (२०-९-९)

सारांश, मनुष्याच्या कल्पनेप्रमाणें केलेल्या परमेश्वराच्या प्रतिमांत परमेश्वराचें जें ध्यान करणें ती उपासना होय. ह्या प्रतिमा वाटेल त्या स्वरूपाच्या असोत किंवा ह्यांना वाटेल तें नांव मिळो, मुख्य गोष्ट ही आहे कीं एका परब्रह्माच्या ह्या सर्व प्रतिमा व नांवें आहेत. खंडोबा, विठोबा, नारायण, कृष्ण, लक्ष्मी, विष्णु, राम, अशीं नाना प्रकारचीं नांवें ह्या अनिर्वाच्य वस्तूला लोक देतात (दशक ११, समास २). परंतु, ही अनिर्वाच्य वस्तू एक आहे हें उपासनेंत विसरतां कामा नये. स्वधर्म, कुळधर्म, वर्णाश्रमधर्म असे सर्व धर्म ह्या एका उपासनाधर्मांत म्हणजे भक्तिमार्गांत येतात. ह्या मार्गाकडे लोकांची प्रवृत्ति करणें म्हणजे परमार्थाच्या मार्गाला त्यांना लावणें होय. तेव्हां भक्तिमार्गाची स्थापना अथवा धर्माची स्थापना करणें हें एक मुक्तीचें मोठेंच साधन आहे. धर्मस्थापनेचे नर केवळ ईश्वराचे अवतार होत, असें समर्थांनीं वारंवार म्हटलें आहे (१८-६-२०). ह्या भक्तिमार्गाचें सर्वस्व जें आत्मज्ञान त्याचें निरूपण, शंका, प्रतिशंका, आशंका, वगैरे नाना तऱ्हांनीं सर्व ग्रंथभर समर्थांनीं केलें आहे.

समाजोद्धाराचें तिसरें साधन-राज्यस्थापना

नीतीची व धर्माची स्थापना केल्यानें परमार्थ जो मोक्ष अथवा मुक्ति अथवा स्वतंत्रता तिची अंशतः प्राप्ति होते. परंतु ती प्राप्ति पूर्ण व अप्रतिबद्ध होण्यास, तिच्या आड कोणतेहि अडथळे न येण्यास, तिसऱ्या एका साधनाची जरूर आहे. तें साधन राज्यस्थापना हें होय. समाजांतील सर्वच लोक मुमुक्षू म्हणजे मुक्तीची इच्छा करणारे म्हणजे नीतिमान् असतात असें नाहीं. बराच मोठा वर्ग बद्ध म्हणजे मुक्तीला पराङ्मुख असणारा म्हणजे अनीतिमान् असतो. नीतिमानांची न्यायाकडे व अनीतिमानांची अन्यायाकडे प्रवृत्ति असल्यामुळें, नीतिमानांचा व अनीतिमानांचा सहज विरोध असतो. ह्या विरोधानें समाजाची तत्त्वापासून म्हणजे परमार्थापासून परावृत्ति होते. ही, अर्थात्, मुमुक्षू समाजाला व आत्म्याला हानिकारक असते. कोणी शास्ता नसणाऱ्या सहज स्थितींत समाजांत मुमुक्षूंची संख्या बद्धांच्या संख्येहून केव्हांहि बरीच कमी असल्याकारणानें, केवळ नीतीच्या जोरावर नीतिमान् अनीतिमानांना दाबांत ठेवून नीतीचा विजय करूं शकत नाहींत. तेव्हां नीतीचें संरक्षण करण्यास व अनीतीचें उत्पाटन करण्यास कांहीं तरी शासन करणारी संस्था असावी लागते. तीच ही राज्यसंस्था होय.

नीतीप्रमाणेंच धर्माचीहि गोष्ट आहे. स्वधर्माच्या विरुद्ध असणारे बद्ध लोक समाजांत अखंड वावरत असतात. देव व धर्म ह्यांच्याविरुद्ध पाखंडी व नास्तिक

हे तर कंकण बांधून सदा तयार आहेतच. परंतु ह्यांच्या व्यतिरिक्त परमेश्वराविषयींच्या ज्यांच्या कल्पना भिन्न आहेत असे परधर्मीहि लोक असतात. ते देवाच्या व धर्माच्या सदा विरुद्ध असतात. आपण जे आर्य लोक त्या आर्य लोकांतील सिद्धांना व साधकांना जो परमार्थ मोठ्या तपानें व परम भाग्यानें प्राप्त झाला आहे व जो सर्व अर्थांहून परमश्रेष्ठ आहे त्याची कल्पना ह्या परधर्मीयांना नसल्याकारणानें, तामसवृत्तीचें प्राबल्य त्यांच्या ठायीं विशेष असल्यामुळें, व बद्धस्थितींतील मोहरूपी पदार्थसुखांवर त्यांची सर्वस्वी आसक्ति असल्यानें, ते ह्या परमार्थप्रवण संस्थांचा द्वेष करतात व त्यांना हाणून पाडण्याची कट्टी मेहनत करीत असतात. अशा ह्या दुष्ट व अधम लोकांपासून धर्मसंरक्षण करण्याकरितां कोणीतरी शासन करणारी संस्था अवश्य हवी असते. जेथें न्याय आणि धर्म यांचा प्रसार झाला व मुमुक्षुवर्गाचा उदय झाला, त्या समाजाला राज्यसंस्था निर्माण करण्याची जरूरी सहजगत्या उत्पन्न होते. अथवा, खरें पाहिलें तर, परमार्थाचा शोध करणाऱ्या ह्या समाजांत नीति व धर्म ह्यांच्या जोरावर जिचें अस्तित्व सर्वस्वी अवलंबून असतें ती राज्यसंस्था आपोआप दिसूं लागते.

ह्या राज्यसंस्थेचें तत्त्व समर्थांनीं जागोजागीं मोठें नामी प्रतिपादिलें आहे. व्यक्तिभूत नरदेहाचा आश्रय करून रहाणारा जो आत्मा तो जाणीव आहे. देहाचा लेप असल्याकारणानें ह्या आत्म्याची ही जाणीव अपूर्ण असते. तेव्हां पूर्ण जाणिवेचा अखंड सांठा जो परात्पर आत्मा त्याच्याशीं सायुज्यता प्राप्त होण्यास, ह्या अपूर्ण जाणिवेला आपल्याहून अधिक जाणिवेचें जें अधिष्ठान त्याचा आश्रय करणें जरूर आहे.

रायाचे सत्तेनें चालतें, । परंतु अवघीं पंचभूतें, ॥
मुळीं अधिक जाणिवेचें तें, । अधिष्ठान आहे; ॥ (१५–३–४).

राजा किंवा राज्यसंस्था अधिक जाणिवेचें अधिष्ठान आहे, हा सिद्धांत दुसरा एक दृष्टान्त देऊन, समर्थ सजवितात.

दुरस्ता दाटल्या फौज़ा, । उंच सिंहासनीं राजा, ॥
याचा विचार समजा, । अंतर्यामीं; ॥ (१५–३–२).

लाखो सैन्य समोर असून राजा ज्याप्रमाणें उंच सिंहासनावर बसून जास्त अधिकारानें त्यावर हुकूम चालवितो, त्याप्रमाणें लाखो लोकांचा जो समाज त्या समाजावर जास्त जाणिवेनें परमेश्वररूपी राज्यसंस्था अधिकार चालविते.

विवेकें बहुत पैसावले, । म्हणोन अवतारी बोलिले, ॥
मनु चक्रवर्ती जाहले, । येणेंचि न्यायें; ॥ (१५–३–५).

आजपर्यंत ज्या ज्या अवतारी राजांनीं राज्यें स्थापिलीं ते ते विवेकाचीं म्हणजे जाणिवेचीं बहुत मोठीं अधिष्ठानें होते. हा मनुष्यमात्राचा जो पसारा आहे त्यांत राजा म्हणजे परमात्म्याच्या साक्षित्वाचा तत्त्वरूप दोरा आहे (१५–३–१). मनुष्यसमाजांत ज्याला राजा म्हणतात तो मी परमेश्वर आहे, असें गीतेंतहि (१०–२७) म्हटलें आहे.

येणेंप्रमाणें राजा हा परमेश्वर आहे व राज्यसंस्था ही परमेश्वराचें अधिष्ठान आहे, असें समर्थांचें म्हणणें आहे. जसें जीवात्म्याचें अधिष्ठान देह, तसें परमात्म्याचें अधिष्ठान राज्यसंस्था आहे. ह्या राज्यसंस्थेचें मुख्य कार्य म्हटलें म्हणजे धर्म व नीति ह्यांना साहाय्य करणें व ह्यांचें साहाय्य घेणें हें होय (११-६). आतां धर्म व नीति ह्यांचा मार्ग परमार्थशोधनाचा आहे. तेव्हां राज्यसंस्थेचा मुख्य हेतू समाजाला परमार्थाकडे नेण्याचा असतो. हा परमार्थ म्हणजे ज्याला मुक्ति, मोक्ष, स्वतंत्रता हीं नांवें आहेत तो. येणेंप्रमाणें आत्यंतिक मोक्षाचा म्हणजे सायुज्यतेचा हेतू धरून मानव-समाज चालला असतां तो नीति, धर्म व राज्य ह्या तीन संस्थांचा आश्रय करितो. ह्या आश्रयांत ज्याला तो राजकीय, नैतिक व धार्मिक स्वातंत्र्य म्हणून म्हणतो त्याचा त्याला लाभ होतो, व हा लाभ बरींच शतकें व सहस्रें टिकला तर तो पूर्ण स्वतंत्र होऊन परमेश्वराशीं सायुज्यता पावतो म्हणजे आपल्या तत्त्वाला जाऊन गांठतो.

नीति, धर्म व राज्य स्थापण्याची रीति

नीति, धर्म व राज्य ह्या ज्या परमार्थाला नेणाऱ्या तीन संस्था त्या स्थापाव्या एवढेंच सांगून समर्थ राहिले नाहींत. तर त्या कशा स्थापाव्या ह्याचेंहि निरूपण परम कारुणिक बुद्धीनें त्यांनीं अनेक स्थलीं केलें आहे. जगताच्या उद्धारार्थ सिद्धानीं साधकांची भूमिका घेऊन, एकान्तांत वस्तुस्थितीचा अभ्यास करावा, उत्तम गुण तितके घ्यावे, घेऊन जनास शिकवावे आणि उदंड समुदाय करावे (११-१०-१८). लोकांचे समुदाय करून म्हणजे मंडळ्या स्थापून भूतदयेचें बीजारोपण केल्यानें नीतीची संस्थापना होते. कारण, जाणीवरूपें सकळाचें अंतःकरण एक असतें हें प्रमाण आहे (१०-१-१५). ही जाणीव सर्व भूतांच्या ठायीं एकच असल्यामुळें, आत्मवत् सर्व लोकांना मानणें मनुष्यांना सहज आहे (१२-१०-२२). नीतिस्थापनेचा समर्थांचा हा असा विचार आहे. धर्मस्थापनेकरितां म्हणजे भक्तिमार्गाच्या स्थापनेकरितां, समर्थ म्हणतात, ब्राह्मण मंडळ्या, संत मंडळ्या, व भक्तमंडळ्या स्थापाव्या (१९-६-१४); व परमात्म्याच्या ज्ञानपूर्वक भजनानें व कीर्तनानें दशदिशा दणाणून टाकाव्या. ह्या स्थापनेनें कर्मठ असे कर्ममार्गी ब्राह्मण, ज्ञानमार्गी संत व केवळ भजनप्रिय असे सर्व जातींचे भक्त, एका परमार्थाच्या निमित्तानें एकत्र जमून, मतानें व मनानें एक होतात. ह्या स्थापनेचें हें काम सिद्धांचेंच आहे.

ऐसा जो महानुभाव, । तेणें करावा समुदाव, ।
भक्तियोगें देवाधिदेव, । आपुला करावा; ॥ (१२-१०-३२).

सिद्धानें, साधकानें किंवा महानुभावानें समुदाय म्हणजे मंडळ्याच कां स्थापाव्या, एकेकट्या मनुष्याला उपदेश केला असतां कार्य साधणार नाहीं कीं काय, असा यथ कोणी प्रश्न करील. तर ही शंका समर्थ पुढील ओवींत फेडतातः—

आपण अवचितें मरोन जावें, । मग भजन कोणें करावें, ।
याकारणें भजनास लावावे, । बहुत लोक; ॥ (१२-१०-३३).

कोणतेंहि मत पूर्णपणें पसरण्यास व फलद्रूप होण्यास एकाकी मनुष्यापेक्षां अनेकमनुष्यघटित निरनिराळ्या मंडळ्यांचा जास्त उपयोग होतो. एकट्यादुकट्या मनुष्याचें मनोगत हातीं घेऊन विशेषसा कारभार उरकत नाहीं. महत्कार्यसिद्धि होण्याला बहुतांचें मनोगत हातीं घेतलें पाहिजे (१२-१०-३७). व हा क्रम पिढ्यान्‌पिढ्या चालला पाहिजे. परंतु महत्कार्य म्हणून घाई व उतावीळपणा करतां नये.

मानत मानत शिष्य करावे, । हळू हळू शेवटा न्यावें, । विवेकानें; ॥
(१२-१०-४१).

धर्मस्थापना कशी करावी आणि त्याला साधन कोणतें त्याचा ऊहापोह समर्थांनीं जो दासबोधांत विस्तारानें अनेक समासांत केला आहे त्याचें मीं नुसतें दिग्दर्शन केलें आहे. ज्यांस विस्ताराची उत्कंठा असेल त्यांनीं मूळाचाच आश्रय करावा.

परमार्थाच्या मार्गाला नेणारी तिसरी संस्था जें राज्य त्याच्या स्थापनेलाहि समुदायाची म्हणजे मंडळ्यांची आवश्यकता आहे. ह्या कामाला मोठा समुदाय असावा लागतो व तो बळकट ताण देऊन जय्यत तयार ठेवावा लागतो (१९-९-२२). असा समुदाय केला म्हणजे चहूकडे सर्व मनुष्यांच्या ठायीं परमार्थबुद्धि उचंबळूं लागते (१५-२-२७). आपण म्हणजे इतर जन व आपण म्हणजे सर्व राष्ट्र, असें जें वाटणें त्यालाच राजकीयदृष्ट्या परमार्थबुद्धि म्हणतात. ही बुद्धि समुदायाच्या अंगीं बाणली म्हणजे लोकांना आधींच अत्यंत इष्ट व आवश्यक अशा ज्या नीति व धर्म ह्या संस्था त्यांच्या रक्षणार्थ व संस्थापनार्थ माणसें कट करून राजकारणांत उत्साहानें पडतात. असा व्याप व आटोप जो समुदाय व समाज करतो आणि धक्के व चपेटे सोसतो तोच देखतदेखतां भाग्याला म्हणजे परमार्थाला चढतो (१५-३-७). सडकून कष्ट केल्याशिवाय ह्या जगांत राज्य प्राप्त होत नसतें (१८-७-३) व तें प्राप्त झाल्याशिवाय नीति व धर्म ह्यांची सुरक्षितता असूं शकत नाहीं. सिद्धांनीं व साधकांनीं राजकीय समुदाय करावे असें सांगून व्यक्तिमात्राला समर्थ सांगतात कीं, देशांत जो कोणी राजा असेल किंवा त्याचा प्रतिनिधि असेल त्याच्या समुदायांत जाऊन त्यानें सुखानें असावें. असा आश्रय करण्याव्यतिरिक्त विलग व्यक्तीला गत्यंतर नाहीं.

समर्थाची नाहीं पाठी, ।
तयास भलताच कुटी; ॥ (१६-१०-३०).

येणेंप्रमाणें समुदाय करून राज्यस्थापना करणें हें नीतिमान् व धर्मनिष्ठ पुढाऱ्यांना व अनुयायांना दोघांनाहि सारख्याच हिताचें आहे. कारण ह्या स्थापनेच्या साहाय्यानें जीवात्म्याला परमार्थाचा, मोक्षाचा, मुक्तीचा, पूर्ण स्वातंत्र्याचा लाभ व्हावयाचा असतो.

परमार्थ सकळांस विसावा , ।
परमार्थ जन्माचें सार्थक , ।
परमार्थ संसारीं तारक , ।
परमार्थी तो राज्यधारी ; ॥ (१-९-२०।२३).

भगवद्गीता व दासबोध

गीतेंत भगवंतांनीं अर्जुनास जो उपदेश केला त्याहून दासांनीं केलेला हा बोध तत्त्वदृष्ट्या कांहीं निराळा नाहीं. देश व काल ह्यांच्या परिस्थितीच्या दृष्टीनें मात्र निरूपणांत व दृष्टान्तांत जमीनअस्मानाचा भेद आहे. भगवद्गीतेंत केलेलें निरूपण गीताकालीन समाजस्थितीला अनुरूप होतें. ती समाजस्थिति बदलल्यावर तें निरूपण नवीन परिस्थितीला लागूं पडण्यासारखें नव्हतें. निराळें निरूपण हवें होतें. ह्या नव्या नव्या परिस्थितींना अनुलक्षून शिवगीता, रामगीता, गुरुगीता, गर्भगीता, उत्तरगीता, अवधूतगीता, ब्रह्मगीता, हंसगीता, पांडवगीता, अनुगीता, गणेशगीता, यमगीता, अशा नाना प्रकारच्या गीता निर्माण झाल्या. ह्यानंतर केवळ तत्कालीन महाराष्ट्रसमाजाला लागू पडणारी अशी इसवी सनाच्या तेराव्या शतकांत ज्ञानेश्वरी गीता मराठींत लिहिली गेली. ह्या गीतेचा तत्कालीन समाजावर काय परिणाम झाला, वगैरे बाबींचा विचार अन्यत्र करण्याचा हेतू आहे. प्रस्तुत इतकेंच सांगून ठेवणें भाग आहे कीं ह्या ज्ञानेश्वरी गीतेचाहि रामदासीन कालीं कांहींएक उपयोग होण्यासारखा नव्हता. तेराव्या शतकांतलें महाराष्ट्र व सतराव्या शतकांतलें महाराष्ट्र ह्यांत फारच थोर अंतर पडलें होतें. भाषा, नीति, रीति, रिवाज, धर्म वगैरे सर्वप्रकारें विलक्षण व शोचनीय स्थित्यंतर झालें होतें अशा स्थित्यंतराला ती तीनशें वर्षांपूर्वीची गीता कशी उपयोगी पडावी ? तींतील जुन्या भाषेनें व टीकात्मक पाल्हाळानें सतराव्या शतकांतल्या समाजाचें लक्ष्य कसें वेधावें ? तेव्हां हा फरक लक्षांत घेऊन, वेदान्तांतील सिद्धान्तांच्या अनुरोधानें समर्थांनीं दासबोध ह्या स्वतंत्र प्रबंधाची निर्मिति केली. हा प्रबंध कोणत्याहि ग्रंथाची टीका नाहीं. तत्कालीन नैतिक, धार्मिक व राजकीय परिस्थितीला पूर्णपणें अनुलक्षून हा ग्रंथ स्वतंत्र बुद्धीनें रचिला आहे. गीतेंतील व वेदान्तांतील सिद्धान्त, तर, ह्या ग्रंथांत गृहीत म्हणून घेतले आहेतच. परंतु गीतेंतील सिद्धान्तांचा विपर्यास होऊन लोकांच्या विचारांत जो एकप्रकारचा एकदेशीपणा एव्हांपर्यंत येत होता व सध्यांहि येत असतो तो ह्या ग्रंथांत टाळला आहे.

गीता हा ग्रंथ, खरें पाहिलें तर, नैराश्यवादी किंवा कातर्यवादी किंवा आलस्यवादी नाहीं. असें असून, परमार्थाचा ज्यांना लाभ झाला अशी ज्यांच्याविषयीं लोकांची समजूत त्या संन्याशांचा व विरक्तांचा वर्ग सर्व लौकिक कर्मांचा परिच्छिन्न

त्याग करून दुसऱ्याच्या जीवावर पोट भरण्याचें तेवढें कर्म स्वीकारून राहिला व लोकोद्धरणाचें जें महत्कार्य त्याला सर्वस्वी विसरता झाला. सर्व कर्मांचा त्याग करणें हा संन्यास नव्हे, सर्व कर्मे इतर जनांप्रमाणें किंबहुना इतर जनांहून श्रेष्ठ तऱ्हेनें करीत राहून त्या कर्मांच्या फलाचा भोग आपण घेऊंच अशी दुरिच्छा न करणें हा खरा संन्यास होय, असें भगवद्गीता कंठरवानें सांगत आहे. तें एकीकडे सारून, परोपजीवी व स्थाणू अशा वनस्पतींप्रमाणें हे संन्याशी जीवयात्रा चालवूं लागले. असा जीवितक्रम सिद्धांच्या किंवा संन्यस्तांच्या स्वभावाला विरुद्ध आहे हें दासांनीं आपल्या बोधांतील भिक्षानिरूपणांत प्रतिपादिलें आहे. परमार्थज्ञानवान् जे सिद्ध त्यांनीं साधकांची भूमिका घेऊन लोकांना परमार्थाचा मार्ग दाखवावा, असें प्रतिपादन समर्थांनीं दासबोधांत अनेक ठिकाणीं स्पष्टपणें व विस्तारानें केलें आहे हा एक दासबोधांतील प्रमुख विशेष आहे. नीति व भक्ति ह्यांची प्राप्ति व्यक्तिमात्रानें कशी करावी हें गीतेंत विस्तारानें सांगितलें आहे. परंतु समुदाय करून समाजाला नीति व धर्म ह्यांकडे कसें न्यावें ह्याचें दहा पांच उल्लेखांपलीकडे गीतेंत विवेचन नाहीं. हें विवेचन तर दासबोधाचा मुख्य प्राण होय तसेंच गीतेंत राज्यसंस्थापनेसंबंधीं—नराणां च नराधिपम्—ह्यासारख्या कांहीं खंडवाक्यांखेरीज दुसरा स्पष्ट असा उल्लेख नाहीं. दासबोधांत राज्यसंस्था म्हणजे ईश्वराचें शरीर आहे, वगैरे प्रतिपादन स्पष्ट केलें आहे. सारांश, गीतेंत जो अर्थ केवळ मुग्ध आहे, तो दासबोध ढोबळ अक्षरांनीं स्पष्ट करून दाखवीत आहे.

विस्तारानें व स्पष्टपणानें परमार्थाचें व तत्प्रवण साधनांचें विवेचन केल्यावांचून तत्कालीन महाराष्ट्रसमाज बद्ध म्हणजे परतंत्र स्थितींतून मुक्त होण्याचा बिलकुल संभव नव्हता. गीताकालीन समाजाला रामदासकालीन समाजाचीं संकटें आलीं नव्हतीं. गीता भारतीय युद्धाच्या कालीं लिहिली असें धरलें तर, त्यावेळीं राष्ट्रांत गृहकलह लागला होता, दोन्हीं युयुत्सू पक्ष एकधर्मी होते, परंतु राज्यसंस्था नष्ट झाली नव्हती, अशी स्थिति होती. गीता भारतीय युद्धानंतर हजार पांचशें वर्षांनीं लिहिली असें धरलें तरीहि, सांख्य व बौद्ध ह्या मतांचें एकीकरण करण्याचाच तेवढा तिचा मुख्य उद्देश होता, असें दिसतें. आतां रामदासांच्या वेळीं सांख्यांच्या किंवा बौद्धांच्या मतांचें वेदान्ताशीं समीकरण करावयाचें नव्हतें; अथवा धर्मराज्य हिंदूंच्या हातीं असून, तें कोणत्या पक्षाच्या हातीं द्यावें, असाहि प्रश्न नव्हता. प्रश्न ह्याहून अगदीं निराळा होता. राज्यसंस्था परधर्मी म्लेंच्छांच्या हातांत गेली होती व नीति व धर्म यांचा बहुतेक पूर्ण उच्छेद होऊन, हिंदूसमाज अत्यंत विस्कळित झाला होता.

ह्या विस्कळितपणाचें चित्र दासांनीं कलिधर्मनिरूपणांत व इतरत्र मोठें चतुराईनें चितारलें आहे. म्लेच्छांनीं महाराष्ट्र पादाक्रान्त केल्यापासून समाजांत अनन्वित प्रकार होऊं लागले. म्लेंच्छ राजांचें व उमरावांचें वैभव पाहून, लोकांस

स्वतःचे आचार, विचार, शास्त्र, सिद्धान्त, चाली, रीती, देव, धर्म वगैरे सर्व कुचकामाचें वाटूं लागलें. स्वतःचीं देवस्थानें सोडून लोक दाउद-उल्-मुलूख उर्फ दावळमलक नामक मुसुलमान पीराला भजूं लागले. कित्येकांनीं तुर्की उर्फ मुसुलमानी धर्म स्वीकारिला. ब्राह्मणांचा बुद्धिनाश झाला. शूद्र व अतिशूद्र ब्राह्मणांना शास्त्र शिकवूं लागले. मनोदौर्बल्य येऊन ब्राह्मणहि त्यांचा उपदेश ऐकूं लागले. शूद्र ब्राह्मणांचा आचार करूं लागले आणि ब्राह्मणांनीं ग्रामण्यें करून आपसांत तंटे माजविले. चातुर्वर्ण्य नष्ट झालें. सर्वत्र बेबंदशाही गाजूं लागली. येणेंप्रमाणें नीतीचा व धर्माचा दाब नाहींसा होऊन हिंदूंच्या हातचें राज्य म्लेंच्छांच्या हातीं जाऊन त्यांची मगरमिठी जास्तच बसली. तीर्थक्षेत्रांचा धुव्वा उडाला. मूर्ती फोडल्या गेल्या. बायका भ्रष्ट झाल्या. आणि धर्महि बहुतेक गेल्या-सारखाच झाला. असा अनन्वित व विस्कळित प्रकार चालूं असतां दासांनीं नाश-कास शके १५५४त म्हणजे इ. स. १६३२ त नीति, धर्म व राज्य स्थापून परमार्थाचा मार्ग लोकांना दाखविण्याचा निश्चय केला. त्या निश्चयाचें फळ हा दासबोध होय. ह्यांत गीतेंतल्याप्रमाणें अनीतिमान् भाऊबंदांना मारून राज्य मिळविण्यांत पाप नाहीं, असा उपदेश केलेला नाहीं. तर, मुळींच अस्तंगत झालेल्या नीति, धर्म व राज्य ह्या तीन संस्था स्थापाव्या कां व कशा ह्याचें निरूपण केलें आहे. नीति, धर्म व राज्य हीं तीन परमेश्वराचीं म्हणजे परमार्थाचीं म्हणजे पूर्ण स्वातंत्र्याचीं मूर्त रूपें आहेत; तेव्हां त्यांची स्थापना व आश्रय करणें मुमुक्षूंना अत्यंत आवश्यक आहे, हा दासांच्या उपदेशाचा मथितार्थ आहे.

महाराष्ट्रधर्म

दासांनीं हें जें निरूपण केलेलें आहे तें हिंदुस्थानांतील सर्व आर्य लोकांना लागूं पडण्यासारखें होतें. परंतु दासांच्या निरूपणाचा मुख्य कटाक्ष महाराष्ट्रावर सर्वस्वी असलेला दिसतो बहुतेक सर्व हिंदुस्थान व महाराष्ट्राचा बराच भाग म्लेंच्छ संस्कृतीनें भिनून गेला होता. तेव्हां बाकी उरलेला जो थोडा महाराष्ट्रदेश (१५-२-४) त्याला अनुलक्षून समर्थांनीं आपला उपदेश सांगितला आहे. परमार्थाचीं मुख्य साधनें जीं नीति, धर्म व राज्य त्यांना मूर्तस्वरूप धारण करून अवतीर्ण होण्याला हा महाराष्ट्रदेशच तेवढा त्यावेळीं पक्व झाला होता. महाराष्ट्राच्या ह्या पक्व-तेला उद्देशून, महाराष्ट्रधर्म ह्या शब्दाची दासांनीं योजना केली आहे. महाराष्ट्रधर्म ह्या शब्दांतील 'महा' हा अवयव काढून टाकून बाकी उर-लेला जो राष्ट्रधर्म हा शब्द त्यावरून ह्या शब्दानें कोणत्या अर्थाची व्यक्ति होते तें वाचकांनीं पहावें. परमार्थप्रवण जीं नीति, धर्म व राज्य तीं सर्व हिंदुस्थानाला सारखींच लागूं पडतात; परंतु महाराष्ट्रधर्म केवळ महाराष्ट्रालाच तेवढा लागूं पडतो.

मराठी ग्रंथ संग्रहालय, दादर, मुंबई-२८.

महाराष्ट्रधर्म म्हणजे महाराष्ट्राचें कर्तव्य. हें कर्तव्य कोणतें तर परमार्थप्रवण नीति, धर्म व राज्य ह्यांच्यासंबंधीं जें महाराष्ट्राचें कर्तव्य तें. महाराष्ट्रधर्माचें विस्तृत विवेचन मराठ्यांच्या इतिहासाच्या साधनांच्या पहिल्या व चवथ्या खंडांच्या प्रस्तावनांत मी केलें आहे व तेथें कैलासवासी म. गो. रानडे यांनीं केलेला महाराष्ट्रधर्म ह्या शब्दाचा religion हा अर्थ चुकीचा आहे हें सिद्ध केलेलें आहे. ही चुकी रानड्यांनीं पुढील आपल्या एका व्याख्यानांत सुधारून घेतली आहे. श्रीमती गंगाभागीरथी रमाबाई यांनीं नुकत्याच प्रसिद्ध केलेल्या रानड्यांच्या धर्मव्याख्यानांत महाराष्ट्रधर्म म्हणजे बहुतेक Patriotism होय असें स्पष्ट म्हटलेलें आहे. ह्या म्हणण्याकडे रा. रा. सरदेसाई ह्यांची नजर न गेल्यामुळें, त्यांनीं आपल्या 'मराठी रियासतींत' रानड्यांच्या पहिल्या अर्थाचाच अनुवाद केला आहे. आपल्या आर्य लोकांचा जो सनातनधर्म त्याचा अभिमान बाळगणारा हा महाराष्ट्रधर्म होय. ज्याप्रमाणें धर्माचा त्याप्रमाणेंच नीतीचा व राज्याचाहि अभिमान महाराष्ट्रधर्म बाळगतो. तेव्हां सनातनधर्माला महाराष्ट्रधर्म समजून कसें चालेल? परंतु ह्यासंबंधीं विस्तृत विवेचन इतरत्र केलें असल्यामुळें, त्याची पुनरुक्ति येथें करण्यास अवकाश नाहीं.

आधुनिक युरोपियन शास्त्राची कसोटी

येथपर्यंत परमार्थप्राप्तीसंबंधानें समर्थांचे विचार काय आहेत त्याचें पृथक्करण संक्षेपानें केलें. आतां हे विचार आधुनिक यूरोपियन शास्त्राच्या कसोटीला कितपत उतरतात तें पाहूं.

हा मानवसमाज आज हजारों वर्षें जी सारखी धडपड करीत आहे, तिचा विचार अनेक दिशांनीं करतां येण्यासारखा असतो. (१) ह्या समाजाचा अथपासून आतांपर्यंत इतिहास काय आहे तें पाहून ह्या धडपडीचें तात्पर्य कोणतें निघतें तें कित्येक शास्त्रज्ञ पहातात. त्यावरून अमूक अमूक चरित्र हा समाज करीत आला आहे एवढेंच निष्पन्न होतें. पुढें हा समाज काय चरित्र करील हें पुढील चरित्रावरून समजावयाचें असतें. त्यासंबंधीं अगोदर कोणतेंहि भाकीत करण्याचें इतिहासाचें काम नाहीं. ह्या पद्धतीला समाजाच्या धडपडीचा विचार करण्याची ऐतिहासिक पद्धति असें नांव आहे. (२) धडपड करतांना हा समाज कोणतीं रूपें अथवा शरीरें धारण करतो ह्याचा विचार कित्येक शास्त्रज्ञ करतात. धडपड करतांना, समाज एकसत्ताक रहातो किंवा बहुजनसत्ताक रहातो, चातुर्वर्ण्याची संस्था स्वीकारतो किंवा एकजातीनेंच रहातो, वगैरे समाजाचीं रूपें पाहण्याचा ह्या शास्त्रज्ञांचा हव्यास असतो. ह्या पद्धतीला समाजाच्या धडपडीचा विचार करण्याची शारीरिक पद्धत म्हणून संज्ञा आहे. (३) समाज कोणतेंहि रूप घेवो किंवा कोणतेंहि चरित्र आचरो, ह्या रूपाचीं किंवा चरित्राचीं लक्षणें काय आहेत एवढ्याचेंच निदान करण्याचा कित्येकांचा संकल्प

असतो ह्या पद्धतीला लाक्षणिक पद्धति असें नांव देतां येईल. (४) ह्या तिन्ही पद्धतींहून निराळी अशी चवथी एक पद्धत आहे. हींत समाजाच्या चरित्राकडे, शरीराकडे किंवा लक्षणांकडे सर्वस्वी लक्ष देण्याचा विचार नसून ज्यांचीं हीं चरित्रें, शरिरें किंवा लक्षणें असतात त्या समाजाच्या चालकाची दृष्टी कोणीकडे आहे त्याचा विचार केलेला असतो. ह्या पद्धतीला आत्मिक किंवा तात्त्विक किंवा वैवेकिक पद्धति असें नांव आहे. ह्या पद्धतींत समाजाचा व मनुष्याचा चालक जो आत्मा त्याच्या घडपडीचा विचार केलेला असतो. आत्म्याचा स्वभाव काय, रूप काय, कार्य काय, अंत्य हेतू काय, वगैरे प्रश्नांचा ऊहापोह करून, त्यावरून समाज कोणीकडे जात आहे ह्याचें विवेचन करण्याचा ह्या पद्धतीचा मुख्य हेतू असतो. ह्या चार पद्धतींना (1) Historical, (2) Morphological, (3) Physiological व (4) Psychological किंवा Philosophical किंवा Rational अशीं अनुक्रमें यूरोपियन लोक नावें देतात. पैकीं चवथी जी आत्मिक किंवा तात्त्विक किंवा वैवेकिक पद्धति तिचा अवलंब दासांनीं आपल्या दासबोधांत केला आहे. ह्या पद्धतीचा अवलंब यूरोपांत श्लेगेल, हेगेल, वगैरे तत्त्वज्ञानीं केलेला प्रसिद्ध आहे. जो जो म्हणून तत्त्वज्ञानाच्या म्हणजे आत्मज्ञानाच्या पाठीमागें लागला तो तो ह्याच पद्धतीचा अवलंब करील हें उघड आहे. मनुष्य म्हणजे जर सर्वस्वी आत्मा आहे, तर मनुष्याच्या कोणत्याहि हालचालींचा विचार करावयाचा म्हणजे त्याच्या आत्म्याच्या दृष्टीनें तो केला पाहिजे. अन्य दृष्टीनें करणें केवळ एकदेशी होईल. अन्य दृष्टीनें विचार करणें नाना तऱ्हांनीं अत्यंत उपयोगाचें आहे. परंतु मानवसमाजाच्या घडपडीचा अंत्य हेतू काय ह्याचा जर विचार करावयाचा असेल तर ह्या आत्मिक किंवा तात्त्विक पद्धतीचाच स्वीकार करणें भाग पडतें.

पहिल्या तीन पद्धतींचा अवलंब ज्या शास्त्रज्ञांनीं केला त्यांच्या मतें सुखवृद्धि, अर्थवृद्धि, शरीरसंरक्षण, विद्यावृद्धि, राजपुरुषाच्या सुखाचें साधन, वगैरे हेतू समाजाच्या किंवा राज्याच्या घडपडीचे अंत्य हेतू होत. ह्याच्याहि पुढें जाऊन, राष्ट्रीय गुणांची पूर्ण वृद्धि करणें हा समाजाचा किंवा राज्यस्थापनेचा मुख्य व अंत्य हेतू असतो, असे ब्लंश्ली वगैरे इतिहासज्ञ व राजनीतिज्ञ प्रतिपादन करतात. परंतु एकंदर सर्व मानवजातीचा ही प्रचंड व अव्याहत घडपड करण्यांत अंत्य हेतू काय ह्याची परीक्षा ह्या शास्त्रज्ञांच्या हातून होणें शक्य नसतें. कारण, वर सांगितल्याप्रमाणें, ते समाजाच्या बाह्य व आंतर उपाधींकडेच तेवढें लक्ष देतात. ह्या उपाधींना झाडून टाकून शुद्ध आणि विमळ जें निरुपाधिक आत्मस्वरूप त्याकडे हे लोक लक्ष देत नाहींत. त्याकडे लक्ष देऊन मानवसमाजाच्या घडपडीचा ज्यांनीं विचार केला आहे अशांच्यापैकीं हेगेल्, ह्या तत्त्वज्ञाचे विचार समर्थांच्या विचारांशीं बरेच जमतात. हा तत्त्वज्ञ वेदान्ती असून अध्यात्मदृष्टीनें त्यानें Philosophy of

History ह्या ग्रंथांत मानवसमाजाच्या अंत्य हेतूचें विवरण केलें आहे. त्याचा सारांश खालीं देतों. व दासांच्या निरूपणाशीं त्याची तुलना करून दाखवितों.

हेगेलचें ऐतिहासिक तत्त्वज्ञान.

हेगेलचें मत येणेंप्रमाणें आहे. हें जग आत्मा व माया ह्या दोन घटकांचें बनलेलें दिसतें. जें जें कांहीं चित्स्वरूप असतें तें तें आत्मा होय; व जें जें कांहीं पंचभूतात्मक असतें तें तें माया होय. मानवसमाजाच्या इतिहासांत पंचभूतांचें म्हणजे नद्या, डोंगर, हवा, पाणी, वगैरेंचें महत्त्व बरेंच असतें. परंतु ह्या मायात्मक पंचभूतांपेक्षां हजारों पटीनें आत्म्याचें महत्त्व मानवेतिहासांत जास्त आहे. तेव्हां ह्या प्रधानघटकात्मक आत्म्याच्या प्रगतीचा व मूर्त अवताराचा जो इतिहास त्यालाच मानव इतिहास असें नांव देणें योग्य आहे. मायेचें मुख्य लक्षण जडता, परतंत्रता किंवा बद्धता आहे; व आत्म्याचें मुख्य लक्षण सूक्ष्मता, स्वतंत्रता किंवा मोक्ष आहे. आत्मा स्वयंभू, स्वतंत्र व स्वसंवेद्य आहे म्हणजे स्वतः स्वतःला जाणणारा आहे. मोक्ष, मुक्ति किंवा स्वतंत्रता हें जें आत्म्याचें मुख्य रूप त्या रूपाचा शोध आत्मा करीत असतो हा शोध करण्याचा जो प्रयत्न त्यालाच मानव-इतिहास ही संज्ञा आहे.

हेगेल पुढें म्हणतो, ह्या इतिहासाचें सूक्ष्म निरूपण केलें असतां असें दिसतें कीं, आपण सर्व माणसें मुक्त आहों किंवा मुक्त होण्यास लायक आहों हें प्रस्तुतच्या युरोपियन म्हणजे जर्मन समाजाला कळलें आहे. ग्रीक व रोमन लोकांना कांहीं मनुष्यें मुक्त होण्याला लायक आहेत एवढेंच कळलें होतें. आणि पूर्वेकडील हिंदू, चिनी, वगैरे जे लोक आहेत व होते त्यांना एकच मुक्त आहे इतकेंच माहीत आहे व होतें. आत्म्याच्या मुक्तस्वरूपासंबंधानें ह्या तीन समाजांचे हे असे निरनिराळे विचार असल्यामुळें, यूरोपियन लोक पूर्ण स्वतंत्र आहेत, ग्रीक व रोमन लोक अंशतः स्वतंत्र होते, व हिंदू आणि चिनी लोक पूर्ण परतंत्र किंवा बद्ध आहेत.

येणेंप्रमाणें बद्धता, मुमुक्षा आणि मुक्ति हा आत्म्याच्या इतिहासाचा म्हणजे जगाच्या इतिहासाचा क्रम आहे. अर्थात्, मानव समाजाच्या घडपडीचा अंत्य हेतू मुक्ति, मोक्ष किंवा स्वतंत्रता हा आहे. ही स्वतंत्रता, हा मोक्ष, ही स्वसंवेद्यता म्हणजेच आत्म्याची तत्ता किंवा तत्त्व होय. ह्या तत्त्वाला जाऊन मिळण्याला मुमुक्षू आत्मा, धर्म, निति आणि राज्य हीं तीन रूपें धारण करतो. पैकीं तिसरें रूप जें राज्य त्याच्या चरित्राला राजकीय इतिहास हें नांव आहे.

आत्मा राज्यरूपानें मूर्त होऊन अवतीर्ण झाला म्हणजे त्याची स्वतंत्र स्थिति प्राप्त करून घेण्याचा मार्ग सिद्ध झाला. हा मार्ग सिद्ध करणारे जे सीझर, नापोलियों, वगैरे वीरपुरुष त्यांच्या ठायीं असणाऱ्या राजस, तामस व सात्विक गुणांचे परिणाम जगाच्या उद्धाराला व प्रगतीला म्हणजे आत्म्याला आपल्या तत्तेकडे अथवा तत्त्वाकडे म्हणजे

पूर्ण स्वातंत्र्याकडे नेण्याला कारणीभूत होतात. ह्याच लोकांना अवतारी किंवा वीर-पुरुष अशी संज्ञा आहे.

राज्य म्हणजे ज्याअर्थी परमात्म्याचें किंवा जीवात्म्याच्या तत्तेचें अधिष्ठान अथवा मूर्त रूप आहे, त्याअर्थी तेंच राज्य उत्तमोत्तम होय कीं ज्यांत राज्याच्या हिताची दिशा तद्घटक सर्व मनुष्यांच्या हिताच्या दिशेशीं सर्वतोपरी जमते.* असा जम बसावयाला प्रत्येक मनुष्याला आत्म्याच्या तत्त्वाशीं म्हणजे परमार्थाशीं ओळख झाली पाहिजे. ही ओळख करून देण्याचें राष्ट्रांतील शिक्षणादि नाना तऱ्हांच्या संस्थांचें काम असतें. ह्या संस्थांनीं राज्यघटक ज्या व्यक्ति त्यांच्या ठायीं अध्यात्मज्ञानाकडे नेणाऱ्या सात्विक व राजस गुणांचा प्रादुर्भाव होतो. ह्या निरनिराळ्या संस्थांचा विचार हेगेलनें आपल्या Philosophy of History त केला नाहीं; परंतु दासांनीं आपल्या दासबोधांत केला आहे.

हेगेलच्या विचाराशीं दासबोधाचें साम्य

दासबोधांत व हेगेलच्या फिलाजफींत किती साम्य आहे हें वरील अत्यंत संक्षिप्त पृथक्करणावरून दिसून येईल. हेगेल व रामदास ह्यांच्या तत्त्वज्ञानांत एका स्थलीं मात्र लक्ष्यांत घेण्यासारखा एक मोठा भेद आहे. तो हा कीं, हिंदू लोकांच्या मतें एकच मुक्त आहे व बाकीचे सर्व बद्ध आहेत, अशी हेगेलनें आपली भ्रममूलक समजूत करून घेतली. हेगेलनें आपलीं इतिहासावरील व्याख्यानें १८२२ पासून १८३१ पर्यंतच्या दहा वर्षांत रचिलीं. त्यावेळीं महाराष्ट्राचा इतिहास युरोपांत मुळींच माहीत नव्हता. सतराव्या शतकांत आत्म्याच्या तत्तेचा शोध करण्याकरितां मराठ्यांनीं

---

* ह्या सिद्धान्ताचा उल्लेख प्रो. सेल्बी ह्यांनीं आपल्या पुण्यांतील एका व्याख्यानांत केला होता. परंतु तो वर्तमानकालीन स्थितीला फारसा जुळणारा होता असें प्रस्तुत लेखकाला वाटत नाहीं. राजा आणि प्रजा ह्यांच्या नीतीच्या, धर्माच्या व राज्याच्या जेव्हां एकच कल्पना असतील तेव्हां तेथें हा सिद्धान्त पूर्णपणें लागूं पडतो. राजा गोमांसभक्षक असला व प्रजा गोमांसभक्षण अनीतीचें आहे असें मानीत असली किंवा खिस्ती धर्माला परोक्ष किंवा अपरोक्ष रीतीनें प्रोत्साहन देणारा राजा असला व प्रजेचा त्या धर्माच्या विरुद्ध कटाक्ष असला, किंवा स्वजनांना पूर्ण राजकीय स्वातंत्र्य देणारा व प्रजेला अनेक प्रकारें स्वतंत्र नागरिकत्वाचे हक्क देऊं नेच्छिणारा राजा असला तर राजा व प्रजा ह्यांच्या परमार्थाची दिशा एक कशी असूं शकेल ? Nationalism कडे जगांतील निरनिराळे लोक जात आहेत, असें जें Hegel नें म्हटलें त्याकडे प्रो. सेल्बी ह्यांचें लक्ष ह्या विधानाचें प्रदर्शन करितांना गेलें नाहीं असें दिसतें.

जी अवाढव्य उलाढाल केली ती हेगेलला माहीत नव्हती. उपनिषदांप्रमाणें रामदासांचे ग्रंथ जर हेगेलच्या अवलोकनांत येते, तर आत्म्याच्या तत्त्वेचा जसा हिंदू लोकांनीं शोध चालविला त्याप्रमाणेंच ही तत्त्वा मूर्त स्वरूपानें अस्तित्वांत आणण्याचेंहि काम रामदासानें व शिवछत्रपतीनें चालविलें, हें त्याच्या लक्षांत आलें असतें.

वास्तविक प्रकार असा आहे कीं सर्व लोकांना मुक्ति शक्य आहे असें रामदासांनीं स्पष्ट म्हटलें आहे.

कोणासीच नाही बंधन, । भ्रांतिस्तव भुलले जन, ॥ (५-६-५७).

असें दासांनीं स्पष्ट विधान केलें आहे. तेव्हां महाराष्ट्राच्या इतिहासाच्या व सारस्वताच्या अज्ञानामुळें, हेगेलच्या हातून उपरिनिर्दिष्ट अवास्तव विधान नमूदलें गेलें हें सांगावयाला नकोच. शिवाय, हेगेलनें ज्याकालीं आपलीं व्याख्यानें दिलीं त्याकालीं हिंदुस्थानाची राजकीय स्थिति फारच विपरीत झालेली होती. ह्या विपरीत स्थितीचें मिल्ल वगैरे ग्रंथकारांनीं जें विपरीत वर्णन केलें त्यावरून हेगेलनें आपलीं अनुमानें बांधिलीं.

ह्या आर्यभूमींत सात्विक गुणांचा एकोणिसाव्या शतकाच्या प्रारंभास जो ऱ्हास झाला त्याच्याबद्दल महाराष्ट्रांतील लोकांना दोष दिल्यास तो एक वेळ ऐकून घेणें भाग आहे. परंतु अठराव्या शतकाच्या उत्तरार्धाच्या पूर्वी शंभर सवाशें वर्षें जो सद्गुणांचा महाराष्ट्रांत उदय झाला त्याच्याकडे ह्या लोकांनीं कानाडोळा करावा हें केवळ पक्षपाताचें लक्षण आहे. ह्या पक्षपातानें हे लोक इतके अंध व कृतघ्न होऊन जातात कीं, जें निःपक्षपाती दृष्टीला निःसंशय उत्तम आहे असें वस्तुतः वाटावें तेंहि हे लोक निंद्य व त्याज्य असें दाखविण्यांत भूषण मानतात. यूरोपांतल्यापेक्षां हिंदुस्थानांतील एखादी वस्तू मोठी असली तर तिचा मोठेपणा हाच त्यांना अवगुण वाटतो, मग जें जात्याच लहान व क्षुद्र असेल तें तसें वाटल्यास नवल काय ? भारत ईलियडापेक्षां मोठें आहे म्हणून तें वाईट आणि दुसरा बाजीराव फ्रेडरिक द ग्रेटपेक्षां लहान दिसतो, तेव्हां तो तर वाईट ठरलेलाच ! यूरोपांत योगी नाहींत म्हणून ते वाईट आणि हिंदुस्थानांत वेरुळचीं लेणीं आहेत म्हणून तींहि वाईट ! यूरोपांत नसतें तें हिंदुस्थानांत असतें किंवा यूरोपांत असतें तें हिंदुस्थानांत नसतें, म्हणून दोन्ही तऱ्हांनीं हिंदुस्थानांतील सर्वच वस्तू ह्या लोकांच्या अवकृपेस सारख्याच पात्र होतात. आणि हें कशामुळें होतें तर एक राजकीय स्वातंत्र्य नाहीं म्हणून. ह्याच दृष्टीनें हेगेलनें, one is free, असें हिंदू लोकांचें मत असतें असें अवास्तव विधान ठोकून दिलें आहे. सद्गुणांनीं सर्व लोक मुमुक्षू म्हणजे स्वतंत्र होण्याच्या लायकीचे आहेत, असें वेदान्त, गीता व रामदास पुनःपुन्हा सांगत असतां व हेगेलनें मोक्षाचा सिद्धांत वेदान्तावरून घेतला असतां, तो असे उद्गार काढतो, त्या अर्थी हा परिणाम पक्षपाताचा, दुरभिमानाचा, दुराग्रहाचा

व महाराष्ट्रेतिहासानभिज्ञतेचा आहे ह्यांत काडीचाहि संशय नाहीं असें म्हणणें प्राप्त होतें. यूरोपीयन लोकांचा हा दुराग्रह घालवावा आणि यूरोपीयन लोकांचा जो परमार्थाकडे जाण्याचा हेतू आज तीनशें वर्षें दिसत आहे तोच मराठ्यांचाहि हेतू होता हें सिद्ध करून दाखवावें, ह्या इराद्यानें अलीकडे एक ग्रंथ एका इतिहास-वेत्त्याच्या हातून लिहिला गेला आहे. तो रानड्यांचा मराठ्यांचा इतिहास होय. ह्या ग्रंथांतील कित्येक लहान मोठ्या गोष्टी तज्ज्ञांना मान्य होण्यासारख्या नाहींत. तत्रापि मराठ्यांचा इतिहास जगाच्या इतिहासांतील एक घटक होण्याच्या लायकीचा आहे, हा जो रानड्यांचा सिद्धान्त तो सर्वांना ग्राह्य होण्याच्या योग्यतेचा आहे. हा ग्रंथ शंभर वर्षांपूर्वी झाला असता, तर हेगेलसारख्या लोकांना जगाच्या इतिहासाच्या तत्त्वदर्शनांत कांहीं फेरफार करणें अवश्य झालें असतें. बाकी ह्या तत्त्वज्ञांनीं मराठ्यांच्या इतिहासाची तशी गणना केली नाहीं म्हणून ती व्हावयाची रहाते असा बिलकुल भाग नाहीं.

असो. येथपर्यंतच्या पृथक्करणावरून व तुलनेवरून, दासबोध हा ग्रंथ कोणत्या स्वरूपाचा आहे, हें स्पष्ट होण्यासारखें आहे. हा ग्रंथ ज्याला इतिहासाचें तत्त्वज्ञान म्हणतात त्याचा आहे. इतकेंच कीं ह्या ग्रंथांतील विचारसरणीची पद्धत ऐतिहासिक नसून अध्यात्म किंवा तात्त्विक आहे. परमार्थप्राप्तीशीं प्रारंभ करून नीति, धर्म व राज्य ह्या संस्थांचा उदय कसा होतो, ह्याचें निरूपण ह्या ग्रंथांत केलें आहे.

रामदास व इतर संत

ह्यावरून एवढें निष्पन्न झालें कीं, रामदास हे इतिहास तत्त्वनिरूपण करणारे महाराष्ट्रांतील प्रथम ग्रंथकार होत. एकनाथ, तुकाराम वगैरे जे साधुसंत झाले त्यांचा सर्व कल नीति व भक्ति ह्यांकडे होता. नीतीचे व भक्तीचे पवाडे गाण्यांत ह्या साधुसंतांनीं महाराष्ट्राचें मोठें हित केलें ह्यांत संशय नाहीं. परंतु राष्ट्रीय व राजकीय दिशेनें विचार करण्यांत ह्या लोकांनीं बिलकुल लक्ष घातलें नाहीं. रामदास व त्यांच्या पूर्वीच्या साधूंत हाच मोठा भेद आहे. पूर्वीचे साधू एकदेशी होते व रामदास सर्वदेशी होते. ह्याशिवाय ह्या दोघांत दुसरा मोठा भेद असा आहे कीं, पूर्वीच्या साधूंनीं ब्राह्मणांचे दोष दाखविण्याचेंच तेवढें व्रत स्वीकारल्यामुळें, चातुर्वर्ण्यघटित जो आपला महाराष्ट्रांतील समाज त्याचे पुढारी जे ब्राह्मण लोक त्यांचें महत्त्व नाहींसें करण्याकडे ह्या साधूंच्या उक्तीचें व लेखांचें पर्यवसान झालें. स्वजनांचे दोष दाखविणें हें कांहीं वाईट काम नाहीं. परंतु दोष काढणाऱ्यावर योग्य रस्ता कोणता तेंहि सांगण्याची व आचरणानें दाखविण्याची जबाबदारी असते. ही जबाबदारी नीट न ओळखिल्यामुळें, दोषाविष्करणानें मनोभंग व मानभंग होऊन, समाजांत विस्कळितपणा व बेबंदशाही मात्र माजली हा परिणाम साधूंच्या एकदेशीपणाचा झाला, तो

रामदासांच्या सर्वदेशीपणानें टळला. रामदासांनीं दोष दाखवून सुरक्षिततेचा रस्ता कोणता हें चातुर्वर्ण्यघटित समाजांतील सर्व लोकांना कारुणिकबुद्धीनें सांगून दिलें. आज हजारो वर्षांची स्थिति पाहिली तर आपला हा समाज चातुर्वर्ण्यघटित आहे हें उघड दिसत आहे. आणि हें चातुर्वर्ण्य असेंच किती सहस्रें राहील ह्याचा अंदाज होत नाहीं. तेव्हां चातुर्वर्ण्य ही गृहीत गोष्ट धरून, मग जे कांहीं दोष दाखवावयाचे व ज्या सुधारणा सुचवावयाच्या त्या देशहितेच्छूंनीं सुचविल्या पाहिजेत. यूरोपांतील समाजांचा असंतुष्ट व Socialistic कल पाहतां, त्याहि समाजाला प्रायः ह्या चातुर्वर्ण्याचाच भाग पुढें मागें आश्रय करावा लागण्याचा जर दूरदृष्टि लोकांना बराचसा संभव दिसत आहे, तर आपल्याजवळ संतोषप्रवण जी संस्था आहे ती मोडूं पाहून असंतुष्ट समाजस्थितीकडे ओढा दाखविणें केव्हांहि देशहिताचें होणार नाहीं. हीच गोष्ट लक्षांत घेऊन दासांनीं आपल्या उपदेशाची रचना केली आहे.

दासबोधाच्या स्वरूपासंबंधानें साधारणपणें संक्षेपानें जें कांहीं सांगण्यासारखें होतें तें वर अंशतः सांगितलें आहे. ह्यासंबंधानें आणखीहि बरेंच लिहिण्याजोगें आहे. तें मराठ्यांच्या सतराव्या शतकांतील इतिहासाविषयीं विचार करण्याचा प्रसंग आला तर विस्तृतपणें लिहिण्याचा विचार आहे.

दासबोधाच्या प्रकाशनांतील शुद्धाशुद्धें

आतां दासांच्या इतर प्रकरणांकडे वळूं. इतर प्रकरणांत, छपाई व शुद्धाशुद्धता ह्यासंबंधानें दासबोधाच्या मुद्रणांत जीं व्यंगें व दोष दिसले, तेच दिसतात, एवढें सांगितलें म्हणजे बस आहे. ओव्यांचे जे चरण तेंडुलकरांनीं सोडिले आहेत ते गोंधळेकरांनींहि तसेंच फुल्या घालून छापिले आहेत. माडगांवकरांनीं कठिण शब्दांचे जे चुकीचे अर्थ दिले आहेत तेच अर्थ गोंधळेकरांच्याहि ग्रंथांत असून, शिवाय आणीकहि बऱ्याच चुका आहेत. सारांश दासांच्या ग्रंथांची शुद्ध अशी एखादी आवृत्ति कोण्या विद्वानानें काढणें जरूर आहे. गोंधळेकरांच्या ग्रंथांतील अपपाठांची व अशुद्ध टिपांची मी एक लांबच लांब यादी केली आहे. परंतु तिनें जागा अडविणें इष्ट दिसत नाहीं. तरी मासल्याकरितां एखाददुसऱ्या समासांतील अपपाठ वगैरे दाखवितों.

दशक चवदा, समास १.

गोंधळेकरांच्या आवृत्तींतील अपपाठ.	मजजवळील जुन्या पोथींतील पाठ.
ओवी १ ऐका निस्पृह शिकवण	ऐका निस्पृहाची शिकवण
,, ५ कांता दृष्टीस राखूं नये	कांताद्दष्टी राखूं नये
,, ८ भिक्षेविषयीं लाजूं नये	भिक्षेविशी लाजूं नये

,, १४ कदाकाळीं	कांहीं केल्या
,, १७ उड़वितां उडो नये	उडवितां उडवूं नये
,, १८ चालवितां चालूं नये	चाळवितां चळों नये
,, २० भरंवसा कोणास देऊं नये	प्रतिग्रह घेऊं नये
अंगीकार करूं नये	सभेमध्यें बैसो नये
नेमस्तपणाचा	सर्वकाळ
,, २३ एकान्त मोडो नये	एकान्त मोडो देऊं नये
,, २४ लोकनिंद्य तें करूं नये	लोकलाज धरूं नये
,, २८ न मानी त्यास सांगो नये	न मनी त्यास सांगो नये
,, ३२ दाटून उपदेश देवूं नये	दाडून उपदेश देवूं नये
,, ३४ कठिण अभ्यास मोडूं नये	कठिण अभ्यास सांडूं नये
,, ३६ मुक्तपणें कदा	मुक्तपणें भरी
,, ४० निःसंगपणाचे	निसुगपणाचें
,, ४१ आपण पुढें	आपणास पुढें
,, ४७ नेणपण सांडू नये	नेणपण सोडूं नये
,, ४८ कारभारीं पडो नये	कारबारीं पडो नये
,, ५० मध्यवर्ती घडो नये	मध्यावर्ती घडो नये
,, ५१ प्रपंच परहस्तीं जाऊं नये	प्रपंचप्रस्तीं जाऊं नये
,, ५१ पाहण्यासरिसें घेऊं नये	पाहुण्यासरिसें घेऊं नये
,, ५२ भोग राहणें बहुवसें	भोग राहाण बहुवसें
,, ५४ बारे (!) अन्न खाऊन पडो नये	वारें अन्न खाऊं नये
,, ५६ दिलें तरी घेऊं नये	दिल्हा तरी घेऊं नये
इनाम निस्पृहें	ईनाम निस्पृहें
,, ५९ आळस दृष्टीस आणूं नये	आळस दृष्टीं आणूं नये
,, ६० उपाधिमध्यें दडो नये	उपाधिमद्धें पडो नये
उपाधि अंगीं जडो नये	उपाधि आंगीं जडोनि ये
निःसंगपणें	निसंगळपणें
,, ६१ बहु उपाधि धरूं नये	बहुत उपाधि करूं नये
,, ६२ बहु कष्ट करूं नये	बहुत कष्ट करूं नये
अशुद्ध खोटें	असुदें खोटें
,, ६८ मुक्तमार्ग कामा नये	मुक्तमार्ग करूं नये
,, ७१ अलक्ष्य वस्तू लक्षितां नये	अलक्ष्य वस्तू लक्ष्या नये
,, ७३ ज्ञातेविण कामा नये	ज्ञानेविण कामा नये

अतर्क्य वस्तू तर्कूं नये	अतर्क्य वस्तू तर्का नये
,, ७७ अबद्ध पोथी लिहो नये	अबद्ध पोथी लेहो नये
अबद्ध कदा वाचूं नये	अबद्ध पोथी वाचूं नये
,, ७८ निस्पृह वक्तृत्व सोडूं नये	निस्पृहें वक्तृत्व सोडो नये

मजजवळील पोथींतील ह्या समासांत ८० ओव्या आहेत. गोंधळेकरांच्यांत ७९ आहेत.

दशक चवदा, समास ७

ओवी ३५ हें ब्राह्मणास कळेना	हें ब्राह्मणांस कळेना
त्याची वृत्ति चळेना	त्यांची वृत्तिच वळेना

गोंधळेकरांच्या व बाकीच्या सर्व आवृत्तिकारांच्या पुस्तकांत असे अपपाठ जर बहुतेक दर ओवीमागें आहेत, तर त्या ओव्यांवर दिलेल्या अर्थनिर्णायक टिपा कोणत्या किंमतीच्या असतील तें स्पष्ट करून सांगावयास नको. गोंधळेकरांचे अपपाठ घेऊन वाचकांनीं अर्थ करावयाला जावें म्हणजे त्यांना त्यांतील रहस्य कळेल. शिवाय सतराव्या शतकांतील लोक जसें मराठी लिहीत होते तसेंच तें सध्या छापिलें पाहिजे. सध्यांच्या आपल्या पद्धतीप्रमाणें छापणें म्हणजे मूळ ग्रंथाचा रूपभंग करणें होय.

दासबोधाची बरीच जुनी म्हणजे दोनशें वर्षांपूर्वीची पोथी मजजवळ असल्यामुळें व तीहि परंपरागत असल्यामुळें, दासबोधांत क्षेपक प्रकरणें किंवा ओव्या शिरल्या असण्याचा संभव अगदींच कमी आहे, किंबहुना, मुळींच नाहीं म्हटलें तरी चालेल. एकवीस समासींत दासबोधांतील कांहीं विषय व ओव्या आहेत. विस्तृत दासबोध वाचण्यास ज्यांना अवकाश नसेल त्यांच्याकरितां हा ग्रंथ लिहिला आहे. इतर प्रकरणासंबंधीं सध्यां विशेष कांहीं नमूद करण्यासारखें नाहीं. स्वामींच्या हनुमंतस्वामींनीं सांगितलेल्या चरित्रासंबंधीं मात्र एक बाब नमूद करतों. हनुमंतस्वामींनीं दासांचा वंशवृक्ष दिला आहे. तो वंशवृक्ष, दर पुरुषाला २५ किंवा २२ वर्षें धरिलीं असतां ५०० वर्षें व्यापितो. समर्थ इ. स. १६०८ त जन्मले, तेव्हां त्यांचा पहिला मूळपुरुष ११०० च्या सुमाराला हयात असावा असें दिसतें. आतां बखरींतल्या वंशावळींत मूळ पुरुष ९ व्या शतकांत हयात होता असें म्हटलें आहे. म्हणजे मूळ पुरुषापासून रामदासांपर्यंत ७०० वर्षें गुदरतात. हीं इतकीं वर्षें व्यापण्याला बखरींत दिल्या आहेत त्याहून बऱ्याच जास्त पिढ्या झाल्या असल्या पाहिजेत. तेव्हां वंशावळ बराबर दिली नाहीं हें उघड आहे.

रामदास व शिवाजी यांचा संबंध

दासांचीं चरित्रें प्रसिद्ध असल्यामुळें, त्यांच्यासंबंधानें कालनिर्णयाचें खटलें रहात नाहीं. त्यांच्या चरित्रांतील कोणतीं कृत्यें केव्हां घडलीं हें अनुक्रमानें दाखवून देण्याचें

काम मात्र सध्यांच्या चिकित्सकाकडे येतें. तें यथास्थित करावयाला गंगाधरस्वामिकृत शके १६४० तील बखर छापिली गेली पाहिजे. तोंपर्यंत ह्या अनुक्रमाच्या चिकित्सेंत न पडणें बरें. बाकी राहिलेलें जें दासांच्या ग्रंथांचें व विचारांचें राष्ट्रीय महत्त्व त्याचें दिग्दर्शन प्रस्तुतच्या निबंधांत केलें आहे. त्यावरून तत्कालीन पुढारी पुरुषांवर व सामान्यजनांवर दासांच्या विचारांचा काय परिणाम झाला त्याचा अंदाज बांधतां येईल. तसेंच, शिवाजीचा व रामदासाचा कांहीं एक म्हणण्यासारखा संबंध नव्हता, सामान्य गुरूपदेश घेण्यापुर्तेंच रामदासाला शिवाजीनें गुरू केलें, वगैरें निरर्गल प्रलाप जे सध्यां कित्येक लोकांच्या तोंडून ऐकूं येतात त्यांत कितपत अर्थ आहे तेंहि कळेल. रामदास प्रतापगडच्या भवानीला भेटण्यास गेले तेव्हां, माझ्या राजाला राख, अशी त्यांनीं शिवाजीसंबंधानें देवीपाशीं मागणी केली. परळीवरील उत्सवांत शिवाजीनें केलेलीं पदें व अभंग म्हणण्याची अद्यापिहि चाल आहे. ह्या दोन गोष्टी लक्ष्यांत घेतल्या म्हणजे रामदासाचा व शिवाजीचा किती निकट संबंध होता तें स्पष्ट होईल. परंतु सिद्ध गोष्टीची सिद्धि करीत बसण्यांत कांहीं हांशील नाहीं. जोंपर्यंत दासबोध हा ग्रंथ विद्यमान आहे व मराठ्यांनीं सतराव्या शतकांत स्वतंत्र राज्य स्थापिलें ही गोष्ट इतिहासांत नमूद आहे, तोंपर्यंत रामदासाचा व शिवछत्रपतीचा संबंध नव्यानें सिद्ध करूं जाण्याची, अव्यवस्थित चित्तांखेरीज बाकीच्या लोकांना, कांहीं आवश्यकता आहे असें वाटत नाहीं.

दासबोधांत योगमार्ग कां प्रतिपादिला नाहीं ?

वरील सारांश, निरूपण, पृथक्करण व टीका पाहून एक शंका उद्भवण्यासारखी आहे. ती ही कीं भक्तिमार्गाचा, ज्ञानमार्गाचा व कर्ममार्गाचा विस्तृत प्रपंच दासांनीं जसा केला तसा योगमार्गाचा कां केला नाहीं ? किंवा समर्थांना योगमार्ग परमार्थाच्या प्राप्तीला योग्य नाहीं असें वाटत होतें कीं काय ? ह्या शंकेचें उत्तर असें आहे कीं, मूळ वेदान्तांत योगमार्गाचें महत्त्व विशेषसें मानिलेलें नाहीं. समर्थ कट्टे अद्वैतवेदान्ती होते. तेव्हां त्यांनीं योगमार्गाचा प्रपंच केला नाहीं हें रास्तच आहे. समर्थांनीं योग-मार्गाचा प्रपंच केला नाहीं इतकेंच नव्हे, तर केवळ हटयोगाचा त्यांनीं उपहास केला आहे. आमचा गुरु पाण्यावर तरून जातो, जमिनींत पुरून घेतो, बीरमंत्र जाणतो वगैरे फटके असद्गुरूंना दासांनीं मारिले आहेत. हटयोगाच्या बलावर अद्भुत चमत्कार करूं जाणाऱ्या भोंदूंचा समर्थांना फार तिटकारा असे. शिवाजी व रामदास हीं माणसें फसवेगिरीला—विचारांत किंवा आचारांत—बिलकुल भीक घालणारीं नव्हतीं. योगाचें निरूपण दासबोधांत न होण्याला हें एक कारण होतें. दुसरें कारण असें होतें कीं, योगाची तालीम करणें प्रायः सामान्यजनसमूहाला शक्य नसतें. निर्वात व निवांत असा प्रदेश, नेमस्त व सात्त्विक असा आहार, आणि मूक व शांत अशी वृत्ति, ज्याला

प्राप्त झाली तोच ह्या नाजूक व मिनतवारीच्या तालमींतील कसरत करूं शकतो. ही कसरत धांगडधिंग्याच्या व आटापिटीच्या ह्या संसारांत सर्व माणसांना कशी साधणार व साधून प्राप्ति काय ? तेव्हां योगाचें साधन समर्थांनीं उपदेशिलें नाहीं तें यथायोग्यच केलें यांत संशय नाहीं. स्वतः समर्थ ह्या तालमींत कधीं पडत नसत व अद्भुत चमत्कार करीत नसत. समर्थांनीं अद्भुत चमत्कार केल्याचें हनुमंतस्वामीनें लिहिलें आहे. परंतु तो सर्व हनुमंतस्वामीच्या कल्पनेचा खेळ होय. समर्थांचे अद्भुत चमत्कार सांगण्यांत हनुमंतस्वामीनें आपल्या स्वतःच्या भोळेपणाचें मात्र हास्यकारक प्रदर्शन केलें आहे. समर्थांच्या काळांत व हनुमंतस्वामीच्या काळांत अंतर केवढें पडलें होतें तें ह्यावरून उत्तम दिसतें. समर्थांच्या वेळची मंडळी धर्मनिष्ठ होती व हनुमंतस्वामीच्या वेळची मंडळी धर्मभोळी होती. समर्थांचा काळ विचक्षणपणाचा समजला तर, हनुमंतस्वाम्रीचा काळ भोळसटपणाचा समजावा. सारांश, योगमार्ग परमार्थाच्या प्राप्तीला विशेषसा श्रेयस्कर नाहीं, अशी समर्थांची समजूत असावी असें दिसतें. कसरतीच्या योगापेक्षां भक्तियोग व ज्ञानयोग समाजाच्या जास्त हिताचे आहेत. असें दासांचें ठाम मत होतें.

मराठींतील या वाङ्मयाचे तीन घटक व त्यांचा संबंध

गेल्या ऐशीं वर्षांत महाराष्ट्रांत जे गद्य ग्रंथ झाले, त्यांत संख्येच्या मानानें कादंबऱ्यांना अग्रस्थान देणें जरूर आहे. युनायटेड् स्टेट्स्, इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी, रशिया, इटली वगैरे पश्चिमेकडील एकेका देशांत दर वर्षाच्या बारा महिन्यांत नाना प्रकारच्या कादंबऱ्यांचा जितका उद्भव होतो, तितक्याच्या निमपट देखील आपल्या ह्या देशांत गेल्या सबंद ऐशीं वर्षांत झाला नाहीं. अशी जरी आपल्या इकडील स्थिति आहे, तत्रापि गेल्या ऐशीं वर्षांतील महाराष्ट्रांतील एकंदर सारस्वताचा बराच मोठा भाग कादंबरीमय असल्यामुळें, हा भाग केवळ दुर्लक्ष करण्यासारखा नाहीं हें उघड सिद्ध होतें. हें कादंबरीमय सारस्वत (१) लहान गोष्टी, (२) अद्भुत कथा व (३) वस्तुस्थित्यादर्शक कथानकें ह्या तीन घटकांनीं बनलेलें आहे. पश्चिमेकडेहि ह्या असल्या सारस्वताचे हे असेच तीन घटक असतात व ह्या तीन घटकांच्या उद्भवाची ऐतिहासिक परंपराहि तिकडल्याप्रमाणेंच आपल्या इकडेहि तशीच असलेली दृष्टीस पडते. म्हणजे इसाबूनीति, बाळमित्र, पंचोपाख्यान, वेताळपंचविशी वगैरे लहान लहान गोष्टींचा प्रथम उदय झाला; नंतर मुक्तामाला, मंजुघोषा, विचित्रपुरी वगैरे अद्भुत कथा जन्मास आल्या; आणि शेवटीं अलीकडेस, आजकालच्या गोष्टी, पण लक्षांत कोण घेतो, जग हें असें आहे, नारायणराव आणिं गोदावरी, शिरस्तेदार, वेणू, वाईकर भटजी वगैरे वस्तुस्थित्यादर्शक किंवा वास्तविक कथानकें लिहिलीं गेलीं. आपल्या इकडील कादंबरीची ही अशी तीन पाह्यऱ्यांची परंपरा आहे.

ह्या परंपरेंतील पहिल्या पाहिरीवरील लहान गोष्टींत पुढील दोन पाह्यऱ्यांचीं मुळें दृष्टीस पडतात. अद्भुत कादंबऱ्यांची जी दुसरी पाहिरी सांगितली तिचे पूर्वज इसाबनीति, पंचोपाख्यान वगैरे लहान लहान अद्भुत कथा होत. तसेंच आजकालच्या गोष्टी वगैरे वास्तविक कथानकांचा जो वर उल्लेख केला आहे त्यांचा स्नेहसंबंध बाळ-मित्राशीं असलेला दृष्टोत्पत्तीस येतो. पुढील दोन पाह्यऱ्यांशीं मागील दोन पाह्यऱ्यांचा हा जो संबंध दाखविलेला आहे, त्यावरून एवढें स्पष्ट होतें कीं पहिल्या प्रथम ज्या लहान गोष्टी प्रसिद्ध झाल्या त्यांतच अद्भुत व वास्तविक असे दोन प्रकार होते. त्याच दोन प्रकारांचा पुढें परिपोष होऊन, एका प्रकारापासून अद्भुत कादंबऱ्यांचा व दुसऱ्या

प्रकारापासून वास्तविक कथानकांचा प्रादुर्भाव झाला. जीवसृष्टींतील कनिष्ठ प्राण्यांत द्वैधीभावानें संतानवृद्धी होतांना आपण पहातों तोच प्रकार ग्रंथसृष्टींत सर्वत्र होतो व आपल्या इकडे हा प्रत्यक्ष झालेला आपण पहात आहों. अद्‌भुत कादंबऱ्यांची व वास्तविक कथानकांची ही वंशावळ पाहिली म्हणजे असाहि पूर्वग्रह मनांत उत्पन्न होतो कीं, पूर्वजांचे गुणदोष प्रजेच्या ठायीं जीवसृष्टींत जसे दृष्टीस पडतात, तसेंच ग्रंथसृष्टींतहि पडले पाहिजेत. वरील तीन पाह्यऱ्यांतील पूर्वग्रंथांचीं व उत्तरग्रंथांचीं लक्षणें ताडून पाहिलीं म्हणजे हा पूर्वग्रह सिद्धान्तवत् होण्याच्या लायकीचा आहे असें वाटूं लागतें.

परभाषेंतून घेतलेलें या वाङ्मय प्रकारांचें ऋण

बाळमित्र हा छोटेखानी गोष्टींचा ग्रंथ फ्रेंचमधून इंग्रजींत उतरलेल्या एका नामांकित ग्रंथाचा उत्कृष्ट मराठी तर्जुमा आहे. त्याप्रमाणेंच, जग हें असें आहे, वाईकर भटजी, पुरी हौस फिटली, रायवाड्यांतील कट, मथुरा, नाहींचना ऐकायचें, शिलादित्य, करण वाघेला, वगैरे वास्तविक कथानकें ही कित्येक इंग्रजी व फ्रेंच सामान्य किंवा चांगल्या ग्रंथांचीं रूपांतरेंच आहेत. इसाबनीति, पंचोपाख्यान, वेताळपंचविशी, वगैरे छोटेखानी अद्‌भुत गोष्टी ग्रीक व संस्कृत ग्रंथांचीं दूरचीं रूपान्तरें आहेत. त्याप्रमाणेंच, अरबी भाषेंतील सुरस गोष्टी, अजब ऐनेमहाल, रासेलस, हातिमताई, वगैरे अद्‌भुत कादंबऱ्याहि कित्येक परदेशी नामांकित ग्रंथांचीं उत्कृष्ट भाषान्तरें आहेत. सारांश, अलीकडील बऱ्याच अद्‌भुत कादंबऱ्या व वास्तविक कथानकें पूर्वींच्या अद्‌भुत व वास्तविक गोष्टींप्रमाणेंच परभाषेंतील ग्रंथांचीं रूपान्तरें, भाषान्तरें किंवा सूचनान्तरें आहेत.

हे ग्रंथ रूपान्तर, भाषान्तर, किंवा सूचनान्तर आहेत म्हणून त्यांच्यांत कांहीं अर्थ नाहीं असें मात्र कोणी समजूं नये. कारण परभाषेंतून उतरलेल्या ह्या ग्रंथांपैकीं कांहीं इतके उत्कृष्ट उतरलेले आहेत कीं, ते ग्रंथ आज दोन तीन पिढ्या आबालवृद्धांच्या करमणुकीचे विषय झालेले आहेत व मराठी भाषेंतील कादंबरी ग्रंथांत त्यांची उत्तमोत्तमांत गणना होत आहे. यद्यपि ह्या ग्रंथांची अशी योग्यता आहे तत्रापि त्यांच्यांत एक मोठी थोरली गोम आहे. ती गोम ही कीं, ही ग्रंथोत्पत्ति आमच्या अस्सल प्रतिभेची अस्सल प्रजा नव्हे. जो अखंड भेद अस्सल व नक्कल, औरस व दत्तक, स्वकीय व परकीय, घरचें व बाहेरचें, मालकीचें व उसनें, ह्यांच्यांत आहे, तोच अभेद्य द्वैधीभाव ह्या परभाषेंतील वर्तमान भाषांतरांत व स्वभाषेंतील स्वतःच्या प्रतिभेनें निर्मिलेल्या स्वतंत्र ग्रंथोत्पत्तींत आहे. आमचा आत्मा, आमचा स्वभाव, आमचा उत्साह, आमची महत्त्वाकांक्षा, आमचा पुरुषार्थ ह्या नकलेंत, ह्या पाहुण्यांत, ह्या दत्तकांत बिलकुल दिसावयाचा नाहीं. दुसऱ्याचें सुंदर पोर पाहून जें कौतुक

वाटणें शक्य आहे, त्याच्याहून लाखोपटीनें अनिवार असा उमाळा स्वतःच्या गोजिरवाण्या मुलाचें तोंड पाहून सहजच येतो, ही तर प्रत्यक्षाची गोष्ट आहे, आणि हीच कथा ह्या उसन्या ग्रंथांची आहे.

ह्या ग्रंथापासून मनाची करमणूक होत नाहीं असें नाहीं. कांहींशी होते. अरबी गोष्टींतील सिंदबादचीं संकटें किंवा रासेलसांतील तत्त्ववेत्त्याचीं भाषणें ऐकून चित्ताचें रंजन होतें. परंतु भोजाचीं किंवा विक्रमादित्याचीं संकटें व चंद्रापीडाचीं किंवा हरिश्चंद्राची भाषणें ऐकून जी मनाची स्थिति होते, तिच्या पासंगालाहि वरचें रंजन लागणार नाहीं. एखाद्या भावी मराठी ग्रंथकारानें, सिंदबाद, जिल्ब्लास, डॉन किझोट, गार्गांचुआ, वगैरेसारखीं अद्भुत पात्रें आपल्या कल्पनासृष्टींतून निर्माण केलीं व तीं महाराष्ट्रांतील अद्भुत सृष्टींतीलच आहेत अशी सहृदय वाचकांची खात्री झाली, तर जो पिढ्यान्पिढ्या करमणुकीचा, सदुपदेशाचा, व अंतःस्वभावाच्या समाधानाचा सांठा प्राप्त होणार आहे, तो ह्या आगंतुक ग्रंथांतील परदेशी पात्रांच्या उपलब्धीनें कधीं तरी होईल काय ? स्वतःच्या कमाईच्या फळांत जी गोडी आहे ती परक्यापासून घेतलेल्या उसन्यांत कशी यावी ?

असो. मराठींत झालेले बरेच कादंबरीग्रंथ हे असल्या योग्यतेचे आहेत. परंतु स्वतंत्र असेहि कांहीं कादंबरीग्रंथ मराठींत अगदींच नाहींत असें नाहीं. ह्या स्वतंत्र ग्रंथांपैकीं कांहीं अद्भुत आहेत व कांहीं वास्तविक आहेत. अद्भुतांपैकीं प्रसिद्ध असे म्हटले म्हणजे, मुक्तामाला, रत्नप्रभा, मंजुघोषा, विचित्रपुरी वगैरे; व वास्तविकांपैकीं, आजकालच्या गोष्टी, पण लक्षांत कोण घेतो, वेणू, नारायणराव व गोदावरी, वगैरे वगैरे. पैकीं अद्भुताचा प्रथम विचार करतों.

अद्भुताचा उद्गम कल्पनेंतून

सृष्टीचा सर्व बाजूंनीं परिचय करून घेण्याचा प्रयत्न सामान्यतः सर्व जीवमात्राचा विशेषतः मनुष्यमात्राचा आज लाखो वर्षें चाललेला आहे. ह्या प्रयत्नांत त्याला दिवसेंदिवस असें कळून येत चाललें आहे कीं कार्यकारणांच्या शृंखलेनें सर्व सृष्टि बद्ध झालेली असावी. परंतु ह्या शृंखलेचा एखादा दुसराच तेवढा दुवा आपल्याला कळलेला आहे व बाकींच्या सर्व दुव्यांसंबंधीं आपलें बहुतेक अज्ञानच आहे, अशीहि मनुष्याची खात्री झालेली दिसते. ज्या दुव्यासंबंधीं अज्ञान आहे त्यांच्याशीं मनुष्याला वस्तुसृष्टींत ढवळाढवळ करता येत नाहीं ही तर सिद्धान्तवत् गोष्ट आहे. आतां जेथें सृष्टीचा कांहीं भाग कार्यकारणाच्या शृंखलेनें बद्ध आहे व कारणांची उपस्थिति केली असतां कार्याची उपस्थिति नियमानें होईल अशी मनुष्याची खात्री असते तेथें देखील कारणांची जुळवाजुळव करण्याचें सामर्थ्य नसल्यामुळें कार्याची उपलब्धि हवी तेव्हां होत नाहीं, असा मनुष्यमात्राचा रोजचा अनुभव आहे. सारांश, ह्या अनंत

सृष्टींत ज्यांच्यावरती मनुष्याचा काडीचाहि ताबा नाहीं, ज्यांच्याशीं त्याला यत्किंचितहि ढवळाढवळ करतां येत नाहीं, अशाच बहुतेक सर्व मूर्तामूर्त वस्तू आहेत. ही मनुष्याच्या दुर्बलतेची जी खात्री तीच अद्‌भुताच्या मुळाशीं आहे. साक्षात् सृष्टींत, वास्तविक सृष्टींत आपलें कांहीं एक चालत नाहीं अशी मनाची बालंबाल खात्री झाली म्हणजे मग मनुष्यप्राणी कल्पनेच्या सृष्टींत, अद्‌भुताच्या सृष्टींत आपला ताबा मनमुराद चालवूं लागतो. वास्तविक सृष्टींतला हा गुलाम कल्पना-सृष्टींत केवळ अरेरावी माजवितो. वास्तविक सृष्टींत जें निव्वळ असंभवनीय तें तो अद्‌भुतसृष्टींत शक्य करून सोडतो. अद्‌भुतसृष्टींतील ही जी अजब दुनिया तीच अद्‌भुत कादंबऱ्यांचा विषय होय. हवेंत चालणारीं माणसें, सर्वसौंदर्यसंपन्न स्त्रिया, अखिलगुणगुणालंकृत राजपुत्र, कोठेंहि न सांपडणारें रामराज्य, अशा नानाप्रकारच्या वस्तू ह्या अद्‌भुत सृष्टींत सांपडतात. ज्या ज्या वस्तूंत म्हणून ह्या वास्तविक सृष्टींत व्यंग असें सांपडतें, ती ती वस्तू अद्‌भुत सृष्टींत सांग अशी हटकून आढळते. समुच्चयानें विधान करावयाचें म्हटलें म्हणजे, वास्तविक सृष्टींतील अपूर्णता अद्‌भुत सृष्टींत पूर्णतेप्रत पोहोंचलेली आढळते.

काल्पनिक सृष्टि व सारस्वत

ह्या अद्‌भुत सृष्टीचीं उदाहरणें पृथ्वीवरील सर्व राष्ट्रांच्या संस्थांत, विचारांत व सारस्वतांत मुबलक आहेत. धर्म, नीति, वेदान्त, इतिहास, गणित, नाटक, कादंबरी, चित्रकला, मूर्तिकला, स्थापत्य, कायदा, कविता वगैरे सर्व स्थलीं अद्‌भुताचा प्रादुर्भाव झालेला दिसतो. धर्मांतील ईश्वराची कल्पना, नीतींतील आत्यंतिक सुखाची कल्पना, वेदान्तांतील सच्चिदानन्दाची कल्पना, इतिहासांतील सुराज्याची कल्पना, गणितांतील शून्याची कल्पना, नाटकांतील अघटित घटना, चित्रकलेंतील सौंदर्यातिशयाची कल्पना, कायद्यांतील हक्काची कल्पना, ह्या सर्व कल्पना वास्तविक सृष्टींतील नसून निव्वळ अद्‌भुत सृष्टीपैकीं आहेत. आणि असें असून, म्हणजे वास्तविक सृष्टींतील नसून त्यांच्याइतका वास्तविकपणा दुसरा कोठेंच नाहीं. सर्व संस्थांच्या, विचारांच्या व शास्त्रांच्या मूळाशीं ह्या कल्पनाच आहेत. असा हा ह्या अद्‌भुत कल्पनांचा महिमा आहे ! व म्हणूनच जगांतील अत्यंत जुनें सारस्वत जे वेदग्रंथ त्यांच्यापासून तों तहत प्रस्तुतच्या यूरोपांतील अत्यंत भिकार अशा वास्तविक कादंबरीपर्यंत ह्या कल्पनांचा स्पर्श कमजास्त प्रमाणानें असलेला आढळतो.

कमींत कमी असा अद्‌भुताचा स्पर्श पहावयाचा असल्यास तो गणितादिशास्त्रांत अत्यंत कमी प्रमाणावर सांपडतो. शून्य, बिंदू, अणू वगैरे एकेक अद्‌भुत कल्पना ह्या गणितादि शास्त्रांचा मूलाधार आहे. ह्या मूल अद्‌भुत कल्पनांपलीकडे ह्या शास्त्रांत अद्‌भुत असें दुसरें कांहीं एक नाहीं; सर्व वास्तविक असाच प्रकार आहे. हाच न्याय व्याकरणादि

शास्त्रांनाहि लागूं पडतो. शंकराच्या डमरूंतून अथवा मनुष्याच्या उच्चाराच्या नाड्यांतून जो ओंकार निघाला तोच सर्व शब्दजाताचा अद्‌भुत मूलस्तंभ होय. सारांश, सांगण्याचें तात्पर्य इतकेंच कीं, जें जें म्हणून कांहीं शास्त्र ह्या संज्ञेला पात्र म्हणून आपण समजतों, तें तें सर्व एकेका अद्‌भुत कल्पनेच्या पायावर रचलेलें आहे, आणि जें जें म्हणून कांहीं शास्त्राच्या प्रांताच्या बाहेर असलेलें दिसतें त्यांत अद्‌भुताची कमजास्त रेलचेल आहे.

हा शास्त्रबाह्य प्रदेश म्हटला म्हणजे अद्‌भुताच्या अत्यंत उत्कट विहाराचें स्थल होय. काव्य, नाटक, कादंबरी, चित्रकला, मूर्तिकला, स्थापत्य, नृत्य, गान वगैरे ललितकला ह्या आपल्या अद्‌भुत देवीचीं माहेरघरें होत. ह्या ललितकृतींचा एकेक अद्‌भुत कल्पना घेऊन निर्वाह लागत नाहीं. त्यांना प्रत्येक संकटसमयीं निरनिराळ्या अद्‌भुत कल्पनांचें साहाय्य घ्यावें लागतें. मेघांना सजीवत्व दिल्याशिवाय काव्यांचें भागत नाहीं. कांहीं तरी दैवी मध्यस्तीची गरज नाटकांतील आधुक माधुकांची भेट व्हावयाला लागते. अशा नाना प्रकारच्या अद्‌भुत युक्त्या व कल्पना ह्या ललितकलांत पदोपदीं योजाव्या लागतात. त्या बेतानें व तारतम्यानें जर योजल्या तर सहृदयांच्या आनंदाला कारण होतात व त्यांचा वाजवीपेक्षां फाजील अतिरेक झाला तर त्या सहृदयांच्या मनाला वीट आणतात. ह्या ललितकलांतील अद्‌भुत कल्पनांत व शास्त्रांच्या मुळांशीं असलेल्या अद्‌भुत कल्पनांत एक मोठा भेद आहे. तो हा कीं शास्त्रांच्या मुळांशीं असलेल्या एकेका अद्‌भुत कल्पनेचा परिष्कार तर्कशास्त्राच्या सिद्धान्तांना धरून होत असतो व ललितकलांतील अद्‌भुत कल्पनांची झुंड तर्कशास्त्रांतील सिद्धांतांना धक्के मारून आपलें साम्राज्य सुरूं करते. शास्त्रांत कार्यकारणभावाचा सर्वत्र विजय असतो व ललितकलांत ह्या भावाला फारसा थारा मिळत नाहीं. शास्त्राचा संकुचित प्रदेश व अद्‌भुताचें विस्तृत विश्व ह्यांत खरोखरच अक्षरशः जमीनअस्मानाचें अंतर आहे.

ह्या अद्‌भुताची व्याप्ति किती जगड्व्याळ आहे त्याचें स्थलनिरूपण येथपर्यंत झालें. परंतु त्याची यथार्थ कल्पना होण्यास कांहींसें खोल जाऊन त्याचें ऐतिहासिक परंपरित स्वरूप दाखवून देणें जरूर आहे. ही परंपरा एकदां ध्यानांत आली म्हणजे अद्‌भुत कादंबरीचा इतिहास किती जुना आहे व मनुष्यमात्राच्या प्रगतीचें तिनें केवढें मोठें कार्य साधिलें आहे तें स्पष्ट होईल.

अद्‌भुताची ऐतिहासिक परंपरा

अगदीं जुन्यांत जुनी अशी पश्चिम पृथ्वीवरील अक्षरानें लिहिलेली अद्‌भुत कादंबरी म्हटली म्हणजे यहुदी लोकांचा जुना करार होय. शास्त्रसिद्ध जो कार्यकारणभाव त्याचा पूर्ण अभिभव करून लिहिलेलें असें जर कांहीं सारस्वत कोठें असेल तर तें

जुन्या करारांतील अद्‌भुत गोष्टींत उत्कट भरलेलें आहे. जुन्या करारांतील रुथच्या अद्‌भुत कादंबरीच्या जोडीचें सारस्वत ह्या पृथ्वीतलावर एकट्या भारतवर्षांतच तेवढें सांपडेल. भारतांतील शिबी राजाची कथा, किंवा हरिश्चंद्राची कथा, किंवा दमयंतीची कथा, किंवा सावित्रीची कथा, ह्या सर्व गोष्टीं अद्‌भुत कादंबरीचे अनुपम मासले आहेत. नव्या करारांतील खिस्ताची कादंबरी तर अत्यंत अद्‌भुत आहे. त्याच्या जोडीला आपल्या इकडील दधीचि ऋषीची कादंबरी ठेवतां येण्यासारखी आहे. बायबल सोडून देऊन पुढें प्रयाण केलें असतां मध्ययुगांतील खिस्ती संतांचीं चरित्रें ही अद्‌भुत कादंबऱ्यांचीं उत्कृष्ट उदाहरणें आहेत. आपल्या इकडील साधुसंतांचीं अद्‌भुत कृत्यें ज्यांत वर्णिलीं आहेत तीं संतचरित्रें त्यांची बरोबरी उत्तमोत्तम करतात. ग्रीस देशांत प्लातों ऊर्फ अल्प्लातून नांवाचा प्रख्यात तत्त्ववेत्ता व प्रबंधकार झाला. त्याचे तर सर्व ग्रंथ येथून तेथून अद्‌भुत कथांनीं ओथंबलेले आहेत.

स्वर्ग, पाताळ, यक्ष, किन्नर, सुराज्य, कुराज्य, वगैरेंविषयीं त्यानें जीं अद्‌भुत वर्णनें दिलीं आहेत, तीं वाचून यूरोपांतील प्रोफेसर अत्यंत मोहून गेलेले आहेत; परंतु ह्या विद्वद्रत्नांनीं जर अग्नि, वायु, वाराह वगैरे आमच्या इकडील पुराणांचा अभ्यास केला तर अद्‌भुत सृष्टीच्या निर्माणकलेंत आर्यावर्तांतील पौराणिक अल्प्लातूनला हजारों अद्‌भुत गोष्टी शिकवूं शकले असते हें त्यांना निरभिमानानें कबूल करावें लागेल. परेतांचे आत्मे कोणच्या कुत्र्याला हटकून कोणत्या होडींतून कोणत्या प्रदेशांत जाऊन कोणतीं दुःखें किंवा सुखें किती वर्षें भोगतात ह्याचा जो तपशील प्लातोनें दिला आहे तो सर्व एकत्र संकलित केला आणि आपल्या इकडील गरुडपुराणांत दिलेल्या परेतांच्या पारलौकिक चरित्रांशीं त्याची तुलना केली, तर गरुडपुराण रचणाऱ्या व्यासापुढें अल्प्लातूनला दुधखुळ्या पोराचीच उपमा द्यावी लागेल. केवळ तपशीलाच्या विस्तारापुरतीच ही उपमा साजेल असें नाहीं. तर राजनीति, व्यवहारनीति, वेदान्त, शब्दशास्त्र, संगीत वगैरे नानाशास्त्रांच्या प्रमेयासंबंधानें-देखील ह्या पुरातन यवनाला फारशी फुशारकी मारण्याला जागा राहील असें वाटत नाहीं. आपल्या देशांतील धर्मांतल्या ज्या पुराणकथा व कहाण्या होत्या, त्या प्लातोनें आपल्या प्रबंधांत गोंविल्या आहेत, व तोच प्रकार भरतखंडांतील पुराणांतून झालेला आहे.

अद्‌भुत कल्पनांचा सामाजिक जीवनावरील प्रभाव

यूरोपांतील धर्मग्रंथांतील, संतचरित्रांतील किंवा तत्त्वप्रबंधांतील अद्‌भुत गोष्टींत व आपल्या इकडील इतिहास व पुराणें ह्यांतील अद्‌भुत गोष्टींत बरेंच साम्य आहे हें वरील तुलनेवरून स्पष्टच होतें. परंतु ह्या अद्‌भुत गोष्टींत दुसरें एक अत्यंत महत्त्वाचें साम्य आहे. वास्तविक कादंबरीकारांची अशी एक अभिमानयुक्त दर्पोक्ति ऐकण्यांत येते कीं वास्तविक कादंबऱ्यांचा जो समाजावरतीं परिणाम घडतो त्याच्या

सहस्रांशहि अद्‌भुत कादंबऱ्यांचा घडत नाहीं. परंतु वास्तविकांचें हें विधान अनुभवाला क्वचितच धरून आहे. पालस्ताईनांतील जुन्या करारांतल्या अद्‌भुत कादंबऱ्यांनीं युरोपांतील रानटी लोकांचीं हृदयें आज दोन हजार वर्षें आक्रमून टाकिलीं आहेत. आणि, रामायण, भारत आणि पुराणें यांतील अद्‌भुत कादंबऱ्यांनीं आज निदान अडीच हजार वर्षें हिंदुस्थानांतील हिंदुसमाजाचें नियंतृत्व पत्करलेलें आहे. पुराणांतर्गत व भारतांतर्गत अद्‌भुत कांदबऱ्यांतील प्रसंगांना हिंदुधर्मशास्त्रांत अर्वाचीन कायद्यांतील कदीम शिलशिल्याचा मान देतात व त्यांतील पात्रें उपमानादाखल घेतात. सावित्रीच्या कथेनें हिंदू स्त्रियांचे ठायीं पातिव्रत्याची परंपरा हा कालपर्यंत लावून दिलेली आहे, आणि भारतांतील कृष्ण, भीष्म, धर्म, द्रोण, अर्जुन, अभिमन्यु ह्यांचे दाखले अर्वाचीन महाराष्ट्राच्या इतिहासांत वारंवार दिलेले आढळतात. ह्या पुराणांतील अद्‌भुत कथा अर्वाचीन कालीं इतिहास म्हणून ज्याला म्हणतात त्यापैकीं निःसंशय नाहीत ही तर सर्वमान्य गोष्ट आहे. काल, स्थल, प्रसंग आणि कार्यकारणभाव ह्या चार शृंखलांनीं इतिहास मर्यादित झालेला असतो. परंतु कादंबरीला ह्या चारींपैकीं कांहींची उणीव असली तरी बिलकुल नडत नाहीं.

तात्पर्य, पुराणांतील कथा निवळ अद्‌भुत कथा आहेत ह्यांत काडीचाहि संशय नाहीं. आणि असें असून त्यांचा समाजाच्या अनेक हालचालींवर अतोनात पगडा बसलेला तर आपण प्रत्यक्ष पहातों. किरिस्तावांचा, मुसुलमानांचा, बौद्धांचा, हिंदूंचा, वाटेल त्यांचा समाज घ्या, त्याच्यावर त्या त्या धर्मांतील अद्‌भुत कादंबऱ्यांचा सर्वस्वी पगडा बसलेला आहे असेंच दृष्टीस पडेल. इतका हा ह्या अद्‌भुत कादंबऱ्यांचा प्रभाव आहे. फार लांब कशाला, गाणगापुरास नृसिंहसरस्वती म्हणून एक सिद्ध होऊन गेले त्यांची अद्‌भुत कादंबरी (गुरुचरित्र) त्यांच्या एका शिष्यानें रचिलेली महाराष्ट्रांत प्रसिद्ध आहे; व तिचा पगडा हजारों लोकांच्या नित्यक्रमावर बेसुमार असलेला सर्वश्रुत आहे.

ही गोष्ट धर्मांतर्गत अद्‌भुत कथांची झाली. आता धर्मांखेरीज इतर प्रदेशांत देखील अद्‌भुताचा सार्वत्रिक प्रसार किती मोठा आहे तेंहि दाखवून देतां येईल. लहान मुलांकरितां सर्व राष्ट्रांत लहान लहान चिमण्याकावळ्याच्या गोष्टी सर्वत्र प्रचलित आहेत. त्यांत तर सर्व अद्‌भुतांचाच खेळ असतो. बालोपयोगी ज्या ह्या अद्‌भुत कथा त्यांचा संग्रह जर्मनींतील ग्रिम बंधूंनीं बराच करून ठेविलेला आहे. ह्या कथांचा मुलांच्या मनावरती अत्यंत जबरदस्त ठसा उमटतो. तो इतका कीं, मुलांचा बालस्वभाव व नैतिक देह ह्या अद्‌भुत कथांच्या श्रवणानेंच बहुतेक बनला जातो. हीच गोष्ट लक्षांत घेऊन, जॅक दी जायंटकिलर वगैरे जुन्या व नव्या बालकथा यूरोपांत सचित्र छापून काढीत असतात. तसेंच प्रौढ अशा अशिक्षित मंडळीकरितांहि प्रत्येक राष्ट्रांत कांहीं लोककथा प्रचलित असतात, व

त्यांचीं नीतीचीं, व्यवहाराचीं वगैरे अनेक धोरणें ह्या कथांवरच बांधिलीं जातात. जांवयाच्या गोष्टी, पाहुण्याच्या गोष्टी, नवराबायकोच्या गोष्टी वगैरे अनेक प्रकारच्या अद्‌भुत गोष्टी आपल्या ह्या देशांत प्रचलित आहेत व त्या सर्व अद्‌भुतानें माखलेल्या आहेत. शिवाय निव्वळ स्त्रियांकरितां म्हणून स्त्रियांच्या कहाण्या वगैरे आहेतच. येणेप्रमाणें ह्या अद्‌भुताचा प्रभाव कोठें नाहीं असें नाहीं. मुलांच्या खेळांत, मुलींच्या धांगडधिंग्यांत, स्त्रियांच्या व्रतोद्यापनांत व पुरुषांच्या करमणुकींत तसेंच राजाच्या राजवाड्यांत व शेतकऱ्याच्या झोंपड्यांत, सुशिक्षितांत व अशिक्षितांत, सर्वत्र अद्‌भुताचें अखंड साम्राज्य आहे. ह्याच साम्राज्याच्या अमलाखालीं सुखानें नांदणाऱ्या हळवे, रिसबूड वगैरे गृहस्थांनीं मराठींत अद्‌भुताची रचना अलीकडे करून दाखविली. ती जरी जुन्याच्या तोडीची बिलकुल नाहीं, तत्रापि महाराष्ट्रांतील भावी अद्‌भुत कादंबऱ्यांची पूर्व सूचना करणाऱ्या शकुनादाखल तिचें संकीर्तन करण्यास हरकत नाहीं.

ज्याप्रमाणें अद्‌भुत कादंबरीची ऐतिहासिक परंपरा फार पुरातन कालापासून चालत आली आहे, त्याप्रमाणेंच आजपर्यंत ज्या ज्या शक्तीला समाजावरती आपला अम्मल बसावा अशी इच्छा उत्पन्न झाली, त्या त्या शक्तीला ह्या अद्‌भुत कादंबरीचें साहाय्य अतोनात झालेलें आहे. एखादा नवीन धर्म जगतीतलावर अवतीर्ण झाला आणि सामान्य जनसमूहावर त्याला आपला अम्मल बसवावयाचा असला, तर त्यानें आपलीं रूक्ष तत्त्वें एकीकडे गुंडाळून ठेवावीं व अद्‌भुत कादंबरीचा पोषाख करून लोकांत खुशाल वावरूं लागावें; त्याला जय हा हटकून ठेवलेलाच. धर्माचें अनुकरण नीतीनें स्वराज्यप्रसारार्थ हरहमेश केलेलें आढळतें. इतकेंच नव्हे तर इतिहास, ज्योतिष, वैद्यक, वगैरे अनेक विद्यांनीं हाच पेहराव करून लोकप्रियता संपादन केलेली आहे. हें विधान कदाचित् कोणास असंभवनीय वाटेल. परंतु त्याची सत्यता व्यवहारांतील दोन चार उदाहरणें देऊन सिद्ध करून दाखवितों. फलज्योतिष म्हणजे काय इलम आहे हें सर्व जगाला जाहीर आहे. ह्यावर संस्कृतांत नानाप्रकारचे ग्रंथ आहेत. परंतु ते सामान्य जनसमूहाला पूर्णपणें तर सोडून द्याच, परंतु अंशमात्रानेंहि कळणें दुरापास्त आहे. येणेंप्रमाणें कळण्याचीच जेथें मारामार, तेथें त्या विद्येचा उपयोग कोण करून घेतो ? ही गोष्ट लक्षांत घेऊन १८ व्या शतकांतील फलज्योतिषांनीं अद्‌भुत कादंबरीचें स्तवन केलें व शनि, बुध, गुरु वगैरे ग्रहांच्या अद्‌भुत-लीलेचे अचाट पराक्रम गोड अशा कथांनीं वर्णन केलें. सामान्य जनसमूहाला कथांचें व त्यांतल्यात्यांत अद्‌भुत कथांचें वेड किती असतें हें ज्यांना माहीत आहे त्यांना सांगावयास नकोच कीं, शनिमाहात्म्यांचीं पारायणें अज्ञ व सुज्ञ लोकांत लाखोनें होऊं लागलीं आणि फलज्योतिषाचें व त्यांच्या बरोबर भिक्षुक, पुराणिक, मैंदेवाले व शेजारीपाजारी याचेहि ग्रह उच्चीप्रत पोहोंचले. शनिमाहात्म्याचा मुख्य सिद्धान्त हा आहे कीं, शनि हा देव आहे, त्याची पूजा जो न करील तो साक्षात् परमेश्वर

असला तरीहि दुःख पावेल, तेव्हां शनीचा फेरा आपल्याला केव्हां येणार आहे त्याची चवकशी फलज्योतिषांकडे करून नैवेद्यादि विधीनें शनीचें समाराधन करावें.

फलज्योतिषांची हिकमत साधलेली पाहून नीतिज्ञहि पुढें सरसावले व त्यांनीं आपल्या सत्यनारायणाला कादंबरीचें स्वरूप दिलें. सत्य सोडिलें असतां कोणकोणाची कसकशी दशा झाली, ह्यांच्या अद्‌भुत गोष्टी सत्यनारायणाच्या कथेंत सांगितल्या आहेत. नीतीचाहि असा समाजांत प्रवेश झालेला पाहून प्रवासाचे शोकी जे पुरातन, मध्ययुगीन व अर्वाचीन आर्य लोक त्यांनीं तीर्थक्षेत्रांचीं वर्णनें व तीं उत्पन्न कर्शीं झालीं ह्या संबंधींच्या अद्‌भुत कादंबऱ्या निर्माण केल्या. अशा ह्या अद्‌भुत कादंबऱ्या शेकडों कार्याकरितां शेकडों झाल्या आहेत व होत आहेत. खिस्तानें तारलेल्या आत्म्यांच्या गोष्टी व इतर धर्मांनीं बुडविलेल्या माणसांच्या कथा किरिस्ताव व मिशनरी छापून काढितात. त्या तरी अद्‌भुत कादंबऱ्याच आहेत. अलीकडे कित्येक वर्तमानपत्रांत औषधांच्या जाहिराती अद्‌भुत गोष्टींच्या रूपानें येतात. गोष्टींच्या अद्‌भुतत्वानें वाचकांचें मनरंजन व्हावें, व आपल्याकडे एकदां त्यांचे मन वेधलें म्हणजे गरजेच्या वेळीं आपली त्यांस पहिल्यांदा आठवण व्हावी हाच हेतू ह्या अद्‌भुत गोष्टींच्या जाहिराती देण्याचा असतो. सारांश, कोणत्याहि मताचा जारीनें प्रसार व्हावयाला अद्‌भुत कादंबरीचें साहाय्य अवश्य हवें असें दिसतें. प्रार्थनादि समाजपंथांना आपला धर्म पसरावा अशी खरोखरच इच्छा असेल तर त्यांनीं आपल्या धर्मानें किती आत्मे तरले गेले, ह्या संबंधींच्या अद्‌भुत कादंबऱ्या लिहून पहाव्या म्हणजे कदाचित् बहुत कार्यभाग होईल. असो. स्वव-स्त्राभिमानी, स्वदेशाभिमानी, स्वधर्माभिमानी, स्वेतिहासाभिमानी, वगैरे सर्व अभिमान्यांच्या मेहेरनजरेपुढें ह्या कुलीन व पुरातन अद्‌भुत कादंबरीचे पोवाडे जितके गाये तितके थोडेच आहेत.

अद्‌भुत कल्पनांच्या सामर्थ्याचें मूळ

अद्‌भुत कादंबरीच्या ह्या अलौकिक सामर्थ्याचें बीज काय ? ज्या गोष्टी कल्पि-ण्याचा नुसता संकल्पहि वास्तविक कादंबरीच्या मनांत यावयाचा नाहीं, त्या गोष्टी धूमधडाक्यानें करतांना अद्‌भुत कादंबरीला आपण पहातों, ह्यांतील रहस्य काय ? शांकरभाष्यांतील अवजड विचारसरणीनें किंवा बादरायणाच्या रूक्ष सूत्रमालेनें जितक्या लोकांना सनातनधर्माची ओळख झाली असेल, त्यापेक्षां भगवद्गीतेंतील अद्‌भुत कथेनें धर्माकडे जास्त लोकांची प्रवृत्ति झालेली आहे. परंतु गजेंद्रमोक्षासारख्या अद्‌भुत कादंबऱ्यांनीं किंवा संतविजयासारख्या अद्‌भुत चरित्रांनीं धर्माकडे लोकांच्या ज्या झुंडीच्या झुंडी वळविल्या आहेत, त्यांपुढें भाष्याभिमानी आणि गीताभिमानी मंडळें, एका ठिकाणीं केलीं असतांहि, क्षुद्र कीटकवत् भासतात. तेव्हां ह्या अद्‌भुत कादंबरी-

मध्यें अशी मोहनी कोणती सांठली आहे, कीं जिच्यामुळें तिला सर्वत्र एवढा जय येतो? ह्या प्रश्नाचें उत्तर मनुष्यमात्राच्या स्वभावांतच सांपडण्यासारखें आहे. तर्कशास्त्राच्या नियमांनीं मर्यादित झालेल्या सिद्धांतपरंपरेनें आकलन करण्याची योग्यता व इच्छा समाजांतील फारच थोड्या, अतिच थोड्या व्यक्तींच्या ठायीं वास करते. बहुतेक लोक केवळ तत्त्वाचा विचार करण्यापासून पराजितच होतात. धर्माचें, नीतीचें किंवा शास्त्राचें एखाददुसरें तत्त्व व्यवहारांत संचार करीत असलेलें देखिलें म्हणजे तें स्थूल मानानें ग्रहण करण्यास सामान्यजनसमूह बहुशः उत्सुक असतो, निदान उदासीन तरी नसतो. आतां ज्या व्यवहारांत हें तत्त्व संचार करतें असें दाखवावयाचें असतें तो व्यवहार मनुष्यप्राण्यांचाच असावा लागतो असें नाहीं; देवांचा, दानवांचा, यक्षांचा किंवा किन्नरांचा असला तरीहि कोणतीच अडचण पडत नाहीं. इतकेंच कीं, मनुष्य प्राण्याच्या व्यवहाराच्या धर्तीवर तो व्यवहार असला म्हणजे झालें. सौकर्यानें व विशेष प्रयास न पडतां कोणतीहि गोष्ट जाणून घेण्याची जी ही मनुष्याची लकब तीच अद्‌भुत कांदबऱ्यांच्या आवश्यकतेचें मुख्य कारण होय. जर यच्चयावत् सर्व माणसें आहेत त्याहून बुद्धीनें व धारणेनें जास्त तीक्ष्ण व टणक असतीं तर अद्‌भुताची बिलकूल जरूर न पडती. इतकेंच नव्हे तर सर्व शास्त्रांत रूक्ष असें जे वेदान्तशास्त्र त्याचाच धर्म सर्वत्र चालता आणि त्याच्या सिद्धान्ताना अद्‌भुत कादंबरीचीं गोड पुटें देण्याचें प्रयोजन न पडतें. परंतु मनुष्यसमाजाची वस्तुस्थितीच अशी आहे कीं त्याच्या मोठमोठ्या गरजा अद्‌भुताच्या मध्यस्तीनेंच भागल्या जाव्या.

महाराष्ट्रीय मनावरील अद्‌भुताची पकड

अद्‌भुत कादंबरीची ही जी परंपरा दाखवून दिली त्यावरून एक चमत्कारिक गोष्ट कळून येते. अलीकडे महाराष्ट्रांत अशी ओरड ऐकूं येऊं लागली आहे कीं समाजांतील बराच मोठा पक्ष कादंबरीचा वाजवीहून फाजील भोक्ता असतो व त्यापासून त्याला म्हणण्यासारखा फायदा नाहीं. परंतु कादंबऱ्या वाचण्याचा व ऐकण्याचा प्रघात महाराष्ट्रांत आज नव्यानेंच पडला आहे असें नाहीं. महाराष्ट्रांतील गेल्या आठशें वर्षांतील सारस्वताचा इतिहास पाहिला म्हणजे असें दिसून येतें कीं या देशांतील लोकांचीं बहुतेक मतें अद्‌भुत कादंबऱ्यांच्या वाचनानें व श्रवणानेंच आज आठशें वर्षें बनत आलीं आहेत. गीता, भारत, रामायण, इतर पुराणें व संतचरित्रें ह्यांतील अद्‌भुत कथांचा महाराष्ट्रभाषेंत अनुवाद ह्या आठशें वर्षांत निदान पंचवीस पंचवीस वेळां तरी झालेला आहे. इतर दुसरें सारस्वत कांहीच नसतांना ह्या अद्‌भुत सारस्वताच्या लाटा महाराष्ट्र-जनसमूहाच्या कर्णपटलावर अप्रतिहत आदळत असलेल्या जर आपण पहात आहों, तर अद्‌भुत कादंबरीचें महाराष्ट्रावरील साम्राज्य आपल्याला

कबूल केलेंच पाहिजे. ह्या अद्‌भुत कादंबऱ्या अक्षरओळख असणारी मंडळी तर फावल्यावेळीं वाचीच. परंतु दरएक खेड्यांत व मोठ्या गांवांत व शहरांत-देवळांतून देवादानवांच्या कथा ब्राह्मणादि सर्व वर्णांना व स्त्रीपुरुषांना दररोज सांगणारे हजारों पुराणिक दोन माणसांच्या शिध्यावर संतुष्ट राहून समाधान मानीत असत. ह्याशिवाय विशेष प्रसंगीं हरदास मंडळी श्रोतृचातकांना ज्ञानामृत पाजण्यास उत्सुक असेच. इंग्लंडांत व अमेरिकेंत पैसे घेऊन आपल्या कादंबऱ्या वाचून दाखविणारे कादंबरीकार कांहीं आहेत. परंतु महाराष्ट्रांतील अद्‌भुत कादंबऱ्या सांगणाऱ्यांचा, वाचणाऱ्यांचा व ऐकणाऱ्यांचा, सपाटा कांहीं विलक्षणच ! कोणत्याहि गोष्टीचा अतिशय करण्याचा महाराष्ट्रांतील लोकांचा स्वभावच आहे; व ह्या स्वभावाला अनुसरून अद्‌भुत कथांचाहि सुकाळ महाराष्ट्रांत इतर सर्व देशांपेक्षां जास्त आहे. वस्तुस्थिति व परंपरा ही अशी असल्यामुळें वीस वर्षांपूर्वी मंजुघोषादि कादंबऱ्यांचा आपल्या देशांत उदय कां झाला ह्याचें फारसें आश्चर्य मानण्याचें कारण नाहीं.

आत्मलीन बाह्य हेतुरहित कादंबरीवाङ्मय

मुक्तामाला, मंजुघोषा वगैरे ज्या अलीकडच्या अद्‌भुत कादंबऱ्या त्यांत व पूर्वीच्या धर्मादि संस्थांच्या उपयोगीं पडलेल्या कादंबऱ्या ह्यांत एक मोठें अंतर आहे. पूर्वीच्या कादंबऱ्या कांहीं एका मताच्या प्रसारार्थ निर्मिल्या गेल्या व ह्या अलीकडील कादंबऱ्यांत तसा कांहीं एक बाह्य हेतू दिसून येत नाहीं. कोणतीहि गोष्ट घेतली तरी तिचें कांहीं तरी तात्पर्य दाखवून देतां येणें शक्य आहे ही गोष्ट अलाहिदा. परंतु सुंदर स्त्रीपुरुषांना वियोगादि संकटें येऊन त्यांचा सरतेशेवटीं सुखपर्यवसायी संयोग होतो, ह्या पलीकडे म्हणण्यासारखें तात्पर्य ह्या कादंबऱ्यांपासून निघण्यासारखें नाहीं. मूळ ग्रंथकारांचीहि ह्या पलीकडे कांहीं दृष्टि होती असें दिसत नाहीं. संस्कृतांत कादंबरी, दशकुमारचरित वगैरे कल्पित कथांचा जसा इतर कांहीं बाह्य हेतू नाहीं, तसाच ह्याहि कादंबऱ्यांचा नाहीं. ज्या कालीं ह्या कादंबऱ्या लिहिल्या गेल्या त्या काळची महाराष्ट्र समाजाची स्थितीच अशी होती कीं त्याचें कोणतेंहि वर्तन कोणतेंहि दूरवर धोरण धरून चाललेलें नव्हतें. १८४० पासून १८६० पर्यंतचा बहुतेक सर्व समाज किंकर्तव्यतामूढ असा झाला होता. अलीकडील तीस पसतीस वर्षांत जीं नाना प्रकारचीं कार्यें करण्यास आपण उद्युक्त झालों आहोंत त्यांचा त्यावेळीं मागमूसहि नव्हता; आणि पूर्वीचीं पेशवाईच्या भर अमदानींतील जीं कार्यें व धोरणें होतीं त्यांचीहि ओळख बुजून गेलेली होती. अशा वेळीं केवळ मनाला करमणूक म्हणून ह्या कथा लिहिल्या गेल्या. त्या लिहिणारांच्या पुढें किरयादाखल पूर्वीच्या अद्‌भुत कथा, गोष्टी वगैरे होत्याच. त्यांचा त्यांनीं विरामादि चिन्हें देऊन व बरींवाईट गद्य वाक्यें लिहून विस्तृत अनुवाद केला इतकेंच. ह्या कादंबऱ्या बोलून चालून

अद्‌भुतच होत्या, तेव्हां त्यांत अतिमानुष अशा अद्‌भुत गोष्टी याव्या हें साहजिकच होतें. कादंबऱ्यांचा मुख्य वाचकवर्ग म्हटला म्हणजे मराठे संस्थानिक, जहागीरदार व इनामदार हे लोक होत. वाणीउदमी व भटभिक्षुकहि ह्या कथा वाचतांना मीं पाहिलेले आहेत. परंतु ह्या कादंबऱ्यांच्या माऱ्याचा मुख्य विषय म्हटला म्हणजे हे बडे, सुखवस्तू, ऐदी, खुशालचंद आणि निष्काम लोक होत. वे. शा. सं. लक्ष्मणशास्त्री हळवे यांना ह्या कादंबऱ्यांबद्दल खंडेराव गायकवाड ह्यांजकडून वर्षासन चालू होतें. ह्या वरून सदर बडे लोकांत सदर कादंबऱ्यांची किती चहा होती तें दिसून येतें. सदर कादंबऱ्यांना तिखटमीठ लावून इतर मसाला घालून व त्यांत वाटतील ते फेरफार करून दिलखुष गोष्टींची बयान करणारे गोष्टीवाले कैलासवासी जमनाबाईसारख्या श्रीमंतांच्या पदरीं हरहमेष पडून राहिलेले सर्वत्र प्रसिद्धच आहेत.

अद्‌भुत व वास्तविक यांचा संगम

ह्या आत्मलीन कादंबऱ्यांतहि पुढें पुढें फेरबदल होत गेला. १८६० च्या नंतर लोकांचीं मनें आत्मपरीक्षेकडे लागलीं व ह्या पानचट अद्‌भुत कथांपासून परावृत्त होत चाललीं. हें परावर्तन एकाएकीं मात्र झालें नाहीं. मुक्तामाला, मंजुघोषा, वगैरे कादंबऱ्यांचा सूर्य माध्यान्हाचलावर येतो न येतो तोंच विचित्रपुरीसारख्या एक दोन कादंबऱ्या क्षितिजावर दिसूं लागल्या. विचित्रपुरी ही कादंबरी आहे अद्‌भुत कोटींतीलच. परंतु तींत विशेष हा आहे कीं ती कांहीं एका हेतूनें लिहिली असून पुष्कळ अद्‌भुत गोष्टींचा उपहास तींत केला आहे. विचित्रपुरींतील मुख्य पात्रांचा जो इतिहास आहे तो अद्‌भुतच आहे. परंतु तींतील मुख्य नायक व त्याचे मित्र भुतांखेतांचे व पिशाचराक्षसांचे कट्टे शत्रू म्हणून दाखविलेले आहेत. येथें अद्‌भुत व वास्तविक ह्या दोन भावनांचा संगम झाला. व हा असाच संगम होणें शक्य आहे. अद्‌भुतावरून वास्तविकावर एकदम उडी जाणें सर्वथा अशक्य. यूरोपांतहि हा असाच प्रकार झाला आहे. १६ व्या शतकापर्यंत यूरोपांतील स्पेन, पोर्तुगाल, फ्रान्स वगैरे देशांत अद्‌भुत कादंबऱ्यांचा इतका कांहीं सुळसुळाट झालेला होता कीं धर्म, शास्त्र वगैरे अनेक दिशांनीं यूरोपांतील लोकांचें जेव्हां आत्मपरीक्षेकडे व सुधारणेकडे लक्ष गेलें, तेव्हां अद्‌भुताचा वास्तविकाशीं संयोग घडून अद्‌भुताचें परावर्तन झालें. राब्लेच्या गार्गांचूआ व पांटाग्रूअेल ह्या कथेचा सर्व पोषाख अद्‌भुत कादंबरीचा आहे. आंतील विचार मात्र येथून तेथून वास्तविकाच्या रंगानें भिनलेले आहेत. सर्व्हंटिसाच्या डॉन किझोट नामक कादंबरीचाहि प्रकार असाच आहे. पूर्वीच्या अद्‌भुत कादंबऱ्या व त्यांतील अद्‌भुत वीर ह्यांची टर उडविण्याच्या हेतूनें ही कादंबरी लिहिलेली आहे. परंतु हिचा सर्व पेहराव अद्‌भुत कादंबरीचाच आहे. हाच

मासला लसाजच्या जिल्ब्लास नांवाच्या कादंबरीचा आहे. सारांश काय कीं सारस्वतांतहि जे फेरबदल होतात ते देखील पाहिरीपाहिरीनेंच होतात.

वास्तविकाचें प्राधान्य व श्रेष्ठ पाश्चात्त्य वाङ्मय

अद्भुताचा व वास्तविकाचा विचित्रपुरींत संगम झाल्यावर केवळ वास्तविकाचें प्राधान्य ज्यांत आहे अशा कादंबऱ्यांचा काळ १८७० नंतर लवकरच आला व तो अद्यापपर्यंत चालू आहे. ह्या वास्तविकाची स्फूर्ति मराठी लेखकांना प्रायः इंग्रजीपासून झालेली आहे. अद्भुत कादंबरीची पूर्वपीठिका जशी ह्या देशांतील असून बहुतेक अनादि, निदान दोन अडीच हजार वर्षांची आहे, तशी वास्तविक कादंबऱ्यांची कुळकथा फारशी मोठी नाहीं. ह्यांचा मुख्य झरा परदेशांतला आहे व ह्यांनीं आपला कित्ताहि तिकडील सामान्य कादंबऱ्यांचाच उचलला आहे. परंतु यूरोपांत वास्तविक कादंबरीचे जे उत्तमोत्तम व सर्वोत्कृष्ट झरे आहेत त्यांच्या उगमाशीं जाऊन तेथून स्फूर्ति घेऊन आलेले मत्तभृंग आपल्या इकडे फारसे, कदाचित् मुळींच, नाहींत. इंग्रजी कादंबरीकारांतील अत्यंत रद्दड असा जो रेनोल्ड्स् त्याच्या भिकार कादंबऱ्यांचाच आस्वाद घेणारे हरीचे लाल आपल्या इकडे पुष्कळ ! कोणी रेनोल्ड्सूच्या पलीकडे भरारी मारलीच तर ते मिसेस हेन्री वुड, लॉर्ड लिटन, वगैरे सामान्य ग्रंथकारांपर्यंत जाऊन धडकले म्हणजे हद्द झाली ! त्यांच्या पलीकडे गेलेला सहृदय एखाद दुसरा असल्यास नकळे आणि यदाकदाचित् असला तरी मूळ झऱ्याची लज्जत लुटून घेऊन येऊन ती आपलीशी करणारा कोण बहाद्दर असेल तो असो, तो ज्याचा त्यालाच माहीत ! अजून त्याची वार्ता जगाला कळावयाचीच आहे !

वास्तविक गोष्ट अशी आहे कीं वास्तविक कादंबरीकाराची पदवी पटकावूं पहाणाऱ्या आपल्या इकडील गृहस्थांना आपल्या कलेच्या इतिहासाचें, तिच्या परंपरेचें, तिच्या ग्रंथसंपत्तीचें व तिच्या मर्माचें जसें ज्ञान असावें तसें प्रायः नसतें. आपल्या कलेचे उत्कृष्ट वस्ताद कोण व तींतील लुंगेसुंगे तमासगीर कोण ह्यांची ओळख नसल्यामुळें अनुकरण कोणाचें करावें व कोणाचें करूं नये ह्याचाच निश्चय त्यांना झालेला नसतो. नवशिक्या भांबावलेल्या पोराप्रमाणें जें कांहीं नवें पहावें तें उत्तमच असेल असा त्यांचा ग्रह होतो. इतकी मनाची उथळ व कोती स्थिति असल्यावर, जी कोणती गोष्ट हातीं पडेल ती मराठींत उतरावी आणि मायभाषेची आपण सेवा केली म्हणून तिला आपलें उतराई होण्यास सांगावें ह्याखेरीज त्यांना दुसरी तोडच रहात नाहीं. प्रस्तुत कालीं मराठींत गोष्टी लिहिणारी बहुतेक सर्व मंडळी ह्या असल्याच मासल्याची आहेत. आधीं भाषांतरावरच पोट भरणारे बहुतेक सर्व आहेत. त्यांत एखाद दुसरा स्वतंत्र ग्रंथरचना करणाराहि आढळतो. परंतु, त्याचीहि मति एखाद्या इंग्रजी किंवा फ्रेंच सामान्य कादंबरीकाराच्या एखाद्या कादंबरीवरूनच स्फुरण

पावलेली असते असें मोठ्या कष्टानें म्हणावें लागतें. एखाद्या परदेशी कादंबरीकाराचें संविधानक व पात्रें घ्यावीं, त्यांना मराठी नांवें द्यावीं, चालीरीतींत योग्य तो फेरफार करावा, व शेवट मूळाच्या उलट किंवा सुलट करावा, ह्या पलीकडे स्वतंत्र म्हणून वाखाणलेल्या आपल्या इकडील कादंबरीकाराची उडी गेलेली नसते. हा असा प्रकार का ? जें इंग्रज किंवा फ्रेंच, जर्मन किंवा रशियन कादंबरीकार लिहूं व कल्पूं शकतो तें लिहिण्याचें किंवा कल्पिण्याचें सामर्थ्य आमच्या इकडील कादंबरीकारांत नसावेंच काय ? तिकडील ग्रंथकाराचा स्पर्श झाल्याशिवाय ह्यांच्या लेखणीनें स्फुरण पावूंच नये काय ? ह्या प्रश्नांना उत्तर असें आहे कीं, हें सर्व इकडील ग्रंथकारांना शक्य आहे. इतकेंच कीं, त्यांच्याप्रमाणें आपल्या इकडील होतकरू लेखकांनीं नानाप्रकारची मेहनत मनोभावानें केली पाहिजे, आणि इतकेंहि करण्याचें साहस ज्यांच्या अंगीं असेल त्यांना ईश्वरदत्त गुणांची जन्मतःच प्राप्ति असली पाहिजे. हें शेवटलें वाक्य गूढ असें भासण्याचा संभव आहे. सबब त्याची फोड किंचित् विस्तारानें करतों.

इंग्लिश मासिक पुस्तकांतून व वर्तमानपत्रांतून हप्त्याहप्त्यांनीं येणाऱ्या कादंबऱ्यांच्या स्वरूपाच्या कादंबऱ्या आपल्या इकडील करमणूक व मासिक मनोरंजन ह्या दोन स्थलीं येत असतात. कांहीं अपवाद खेरीजकरून ह्या इंग्लिश पत्रांतील व पुस्तकांतील कादंबऱ्या योग्यतेच्या मानानें सरासरीच असतात. सरासरी म्हणजे गचाळ असा म्हणण्याचा भाग नव्हे. सरासरी म्हणजे नामांकित नव्हे, एवढेंच दर्शविण्याचा आशय आहे. ह्या हप्त्यांनीं येणाऱ्या कादंबऱ्यांत स्कॉट, डिकन्स, थॅकरे, बाल्झाक, ह्यूगो, डूमास, झोला, टाल्स्टॉय ह्या वस्तादांच्या हातून उतरलेल्या कादंबऱ्यांच्या तोडीच्या कादंबऱ्या क्वचितच असतात. इंग्रजी वर्तमानपत्रांतील व मासिक पुस्तकांतील हप्त्याच्या कादंबऱ्यांची जर ही अशी योग्यता आहे, तर त्यांचें केवळ अनुकरण करणाऱ्या व त्यांशीं स्पर्धणाऱ्या आपल्या इकडील कादंबऱ्यांची योग्यता वर उल्लेखिलेल्या वस्तादांच्या कादंबऱ्यांहून किती कमी असली पाहिजे, ह्याचा अंदाज सहजासहजीं होण्यासारखा आहे. परंतु मराठींतील ह्या कादंबऱ्यांची योग्यता ह्या तुलनेनेंच जोखून काम भागण्यासारखें नाहीं. युरोपियन प्रख्यात कादंबरीकारांची उत्कृष्टता कोणत्या स्वरूपाची आहे व युरोपियन लोकमताच्या प्रगत्यर्थ व शिक्षणार्थ ह्या कादंबऱ्यांचा काय उपयोग झालेला आहे, ह्याचें संक्षेपतः दिग्दर्शन केल्यानें तें काम उत्तमोत्तम होणार आहे.

उत्कृष्ट कादंबरीवाङ्मय व सामाजिक प्रगति यांचा संबंध

युरोपांतील गेल्या तीनशें वर्षांतील एकंदर कादंबऱ्या घेतल्या तर, त्यांचे मोठमोठे असे दोन विभाग पडतात. — पहिला व्यक्तिविषयक कादंबऱ्यांचा व दुसरा समाजविषक कादंबऱ्यांचा. वैयक्तिक कादंबऱ्यांत केवळ व्यक्तींच्या ठायीं नियमानें

आढळणारे जे कामक्रोधमदमत्सरलोभमोह हे षड्रिपू त्यांच्या संकोचविकोचांचें चित्र काढिलेलें असतें. ह्या चित्राची व्याप्ति व्यक्तिमात्राच्या पलीकडे फारशी कधीं जात नाहीं. ह्यांच्यापासून वाचकांच्या मनावर वैयक्तिक नीतीचाच तेवढा बोध होतो. ह्या वर्गांतील कादंबऱ्यांचे अनेक प्रकार आहेत. (१) सामान्य नित्याच्या संसारांतील दोन स्त्रीपुरुषें घ्यावयाचीं, त्यांच्या चमत्कारिक लकबा असतील त्या अतिशयानें वर्णावयाच्या, त्यांच्या सुखदुःखांचीं चटकदार वर्णनें द्यावयाचीं, अधून मधून घरें, बगीचे, डोंगर, नद्या ह्यांच्या, आपलीं पात्रें वाचकांच्या डोळ्यांत भरावयासाठीं, प्रभावळी काढावयाच्या, आणि सरतेशेवटीं त्यांची समाप्ति बरी किंवा वाईट करावयाची, हा बहुतेक सर्व वैयक्तिक वास्तविक कादंबऱ्यांचा विषय असतो. Society ladies चीं Society novels म्हणून ज्यांस इंग्लंडांत ओळखतात त्या कादंबऱ्या ह्याच. ह्या खुशालचंद अशा स्त्रीपुरुषांच्या करमणुकेचा विषय होत. पश्चिमेकडे असल्या कादंबऱ्या कुत्र्याच्या छत्रीप्रमाणें दररोज दहा पांच उगवतात. त्यांच्यापासून व्यक्तिमात्राला काय करमणूक होत असेल ती असेल, राष्ट्रांच्या स्वभावावर त्यांचा म्हणण्यासारखा कांहींच परिणाम होत नाहीं. ह्या मिळमिळीत प्रकाराहून दुसरा असा एक वैयक्तिक कादंबऱ्यांचा वर्ग आहे. त्याचें मुख्य लक्षण कोणत्याहि विकाराचा तीव्रपणा हें होय. तीन मजल्यांच्या Society novels बडया बडया स्त्रीपुरुषांकरितां म्हणून मुद्दाम तयार केल्या असल्यामुळें त्या होतील तितक्या मिळमिळीत, गुळगुळीत, सपक, नरम व आवेशहीन करण्यांतच सभ्यपणाचा कळस झाला अशी समजूत आहे. (२) ह्या मिळमिळीत सभ्यपणाच्या उलट तीव्र कादंबऱ्यांचा मार्ग असतो. म्हणजे इंग्लंडांतील मध्यस्थितींतील व कनिष्ठ स्थितींतील स्त्रीपुरुषांकरितां ह्या गोष्टी लिहिल्या असल्यामुळें तीव्र विकारांचें प्रदर्शन त्यांत अप्रतिबद्ध केलेलें असतें. ह्याहि कादंबऱ्या व्यक्तिमात्राला काय गोड वाटत असतील त्या असतील, समाजावर त्यांचा कांहींएक परिणाम नसतो. वैयक्तिक कादंबऱ्याचे आणखीहि कित्येक भेद आहेत. शाळेंतील मुलांकरितां, वाणी-उद्म्यांकरितां, नावाडयांकरितां, शिपायांकरितां, प्रवाशांकरितां, पोलिसांकरितां, अशा नाना प्रकारच्या व्यक्तींच्या करमणुकीकरितां वैयक्तिक कादंबऱ्यांचे नाना प्रकार आहेत, त्यांचा मुख्य हेतू करमणूक हा असतो. ह्यापेक्षां विशेष खोल विचार त्यांत केलेला नसतो. गरजू लेखक, थोडेंबहुत शिकल्यासवरलेल्या तरुण स्त्रिया, वगैरे असल्याच दर्जाचीं माणसें असल्या कादंबऱ्यांचा कारखाना चालवितात. मास्तरकी, खर्डेघाशी, दुकानदारी, वगैरे धंदे करणाऱ्यांचीच ही अक्कल वास्तविक कादंबऱ्यांच्या लेखनाकडे वळलेली असते, एवढें सांगितलें म्हणजे ह्या कादंबऱ्यांच्या योग्यतेचा अंदाज सहज होईल.

व्यक्तिविषयक कादंबऱ्यांच्या खटाऱ्याचा मैला सोडून दिला, म्हणजे पुढें मनुष्यमात्राच्या उच्च व नाजुक विकारांचें व विचारांचें प्रदर्शन ज्यांत केलेलें असतें अशा (३)

व्यक्तिविषयक कादंबऱ्यांची उत्तेजक हवा लागते. देशप्रीति, लोकोपकार, वात्सल्य, प्रेमबंधन, वगैरे उदात्त भावनांची चिकित्सा ह्या कादंबऱ्यांतून होत असते. गोल्डस्मिथ्, फील्डिंग, स्मॉलेट, रिचर्डसन्, आस्टिन, स्कॉट, थॉकरे, डिकन्स, इलियट वगैरे नामांकित कादंबरीकारांनीं आपलें कौशलसर्वस्व ह्या कामीं खर्चिलेलें आहे. ह्या कुशल कारागिरांच्या हातून अशीं अनेक पात्रें निर्माण झालेलीं आहेत कीं त्यांची ओळख इंग्लंडांतील बहुतेक सुशिक्षित लोकांना चांगली झालेली आहे. गोल्डस्मिथचा व्हिकार, स्मॉलेटचा अंकल टोबी, फिल्डिंगचा ऑलवर्दी, स्कॉटचा आयव्हनो, डिकन्सचा पिक्विक्, ईलियटची रोमोला, वगैरे पात्रें इंग्रजी भाषेंत सर्व प्रसिद्ध आहेत. ह्या इंग्रज कादंबरीकारांच्याच तोडीला बाल्झाक, डूमास, वगैरे फ्रेंच कादंबरीकार बसविले पाहिजेत. इतकेंच कीं, कोंवळीं पोरें आणि धणधकट जवान ह्यांमध्यें जें अंतर असतें तेंच ह्या इंग्लिश व फ्रेंच ग्रंथकारांत आहे. सतराव्या शतकांतील इंग्लिश राज्यक्रांति व अठराव्या शतकांतील फ्रेंच राज्यक्रांति ह्यांमध्यें जें जमीनअस्मानाचें अंतर आहे, किंवा लंडनांतील सेंट पॉलचें देऊळ व पारिसांतील ईफेलचा बुरुज ह्यांत जें उंचीचें बेसुमार अंतर आहे किंवा इंग्रज लोकांनीं केलेला लिव्हरपूल-मँचेस्टर कालवा व बारन लसेप्स ह्यानें बांधिलेला सूएझचा कालवा ह्यांमध्यें जें अपरंपार अंतर आहे; तेंच अंतर इंग्लिश कादंबरीकार व फ्रेंच कादंबरीकार ह्यांमध्यें आहे. डूमास व त्याचे साथीदार ह्यांनीं मिळून सरासरी दोन हजार कादंबऱ्या लिहिलेल्या आहेत. इतक्या कादंबऱ्या उपरिनिर्दिष्ट सर्व इंग्रज ग्रंथकारांच्याहि नाहींत. बाल्झाकहि असाच जंगी लेखक होता. ह्यानें आपल्या सर्व ग्रंथांना 'मानवी नाटक' असें अनुरूप नांव दिलेलें आहे. बाल्झाक व डूमास ह्यांची लेखनशैली उत्कृष्ट असून मानसिक विकारांचें पृथक्करण त्यांनीं फारच नामी केलेलें आहे. तसेंच बहुतेक सर्व इंग्रज ग्रंथकार व्यक्तीला सोडून फार बाहेर कधीं जात नाहींत. बाल्झाक व डूमास ह्यांचा कल व्यक्तीपेक्षां समाजाकडे विशेष आहे. हा समाजाचे गुणदोषवर्णन करण्याचा कल फ्रान्सांत, रशियांत व यूरोपांतील इतर देशांत इतका कांहीं वाढला आहे कीं, त्याच्या तोडीचें इंग्लंडांतील कादंबरीप्रदेशांत म्हणण्यासारखें कांहींच दाखविण्याजोगें नाहीं. ह्या बाबतींत इंग्लंड, यूरोपच्या व विशेषतः फ्रान्स व रशिया ह्यांच्या फारच पाठीमागें आहे. सामाजिक व राष्ट्रीय कादंबऱ्यांचा उत्कर्ष फ्रान्सांत व रशियांतच इतका का व्हावा व इंग्लंडांत कां होऊ नये, तसेंच इंग्लंडानें ह्या बाबतींत उष्ट्या भाषांतरावरच आपली भूक कां भागवावी व स्वतंत्र ग्रंथरचना कां करूं नये, ह्याचीं कारणें मोठीं मनोरंजक व चमत्कारिक असून नमूद करण्यासारखीं आहेत.

राष्ट्रीय प्रगतीचें साधन सारस्वत

प्रत्येक राष्ट्राला कांहीं आणीबाणीचे प्रसंग येतात. दास्यांतून स्वतंत्र होतांना, जुलमाच्या शृंखला तोडतांना, सामाजिक अडचणी दूर करतांना, राष्ट्रांना आटोकाट

मेहनत करावी लागते व ही मेहनत होत असतांना, समाजाचा आवेश कायम ठेवण्याकरितां, त्याच्या विचारांना योग्य वळण देण्याकरितां, इष्ट वस्तूची कल्पना त्याच्या मनांत बिंबविण्याकरितां, लेखनकलाकुशल असे सरस्वतीचे कांहीं प्यारे त्या त्या राष्ट्रांत अवतीर्ण होत असतात. राष्ट्रीय विचारांचें व विकारांचें आवेशयुक्त प्रदर्शन शब्दांनीं करण्याचें काम ह्या प्रासादिक लोकांचें असतें. हे लेखक नाना प्रकारचीं हत्यारें घेऊन आपलें काम करून जातात. कोणी नाटकांच्या द्वारा, कोणी इतिहासाच्या द्वारा, कोणी कादंबऱ्यांच्या द्वारा, कोणी कवितेच्या द्वारा, कोणी वर्तमानपत्राच्या द्वारा, कोणी धर्मव्याख्यानांच्या द्वारा, अशा नाना द्वारांनीं हे सरस्वतीभक्त आपापलें कर्तव्य करीत असतात. अठराव्या शतकांत अमेरिकेंतील संयुक्त संस्थानें स्वतंत्र झालीं त्यावेळीं समाजांतील विचारांच्या आवेशाचें प्रदर्शन टामस् पेन् यानें Common Sense (सारासार विचार) सारख्या निबंधांतून व जेफर्सन वगैरेनें Federalist (संयुक्तसंस्थावादी) सारख्या वर्तमानपत्रांतील लेखांतून फारच जोरदार असें केलें. चवदाव्या शतकांत व एकोणिसाव्या शतकांत हें काम इटालींत व्याख्यात्यांनीं केलें. अठराव्या शतकांत फ्रान्सांत जी थोरली राजकीय, सामाजिक, औद्योगिक व धार्मिक क्रांति झाली, तिचे विचार प्रगट करणारे रूझो, व्होल्टेअर, डिडरो, वगैरे प्रचंड कादंबरीकार, नाटककार, निबंधकार व शास्त्रज्ञ असे लोक होते. तो खटाटोप ज्या मानानें मोठा होता त्या मानानें त्याचे प्रदर्शकहि महान् महान् ग्रंथकार होते. पस्तीस चाळीस वर्षांपूर्वी अमेरिकेंत गुलामांना बंधमुक्त करण्याबद्दल लढाई झाली तिचें रहस्य व महिमा मिसेस् स्टौकृत अंकल टॉम नांवाच्या कादंबरीनें प्रसिद्ध केला. सध्यां रशियांत आज पन्नास साठ वर्षें जी मोठी सामाजिक व राजकीय उलाढाल होत आहे, तिचे मुख्य वक्ते रशियांतील कादंबरीकारच आहेत. सारांश, जेव्हां जेव्हां एखादें राष्ट्र जगाच्या रंगभूमीवर प्रमुख पात्राचें काम करण्याचें अवसान दाखवितें, तेव्हां तेव्हां त्या अवसानाचे सूत्रक, दर्शक व प्रोत्साहक असे शब्द कोणत्यानाही कोणत्या तरी रूपानें त्या राष्ट्रांतील ग्रंथकारांच्या लेखणींतून व तोंडांतून पडतात. सतराव्या व अठराव्या शतकांत महाराष्ट्राच्या अंगांत सर्व भरतखंडाला स्वतंत्र करण्याचा जेव्हां आवेश भरला, तेव्हां त्या आवेशाचें प्रदर्शन मराठी भाषेत झालेल्या रामायणभारतादि कथांच्याद्वारें झालें. सर्वांत रामदास व मुद्गल ह्यांच्या रामायणांचा प्रभाव महाराष्ट्रसमाजावर अतोनात झाला. ऐतिहासिक लेखांच्या शोधार्थ निरनिराळ्या प्रांतांतून हिंडतांना मला असें आढळून आलें कीं रामदासाचें व मुद्गलाचें युद्धकांड किल्ल्यांतून व सैन्यांतून शिपाई नित्य वाचीत असत. ह्या रामायणांतील कांहीं चित्रें मजजवळ आहेत, त्यांत रावणाला व राक्षसांना मुसुलमानांचे पेहराव, चेहरे व रंग दिलेले आहेत आणि राम व माकडें क्षत्रिय व मराठे म्हणून दर्शविलेले आहेत.

इंग्लंडच्या वाङ्मयाचा अपकर्ष

आणीबाणीचे प्रसंग आले म्हणजे महत्त्वाचे उद्गार बाहेर पडतात हा सिद्धान्त आहे. अर्थात् आणीबाणीचे प्रसंगच जेथें आले नाहींत तेथें असे उद्गार बाहेर पड-ण्याचें कारणच उद्भवत नाहीं; आणि तोच प्रकार इंग्लंडचा झालेला आहे. अलीकडे पाऊणशें वर्षांत व त्यांतल्यात्यांत गेल्या पन्नास वर्षांत संपत्तीच्या पुरांत डुबून गेल्या-मुळें विद्या, कला, कौशल्य, उदीम, व्यापार, यंत्रशास्त्र, वगैरे सर्वत्र इंग्लंडचें अत्यंत दुर्लक्ष होत चाललें आहे. ह्या संपत्तीच्या पुराला व्यापार वगैरे कारणें झालीं असें सांग-तात. परंतु इंग्लंडच्या संपत्तीचें एकच मोठें कारण म्हटलें म्हणजे हिंदुस्थान हें होय. हें कारण जोंपर्यंत विद्यमान आहे, तोपर्यंत इतर राष्ट्राप्रमाणें इंग्लंडाला कशाकरितांहि आक्रोश करण्याची काडीची जरूर नाहीं व इच्छाहि होणें अस्वाभाविक होय. विद्यमान राजकीय, सामाजिक व औद्योगिक स्थितींतच श्रीमंतीचे सर्व सोहाळे भोगावयास सांपडतात, तर ती बदलण्यास कोणता सुखवस्तू माणूस तयार होईल ? १८६० पर्यंत आपल्या स्थितींत कांहीं बदल असावा असें वाटणारी इंग्लंडांत मिल्ल वगैरे मंडळी होती. अलीकडील ४० वर्षांत तो मनू बदलला आहे. सध्या जमल्यास रोमन साम्राज्यासारखें सर्व पृथ्वीवर एकच साम्राज्य करावें असा इंग्लंडचा मोठा डाव आहे, प्रथम काळे लोक असतील त्यांचें चंबूगवाळें उचलावें व नंतर रोमनें कार्थेज वगैरे देश पादाक्रांत करून आस्ते आस्ते सर्व ज्ञात पृथ्वीचें जसें साम्राज्य पटकविलें, तसें फ्रान्स, जर्मनी रशिया, युनायटेड स्टेट्स् वगैरे एकेक राष्ट्राला पादा-क्रांत करीत करीत शेंदोनशें वर्षांत सर्व पृथ्वीच्या चक्रवर्तित्वाला हात घालावा, असें लांबचें धोरण इंग्लंडांतील कित्येक पुरुषांनीं बांधिलेलें असावें, असें त्यांच्या रोमन साम्राज्याच्या संबंधानें वेळोवेळींच्या उद्गारांवरून वाटतें. फ्रान्सासारखीं गडबडीं राष्ट्रें समाजांत व राज्ययंत्रांत अशी सुधारणा करावी आणि तशी सुधारणा करावी वगैरे प्रयोग करण्यांत गुंतलीं आहेत, तों संधि साधून फ्रान्सचें राज्ययंत्रच मुळीं आपल्या हातांत घ्यावें, असा कोणाचा मनोदय असल्यास तो केवळ अशक्यच आहे, असें म्हणतां येत नाहीं. इतकेंच कीं, हें साधण्यास अक्कल व सद्दी ह्यांचें साहाय्य पाहिजे. इंग्लंडाचे विचार हे असे साम्राज्याकडे वळल्यामुळें सामाजीक, धार्मिक, राजकीय वगैरे सामान्य गोष्टींच्या सुधारणेकडे लक्ष फेकण्यास त्याला आतां अवकाश नाहीं. अर्थात् इंग्लंडांतील ग्रंथकर्तेहि त्यासंबंधीं कळकळीनें लिहीत नाहींत. एक ग्रंथकर्ता मात्र इंग्लंडचें हृदय पूर्णपणें जाणतो. आणि तो कोण तर जगत्प्रसिद्ध रुड्यार्ड किप्लिंग हा होय. त्यानें इंग्लंडाच्या मनांतल्या मनोगतांचें प्रदर्शन यथास्थित केलें आहे. साम्राज्यलब्धि हा इंग्लंडचा प्रस्तुतचा मुख्य पुरुषार्थ आहे. इतर कोणतीहि गोष्ट इंग्लंड जाणत नाहीं व कोणी जाणवूं लागला तर ऐकत नाहीं. अशा स्थितींत मनुष्य-

जातीच्या अत्युच्च व उदात्त विचारांचे जे केवळ सागर, ते ग्रंथ इंग्लंडांत कसे निर्माण व्हावे ? स्वातंत्र्याच्या, प्रगतीच्या आणि सामाजिक, धार्मिक व राजकीय सुधारणेच्या सिद्धांतांनीं सध्या परदेश पहावा हेंच सोयीचें दिसतें !

फ्रान्स व रशिया यांचें श्रेष्ठ सारस्वत

इंग्लंडाच्या पुरुषार्थाची दिशा ही अशी पडल्यामुळें, फ्रान्सांतील किंवा रशियांतील राष्ट्रीय किंवा सामाजिक कादंबऱ्यासारख्या कादंबऱ्या त्या देशांत प्रस्तुत कालीं निपजत नाहीत. अठराव्या शतकांतील क्रांतीनें फ्रान्सांतील समाजाला जें चलन मिळालेलें आहे, त्याच्यामुळें समाजांतील व्यंगें बाहेर काढण्याकडे व तो पूर्णतेच्या दिशेप्रत नेण्याकडे तिकडील सर्व विचारी लोकांचें लक्ष लागलेलें आहे. मोठमोठे कारखाने, शहरें, कौन्सिलें, पेढ्या वगैरे ठिकाणीं अनीतीचें साम्राज्य केवढें जुलमाचें आहे, समाजांतील कांहीं वर्ग इतर वर्गांना किती अन्यायानें वागवितात, शास्त्रापुढें धर्माचें नव्हे, धर्मसंस्थांचें प्रस्थ किती पोकळ पडत चाललें आहे, वगैरे गोष्टींचा खल शास्त्रज्ञाप्रमाणें फ्रान्सांतील कादंबरीकारहि करतात. हिक्टर ह्यूगोचीं 'The Miserables' किंवा झोलाची पारिस ही कादंबरी घेतली म्हणजे फ्रेंच समाजाच्या पोटांत कोणता वडवाग्नि पेट घेतो आहे तें कळतें; व हेंच कळविण्याचा ह्या ग्रंथकारांचा मुख्य हेतू आहे. रशियन समाजाचीहि अशीच स्थिति झालेली आहे. फ्रान्सची राज्यपद्धति पृथ्वीवरील सर्व देशांपेक्षां उदार व स्वतंत्र असल्यामुळें विचारी पुरुषांना आपले विचार कोणताहि प्रतिबंध न होतां प्रदर्शित करतां येतात. त्यामुळें वर्तमानपत्रें, मासिकपुस्तकें, कविता, नाटकें, कादंबऱ्या, इतिहास वगैरे नाना तऱ्हांनी फ्रान्सांत विचाराचें प्रदर्शन होण्यास कोणतीच हरकत पडत नाहीं. तेंच, रशियांत अनियंत्रित राजसत्ता असल्याकारणानें, मुद्रणाचें स्वातंत्र्य नाहीं आणि लोकांना आपले विचार योग्य मार्गांनीं प्रसिद्ध करतां येत नाहींत. ह्याचा असा परिणाम झाला आहे कीं १८४० पासून म्हणजे गोगोल यानें आपली पहिली कादंबरी छापिल्याच्या काळापासून तों आतांपर्यंत रशियन ग्रंथकारांनीं राष्ट्रीय अशा सर्व वासना कादंबरीच्या द्वारा प्रगट केल्या आहेत. गोगोल, गोशाराफ, पिसेन्स्की, दोस्तोव्हस्की, टूर्गेनेफ व टॉलस्टॉय वगैरे नामांकित कादंबरीकार आजपर्यंत रशियांत झाले. पैकीं कौंट टॉलस्टॉय याच्या प्रख्यात कादंबऱ्या म्हटल्या म्हणजे Les Cosaques, Guerreet Paix, Anna Karenina वगैरे होत. रशियांतील तरुण पिढींतील लोकांच्या मतांची रचना ह्या कादंबऱ्यांच्या सेवनानें झाली आहे. एवढें सांगितलें म्हणजे राष्ट्ररचनेंत ह्या ग्रंथांचें कार्य काय ह्याचें निराळें वर्णन करण्याची जरूर नाहीं.

टॉयस्टॉय, झोला, ह्यूगो ह्यांनीं लिहिलेल्या कादंबऱ्यांच्या तोडीची इंग्लिश भाषेंत एकहि कादंबरी नाहीं. जगांतील सर्व राष्ट्रांना प्रसिद्ध अशा निरनिराळ्या

भाषांतील कादंबऱ्यांची गणना केली तर त्यांत इंग्लंडांतील दोन तीन व अमेरिकेंतील एकाच कादंबरीचा समावेश करावा लागेल. Filgrim's Progress, Gulliver's Travels, Robinson Crusoe आणि Uncle Tom's cabin ह्या चार कादंबऱ्यांखेरीज दुसऱ्या कोणत्याहि कादंबऱ्या इतर राष्ट्रांना सररहा माहीत असतील असें म्हणवत नाहीं. पैकीं पहिल्या तिहींत अद्भुताचा खेळ अतोनात आहे. चवथी सर्वमान्य असून इतिहासांत तिचें कार्य फारच नांव घेण्याजोगें झालें आहे. पहिल्या तीन यद्यपि अद्भुतांतील आहेत तत्रापि त्यांचाहि इंग्लिश राष्ट्राला थोडा थोडका उपयोग झाला नाहीं. पहिलीनें धर्म व नीति ह्यांचा प्रसार केला. दुसरीनें समाजांतील नाना प्रकारचे भ्रम, औपरोधिक पद्धतीनें मोडण्याचें श्रेय घेतलें व तिसरीनें इंग्लंडांतील तरुणांना साहसी प्रवासी केलें. ह्या तिन्हीं कादंबऱ्या दीडशें वर्षांच्या पूर्वीच्या आहेत. त्यांच्यापुढें त्यांच्या तोडीचीं अशीं पुस्तकें इंग्लिश भाषेंत अद्यापपर्यंत झालीं नाहींत. राष्ट्रीय कार्य करणाऱ्या इंग्लिश भाषेंतील कादंबऱ्या ह्या एवढ्याच.

मराठी कादंबरीची दशा

इंग्लंडांतील उत्तम कादंबऱ्या कोणत्या, त्या देशांत कादंबरीची स्थिति सध्यां कोणत्या प्रकारची आहे, आणि फ्रान्स व रशिया ह्या देशांतील उत्कृष्ट वास्तविक व अद्भुत कादंबरीकार कोणते, ह्यासंबंधानें येथपर्यंत चार शब्द सांगितले. त्यावरून आपल्या मराठींत ज्या सध्या वास्तविक कादंबऱ्या झाल्या आहेत, त्यांची योग्यता काय व प्रस्तुतच्या मराठी कादंबरीकारांच्या हातून अपेक्षा कोणती करावयाची, ह्याचा अंदाज करतां येईल.

प्रस्तुतच्या मराठी कादंबरीकारांत स्वतंत्र अशी ग्रंथरचना मोठ्या प्रमाणावर करणारा असा एकच ग्रंथकार आहे. रा. रा. हरि नारायण आपटे ह्यांच्या कृतींनीं बऱ्याच लोकांचें मनोरंजन झालेलें आहे व पुढेंहि तें जास्त प्रमाणावर होईल अशी आशा आहे. परंतु व्यक्तिविषयक कादंबऱ्या लिहिण्यापलीकडे ह्यांची धाव अद्यापपर्यंत गेली नाहीं. इंग्लंडांतील Society Novels पेक्षां ह्यांच्या कादंबऱ्या सरस आहेत. परंतु डिकन्स, थॉकरे वगैरेंच्या तोडीला ह्यांचा कोणताहि ग्रंथ बसविता येईल असें वाटत नाहीं. ह्यूगो, झोला, टॉलस्टॉय, ह्यांच्यापासून तर हे फारच दूर आहेत. महाशब्दे, शंखध्वनि, बुलीस्नीक, फेअरब्रेन, प्रो० डयांडी वगैरे कांहीं कांहीं पात्रें ह्यांनीं बरींच नामांकित अशीं निर्माण केलीं आहेत. परंतु तीं जितकीं उठून दिसलीं पाहिजेत तितकीं दिसत नाहींत. ह्यांच्याहिपेक्षां कित्येक बाबींत उत्तम अशी एक कादंबरी एका ग्रंथकारानें लिहिलेली आहे. ती कादंबरी रा. ओककृत शिरस्तेदार ही होय. हींत मोठा दोष म्हटला म्हणजे ही फार सूक्ष्म प्रमाणावर घरलेली आहे.

हिचें रूपुस्त जर वाढविलें असतें व त्या रूपुस्तांत अघटित चमत्कारांचें वर्णन केलें असतें, म्हणजे शिरस्तेदाराचा, मामलतदार, दफ्तरदार, कौन्सिलरहि यद्यपि झाला, तत्रापि त्याचा कारकुनी बाणा सुटावयाचा नाहीं, अशा तऱ्हेची जर ह्या ग्रंथाची सांगोपांग उठावणी झाली असती, तर हिंदुस्थानांतील पांच रुपडयांपासून पांच हजारापर्यंतच्या कारकुनी पेशाचें हुबेहुब चित्र निघालें असतें. कादंबरीच्या पुठ्यांतील ह्यांचें हें एकच पुस्तक असल्यामुळें व तेंहि फारच संकुचित व पिटुकलें असल्यामुळें, त्यांची गणना रा. आपटे ह्यांच्यासारख्या पांच चार ग्रंथ प्रसवलेल्या कादंबरीकाराबरोबर करणें योग्य होणार नाहीं.

रा. आपटे यांची स्फूर्ति कित्येक इंग्रजी कादंबरीकारांच्या ग्रंथांवरून झालेली दिसते. आतां दुसऱ्याच्या ग्रंथावरून एखाद्याची ग्रंथरचना सुचलेली असलेली म्हणजे त्याचा सबंद ग्रंथ कुचकामाचा ठरतो असा कांहीं प्रकार नाहीं. मूळ ग्रंथांतील कल्पना सुधारून व त्याचीं व्यंगें काढून टाकून ग्रंथरचना होण्यासारखी असते. शेक्सपियर किंवा ड्यूमास ह्यांच्यासारख्या श्रेष्ठ ग्रंथकारांना ह्या उसन्याची फारशी फिकीर नसते. परंतु एकंदरींत सामान्य ग्रंथकारांसंबंधानें हा प्रकार गौणच समजावयाचा. मनुष्याच्या संसारांत व सुधारणेंत इतक्या कांहीं अजब गोष्टी भरलेल्या आहेत कीं, लाखों कादंबऱ्यांना लाखों निरनिराळे विषय तींत सांपडण्यासारखे आहेत. असें असतां म्हणजे कारण नसतां, दुसऱ्याच्या तोंडाकडे आमच्या इकडील कादंबरीकारांनीं बघावें तें कां समजत नाहीं. शिवाय रा. आपटे ह्यांच्या अद्‌भुत व वास्तविक ह्यांसंबंधींच्या कल्पना किंचित् अस्पष्ट आहेत असें वाटतें. त्यामुळें त्यांची कृति जितकी ठळक निपजावी तितकी निपजत नाहीं.

अद्‌भुत व वास्तविक यांचा संबंध

आपण ज्याला अद्‌भुत व वास्तविक म्हणून मराठींत म्हणतों, त्यालाच युरोपांत Romantic व realistic ह्या नांवानें ओळखतात. समाज व संसार ह्यांच्यांत अद्‌भुत व वास्तविक ह्यांचें नाना प्रमाणांचें मिश्रण असतें. शुद्ध अद्‌भुत किंवा शुद्ध वास्तविक असें ह्या जगांत कांहींच नाहीं. सर्व मिश्र असाच प्रकार आहे; आणि असा जर प्रकार आहे, तर निव्वळ शुद्ध वास्तविक कादंबरी लिहूं जाण्याचा आव घालणें केवळ थोतांड आहे; व थोतांड नसलें, तर चूक आहे. चित्रकर्माप्रमाणें कादंबरी-लेखन ही कला आहे आणि चित्रांत हुबेहूब वस्तू उठवून देणें हें जसें अशक्य असतें, पांढरे व काळें ह्यांचें मिश्रण करून नेत्रांना हुबेहूब वस्तू दिसली असा भ्रम पाडावयाचा असतो, तीच तऱ्हा कादंबरीचीहि असते. संसारातील किंवा समाजांतील जीं हरतऱ्हेचीं कृत्यें त्यापैकीं अनेकांचा लोप करून कांहीं तेवढीं प्रामुख्यानें, तीं मुळांत असतील त्यापेक्षां, जास्त ठळठळीत अशीं दाखवावयाचीं हेंच कादंबरीरचनेचें

मुख्य रहस्य आहे. अनेक कृत्यांचा व गुणांचा लोप व अध्याहार आणि कांहींचें प्रदर्शन, हा सर्वत्र कादंबरीकारांचा मार्ग असतो. गुणांचें व कृत्यांचें वर्णन करण्यांत ठळ-ठळीतपणाचा, अतिशयाचा किंवा अतिशयोक्तीचा अवलंब कोणत्या प्रमाणानें करावा, ह्यासंबंधीं मात्र आद्भुतिकांत व वास्तविकांत फरक असतो. एक अतिशयोक्तीचा जास्त उपयोग करतो व दुसरा कमी करतो. उदाहरणार्थः—पॉल आणि व्हर्जिनिया ही अत्यंत उत्कृष्ट अशी अद्भुत कादंबरी आहे. हिच्याशीं तुलना करावयाला एखादी वास्तविक कादंबरी घेऊं. अत्यंत वास्तविक अशा कादंबऱ्या म्हटल्या म्हणजे गुप्त पोलिसांच्या कथा होत. परंतु ह्यांतहि अद्भुताचा बराच भाग असतो. दुर्गुणांच्या मूर्ती, पाजीपणाचे कळस व फसवेगिरीचे पुतळे जर कोठें पहावयाचे असतील तर ते खऱ्याखुऱ्या समाजांत सांपडावयाचे नाहींत; ते पहावयास गाबोरियोचे ग्रंथच पाहिले पाहिजेत. ह्या कथा सोडून झोलाच्या ग्रंथाकडे वळूं. झोलाची नाना घ्या, तींतहि अद्भुताचा भाग सडकून आहे. ह्यूगोची The miserables हींत बोलून चालून अद्भुताचा अवलंब बराच केलेला आहे. डिकन्सच्या कादंबऱ्या वास्तविक म्हणून फारच नांवाजल्या गेल्या आहेत. त्यांतली पिक्विक्ची कादंबरी अत्यंत वास्तविक म्हणून कीर्ति आहे. परंतु तींतहि अतिशयोक्ति पहावी तर हवी तितकी आहे. येणें-प्रमाणें वास्तविक म्हणून नांवाजलेली वाटेल ती प्रख्यात कादंबरी घ्या, तींत अद्भुताचा अंश बराच सांपडेल. पृथ्वींत एका मात्र स्थलीं अद्भुताचें प्रदर्शन अत्यंत थोडें सांप-डेल. व तें स्थल कोर्टांतील खटल्यांचे वर्तमानपत्रांतील रिपोर्ट हें होय. परंतु वर्त-मानपत्रांतील रिपोर्टांकडे जाण्यापूर्वी खुद्द रा. रा. आपटे यांच्या वास्तविक कादंबऱ्यां-चाच आपण आश्रय करूं. त्यांतहि अतिशयोक्त व अद्भुत हें आहेच. सदर कादं-बरीकाराचें राधाबाई हें वास्तविक पात्र घ्या. म्हाताऱ्या नवऱ्याशीं पातिव्रत्यानें राह-णारी, नवरा मेल्यानंतर केस न काढणारी, व इतकी सुधारून व केस ठेवून पुनर्विवाह न करणारी, अशी बाई वास्तविक कोटींतील कीं अद्भुत कोटींतील ह्याचा निर्णय वस्तु वाद्यांनींच करावा. सारांश काय, कीं अद्भुत अशी एकहि कोटी ज्यांत नाहीं असा कादंबरीग्रंथ मिळणें प्रायः अशक्य आहे. आणि यदाकदाचित् मिळालाच तर तो भिकारांतला भिकार आहे असें खुशाल धरून चालावें. पृथ्वीला सोडून जसें मनु-ष्यत्व नाहीं, तसें अद्भुताला सोडून कादंबरीत्वहि नाहीं.

झोला, टॉलूस्टॉय वगैरे प्रख्यात कादंबरीकारांना realistic किंवा वास्तविक हें जें विशेषण लावतात, तें त्यांच्यांत अद्भुतकल्पना नसतात म्हणून लावतात असा भाग नव्हे. तर साक्षात् संसाराच्या व समाजाच्या सुखदुःखांचीं वर्णनें ते अद्भुत शब्दांनीं करतात म्हणून त्यांना वास्तविक ही संज्ञा लाविली जाते. खाणींत काम करा-वयाला जातांना व येतांना हजारों तरुण स्त्रीपुरुषांचें बाकडें पाऊल गेलें म्हणजे गेलें म्हणून तारस्वरानें व कळकळीनें सांगण्यांत जे कादंबरीकार अतिशयोक्ति झाली

म्हणून शरमत नाहींत, त्यांनाच वास्तविक हें नामाभिधान यथार्थ लागूं पडतें. अन्यायानें किंवा न्यायानें काळ्या पाण्यावर गेलेला कैदी परत येऊन साधुवृत्तीनें व उदार चरितानें राहूं लागला असतां त्याचा छळ करणारा समाज राक्षसी होय हें निक्षून सांगणाऱ्या ह्यूगोसारख्या माहात्म्यालाच वास्तविक कादंबरीकाराची पदवी शोभते. त्याच्या सारख्याच्या पुढें इतर निव्वळ पांढऱ्यावर काळें करणारे खर्डेघाशे होत ! फार झालें तर त्यांनीं सटरफटर गोष्टी लिहून व्यक्तिमात्राला रंजवावें इतकेंच.

युरोपियन कादंबरीकार व आपटे वगैरे मराठी कादंबरीकार

येथपर्यंतच्या निरूपणावरून येवढें स्पष्ट झालें कीं, realistic किंवा वास्तविक ह्या शब्दाचा अर्थ येथील लोक समजतात, त्याहून युरोपांतील कादंबरीकार फारच निराळा समजतात. एखाद्या विशिष्ट व्यक्तीचा किंवा विचाराचा अतिशयानें निष्कर्ष करणें हें तर ते आपुल्या कलेचें बीज समजतात. रा. रा. आपटेहि कृतीनें यूरोपियनांचाच बऱ्याच अंशानें कित्ता गिरवितात, परंतु कोणत्या पद्धतीनें आपण आपलें काम करतों त्याचें त्यांना पृथक्करण करून लक्षण करतांना पंचाईत पडते. Realistic ह्या शब्दाचा, जें जसें असतें. तें तसें वठवावयाचें, असा अर्थ रा. आपटे समजतात. परंतु realistic शब्दाचा हा अर्थ कादंबरीच्या किंवा इतर कोणत्याहि कलेंत शक्य नाहीं. वर्तमानपत्रांतील रिपोर्टांत मात्र तो शक्य आहे. रा. रा. आपटे ह्यांच्या कादंबऱ्या वर्तमानपत्रांतील रिपोर्ट नाहींत. अर्थात् त्यांच्या कृतींतील ह्या शब्दाचा अर्थ युरोपियन कादंबरीकाराप्रमाणेंच आहे हें उघड आहे. मनांतील अर्थ एक, व कलेचा निर्बंध दुसराच, असा प्रकार झाल्यामुळें, ह्यांच्या कादंबरींतील कित्येक भाग लांबलचक व कंटाळवाणे होतात, आणि संविधानकाची जुळणी बांधेसूत जमत नाहीं. कलेच्या मर्मासंबंधानें गैरसमज झाल्यानें हा प्रकार होतो हें उघड आहे. Natural व realistic ह्या दोन शब्दांनींहि ह्या ग्रंथकाराच्या मनांत बराच घोटाळा होण्यासारखा आहे. तसेंच त्यांचा दुसराहि एक गैरसमज झालेला असण्याचा संभव दिसतो. तो हा कीं, समाजांतील नीतीनें, वर्तमानानें, विचारानें, रहाणीनें, व दारिद्र्यानें गलिच्छ असा जो भाग त्याचें प्रदर्शन करणें सत्कादंबरीचें काम नव्हे; परंतु हा समज निसर्गाच्या विरुद्ध आहे. उजेड आणि अंधार, ईश्वर आणि सैतान, चांगलें आणि वाईट, सुगुण आणि दुर्गुण ह्या जोड्या ब्रह्मानें सृष्टीच्या प्रारंभापासूनच निर्माण केल्या आहेत. त्यापैकीं एकीचा निषेध कोमल मनाच्या कादंबरीकारांनीं केला म्हणजे ती नाहींशी होते असें थोडेंच आहे. डोळे गच्च मिटून धरिले म्हणून आस्वल अंगावर चालून यावयाचें थोडेंच रहातें. तेव्हां समाजांतील हा जो पतित भाग आहे त्याच्या स्थितीचें प्रदर्शन करणें हें प्रत्येक कादंबरीकारानें आपलें आद्यकर्तव्य समजलें पाहिजे. श्रीमंतींत अंध झालेल्या राष्ट्रांतील कादंबरीकारांना हें कर्तव्य करणें लाजिरवाणें वाटल्यास,

तें त्यांना खुशाल वाटो. परंतु हिंदुस्थानांतील व महाराष्ट्रांतील कादंबरीकारांना तसें वाटून परिणाम लागावयाचा नाहीं. ह्या देशांतील दारिद्र्यानें गांजलेल्या, रोगानें पीडिलेल्या व विद्येनें मागासलेल्या, सामान्य जनसमूहाचा कैवार सहृदयतेचे मूर्तिमंत पुतळे जे कादंबरीकार त्यांनीं घेतला नाहीं, तर दुसरा कोण घेईल ? लोकांची खरी स्थिति लोकांच्या मनांत यथास्थित बिंबविण्याला कादंबरीसारखें दुसरें साधन नाहीं. त्या साधनाचा योग्य व पूर्ण उपयोग करणें ही महाराष्ट्रांतील कादंबरीकारांवर मोठी जबाबदारी येऊन पडलेली आहे. दोनशें वर्षांपूर्वीच्या ग्रंथकारांनीं अद्भुत कादंबरीच्या द्वारानें व प्रासादिक कवितेच्या मार्गानें सामान्यजनसमूहाला आत्मबोध करून दिला. प्रस्तुतकालीं तेंच कार्य बहुधा वास्तविक कादंबऱ्यांच्या व कदाचित् अद्भुत गोष्टींच्या द्वारा व्हावें असा अदमास दिसतो. रा. रा. आपटे यांची रामजी ही गोष्ट ह्या अदमासाचें प्रत्यक्ष उदाहरण आहे.

एकंदर जगांतील कादंबऱ्यांच्या मानानें रा. रा. हरि नारायण आपटे ह्यांच्या कादंबऱ्यांची योग्यता काय आहे हें दाखवून दिलें म्हणजे, मराठींतील वर्तमानकालीन वास्तविक कादंबऱ्यांची किंमत कोणत्या दर्जाची आहे तें सांगितल्यासारखेंच होतें. कारण, स्वतंत्र ग्रंथरचना करणारा असा कादंबरीकार महाराष्ट्रांत रा. आपट्यांखेरीज दुसरा सध्यां कोणीच नाहीं. मासिक मनोरंजनाचे संपादक श्रीयुत काशीनाथ रघुनाथ मित्र, कादंबरी कल्पद्रुमाचे संपादक रा. चितळे व इतर किरकोळ लेखक ह्यांना मराठी कादंबरी संपादकांच्या गणनेंत घेणें जरूर आहे. ह्यांची भाषा बरी असते. परंतु भाषान्तर व रूपान्तर ह्यांतच त्यांचा बहुतेक व्याप असल्यामुळें, स्वतंत्र ग्रंथरचनेचा विचार होत असतांना त्यांच्याकडे लक्ष देणें न्याय्य होईल किंवा काय ह्याची शंका वाटते. परभाषेंतील उत्तम कादंबऱ्यांचीं भाषान्तरें किंवा रूपान्तरें करणें कोणत्याहि प्रकारें वाईट आहे असें म्हणण्याचा रोख नाहीं. रोख एवढाच कीं भाषान्तर असो, किंवा रूपान्तर असो, त्या ग्रंथांतील गुणांचें सर्व श्रेय मूळ ग्रंथकाराकडे जातें. भाषान्तरकार किंवा रूपान्तरकार गचाळ असल्यास तो दोषाला मात्र धनी होतो. ही अशी अडचण असल्यामुळें ह्या दोघां संपादकांच्या व इतर तद्वर्गीयांच्या कृतींवर मी टीका करूं इच्छित नाहीं. तत्रापि श्रीयुत मित्र ह्यांच्या मासिकांतील कांहीं छोट्या गोष्टी कदाचित् स्वतंत्र असल्यास त्यांचा विचार येथें करणें अवश्य होतें. परंतु भाषान्तर व रूपान्तर ह्यांच्या व्याप्तीनें स्वतंत्राचा त्यांच्या मासिकांत इतका लोप झाला आहे कीं स्वतंत्र कथा हुडकून काढणें म्हणजे एक प्रकारचें कोडेंच उलगडीत बसण्यासारखें आहे. रा. आपटे ह्यांच्या करमणुकींतील बहुतेक लहान गोष्टींना हाच कायदा लागूं केला पाहिजे. रा. आपट्यांच्या मोठ्या कादंबऱ्यांपैकीं ज्या कादंबऱ्या पाश्चात्य कादंबऱ्यावरून सुचल्या त्यांची देखील किंमत तेवढ्यानें कमीच होते. कां कीं इतर देशांतील ग्रंथकारांनीं मोठ्या परिश्रमानें जीं संविधानकें

जुळविलेलीं व ज्या क्लृप्त्या काढलेल्या असण्याचा संभव आहे, तीं संविधानकें व त्या क्लृप्त्या घेऊन रचना करणारा ग्रंथकार तज्ज्ञ व सहृदय टीकाकारांच्या आदरास जसा पात्र व्हावा तसा होत नाहीं. ही एक गोष्ट वगळली आणि रा. आपटे ह्यांच्या कृतींचें परीक्षण करूं गेलें, तर असें दिसतें कीं अलीकडील तीस वर्षांतील वास्तविक कादंबरीकारांत हे फारच मोठ्या योग्यतेचे आहेत. ह्यांचें लक्ष राष्ट्रीय प्रश्नांपेक्षां सामाजिक प्रश्नांकडे विशेष आहे. सामाजिक प्रश्नांच्या वरवर दिसणाऱ्या ज्या बाजू त्यांचीं वर्णनें हे पाल्हाळानें देतात. परंतु ह्यांच्या पात्रांच्या हृदयांत विकारांचा व विचारांचा जो थोर कलह माजलेला असावा असें वाचकांस वाटतें त्यांचें प्रदर्शन करण्याकडे ह्यांचें लक्ष गेलेलें नाहीं. सामान्य संकटें, रोजचें वर्तन, घरगुती भाषणें, लहानसे पुरुषार्थ, ह्या विषयांचीं चटकदार वर्णनें ह्यांच्या ग्रंथांत हवीं तितकीं आहेत व ह्यांनीं जर आपली कोणतीच कादंबरी संपविली नाहीं तर हीं वर्णनें बराच कंटाळा येई तोंपर्यंत वाढवितां येणें शक्य आहे. कुंचल्याचे दोन चार हात मारून एखादा वस्ताद जें चित्र कायमचें खुलवून टाकतो त्या चित्राचा नुसता उठाव करण्यास प्रस्तुत कादंबरीकाराला वर्णनांवर वर्णनें द्यावीं लागतात. सारांश मागें सांगितल्याप्रमाणें Society novels च्या वरती, व डिकन्स, थॉकरे ह्यांच्या खालती, अशी ह्यांची सध्यां स्थिति आहे. तरी कादंबरीक्षेत्रांत प्रवेश करून ह्यांना कोठें दहा पंधरा वर्षें झालेलीं आहेत. पुढील दहा वीस वर्षांत हे कदाचित् सध्यांच्या वाचकांच्या स्वप्नींहि नाहींत असे स्वतंत्र चमत्कार करूं शकतील असें त्यांच्या रामजी ह्या गोष्टीवरून वाटतें.

प्रस्तुत कालीं मराठी कादंबरीच्या वास्तविक शाखेची स्थिति ही अशी आहे. इंग्लंडांतील Society novels पेक्षां उत्तम अशा कादंबऱ्या तींत निपजूं लागल्या आहेत. परंतु स्कॉट, फील्डिंग, डिकन्स वगैरेंच्या बरोबरीचें अद्याप कांहीं एक झालेलें नाहीं. झोला, टॉलस्टॉय ह्यांच्याशीं टक्कर मारण्याची तर गोष्ट अजून बरीच लांब आहे. वास्तविक शाखेच्या ह्या स्थितिपेक्षांहि अद्भुत शाखेची दैना अधिक आहे. मुक्तामाला, मंजुघोषा, वगैरेचें जें एकदां खुरटें पीक येऊन गेलें त्यावर अद्यापपर्यंत पुनः म्हणून अद्भुत शाखेला बहार आला नाहीं. परंतु ही सर्वथा शोचनीय गोष्ट आहे. पर्वा नुकती जर्मनींत जीन पॉल रिक्टरसारखी मंडळी नामी नामी अद्भुत कथा निर्माण करते; आणि अद्भुताचा काळ गेला आणि वास्तविकाचा काळ आला, म्हणून म्हातारपणच्या गोष्टी करण्यांत आम्ही शहाणपणा मानतों, ह्याला काय बरें म्हणावें ? आपल्या इकडील सरस्वतीच्या राज्यांतील बहुतेक एकोनएक क्षेत्रें लागवडीवांचून आज शेकडों वर्षें रिकामीं पडलेलीं असतां, अमुक क्षेत्र नापीक व अमुक क्षेत्र सुपीक, असें आम्हीं काय म्हणून म्हणतों ? परदेशचे लोक आपापल्या देशांना लागूं पडणारीं जीं विधानें करतात तीं अक्षरशः उचलून आम्हीं चोहोंकडे मिरवावीं हा शहाणपणा कोठला ? गोष्ट अशी आहे कीं, आपल्या-

2334 ह, गि&ए—
9937 २९१
99/G/4-L

इकडील सरस्वतीप्रदेशांतील सर्व क्षेत्रें भरपूर पीक देण्याला खचून मेहनत करणाऱ्या व पाश्चात्त्य यंत्रांचा उपयोग करणाऱ्या उद्योगी कृषीवलाची उत्सुकतेनें नुसती वाट बघत आहेत. ही फारा दिवसांची आशा सफल झाली तर हीं क्षेत्रें जें उफाड पीक देतील तें घेऊन महाराष्ट्रांतील लोक आपल्याला धन्य मानतील व पाहून पृथ्वीवरील सर्व राष्ट्रें कौतुकानें माना तुकावतील ! परंतु हें व्हावें कसें ? हाच प्रश्न आहे !

बाळमित्राचें भाषांतर करणाऱ्या छन्यांपासून तों मोठमोठ्या वास्तविक कादंबऱ्या लिहिणाऱ्या आपटयांपर्यंत वास्तविक कादंबरीची मजल कोठपर्यंत येऊन पोहोंचली व ही लहानशी मजल मारण्यास किती वर्षें लागलीं, ह्याचा विचार केला म्हणजे टॉलस्टॉयपर्यंत जाण्याला किती युगें लागतील तें हरि जाणे ! समाधानाची बाब एवढीच कीं पाऊल पुढें आहे, मागें नाहीं. आतां ह्यूगो, झोला, टॉल्स्टॉय ह्यांच्या-सारखी ग्रंथरचना व्हावी अशी इच्छा असेल, तर त्याला एकच उपाय आहे. ह्यांच्या-सारखीं मनें ह्या देशांतील कादंबरीकारांचीं बनलीं पाहिजेत. विधवांची दुःखें पाहून जीव तिळतिळ तुटला पाहिजे. गरीबांची उपासमार पाहून स्वतःच्या घशाखालीं घांस उतरतां कामा नये. स्वदेशाचें दैन्य पाहून रात्रींची झोंप डोळ्यांवरून उडून जावी. स्त्रियांची बेअब्रू झालेली पाहून द्रौपदीच्या भीमाप्रमाणें त्वेष यावा. ही मनोवृत्ति ज्यांची झाली, ह्या ब्रह्मानंदीं ज्यांची टाळी लागली, त्यांनींच कप्तान ड्रेफूची बाजू घेऊन सर्व राष्ट्रांविरुद्ध भांडावें व रशियांतील पादशाहांनाहि चळचळ कापावयाला लावावें. इतरांची माय हीं कामें करणाऱ्या कादंबरीकारांना व्याली नाहीं ! तेव्हां उत्तमोत्तम कादंबरीकार व्हावयाचें म्हणजे मनोवृत्ति अशी अत्यंत जाज्वल्य पाहिजे. श्रेष्ठ विद्या, विस्तृत वाचन, मोठा प्रवास, तीक्ष्ण निरीक्षण, कडक परीक्षण, थोर औदार्य, गाढ सानुभूति व नाटकी लेखणी हे गुण तर नांव घेण्यासारख्या प्रत्येक कादंबरीकारांत हवेतच. परंतु सर्वांत मुख्य गुण म्हटला म्हणजे जाज्वल्य मनोवृत्ति हवी. तिच्या अभावीं वरील सर्व गुण व्यर्थ होत. ही मनोवृत्ति कृत्रिम तऱ्हेनें येणें नाहीं. ही ईश्वराची देणगी आहे. उत्तेजक मंडळयांच्या बक्षिसांनीं किंवा प्रोत्साहक सोसायट्यांच्या देणग्यांनीं रद्दड कविता, रद्दड कादंबऱ्या, रद्दड नाटकें, रद्दड चरित्रें अशी सर्व रद्दड ग्रंथप्रजा उत्पन्न होईल. तेजस्वी ग्रंथसंपत्ति निर्माण व्हावयाला जाज्वल्य अशा प्रखर मनोवृत्तीचा जातीचाच अंकुर पाहिजे. बक्षिसानीं प्रासादिक ग्रंथ निर्माण होते तर, बाळाजी बाजीरावानें म्हटल्याप्रमाणें, चुटक्यांनीं पोरेंहि झालीं असतीं ! रा. आपटे ह्यांची वाङ्मयप्रजा उत्तेजनोत्पन्न नाहीं हा एक त्यांच्या तर्फेचा गुणच आहे.

रा. रा आपटे ह्यांच्या बहुतेक सर्व कादंबऱ्या व्यक्तिविषयक असून, त्यांतील बरींच पात्रें सुधारक-वर्गापैकीं आहेत. रा. आपटे स्वतः ह्याच वर्गापैकीं असल्यामुळें, त्यांच्या मनोरचनेची सावली त्यांच्या पात्रांवर पडावी ह्यांत कांहीं आश्चर्य नाहीं.

अखिल विश्वाच्या सुखादुःखाशीं समानशील असणारे व्यास, वाल्मीकि, होमर, गेटी, रामदास, रानडे, व्होल्टेअर, डांटी ह्यांची गोष्ट निराळी, आणि दोन दिवसांच्या पक्षाभिमानांत गुंतणारी तुमच्या आमच्यासारखीं सामान्य माणसें निराळीं ! तेव्हां सुधारणेची छटा त्यांच्या लेखांत सर्वत्र दिसावी हें स्वाभाविकच आहे. रा. रा. आपटे यांनीं आजपर्यंत पांच सहा मोठमोठ्या कादंबऱ्या करमणुकींतून प्रसिद्ध केल्या. त्यांपैकीं प्रत्येक दहा दहा हजार वाचकांनीं वाचली असें धरलें, तर सुधारणेच्या मतांचा स्पर्श बऱ्याच प्रदेशभर झाला असें कबूल केलें पाहिजे. सुधारणेचा जो हा प्रकाश पडला तो असाच पडत जावा असें माझें मत आहे. परंतु ह्या जंगम प्रेरणेला तोलून धरणारा जो उद्धारकपक्ष त्याचीं स्थावर मतें कायम करण्याला कादंबरीद्वारा कांहीं प्रयत्न झाले आहेत असें दिसत नाहीं. अपवादाला, प्रो. गोळे यांचा 'हिंदुधर्म आणि सुधारणा' हा एकच उत्कृष्ट ग्रंथ आहे. असो. मूळ स्थावरच्च जर जाग्यावर नसलें, तर जंगमतेचा प्रयोग कशावर करावयाचा ? तेव्हां रा. आपटे यांच्या प्रगतिशील प्रयत्नांनें तोलून धरण्यास स्थितिशील प्रयत्नांची जरूर आहे अशी इशारत करून आणि ह्या वास्तविक कादंबऱ्यांचा पुढील दहा वीस वर्षांत स्वतंत्र उत्कर्ष व्हावा असें इच्छून ह्या प्रकरणाला येथेंच तूर्त सोडून देतों.

युरोपांतील कादंबरांशीं तुलना केली असतां आपल्या इकडील वर्तमान कादंबरीकारांची योग्यता कोणत्या प्रकारची आहे. ह्याचा विचार झाला. ह्या विचारावर कोणी असा आक्षेप आणतील कीं, थोरांशीं लहानाची तुलना करून लहानाला लहान ठरविणें व त्याचा उत्साहभंग करणें सानुभूतीचें लक्षण नव्हे. परंतु प्रस्तुत टीकाकर्त्याचें सानुभूतींप्रमाणें सत्याकडे व प्रोत्साहनाप्रमाणेंच प्रगतीकडे विशेष लक्ष असल्यामुळें, त्याला हा तुलनेचाच मार्ग स्वीकारणें श्रेयस्कर दिसतें, राष्ट्राराष्ट्रांत जो जीवनार्थ कलह चालला आहे, त्या कलहांत उत्साहानें शिरण्याची जर इच्छा व आवश्यकता असेल, तर त्या कलहार्थ लागणारीं साधनेंहि आपल्यापाशीं इतरांपेक्षां श्रेष्ठ, निदान इतरांच्या बरोबरीचीं तरी, असणें आवश्यक आहे. कलहांत शिरल्यावर लहानपणाच्या सबबीकडे लक्ष देऊन कोणीं कींव करतो, अशांतली गोष्ट बिलकुल नाहीं. तेव्हां आपल्या इकडील कादंबरीच्या पुस्तकांची किंमत ठरवितांना जगांत जें कांहीं उत्कृष्ट असें सवर्गीय सारस्वत असेल त्याशींच तुलना करणें भाग आहे. शिवाय अशी तुलना करण्याला दुसरेंहि एक कारण आहे. मराठी कादंबरीकार ग्रंथ लिहितात ते महाराष्ट्रांतील सर्व लोकांकरितां लिहितात असा माझा समज आहे. तसेंच महाराष्ट्रांतील अत्युच्च शिक्षण मिळालेला जो वर्ग त्या वर्गाच्या पसंतीस जो ग्रंथ उतरेल तोच श्रेष्ठ होय, असा माझा दुसरा समज आहे. महाराष्ट्रांत प्रस्तुतकालीं अत्युच्च शिक्षण मिळालेला जो वर्ग आहे त्या वर्गाला यूरोपांतील सारस्वत माहीत झालेलें आहे. उत्कृष्ट कोणतें व अपकृष्ट कोणतें हें तो वर्ग उत्तमोत्तम जाणतो. तेव्हां एखाद्यानें आपला ग्रंथ त्याच्यापुढें मांडला तर त्याची

किंमत ते लोक कोणत्या कसोटीनें व किती कसोशीनें करतील हें स्पष्ट आहे. प्रस्तुतकालीं सहृदय असे शिकलेले लोक पहावे तर ते उच्चप्रतीच्या यूरोपियन कादंबऱ्याच वाचण्यांत गुंग झालेले दिसतात. ह्या लोकांना मराठी कादंबऱ्या वाचण्याला जो लावील व त्या वाचल्या नाहींत तर उत्कृष्ट विचारांना आपण मुकूं असें जो त्यांना भासवील तोच उत्कृष्ट कादंबरीकाराच्या पदवीला प्राप्त होईल.

कादंबरीचें कार्य

महाराष्ट्रांतील अद्भुत व वास्तविक कादंबऱ्यांची परंपरा काय, अद्भुत कादंबरीचें स्वरूप काय व वास्तविक कादंबरीचें मर्म कोणतें इत्यादि प्रकरणांचा ऊहापोह थोडक्यांत होण्यासारखा होता तेवढा केला. त्यावरून इतकें दिसून आलें कीं, समाजांतील व व्यक्तींतील गुणांचें व विचारांचें प्रदर्शन करण्यास हीं दोन साधनें उत्तम आहेत; इतकेंच नव्हे तर समाजांत उत्कृष्ट विचारांचा व पुरुषार्थाच्या कल्पनांचा प्रसार करण्यास कादंबरीसारखें दुसरें सोपें साधनच नाहीं. ह्या उत्कृष्ट विचारांचा व पुरुषार्थाच्या कल्पनांचा प्रादुर्भाव ज्या व्यक्तींच्याठायीं झाला असें कादंबरीकारांना दाखवावयाचें असतें, त्या व्यक्ती व्यवहारांतील वर्तमान समाजांत प्रायः असणें अशक्यच असतें. त्या कादंबरीकाराच्या अद्भुत सृष्टींतच वास करीत असतात. परंतु वास्तविक कादंबरीकारानें त्या एकदां आपल्या वास्तविक कथानकांत आणून सोडल्या म्हणजे त्या वाचकांचीं मनें आपल्याकडे आकर्षून घेतात व संतांप्रमाणें वाचकांना तात्काळ आपल्यासारखें करून टाकतात. मतप्रसाराचें काम कादंबऱ्या करतात त्या हें असें करितात. कथानकांतील पात्रांशीं तादात्म्य पावण्याचा मनुष्यमात्राचा स्वभावच आहे. कादंबऱ्या वाचतांना त्यांतील पात्रांचीं सुखें, दुःखें, संकटें, विजय आणि शेवटीं मतें आपलींच आहेत अशी भावना वाचकांच्या मनांत उद्भवते आणि ही भावना उद्भवली म्हणजे कादंबरीकारांचें कार्य सफल होतें. ऐतिहासिक कादंबऱ्या लिहिण्याचा तरी हाच हेतु असतो. आतां कादंबरीचें ऐतिहासिक म्हणून एक निराळेंच सदर काढीत असतात, परंतु तसें करण्याचें कांहीं एक कारण नाहीं. ऐतिहासिक हा जर कादंबऱ्यांचा एक निराळाच भाग समजला, तर नैतिक, शास्त्रीय, प्रावासिक, प्रेमळ, राजकीय, वगैरे नानाप्रकारचे असंख्य वर्ग करणें जरूर पडेल. परंतु तें अनवस्थित अतएव अशास्त्र होय.

समाजांत कादंबऱ्यांचें कार्य काय असतें हें वरील कलमांवरून ध्यानांत येण्यासारखें आहे. अर्थात, लोक कादंबऱ्या फार वाचतात, म्हणून नाकें मुरडणाऱ्या व हकाटी करणाऱ्या कित्येक लोकांना आपला प्रतिस्पर्धी किती जुनाट व केवढा बलाढ्य आहे ह्याचा यथास्थित अंदाज झालेला नसतो असेंच म्हणावें लागतें. हा जर अंदाज त्यांना होईल तर ह्या राक्षसाचा अधिक्षेप करण्यापेक्षां आत्मकार्यार्थ

ह्याचें साहाय्य घेणें जास्त हिताचें आहे हें त्यांच्या ध्यानांत येईल. समाजांत अमुक एका मताचा प्रसार व्हावा अशी इच्छा उत्पन्न झाली म्हणजे सरस्वतीच्या ह्या मांडलिकाला ही इच्छा अमलांत आणण्याची विनंति केली असतां ती तो खुशीनें मान्य करील. आपली उपयुक्तता दाखवून मान्यता वाढवून घेण्याची असली अलभ्य पर्वणी कोण शहाणा व्यर्थ दवडील ? समाजाची इच्छा काय आहे, त्याचें स्वरूप समजून घेऊन तो आपल्या कामाला जारीनें लागेल. लहान मुलांना पशुपक्षांच्या गोष्टी सांगून त्यांच्या मनांत युक्ति व साहस ह्यांचें बीजारोपण करील; स्त्रीजनांना संसारसुखाची गुरुकिल्ली पटवील; तरुणांना राष्ट्रीय महत्त्वाकांक्षेचें रहस्य कळवील; आणि वृद्धांना आयुष्याच्या इतिकर्तव्यतेचें दिग्दर्शन करील; आणि इतकेंहि करून तें कसें व केव्हां केलें हें कोणाला समजून देणार नाहीं. अशी ह्या मयासुराची करणी आहे. युधिष्ठिराप्रमाणें ती ज्या लोकांना लाधली ते लोक धन्य होत !

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. ह्यांचे
क्रमांक 2.3.3.4.4 दि: [illegible]
क्रमांक 2.2.3.7 नों: दि: 22.12.95



REFBK-0009755